मा. ५१

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
( जिल्हा वाचनालय ) २०१५

मासिकाचे नांव — का

संपादक — ९३ ४

मासिक क्रमांक — सन — १८८०

अंक — १·३·४·६·७·८·९·१०·११
१८८०·१२

(महिने)

काव्येतिहाससंग्रह (१०)

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

# काव्येतिहाससंग्रह

१८८०

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छायां येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक. ३. जानुआरी, सन १८८०. अंक १.

हें मासिक पुस्तक
पुणें पेठ शनवार, येथें
'श्री शिवाजी' छापखान्यांत छापिलें.

किंमत ८ आणे.

# शिवछत्रपतींचें चरित्र.

## उपोद्घात.

गेल्या अंकीं सुचविल्याप्रमाणें ह्या अंकांत आह्मी श्रीमंत छत्रपति शिवाजी राजे यांचें चरित्र प्रसिद्ध करण्यास आरंभ करितों.

१. हें चरित्र रा० रा० कृष्णाजी अनंत सभासद यांणीं लिहिलें. थोरले राजाराम महाराज यांच्या पदरीं सभासद हे होते. थोरले महाराज ह्मणजे शिवाजी राजे यांचें वृत्त प्रथम पासून विदित करावें, अशी राजाराम महाराज यांणीं आज्ञा केल्यावरून हें चरित्र तंजावर येथें मशारनिल्हे कृष्णाजीपंत यांणीं लिहिलें. शोधा अंतीं असें समजतें कीं, ह्या सभासदांचे वंशज श्रीक्षेत्र करवीर येथें राहतात. हल्लींच्या सभासदांकडून कृष्णाजी अनंत यांचा वृत्तांत व त्यांजकडे असलेली ह्या चरित्राची प्रत मिळण्याकरितां आमचेकडून होणारा तितका प्रयत्न आह्मीं केला; परंतु अद्यापि तो सफळ झाला नाहीं. आमची कोल्हापूरकर मित्रमंडळी या कामीं आह्मांस मदत करतील अशी खूप उमेद *आहे.

२. ह्या चरित्रांत अर्थात् शिवाजी राजे यांचें वृत्त कथन केलें आहे. राजे यांच्या पूर्वजांची हकीगत जशी असावी तशी यांत दिलेली नाहीं. इतकें साद्यंत खुलासेवार चरित्र लिहिण्यास जितका वेळ व स्वस्थता पाहिजे तितकी सभासद यांस मिळाली नसावी, असें राजाराम महाराजांच्या कारकीर्दींत जी धामधूम चालली होती त्यावरून अनुमान होतें. तथापि शिवाजी राजे यांणीं जीं जीं महत् कार्यें आरंभून सिद्धीस नेलीं त्यांतून एकाद्याचें वर्णन सभासदांनीं आपले संक्षिप्त चरित्रांत गाळल्याचें बिलकुल आढळत नाहीं.

३. आह्मांकडे ह्या चरित्राच्या एकंदर पांच प्रती आल्या. पैकीं दोन असल व तीन आलीकडे केलेल्या नकला आहेत.

(अ) प्रथम प्रत प्रतापगड येथील पूजारी यांजकडून आह्मां करितां रा० रा० दामोदर भिकाजी जठार यांणीं मिळविली. ही असलच मिळाली. ही फार जुनी असून घोंटीव जुंनरी कागदाच्या अर्ध बंदावर एका आंगानें

---

* टी० वरचा मजकुर लिहिल्यानंतर आह्मांस आता असें कळून येतें कीं हल्लींचे करवीरस्थ सभासद यांस कृष्णाजी अनंत हे त्यांचे कोण होते हें स्पष्टपणें कळत नाहीं! त्याजकडे असलेली बखर साताराचे पारसनीस यांजकडून त्यांणीं नेली असेंही समजतें.

॥ श्री ॥

श्रीमंत महाराज राजश्री राजाराम साहेब छत्रपती,

साहेबांचे शेवेशीं. ४

विनंती सेवक कृष्णाजी अनंत सभासद* कृतानेक विज्ञापना ऐसी जे, साहेबीं मेहरबानी करून सेवकास पुसिलें कीं, " आपले पिते थोरले राजे यांणीं इतका पराक्रम केला व चार पातशाहींशीं दावा लाविला. ऐसा पराक्रम केला. ऐसे असतां औरंगजेब येऊन [ त्याणें ] किलोकिल्लीं अनर्थ मांडिला†. याचा अर्थ काय ? तुह्मी पुरातन राज्यांतील माहीत [गार] लोक आहां तरिं ईस्तक[1]बिल पासून चरित्र लेहून देणें. " ह्मणोन आज्ञा केली त्याजवरून वर्तमान ऐसी जे.

राजियांचे बाप थोरले महाराज राजश्री शाहाजी राजे, यांचे बाप म्हणजे राजियांचे आजे राजश्री मालोजी राजे व विठोजी राजे भोंसले हे निजामशाही वजीर दौलता करून तालेदारीनें‡ होते. त्यांची निष्ठा श्रीशंभुमहादेव यांचे भजनीं बहुत होती. त्यास शिखरीं यात्रा चैत्रमाशीं भरते. पांचसात लक्ष माणसें मिळतात. पाणियाचें बहुत संकट. उदक नाहीं. तीन कोशावरून उदक आणतात. लोक श्रमी बहुत होतात. ह्मणून राजश्री मालोजीराजे यांनीं तेथें जागा पाहून तळें एक थोर बांधिलें. सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें. अपरमित द्रव्य खर्च केलें. तळें संपूर्ण उदकानें भरलें. हें करितांच रात्रौ श्री शंभुमहादेव स्वप्नास[2] येऊन, प्रसन्न होऊन बोलिला जे, " तुझ्या वंशांत आपण अवतार घेऊं. देव ब्राम्हणाचें संरक्षण करून म्लेंछांचा क्षय करतों. दक्षण देशचें राज्य[3] देतों." म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला. त्याजवरून राजे बहुत संतोषी होऊन दानधर्म बहुत केला.

पुढें राजश्री मालोजी राजे यांच्या पोटीं राजश्री शाहाजी राजे [ व ] राजश्री सरफजी राजे हे दोघे पुत्र जाहाले. दोघांनीं पातशाही मध्यें

---

* "सभासद राजमंडळ" पाठांतर.

† औरंजेब दक्षिणेंत स० इ० १६८३ पासून १७०७ पर्यंत लढायाकरीत होता. गोंवळकोंडा व विजापूर हीं राज्यें खालसा केल्यावर ( १६८६-८७ ) तो मराठ्यांच्या पाठीमागें लागला. खुद्द राजाराम यास कर्नाटकांत पळून जावें लागलें. या गोष्टीस अनुलक्षून वरील लेख आहे.

१. इस्तकबील=अमक्या दिवसापासून =आरंभापासून.

‡ तालेदारीनें=डौलानें, थाटानें.

२. " जागृतीमध्यें स्वप्नांत येऊन " प्रतापगड प्रत. " जागृतीस येऊन " महाड प्रत.

३. " दक्षिण देशीं नर्मदापर्यंत राज्यापट देतों " म० प्र०

## रा० ब० महादेव गोविंद रानडे यांचा ह्या पुस्तकाविषयीं अभिप्राय.

**काव्येतिहास-संग्रहा**चें पुस्तक निघूं लागल्यास बरेच दिवस झा या मुदतीपर्यंत हें मासिक पुस्तक प्रसिद्ध करण्याचें काम अव्याह ानें चाललें आहे, ही गोष्ट मोठी आनंदाची आहे. जुन्या इतिहासा या ग्रंथांचा संग्रह इकडील प्रांतांत बराच असून तो प्रसिद्ध करण्याचें का आजवर विशेष आस्थेनें कोणीं केलें नाहीं. तें काम किती महत्वाचें आ हें आज कळून येणार नाहीं. जेवढ्या बखरी व इतिहास प्रसिद्ध करण्या सारखे आहेत तेवढे प्रसिद्ध झाले ह्मणजे त्यांच्या साह्यानें सारासार विचा करून ज्या वेळेस नवीन इतिहासाचा ग्रंथ लिहिण्याचें कोणीं काम हातं घेईल त्या वेळेस ह्या उद्योगाची खरी योग्यता कळून येईल. **पुणें** किंव **मुंबई** येथें एखादी कमेटी नेमून सर्व ठिकाणीं त्याच्या शाखा स्थापून, ग्रं मिळवून, ते प्रसिद्धीस आणावे, हा विचार माझे मनांत पुष्कळ दिवस होता व त्या धोरणानें अल्प स्वल्प उद्योगही ग्रंथ मिळविण्याचे कामीं चालू केले होते. इतक्यांत हें पुस्तक निघूं लागल्यामुळें त्यासच होईल ती मदत करावी ह्मणजे कांहीं दिवसांनीं इष्ट हेतु सिद्धीस जातील, असें समजून मज जवळ असलेल्या संग्रहापैकीं कांहीं बखरी व कैफीयती पुस्तक कर्त्यांकडे पाठवून दिल्या. त्या त्यांच्या सवडी प्रमाणें प्रसिद्ध होतील. हल्लीं जितके अंक निघाले आहेत, त्यांत मुख्यत्वेंकरून दोन बखरी छापण्यांत आल्या आहेत. एक **पेशव्यांची** बखर, व दुसरी **भाऊसाहेब** यांची बखर. पैकीं **पेशव्यांच्या** बखरीहून **भाऊसाहेब** यांची बखर विशेष योग्यतेची आहे, असें दोन्ही बखरी वाचून पाहिल्यावरून वाटतें. **भाऊसाहेब** यांची बखर वाचून पाहिली असतां आपल्या लोकांत इतिहासाविषयीं अभिरुचि मुळींच नाहीं असा जो वृथा आरोप करण्यांत येतो तो पुष्कळ अंशीं निर्मूल आहे असें सर्वत्रांस कळून येईल. **हिंदुस्तानां**तील इतर प्रांतांत आपल्या इकडील बखरी सारखे ग्रंथ झाले नाहींत, याचें उघड कारण राजसत्तेच्या संबंधानें परवशता असल्यामुळें स्वदेशीय कवींस किंवा ग्रंथकारांस परस्थ लोकांचे पराक्रम वगैरे वर्णन करण्यास हौस वाटण्याचा संभव मुळींच नाहीं, हें होय. मुसलमानी ग्रंथकारांनीं इतिहास लिहिले आहेत, याचें कारण इतिहास लिहिण्यासारखे पराक्रम यांच्या लोकांकडून या देशांत झाले. तरे

☞ आपण ह्या उपयुक्त पुस्तकास आश्रय देऊन हें ग्रंथ-जीर्णोद्धाराचें काम उरकण्यास साहाय्य कराल अशी खूप उमेद बाळगून हा ह्या वर्षाचा प्रथम अंक आपल्याकडे पाठविला आहे. आश्रय देण्याची मर्जी नसल्यास फेब्रुआरीचे आंत आह्मांस पोंचेल अशा बेतानें हा अंक परत पाठविण्याची कृपा करावी.

## विषयक्रम.

**बखरी.**

शिवछत्रपतींचें चरित्र १–१२.

पत्रें, यादी वगैरे. ५–८.

**मराठी कविता.**

मोरोपंतकृत.—गोपी-गोडवा. मारुति-स्तुती. २५–३२.

वामन पंडित.—हनुमंत-स्तव. राम-स्तव. भगवद्गीता. विष्णु ध्यान. स्फुट-सवाया. ७१-७८

**संस्कृत कविता.**

मंत्ररामायणम्. २९९–३०६.

त्रिविक्रमकृत मदलसा-चंपूः १–८.

# शिवछत्रपतींचें चरित्र.

## उपोद्घात.

गेल्या अंकीं सुचविल्याप्रमाणें ह्या अंकांत आह्मी श्रीमंत छत्रपति शिवाजी राजे यांचें चरित्र प्रसिद्ध करण्यास आरंभ करितों.

१. हें चरित्र रा० रा० कृष्णाजी अनंत सभासद यांणीं लिहिलें. थोरले राजाराम महाराज यांच्या पदरीं सभासद हे होते. थोरले महाराज ह्मणजे शिवाजी राजे यांचें वृत्त प्रथम पासून विदित करावें, अशी राजाराम महाराज यांणीं आज्ञा केल्यावरून हें चरित्र तंजावर येथें मशारनिल्हे कृष्णाजीपंत यांणीं लिहिलें. शोधा अंतीं असें समजतें कीं, ह्या सभासदांचे वंशज श्रीक्षेत्र करवीर येथें राहतात. हल्लींच्या सभासदांकडून कृष्णाजी अनंत यांचा वृत्तांत व त्यांजकडे असलेली ह्या चरित्राची प्रत मिळण्याकरितां आमचेकडून होणारा तितका प्रयत्न आह्मीं केला; परंतु अद्यापि तो सफळ झा‍ला नाहीं. आमची कोल्हापूरकर मित्रमंडळी या कामीं आह्मांस मदत करतील अशी खूप उमेद *आहे.

२. ह्या चरित्रांत अर्थात् शिवाजी राजे यांचें वृत्त कथन केलें आहे. राजे यांच्या पूर्वजांची हकीगत जशी असावी तशी यांत दिलेली नाहीं. इतकें साद्यंत खुलासेवार चरित्र लिहिण्यास जितका वेळ व स्वस्थता पाहिजे तितकी सभासद यांस मिळाली नसावी, असें राजाराम महाराजांच्या कारकीर्दींत जी धामधूम चालली होती त्यावरून अनुमान होतें. तथापि शिवाजी राजे यांणीं जीं जीं महत् कार्यें आरंभून सिद्धीस नेलीं त्यांतून एकाद्याचें वर्णन सभासदांनीं आपले संक्षिप्त चरित्रांत गाळल्याचें बिलकुल आढळत नाहीं.

३. आह्मांकडे ह्या चरित्राच्या एकंदर पांच प्रती आल्या. पैकीं दोन असल व तीन अलीकडे केलेल्या नकला आहेत.

(अ) प्रथम प्रत प्रतापगड येथील पूजारी यांजकडून आह्मां करितां रा० रा० दामोदर भिकाजी जठार यांणीं मिळविली. ही अस्सलच मिळाली ही फार जुनी असून घोटीव जुनरी कागदाच्या अर्ध बंदावर एका आंगानें

* टी० वरचा मजकुर लिहिल्यानंतर आह्मांस आतां असें कळून येतें कीं हल्लींचे करवीरस्थ सभासद यांस कृष्णाजी अनंत हे त्यांचे कोण होते हें स्पष्टपणें कळत नाहीं! त्याजकडे असलेली बखर सातारचे पारसनीस यांजकडून त्यांणीं नेली असेंही समजतें.

लिहिलेली आहे. अक्षर सुरेख वळणदार आहे. हिचे ३०५ बंद आहेत. यांपैकीं १२१ पासून १२५ पर्यंत ५ बंद गाहाळ झालेले आहेत. बाकी सर्व पत्रें शाबूद आहेत. ही प्रत (निदान हें चरित्र) शके १६११ मध्यें चंदी चंदावर येथें लिहिली असें हिच्या शेवटीं लिहिलें आहे. ज्या ज्या प्रतींत मूळ लेखाचें साल दिलें आहे तेथें १६११ हेंच दिलें आहे. परंतु संवत्सरा वरून पाहतां ही बखर १६१९ मध्यें लिहिली असें होतें. संवत्सर ही सर्वत्र एकच एकच आहे तो ईश्वर हा होय. शकाच्या आंकड्याची चुकी सर्व प्रतींत दृष्टीस पडते ती कशी घडली असेल ती नकळे असो. ही प्रत फार जुनी, तशांत प्रतापगडावरील, असल्यामुळें हिचीच प्रत ह्या पुस्तकांत प्राधान्यें करून येईल. क्वचित् फेरफार करणें बरें वांटल्यास दुसऱ्या प्रतीवरून केला जाईल. ह्या प्रतीचें नांव 'प्रतापगडची प्रत' असें ठेवूं.

(आ) दुसरी प्रत पुणें येथील नेटिव जनरल लायब्ररींत मिळाली. ही स० इ० १८९२ सालीं तयार केली असें तिचे शेवटीं लिहिलें आहे. प्रत तयार करणारानें जुनी भाषा जागोजाग काढून नवीन अलीकडील भाषा घालण्याचा प्रयत्न केला आहे, व कांहीं ठिकाणीं तर मूळांतील मजकूर गाळलाही आहे, असें ही प्रत 'प्रतापगडचे' प्रतीशीं ताडून पाहतां कळून आलें. ही फूलस्क्याप कागदाच्या वर्खांवर दोन्ही बाजूंनीं लिहिलेली आहे. हिचीं पृष्ठें १८५ आहेत. अक्षर सुवाच्य व सुरेख आहे. ही बुकाप्रमाणें बांधलेली आहे. ह्या प्रतीचा ताडून पहण्यांत फारसा उपयोग झाला नाहीं. कोठें कोठें अर्थनिर्णयाच्या मात्र ती उपयोगी पडली. ही 'पुणें प्रत.'

(इ) साताऱ्याहून दोन प्रती आम्हास मिळाल्या. पैकीं १ नक्कल आहे. ही सावंत आहे. ही कोठील प्रतीची नक्कल हें समजत नाहीं. प्रतापगडचे प्रतीशीं ही पुष्कळ अंशीं जमते. ही 'सातारा प्रत.'

(ई) दुसरी साताऱ्याहून मिळाली ती असल आहेसें वाटतें. ही त्रुटित आहे. पाहिला बंद गाहाळ झाला आहे. पुढें २५ बंदापर्यंत ती उपलब्ध आहे. तितक्यांत अफजलखानाचा वध करून प्रतापगडीं जगदंबेचें मंदीर बांधण्याचें काम लाविलें, इतकी हकीगत आहे. ही साध्या खर्ची कागदावर लिहिली आहे. ह्या दोन ही प्रती साताऱ्याहून रा० रा० कृष्णाजीपंत कालगांवकर याजकडून मिळाल्या.

(उ) पांचवी प्रत माहाड येथें रा० रा० अंताजी रामचंद्र हरडीकर यांणीं एका जुन्या प्रती वरून नक्कल करून पाठविली ती होय. हिच्या

व प्रतापगडच्या प्रतीच्या पाठांत पुष्कळ ठिकाणीं अंतर असतें. तें स्थळीं स्थळीं दर्शविलें आहे.

४. ह्या पुस्तकांत बखरी छापण्याचा जो क्रम सुरू केला त्यावर कित्येकांचा असा आक्षेप निघाला कीं, मराठेशाईचा पाया घालणाऱ्या पुरुषाचें चरित्र प्रथम सुरू करावयाचें तें नकरितां दुसऱ्या बखरीस आधीं आरंभ केला हें कसें ? आमच्या मनांत ही गोष्ट पूर्वीं आली नाहीं असें नाहीं. आमची मनीषा ह्या पुण्य-प्रतापी पुरुषाच्या चरित्रास प्रथम आरंभ करावा अशीच होती. परंतु शिवाजी राजे यांचें एक ही चरित्र आह्मांस प्रथम उपलब्ध नव्हतें. तेव्हां फक्त कालानुक्रमास अनुसरण्यासाठीं झालेला संग्रह तसाच ठेवून द्यावा हे ठीक नाहीं असें समजून, जी बखर आह्मांस प्रथम मिळाली ती—ह्मणजे पेशव्यांची—सुरू केली. हे शिवाजी राजाचें चरित्र मागाहून उपलब्ध झालें. असो, या प्रकरणीं आमचें वाचकांस इतकें कळविणें जरूर आहे कीं, चरित्रें, बखरी, पत्रें वगैरे या पुस्तकांत कालानुक्रमानें घालणें वस्तुतःच मुष्कील आहे. सर्व लेख-संग्रह आमच्या पाशीं येऊन पडल्यावर कालानुक्रम लावून नंतर प्रसिद्धीचें काम चालवूं. असें ह्मटल्यास मग या कामीं पुढें पाऊल पडणेंच अशक्य आहे. असें समजून जसजसे ग्रंथ येतील व जसजशा त्यांच्या प्रती आह्मांस उपलब्ध होतील त्या त्या प्रमाणें सोईस पडेल तसेच हे ग्रंथ छापणें भाग आहे.

॥ श्री ॥

श्रीमंत महाराज राजश्री राजाराम साहेब छत्रपती,
साहेबांचे सेवेशीं.

विनंती सेवक कृष्णाजी अनंत सभासद* कृतानेक विज्ञापना ऐसी जे, साहेबीं मेहरबानी करून सेवकास पुसिलें कीं, "आपले पिते थोरले राजे यांणीं इतका पराक्रम केला व चार पातशाहींशीं दावा लाविला. ऐसा पराक्रम केला. ऐसे असतां औरंगजेब येऊन [ त्याणें ] किल्लोकिल्लीं अनर्थ मांडिला†. याचा अर्थ काय? तुम्ही पुरातन राज्यांतील माहीत [गार] लोक आहां तरि इस्तकबिल¹ पासून चरित्र लेहून देणें." म्हणोन आज्ञा केली त्याजवरून वर्तमान ऐसी जे.

राजियांचे बाप थोरले महाराज राजश्री शाहाजी राजे, यांचे बाप म्हणजे राजियांचे आजे राजश्री मालोजी राजे व विठोजी राजे भोंसले हे निजामशाही वजीर दौलता करून तालेदारीनें‡ होते. त्यांची निष्ठा श्रीशंभुमहादेव यांचे भजनीं बहुत होती. त्यास शिखरीं यात्रा चैत्रमासीं भरते. पांचसात लक्ष माणसें मिळतात. पाणियाचें बहुत संकट. उदक नाहीं. तीन कोशावरून उदक आणतात. लोक श्रमी बहुत होतात. म्हणून राजश्री मालोजीराजे यांनीं तेथें जागा पाहून तळें एक थोर बांधिलें. सर्वत्र लोकांस उदक कार्यास येई असें केलें. अपरमित द्रव्य खर्च केलें. तळें संपूर्ण उदकानें भरलें. हें करितांच रात्रौ श्री शंभुमहादेव स्वप्नांत² येऊन, प्रसन्न होऊन बोलिला जे, "तुझ्या वंशांत आपण अवतार घेऊं. देव ब्राम्हणाचें संरक्षण करून म्लेंछांचा क्षय करतों. दक्षण देशचें राज्य³ देतों." म्हणोन त्रिवार वचन करून वर दिला. त्याजवरून राजे बहुत संतोषी होऊन दानधर्म बहुत केला.

पुढें राजश्री मालोजी राजे यांच्या पोटीं राजश्री शाहाजी राजे [ व ] राजश्री सरफजी राजे हे दोघे पुत्र जाहाले. दोघांनीं पातशाही मध्ये

---

* "सभासद राजमंडळ" पाठांतर.

† औरंजेब दक्षिणेंत स० इ० १६८३ पासून १७०७ पर्यंत लढायाकरीत होता. गोंवळकोंडा व विजापूर हीं राज्यें खालसा केल्यावर (१६८६-८७) तो मराठ्यांच्या पाठीमागें लागला. खुद्द राजाराम यास कर्नाटकांत पळून जावें लागलें. या गोष्टीस अनुलक्षून वरील लेख आहे.

१. इस्तकबिल=अमक्या दिवसापासून =आरंभापासून.

‡ तालेदारीनें=डौलानें, थाटानें.

२. "जागृतीमध्यें स्वप्नांत येऊन" प्रतापगड प्रत. "जागृतीस येऊन" महाड प्रत.

३. "दक्षिण देशीं नर्मदापर्यंत राज्यापट देतों" म० प्र०

दौलता केल्यीं. निजामशाही बुडाली. यावरि शाहाजी राजे इदलशाही वजीर झाले. महाराज [हा] किताब दिला. दहाबारा हजार फौज चालूं लागली. शाहाजी राजियासि दोघी स्त्रिया. प्रथम स्त्री जिजाई आऊ. दुसरी स्त्री तुकाबाईआऊ. तिचे पोटीं एकाजी राजे पुत्र झाले. जिजाईआऊ, तिचे पोटीं राजश्री शिवाजी राजे पुत्र होतांच* श्रीशंभुमहादेव जागृतीं येऊन स्वप्न झालें कीं, "आपणच अवतरलों आहे. पुढें बहुत ख्यात करणें आहे. बारा वर्षे पर्यंत तुम्हीं आपले जवळ ठेवावें. पुढें न ठेवणें. जातील तिकडे जाऊं देणें आटोप न करणें." ऐशी जागृती झाली. शाहाजीराजे कर्नाटक प्रांतीं बेंगरूळें येथें होते. त्यापाशीं कारभारी राजश्री नारोपंत† दीक्षित होते. त्यांच्या पोटीं रघुनाथपंत व जनार्दनपंत हे दोघे पुत्र बहुत शाहाणे झाले. शाहाजी राजे यांसि [13]दौलते मध्यें पुणें परगणा होता. तेथें दादाजी कोंडदेव शाहाणा, चौकस ठेविला

४. "दौलत करीत असतां निजामशाही बुडाली" सा० प्र०

५. निजामशाही=अहमदनगरची पादशाही. हिचा शेवट स० इ० १६३७ मध्यें झाला. निजामशाहीकरितां शहाजी फार भांडला. परंतु शेवटीं त्याचा नाइलाज झाल्यावर विजापूरचा दिवाण जो मुरारपंत याचे मार्फत तो अदलशाही मनसबदार झाला.

६. इदलशाही=अदलशाही=विजापूरकरांचें राज्य.

७. "सरफजी राजे मोंगलाई वजीरपणा करून चाकर होऊन राहिले" असें म० प्र० आहे.

८. "प्रथम स्त्री नांव जिजाई तिचे पोटीं पुत्र संभाजीराजे झाले दुसरे पुत्र शिवाजीराजे झाले" असा म० व सा० प्रतींचा पाठ. जिजाबाई ही लखुजी जाधव शिंदखेडकर यांची कन्या. शहाजीचें व जाधव यांचें कधींच बरें नव्हतें. याजकरितां जिजाईवर शहाजीचें प्रेम कमी असे.

९. एकोजी ऊर्फ वेंकोजी. याची आई तुकाबाई ही मोहित्यांची कन्या. हिशीं शके १५५२ मध्यें शहाजीनें लग्न लाविलें.

* शहाजीचा पाठलाग मोंगल करीत असतां पळतां पळतां, त्याणें जिजाबाईस शिवनेरी किल्ल्यांत ठेऊन आपण विजापुरास गेला. त्या वेळीं जिजाबाई गरोदर होती. तिणें शिवनेरीच्या शिवाई देवीस नवस केला कीं, पुत्र झाला तर तुझें नांव ठेवूं. त्यापुढें शिवाजीचा जन्म वैशाख शुद्ध द्वितीयेस झाला. शके १५४९ या वेळीं शिवाजीस साहा ग्रह उच्चीचे पडले असा लेख आहे.

१०. ख्यात=ख्याति=पराक्रम.

११. याचे पुढें सा० व म० प्रतींत असें आहे:—"दान धर्म दुसरे दिवशीं बहुत केला. दुसरी स्त्री तुकाई आऊ तिचे पोटीं पुत्र व्यंकाजीराजे झाले असे तिघे पुत्र झाले त्यामध्यें संभाजीराजे वडील. यांसि विजापुराहून वेगळी दौलत झाली होती. त्यांसि बडी साहेबीन बाईल (?) सुलतान महंमद पादशाह याची स्त्री विजापुरीं होती तिणें विश्वासघात करून विषाची लुगदी दिली तेव्हां ते मेले." लुगदी=लगदा, मळून केलेली गोळी.

१२. बेंगरूळ=बेंगलोर. कोल्हार, होसकोटा, बाळापूर, सेरा व बंगलूर हे पांच प्रांत शहाजीस कर्नाटकांत जाहागीर होते.

† नारो त्रिमळ हनमंते.

१३. दौलत=संपदा=(येथें) जाहागीर.

१४. 'बाबजी कोंडदेव' असा म० प्रतीचा सर्वत्र पाठ आहे.

होता. तो बेंगरूळास महाराजांचे भेटीस गेला. त्या बरोबर राजेश्री शिवाजी राजे व जिजाबाईआऊ ऐशीं गेली तेसमयीं राजियास वर्षें बारा होतीं. बराबर शामराव निळकंठ ह्मणून पेशवे करून दिले; व बाळकृष्णपंत व नारोपंत दीक्षिताचे चुलत भाऊ[१५] मजुमदार[१६] दिले व सोनोपंत डबीर[१७] व रघुनाथ बल्लाळ सबनीस[१८], ऐसे देऊन दादाजी पंतास व राजे यांसि पुण्यास रवाना केले. ते पुण्यास आले.

येतांच बारा[१९] मावळें काबीज केलीं. मावळे देशमुख बांधून, दस्तें[२०] करून, पुंड होते त्यांस मारिलें. त्याजवर कालवशात् दादाजी कोंडदेव मृत्यु *पावले. पुढें शिवाजी राजे आपणच कारभार करीत चालले. मग सुपे महाल येथें कोणें एके जागां संभाजी मोहिता म्हणोन सावत्र आईचा भाऊ, मामा होता. तो महाराजांनीं[२१] माहालोंवेरि[२२] ठेविला होता; त्याचे भेटीस शिमग्याचे सणास पोस्त मागावयास ह्मणून गेले. मामास कैद करून ठेविलें†. त्याचे तीनशें घोडे पागेचे होते व द्रव्य ही बहुत होतें. वस्तभाव, कापड हस्तगत करून सुपें देश साधिलीं[२३]. तुकोजी चोर मराठा म्हणोन लष्करचा सरणोबत[२४] केला. शामराव निळकंठ पेशवे व बाळकृष्णपंत मजुमदार व नारोपंत व सोनाजीपंत व रघुनाथ बल्लाळ सबनीस असे कारभारी करून, बहुत सावधपणें चौकशीनें वर्तणूक करीत चालले.

---

१५. "चुलते व भाऊ मुजुमदार" म० प्र०

१६. "अमात्यःस्यान् मुजुम्दारः" राजव्यवहार कोश.

१७. "युक्त्यभिज्ञो दबीरःस्यात्" रा० व्य० को०

१८. "सबनीसस्तथा सेनालेखकःपरिकीर्तितः" रा० व्य० को०

१९. ही बारा मावळें कोणतीं? मुन्हे, नाणें व हिरडस वगैरे तीन चार रोजच्या प्रचारांतील आहेत.

२०. दस्त करणें=धरणें.

* दादाजी कोंडदेव हा तालुके पाटस येथील मलठण गांवचा कुळकर्णी. यानें मावळ, जुन्नर वगैरे देश चांगल्या दशेस आणिला. मलिकांबरी धाऱ्याची पद्धती सुरू करून जाहागिरीचें उत्पन्न वाढविलें. बक्षीसें देऊन क्रूर पशु मारविले व मावळे लोकांस नौकरींत ठेऊन त्यांस सुधारण्याचा क्रम घातला. शिवाजीच्या पुंडाईबद्दल दादोबास पहिल्यानें वाईट वाटून त्याणें "हे ढंग सोडून द्या. ह्यांतच तुमच्या बापाचें व तुमचें हित आहे" असें शिवाजीस सांगून पाहिलें पण तें सर्व व्यर्थ गेलें. शेवटीं मृत्युसमयीं "गोब्राह्मणाचें प्रतिपालन करण्याचा जो उद्योग तुह्मी आरंभिला आहे तो तसाच चालवून धर्मसंस्थापना करा. ह्यांत देव तुह्मांस यश देईल." असा उपदेश त्याणें शिवाजीस केला.

२१. ह्मणजे शहाजीनें.

२२. 'मोकाशियावर' सा० व म० प्र०

† हा मामा शिवाजीचे पदरीं राहीना तेव्हां त्यास व त्याच्या पदरचे लोकांस शहाजीकडे कर्नाटकांत पाठविलें.

२३. "सुपें देखील कोट साधिला" म० प्र०

२४. "सर्नौबतस्तु सेनानी" रा० व्य० को०

पुढें जुन्नर शहर *मारिलें. घोडे दोनशें पाडाव[२५] केले. तीन लक्ष होनाची मत्ता, खेरीज कापड जिन्नस, जड जवाहीर हस्तगत करून पुण्यास आले. मग अमदानगर शहर मारिलें. मोगलाशीं मोठें युद्ध केलें. सातशें घोडे पाडाव केले. हत्ती ही पाडाव केले, द्रव्य बहुत सांपडलें. ते समयीं पागा बाराशें व शिलेदार दोन हजार जाहाले. अशी तीन हजार स्वारांची बेरीज झाली, तेव्हां माणकोजी †दाहातोंडे सरनोबत लष्करचे केले. मग किल्ले कोंढाणा[२६] इदलशाही होता, तो भेद[२७] करून घेतला. ठाणें आपलें ठेविलें. सवेंच पुरंदरगड इदलशाही येथें निळकंठराव म्हणोन ब्राम्हण गडास खावंद होते. ते मेले. त्यांचे पुत्र ‡दोघे, ते एकांत एक भांडूं लागले. त्यांची समजावीस करावयास म्हणोन राजे पुरंदरास गेले. आणि ते दोघे भाऊ कैद करून तोही गड आपणास घेतला. आपलें ठाणें बसाविलें.

त्याजवरी कोंकणांत कल्याण§ भिवंडी मारिली. आणि माहुली[२८] किल्ला अदलशाही घेतला. मावळे लोक यांची संचणी[२९] करीत चालले. मुरबांद[३०] म्हणोन डोंगर होता त्यास वसविलें[३१]. त्याचें नांव राजगड म्हणोन ठेविलें. त्या गडाच्या चार माच्या[३२] वसविल्या. कोंकणांत चंद्रराव मोरे ह्मणून राज्य करीत होते. व शृंगारपुरीं[३३] सुर्वे राज्य करीत होते. त्याचे प्रधान शिरके होते. असे जबरदस्त गड, कोट[३४], दाहाबारा हजार लष्कर, हशम[३५] समेत राज्य करीत असत. त्यांजकडे रघुनाथ बल्लाळ सबनीस बोलावून पाठविले.

---

* जुन्नर व अहमदनगर हीं ठाणीं मोंगलाचीं होतीं. जुन्नर स० इ० १६५७ मध्यें मारिलें.

२५. पाडाव केले=जीवंत धरले.

† "माणकोजी दुतोंडे" असें ग्रां० ड० ह्म०

२६. मागाहून याचें नांव 'सिंहगड' असें पडलें.

२७. "जोरावारीनें घेतला" म० प्र०

‡ पुरंदरचे मालक तिघे भाऊ होते असें ग्रंथांतरी सांपडतें.

§ कल्याण आबाजी सोनदेव यांणीं मारिलें. मुल्लाना म्हणून तेथील अधिकारी यास कैद करून विजापुरास परत पाठविलें. मुल्लानाची सून आबाजीपंतांनीं महाराजांकारितां अटकावून ठेविली होती तिची महाराजांनीं कल्याणास आल्यावर वस्त्रालंकार देऊन सुटका केली.

२८ ता० शहापूर जिल्हा ठाणें.

२९. संचणी=जमाव, वसाहात.

३०. "मुरबादेश म्हणोन" म० प्र० 'मुरबाद' सा० प्र०

३१. वसविलें=बांधिलें ; तटबंदी केली.

३२. "उपत्यकाद्रु माची स्यात्" रा० व्य० को०

डोंगराच्या पायथ्याशीं किंवा पायथा आणि शिखर यां दरम्यान असणारी सपाटी.

३३. शृंगारपूर हबसाणांत आहे.

३४. "प्राकारः कोटइत्युक्तो गिरिदुर्गं गडः स्मृतः" रा० व्य० को०

३५. हशम=परिचारक (?)

विचार करितां, "चंदरराव मोरे यास मारल्या विरहित राज्य साधत नाहीं. त्यास तुम्हां वांचून हें कर्म कोणास न होय. तुम्हीं त्यांजकडे हेजबीस[३६] जाणें." ऐसें सांगितलें. बराबर निवडक धारेकरी[३७] शें सवाशें माणूस निवडून दिलें. ते स्वार होऊन जावली[३८] नजीक जाऊन पुढें चंदररायास सांगून पाठविलें कीं. "आपण राजियाकडोन आलों आहों. कित्येक बोलणें चालणें तह रह कर्तव्य आहे" असें सांगून पाठविलें. उपरी त्यांनीं त्यांस आपणाजवळ बोलावून भेट घेतली. कित्येक बाह्यात्कारी बोलणें जालें. बिराड दिलें तेथें जाऊन राहिले. दुसरे दिवशीं मागती गेले. एकांतीं भेट घेतली. बोलणें जाहालें. प्रसंग पाहून चंदरराव व सुर्याजीराव दोघां भावांस कटारीचे वार चालविले. जमातीशीं निघून चालिले. पाठी-वर लाग जाहाला त्यास मारून निघोन चालिले. खासाच पडलियावरि लोक काय चालून येतात ? असे कर्म करून परतोन, राजियाकडे भेटीस आले. तेंचे[३९] खासा राजा चालोन जाऊन जावली सर केली. मावळे लोकांस कौलें[४०] देऊन संचणी केली. प्रतापगड म्हणवून नवाच वसविला.* हणमंतराव ह्मणवून चंदररायाचा भाऊ चतुर्बेट ह्मणून जागा जावलीचा होता, तेथें बळ धरून[४१] राहिला. त्यास मारल्याविना जावलीचें शैल्य[४२] तुटत नाहीं. असे जाणून संभाजी कावजी ह्मणून माहालदार[४३] राजियाचा होता त्यास हणमंतराव याजकडे राज्यकारणास पाठवून, सोईरिकीचें नातें लावून, एकांती बोली चालीस जाऊन, संभाजी कावजी यानें हणमंतरायासि कटा-रीचे वार चालवून जिवें मारिलें. जावली काबीज केली. सिवतर खोरि-यांत बावजी राऊ[४४] ह्मणून पुंड[४५] होता. तोही कैद करून त्याचे डोळे काढिले.

पुढें सुर्वे राजे राज्य करित होते त्यांजवर चालून गेले. शृंगारपूर घेतलें. सुर्वे पळोन देशांतरास गेले. त्यांचे कारभारी शिर्के होते त्यांशीं भेदकरून राज्य हस्तगत केलें. त्यांसि माहाल मुलुख देऊन त्यांची कन्या राजियानें आपले पुत्रास † केली. या प्रकारें जावलीचें राज्य व शृंगारपुरचें राज्य ऐशी

---

३६. "दूतो हेजीबनामकः" रा० व्य० को० हेजिबी=दौत्य, वकीली.

३७. धारकरी=तरवार बहादर, वीर.

३८. चंदरराव मोरे याजकडे कृष्णा व वारणा या नद्यांमधील घांटमाथ्याचा मुलुख होता. तो जावलीस राहत असे. ग्रां० ड०

३९. त्या क्षणींच, तावडतोब.

४०. कौल=वसाहत करावी अशाबद्दल सरकारी लेख.

* प्रतापगड मोरो त्रिमल पिंगळे यांणीं बांधिला. हें काम नीट केल्याबद्दल व दुस-ऱ्याही काहीं प्रसंगीं मोरोपंत उपयोगी पडला होता म्हणून त्यास पेशवाईचें पद दिलें.

४४. 'बाबाजी कोंडणें' म० प्र०

४५. पुंड=लुटारू, चोर.

† हें लग्न पुढें झालें असावें.

दोन राज्यें काबीज केलीं; तेव्हां **मोरो त्रिंबक पिंगळे** ब्राह्मण यांनीं वहुत मेहनत केली त्याजवरून **शामराव निळकंठ** याची **पेशवाई*** दूर करून **मोरो-पंतांस पेशवाई** दिली व **निळो सोनदेव** यांणीं ही मेहनत केली ह्मणोन सुरनि-[४६]शी सांगितली. **गंगाजी मंगाजी** म्हणोन होते त्यांस वांकेनिशी[४७] सांगितली. **प्रभाकरभट** म्हणून थोर ब्राम्हण उपाध्ये होते त्यांचे पुत्र **बाळंभट व गो-विंदभट** हे उपाध्येपण चालवीत होते. लष्करचा सरनोबत[४८] **नेताजी पालकर**[४९] व **माणकोजी दाहातोंडे** सरनोबत केला. **नेताजी** सरनोबती करीत असतां सातहजार पागा व तीन हजार शिलेदार† अशीं पांच हजार फौज जाहाली. **मावळे** लोकांची संचणी दाहा हजार पावेतों झाली. यासि सरनोब-त **येसाजी कांक** म्हणून केला. ऐसें राज्य चौकशी बंदोबस्त करून राहिले. राजियाची स्त्री **निंबाळकर** यांची कन्या **सईबाई** केली होती ती प्रसूत जाहली, पुत्र जाहाला. त्याचें नाव **संभाजी राजा** ह्मणून ठेविलें. बहुत उत्साह केला. धर्म बहुत केला. **राजगडीं** राहिले.

मग पुढें या खबरी **दिल्लीस** पातशाहास कळाल्या. **विजापूर** [येथें] **अल्ली‡ इदलशाहा** पादशाही करूं लागले व बडी साहेबीण **सुलतान महमंद** याची बायको ही कारभार कुल्[५०] करीत असतां त्यांस हें वर्तमान कळून बहुत कष्टी जाहाली. पादशाही किल्ले घेतले. देशही काबीज केला. एक दोन राज्यें बुडविलीं. हा पुंड जाहाला. त्यास मारून गर्दीस मेळविण्याचें कसें करावें, ह्मणून विचार करून, राजश्री **शाहाजी** राजे **बेंगरूळाकडे** होते, त्यांस पत्रें लिहिलीं. माहालदार[५१] रवाना केले कीं, "तुह्मी पादशाही चा-कर आणि **शिवाजी** लेक **पुण्याकडे** पाठवून यांणीं पादशाहाशी बदलून

* दूर करण्याचें कारण शामराजपंताचा सिद्दीचे लढाईत पराजय झाला होता.

४६. "बाळकृष्णपंताची मजुमदारी काढून निळोपंतास सांगितली. आबाजीपंत यांणींही ........केली त्यासि सुरनिशी सांगितली" म० प्र०

"सुर्नीसः सचिवस्तथा" रा० व्य० को०

४७. "वांकानवीसोवृत्तांतलेखकः परिकीर्तित" वाकनवीस = खासगीकडील हिशेब व पत्रव्यवहार ठेवणारा कामगार.

४८. सरनोबत = सेनापति.

४९. "जैतोजी पालकर" म० प्र० दाहा तोंडे मेल्यावर पालकर यास हें पद दिलें.

† "शिलेदार : स्वतुरगी" रा० व्य० को० आपला घोडा घेऊन नौकरी करणारा राऊत.

‡ अल्ली हा सुलतान महंमद अदूलशाहा याचा मुलगा याचें वय १८ वर्षांचें होतें. खुद्द महंमदशाहाही स्वभावानें ऐष आरामी होता व त्याचा काल विजापुरांत मोठमोठाल्या इमारती बांधून तें शहर सुशोभित व सुखावह करण्यांत जात असे यामुळें शिवाजीच्या धामधुमीकडे त्यांचें अगदीं दुर्लक्ष झालें.

५०. कुल् = सर्व.

५१. माहालदार = भालदार.

हरामखोरी केली. चार किल्ले पादशाहीं घेतले. देश, मुलुख काबीज केला व मारिला. एक दोन राज्यें बुडविलीं, व एक दोन राजे पादशाहीं रुजुवातींत[52] होते ते मारिले. आतां लेंकास कैदेंवार[53] ठेवणें. नाहीं तरि पादशाही हवाला[54] घेतील" ? असें लिहून पाठविलें. मग महाराजांनीं उत्तर दिलें कीं, "शिवाजी आपला पुत्र, परंतु आपणाजवळून पळोन गेला. तो आपल्या हुकुमांत नाहीं. आपण तो पादशाहाशीं रुजुवात एक निष्ठेनें आहों. शिवाजी आपला पुत्र याजवरि हल्ला करावी, मन मानेल तें करावें. आपण दरम्यान येत नाहीं." असें उत्तर पाठविलें. *

त्याजवरून बडी साहेबीण हिणें कुल वजीर उमराव अदलशाही बोलावून आणून शिवाजी राजियावरि रवाना करावें ह्मणोन पुसतां कोणी कबूल केलें नाहीं. अफजलखान वजीर यांणीं कबूल केलें कीं, "शिवाजी काय ? चढे[55] घोडियानिशीं जिवंत कैद करून घेऊन येतों." असें बोलिलियावरि पादशाहाजादी खुशाल होऊन वस्त्रें, अलंकार, हत्ती, घोडे, दौलत इजाफी[56] देऊन नांवाजीक बरोबर उमराव जमाव बारा हजार स्वार खेरीज पायदळ रवाना केलें.

तेव्हां अवघी फौज एकत्र होऊन आवरस चौरस लष्कर उतरलें. आणि पुढें तुळजापुरास आले. तेथें येऊन मुक्काम केला. श्रीभवानी कुलदैवता महाराजांची, तीस फोडून, जातियांत घालून भरडून पीठ केलें. भवानीस फोडतांच आकाशवाणी जाहाली कीं, "अरे अफजलखाना, नीचा-आजपासून एकाविसावे दिवशीं तुझें शिर कापून तुझें लष्कर अवघें संहार करून नवकोटी चामुंडांस संतृप्त करितें." अशी अश्रणी[57] जाहाली. पुढें लष्कर कूच करून श्रीपंढरीस आलें. भीमातीरीं उतरलें. देवास उपद्रव देऊन वाईस आलें. तेथें येऊन विचार केला कीं, "राजियाकडे हेजिबीस पाठवून, सल्ला करून, पातेजून[58] जिवंत हातीं धरावा." अशी मनांत योजना करून कृष्णाजी भास्कर[59] हेजीब यास बोलावून आणून,

५२. पातशाहीं रुजुवात = पातशहाच्या आज्ञेंत.

५३. कैदवार = आज्ञेंत, हुकुमांत.

५४. हवाला = ताबा, ताबेंत दिलेला मुलुख.

† या उत्तरानें पातशहाची खात्री होईना. शेवटीं बाजी घोरपडे यांजकडून विश्वासघातानें शाहजीस धरवून भिंतींत त्यास कोंडून ठेविलें. पुढें शिवाजीनें शहाजद्याना मार्फत आपल्या बापाची सुटका करविली.

५५. चढे घोडियानिशीं = एकदांही घोड्यावरून न उतरतां, सपाट्यासरसा.

५६. इजाफत = इनाम.

५७. अश्रणी = अशरीरिणी.

५८. पातेजणें = विश्वासविणें.

५९. "पंतोजीपंत" म० प्र० व भा० ड०

सं. ... २०13
ता. २/६/३३



सांगितलें कीं, "तुमचे बाप[६०] महाराज त्यांचा आमचा भाईचारांत पुरातन स्नेह चालला आहे. त्याजमुळें तुह्मीं कांहीं आपणास इतर नाहीं, तुह्मीं येऊन आपल्यास भेटणें. आपण पादशाहा जवळून तुह्मांस तळ कोंकणचें राज्य व जाहागिरी देववितों. गडकोट घेतले ते करार करवितों. वरकड ही नावाजितों. जितकें तुमचे मनांत असल तेणें प्रमाणें सरंजाम देववितों. पादशाहाशीं भेट घेणें तरि घ्या, नाहीं तरि मुलाजमत[६१] माफ करवितों. ऐशा कित्येक गोष्टी सांगोन सल्यांत राजासि भेटीस आणावें. अगर आपण येऊं." असें कृष्णाजीपंता[६२]पाशीं सांगितलें. आणि त्यास पुढें रवाना करावें. [असें केलें]

तों या खबरी राजियासि पावल्या; कीं, "विजापुराहून अफ़्जलखान बारा हजार स्वारांनिशीं नामजाद[६३] जाहाला. हें कळून राजानें आपली कुल् फौज लष्कर मुस्तेद[६४] करावें; आणि जावलीस युद्ध करावें; आपण प्रतापगडास जावें, हा विचार केला. तेव्हां सर्वांनीं निवारिलें कीं, झुंज देऊं नये, सल्ला करावा. त्यास राजे बोलिले जे संभाजी[६५] राजियास असें मारिलें तसे आपणास मारितील. मारितां मारितां जे होईल तें करूं. सल्ला करणें नाहीं." हा विचार केला. तों रात्रीं श्रीभवानी तुळजापुरची [इणें] मूर्तिमंत दर्शन दिलें आणि बोलिली कीं, "आपण प्रसन्न जाहालों. सर्वस्वें साह्य तुला आहें. तुझे हातें अफजलखान मारवितों. तुजला यश देतों. तूं कांहीं चिंता करूं नको." ह्मणून धीर भरवंसा देऊन अभय दिलें. राजे जागे होऊन जिजाबाई आऊस बोलावून आणून स्वप्नाचें वर्तमान सांगितलें. व गोमाजी[६६] नाईक पानसबल जामदार व कृष्णाजी नाईक व सुभानजी नाईक असे मातबर लोक व सरदार व सरकारकून मोरोपंत व निळोपंत व अण्णाजीपंत व सोनाजीपंत व गंगाजी मंगाजी व नेताजी पालकर सरनोबत व रघुनाथ बल्लाळ सबनीस व पुरोहित असे बोलावून

६०. शिवाजीचा बाप शहाजी.

६१. मुलाजमत = भेट.

६२. "पंतोजी पंतास" असा महाड-प्रतीचा पाठ सर्वत्र आहे. सातारा व प्रतापगड प्रतीचा पाठ 'कृष्णाजीपंत' असा सर्व ठिकाणीं आहे. कृष्णाजी भास्कर हा शिवाजीचा वकील होता असें ग्रां० ड० ह्मणतात.

६३. नामजाद = नियुक्त, नेमिलेला. अधिकृत.

६४. मुस्तेद = तय्यार.

६५. संभाजी हा शिवाजीचा वडील बंधु-ह्याजवर शहाजीचें प्रेम विशेष असे. शहाजीला विजापुरीं शिवाजीच्या बंडाबद्दल कोंडून ठेविलें होतें, तेथून त्याची सुटका झाल्यानंतर कर्नाटकांत बंडें झालीं होतीं तेथील बंदोबस्तास त्यास पाठविलें. तेथें कनकगिरी किल्याच्या वेढ्यांत संभाजी पडला. संभाजीस अफजलखान किंवा त्याचा कोणी संबंधी याणें विश्वासघात करून मारिलें असा मराठी बखरींचा झोंक असतो.

६६. गोमाजी नाईक हा जाधवरावाच्या पदरचा एक फार जुनाट माणूस जिजाबाईच्या कामीं फार पडला होता.

सर्वांस स्वप्न सांगितलें. श्री प्रसन्न जाहाली आतां अफजलखान मारून गर्दीस मेळवितों." [असें ह्मणाले.] हें सर्वांचें मतें, कठीण कर्म, सिद्धीस गेलें ह्मणजे बरें, नाहीं तरि कसें होईल ? म्हणोन विचार पडला. मग राजे बोलिले कीं, "सल्ला केलियानें प्राणनाश होईल. युद्ध केलियानें जय जाहलियास उत्तम, प्राण गेलियानें कीर्ति आहे. येविषयीं श्लोक.

जितेन [जयेन ?] लभते लक्ष्मीं मृत्युनापि सुरांगना:
क्षण-विध्वंसिनी काया का चिंता मरणे रणे ? ॥ १ ॥

असा नीतीमध्यें विचार सांगितला आहे. त्याज करितां युद्ध करावें हें खरें. आतां एकच तजवीज करावी. संभाजी राजे पुत्र व मातोश्री आहेत हीं राजगडीं ठेवावीं. जर अफजलखान मारून जय जाहाला तरि माझा मीच आहें. एखादे समयीं युद्धीं प्राणनाश जाहाला, तरी संभाजी राजे आहेत, त्यांस राज्य देऊन यांचे आज्ञेत तुह्मीं राहणें." अशी निर्वाणूक करून, सर्वांस सांगून, मातुश्रीच्या पायांवरि डोई ठेऊन, निरोप घेतला. मातुश्रीनीं आशिर्वाद दिला कीं, "शिवबा ! विजयी होशील."

असा आशिर्वाद घेऊन मग राजे निघोन प्रतापगडास* गेले. नेतोजी पालकर सरनोबत यास लष्कर घेऊन वर घाटावरि येणें म्हणोन सांगितलें. आणि "अफजलखानास जावलीस बोलावितों, सल्ला करून भेटतों, विश्वास लावून जवळ आणितों, तें समयीं तुम्ही घाट माथां येऊन मार्ग धरणें." असें सांगितलें. त्याजबरोबर रघुनाथ बल्लाळ सबनीस दिले. व मोरोपंत पेशवे, व शामराव निळकंठ व त्रिंबक भास्कर त्यांसही समागमें घेऊन तेही कोंकणांतून यावे असें केलें.

इतक्यांत कृष्णाजीपंत हेजीब खानाकडील आले. त्यास प्रतापगडावर घेतलें. राजियाची भेट जाहाली. कित्येक खानांनीं गोष्टी सांगितल्या होत्या त्या विदित केल्या. लौकिक बोलणें जाहालें. राजे बोलिले कीं, "जसे मँहाराज[६७] तसे खान आपणास वडील आहेत. त्यांची भेट अलबत्ता घेऊं." असें बोलून कृष्णाजी पंत यास बिराड एक घर दिलें तेथें जावयास निरोप दिला. दुसरे दिवशीं राजे सदरेंत बैसले. सरकारकून सर्व सरदार असे सर्व ही बोलावून आणिले. व पंताजी गोपीनाथ ह्मणवून राजियाजवळ विश्वासू मातबर होते, त्यांस बोलावून आणून एकांतीं महालांत

* हें सर्व प्रतापगडींच घडलें. मातुश्रीस व संभाजीस ही प्रतापगडींच ठेविलें होतें असें ग्रंथांतरीं आढळतें.

६७. महाराज = शहाजी राजे.

हेंच योग्य आहे. मागें नासरजंग नबाबाशीं[११] भांडले [ते] काय फळ व ~~कप्स~~ लौकिक पावले? बाहेरील कोणी आला तर भांडणें योग्य, घरचे घरीं भांडणें सर्व प्रकारें योग्य नाहीं. याच प्रकारें खानांनीं[१२] मसलत × × × कोणी कलहवृद्धीचा उपदेश × × × त्यास दीर्घदर्शित्व खमवार [?] करून आपले हातीं घेणें योग्य आहे. आह्मांस तो खानांचा भरंवसा पूर्ण आहे. तथापि नवीन प्रसंग आहे. लिहून उत्तर आणणें योग्य आहे. एतद्विषयीं कांहीं संकलित खानास पत्र पाठविलें आहे. हें जलद पावतें करून सविस्तर उत्तर आणून पाठवावें. तदनुरूप कर्तव्य तें केलें जाईल. छ २९ साबान बहुत काय लिहिणें हे विनंति. कदाचित् खान फिरंग्यांचे[१३] भरावर जातील तर न जावें. सर्व उमराव तिकडे[१४] होतील. फिरंगियाची फुलचरीस[१५] संकट, मग नवें सामान कोठें येणार? व एक फिरंगी सामानानें काय होतें? ते भर देतील परंतु भरंवसा न मानावयाचा. त्याचा पूर्व प्रकार कळलाच आहे. हे विनंति.

पै॥ आषाढ शुद्ध ६ सोमवार शके १६७६

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दीक्षित, स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम तागाईत आषाढ वद्य पंचमी पर्यंत यथास्थित असे. विशेष आषाढ शुद्ध पौर्णिमा मंगळवारचें पत्र पाठविलें तें वद्य चतुर्थीस पावलें, लिहिलें वृत्त साद्यंत कळलें. दरगाह कुलीखान यांस पत्र लिहून पाठविण्याचा मजकूर व यांचे विशीं गाजुदीखान याचें पत्र दरगाह कुलीखान यास आणवावयाचा मजकूर लिहिला तो साद्यंत कळला. त्याजवरून दरगाह कुलीखान यास पत्र लिहून पाठविलें आहे. हें त्यास प्रविष्ट करणें. व याचे विशीं राजश्री मल्हारजी होळकर व जयाजी शिंदे यांस पत्र लिहून पाठविलें आहे. व गाजुदीखान यास पत्र लिहून पाठविलें आहे. तेथूनही पत्र येईल. सारांश औरंगाबादेस खुदावतखान व शेख अलीखान जुनदी [?] व जमीलबेगखान व अस्सलखान व हशमदुल्लाखान वगैरे आहेत त्यांशीं स-

११ नबाबाशीं ह्म० आपला बाप जो निजाम उल्मुल्क त्याशीं.

१२. खान=सय्यद लष्कर खान.

१३. फिरंगी [फ्रांक] हें नांव सर्व युरोपियन लोकांस मुसुलमान लावीत परंतु येथें फ्रेंच उर्फ फरांशीस हे होत.

१४ तिकडे ह्म० गाजुदीखानाकडे.

१५. फुलचरी ह्म० पादेशरी. इंग्रजांची व फ्रेंचांची लढाई मद्रासेकडे या वेळीं चालली असून इंग्रजांचा जय झाला (१७५१–५४) त्यास अनुलक्षून हें लिहिणें आहे.

वांशीं राजकारणें करून गाजुदीखान बऱ्हाणपुरास येतांच साऱ्या शहरामध्यें गाजुदीखान याची द्वाही फिरवावी; आणि सर्वांनीं गाजुदीखान याजकडे राजकारण लाऊन सामील व्हावें. याप्रमाणें विचारणा होय तें करावें. दरगाह कुलीखान तुह्मांशीं बोलले त्याप्रमाणें त्यांचीं निरोपाचीं पत्रें आपचे नांवें व फेरोजंगाचें नांव घेऊन पावून देणें. परभारें हीं पत्रें पाठवीत जाणें. वरकड, प्रस्तुत बाहेर निघालों. लोक जमा होत आहेत. आठ दहा रोजांत भीमा पार होऊं. मराठियाशीं जावसाल आहेच. पहिलें पहिलें लिहून पाठविलें त्याप्रमाणें खानास वरचेवर लिहून तेथून हरएक बाबांनीं भोजन घेत [?] व तेथेंही सर्व सूत्रें गाजुदीखानाकडे अनुकूल पडत अशीं करावीं. याप्रमाणें लिहून उत्तर आणवावें ता। छ २० रमजान. बहुत काय लिहणें लोभ असों दीजे हे विनंति.

---

पौ आषाढ वद्य ३० बुधवार शके १६७४.

पु॥* वेदशास्त्रसंपन्न राजश्री वासुदेव दिक्षित स्वामीचे सेवेसीं.

विनंति. गाजुदीखान छ ११ रमजानीं नर्मदा उतरून अलीकडे आले, ह्मणून पत्रें आलीं, ह्मणून लिहिलें तें कळलें. पुढें वर्तमान आणखी येत जाईल तें वरचेवर लिहून पाठवीत जावें. भागानगराकडील[16] वर्तमान लिहिलें तें सावंत कळलें. आपले विद्यमानें गाजुदीनखान याजला स्नेहाचा संदर्भ लावून भागानगर प्रांत आपणाकडे करून घ्यावा. मक्ता झाला तर करून देतील त्याप्रमाणें वर्षास देत जाऊं. या प्रमाणें पत्रें आलीं ह्मणून लिहिलें तें कळलें ऐसियास सय्यद लष्करखान आमचे भेटीस सलाबतजंग याजपासून रुखसत[17] होऊन येत आहेत. ते येथें आलियावरि त्यांची आमची भेटि जाहलियावरि जो विचार होणें तो होईल. दरगाहाकुलीखान याजविशीं आपणांस पत्र लिहिलें आहे त्याप्रमाणें पत्रें अगत्य पाठवून द्यावीं ह्मणून लिहिलें तर येविशींचें उत्तर पूर्वींच आपल्यास लिहून पाठविलें आहे. त्याजवरून कळलेंच असेल, आपण लिहिला अर्थ तहकीक[18] करून मागितल्याबद्दल मग सरदारांस लिहून याचा विचार करूं. आह्मी तो सर्वत्र ऐकतों कीं फिरंगी[19] व खान मिळोन फार झुझावयाच्या गप्पा मारतात त्यास पुर्ता शोध करून जरूर लिहिणें. जरूर गुप्त रितीनें

---

* पुण्यपावन, पुण्यशील, [?]

१६ भागानगर=हैदराबाद.

१७. निरोप घेऊन, निरोपाचीं पत्रें मिळून.

१८. तहकीक=पक्का, निश्चयात्मक.

१९. बुशी फरांशीस.

राजकारण शोध जरूर करून अती त्वरेनें लिहीत असावें. बहुत काय लिहिणें हे विनंति.

---

पे॥ आषाढ वद्य ३० बुधवार शके १६७४.

वेदशास्त्र संपन्न राजश्री वासुदेव दिक्षित स्वामीचे सेवेशीं.

विद्यार्थी बाळाजी बाजीराव प्रधान कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता॥ छ २४ रमजान पावेतों यथास्थित असे विशेष आपण आषाढ व॥ ९ रविवारचीं पत्रें पाठविलीं तीं दशमीस शुक्रवारीं पावलीं. वृत्त सादन्त कळलें. सय्यद लष्करखान याचे कबिलेयांचा मजकूर लिहिला तो कळला. ऐसियास सय्यद लष्करखान सलाबतजंग याजपासून निरोप घेऊन आमचे भेटीस येत आहेत. तरि शहराकडे न जातां आमचे भेटीस आले तर उतम आहे. कदाचित् त्यांणीं आपले चित्तांमध्यें आणिलें असेल कीं, मराठे सरदार आहेत, त्यांस आपण समागमें घेऊन शहरास जाऊन शहरचा बंदोबस्त करूं. असें ह्मणतील तरि आह्मी या प्रमाणें त्यास करूं देणार नाहीं. व शहरास ही जाऊं देणार नाहीं. ते परभारें उपद्रोप[21] करून शहरास गेले ह्मणजे त्यांचे कबिल्यास काय चिंता आहे ? सुखरूप शहरामध्यें असावें. नाहीं तर त्याचें आमचे सौरस्य व घरोबा आहे त्या रीतीनें ह्मटलें तर त्यांचे कबीलें ठेवावयास एखादें मातिबर[22] स्थल देऊन ठेऊं. चिंता काय आहे ? गुदस्तां सैय्यद लष्करखान त्याचे चित्तामध्यें रामदासपंताचे वर्तणुकें करून विपर्यास होताच, परंतु यंदा रामदासपंत वारलियावर सलाबतजंग याचा पक्ष धरिला आहे; तरि तुह्मीं सय्यद लष्करखान याजला बहुत प्रकारें लिहून पाठवून तो ग्याजुदीखान याजकडे संदर्भ लावीत, आमचे विचारा प्रमाणें वर्तत, ते गोष्ट करणें. ये समयीं खानांनी आमचे विचारें न वर्तल्यास तिलमात्र आमचा व खानाचा स्नेह राहत नाहीं, असा भाव तुह्मी दाखविणें खान हजारदां आह्मांशीं ग्याजुदीखानाचा प्रकार बोलले असतां रामदासपंत मेले ह्मणून आयते वेळेस फिरले तर हें कसें कामास येईल'? यांचा स्नेह परलोकीं कामाचा नाहीं. हे विनंति.

---

श्री.

वेदशास्त्रसंपन्न राजश्री दीक्षितें[23] बाबा स्वामीचे सेवेशीं.

---

२०. कबिला=कुटुंब, माणसें.
२१. [ ? ] उपद्रव?
२२. मातबर=बळकट.
२३. हे दीक्षित नारायण भट्ट पाटणकर हे होत. हे पुढें काशीस जाऊन राहिले.

विद्यार्थी **बाजीराव बल्लाळ प्रधान** साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशळ स्वामीचे आशीर्वादें करून यथास्थित असो विशेष. मौजे **रांजणगांव** पो मजकूर हा गांव खासगत मुकासा आहे तो राजश्री **बाबूराव मल्हार** यास दिला आहे. त्यास राजश्री **मानाजी जाधव** याजपासून चिरंजीव **राजश्री चिमणाजी** यांणीं बाकीचे ऐवजीं पैका घेतला त्यास दरम्यान तुह्मींच आहां. तुह्मीं आपले हातें कारभार विल्हेस लाविला आहे. हल्लीं मौजे मजकुरासि वगैरे गांवासि कटकट करणार ह्मणून कळलें. स्वामींनीं दरम्यान होऊन त्याजकडील कारभार चिरंजीवापासून फैसल करून घेतला असतां हल्लीं ते कटकट करणार. ही गोष्ट उत्तम आहेशी नाहीं. स्वामींनीं त्यास माकूल [ ? ] करून सांगणें ते रीतीनें सांगावें आणि मौजे मजकुरास कटकट न करितां अंमल सुरळीत चालेल तें करावें. अगोदर स्वामीस लिहिलें असावें यास्तव लिहिलें आहे. तरि त्यास फजित करावयाचें तें करून मौजे मजकुराचे वाटेस न जात तें करणें. लोभ असों दिजे हे विनंती.

सदहु अस्सल पत्र डुबेरकर बर्वे यांजपाशीं आहे.

---

श्री

वेद-शास्त्रसंपन्न राजश्री **वासुदेव दीक्षित** स्वामींचे सेवेशीं.

विद्यार्थी **चिमणाजी बल्लाळ** साष्टांग नमस्कार विनंती उपरी येथील कुशल ता। मार्गशीर्ष शुद्ध पंचमी जाणून स्वकीय लिहीत गेले पाहिजे विशेष. वेदशास्त्र संपन्न राजश्री **नारायण दीक्षित** यांस रुपये १५००० पंधरा हजार राजेश्री **लक्ष्मण शंकर** यांजकडून देवविले आहेत. मशारनिल्हे प्रांत **बुंदेलखंड** येथे गेलियावर वसुल करून **दीक्षितांकडे श्रीस** पावते करतील. तुह्मांस कळावें ह्मणोन लिहिलें असे. बहुत काय लिहिणें लोभ असों दिजे हे विनंती.

मार्गशीर्ष वद्य २ शके १६६२ रौद्रनामसंवत्सरें.

---

श्री

तीर्थरूप वेद-शास्त्रसंपन्न राजश्री **दीक्षित** स्वामी वडिलांचे सेवेशीं.

अपत्य **चिमणाजी बल्लाळ** व **बाळाजी बाजीराव** कृतानेक साष्टांग नमस्कार विनंती येथील क्षेम आश्वीन वा। ९ मुक्काम कसबे **पुणें**. स्वामींच्या कृपेंकरून यथास्थित असे विशेष—स्वामींनीं ज्येष्ट शुद्ध १० चें पत्र पाठविलें तें पावलें. सविस्तर अर्थ कळला. सारांश स्वामींचे आशीर्वादाचा सर्व आमचा विचार आहे. स्वामींच्या आशीर्वादा पेक्षां दुसरें दैवत जाणत नाहीं.

वानिति भूसुर देवा, यत्स्मरणें ताप पाप-सह गेले ॥ १०५ ॥
नद्युत्तमा तें[९७]घौघी भव्य-गती गी[९८] तिच्या तटीं वसते ॥
वाडव सुज्ञ करिति हा, देवाद्या पारखुनि यशोरस ते ॥ १०६ ॥
संतत नव परमोत्सव, भरले नगरींत वसति ते करिती ॥
वाद्यें सुस्वर गीतें, देवालयें[९९]-गर्व सर्व ही हरिती ॥ १०७ ॥
येनंदें प्रभुवर मोरचि, भक्त-गण वेंदान्यतेसि[१००][१०१] पार[१०२] नसे ॥
वाखाणिति सुखदेश्वर वार्ता कविराय ही अशेष कसे ॥ १०८ ॥
मंत्रमय रचुनि भावें, भागवता नमुनि देव-देवा हे ॥
तुलसी च राम-नंदन, सेवा ऐशीच देव दे वाहे ॥ १०९ ॥

समाप्त.

---

## गोपी गोडवा.*

श्रीमद्गोपी-वृंद, प्रेमामृत-सिंधु-बिंदु-लव करितो ॥
श्रवणां शीतळ सेवा, अजि रसिक-चकोर-इंदु लवकरि तो ॥ १ ॥
मथुरेकडील कांहीं, आयकिलें वृत्त सखि नव लटिक तें ॥
नोहे बहु वदति सये[१] !, सुज्ञ-जन-मनीं खरें नवल टिकतें ॥ २ ॥
आलि कसें काय बरें, वद निववायासि आयकों दे हा ॥
हृदय-प्रिय-जन-वार्ता,-श्रवण-सुखें करुनि कायें[२] कोंदे हा ॥ ३ ॥
प्रिय सखि ! लाजे जिव्हा, ज्याची पद-धूलि सुर तदा सीसीं[३] ॥
वाहत होते त्यासीं, त्या मथुरेमाजि सुरत दासीसीं ॥ ४ ॥
मेला विधि[४] ऐकवितो, सखि जें स्वप्नीं हि नायकावेंच ॥
गलित तदधरामृत-रस-कण हि जपुनि रसिक-नायका वेंच ॥ ५ ॥
उद्धव कीं अनुसरला, सखि आश्रित आश्रया न विटवीती ॥
यश नाहींच करिल कीं, किति शोषिल तो समुद्र टिटवी ती ॥ ६ ॥
बाई सत्य वदसि हें, प्रभु जन असतां कलंक ही शोभे ॥
चंद्रचि पहा जरि हि हा, सक्षय सकलंक दृष्टि ही लोभे ॥ ७ ॥
सखि आर्जवार्थ गेला, ध्याया ह्मणवून हा दयालु बरा ॥

---

९७ पाप-नाशक. ९८ सरस्वती. ९९ स्वर्ग. १०० मेघ. १०१ दातृत्वाला. १०२ अंत.
* एखाद्याचें प्रेम आपणावर असून तें तो पुढें विसरला असता जे उद्गार आपले तोंडांतून निघतात त्यास गोडवे म्हणतात. १ हे सखि. २ शरीर. ३ मस्तकीं ४ ब्रह्मदेव.

**उद्धव** पहा कसा जो, मोहीं कृत-साधु-वाद या लुबरा ॥ ८ ॥
सभ्यावांचुनि सदनीं, सखि होता, कोण झुरत सवतीच्या ॥
सखि होय काय अगणित, पुण्य-फल लहान सुरत-सर्व तीचा ॥९॥
या भाग्यावरुनि गमे, बहुतचि जन्मांतरीं करी सर्वं[1] ती ॥
सवतीस दैव फळलें, हा व्रज सर्वस्व भोगि तो सेवती ॥ १० ॥
**मथुरा**-पुरींत बरवी, मेळविली रसिक-नायका **कुब्जा** ॥
पात्र प्रतिग्रहा या, तूं **द्राविड**[2] जेंवि तंडुला उब्जा[3] ॥ ११ ॥
**मथुरे** बहु अयश तुझें, वरिली तुज माजि **केशवें कुब्जा** ॥
वाटे या स्वपरिभवें, भारी करवील इंदिरा[4] न्युब्जा[5] ॥ १२ ॥
रुचवी खोटा कामचि, दृढ-रति-गुण-पाश-जनक **कुब्जा** या ॥
प्राची[6] जाया न रुचो, हरिला[7] कुणपाश[8]-जन-ककुब्जाया[9] ॥ १३ ॥
सखि माझ्या हृत्सदनीं, रात्रि दिवस हे चि आठवण वागे ॥
ताप मनाची पुरवी, कक्षाची[10] जेंवि पाठ वणवा गे ॥ १४ ॥
अमृताचीच सुतृषिता, **कृष्णा** आली नवि प्रपा[11] दासी ॥
कसि भजत धरुनि भजनीं, तृष्णा आली न विप्र-पादासीं ॥१५॥
आठ मण यामे[12] आह्मां, तिस दावी करुनि आठ वालें[13] वशी ॥
**गौरी-हरचि** मनीं नच, सवतीचा विभव आठवा लव ही ॥१६॥
**कात्यायनी** द्रवेलचि, तीचा स्तव करुनि पाठवा नाकीं[14] ॥
दासीहुनि काय उण्या, वृत्तयशें भरुनि पाठ वाना कीं ॥ १७ ॥
ती कारणें **हरिस** सखि, बहुधा साधूनि दे वशीकरण ॥
दिव्य स्त्री भोगाया, पुरुषासचि ह्मणति देव शीक रण ॥ १८ ॥
बहुधा असेल **कुब्जा**, दासी नामें नसेल ती जाया ॥
विनयें बहु निववाया, नमिल उभि न च बसेल ती ज्या त्या ॥१९॥
सखि दासी सैरंध्री, ती स्ववशा शिल्प-कारिका हो ती ॥
**प्रभुला** रुचली चिमणी, बहु बरवी होय सारिका हो ती ॥ २० ॥
टाणेटोणे[15] शिकतों; तरि सखि देतोंचि तीस उडवून ॥
सखि कोणाला हि किमपि, सुख चिर न मिळेचि सुकृत बुडवून २१

---

१ यज्ञ. २ एकटी ३ साळी भिजवून वाळवाव्या आणि नंतर त्या कुटून तांदूळ करावे म्हणजे उब्जे होतात. ४ लक्ष्मी. ५ नीच, ठेंगणी. ६ पूर्व. ७ इंद्राला. ८ स्वामी निऋति कुणप+अश = प्रेत खाणारा = राक्षस = नैर्ऋत्य दिशेचा. ९ दिशारूपी स्त्री (ककुप्+जाया) १० गवत. ११ पाण-पोयी. १२ प्रहर. १३ दोन गुंजा = वाल. १४ स्वर्गी. १५ मंत्र जादू.

दासी असो नसो परि, जन कुब्जा ह्मणति काय ती कुबडी ॥
विदरी हि कामुका स्त्री घुबडाला काय नावडे घुबडी ॥ २२ ॥
होती पहिलीं कुबडी, बहुतचि केली बरी परि सये ती ॥
शुभ दैव वृष्टि होती, जानिं सफळें बहु बरी परिस येती ॥ २३ ॥
हा ऐसा हि जन प्रिय, जन दर्शन न मरण तळमळ तो ॥
तैसा कशास पदरीं घे प्रभु ही वैरि-चरण-तळ-मळ तो ॥ २४ ॥
निंदित जन होय मलिन, पटसा शुचि रजकसा चिखल मळतो ॥
तीर्थचि तीर्थी मिळतां, जो गांवांतील दुष्ट खळमळ तो ॥ २५ ॥
पूर्ण लघुचि गुरुचि सये, वरितो घट गुरु हि बहु उणीव रिते ॥
महदाश्रय कीर्तिप्रद, नसता तरि झटुनि कां गुणी वरिते ॥ २६ ॥
राधे साधे दैवें, सर्व हि तद्दत्त अंगराग[1] मला ॥
हेतु स्पष्ट तद्भुत,-रूपा तत्काम-संगरा[2] गमला ॥ २७ ॥
तरि अंगदान आधी, बहु किंवा अंगराग-दान वदा ॥
भक्तिच याला जिंकिल, धरितां ही संगरा गदा नवदा ॥ २८ ॥
तो सखि तरि हरि-परिचर्या भक्ति हा चि न जन चवकळती ॥
उष्णार्ता छायेची, घडतां पळभरि हि भजन चव कळती ॥ २९ ॥
स्वकरें लेववुनि तिचे, काढित हि बसेल हा नग रतींत ॥
दासींत यश हिम-नगाचि, कण-समचि असे लहान गरतींत ३०
अस्मत्कथा असो ज्या, त्या मथुरेतील गुणवती मैहिला[3] ॥
कुब्जाऽतियशें लाजुनि, ह्मणतचि असतील विवर दे मैहिला ३१ ॥
तत्काल विसर झाला, प्रेम-रसें पूर्ण तो कसा पहिला ॥
त्या ती वेडी वेडी या, विश्वासूं नये जसें अहिला ॥ ३२ ॥
बहु शत झटलों सुदृढें, प्रेम-गुणें जो न गोंविला सवती ॥
कुब्जे कोण ह्मणेल, स्नेहीं याच्या तगो विलासवती ॥ ३३ ॥
आह्मांस आमुची बहु, तीची चिंता वृथाचि कां पडली ॥
कवड्यांची न मिळावी, परि मणिमाळा पथींच सांपडली ॥३४॥
चित्तीं क्षण क्षण मला, वाटे दासीस न च वरील हरी ॥
अमृताब्धिची निज-गुणें, परिभूता करिल न चवरी लहरी ॥ ३५ ॥
कुब्जा राणी हरिला, बहु कुब्जेला हि आवडेल हरी ॥
लहरीस सिंधु संतत, सिंधुस हि सदैव आवडे लहरी ॥ ३६ ॥

---

१ उटी. २ युद्ध. ३ स्त्रिया. ४ पृथ्वीला. ५ सर्पाला. ६ दोरानें. ७ अमृत सागराचे. ८ लाट. ९ समुद्र.

गोरी नसावि कुब्जा, बहुधा काळीच ती असावि खरी ॥
जेंवि घन तमीं संगम, अंधार तरीच हा असा विखरी ॥ ३७ ॥
हा काळी कीं गोरी, तद्विषया श्रुत नसो मला वाणी[1] ॥
तत्संग्रह हरिहि तसा, तापद पाजुन न सोमला वाणी[2] ३८ ॥
कुब्जा धन्या जैशी, आद्या प्रभुंचे[3] धरूनि पाय सती[4] ॥
बहुधा क्षुधिता वाढी, शत जन्में बहु करूनि पायस[5] ती ॥ ३९ ॥
सर्वाधरामृताच्या, वाटावी काय न रिपुसी[6] पानें ॥
मुरली भली मुखा या, हे रस सेवूनि तरि पुसी पानें[7] ॥ ४० ॥
इचि तासे तिचि हि गति करूनि, पर सर्वस्वापहार[8] कल्याण ॥
भूत-द्रोहि-जनाश्वीं, घालिच वित्तवीर पलंयाण[9] ॥ ४१ ॥
सखि ती सुखी असो गे, श्रीकृष्णासां करूनि केलीलो[10] ॥
आह्मी अशा दशेला, पात्र दुरित-पथ धरूनि केलीला[11] ॥ ४२ ॥
वाटे श्रीसे[12] हि दुर्लभ, पावे ती रूप भाग्य जे विदरी[13] ॥
केली प्रभु-प्रसादें, गुरू गुहे[14]-गुरूनें बसोनि जेंवि दरी ॥ ४३ ॥
दासी कुब्जा पहिली, होउनि विभुसी[15] रमे सती सरळी ॥
मोठें पुण्य मिळाली, जी न प्राप्त रमेस तीस रेळी[16] ॥ ४४ ॥
चिंता तत्प्रियाचे सखी, हे सासी[17] आमुचें असे नातें ॥
वसविल निज दयित मनीं, ती अस्मत्प्रेम जें असेना तें ॥ ४५ ॥
विपरीता गति होती, सखि जों जों भाग्य होय भर भर तें ॥
उलटी नदीस आली, जे मिळतां सिंधु-तोयें[18]-भर भरतें ॥ ४६ ॥
भगवत्पदाश्रिता ती, सांभाळिल भरूनि कां न दीनातें ॥
स्वाश्रित नदी-शताचें, रक्षि दया करूनि कां नदी मातें ॥ ४७ ॥
त्या श्रीपदाश्रित जनें, कवणें कवण न कृतार्थ सांगा तें ॥
शरणागतार्थ सादर, शिबि शिर वेंचो दधीच आंगातें ॥ ४८ ॥
प्रिय सखि असो सपत्नी[19], नीचा जाणो हि न जप तप दासी ॥
सेवादर[20] बहु वाटे, श्री वसली तेंवि न जपत पदासी ॥ ४९ ॥
ज्याची सखी असि तिचा, सेवादर बहु ह्मणोन हे मातें ॥
लोह रुचो प्रभुसि गुणें ह्मणो, त्या परिस उणें न हेमातें[21] ॥ ५० ॥

---

१ भाषण. २ सदृश. ३ शिवाचें. ४ पार्वती. ५ खीर. ६ शत्रूसारखी. ७ प्राशनानें ८ सर्व-द्रव्य-हरण करणें. ९ प्राणिमात्राचा द्रोह करणारे हेच कोणी घोडे त्याजवर. १० खोगीर. ११ क्रीडा. १२ लक्ष्मीस. १३ कुरूप. १४ कार्तिकस्वामीचा बाप शिव. १५ कृष्णास १६ व्राढ पुरावेणें. १७ सासू (?) १८ उदक. १९ सवत. २० सेवेविषयीं आदर. २१ सोन्याला.

अस्मत्सेवादर बहु, दासी-सेवादरा परिस न-कसा ॥
चकसा जपला हा जन, दृष्टांत असे वरा परि सनकसा ॥ ५१ ॥
तोडुनि पति सुत गुरु गृह, अशन[1] वसन धर्म-भीति भी लज्जा ॥
तज्जात्युत्पल-कोमल, विमल-चरण-कमल-सुभजनीं सज्जा[3] ॥ ५२ ॥
सत्य वदसि तूं सखि ये, तेव्हांचें वृत्त गेह भानाचें ॥
येणें श्रीदत्ताचें, जैसें तैसेंचि देहभा नाचे ॥ ५३ ॥
गीत परिसतांचि भुले, मन कीं तैसाचि आननीं कवैळ ॥
जवळ क्षिप्र भिडावें, प्राशाया अमृत जें मुखीं धवळ ॥ ५४ ॥
हासति सकाळ सासू-बाई, नाकीं तशी गमे बाळी ॥
हास्य करि बंधु ह्मणुनि, मातुल-जा कीं जसी रमे बाळीं ॥ ५५ ॥
तें कुंकुमा पद नयन, सखि कज्जल जें तया पद कपाळ ॥
हा नाथा आह्मां जरि, न प्रतिपाळिसि दया-पदकें पाळ ॥५६॥
स्मरवुनि रिझवुनि खिजवुनि, विरह तुझा फार बायकां गांजी ॥
ती यां स्थिरता आली, भजली मेर्वादि नायकां गा जी ॥ ५७ ॥
दुःसह-विरह-दयार्द्रे, सोडाया क्षण न तीस हि सकावें ॥
देउनि उष्णीष पुन्हा, कैसें करितां नैतीस हिसकावें ॥ ५८ ॥
निववाव्या होय्या हो, प्रभुजी दावून पाय या दासी ॥
जीवन-दानें निववी, घन बहु एका न काय यांदासी ॥ ५९ ॥
दर्शन मात्र बहु सये, कर जोडियलेचि अंग-संगातें ॥
भेटि असो कीर्ति हि करि, जें ताप शमन करी न गंगा तें ॥६०॥
हरि-यशचि व्रज-हृदया, धाम जसें तोय धाम यादासी ॥
भजुनि हरि जना पावो, हरिला ती जेंवि नामयां[12] दासी[13] ॥ ६१॥
वाटे स्पर्श-मणि[14] प्रभु, जी कुब्जा काय ती पहार मला ॥
बहु करुण सज्जनि तीसीं, असतां [15]श्री आयता पहा रमला ॥ ६२॥
प्रेमें दे गध तिसीं, दे ब्रह्मांड भव-नदी परते ॥
प्रभु-गुण गात्या गरुडा, व्याळासी त्यजुन भवन-दीप रते ॥६३॥
सुकृतज्ञत्वादि गुणें, अतुळें बहु मानवेलाच रमा या ॥
कुब्जेवरि करिल तिचा, सिंचुनि बहु मान वेल चिरें मीया ॥६४॥
सर्प जसा सदनांतुनि, चित्तांतुनि वैर-भाव सखि जावा ॥

---

१ भोजन. २ तत्पर. ३ घांस. ४ शुभ्र. ५ स्थान. ६ दया-श्रीद्र. ७ नमस्कार. ८ उदक. १० जलचर. ११ घर. १२ नामदेवाला. १३ जनी दासी. १४ परिस. १५ लक्ष्मी १६ फार वेळ. १७ कृपा.

तेंव्हां मानें तैसा, आतां हि सखा **मुकुंद** न खिजावा ॥ ६५ ॥
**श्रीकुब्जे श्रीकृष्णा**, हा जन चुकला तुह्मांसि निंदून ।
नमितों क्षमा करा हो, क्षमित्याचें यश नसेचि इंदून ॥ ६६ ॥
गोपी विनवित होत्या, ऐसे गाऊन गोडवें दात्या ॥
त्याचें गातां लागे, यश अमृता परिस गोड वेदा त्या ॥ ६७ ॥
**प्रभुनें** दिली द्विजानन रस-पाकांतील गोड वेद-वडी ॥
भक्त **मयूरातींतें**, प्रभु-घन गातांचि गोडवें दवडी ॥ ६८ ॥

श्लोक

हे गोडवे नाम हि गोडवा ची । ग्रंथांतरें जो जन गोड वाची ॥
वाचो न वाचो तरि वाचया जी । वैकुंठ-यात्रोचित हाचि वाजी ॥ ६९

(समाप्त.)

## मारुति-स्तुति.

अनुष्टुप्

श्रीमज्जगत्प्राण[२]-पुत्रा, अंजना भव[३]-नाशना ॥
श्रीच्या शोधें लाविला त्वां, कंज-नाभ[४] वनाशना[५] ॥ १ ॥
स्मरेषु[६] घाया रामोरीं, संताप परमा[७] रुते ॥
न सौमित्री तदुद्धारीं, तूं शक्त पर मारुते ॥ २ ॥
राम-सुग्रीव-सख्याचा, हेतु तूं वात-नंदना ॥
उत्पत्तिभू[८] गुण-गणा, जसा मलय चंदना ॥ ३ ॥
केली प्रहृष्टा लंघूनी, तुवां नद-नदी-पती[९] ॥
मोही रक्षःपतंगातें[१०], जिचा वदन-दीप ती ॥ ४ ॥
जी त्वद्बल परीक्षार्थ, देवांनीं प्रेषिली जरी ॥
नागांची माय सुरसा, अंतराय[११] पथीं करी ॥ ५ ॥
तोंड शंभर[१२] गांवें तीं, पसरूनि ह्मणे तुतें ॥
गिळीन मन्मुखीं भूतें, होती ब्रह्म-वरें हुतें ॥ ६ ॥
देह अंगुष्ठसा केला, त्वां जो नवति[१३] योजन ॥

---

१ चंद्राहून उणें. २ वायु. ३ संसार. ४ कमळ-नाभ. ५ खाणें-पिणें. ६ मदन-बाण. ७ अतिशय. ८ उत्पत्ति-कार. ९ समुद्र. १० राक्षस-रूपी पतंग ११ विघ्न. १२ योजनें १३ नव्वद.

गेलास तन्मुखीं वांछी । जी करावयास भोजन ॥ ७ ॥
**सुरसे**च्या मुखांतूनी । तूं निघालासि सत्वर ॥
माघारा उसळे चेंडू । जैसा सोडुनि चत्वर[1] ॥ ८ ॥
**सुरसे**तें बोलिलाशी । **दाक्षायणि** नमोऽस्तु ते ॥
तूं साधु निरहंकार । वा गर्वे सर्व ही ऊते[2] ॥ ९ ॥
**धाता** विस्मित झाला न । **मैनाक** शिखरीं **शची** ॥
**शुक्र शक्र** स्तवी नोहे । मैनाक शिखरीश ची ॥ १० ॥
दोरी धरुनि ओढावी । नभस्था जेंवि वावडी[3] ॥
तशी कवळुनी छाया । ओढी जी फार वावडी ॥ ११ ॥
ती **सिंहिका** तुझी बापा । सहसा सावली धरी ॥
करी आकर्षण तुझें । धैर्य वृत्रारिचें[4] हरी ॥ १२ ॥
त्या **सिंहिके**च्या उदरीं । जेव्हां गेलासि घांसता ॥
भासलासि प्रेक्षित्यातें । व्याघ्री ती तं न कां संसा ॥ १३ ॥
भू-देव-धी हि पावे न । त्वद्ग्रासीं **अंजना** भया ॥
भीताचि व्यसना[5] तो ही । वीर ही **कंज-नाभ**[6] या ॥ १४ ॥
मग काळिज तोडावें । त्यां आधीं आंतडीं तमीं ॥
वदलासि करूं काय । कार्याच्या[7] आंतडींत मी ॥ १५ ॥
**लंकेंत** शोधिली **सीता** । वा झालासि लहानसा ॥
राक्षसांतें पाठवाया । अंतकाच्या महानसा[8] ॥ १६ ॥
भली **लंका**-देवता त्वां । भंगिली वा कदापि ती ॥
न देती वाट मारुनीं । नाकदा हाक दापिती ॥ १७ ॥
**रावणां**तःपुर तुला । न च भीं तेंव तातंजा ॥
**श्री** देखिली धुंडितां त्वां । अशोक-वनिं **वानजा** ॥ १८ ॥
वृक्षीं बैसोनि कामांध । आला **रावण** पाहिला ॥
तदुक्तें उसळला । क्रोधाचा वेग साहिला ॥ १९ ॥
स्तवें विश्वास देऊनी । श्री-मुद्रा मग अर्पिली ॥
कुशलोदंत[10]-पीयूषें[11] । देवी त्वां फार तर्पिली[12] ॥ २० ॥
[13]द्रु आणि [14]चमू-हानें । त्वत्कृता [15]अक्षमा-रणीं ॥
[16]सुधाधिक [17]सुरा झाली । सत्कृता [18]अक्ष-मारणीं ॥ २१ ॥

१ अंगण. २ फुगतो. ३ खेळण्याचा पतंग. ४ इंद्राचें. ५ संकट. ६ राम. ७ पाईत. ८ सैपाक-घर. ९ अंगठी. १० कुशल-वार्ता. ११ अमृत १२ संतुष्ट केली. १३ वृक्ष. १४ सेना. १५ असमर्थ-दुःसह. १६ अमृताहून अधिक. १७ मद्य. १८ रावण-पुत्र-शिर.

ब्रह्मास्त्राचा रक्षिला त्वां । बहु मान पराभव ॥
सभेंत रक्षोराजाचा । केला हृष्ट बरा भवे[1] ॥ २२ ॥
बा भावुनी तुझें पुच्छ । तुच्छ पेटविलें खळें ॥
जळे म्हणे तें लंकेनें । प्रेरितां त्वां महाबळें ॥ २३ ॥
आंजनेया गमे [2]व्योमीं । वदले देव धूर हा ॥
पुरे न राम-प्रणतीं । वदले देव-धूं[3]र हा[4] ॥ २४ ॥
खूण सांगोनि जेव्हां त्वां । श्रीचूं[5]डामणि अर्पिला ॥
प्रभु आनंदला तेव्हां । पीयूषें तमं[6] तर्पिला ॥ २५ ॥
प्रभु दे तुज [7]आश्लेष । पारितोषिकं[8] तो भलें ॥
शोभलें यश हें विश्वीं । सर्व सन्मन लोभलें ॥ २६ ॥
अंगदें लक्ष्मण-स्कंधीं । तुवां श्रीराम वाहिला ॥
पाहिला तार्क्ष्य[9] देवांहीं । साधि[10] सव्रीड[11] राहिला ॥ २७ ॥
केला बिभीषण भ्राता । श्रीरामें तव सन्मतें ॥
कीं ज्ञान-शक्ति-संपन्न । विचारें यश जन्मतें ॥ २८ ॥
महौषधि [12]नगाचें त्वां । दोनदां शृंग[13] आणिलें ॥
जे बळी विक्रमी त्यांच्या । मदाचें मूळ खाणिलें ॥ २९ ॥
तें तें बा त्वां कर्म केलें । जें जें अन्या सुदुष्कर ॥
तूं प्रिय प्रभुच्या चित्ता । मधुपा जेंवि पुष्क[14]र ॥ ३० ॥
तूं पूजिलासि भरतें । [15]नतें परम हर्षितें ॥
तूतें सत्कृत जें प्राप्त । न तें पर महर्षितें ॥ ३१ ॥
त्वां कथा तों [16]जगतीं हे । तारिली परमा गती ॥
बा प्रेम-भक्तिज्ञ न जे । ते मोक्ष वर मागती ॥ ३२ ॥
तूतें श्रीराम "[17]ऋणिनो वयम्" ऐसें सुखें वदे ॥
तूं एक धन्य त्रिजगीं । तातसाचि [18]सुखेंव दे ॥ ३३ ॥
रत्नहार स्वयें श्रीनें । [19]प्रेमांभें भरला दिला ॥
तुला वाटे [20]महोक्षाचा । [21]तर्णकीं भर लादिला ॥ ३४ ॥
प्रभु दे भूषणें [22]अंकीं । स्थापुनी तुज आपलीं ॥
बा जाणों तीं [23]भावि । साधु-विरहें बहु तापलीं ॥ ३५ ॥

---

१ शिव. २ आकाश. ३ देव-श्रेष्ठ. ४ हाय हाय. ५ सीतेचें शिरोभूषण. ६ राहू (भू-छाया) ७ आलिंगन. ८ बक्षीस. ९ गरुड. १० सदुःख. ११ सलज्ज. १२ पर्वताचें १३ शिखर. १४ कमळ. १५ नम्र. १६ जगांत. १७ "आम्ही (मारुतीचे) ऋणी आहों" १८ आलिंगन १९ प्रेमोदक. २० मोठ्या बैलाचा. २१ वासरूं-पाडा, २२ मांडीवर. २३ पुढें होणाऱ्या साधूच्या (तुझ्या) वियोगानें तीं भूषणें ताप पावलीं.

## हनुमंत-स्तव.

जो ध्यातसे पवन-पुत्र रघूत्तमातें ।
तो प्राण मुख्य तरि त्या कपि-सत्तमातें ॥
जे सेविती प्रकट राघव त्यास होतो ।
चित्तीं स्मरा ह्मणवुनीं हनुमंत होतो ॥ १ ॥

बेध राघव-विलास-कळांचा । प्राण मुख्य कपि तो सकळांचा ॥
राम-भक्ति हृदयीं च निघाली । त्यासि जो स्वमनिं आणुनि घाली ॥२॥

जेथें विलास रघुनंदन-गायनाचे ।
तेथें समीर-सुत आपण गाय नाचे ॥
जोडूनि अंजलि-पुट स्वशिरावरी तो ।
ऐके स्मरोनि रघुवंश वरावरी तो ॥ ३ ॥

एकया उडाणें चि उडे समुद्रा । दे राघवाची क्षितिजेस मुद्रा ॥
जो जानकी वृत्त रघूत्तमातें । सांगे स्मरा त्या कपि-सत्तमातें ॥ ४ ॥

राघवाविण रुचे न मनातें । धन्य ज्यासि करिती नमनातें ॥
वायु-पुत्र सुचरित्र चि साचा । वामनीं तरिच आदर साचा ॥ ५ ॥

समाप्त.

## राम-स्तव.

मुनि-मनें रमती रघु-नंदना । तुज मधें दश-कंधर-सूदना ! ॥
ह्मणुनि निर्गुण जानकि-नायका । ह्मणति राम तुतें गति-दायका ॥ १

करुनि दिव्य अलौकिक सुव्रतें । रमविशी मन तूं सगुण व्रतें ॥
सगुण संत असे रिति राम तूं । सुजन-हृन्कमळीं अभिराम तूं ॥ २ ॥

सूर्य-वंश-अमृतांबुधि-सोमा । रामचंद्र म्हणती तुज रामा ! ॥
पाप ताप हरि नाम जिवाचे । दाह शांत करणार शिवाचे ॥ ३ ॥

चंद्र आणि धरिली शिरिं गंगा । जाय ना तरि विषानळ भंगा ॥
राम नाम जपतां मग वाचे । दाह शांत करणार शिवाचे ॥ ४ ॥

राम हृत्कमळिं आतळवेना । राम नाम वदनीं पळवेना ॥

---

१ मारुतें. २ वायुपुत्र मारुति. ३ सीतेला. ४ आंगठी ५ दशमख रावण याच्या हनन कर्त्या. ६ अपूर्व. ७ सूर्यवंशरूपी सागरांतून उदय झालेला चंद्रा. ८ विषाग्नि.

काळकूट मग शंकर-कंठीं । काळ राघव भयास्तव कंठी ॥ ५ ॥
शर्व[1]-कंठ-विष-गर्व हराया । शक्त नामचि तुझें रघु-राया ॥
सेतु सागर कपी उतराया । नाम-सेतु भव सिंधु तराया ॥ ६ ॥
नाम राममय राम चि लोकीं । हे न जाणत वृथा शिणलों कीं ॥
राम-नाम धरिलें जयिं वाचे । तूटले तयिंच पाश भवाचे[2] ॥ ७ ॥
सिंधु-सेतु रचिला रघु-रामें । नाशिला भव-समुद्र चि नामें ॥
तारिली स्वनगरी अवतारीं । राम-नाम भुवन-त्रय तारि ॥ ८ ॥
मुर्ति ते प्रकटली घन-वर्णी । जो दिवाकर-कुळीं[3] नृप वर्णी ॥
तो चि हे गुण हि वामन वर्णी । मूर्ति आदिकवि वाल्मिकि वर्णी ॥९॥

समाप्त.

---

## भगवद्गीता[4].

—:o:—

श्रीमद्वामन-पाद-पद्मे[5]-युगुलीं अर्पूं मना षट्पदा[6] ।
स्वात्मा जो जगिं सत्पद स्मरतसे दावी स्वयें चित्पदा ॥
आनंदात्मक तो चि श्रीहरि गुरू आत्मा नसे वेगळा ।
ऐसा श्रीभगवान् तया नमितसें प्रेमें जगन्मंगला ॥ १ ॥
तो श्रीहरि सारथि वामनाचा । होवोनियां प्रेरक जो मनाचा ॥
अध्याय-अंतीं कथि एक श्लोका । म्हणोनि दावी स्व कृपावलोका ॥२॥
अध्यायीं प्रथमांत पार्थ स्वजना देखोनियां मोहला ।
कीं हे गोत्रज सोयरे कुल-गुरू मारीं च ना मी मला ॥
लागे पाप ह्मणोनि "युद्ध न करीं" कृष्णा असें बोलिला ।
बाणेशीं धनु टाकुनी मग रथीं तो ऊगला बैसला ॥३ ॥
सांख्यें आत्म अनात्मता निवडुनी योगें चि स्वात्मैक्यता ।
पाहे हा न मरे न मारित असे आत्मा असें तत्वतां ॥
अध्यायीं दुसऱ्या परेश वदला तो श्रीगुरू वामनें ।
टीका हे सम-पद्य-रूप रचिली संतीं पहावी मनें ॥ ४ ॥

---

१ शिव. २ संसाराचे ३ सूर्यवंशीं. ४ समश्लोकी म्हणून जें भगवद्गीचें भाषांतर वामन पंडितानें केलें आहे त्या भाषांतराचे प्रत्येक अध्यायाचे अखेरीस मोठया वृत्तानें रचलेला एक श्लोक असावयाचा. परंतु "गीतार्थ बोधिनी" नामक पुस्तकांत छापिलेल्या समश्लोकीचे प्रत्येक अध्यायाचे शेवटीं या श्लोकांपैकीं एकेक श्लोक आढळत नाहीं. म्हणून हे येथें छापिले आहेत. वस्तुतः हे सर्व श्लोक समश्लोकीचाच एक भाग होत. ५ कमळ. ६ भ्रमर

अध्याय हा तृतिय नामक कर्म योग ।
कर्मांग ब्रह्ममय जाणुनि स्वात्मयोग ॥
नित्या अनित्य अवघीं हरिच्या चि पायीं ।
अर्पा असें वदतसे निजसौख्य-दायी ॥ ५ ॥
चतुर्थी अध्यायीं गुरुवर वदे ज्ञान-पथ हा ।
तयाची हे टीका करि बहु सुखाचा सुपथ हा ॥
बरा हा जाणोनी सुजन समजोनी तुह्मि पहा ।
**सम-श्लोकी**चा हो निशि दिनिं करावा स्व जप हा ॥ ६ ॥
अध्याय हा पंचम स्वात्मयोगी । जो कर्मसंन्यास करी सुयोगी ॥
तो श्रेष्ठ संन्यास ह्मणे **हरी** तो । जो **पार्थ**-मोहास हि संहरीतो ॥ ७ ॥
षष्ठाध्यायीं योग अध्यास नामा । बोधी **पार्था श्रीहरी** तो अनामा ॥
अभ्यासीतां तत्व-बोधावलोका । दे सौख्यातें क्षिप्र हा संत लोकां ॥ ८ ॥
अध्याय हा सप्तम योग नाम । विज्ञान विख्यात स्वयें अनाम ॥
आध्यास अभ्यास करी महात्मा । चतुर्विधा माजि हि भक्ति-वर्त्मा[1] ॥ ९ ॥
अध्याय हा अक्षर-योगनामा । जो आठवा आठवितां अनामा ॥
पावाल हो सद्य चि स्वात्म-ठेवा । अविस्मरें हें चि मनांत ठेवा ॥ १० ॥
नवमाध्यायीं नवविध भक्ती । अनुभवणें या नव नव युक्ती ॥
विज्ञानासह ज्ञान हि एथें । सेवा नव नव रस हो स्वार्थें ॥ ११ ॥
दशमाध्यायीं **हरी** विभूती- । योगा सांगे सकळां भूतीं ॥
त्यातें जें... मुख्यत्वें नामें । अनुभवरसिका निज सुखधामें ॥ १२ ॥
अध्याय एकादश विश्वरूपी । अयोग्य ऐश्वर्य निजस्वरूपीं ॥
दावीतसे ध्यान करा विशेषीं । अहर्निशी कीटक भृंगि जैशी ॥ १३ ॥
अध्याय हा द्वादश भक्ति-योग । सप्रेम जे वाचिति स्वात्मयोग ॥
जे प्रीति ते भक्ति असो जयाला । कळे तया तारक **देव** जाला ॥ १४ ॥
अध्याय तो हा चि त्रयोदशावा । निरीक्षितो संत मनांत ठेवा ॥
क्षेतज्ञ हा चिद्गुण सर्व क्षेत्रीं । व्यापीतसे तो चि हि भूतमात्रीं ॥ १५
अध्यायीं चवदावियांत वदला **श्रीकृष्ण**जी **अर्जुना** ।
श्रोत्रादी गुण या विभाग वदतों ऐकें ह्मणे सज्जना ॥
तीन्ही हे गुण लंघुनी निजसुखा जाणोनि जे वर्तती ।
ते योगी निजभक्त ते गुणत्रयातीतात्मता[3] पावती ॥ १६ ॥
अध्याय हा पंचदशाख्य नामें । जे वाचिती ऐकति अर्थ प्रेमें ॥

---

१ सत्वर. २ मार्ग. ३ सत्व, रज, तम या तीन गुणांनीं व्याकुळ न होण्याची स्थिति

ते जाणती श्रीपुरुषोत्तमातें । क्षरक्षरा होउनि उत्तमा ते ॥ १७ ॥
अध्याय हा षोडश निर्णयाचा । कीं दैव ही आणिक आसुरीचा ॥
विभाग एथें विषदार्थ वाणी । बोले हरीची न सुखासि वाणी ॥ १८ ॥
अध्याय हा सप्त दशाख्य योग । श्रद्धा त्रिधा तीं गुणिचा विभाग ॥
जें कर्म तें ब्रह्ममय स्वरूपीं । पाहे वदे हा हरि विश्वरूपी ॥ १९ ॥
अध्याय अष्टादश सौख्य-धामा । हा मोक्षसंन्यास चि मोक्षनामा ॥
वाचाल भावें जयिं सर्वदा हो । तयीं नुरे लेश प्रपंच-दाहो ॥ २० ॥
अध्यायांतीं एक हा श्लोक जाणा । पुष्प प्राय श्रीगुरूतें सुजाणा ॥
पायीं त्याच्या लेहुनी अर्पिला हो । मागें हा ची सर्वदा स्वात्मलाहो ॥ २१

सम-श्लोकी टीका प्रकटलि जगीं ज्ञान-सरिता ।
सदा स्नानें पानें करुनि करि आनंदभरिता ॥
अनंतां जन्मांच्या हरुनि सकळा साच दुरिता ।
स्वयें दे मोक्षातें श्रवण-पठणीं हे चि त्वरिता ॥ २२ ॥
सत्संगासि धरीं कुसंग न करीं आत्मैक्यता मोहरीं ।
चित्तातें अवरीं कुकर्म न करीं वेदोदितें आचरीं ॥
सप्रेमें श्रवणादरीं अनुदिनी गातां सुखें अंतरीं ।
हे टीका वरदायिनी झडकरी अज्ञान हो संहरी ॥ २३ ॥

समाप्त

## विष्णुध्यान

——:o:——

**सवाया.**

पादसरोज उरोजयुगांवरि ठेवुनि सेवि सरोज-भवा ॥
भृंग असंग मुनींद्र मनीं रस घेति जयांतिल नित्य नवा ॥
ध्यान-परास निधान सुखप्रद विष्णुपरं पद जेथ जिवा ।
अंबुज-संभव-धौत-पदांबुज जे चरणांबु किरीट शिवा ॥ १ ॥
दिव्य शशांक दशांगुलिकांवरि शोभति रम्य पदाब्ज-नखें ।
आठवितां मनिं संत महत्तम नासुनि उत्तम देति सुखें ॥

१ कमताई. २ नदी. ३ प्राप्त होई. ४ पदकमल. ५ स्तनयुग्म. ६ ब्रह्मदेव. ७ कमळोद्भव ब्रह्मदेवानें धुतळे आहे पदकमळ ज्याचें अशा. ८ पादोदक. ९ चंद्र. १० पदकमळ.

लेश महत्व हि वर्णुं ह्मणे परि भागलि शेषें-अशेष-मुखें ।
ध्यान असें बहु दान-तपें जन-मानसिं होय अनेक मखें ॥ २ ॥
चित्त असें चरण-द्वय चिंतुनि चिंतितसे मन वर्तुळ घोंटे ।
हाटक-पीत-पटीं कटि त्यावरि वेष्टित पुष्ट तनू मनिं वाटे ॥
विश्व-सरोज सुनाभि-सरोवरिं ज्यांत सरोरुह-संभवें भेटे ।
पोट सुरम्य वलित्रय ज्यावरि आंत जगत्रय-कोटि न दाटे ॥ ३ ॥
**श्रीप्रियमंदिर** सुंदर तो उर शोभतसे स्वविशाळपणें ।
केवळ तो करुणा-वरुणालय तो कमलालयें या चि गुणें ॥
[6]कंबु नये सम रम्य गळा परि सिंधु-सुतों निज बंधु तिणें ।
आणुनियां समते ममतेस्तव सार्थक केलें * तयाचें जिणें ॥ ४ ॥
सायुध सुंदर बाहु-चतुष्टय पुष्ट जसे करिचे करें ते ।
जे भुज वीर-रसा अवलंबुनि लंब हि जानुवरी पुरते ॥
स्कंद सुरम्य न साम्य दिसे वृष होति पशुत्व-गुणें पर ते ।
वस्त्र अपूर्व वरी रविचे करें पूर्वगिरी-शिखरावरुते ॥ ५ ॥
श्रीमुख तें सुख नीर सरोरुह ज्या वदनीं निगमामृत-खाणी ।
[12]बिंब-फलाधर कोटि कलाधरें[13] आणु शके उपमेसि न वाणी[14] ॥
सेवि **रमा** परमामृत जेथिल पाहणियाचि जियेस शिराणी ।
पाहि अनादि अनादिपणें तरि [16]भ्रमरांची पुरे न शिराणी ॥६ ॥
**श्रीहरिचें** मुख पंकज त्यांत हि लोचन-पंकज-युग्म वसे ।
**श्रीहरिचा** मुख-चंद्र तयांत हि सुंदर ते द्विजें[17]-पंक्ति दिसे ॥
प्राकृत पंकजें[18] चंद्र न त्यासम अद्भुत हार न त्यांत असे ।
ध्यान मुनी करिती हरिचें मनिं सांपडती रस त्यांत असे ॥ ७ ॥
आस्यें[19]-सरोरुह हास्य-लवें अति रम्य उपास्य[20]-मनो-भ्रमरीं ।
भ्रूयुग भूरि[21] अनुग्रह[22]-सूचक भूसुरें[23] भूपऋर्षीं अमरीं[24] ॥
लेश अनुग्रह घेउनि दानव मारियले अमरीं समरीं ।
भक्ति विरक्ति जनीं तरि त्यांसि च मागितली विधिच्या कुमरीं॥८॥
नासिक तें तिलपुष्प ह्मणों तरि त्यास न ये तिल हे उपमा ।

---

१ सहस्रमुख सर्प. २ सुवर्ण. ३ ब्रम्हा. ४ कृपासागर. ५ लक्ष्मीचें स्थान. ६ शंख. ७ लक्ष्मी. ८ हत्तीचे. ९ शुंडा. १० किरण. ११ वेदामृत. १२ तोंडलें. १३ चंद्र. १४ कमताई. १५ आवड. १६ नेत्रभ्रमर. १७ दंतपंक्ति. १८ कमळ. १९ मुख. २० उपासनेस योग्य २१ पुष्कळ. २२ कृपा. २३ ब्राम्हण. २४ देवांनीं. * 'लें' हें अक्षर वृत्त सुखार्थ-हस्व म्हटलें पाहिजे.

प्राकृत जे शुक[1]-चंचु नये तिस चित्सुख-नासिकिंचा महिमा ॥
[illegible] वरि सुंदर दौंति न वर्णु शके सुषमा ।
चांगुल गाल हनू अति सुंदर विस्मित देखुनि जेथ **रमा** ॥ ९ ॥
दोन सहस्र-दळें चरणीं तसिं चारि करीं **हरि**च्या कमळें ।
लोचन-आनन-अंबुज कानन अंबुरुहें[4] सकळें विमळें ॥
चित्सुख ज्यांत सुधारस केवळ या करितां मुनि-भृंग कुळें ।
केश-मिषें वरि **केशव**-मस्तकिं देखिलिं दिव्य मनें कुशळें ॥ १० ॥
रत्न-किरीट शिरीं मकराकृति कुंडल कौस्तुभ कंठमणी ।
श्रीवनमाळ गळां पदकावरि वेष्टित ज्यांत **रमा** रमणी ॥
पीत-पटीं कटिं सूत्र सुनूपुर दुःखहरें बिरुदें चरणीं ।
अंगद-कंकण-संघ[6] मुद्रांवरि रत्न-समूह जसे तरणी ॥ ११ ॥
वर्णिति वर्ण अनेकविध श्रुति तप्त सुवर्ण सुगौर तसा ।
**सत्य**-युगीं स्फुरतो स्फटिकोपम **कर्म**-युगीं उदयार्क जसा ॥
**द्वापरिं** नील सुनील सुनीरदें **माधव** याहि युगांत असा ।
श्यामल कोमल **वामन**-मानसिं सुंदर या **कलिं** मानि ठसा ॥ १२ ॥
**श्रीधरणी**-चरणीं मन ठेउनि सेविती ज्या विमळा दिक शक्ती ।
होउनि भाट अचाट गुण श्रुति वर्णिति शास्त्र पुराण सयुक्ती ॥
दृष्टि-लवामृत मृष्टिस लक्षुनि धावति ते स्थळिं चारि हि मुक्ती ।
**अंबुज-संभव शंभु** सुखीं पद पुजियले **सनकादिक**-भक्तीं ॥ १३
अंग पलंग करूनि भुजंग-पती सुपती स्वतनूचिच केली ।
स्तोत्र अजस्र सहस्र मुखें मति मागुति भक्ति निमित्त भुकेली ॥
**वामन**-वैखरि तृप्ति नव्हे परि वर्णुनियां **हरि**-भक्ति निवाली ।
ध्यान निदिध्यास **सवाइ**-चतुर्दश-रत्नकला **हरि**-अर्पित जाली ॥ १४ ॥

समाप्त.

---

१ राघूची चोंच. २ सरस्वती ३ शोभा. ४ कमळें. ५ बाहुभूषण. ६ समूह. ७ आंगठ्या. ८ सूर्य. ९ मेघ. १० स्तुतिपाठक. ११ सायुज्य, सलोकता, सरूपता, व समीपता.

# स्फुट सवाया

## बोधपर.

नीपट[1] हें मन लंपट होऊनि सोंकविलें रतिच्या सदनों[2] ।
दाऊनियां प्रमदा[3] नट वैभव नाचवि काम-भरें मदना ॥
शेवटिं काळ लपेटिल हें वय सोडवितां न दिसे कदना ।
स्वप्न असोनि नसे सुटका घटका पळ **राम** न ये वदना ॥ १ ॥
अंबुज एक करीं अवलंबुनि भक्तिपुरःसर बोलतसे ।
हृत्कमळीं **कमळापति**[4] चिंतुनि मंद-गिरा मग बोलतसे ॥
हृद्गत तूं निजमूर्ति-सुखा तुजवीण दुजा मज कोण असे ।
पाव अपाव निवारुनि मी मज दाउनि वारि समूळ पिसें* ॥ २ ॥
भक्ति-सुखें **प्रहराद** तरे मुनि **नारद** भक्ति-सुखें विचरे ।
भक्ति-सुखें **सनकादिक** पावन भक्तिसुखें **उपमन्यु** सरे ॥
भक्ति सुखें **ध्रुव** बाळ सुखावे **व्यास** सुखें जगताप हरे ।
**वाल्मिकि अंबरऋषी बाळि भीष्म शुकादिक** तन्मय भक्ति-भरें ॥ ३ ॥
**उध्दव अर्जुन धर्म बिभीषण राम**-पदीं रत चित्त जयांचें ।
**अक्रूर वैष्णव** भक्त कपी **हनुमंत** सभाग्य जिणें **विदुराचें** ॥
**भानु** कुळीं **रुखमांगद** भक्त सुधाकर-वंशिं **परीक्षिति** साचे ।
ऐक्य निरंतर चित्स्वरूपीं निज भक्त वदे श्रुति नाम तयाचें ॥ ४ ॥
उद्धरिला **अजमेळ** अहंकृति तारियली गणिका अघ-रासी ।
हिंसक **व्याध** अगाध जिवांप्रति विंधुनियां शर भक्षित त्यांसीं ।
चोज कसें मज सांग तयाहुनि पातक काय असे मजपाशीं ।
दीन-दया-कर हे बिरुदावलि वानिति **वेद** निरंतर कैशी ॥ ५ ॥
**पांडव**-भाग्य सहस्त्र-मुखीं हि वाच्य नव्हे न धरे अनुमाना ।
जे अति थोर **पितामह**-वैभव त्याहुनि ही अति उत्तम माना ॥
लोक चतुर्दश निर्मुनि ही **विधि** पात्र न ज्या **पुरुषोत्तम**-माना ।
तो **हरि** भाय रे भाय म्हणोनि हि थापटि **पार्थ**-तुरंगम-माना ॥ ६ ॥
वैभव त्यांत समस्त किं मस्तकिं त्या **हरिचें** पद-रेणु जरी ।
अश्व खुरींत[11] खुरीं उठतां रज ते पडतात तयाचे शिरीं ॥

---

१ अत्यंत २ योनी ३ स्त्रिया. ४ लक्ष्मीपति. * वेड. ५ सूर्यवंशी. ६ चद्रवंशी. ७ अभिमान. ८ वेश्या. ९ पापराशी. १० शेषास, ११ अश्वशाळेत

क्लेश न लेश उरे स्मरतां मुख जें सुख नित्य अशेष करी ।
त्या वदनेंदुवरि श्रमबिंदु हि दीसति पार्थ-रथीं समरीं ॥७॥
तूं अज अव्यय नित्य निरामय तूं सद चिन्मय सौख्य-निधाना ।
हें जग डंबर भासत तद्वत बोध तरंग जळावरि नाना ॥
कुंडल किंकिणि नूपुर कंकण कांचन हें बहुधा अभिधाना ।
वेद वदे जग तद्वत एक निरंतर नातळसी भव नाना ॥८॥
विश्वरूपा अरूपा अविकार अनाम असंग अनंत अपारा ।
शास्त्र पुराण विवीध विवाद सदां करिती परि नेणति निश्चित पारा ॥
विश्व तुझ्या स्वरूपीं परि कल्पिति विद्वत वानिति विश्व अधारा ।
"नेति" वदोनि सरे श्रुति वाद न वाच्य अवाच्य वृथा श्रम सारा॥९
साच नसे मृगतोय सुनिश्चित आश्रय भानु तया प्रति पाहे ।
लोह चळे परि चुंबक अक्रिय निष्क्रिय तेविं विलासत आहे ॥
साच नसे घन चिद्रुप तद्रुप तंतु पटादि-रूपें दिसताहे ।
हें निज गुह्य अलौलिक जाणति संत अनंत रूपें रमताहे ॥ १० ॥
निर्गुण जें रूप या परिचें विग भेद सगुण हि त्या वदती ।
तें सुखदायक मानुनि एक विराग धरूनि मनीं भजती ॥
भक्तिसुखें तुज अर्चिति उत्तम ते परमोत रहीत किती ।
त्या करुणाकर श्रीचरणाप्रति मी शरणागत आर्तमति ॥ ११ ॥
काळकि लाविति जे गगनास हि काळ किं लागे करीं चवरी ।
भूचर भानुवरी जरि थुंकिति थुंकि पडे वदना चि वरी ॥
कर्म करूनि अकर्म तथापि हि धर्म विरुद्ध कदां न करी ।
त्यासिं च वंदिति वंद्य जगत्रय हें ह्मणे वामन त्याचि परी ॥ १२ ॥

**समाप्त.**

---

## स्फुट सवाया

——:०:——

### बोधपर.

वैभव हें क्षणभंगुर केवळ दों प्रहरीं जसि चंचळ छाया ।
आप्त जनें असती परि शेवटिं कोणि हि सिद्ध नव्हे सँम जाया ॥

---

१ मुखचंद्रावर, २ लाटा. ३ सोनें ४ मृगजळ. ५ सूर्य. ६ अपूर्व. ७ बरोबर.

शत्रुघ्नायाथ ते श्री मद्वृत्तमाचख्युरद्भुतं ॥
लक्ष्मणस्य परित्यागं प्रतिज्ञां राघवस्य तां ९५०

विभज्य पुत्रयो रा ज्यं दत्तं विंध्यस्य रोधसि ॥
पुरी कुशावती नाम कुशस्य रचितोत्तमा ॥ ९५१ ॥

श्रावस्तीति पुरी म ह्यां प्रसिद्धिं प्रापिता वरा ॥
लवस्य निर्मिता वीर राघवेण महात्मना ॥ ९५२ ॥

कृत्वा त्वयोध्यां वि ज नां राघवो भरतस्तथा ॥
पौरैः समं स्वर्गमने कृतोद्योगौ सहानुगौ ॥ ९५३ ॥

एवं निवेद्य प्र य ताः शत्रुघ्नाय महात्मने ॥
विरेमुस्ते ततो दूता भो त्वरस्वेति चाब्रुवन् ॥ ९५४॥

श्रुत्वा वृत्तं तत्त्व रा वान्छत्रुघ्नः कांचनाभिधं ॥
पुरोहितं समानीय प्रजाश्चाकथयत्स्वयं ॥ ९५५ ॥

अभिषिच्याथ सु म हत्तद्राज्यं स्वं विभज्य सः ॥
पुत्राभ्यां प्रददौ लेभे सुबाहुर्मधुरां पुरीं ॥ ९५६ ॥

शत्रुघाती च ते ज स्वी वैदिशं प्राप सत्पुरं ॥
एवं कृत्वागादयोध्यां रथेनैकेन सत्वरं ॥ ९५७ ॥

स शत्रुघ्नो विन य वानभिवाद्याह राघव ॥
तवानुगमने राजन्विद्धि मां कृतनिश्चयं ॥ ९५८ ॥

दत्तं राज्यं तनु ज योः कृतं कृत्यमशेषतः ॥
न चान्यदद्य वक्तव्यमागतोहमुपासितुम् ॥ ९५९ ॥

त्वच्छासनं स्वाश य ज्ञ प्रभो नित्यमनुष्ठितं ॥
विहन्यमानं नेच्छामि प्रसादं कर्तुमर्हसि ॥ ९६० ॥

तं बाढमित्युदा रा णां गुरुराहातिवत्सलः ॥
ततः समागता ऋक्षा वानराश्च सयूथपाः ॥ ९६१ ॥

ते कृतांजलयो म ह्यां पतिताः प्रभुमब्रुवन् ॥
नयास्मानपि काकुत्स्थ शरणागतवत्सल ॥ ९६२ ॥

तांश्च बाढमिति **श्री** मानुवाच श्रितवत्सलः ॥
अथ बद्धांजलिः प्राह सुग्रीवो रघुनंदनम् ॥ ९६३ ॥
अभिषिच्यांगदं **रा** ज्ये प्राप्तोहं राम कामद ॥
तवानुगमने राजन्विद्धि मां कृतनिश्चयं ॥ ९६४ ॥
तं स्मयन्नाह स **म** ये प्राप्तं बाढमिति प्रभुः ॥
बिभीषणमथोवाच वाचस्पतिशतस्तुतः ॥ ९६५ ॥
शृणु राक्षसरा **ज** त्वं कार्यं मच्छासनं त्वया ॥
प्रजाः संरक्ष धर्मेण नोत्तरं वक्तुमर्हसि ॥ ९६६ ॥
यावच्चंद्रोब्जप्रि **य** श्च यावत्तिष्ठति मेदिनी ॥
यावच्च मत्कथा लोके तावद्राज्यं तवास्त्विह ॥ ९६७ ॥
तथेति रक्षसां **रा** जा प्रतिजग्राह तद्वचः ॥
तमेवमुक्त्वा श्रीरामो हनूमंतमथाब्रवीत् ॥ ९६८ ॥
तावत्प्रीतस्त्वं र **म** स्व मद्वाक्यमनुपालयन् ॥
मत्कथाः प्रचरिष्यंति यावल्लोके हरीश्वर ॥ ९६९ ॥
कृतांजलिर्वायु **ज** स्तमब्रवीद्राममीश्वरं ॥
यावत्तव कथा लोके तावत्स्थास्याम्यहं भुवि ॥ ९७० ॥
जांबवंतं प्रव **य** सं मैंदं च द्विविदं प्रभुः ॥
प्राह यावत्कलियुगं तावज्जीवत सर्वदा ॥ ९७१ ॥
अथ प्रभात र **ज** नौ पृथुवक्षा महायशाः ॥
रामः कमलपत्राक्षः स्वपुरोहितमब्रवीत् ॥ ९७२ ॥
अग्रे निहोत्रं प्र **य** तैर्विप्रैः सार्द्धं व्रजत्विदं ॥
वाजपेयातपत्रच्च शोभमानं महापथे ॥ ९७३ ॥
ततो गुरुस्तपो **रा** शिः सर्वं निरवशेषतः ॥
चकार विधिवद्धर्मं महाप्रस्थानिकं विधिम् ॥ ९७४ ॥
सूक्ष्मांबरधरो **म** त्या स ब्रह्मावर्तयन् परं ॥
कुशान्गृहीत्वा पाणिभ्यां सरयूं प्रययौ स्वयं ॥ ९७५ ॥

मौनव्रतधरः **श्री** मान् पन्थामिव चलन्पथि ॥
निर्जगाम गृहात्तस्माद्दीप्यमानो यथांशुमान् ॥ ९७६ ॥

पार्श्वेस्य दक्षिणे **रा** ज्ञः पद्मा श्रीः समुपस्थिता ॥
सव्येपि च मही देवी व्यवसायस्तथाग्रतः ॥ ९७७ ॥

स्तुतानि शस्त्राण्य **म** रैर्यानि तस्य जगत्पतेः ॥
अन्वयुस्तानि तं रामं कृत्वा पुरुषविग्रहम् ॥ ९७८ ॥

वेदाश्च सर्वे त्रि **ज** गन्मूलं राजर्षिरूपिणम् ॥
अनुजग्मुस्तदा रामं प्रभुं ब्राह्मणरूपिणम् ॥ ९७९ ॥

ओंकारश्चाथ गा **य** त्री वषट्कारश्च मूर्तिमान् ॥
यज्ञाश्चानुव्रता रामं सर्वे पुरुषविग्रहाः ॥ ९८० ॥

हृष्टाः सपरिवा **रा** स्तं पौराजानपदा जनाः ॥
अन्वयुः पशवः सर्वे पक्षिणः स्थावरा अपि ॥ ९८१ ॥

सर्वे रामानुग **म** ने हृष्टाः पुष्टाः प्लवंगमाः ॥
तेषां बभूव भाग्येन स्वर्गद्वारमपावृतम् ॥ ९८२ ॥

भूताः प्रेताश्चानु **ज** ग्मुः प्रभुं किंबहुना तदा ॥
न सूक्ष्ममप्ययोध्यायां प्राणिजातं स्म दृश्यते ॥ ९८३ ॥

भ्रातरौ मंत्रिणो **य** त्ताः सर्वे सांतःपुराः पुरात् ॥
निर्गत्य तेन्वयू रामं प्रभुं तद्गुणरंजिताः ॥ ९८४ ॥

अध्यर्धयोजनं **ज** न्मिजन्ममृत्युभयापहः ॥
गत्वा ददर्श सरयूं रामः पुण्योदकां नदीम् ॥ ९८५ ॥

तस्याः स्वर्गप्रदो **य** स्तं देशं रामः समागतः ॥
तस्मिन्मुहूर्ते ब्रह्मापि त्रिदशैर्मुनिभिः सह ॥ ९८६ ॥

विमानानां भास्व **रा** णां शतकोटिभिरावृतं ॥
प्रभाभिः स्वर्गिणां व्योम ज्योतिर्मयमिवाभवत् ॥ ९८७ ॥

सुखस्पर्शस्तत्र **म** रुद्ववौ शीतः सुगंधवान् ॥
पपात पुष्पवृष्टिश्च देववाद्यानि सस्वनुः ॥ ९८८ ॥

गंधर्वाश्च जगुः श्री मद्रामस्य चरितं मुदा ॥
मुख्या अप्सरसस्तत्र ननृतुर्हृष्टमानसाः ॥ ९८९ ॥

रचितांजलि रा रा त्तमागत्य विधिरब्रवीत् ॥
आगच्छ विष्णो भद्रं ते तां तनुं प्रविश स्वकां ॥९९०

भ्रातृभिः सह धा म त्वं निजं विष्णो विभूषय ॥
लोकानां गतिरस्याद्य नत्वां जानंति केचन ॥ ९९१ ॥

ज्ञानशक्तिं विनाऽज त्वां न जानंति जगद्गुरो ॥
इति वाक्यं विधेः श्रुत्वा रामो रमयतां वरः ॥९९२॥

पद्मापतिः पुण्य य शाः सशरीरोनुजैः सह ॥
विवेश वैष्णवं धाम ध्यातं यत्साधुभिः सदा ॥ ९९३ ॥

ततो विष्णुमयं रा मं पूजयंति स्म देवताः
सिद्धा मरुद्गणाश्चैव सेंद्राः साग्निपुरोगमाः ॥ ९९४ ॥

देवर्षयो जात म हा गंधर्वास्त्रिदशांगनाः ॥
सुपर्णनागयक्षाश्च दैत्यदानवराक्षसाः ॥ ९९५ ॥

अत्र त्वय्यागतेऽ ज त्रिदिवः पूर्णमनोरथः ॥
दृष्टो विकल्मषो जात इत्यूचुर्विष्णुमव्ययम् ॥ ९९६ ॥

अथ विष्णुः स्वप्रि य कर्त्तं पितामहमब्रवीत् ॥
एषां लोकं जनौघानां दातुमर्हसि सुव्रत ॥ ९९७ ॥

इमे सर्वेप्यात्म ज न्मन् स्नेहान्मानुगताः सदा ॥
भक्ता हि भजनीयाश्च त्यक्तात्मानश्च मत्कृते ॥ ९९८ ॥

श्रुत्वा वाक्यं साप्रि य स्य ब्रह्मा विश्वकृदब्रवीत् ॥
लोकान्संतानकान्नाम यास्यंतीमे समागताः ॥ ९९९ ॥

तिर्यग्गतं त्वानु रा गात् यद्विष्णोनुगतं ध्रुवं ॥
प्राणांस्त्यक्ष्यति भक्त्या तत्संतानेषु निवत्स्यति ॥१०००

लो को यथा मम म हान् युक्तो ब्रह्मगुणैः सदा ॥
ब्रह्मलोकसमीपस्थः क्रममुक्तिप्रदः कृतः ॥ १ ॥

लोकः संतानकः श्री मान्मयैषामद्य कल्पितः ॥
इत्युवाच स्वयं ब्रह्मा भगवान्भूतभावनः ॥ २ ॥
ततः पतिर्वान रा णां सुग्रीवो हृष्टमानसः ॥
निमज्य सारवे तीर्थे विवेश रविमंडलम् ॥ ३ ॥
गोप्रताराव्हये म ग्नास्तीर्थे परमपावने ॥
ऋक्षाश्च कपयः प्रापुः सुरान्येभ्यस्तदुद्भवः ॥ ४ ॥
पौरा जानपदा ज ग्मुः स्वजनैः सह सारवं ॥
स्वर्गस्थाः शुश्रुवुस्तेषां चकिताः सहसा रवं ॥ ५ ॥
स्थावरा जंगमा य श्चैर्महद्भिर्दुर्लभं पदम् ॥
गोप्रतारे कृतस्नानाः प्रापुर्भासुरविग्रहाः ॥ ६ ॥
सुतीर्थे प्राणिवा रा स्ते प्रहृष्टाः कृतमज्जनाः ॥
दिव्यदेहाः प्रसादेन प्रभोः सर्वेपि सज्जनाः ॥ ७ ॥
अमर्त्यत्वं गता म र्त्या दिव्यालंकारवाससः ॥
विमानानि समारूढा सर्वे भास्वरमूर्तयः ॥ ८ ॥
गोप्रतारे तदा ज न्मी सर्वस्त्यक्तकलेवरः ॥
दिव्यरूपोभवच्छ्वापि बिडालो ग्रामसूकरः ॥ ९ ॥
सरयूपुण्यतो य स्य महिमा परमाद्भुतः ॥
ये तत्र त्यक्तदेहास्ते लोकं संतानकं गताः ॥१०॥
संतानकं मुदा ज ग्मुर्ऋक्षवानरराक्षसाः ॥
अनुग्रहाद्भगवतो रामस्याद्भुतकर्मणः ॥ ११ ॥
गंधर्वैः सह गा य द्भिः पुण्यं निजयशोद्भुतं ॥
शृण्वन्संतानकं निन्ये विमानैस्तान्दयार्णवः ॥ १२ ॥
तत्र सर्वानुदा रा णां नाथः श्रीविष्णुरीश्वरः ॥
स्थापयामास तान्प्रेम्णा पिता पुत्रानिवौरसान् ॥ १३ ॥
ततः स्वयं स्वधा म स्वैः सर्वैर्ब्रह्मादिभिः सह ॥
ययौ भक्तमयूराणां मेघो रामः सतां गतिः ॥ १४ ॥

श्रीमद्रामायणं श्री मान्वाल्मीकिर्मुनिपुंगवः ॥
महाकाव्यं चकारेत्थं भव्यमादिमहाकविः ॥ १५ ॥
गीतं रामकुमा रा भ्यां श्रुतं सर्वैर्महार्षिभिः ॥
ब्रह्मणा सत्यलोके च कैलासाग्रेपि शंभुना ॥ १६ ॥
अश्वमेधे महा म न्यौ सह सर्वैर्मुनीश्वरैः ॥
सचिवैर्भ्रातृभिः सार्द्धं रामेणापि श्रुतं स्वयं ॥ १७ ॥
हितेच्छुभिः सदा ज प्यं श्राव्यं दुःस्वप्ननाशनं ॥
पापतापप्रशमनं मनोरथकरं परं ॥ १८ ॥
वेदैः सममिदं य ज्ञदानतीर्थफलप्रदं ॥
सर्वपापैः प्रमुच्येत पादमप्यस्य यः पठेत् ॥ १९ ॥
पापान्यपि दिवा रा त्रौ यः कुर्यान्मानवः सदा ॥
पठत्येकमपि श्लोकं पापात्स परिमुच्यते ॥ २० ॥
न केवलमिदं म ह्यां पाताले त्रिदिवेपि च ॥
नित्यं शृण्वंति संहृष्टाः काव्यं रामायणं परं ॥ २१ ॥
श्रीमद्रामायणेऽ ज स्रं प्रेमात्यंतं हनूमतः ॥
नारदस्य तु सर्वस्वमेतद्वाल्मीकिसद्गुरोः ॥ २२ ॥
गंधर्वैर्गीयते य त्नात्सिद्धैश्च परमर्षिभिः ॥
सर्वैर्मुमुक्षुभिर्मुक्तैः सेव्यते सुमनोहरं ॥ २३ ॥
रामायणं यशो ज स्रं श्रीमच्छ्रीनायकाननं ॥
का न नंदति चैतेन सभैतत्स्वर्द्रुकाननं ॥ २४ ॥
प्रेम रामायणे य स्य प्रसन्नास्तस्य देवताः ॥
या आपदः प्रपश्यंति स्वबलं भ्रश्यदेव ताः ॥ २५ ॥
वाल्मीकिं तपसां रा शिमनुमान्य महाकविं ।
तद्गुरुं नारदं व्यासं शुकमन्यान्कवीन्मुनीन् ॥ २६ ॥
मंत्ररामायणं म ह्यं श्रीमद्रामायणात्स्वयं ॥
दत्तमुद्धृत्य बालाय श्रीरामेण दयालुना ॥ २७ ॥

मंत्ररामायणे बालकांडे रामप्रसादजे ॥
त्रयोविंशतिरेवात्र मंत्राः संत्रासदाः कलेः ॥ १ ॥
द्वितीयेत्र सतामिष्टेऽयोध्याकांडे शुभप्रदाः ॥
विंशतिः परिसंख्याता मंत्राः सेव्याः सतां सदा ॥ २ ॥
तृतीयेरण्यकांडेऽत्र त्रिंशन्मंत्राः प्रकीर्तिताः ॥
कामदाः कविवर्गाणां नंदनस्था द्रुमा इव ॥ ३ ॥
चतुर्थेत्वत्र किष्किंधाकांडे कांडेभिपूजिते ॥
त्रिंशदेव महामंत्राः पुरुषार्थफलप्रदाः ॥ ४ ॥
पंचमे सुंदरे कांडे मंत्राः षट्त्रिंशदुत्तमाः ॥
सर्वोपि सेवनाद्येषां भवेत्पुरुषउत्तमः ॥ ५ ॥
मंत्राः षष्ठे युद्धकांडे षडशीतिरुदाहृताः ॥
सर्वेपि रसिका येभ्यः समुत्पन्नमुदाहृताः ॥ ६ ॥
मंत्रा उत्तरकांडेत्र सर्वसंसिद्धिवल्लभाः ॥
एकोनाशीतिरुदिता मुदिता यैः सतां सभाः ॥ ७ ॥
एवं सप्तसु कांडेषु सर्वे मंत्राः शुभप्रदाः ॥
सदा जयंति चत्वारः शतानि त्रीणि चार्चिताः ॥ ८ ॥
मंत्ररामायणे ग्रंथे सज्जनानां सुखप्रदे ॥
अक्षित्राणांकशिखिभिर्विज्ञेया श्लोकसंमितिः ॥ ९ ॥ ३९५२
त्रयोदशाक्षरो मंत्रः सर्वत्रात्र विराजते ॥
तेनैतन्नामतः श्रीमन्मंत्ररामायणं बुधाः ॥ १० ॥
वर्णः प्रथमकांडेत्र महामंत्रस्य सज्जनाः ॥
श्लोकानां प्रथमे पादे सर्वत्र प्रथमः स्फुटः ॥ ११ ॥
द्वितीये च द्वितीयः स तृतीये च तृतीयकः ॥
एवं सप्तमकांडेस्मिन् मंत्रवर्णोत्र सप्तमः ॥ १२ ॥
पृष्ठे त्रयोदशश्लोकलिपेरेतत्स्फुटीभवेत् ॥
आर्षात्समुद्धृतमिदं तीर्थं गंगाह्रदादिव ॥ १३ ॥

॥ सत्काव्योपवनं यदाद्यकविना वाल्मीकिना निर्मितं ॥
॥ तत्रत्यैरतिरम्यपद्यकुसुमैः प्रीत्या गृहीतैर्गुणे ॥
॥ श्रीमंत्रे विरचय्य दाम रुचिरं श्रीमंत्ररामायणं ॥
॥ श्रीरामस्य जगद्गुरोरुचितयोः पादाब्जयोरार्पितं ॥ १४ ॥

॥ इति श्रीमंत्ररामायणे श्रीरामनंदनमयूरविरचिते श्रीमदुत्तरकांडे एको-
॥ नाशीतितमो मंत्रः श्रीरामार्पणमस्तु ॥ शुभंभवतु ॥ ॥ समाप्तम् ॥

स्था...
ग्रं...
ता...

# मदालसा चंपूः

ग्रंथस्य लिख्यमानस्यास्यांतरा पततां मुहुः ।
शांत्यर्थमंतरायाणां शिवां पंचमयीं नुमः ॥
सापायादगजाजगन्निजकरप्रक्षिप्तमुक्तामणि-
प्राग्भारां पुरसूदनें समुदयत्सांद्रानुरागे मुहुः ।
उन्मीलन्नयनाभिलीनमदनोद्भेदाय भूयः स्वयं ॥
बीजानि क्षिपतीव या विजयते देवी विवाहोत्सवे ॥ १ ॥

वंदारुकल्पद्रुममिंदुमौलिं
नमामि वामांकवामकायम् ।
वर्षाशरद्वारिदतुल्यरूपं
यं वीक्ष्य तुष्यंति शिखींद्रहंसाः ॥ २ ॥

कालिदासमुखसत्कवीश्वरान्
नौमि शब्दपरिशुद्धिहेतवे ।
यत्प्रबंधजलधे बुधा रसं
प्राप्य सद्गुणघना भवंतितान् ॥ ३ ॥

काव्येषु सत्सु रसवत्स्वपि सत्कवीनां
नैष्फल्य मेतिन मया रचितः प्रबंधः ।
लोकांधकारभिदि सत्यपि पार्वणेंदौ
दीपो मुधा भवति किं सदनोदरस्थः ॥ ४ ॥

अविरतसुकविवचोऽमृतपानजडीभूतचेतसां विदुषाम् ॥
पुनरास्वादनहेतो मत्काव्यं कांजिकत्वमुपयातु ॥ ५ ॥

अथवा

रसशास्त्रकतामेव मत्काव्यमुपकारकम् ॥
दोषप्रकरणारंभे हरत्येषां यतः श्रमम् ॥ ६ ॥
अथ कुवलयाश्वचरितश्रवणासक्तेन निजपित्रा ॥
अनुयुक्तो मुनिपुत्रः प्रोवाचेदं त्रिकालज्ञः ॥ ७ ॥

---

१ विघ्नांचे २ पंच (पृथ्वी, आप्, तेज, वायु, आकाश हीं पंचमहाभूते) एतद्रूप ३ अग ह्मणजे पर्वत त्यापासून उत्पन्न जालेली पार्वती. ४ समुदाय. ५ भक्तजनाचे कल्पद्रुमाप्रमाणें कामपूर्ण करणारा ६ स्त्री अर्थात् पार्वती. ८ पौर्णिमेचा चंद्र.

आसीत्प्रशस्तनरपालकुलप्रदीपः
स्वर्लोकपंकजमुखीमुखगीतकीर्तिः ।
त्राता समुद्रपरिमुद्रितभूतलस्य
नाम्नाऽपि शक्रजिदिति प्रथितः क्षितीशः ॥ ८ ॥
अंभोधिसंभृतयदस्त्रनिकृत्तवैरि-
रक्तं सुधाकरतनावभवत्प्रसक्तम् ।
तस्मादुदेति परिपाटलमूर्तिरिंदुः
शुष्कं तदेव कथयंतिजनाः कलंकम् ॥ ९ ॥
यदीययशसाखिले धवलिते जगन्मंडले
स्वनाथ इति संभ्रमादुपगता परं पूरुषम् ।
निवेद्य सरसं वचः प्रियतमैकवेद्यं पुन-
स्तदीयविषमोत्तराद्बुधवधूः परं लज्जते ॥ १० ॥
यत्कीर्तेर[1]वदातायाः सादृश्यं शशिमौलिना ॥
वक्तुं शक्येत विबुधैः सनचेन्नीललोहितः ॥ ११ ॥
पुनः प्रदातेति पयोनिधौ धरे
निवासहेतौ बहुजीवनप्रदैः ।
अन्यत्र जीमूतगणे रतद्विधे-
वि[2]श्राणने यत्तुलना सुदुर्लभा ॥ १२ ॥

यस्मिन्नशिष्टजनशिक्षानिबद्धपरिकरे स[3]हजस्पर्धा युवतिजनपयोधरेषु आ[4]र्याव-मति र्दक्षयज्ञे नीचोपसर्पणं मणिसरप्रकरेषु च[5]पलानुषंगः प्रावृषे[6]ण्यजलदक[7]दंबेषु नायकाधःकरणं विपरीतरतेषु चिंताऽभिभवो विप्रलंभे वि[8]वर्णता प्रोषितपतिकासु म[9]हाहीनप्रचारो रसातले द्विज[10]पक्षतिदान मवनिजापद्धतिसमयसंगरे [11]वर्णवैषम्यमा र्यादिपद्यपादेषु जनकत्यागो वनप्रियेषु सदागमोल्लंघनलौल्यं प्लवंगमेषु परागस्फुटो-न्नयनं नलिनाकरोदरचरमरुत्किशोरेषु म[12]धुपानुषंगो बिसप्रसूनेषु मिथ्यार्थविडंबन-मिंद्रजालकलनायां वा[13]डवोत्कर्षासहिष्णुत्वमकूपारे निगडबंधोगंधा[14]धसिंधुरव्यूहेषु,

---

१ धवलित. २ दान. ३ बरोबर उत्पन्न झालेला ४ आर्य ( श्रेष्ठ ) यांचा अवमान पक्षीं आर्या ( पार्वती ) तिचा अपमान. ५ चपळा (जारिणी ) तिचा संगम पक्षीं चपला ( वीज ) तिची संगती. ६ पर्जन्काळचे. ७ समुदाय. ८ विवर्णता ( मळीनता ) पक्षीं हीनजातित्व. ९ महाहीन ( हीन म्हणजे निंद्य ) मह्रा + अहि + ईन ( नायक ) यांची गति. १० द्विजप ( ब्राम्हणश्रेष्ठ ) याचें क्षतिदान ( नाश करणें ) पक्षीं द्विज ( पक्षी ) त्याचे पक्षति ( पंख ) त्याचें दान ( त्याग ) ११ अक्षराचा कमजास्तीपणा असणें पक्षीं वर्ण संकर. १२ मधुप ( भ्रमर, मद्यप ) १३ वाडवोत्कर्ष ( ब्राम्हणाचें वर्चस्व ) पक्षीं वाडव नांवाचा समुद्रांतील अग्नि. त्याचा उत्कर्ष ( प्रबळता. ) १४ हत्ती.

भुजबंधः प्रेयसीषु स्वस्त्रीवैमुख्यं युद्धसाध्वसपलायमानविपक्षसंघेषु कशाघात स्तुरंगेषु आर्तगंधता वसंतवनेषु जीवनवैधुर्यं धन्वविषयेषु वनीपकाभिभवः सुग्रीवमधुवने सन्मार्गरोधो विंध्याहार्ये मित्रोदयासहिष्णुत्वं कुमुदवन एवकेवलमाविरासीत् स एव शर्व इव सर्वमंगलासक्तः पतत्रिराज इव विनतानंदनः सारसासन इव सत्यालयः विभावानिवारसाभिपोषकः कुवलयहितोऽपि चक्रवाता लक्ष्मणोऽप्यसुमित्रानंदनः बहुमन्युरप्यक्रोधनः नरवरोऽपि विद्याधरः जिष्णुरप्यनंतासुराप्रियः जन्यविजितसकलराजन्यनिवहनिवेदितभूतिसर्वस्वः सप्ततंतुशतैरतोषच्छतमखेतरानखिलान्मखभूः । अभूदस्यमहीजाने स्तनूजन्मा ऋतुध्वज इति ।

सौंदर्यसारपरिवंचितपंचबाण-
मालोक्य यं शफरलोलदृश स्तरूण्यः ।
जानंतिकेवलदृशः सफलानि काम-
मंगेष्व नंगकरखड्गलतासखेषु ॥ १२ ॥

लब्ध्वा धिया गुरुसमो गुरुणा वितीर्णं
कौमारकेवयसितात स यौवराज्यम् ।
राज्ञो रणेषु परिभूय समाहृतेन
वित्तेन तातमकरोत्परिपूर्णकामम् ॥ १४ ॥

अथ कदाचिदंतेवासिभिः परिवृतः कनकगर्भ इव सनकादिभिः पुरस्कृतवीतिर्विशांपत्युः सदनमुपागमद्गालवनामा महर्षिः । महीजानिरपि प्रतीहारनिवेदितनिर्यमधनागमनवृत्तांतो नितांतसंजातप्रहर्षः प्रत्युद्गमादिभिः सभाजयन्नुपचारैरनर्घमणिविष्टरोपविष्टमेनमुवाचेदमुपश्रितपुरुषप्रश्रयो बम्हार्षिम् ।

अपिवर्धेततपोवः प्रशमितविघ्नानि किं वितानानि ॥
शमितश्वापददनुजोपप्लवमास्ते किमाश्रमस्थानम् ॥ १५ ॥

दितिसुतकृतबाधाहेतुर त्रागमे किं
त्वयि नहिघटते सा तादशी यत्तपस्ते ।
अथ सकलधरित्रीदक्षिणानां मखानां
यदि भवति चिकीर्षा किंपरायत्तमत्र ॥ १६ ॥

---

१ गर्वानें व्यापणें पक्षीं सुगंध बाहुल्य. २ याचक पक्षीं वानर विशेष. ३ अहार्य (पर्वती *।मत्र (सूर्य) पक्षीं स्पष्टच आहे. ४ सर्व मंगळा (पार्वती) पक्षीं स्पष्ट. ५ गरुडाच्या आईचे नांव विनता पक्षीं विनत आनंद. नम्र जालेल्यास संतोषविणारा. ६ सुमित्रा लक्ष्मणाची आई पक्षीं असु + मित्र= प्राणमित्र. ७ विष्णु पक्षीं जिकणारा ८ अनंता पृथ्वी ९ तिजवरील सुर (ब्राम्हण) पक्षीं अनंत + असुर + प्रिय. १० युद्ध. ११ ऐश्वर्य. १२ विशेष. १३ भूयामिपाळ १४ मत्स्य. १५ ऋषि सन्मान करून १६ यज्ञ. १७ उपप्लव (विघ्न)

गिरमिति निगदंतं भूमिजानिं मुनींद्रो
विनयविनतमूर्तिं वाचमेवं जगाद ।
त्वयि जयति नितांतं दुष्टशिक्षावितंद्रे
न दनुजकृतबाधा दृष्टपूर्वाऽश्रमेषु ॥ १७ ॥

इदानीं कोऽपि दनुजापसदः कामं विकलयति मदी-
यमाश्रमपदं कासारमिव कासरः । तथा हि
कासारान् कलुषीकरोति फालिनः सर्वान् भिनत्ति द्रुमान्
धेनूर्हंति बटून् हिनस्ति यमिनां भार्या हरत्याश्रमात् ।
अन्यत्किं परिभर्त्सिता बहुतरं येनाति दुष्टात्मना
नेत्रागारमपि प्रवेष्टुमनिशं त्रस्यंति राजन् द्विजाः ॥ १८ ॥

विधाय भीमं मृगपक्षिरूपं
तथा स दैत्यापसदः करोति ।
समाधिनिष्ठस्य यथा मनो मे
सरोजपत्रांबुकणोपमं स्यात् ॥ १९ ॥

लिखिताकृतिरिव सततं दरतः परितस्तमेव निध्यायन् ॥
गृहिणीजनोऽपि गृहिणां गृहकर्मसु न क्षमो भवति ॥ २० ॥

शक्नोमितं तपोऽनलसात्कर्तुं दानवाधमं तदपि
क्लेशार्जिततपसो मां हानेः शंकाकरोत्यनुत्साहम् ॥ २१ ॥

अथ केनचित्कालेन ममानंतचिंतासंतानकंदलितबहुलनिश्वासमातरिश्वविताने
विताानिताम्नभसो निपपात परिसरे हरिहयहयप्रख्यो महाहयः तदा तदालोकन-
जनित प्रभूत विस्मयसमालीढस्वांतेषु सकलजनेषु वागुवाच मामित्थमशरीरि-
णी । भगवन्नेष भवते प्रतिपादितो भगवता गभस्तिमालिना तुरंगः ।

जले वा पाताले त्रिदशभुवने वाऽवनितले
दिशामंते मूर्धन्यवधिकुधरस्याऽपि परतः ।
चरन्नैव ग्लानिं भजति सतताकुंठितगति
स्तुरंगोनंसोऽयं जवजितसहस्रांशुतुरगः ॥ २२ ॥

जलधिवसनामुर्वीं भ्राम्यन्नजातपरिश्रमः
कुवलय इति ख्यातिं तस्मादसौ समुपैष्यति ।

---

१ रेडा. २ अग्नीचें स्थान. ३ वायु. ४ नाशन.

नरपतिसुत स्वारुह्यैनं तनोतु क्रतुध्वजे
मुनिजनतप:प्रत्यूहानामपासनमंजसा ॥ २३ ॥

तमेनमाज्ञानेयं भूजानितनूजन्मने वितीर्य तेन समीहितार्थं संपादयतु भवानिति । स एवायं गंधर्व: ।

तदेनमारोप्य हयं तनूजं
मया सहत्वं प्रहिणु क्षितीश ।
तथा चरत्वेष यथा न धर्मो
विलुप्यते यत्क्षितिपोऽशभोक्ता ॥ २४ ॥

इतीदमाकर्ण्य मुदितमना मेदिनीपतिर्महर्षिभाषितमिदमवादीत् । भगवन् भवतोऽपि धर्माश्रमरक्षणे वयमपेक्षणीया इति तवैवानुभाव: । तथाहि

अस्मादृशा गुरुणि कर्मणि फल्गवो[2]ऽपि
कामं भवंति पटवो भवत: प्रसादात् ।
यद्विद्विषां विदलयंति शरा: शरीरं
बीजं प्रयोक्तृकरकौशलमेव तत्र ॥ २५ ॥

अस्मान् परं समलंब्य भवत्प्रभावो
विघ्नान्निहंति यमिनां तपसि प्रसक्तान् ।
ज्योतिर्लता समवलंब्य सहस्रभानो
स्तेजो निहंति तिमिरं खलु शर्वरीषु ॥ २६ ॥

किं बहुना ।

याचते गृहमुपेत्य गालवो
रक्षणीय इह तापसाश्रम: ।
तच्च मे तनुभवोपपद्यते
चेत्किमस्ति सुकृतं तत:परम् ॥ २७ ॥

इति नितांतमनुमोदयन्नयमवनिसुरवरविनिर्वर्तितकौतुकमंगलं निजतनूजमादत्तस[4]पर्येण मुनिवर्येण सह प्रस्थापयामास । सोऽपि जनकाज्ञया समुपात्तसकलसाधनो नियमधनवितीर्णमधिरुह्य तुरंगपुंगवमखर्व[5]प्रमोदभरभरितपुरंध्रीजनकरनिकरविकीर्यमाणपल्लवतल्लज[6]शतपर्विकानिकायव्यतिकरशबलितबलिकुसुमविसरमंगलिकुर्वाणोभाविपरिणयशुभारंभपिशुनमशीनिधरानुभावो धराधिराजतनूजो धर्माश्रमरक्षणाय प्रतस्थे । तदनुपरिसरतरुशाखाशिखानिकरविनिबद्ध वल्कल

१ पाठम. २ असमर्थ. ३ रात्र ४ पूजामान्य केलेला. ५ अतिशय. ६ उत्कृष्ट. ७ वृक्ष.

निचयसंजनितमर्मरश्रवणकंदलितकुतुकरचितचटुचंक्रमणतरुणहरिणगणचरण-खरतरखुरपरिक्षुण्णक्ष्मातलसमुत्कीर्णपरागपटलपरिमिलनबहुलीकृतहोमधूमप्राग्भारमेदुरितनभोमंडलं बिसांकुरशंकासमाकृष्टजृंभासमारंभविकस्वरहरिकिशोरवक्त्रदरीदरीदृश्यमानदंष्ट्रांकुरकरिकलभकुलावृतं अनोकहमूलतलसमास्तीर्णविस्तीर्णतरतरक्षुकृत्तिनिर्वर्णनजनितसाध्वसधावमाननवीनगवीकदंबकालनचटुलवपुपटलपददघट्टनत्रुटितचिरपरिपोषितलतावितानविलोकनसमुदितरुदितसमुदंचितनयनसलिलधारापरिप्लुतल्पनकमलावलेहनसमुत्पादितहसितचमूरुतर्णकपरिलालनपरमुनिकुमारिकाजनमनोहरं निजकरसरोजकलितधारासंवर्धितप्रवृद्धरसालवरवासंतिकापरिणयसमारंभसंभृतामोदमुनिकन्यकाजनसंगीतमंगलप्रबंधसहकारिसरससहकारतरुबंधुगंधांधपुष्पंधयमधुरझंकारमुखरितदिशामुखं समददंतिनिकरदंतनिशितकुंतदलिततेजनगलितशर्करसीमंतिनीसमानीतप्रि[1]यंगुकणक्रीतनितांतकांतमुक्ताफलान्यपि दूरे निरस्य निजवपूंषि केवलकुसुमकिसलयबिसांकुरैरलंकुर्वतीभिर्नागरजतोपहास्यवेषचरित्राभिः पुत्रिकाक्रीडनकुतूहलसमापतन्मुनिपुत्रिकाभिराक्रांतपर्यंत तरुमूलवितर्दिकासहस्राभिरामं हूयमानहविःकुशसमास्वादनलौल्यपरिपतितगृह्यचमूरुशावकनिर्भर्त्सनव्यापार[2] विस्मापितमंत्रक्रमानुसंधाननिमीलितार्धविलोकनोत्कंधरगृहमेधिविराजमानत्रेताल[3]यं अमलकमलाकरोदरविहारशीतलसामोदगंधवहस्तनंधयसंस्तवनिरस्तत्रयीनयाभ्यासपरिश्रांतमुनिकुमारपरिश्रममाश्रमं समाससाद महर्षेः सहर्षम्।

गालवादिमुनिभिः स सत्कृतो
राजसूनुरथ तापसाश्रमे ।
दुष्टसत्वदमनाय वाजिना
बाणकार्मुककरश्चचार ह ॥ २८ ॥

कृत्वा गतासून् करिणस्तरक्षून्
हत्वा मृगेंद्रान् विनिपात्य भीमान् ।
अपास्तबाधं विदधे सवीर-
स्तपोवनं तापसपुंगवस्य ॥ २९ ॥

तदीयास्त्रनिर्भिन्नकुंभीद्रकुंभ-
स्खलद्रक्तमुक्तापरीता धरित्री ।
मिलत्सांध्यरागोडुजालस्य शंकां
विधत्ते नितांतं नभोमंडलस्य ॥ ३० ॥

मुनिकुमारनिरूपितविस्मय-

१ नक्षत्रसमुदाय. २ बळी विशेष, वेदी, आळे. ३ नक्षत्रसमुदाय.

स्थलविलोकनजातकुतूहलः ।
कतिपयान् दिवसान् समनीनयत्
मुनिगृहे नरदेवतनूभवः ॥ ३१ ॥

अथ कदाचित् ।

वीरोत्तंसं क्षितिपतिसुतं नाश्रमस्थं विजानन्
संध्योपास्तिप्रवणहृदयं गालवं तं महर्षिम् ।
मत्तः कोऽपि प्रचलमनसं धर्षणाद्यौश्चिकीर्षु-
र्धर्मारण्यं दनुजहतकः प्राविशद्घोणिरूपी ॥ ३२ ॥

ततः ।

छिन्नच्छायातरुकलुषितस्वच्छकासारनीरं
दंष्ट्राकृत्तोत्त्रुटितलतिकं ध्वस्तमुस्ताकर्दमम् ।
त्रासोद्रेकश्चलितविहगं भीतधावत्कुरंगं
चक्रेऽरण्यं सदनुजकिटिस्तापसानां निवासम् ॥ ३३ ॥

तेनैवमात्तगंधे तपोवने

आरोहंति तरून्विमुक्तसमिधस्त्रासोत्कटाश्रंगिन-
स्त्यक्त्वा सेकविधिं मुनींद्रतनया धावंति पृथ्वीरुहाम् ।
तिष्ठंतो मुनयोऽपि मुक्तनियमा हंतुं यतंते कुशै-
र्गोपायंतिकुलस्त्रियोऽपि यमिनां नीवारमूलादिकम् ॥ ३४ ॥

तदनु भयातुरपलायमानमुनिकुमारीनिवेदितवृत्तांतो राजपुत्रः
रोषातिरेकपरिपाटलनेत्रपद्मः
सज्जं विधाय धनुरश्वमथाधिरुह्य ।
बाणेन तं समधिगम्य जघान दुष्टं
घृष्टिं महाशनिनिपातनिभेन तूर्णम् ॥ ३५ ॥

तद्बाणाभिहतः स दानवकिटिः स्वप्राणरक्षातुर-
स्तीर्त्वा पर्वतगुल्मपादपलतासंबाधदुर्गाटवीम् ।
धावंधावमतीतयोजनशतो विस्तारयन् घुर्घुरं
कस्मिंश्चिन्निपपात भूमिकुहरे घोरांधकारावृते ॥ ३६ ॥

अथ ऋतुध्वजप्रचोदितकुवलयाश्वोऽपि भूदारं तमनुद्रवन् भूगर्ते महति नि-
पपात। अथ तत्र नरदेवनंदनोऽप्यनालोकितवराहस्तमितस्ततो विचिन्वन्ननंतमणि-

१ घोणी ( डुकर ).

मयप्राकारप्रभाविनिर्वर्तितानंतमणिकुयं अचंचलचंचलासनाथपयोवाहव्यूहशंकाकर-कांचनपांचा[1]लिकानिकरपरिवारितहरितमणिविकारप्रासादशिखरमनोहरं विशाल-सालशिखावलीविनिवेशितकृतकशि[2]खावलजालविलोकनसंजनितदरमुग्धकाकोदर-शातोदरीवारविदूरविमुक्तपरिसरप्रदेशं अनंतकांतशशिकांतनितांतकांतिसंतानसमा-क्रांततयानपेक्षितनिशाकांतं विचित्रवसनकृतावगुंठनमिव व्यतिकरितनवरत्नकर्बु[3]र-रुचिनिचयसंछादितं छादितं समुत्तुंगतरनिकेतनशिखराग्रनिबद्धकेतनपटांचलकं-दलितपवनपरिपूरितोदरकाकोदरकुलाभिनंद्यं शरदरविंदबंधुरकलिंदनंदिनीह्रदसंदे-हसंधायककुंजरागरंजितशचींद्रमणिमयवितर्दिकासहस्राभिरामं वारनारीनिकेतनमिव भु[4]जंगलोकाश्रयं महारण्यमिव बहुविद्रु[5]मोपशोभितं विभवविजितगोपुरं किमपिपुर-मद्राक्षीत् । तदानीं तदवलोकनजनितप्रभूतविस्मयविस्फारितलोचनारविंदो नरेंद्र-सूनुः कस्येदमधिष्ठानमदृष्टश्रुतपूर्ववैभवमित्यगंतुकामः प्रविश्य तस्मिन्नदृष्टजन-संचारः संचरन्नितस्ततः कांचनचंचललोचनां विलोक्य कस्य त्वं कुतो वा क नु व्रजसीत्यनुयुक्तामप्यदत्तोत्तरां तां सत्वरगमनामनुजगाम । तदानीं दक्षिणोऽयं स्पंदमानदक्षिणभुजाक्षिपद्मः स्वमनस्येवमचिंतयत् ।

अक्षि स्पंदमुपैति दक्षिणमिदं वामेतरो वेपथुं
बाहुर्विंदति को भवेदिह शुभोदर्कोऽनुरूपो मम ।
किं दैतेयजयः कियच्छुभमिदं नान्यद्दरीदृश्यते
दैवं चेदनुकूलतामुपगतं किं दुर्लभं देहिनाम् ॥ ३७ ॥

इति मनसि विचारयन्नेव पुरसरोजकर्णिकायमानं सुना[6]सीरनासीरमिव गांगेय-विराजितं नरवरांतः पुरमिव सुरुचिरमणिगणैक विलासितं सुधर्मोद्देशमिव चित्रशिखंडिजातपरिष्कृतं कमलबंधुनंदनस्कंधावारमिवनीलगवाक्षालंकृतं निजवि-भवकृतवैजयंतजयंतदानीमेकंप्रासादवतंसमारोहंत्यास्तस्या अनंतर एव तदा लिंदो-द्देशनियमितुरंगोऽसौ हंस इव तंसमारुरोह

तस्मिंस्ततः कनकमंचतले निषण्णां
कांचिन्नरेंद्रतनयः सुदतीमपश्यत्।
उन्मीलदुत्पलमरीचिसखैः कटाक्षैः
पर्यंतगां प्रियसखीमभिसंस्पृशंतीं ॥ ३८

१ पुतळी. २ मोर. ३ चित्रित. ४ सर्प पक्षी जार. ५ पोवळें पक्षी झाडी. ६ इंद्र. ७ इंद्र ८ देवसभा.

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छायां येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक. ३. मार्च, सन १८८०. अंक ३.

हें मासिक पुस्तक
पुणें पेठ शनवार, येथें
'श्री शिवाजी' छापखान्यांत छापिलें.

किंमत ८ आणे.

# राजव्यवहार-कोश.

ह्या नांवाचा कोश सुमारें २० वर्षांपूर्वी रा० रा० काशिनाथ गंगाधरजी क्षत्री यांणीं छापून प्रसिद्ध केला असें आमच्या ऐकिवांत होतें. हल्लीं तो विकत तर मिळत नाहींच; परंतु कोणाच्या संग्रहीं असल्याचेंही क्वचितच आढळतें. याजकरितां ह्या कोशाच्या अनेक प्रती मिळवून तो पुनः एकवार प्रसिद्ध करण्याचा आह्मी विचार केला आहे.

महाराष्ट्र भाषेंत जे मुसलमानी शद्ब प्रचारांत आले आहेत ते एकत्र करून त्यांस संस्कृत पर्याय देऊन एक कोश तयार करावा अशी आज्ञा श्री० शिवाजी छत्रपति यांणीं केल्यावरून महाराजांचे प्रिय अमात्य जे रघुनाथ पंडित अंत्वरी त्यांणीं हा कोश निर्माण केला.

याची रचना संस्कृत आणि प्राकृत [ह्म० मराठी, फारशी, अरबी, व ऊर्दू] अशी मिश्रित पद्यरूपानें केली आहे यामुळें तो समजायास सोपा आहे. तो साधारण गृहस्थ, दरबारी कारकून व शाळेंतील विद्यार्थी यांना हांसत खेळत तोंडीं बसण्यासारखा आहे.

रा० रा० काशिनाथ गंगाधरजी असें ह्मणतात कीं, "या कोशाची नुसती वाचणी केली तर हजारों संस्कृत शद्ब मनांत ठसून, मराठी भाषेची प्रौढता आणि माहितगारी वाढेल यांत संशय नाहीं." आह्मांस तर असें वाटतें कीं, या वाचणी पासून संस्कृत व मुसलमानी ह्या दोन्ही ही भाषेंतील उपयुक्त शद्ब—ज्यांची उणीव हल्लीं फार भासूं लागली आहे असे—प्रचारांत येऊन आमच्या महाराष्ट्र भाषेची बरीच उणीव दूर होईल.

सुमारें २० वर्षांमागें ज्या वेळीं हा ग्रंथ प्रथमतः प्रसिद्धीस आला त्यावेळे पेक्षां मराठी भाषेला ऊर्जित दशेस आणण्याची चळवळ प्रस्तुत काळीं पुष्कळ दृष्टीस पडत आहे तेव्हां अशा वेळीं अशा ग्रंथाचा उपयोग किती होईल हें सांगणें नको.

ह्या ग्रंथाचे राजवर्ग, कार्यस्थानवर्ग, भोग्यवर्ग, शस्त्रवर्ग, चतुरंगवर्ग, सामंतवर्ग, दुर्गवर्ग, लेखनवर्ग, जनपदवर्ग, व पण्यवर्ग असे १० भाग आहेत. एकंदर श्लोक संख्या सुमारें ४०० आहे. हे श्लोक सुंदर टैपानें छापून प्रत्येक पृष्ठाचे तळीं पाठांतरें व कठीण स्थळीं टीपा देऊन शेवटीं वर्णानुक्रमें कोशांतील सर्व प्राकृत शद्बांची यादी व ज्या श्लोकांत ते आले आहेत त्याचा अंक असें देण्याचें योजिलें आहे. कागद **काव्येतिहास-संग्रह** पुस्तकास घालतात त्याच प्रतीचा जाड घालण्याचें योजिलें आहे.

ह्या उपयुक्त उद्योगास यथायोग्य आश्रय मिळाल्यास पुस्तक छापून येत्या

## विषयक्रम.

बखरी.

शिवछत्रपतींचें चरित्र २१–२८.

साष्टी (उर्फ ठाण्या) ची बखर ३–६.

पत्रें, यादी वगैरे. १३–१६.

मराठी कविता.

मुक्तेश्वर. मुखपत्र, शुद्धिपत्र वगैरे.

वामन पंडित.—प्रेमसरी. नृहरि-दर्पण. ८७–९०.

संस्कृत कविता.

त्रिविक्रमकृत मदलसा-चंपूः २९–४०.

# राजव्यवहार-कोश.

ह्या नांवाचा कोश सुमारें २० वर्षांपूर्वीं रा० रा० काशिनाथ गंगाधरजी क्षत्री यांणीं छापून प्रसिद्ध केला असें आमच्या ऐकिवांत होतें. हल्लीं तो विकत तर मिळत नाहींच; परंतु कोणाच्या संग्रहीं असल्याचेंही क्वचितच आढळतें. याजकरितां ह्या कोशाच्या अनेक प्रती मिळवून तो पुनः एकवार प्रसिद्ध करण्याचा आह्मी विचार केला आहे.

महाराष्ट्र भाषेंत जे मुसलमानी शब्द प्रचारांत आले आहेत ते एकत्र करून त्यांत संस्कृत पर्याय देऊन एक कोश तयार करावा अशी आज्ञा श्री० शिवाजी छत्रपति यांणीं केल्यावरून महाराजांचे प्रिय अमात्य जे रघुनाथ पंडित अमात्य त्यांणीं हा कोश निर्माण केला.

याची रचना संस्कृत आणि प्राकृत [ह्म० मराठी, फारशी, अरबी, व ऊर्दू] अशी मिश्रित पद्यरूपानें केली आहे यामुळें तो समजायास सोपा आहे. तो साधारण गृहस्थ, दरबारी कारकून व शाळेंतील विद्यार्थी यांना हांसत खेळत तोंडीं बसण्यासारखा आहे.

रा० रा० काशिनाथ गंगाधरजी असें ह्मणतात कीं, "या कोशाची नुसती वाचणी केली तर हजारों संस्कृत शब्द मनांत ठसून, मराठी भाषेची प्रौढता आणि माहितगारी वाढेल यांत संशय नाहीं." आह्मांस तर असें वाटतें कीं, या वाचणीपासून संस्कृत व मुसलमानी ह्या दोन्ही ही भाषेंतील उपयुक्त शब्द—ज्यांची उणीव हल्लीं फार भासूं लागली आहे असे—प्रचारांत येऊन आमच्या महाराष्ट्र भाषेची बरीच उणीव दूर होईल.

सुमारें २० वर्षांमागें ज्या वेळीं हा ग्रंथ प्रथमतः प्रसिद्धीस आला त्यावेळे पेक्षां मराठी भाषेला ऊर्जित दशेस आणण्याची चळवळ प्रस्तुत काळीं पुष्कळ दृष्टीस पडत आहे तेव्हां अशा वेळीं अशा ग्रंथाचा उपयोग किती होईल हें सांगणें नको.

ह्या ग्रंथाचे राजवर्ग, कार्यस्थानवर्ग, भोग्यवर्ग, शस्त्रवर्ग, चतुरंगवर्ग, सामंतवर्ग, दुर्गवर्ग, लेखनवर्ग, जनपदवर्ग, व पण्यवर्ग असे १० भाग आहेत. एकंदर श्लोक संख्या सुमारें ४०० आहे. हे श्लोक सुंदर टैपानें छापून प्रत्येक पृष्ठाचे तळीं पाठांतरें व कठीण स्थळीं टीपा देऊन शेवटीं वर्णानुक्रमें कोशांतील सर्व प्राकृत शब्दांची यादी व ज्या श्लोकांत ते आले आहेत त्याचा अंक असें देण्याचें योजिलें आहे. कागद काव्येतिहास-संग्रह पुस्तकास घालतात त्याच प्रतीचा जाड घालण्याचें योजिलें आहे.

ह्या उपयुक्त उद्योगास यथायोग्य आश्रय मिळाल्यास पुस्तक छापून येत्या

# विषयक्रम.


बखरी.

शिवछत्रपतींचें चरित्र २१–२८.

साष्टी (उर्फ ठाण्या) ची बखर ३–६.

पत्रें, यादी वगैरे. १३–१६.

मराठी कविता.

मुक्तेश्वर. मुखपत्र, शुद्धिपत्र वगैरे.

वामन पंडित.—प्रेमसरी. नृहरि-दर्पण. ८७–९०.

संस्कृत कविता.

त्रिविक्रमकृत मदलसा-चंपूः २९–४०.

गावरि टाकून रडत पडली. "मुसलमानाची पादशाई खुदानें बुडविली," ऐसा कित्येक विलाप करून बहुत शोक केला. पादशाह-जादीनें [17] तीन दिवस अन्न उदक [घेतलें] नाहीं. तसेच कुल् मोठमोठे वजीर व लष्कर व कुल् शहर दिलगीर जाहाले. ह्मणूं लागले कीं, "उद्यां राजा येऊन शहर मारील व कोट घेईल." ऐसे घाबरे जाहाले. "खुदानें मुसलमानाची पातशाही दूर करून मराठ्यांसि दिली असें वाटतें," असें ह्मणों लागले.

त्या उपरांत मग राजियासि स्वप्नांत श्रीभवानी तुळजापुरची येऊन बोलूं लागली कीं, "आपण अफजल् तुझ्या हातें मारविला. व कित्येक पुढेंही आले, त्यांस पराभवांत नेलें. पुढें हीं कर्तव्य [18] उदंड कारण करणें आहे. आपण तुझ्या राज्यांत वास्तव्य करावें. आपली स्थापना करून पूजा-पूजन-प्रकार चालविणें." त्याउपरि राजियानें गंडकी* नदीस द्रव्य गाडियावरि घालून, गंडकी पाषाण आणून, श्री भवानी सिद्ध करून, प्रतापगडा [वर] देवीची स्थापना केली. धर्मदान उदंड केला. देवीस रत्नखचित अलंकार भूषणें नानाप्रकारें करून दिलीं. महाल मोकाशे देऊन सचंतरें [19] हवालदार व मुजुमदार व पेशवे देवीचे करून महोच्छाव चालविला. नवस यात्रा सर्वदां तुळजापुरच्या प्रमाणें तेथें चालती झाली. आणि तुळजापुरचे यात्रेस लोक जातात त्यांस दृष्टांत स्वप्नें होतात कीं, "आपण प्रतापगडास आहें. तेथें तुह्मीं जाऊन दर्शन घेणें व नवस फेडणें." असें [देवी] बोलूं लागली. मोठें जागृत स्थान जाहालें.

यानंतरि, विजापुरचा मातबर वजीर अफजुलखान होता तो बुडविला, तेव्हां पातशाही कमतर पडली, असें समजून राजियानें विजापूरचे किल्ले तळकोकणांत होते ते सर्व घेतले. पन्नास साठ गड घेतले. तळकोंकण काबीज केलें. वरघाटही घेतला. तेव्हां लष्कर पागा सात हजार व शिलेदार आठ हजार, एकूण पंधरा हजार व हशम लोक बारा हजार ऐसी तोलेंदार [20] फौज जमा जाहाली. लष्कर कुल जमाव घेऊन नेताजी पालकर सरनोबत मोगलाईंत स्वाऱ्या करून, बालेघाट परांडे, हवेली, कल्याण [21], कलबुर्गे, आवसें,

---

१७. "पांच सहा दिवस" म० प्र०

१८. उदंड=पुष्कळ, मोठें.

* गंडकी, नारायणी ऊर्फ शाळिग्रामी ही नदी नेपाळांतून वाहून येऊन भागिरथीस मिळते

१९. सचंतर=स्वतंत्र, निराळे.

२०. तोलदार=मोठी, जबरदस्त ह्या अर्थी.

२१ देशावरील कल्याणी.

उदगीर, गंगातीर[२२] पावेतों मुलुख मारीत चालले. खंडण्या घेतल्या. मुलुख अप्त केला. औरंगाबादचे पुरे मारिले. मोंगलाकडील फौजदारे[२३] औरंगाबादेंत होता, तो चालून आला त्याशीं युद्ध जाहालें[२४]. हत्ती घोडे पाडाव केले. मोंगलाईत धुंद उठविली. ऐसा पराक्रम करीत चालले.*

जे जे गड घेतले त्या गडावर राजियानें कारभारी बंदोबस्ती ऐसी पद्धत घातली कीं, गडावरि हवालदार एक, व सबनीस एक, व सरनोबत एक, असे तिघेजण एका प्रतीचे. जो कारभार करणें तो तिघांनीं एका प्रतीचा करावा. गडावरि गल्याचे सामानाचे अंबेरे[२५] करावे. त्यास कारखाननीस ह्मणून कारभारी केला. त्याचे विद्यमानें सर्व कारखाने यांस जमाखर्च लिहावा. गड† तोलदार आहे तेथें, त्या गडाचा घेरा थोर, त्या जागां सात पांच तट-सरनोबत ठेवावे. त्यांस तट वांटून द्यावे. हुशारी खबरदारीस त्यांनीं सावध असावें. गडावरि लोक ठेवावे त्यांस दहा लोकांस एक नाईक करावा. नऊ पाईक‡ दहावा नाईक, येणें प्रमाणें §जातीचे लोक ठेवावे. लोकांत बंदुखी व ईटेकेरी[२६] व तिरंदाज व आडहत्यारी असे लोक मर्दाने चौकशीनें आपण राजियानीं नजर गुजर§§ [करून] एक एक माणूस पाहून ठेवावे. गडावरि लोक हावलदार व सरनोबत मराठे जातीवंत ठेवावे. त्यांस जामीन आपले हुजरातीस लोक असतील त्यापैकीं घेऊन मग ठेवावे. सबनीस ब्राह्मण हुजरातीचे ओळखीचे ठेवावे. व कारखाननीस परभू ठेवावे. असे एकास एक

---

२२. गंगातीर=गोदातीर

२३. 'सुभेदार' म० प्र०

२४. "त्यासि जिवें मारिलें" म० प्र०

* अक्टोबर १६५९ मध्यें अफ्जलखानास मारिलें. दिसेंबर मध्यें विजापुरचा हस्तक रुस्तुम झमान याचा पन्हाळा किल्ला घेतला. मे महिन्यांत पन्हाळ्यास वेढा पडला. तेथून राजाचें पलायन, बाजी परभूचें शौर्य, सांवताशीं बाजी पासलकराचें युद्ध व त्याचा मृत्यु, सिध्धीचें पारिपत्य, विजापुरापर्यंत लुटालूट, बाजी घोरपड्याचा वध, शहाजीची भेट, विजापूरकरांशीं शिवाजीचा गुप्तरीतीनें झालेला सल्ला, वगैरे दोन वर्षांची हकीकत येथें दिलेली नाहीं. विजापुराशीं आंतून सल्ला झाल्यावर व मोगलांनीं कल्याण भिवंडी परत घेतल्यानंतर सन १६६२ मध्यें वर लिहिल्याप्रमाणें मोरोपंत व नेताजी याणीं मोंगलाचें मुलुखांत धामधुम उडविली.

या वेळीं [१६६२] शिवाजी जवळ निदान ५० हजार पायदळ व ७ हजार घोडा अशी फौज होती. त्याचा मुलुख कोंकणांत कल्याण भिवंडी पासून गोव्यापर्यंत सुमारें २०० मैल व देशावर भीमा व वारणा या नद्यांमधील १६० मैल इतका होता. ह्या मुलखाची रुंदी कोठें कोठें १०० मैल होती.

२५. अंबर = कोठार

† तोलदार = मोठा, विशाळ.

‡ पाईक = शिपायी, पदाति.

§ जातीचे = जातिवंत, चांगल्या कुळांतील.

२६. 'हेटकरी' म० प्र०

§§ नजरगुजर = नजर गुजारत = पाहणी.

प्रति मेळे[२७] ठेवावे. एक हवलदाराचे हातीं किल्ला नाहीं.* हरएक फितवा फांदा यास किल्ला कोणाच्यानें देववेना. ये रीतीनें बंदोबस्तीनें गड कोटाचे मामले केले. नवी पद्धत घातली.

तसेंच लष्करांत पागा केली. पागेचे बळ तोलदार केलें. पागांच्या तालेदारी‡ खालीं शिलेदार ठेविले. स्वतंत्र बंड कोणाचें चालेना. पागे मध्यें दर घोड्यासि बारगीर एक. [असे] पंचवीस बारगिरांस मराठा धारकरी हवालदार एक केला पांच हवाल्यांचा एक जुमला ह्मणून नांव ठेविलें. जुमालदारास पांचशें होन तैनात व पालखी त्यास एक व [त्याच्या] मजमुदारास शे सवाशें होनांची [तैनात] करावी. पंचवीस घोड्यांस एक पखालजी, व एक नालबंद. असे दहा जुमले ह्मणजे एक हजारी. यास एक हजार होन तैनात, एक मजुमदार व एक मराठा कारभारी व एक जेमनीस[२९] परभू कायस्थ, त्यांस पांचशें होन. या प्रमाणें असामीस तैनात [व] पालखी द्यावी. आला जमाखर्च चौघांचे विद्यामानें करावा. अशा पांचा हजारिया मिळोन एक पांचहजारी करावा. त्यास दोन हजार होन तैनात. तसेच मजुमदार, कारभारी, जमनीस करावे. अशा पांच हजारिया सर-नोबताच्या हुकुमांत. ये जातीचा मामला पागेचा. तसे शिलेदारांकडे सुभे वेगळाले, तेही सर नोबताचे आज्ञेत. पागा [व] शिलेदार मिळोन सरनोबत याचे आज्ञेत वर्तावें. दर हजारी, पंचहजारी, सरनोबत यांजवळून वांकनिसीचे कारकून व हरकारे व जासूद ठेवावे. सरनोबताजवळ बहिरजी जाधव नाईक, मोठा शहाणा, जासुदांचा नाईक केला. तो बहुत हुशार चौकस करून ठेविला.

लष्कर पावसाळिया दिवशीं छावणीस आपले देशांत यावें. त्यास दाणा रतीब औषधें, घोडियांस[व] लोकांस घरें, गवतानें शाकारून ठेवविलीं असावीं. दसरा होतांच छावणीहून लष्कर कूच करून जावें. ते समयीं कुल लष्करचे लहान थोर लोकांचे निशांदीचे[३०] जाबते[३१] करावे, आणि मुलुखगिरीस[३२] जावें. आठ महिने बाहेर लष्करांनीं पर मुलखांत पोट भरावें. खंडण्या घ्याव्या. लष्करांत बायको व बटकी व कलावंतीण नसावी. जो बाळगील याची गर्दन मारावी. पर मुलखांत पोर बायका न धरावीं. मर्दाना सांपडला तरि धरावा. गाई न धरावी. बईल

२७. 'एकास एक मेळ प्रतीनें' म० प्र०

* हरएक = कोणताही.

‡ तालेदारी = अंमल, दरारा.

२८. "पांच जुमल्यांचा (६२५) एक सुभा, व दाहा सुभ्यांचा (६२५०) एक पंचहजारी" असें मा० ड० म्हणतात.

२९. जमनीस = मुलकी कामगार.

३०. निशाद = माळमत्ता, चीजवस्त.

३१ जाबता=यादी, टिप्पण.

३२. "धावणीस" म० प्र०

ओइयास मात्र धरावा. ब्राह्मणास उपद्रव न द्यावा. खंडणी केल्या जागां ओळखयीयासि ब्राह्मण न घ्यावा. कोणी बदअंमल[33] न करावा. आठ महिने परमुलखांत स्वारी करावी. वैशाख मासीं परतोन छावणीस येतांच आपले मुलखाचे सरदेस[34] कुल लष्कराचा झाडा घ्यावा. पूर्वील निशादीचे जाब ते रुजु घालावे. ज्याजती होईल तितकी किंमत करून त्याच्या हैक्कांत[35] धरावी. थोर किमतीची वस्तभाव असलियास दिवैणांत[36] द्यावी. कोणी चोरून ठेवील आणि दाखल सरदारास जाहलियानें शासन करावें. लष्कर छावणीस आलियावर हिशेब करून सोनें रुपें, जड जवाहीर व कापड वस्तभाव कुल सरदारांनीं बराबर घेऊन राजाचे दर्शनास जावें. तेथें अवघे हिशेब समजावून मालहुजूर द्यावा आणि लष्करच्या लोकांचे हिशेब देणें, [व] फाजील समजावीस जो ऐवज जो मागणें तो हुजूर मागावा. मग छावणीस यावें. काम कष्ट मशागत[37] केलिया लोकांस सरंजाम करून द्यावा. बेकैद वर्तणूक कोणी केली असेल आणि नामर्दी केली असेल त्यांचीं चौकशी करून, बहुतां मतें शोध करून, त्यास दूर करून शासन करावें. वरचेवर शोध करावा. चार मास छावणी करावी आणि राजाचे भेटीस दसऱ्यास जावें. राजियाच्या आज्ञेनें ज्या प्रांतीं स्वारी जावयाची होईल त्या प्रांतीं जावें. अशी लष्करची रीत.

तसेंच मावळे लोकांतें[38] दहा लोकांत एक नाईक. पन्नास लोक ह्मणजे पंच नायकी यास एक हवलदार. दोन तीन हवाले मिळून एक जुमलेदार. दहा जुमले मिळून एक हजारी. जुमलेदारांस शंभर होन तैनात सालीना. एक सबनीस, त्यास चाळीस होन तैनात. हजारी यास पांचशें होन तैनात. [ त्याच्या ] सबनिसास शंभर सवाशें होन पर्यंत. ऐशा हजारियांस [नेमणुका केल्या.] सात हैजारिया[39] मिळोन एक सरनोबत येसजी कांक ह्मणून केला. याचे आज्ञेंत सर्वांनीं असावें.

सरनोबतास व मजुमदारास व कारकुनांस व हुजरातींतील लोकांस तनखे वराता देत होते. सेत करीत होते त्याचा आकार रयतेप्रमाणें त्यांच्या हक्कांत धरीत होते. वरकड वाटणी हुजूर व मुलुकावरि वराता. येणें प्रमाणें सालझाडा वरचेवर करीत होते. लष्करांत

---

३३. बद अंमल = बदकर्म, जुलूम. ' बदमामला ' पाठांतर.

३४. सरद = सरहद, सीमा.

३५. " हैसार्तीत " पाठांतर

३६. दिवाणांत = सरकारांत.

३७. मशागत = श्रम, मेहनत.

३८. " महाल मुलखांत " प्र० प्र०

३९. " असे सर्व हजारी " पाठांतर.

व हशमास व गडास एकंदर मोकाशे महालगांव दरोबस्त देणे[४०] नाहीं. जे देणे ते *बरातेनें द्यावें, अगर †पोत्याहून रोख ऐवज द्यावा. मुलखांत ‡ साहेबी कारकुनाखेरीज कोणाची नाहीं. लष्करास व हशमास व गडास देणे तें कारकुनांनीं द्यावें. मोकाशी जाहालियानें रयत अफरा § होईल आणि बळावेल. कमाविशीची ॥ कैद चालणार नाहीं. रयत बळावली ह्मणजे जागां जागां बंडे होतील. ज्यास मोकासे द्यावे तो व जमीदार एक जाहालियानें बेकैद होतील. म्हणून मोकाशे कोणास देणेचे नाहीं.

मुलुख काबीज होतो त्यास मुलखास स र ब रा [?] चौकशीस कारकून ठेवावा. आधीं लिहिणार चौकस दप्तरदारी करून. कागद घडणी [?] करून मोकीसबा दिला ह्मणजे दप्तरदारी मध्ये शाहणा पाहून मुलखांत ठेवावा आणि माहालची मजमु सांगावी. कोणास माहालचा हवाला सांगावा. कोणास सुभ्याची मजमु सांगावी. पुढें होतां होतां शहाणा पाहून हवालदार चौकस पाहून सुभा द्यावा. सुभ्याचा मजमुदार लिहिणार, चौकस, हिशेब जाणता त्यासच मामला महालचा सांगावा. केवळ लिहिणें येईना, कमाविशीही न केली, त्यास मुलकीचा हुद्दा न सांगावा. आणि पादशाहींत चाकरी करणें अगर घोडे घेऊन शिलेदारी करणें, असें सांगोन निरोप द्यावा. मुलखास कारकून ठेवावे. त्यास माहल पाहून हवालदारास तीन होन तैनात अगर चार पांच होन इतकी तैनात,मजुमदारास तीन चार पांच, पन्नास पाऊणशे होन येणे प्रमाणें करावे. दोन महाल मिळोन लाख, सवा लाख, पाऊण लाख होन पाहून एक सुभेदार व एक कारकून करावा. त्यास दर असामीस चारशे होन तैनात करावी. मजमुदार सुभ्याचा करावा. त्यास शंभर सवाशे होन करावे. सुभेदारास पालखी चारशे होनांत करार करवावी. मजमुदारास अबदागिरी द्यावी. तैनात सरकारची द्यावी. बादशाहींत छत्री वजीरी उमराव मातबर लोकांस होती, तो शिरस्ता मोडून टाकिला; कीं पादशहावर छत्र आणि चाकर लोकांवरही छत्र ही गैर पद्धत,याकरितां पादशाही कायदा छत्रीचा मोडून अबदागिरीचा घातला. सर्वत्र लष्कर हषम मुलुखगिरीस [जाती-

४०. मोकाशे महाल इ० = प्रांताचे उत्पन्नावर हक्क अगर जाहगीर बिलकुल द्यावयाची नाहीं.

* बरात = पैसा देण्याविषयी चिठ्ठी.

† पोतें=सरकारी तिजोरी.

‡ साहेबी = अंमल, मुखत्यारी.

§ अफरा = अव्यवस्थित.

॥ कमाविशीची कैद=राजाच्या मुलकी कामगाराचा अधिकार अथवा अंमल

४१. " हिशेब " पाठांतर.

' मोसबा ' असें वरील पाठांत असावेंसे वाटतें.

ल] त्यांत भर सवासे होन तैनात असेल त्यानें अबदागिरी वाळगावी. मुलुखांत देश पाहून लाख रुपयांस सुभा ठेविला. धामधुमीचा मुलुख सरदेचा पाहून मुलुखगिरीच्या कारकुनासमागमे लष्कर, स्वार, हशम जे जागां जितकी तालेदारी पाहिजे तितकी करून द्यावी.

प्रज्ञाविक्रमदानैः सूनोरपकृष्टता यथा पुंसाम् ॥ २७ ॥

ज्ञातो मात्रा मातृपक्षैर्निकृष्टः पित्रा लोके ज्ञायते मध्यमस्तु ।
ख्यातिं प्राप्तः स्वैर्गुणैरेव धन्यः पुत्रैर्वित्तः कोपि पुण्याधिकेषु ॥ २८ ॥

पुत्रः स एव यस्तातादतिशेत निजैर्गुणैः ।
पुत्री स एव यः पुत्रान्नातिशेते निजैर्गुणैः ॥ २९ ॥

तस्मादित्थंभूतावुभावपि भवंतौ धन्यतमानां मूर्धनि मन्यामहे । किंच समस्तराजन्यवंशेषु परं प्रशस्तिपद्यामधिरूढो भवतामेवाभिजनः । यत्र वधूपदमुपगतेयमपि गंधर्वराजनंदिनी । इति वदतस्तान् सभास्तारानवसरोचितसल्लापैः सत्कृत्य प्रविष्टशुद्धांतो राजदारचरणारविंदं ववंदे ससुंदरीको नृपनंदनः । अथ विदितनंदनोदंतकंदलितनिर्वेलसंतोषा राजयोषा स्नुषामाश्लिष्य शीतलतरबाष्पवारिपरिप्लुतलोचना विकचारविंदलोचनां तां व्याजहार । अयि वत्से मदालसे ।

गंधर्ववंशे जननं महार्हे सुतेऽनुरागे निरुपाधिके मे ।
शीलं तु लोकोत्तरमेव यस्याः सा त्वं वधूस्त्वं खलु नः प्रपन्ना ॥ ३० ॥

तस्मादितः किमस्त्यस्माकमभ्यर्थनीयं श्रेयो नाम । त्वमप्यनेन वत्सेन सह चिरमनुभूतसकलसाम्राज्या वीरप्रसविनीजनेषु भज केवलं प्रशस्तिमिति । ततः ।

गुरुपरिचर्यानिरतौ विभवैरुपहासितगोपुरे स्वपुरे ।
रमयांबभूवतुस्तौ गंधर्वसुताकुतुध्वजौ नितराम् ॥ ३१ ॥

मुक्तामंचसमंचिते नवमणिस्तंभप्रभाचित्रिते
गेहे वैभवसंभृते दयितया सार्थं तया क्रीडता ।
आनंदाकृतयः परं तनुभुवा भूमीशिशुर्वासरा
नीताः शीतमयूखचुंबितनभश्चक्रं निशानामपि ॥ ३२ ॥

किंच ।

क्रीडाशैलदरीषु शैवलवनीकूलेषु लीलाचलद्वातानीतसरोजसौरभझरीविश्रामभूमिष्वपि ।
माद्यत्कोकिलसारिकाकलरवैरानंदसंधायिषु
प्रेयस्या नृपनंदनः सह मधूद्यानेषु रेमे चिरम् ॥ ३३ ॥

परस्परप्रेमरसातिरेकादकार्यकार्ये विदितेन ताभ्याम् ।
पुरा चिराभ्यासवशेन किंतु विधेयकृत्यं समकारि किंचित् ॥ ३४ ॥

अथैकदा विनीतमेनं स नीतिकोविदो जगाद राजा ऋतुध्वजम् ।

विधिना विहिता नरेश्वराणां कुलवृत्तिः खलु वर्णधर्मगुप्तिः ।
यदि तत्र भजंति ते प्रमादं विभवक्षीवतया तदा पतंति ॥ ३५ ॥

तस्मादस्माकमनामंत्रितानामपि मुनिभिरवश्यं विधेयं तदीयधर्माश्रमाणां परित्राणम् । अतस्त्वमिदानीं तपोभियातिभ्यो यातुभ्यः परित्रातुं सत्रिणः प्रयाहि वाहाधिरूढः सत्वरमिति ।

अथ नरपतिशिष्टिं प्राप्य वीरावतंसो
मुनिवनभुवि सादी संचरन् प्रत्यहं सः ।
घनविटपिनिरुद्धोदग्रतिग्मांशुतापं
कमपि विपिनदेशं प्राप रम्यं कदाचित् ॥ ३६ ॥

तत्रापश्यदभंगभंगविहतव्यालोलवेलालता-
विस्रस्तप्रसवाव्यलिव्यतिकरादामोदमाबिभ्रतीम् ।
अंतर्वारिनिमज्जदब्जवदनावक्षोजगोरोचना-
पंकासंगपिशंगितामथ रवेः कन्या पुरः पावनीम् ॥ ३७ ॥

फुल्लेंदीवरकांतिकंदलसखप्रेंखत्तरंगद्युति-
व्यामिश्रद्विगुणीभवत्तटवनीतापिच्छकांतिव्रजैः ।
स्वच्छंदं पुलिनस्थले विचरतोः स्त्रीपुंसयो रागिणोः
क्रीडांतप्रभवां परेक्षणमहाशंकामपाकुर्वतीम् ॥ ३८ ॥

यत्नेनापि यदृच्छयापि सलिले स्वस्या जगत्पावने
ये मज्जंति मनोहरे तनुभृतस्नानस्तदोष व्रजान् ।
फुल्लांभोरुहतल्लजोदरसमुड्डीनद्विरेफावली-
दंडेन त्रिदशेंद्रपत्तनपथानावेदयंतीमिव ॥ ३९ ॥

भिल्लस्त्रीकुचघट्टनप्रतिलुठत्कल्लोलतालध्वनि-
व्यामिश्रैः पवमानताडिततटत्वक्साररंध्रस्वनैः ।
नृत्यत्यै प्रियपारितोषिकमिव प्रत्यर्पयद्भिर्बिसं
कांतायै कलहंसराजनिकरैर्व्यक्तीकृतस्वकुश्रियम् ॥ ४० ॥

तत ।

तस्यास्तटे विमलवारिकणापहारिवातायसारितमहातपजातखेदे ।
आस्तीर्णवंजुलतरुच्युतपुष्पजाले श्रांतस्तदा क्षणमुवास नरेंद्रसूनुः ॥४१॥

तत्रांतरे तालकेतुनामा पातालकेतुसहोदरः समरविहितनिजाग्रजप्रमापणादारभ्य समेधमानस्य विरोधानलस्य प्रतीकाररंध्राणि चिरमनुचिंतयन् प्रवीरवरं

समराजय्यमाकलय्य कुवलयाश्वं कुहनयैव निहंतुकामः कालिंदनंदिनीतटोद्देश-परिकल्पितकपटाश्रमः समाहततपस्विवेषः तदुपकंठं सोत्कंठमाजगाम ।

समागतं तं कुहनामुनींद्रं विलोक्य दूरादथ राजसूनुः ।
समुत्थितः प्रश्रयनम्रमूर्तिर्ननाम भक्त्या निजनाम शंसन् ॥ ४२ ॥

अथोवाच तालकेतुः पातालनिषूदनम् ।

येषां गृहानुपगतः क्षितिपालसूनो
नार्थी कयापि विफलत्वमुपागतोऽभूत् ।
तेषां सुतस्त्वमसि पार्थिवपुंगवानां
तद्याचितं कथमिवासुलभं मम स्यात् ॥ ४३ ॥

कर्तव्यमस्ति मखकर्म ममाद्य वीर वित्तं विना न सुलभं खलु तद्विधानम् ।
तद्भूषणं वितर मे बहुमूल्यमेकं दत्तेन तेन सफलोऽस्तु मम प्रयत्नः ॥ ४४ ॥

किंच ।

अंतर्जले वैदिकमंत्रसूक्तैः प्रचेतसं पुष्टिकरैः प्रजानां ।
स्तुत्वा गमिष्याम्यहमंग यावत् तावदत्पदं मे तव रक्षणीयम् ॥ ४५ ॥

इत्युक्तवंतं कितवं मुनिं तं स स्थूललक्षः प्रणिपत्य तूर्णम् ।
महाधनां कामपि कंठभूषां वितीर्य सप्रश्रयमेवमूचे ॥ ४६ ॥

आज्ञावशंवदे ब्रह्मन् जनेऽस्मिन् प्रार्थना कुतः ।
अकर्तुं भवदाज्ञप्तं क इव प्रभविष्यति ॥ ४७ ॥

मद्रक्षितेऽत्र मुनिराजकुलावतंस-
पुण्याश्रमे तव तनोति न कोऽपि बाधाम् ।
तस्माद्व्यलीकविरहस्तिमितांतरात्मा
तूर्णं समाचर मनोगतमात्मकार्यम् ॥ ४८ ॥

इत्युक्तो नृपतनयस्य पश्यतोऽभूत्
कालिंदीह्रदसलिले कृतावगाहः ।
उत्तीर्णो दितितनयस्ततो विदूरा-
दामंदादिति हृदि निश्चयं चकार ॥ ४९ ॥

अश्लीलं वदता मया प्रियगतं ग्रैवेयके दर्शिते
सेयं वल्लभजीवितास्य दयिता प्राणानरं त्यक्ष्यति ।
स्वार्थे तां गतजीवितां प्रियतमामाकर्ण्य राजात्मजो
मुंचन्नेव तनुं तदद्य फलितं यत्नेन मे सर्वथा ॥ ५० ॥

इति निश्चित्य मनसि समेत्य राजकुलमनादृत्य तत्कृतमपि सत्कारं विषण्ण-मेव भुवि निषण्णं तमेनं विलोक्य समुद्विग्नहृदयस्तदा जगाद मेदिनीपतिः ।

गेहं समागतवति त्वयि जातहर्षं
दुःखीकरोति बत मां भवतो विषादः ।
पूर्वक्ष्माधरमुपेयुषि शीतभानौ
तुष्टं चकोरमिव राहुमहोपरागः ॥ ५१ ॥

भवादृशानां गृहमागतानामज्ञातबीजात्सविषादभावात् ।
निर्वेदहेतुर्न परोऽस्ति कश्चिन् मुनींद्रमौले गृहमेधिनां नः ॥ ५२ ॥

तस्मादुपगतचेतोविषादहेतोर्निवेदनेनाशु ।
प्रशमय मनोगतं मे संतापं मुनिकुलाब्धिपूर्णेंदो ॥ ५३ ॥

इति वदति नरेंद्रे दैत्यमौनी तदानी-
मलसतरलनेत्रं वक्रमुन्नीय किंचित् ।
प्रतिकलसमुदंचद्दीर्घनिश्वासवेग-
स्फुरदधरपुटः सन्वाचमूचे विषण्णः ॥ ५४ ॥

आधेस्तवोपशमनाय मनोविषाद-
हेतुं ममाद्य कथयन्नरनायकाहम् ।
लग्नं परागमपनेतुमयःशलाको-
ल्लेखं करोमि कथमीक्षणगोलके हा ॥ ५५ ॥

उक्त्वातिकर्कशतया जनगर्हणार्हो
नोत्काप्रतारकतयाहमिदं भवामि ।
इत्यद्य संशयविषादविलीनचित्तो
धत्ते जनोऽयमधुना नृप मौनमुद्राम् ॥ ५६ ॥

तथापि नहीदृशार्था हितेषु समुपेक्षणीयाः । ततः कार्कश्यमवश्यमुररीकृत्यापि वक्तव्यमेव संवृतमाकर्ण्यताम् ।

चरन्नयि महीपते मुनिवनावनायावनी
ममाश्रमसमीपतः समभजत्त्वदीयः सुतः ।
कलिंदगिरिनंदिनीतटवनं सरोजाटवी-
विहाररसिकोच्चलत्पवननुन्नतापोत्करम् ॥ ५७ ॥

अथ तत्र केनचिदुपागतेन कृतांतकिंकरभयंकरेण नक्तंचरेण युद्धाय रुध्य-मानः कुवलयाश्वस्तमेनं जघान बाणैरतिदारुणैः सोऽपि तत्प्रहरणाभिघातमसह-

मानः समास्थाय मायया सह विहायस्त्रिशिखेन विशिखेन बिभेद हृदि कुवलयाश्वं ।

तदा स एनां निजकंठदेशादाकृष्य मह्यं प्रतिपाद्यभूषाम् ।
नाहं हतः केवलमित्युदस्तमधोक्तवागेव जहौ शरीरम् ॥ ५८ ॥

ततः ।

अनाश्रयाणां मुनिवल्लिकानामुपघ्नमेनं विनिहत्य वीरम् ।
कृतार्तहेषं गलदश्रुनेत्रमादाय दैत्यः स जगाम सप्तिम् ॥ ५९ ॥

अथ प्रापितोयमवनिपते सुतस्ते हंत शूद्रतापसैरग्नियोगम् ।

राजन् संचितपातकेन मनसा वज्रं मृदूकुर्वता
दृष्टा हंत मया तथा परिणतिः कष्टा तनूजस्य ते ।
इत्याभाष्य मदालसामुखविधुं निध्याय भूयः श्वसन्
तत्कंठाभरणं नृपांके भुवि स क्षिप्त्वा ययौ दानवः ॥ ६० ॥

ततः ।

कर्णांतिकस्पर्शि वचस्यति दारुणेस्मिन्
प्राणा ययुस्तनुमपास्य मदालसायाः ।
संफुल्लचंपकवनीपवमानपोते
नेदीयसीव झटिति भ्रमराः सरस्याः ॥ ६१ ॥
तस्यास्तथाविधसुदीर्घवियोगदुःखे-
ष्यप्रस्थितान्विकचपद्मदृशः पुरासून् ।
दैत्याधमोक्तमशिवं तदचूचुरत्तान्
प्रत्याशयैव खलु जीवति विप्रयुक्ता ॥ ६२ ॥

अनुरूपमेवेदमनयोस्तथाविधदांपत्यस्य ।

तत्तु प्रेमविडंबनं विघटितं प्राणप्रियायोषितो
वैवर्ण्यं जडतां तमोस्तु तनुतां विंदंति यत्केवलम् ।
यावद्गोचरमाकलय्य सुदती देहं जहात्यप्रियं
सा नूनं दयिता स एव दयितः स्नेहस्य सा पूर्णता ॥ ६३ ॥

अथ तत्र पुरे नरवरांतःपुरे च निर्वेलः सुमहानाक्रंदस्तदानीमुदजृंभत ।

तस्मिंस्तथा सति जने दयितानुरागाद्
भूमीश्वरस्य वदनं सदनं च सद्यः ।
आसीत्समग्रगिलिते कुमुदाप्तबिंबे
स्वर्भानुनेव गगनांगणमस्तकांति ॥ ६४ ॥

उत्खातस्थलनलिनीमिव स्नुषां तां
प्रम्लानां भुवि पतितामपेतजीवाम् ।
निध्याय प्रियतनयं हतं निशम्य
प्रापायं धरणिपतिः कठोरमूर्छाम् ॥ ६५ ॥

अथ कथमप्यधिरूढचेतनः प्रजानामधिभूः समधिगतविवेकोदयस्तिमितहृदयो जगाद तदा शोकभाजनं सभाजनम् ।

ध्रुवमतितरलः शरीरभाजां भवति हि संगम एष संगतानाम् ।
मृतमिथुनमिदं तदानुशोच्यं वयमपि तेन पथा न चेद्व्रजामः ॥६६ ॥

शुश्रूषणे मम रतः कुशलः प्रवीरः
पुत्रो हतः सतु तथापि न शोच्य एव ।
देहं निसर्गचपलं द्विजरक्षणार्थ-
मुन्मुच्य जन्म सफलं यदकारि येन ॥ ६७ ॥

न केवलमात्ममात्रस्य किंतु कुलस्यात्मना तिलकितस्यापि ।

पतिमनुगता नेयं शोच्या कुलद्वयपावनी
सकलभुवनश्लाघ्याऽस्माकं वधूः पतिदेवता ।
अपि तु जगतः शोच्यासा सा भवत्यनृतोदरी
दयितविरहे या यां प्राणिग्रहो हतमंगला ॥ ६८ ॥

इत्यादिभिर्वचोभिः स्वजनमाश्वासयन् तत्त्वविनिर्णयनिर्वृतस्वांतो विरराम । युक्तमेवैतत् ।

मोहं समेत्यापि न तस्य वश्या भवंति निष्णातधियः प्रकामम् ।
प्रमादतोऽपि स्खलिता विहंगा भजंति किं पातभवां विपत्तिम् ॥ ६९ ॥

अथ तदानीम् ।

वैरिमाता राजपत्नी निशम्योदंतमीदृशम् ।
स्मेरप्रफुल्लवदना जगाद निजवल्लभम् ॥ ७० ॥

मात्रा न पित्रा न सहोदराद्यैः स्वामिन् भवल्लालनयांततोऽपि ।
न तादृशं सौख्यमदायि मह्यं सुतेन विप्रार्थहतेन यादृक् ॥ ७१ ॥

विंदंति ये गदहता विलयं किमेतैस्तैरामनस्य फलदैः परमात्ममातुः ।
त्रस्तावनीसुरगवामवने शरीरं मुंचति येऽस्त्रनिहताः पुरुषास्त एव ॥ ७२॥

तैरेव खलु पितरौ पुत्रिणौ ।

येषां च मार्गणगणो रिपुभि प्रयुक्ता गेहं समेत्य विफला. सफला भवंति ।

येषां च मार्गणगणा रिपुभिः प्रयुक्ता देहं समेत्य सफला विफला भवंति ॥७३॥

युधि बलवतां भ्रातृव्याणां शराहतसंस्थिता
दिविजयुवतिव्यूहानां ये गताः स्पृहणीयताम् ।
रिपुजयजया येषां कीर्त्या जगद्भूयतेऽखिलं
त इह जननीगर्भक्लेशच्छिदो नृपनंदनाः ॥ ७४ ॥

तस्मादित्थंभूतेन पूतजजन्मना तनूजन्मना धन्यतमावावामेव लोकेषु इति । ततोऽयं महीपतिः पुराद्बहिर्यथाविधि विहितमदालसाकलेवरसंस्कारः वितीर्य वधू-सुतयोर्निवापजलांजलिमवाप गेहं सपरिवारः ।

अथ तालकेतुरपि मायया वृतः प्रतिपद्य वृत्तमखिलं तथाविधम् ।
प्रमदांबुपूरकृतमज्जनस्तदाद्भुतमुन्ममज्ज यमुनां विगाह्य सः ॥ ७५ ॥

अथायमब्रवीदृतुध्वजं सप्रणय इव प्रच्छन्नकैतवो दैतेयः ।

अत्र स्थितेन भवतार्पितभूषणेन संपादितः खलु मया चिरवांछितार्थः ।
ध्वस्ताधिरस्मि तदहं क्षितिपालसूनो गच्छ त्वमद्य निलयं तव यत्र कांता॥७६॥

इतीदमाकर्ण्य भगवन् सत्यपि गुरुजने प्रियामेवाधिकृत्य वदतस्त्वद्वचनामिदं सपदि संस्पृशती व मे मर्माणि नाहमत्र हेतुमाकलयामीति सविषादं भाषमाणं ऋतुध्वजं जगाद पुनः शर्वरीचरः । अयि सार्वभौमकुलकलशजलधिकलानिधे मदीयवचनमिदमन्यथा मास्म मन्यथाः ।

दयितैकजीवितानां चिरविश्लेषो भवत्यपायाय ।
तइझटिति लालनीया मदालसेत्युक्तमीदृशं वचनम् ॥ ७७ ॥
अथ नत्वा कपटमुनिं तुरंगमारुह्य पतगपतिवेगम् ।
पदवंदनाभिलाषी पितुः प्रतस्थे स पत्तनंवीरम् ॥ ७८ ॥

ततः ।

पथि दुर्निमित्तशतदर्शनात्परं नृपनंदनस्य विकलांतरात्मनः ।
वलमानमीनहतनालपद्मवत् पुरतस्फुरन्नयनमप्यदक्षिणम् ॥ ७९ ॥

तेन नितांतोद्विग्नहृदयोयं स्वमनस्येवमचिंतयत् ।

अकांडे मे चक्षुः स्फुरति वददत्याहितमिदं
कथं वास्ते तातः कथमिव न जाने प्रकृतयः ।
अनर्थाशंकीदं भवति सदृशं चित्तमधुना
मरुत्पोताद्घातप्रचलनलिनीपत्रपयसा ॥ ८० ॥

किंच ।

त्रस्यत्कुरंगशिशुमुग्धदृशः प्रियायाः

स्मेराननांबुरुहदर्शनदुर्लभत्वम् ।
अस्थान एव परिशंक्य मनो मदीयं
कं वा विकारमुपयाति कथं करोमि ॥ ८१ ॥

किंच मुनिवचनमपि साकूतं द्विषद्वचनमिव नितांतं मामुद्वेजयति पदे पदे स्मर्यमाणं हंत हंत क इवापतितेऽयमनर्थः सर्वथास्तु जीवितस्य भद्रं मे दयितामयस्य ।

इति बहुविधशंकालीढचित्तस्ततोयं
झटिति हृदयकांतावक्त्रपद्मं दिदृक्षुः ।
निजनगरपमास्तश्रीकस्मतार्कबिंबं
नभ इव कुमुदाप्तः प्राविशद्राजसूनुः ॥ ८२ ॥

तदानीं तमुदीक्ष्य पौराः कतिपये ।

हर्षप्रफुल्लनयनोद्गतवारिधाराजंबालितांगणभुवो जगुरेवमुच्चैः ।
दिष्ट्या वयं नु विहिताः सनाथा मुक्तेंदुनेव तमसा तृषिताश्चकोराः॥८३

केचिद्विषण्णमनसो रहसीदमूचु-
र्भग्नो मनोरथतरुः सफलस्तदा स्यात् ।
तादृग्दशां प्रियजनस्य निशम्य सोयं
भूयो भवेद्यदि विलोचनगोचरो नः ॥ ८४ ॥

कोयं विधेर्विधिरयं क्षितिपालसूनुः
पंचत्वमेत्य कथमद्य समागतोऽभूत् ।
इत्यद्भुताक्रमणतस्तिमितांतरगा-
श्चित्रार्पिता इव तदा कतिचिद्बभूवुः ॥ ८५ ॥

नायं हतो नृपसुतो दनुजेन किंतु
केनाप्यमुष्य रिपुणा कृतकैतवेन ।
आपातितोऽयमवनींद्रकुले ह्यनर्थ
इत्यूचिरे कतिपये कुशलास्तदानीम् ॥ ८६ ॥

भद्रं भवाद्भिरपरैरितरैर्हसद्भि-
रन्योन्यदर्शनपरैश्च परैर्नटद्भिः ।
गायद्भिरप्यवनिपालकुलं तदानीं
पौरैरभूत्कतिपयैर्विगतावकाशम् ॥ ८७ ॥

अथैवंविधानवलोकयन् पौरान् दुरातंककलंकितांतरंगः सारंग इव निरस्त-

मरंदगंधमरविंदं निर्मदालसमगारमात्मनो विगाह्य पपात गुरोरयं पादयुग्मे। तदानीम्।

प्राप्तनीतं पुनः प्राप्य द्रविणं दुर्गतो यथा
सुतं सुतं परिष्वज्य ममज्ज प्रमदांबुधौ ॥ ८८ ॥

किं वक्ष्यामि महीपतेः प्रियसुतप्राप्तिप्रसक्तां मुदं
नैतावानिति वक्तुमर्हति जनो हर्षं प्रजानामपि।
उन्मीलत्यमृतांशुबिंब उदधिर्नो जृंभते केवलं
फुल्लंत्यप्यसितोत्पलानि भजते तोषश्चकोरानपि ॥ ८९ ॥

हतममंगलमद्य कुमार नो पुनरपीह तवाननदर्शनात्।
तदपि निष्करुणस्य हता वयं बत विधेः कुटिलेन तु कर्मणा ॥९०॥

इति तदा वदति क्षितिनायके कुवलयाश्व उवाच सविक्लवः।
ध्रुवमपूर्वमिदं वचनं गुरोः श्रुतिमवाप्य धुनोति मनो मम ॥९१ ॥

किंच।

निध्याय मां रहसि सल्लपतां जनाना-
मेषां मुखानि न समग्रविकासभांजि।
नीतान्यनर्ककिरणैः प्रसभं विकास-
मंभोरुहाणि नितरामनुकुर्वते च ॥ ९२ ॥

तदत्र निदानमुदीर्य मदीयहृदयतोदापनोदनं विधेयमिदानीं तातपादैः। इत्य-नुयुक्तो जगाद नंदनमसौ वसुंधराधिपतिः।

कोवा द्विजो मम सकाशमुपेत्य वत्स
युद्धे निशाचरहतं कथयन् भवंतम्।
क्षिप्त्वा ययाविह गलाभरणं त्वदीयं
तत्प्रत्ययेन दयिता विजहौ तवासून्॥ ९३ ॥

श्रोत्रे हलाहलसखीरुशती प्रविश्य तादृक्तदास्य नरदेवतनूभवस्य।
चक्रे विषाक्तफलतीव्रकलंबवेधं चित्ते च दावपवमानसखस्य कार्यम् ॥९४

न्हीतस्य तातनिकटेन विकारलेशो-
प्याविर्बभूव वपुषि क्षितिपालसूनोः।
अभ्यंतरं त्वजनि शून्यमतीव शोकाद्
गीर्णस्य मन्मथकलस्य यथा गजेन ॥ ९५ ॥

अथायं हृदयदयितां हृदि लक्षयन् प्रक्षीणधैर्यो रहसीत्थं विललाप।

यस्यांगानि ममांगकेषु विलसल्लीलासरोजस्रजो
यद्वक्त्रं नयनद्वयस्य तु पुनः पीयूषसारांजनम् ।
यश्चेतो वरटाविटस्य तु शरत्कालांबुजाताकरः
सोऽयं हंत हतो मम प्रियजनः स्यात्केन पापीयसा ॥९६ ॥

नूनमिदं केनापि पातालकेतुपक्षपातिना यातुधानेन विहितमेव कैतवम् । अन्यथा शांतपावनशीलेषु मुनिषु क इव कुशलस्यादीदृशकार्कश्यावलंबने । हाहा धिगिदं दुर्विलसितम् ।

सोढातितीव्रविरहा अपि चंचलाक्ष्याः
प्राणा ययुः कथममंगलवाक्यमात्रात् ।
आग्रीष्मतापसहने पटवोऽपि हंसा
मुंचंति नो कथमुदंचति गर्जिते क्ष्माम् ॥ ९७ ॥

अयि कुवलयाश्वजीवितसर्वस्वविलासिते विश्वावसुप्रियनंदिनि मदालसे ।

मानग्रहाग्रहपरेऽपि सखीकदंबे कोपस्य सत्यपरिहार्यतरे च हेतौ ।
दुःसोढपक्ष्मपुटपातकृतांतरायप्रेमार्दितेव मयि दृष्टिरभूत्वदीया ॥ ९८ ॥

सा त्वं चिरादुपगते मयि चंद्रशाला-
जालोपकंठनिहितात्ममुखारविंदा ।
दृष्टिं निषिंचसि कुतोद्य दलत्पयोज-
गर्भप्रभासहचरी न पुरेव कांते ॥ ९९ ॥

उपगतं दयितेन समीक्ष्य मां किमु चिरायसि गर्भगृहेऽथवा ।
अवधिकालविलंघनमन्युना किमसि वारिरुहाक्षि तिरोहिता ॥ १०० ॥

अये ग्रैवेयकसुगुणप्रोत

पूर्वं मदीयपुनरागमदंडसंख्या-
साक्षीभवन्मणिजुषा भवता प्रिया मे ।
त्रातामृतेरहह सैव हता त्वयाद्य
काले भविष्यति हितोऽपि रिपुर्जनानाम् ॥ १०१ ॥

प्राक् प्रोषिताभरणयापि तया वियोगे
वक्षोजयोस्त्वमयि हारपरं धृतो भूः ।
तद्गौरवं तव मदीयतयैव लब्धं
तद्विस्मृतं कथमरे भवता तदानीम् ॥ १०२ ॥

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छायां येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक. ३.    जून, सन १८८०.    अंक ६.

हें मासिक पुस्तक

पुणें पेठ शनवार, येथें

'श्री शिवाजी' छापखान्यांत छापिलें.

किंमत ८ आणे.

## सूचना

आमचे वर्गणीदार यांजकडे पहिलीं बिलें गेलीं असून कांहींकांकडून अद्याप वर्गणी न आल्यामुळें दुसरीं बिलें पाठविणें भाग आलें त्याजकडे लक्ष देऊन वर्गणी पाठविण्याची ते कृपा करतील अशी विनंती आहे.

का० सं० व्यवस्थापक.

---

# राजव्यवहार-कोश.

हें पुस्तक छापण्यास वर्गणीदारांची जी संख्या अवश्यक आहे ती पूर्ण होण्यास अद्याप कांहीं उणीव आहे. ती उणीव भरून यावी म्हणून आणखी एक महिनाभर आगाउची मुदत प्रकाशकांनीं वाढविली आहे. याजकडे लक्ष देऊन किंमत लौकर पाठवून द्यावी अशी त्यांची विनयपूर्वक सूचना आहे. आगष्ट महिन्यांत पुस्तक तयार होईल. आमच्याकडे वर्गणी पाठविली असून ज्या गृहस्थांस पावती दिली नाहीं त्यांचीं नांवें खालीं दिलीं आहेत. कांहींकांकडून पोष्टेजचे पैसे आले नाहींत त्यांनीं ते पाठवावे. ज्यांनीं नुसती नांवेंच दिलीं आहेत त्यांनीं ही आतां पैसे पाठवावे.

का० सं० व्यवस्थापक.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ,, ,, | स. गो. गाधी, ठाणे. | ० | ६ | ६ |
| ,, ,, | बा. ना. शिंदे. | ० | १२ | ० |
| ,, ,, | अं. चिं. दामले. | ० | ६ | ६ |
| ,, ,, | मो. ब. देशपांडे. | ० | ६ | ६ |
| ,, ,, | प. ग. तहशीलदार. | ० | १२ | ० |
| ,, ,, | ना. मो. पारनेरकर. | ० | ६ | ६ |
| ,, ,, | गो. सि. राजुरकर. | ० | ६ | ६ |
| ,, ,, | प्रयागराज रामदीन तीवारी | ० | ६ | ६ |
| ,, ,, | नारो वि. आभ्यंकर. | ० | ६ | ० |
| ,, ,, | घा. मो. डोंगरे | ० | ६ | ६ |
| ,, ,, | त्र्यं. नारायण पै. | ० | ६ | ६ |
| ,, ,, | गो. ना. केळकर. | ० | ६ | ० |
| ,, ,, | दामोदरपंत आठले. | ० | ६ | ० |
| ,, ,, | प्रभाकर रामचंद्र पंडित | ० | ६ | ६ |
| ,, ,, | बाळकृष्ण ना. पेणसे. | ० | ६ | ० |
| ,, ,, | रामचंद्र वि० ताकटे. | ० | १२ | ० |
| ,, ,, | कृष्णाजी हरि चिटणीस. | ० | ६ | ० |
| ,, ,, | धोंडो विनायक दांडेकर. | ० | ६ | ६ |
| ,, ,, | नागेश केशव गोडबोले | ० | ६ | ० |

# विषयक्रम.

शिवछत्रपतीचें चरित्र ४९–५२.

साष्टी ( उर्फ ठाण्या ) ची बखर १९–२२.

मराठी कविता.

मुक्तेश्वर शुद्धिपत्र, पाठांतरें वगैरे. ३३–४८.

संस्कृत कविता.

त्रिविक्रमकृत मदालसा-चंपूः ७३–८४.

नीलकंठ-चंपूः .... .... .... १–४.

ब्राह्मण, कंगाल, ब्रह्मचारी, परमहंसी, वेडीं नानापरीचीं सोंगें शोधकरून, राजा ओळखून, कैद करून आणणें." अशी इशारती सांगोन रवाना केले. फौजा चोहोंकडे स्वार जाहल्या. आणि पातशानीं मनांत शंका धरली कीं, "राजा शहरांत कोठें दडून राहिला असेल. आणि रात्रीस आपणास दगा करिल." म्हणून तजवीजकरून, बहुत सावध चौकी पाहरा ठेवून जागेच पलंगावर राहून बैसले. लोक कंबरबस्ती करून रात्रंदिवस जवळ ठेविले. ये जातीनें राहूं लागले.

पुढें राजे व राजपुत्र मजल दर मजल चालोन मथुरेस गेले. मथुरेमध्यें ओळखीचे माणूस शोधितां कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत हे त्रिवर्ग बंधु ब्राह्मण, मोरोपंत पेशवे यांचे मेहुणे, त्यांस निराजीपंत ओळखीत होते त्यांणीं जाऊन, त्यांची भेट घेऊन, वर्तमान सांगितलें. त्यांणीं धैर्य धरून कबूल केलें. त्यांजवर त्याचे घरीं संभाजी राजे पुत्र ठेविले, कीं, "आपण देशास आपल्या राज्यांत जाऊन पावलों म्हणून तुम्हांस पत्र व जासूद पाठवितों. तुम्हीं राजपुत्रास घेऊन देशास सर्व बंधु आपल्या कुटुंबानिशीं येणें. तुमचे सर्व प्रकारें चालवूं. ऊर्जित करून बक्षीस देऊं." असें सांगोन राजपुत्रास ठेविलें. आणि त्यांचा एक बंधु कृष्णाजीपंत समागमें घेऊन वाराणशीस गेले. "गया प्रयागीं याला तुमचे ओळखीनें तुम्हीं आपल्यास करून देणें," म्हणून सांगून, त्यास बरोबर घेऊन, वाराणशीस आले. तेथें गुप्तरूपें स्नान करून, श्रीविश्वेश्वर दर्शन करून प्रयाग[३३]णि स्नान केलें व गयावर्जन केलें. तेथें कर्जही उदंड घेऊन धर्मही केला. पुढें देशास आपले राज्यांत यावें असें केलें. नीट वाटे यावें तरि पादशहाच्या फौजा गेल्या त्या मार्गें जातां नये. म्हणून विचार करून, गोंडवणांतून भागानगर, विजापुरावरून राजगडास आले. मार्गीं कित्येक जागा उदंड शोध पडला होता. अपाय होतां दगाच व्हावा असें जालें होतें. परंतु श्रीभवानीनें संरक्षून स्वस्तिक्षेम आणिलें. निराजीपंत व दत्ताजीपंत व राघोजी मराठा असे चौघे आले. राजगडास आलियावरि थोर धर्म, मोठा महोच्छाव केला. साखरा वांटल्या. तोफांचे आवाज केले. मातुश्रीनें व कारकुनांनीं व लष्कर, गड, कोट, हशम, सर्वांनीं संतोष करून खुशाली केली.

पुढें सत्तावीस गड मोंगलास * दिले ते मागती घ्यावे ही तजवीज केली. मोरोपंत पेशवे व निळोपंत मजमदार व अंणाजीपंत सुरनीस

---

३३. प्रयाग स्नान तर नव्हे? | * मांग पृ० ३८ पहा.

यांसि सांगितलें कीं, " तुह्मीं राजकारण, यत्न करून किल्ले घ्यावे. आपण राजियांनीं मावळे लोकांस सांगितलें कीं, "गड घेणें." त्याजवरून तानाजी मालसुरा म्हणून हजारी मावळियांचा होता, त्यानें कबूल केलें कीं, " कोंढाणा गड आपण घेतों " असें कबूल करून वस्त्रें, विडे घेऊन गडाचे यत्नास ५०० माणूस घेऊन गडा खालीं गेला. आणि दोघे मावळे बरे, मर्दाने निवडून रात्रीं गडाच्या कड्यावरून चढाविले. जैसे वानर चालून जातात, त्याच प्रमाणें कड्यावर चालून गेले. आणि कडा चढून, गडावर जाऊन, तेथून माळ लावून वरकड लोक देखील[३४] तान्हाजी मालसुरा चढून गडावरि तीनशें माणूस गेले. गडावरि उदेभान रजपूत होता. त्यास कळलें कीं गनिमाचे लोक आले. ही खबर कळून कुल् रजपूत कंबरबस्ता होऊन, हातीं तोडा बार घेऊन, हिलाल चंद्रजोती लावून, बाराशें माणूस तोफांची[३५] व तिरंदाज, बरचीवाले, पटाईत, सुऱ्या, आड हत्यारी ढाला चढवून चालोन आले. तेव्हां मावळे लोकांनीं 'श्रीमहादेव!' असें स्मरण करून नीट फौजेवर रजपुतांचे चालून घेतलें. मोठें युद्ध एक प्रहर झालें. पांचशें रजपूत ठार झाले. चाळीस पंन्नास मावळे ठार झाले. उदेभान किल्लेदार खासा त्यास व तानाजी मालसुरा सुभेदार यासि गांठ पडली. दोघे मोठे योद्धे, महाशूर, एकएकावर पडले, वार करीत चालले. तानाजीचे डावे हातची ढाल तुटली. दुसरी ढाल समयास आली नाहीं. मग तानाजीनें आपले डावे हाताची ढाल करून, त्याजवरी वोढ[३६] घेऊन, दोघे महारागास पेटले. मोठें युद्ध केलें. एकाचे हातें एक तुकडे होऊन फिरंगीच्या वारें पडले. दोघे ठार झाले. मग सूर्याजी मालसुरा, तानाजीचा भाऊ, याणें हिंमत धरून, कुल् लोक सांवरून, उरले रजपूत मारिले. कित्येक रजपूत कडे उडोन पळोन मेले. असें बाराशें माणूस मारिलें. किल्ला काबीज केला. आणि गडावर पागेचे खण होते त्यांस आग लाविली. त्याचा उजेड राजियांनीं राजगडाहून पाहिला आणि बोलले कीं, " गड घेतला. फत्ते झाली ! " असें जाहले. तों जासूद दुसरे दिवशीं वर्तमान घेऊन आला कीं, " तानाजी मालसुरा यांणीं मोठें युद्ध केलें. उदेभान किल्लेदार यास मारिले आणि तानाजी मालसुरा ही पडला." असें सांगितलें. "गड फत्ते केला." असें सांगतांच राजे ह्मणूं लागले कीं,

---

३४. देखील = सुद्धां, सह.
३५. तोफांची = बंदुकवाले, गोलंदाज.
३६. वोढ घेऊन = त्याजवर शत्रूचा मारा घेऊन

" एक गड घेतला, परंतु एक गड गेला !" असे तानाजीसाठीं बहुत कष्टी जाहाले. पुढें गडावरि ठाणें घातलें. सूर्याजी मालसुरा, भाऊ, नांवाजून त्याचा सुभा त्यास सांगितला. धारकरी लोकांस बक्षिसें सोन्याचीं कडीं दिलीं. द्रव्य आपार दिलें. वस्त्रें जरी कुल लोकांस दिलीं. ये जातीनें प्रथम कोंडाणा घेतला. पुढें मोरोपंत पेशवे यांणीं व निळोपंतीं व अंणाजीपंतीं व मानके यांनीं सव्वीस गड ऐसेच ख्यात करून चौ महिन्यांनीं घेतले. सल्यानें गड दिधले होते ते मागुती घेऊन आपलें राज्य करूं लागले.

राजगडास वाराणशी होऊन सुखरूप पावलियावरि मथुरेस माणसें व पत्रें पाठविलीं. त्याजवरून कृष्णाजीपंत व काशीराऊ व विसाजीपंत या त्रिवर्गांनीं आपले कुटुंबासहित संभाजीराजियांस जानवें धोत्रे नेसवून, आपला भाचा म्हणवून राजगडास आले आणि राजियासि भेटले. मग राजे पुत्रास भेटले. आनंद थोर जाहला. मोठा दान धर्म केला. आणि कृष्णाजीपंत त्रिवर्ग बंधूस 'विश्वासराव' ह्मणवून नांव किताब दिला. लक्ष होन बक्षीस दिले. तिघां बंधूस दहा हजार होन तैनात केली. मातबर लोकांत असामी घातली. मोकाशे महाल दिधले. नांवाजिलें. तसेंच निराजीपंत हे बराबरि बहुत श्रम साहस करून आले व दत्ताजीपंत बरोबरि होते व राघो मित्राही बरोबरि होता; त्यास निराजीपंत नितिन्याय सर्व जाणते चतुर चौकस निज्यामशाई ब्राह्मण त्यांस न्यायाधिशी सरकारांतून सांगितली जितकी राज्यांतील न्याय मनसुबी तितकी त्यानें करावी. त्यांचे पुत्र प्रल्हादपंत धाकटे बारा चौदा वर्षांचे होते. शाहणा, बुद्धीचा देखोन त्यास लष्करची सबनीशीची मुतालकी सांगोन लष्करा समागमें सरनौबता जवळ ठेविला. प्रल्हादपंत मोठ माणूस होतील,थोरभार घेतील; असें राजे बोलले. दत्ताजीपंतास हुद्दा काय सांगावा ह्मणून तजविज केली, तों गंगाजीपंत वाकनीस मृत्यु पावला. त्याची वाकानिसी दत्ताजीपंतास सांगितली. सर कारकुनामध्यें गणना केली. राघो मित्रा यासि हुजूर लोकांचा हवाला सांगितला. समागमें जे जे लोकीं श्रम साहस केला त्यांस नांवाजिलें.

पुढें राजियांनीं आपले पालखी बरोबरि चोखोट माणूस पाहून निवडक असामी ठेविले. चहूं पादशाहांचे आपण दावेदार, एखादे वेळेस प्रसंग पडातो तेव्हां जवळ आहेत ते कार्यास येतील. असें जाणून

मावळे लोकांत पाहाणी परीक्षा करून, निवडक माणूस पाहून, पतकें केलीं त्यांचीं नांवनिशीवार.

१ शंभरलोक ह्मणून नांव ठेविलें. १ साठलोक ह्मणून नांव ठेविलें.
१ चाळीसलोक ह्मणून नांव ठेविलें. १ तीसलोक ह्मणून नांवें ठेविलें.
१ वीसलोक ह्मणून नांव ठेविलें. कलम १

येणें प्रमाणें पतका पताकांचीं नावें ठेविली. मावळगामावळ्यांमध्यें लोक उत्तम निवडला. निवडक भरती करून चार पतकें मिळून दोन हजार माणूस ठेविले. त्यांत कांहीं बंदुखी, कांहीं विटेकरी, वरकड आड-हत्यारी, फिरंग असे माणूस सजले. तितके माणसांस साज करून दिले. डोईस मंदिल, अंगास सखलादी फतु, दोहों हातीं दोन सोन्याचीं कडीं, कोणास रुप्याचीं कडीं, तरवारांस अवनाळें तैनाळ सोनेंरुप्याचे. बंदुकीस कट रुप्याचे व विटियांसि कट तैसेच, कानास जोडी कुडक्यांची, येणेंप्रमाणें अवघे लोकांस साज सरकार निसवतीनें देऊन लोक सजविले. अवघ्यांचे एकच साज. मर्दानी म्हणावें तरि एकापेक्षां एक अधिक. अशी परीक्षा करून हमेशा २००० मावळे लोक पालखीबरोबर जवळ असावे. तसेंच त्यास तैनाती सरदार हजारी हशमांत केले. त्या प्रमाणें जुमलेदार प्रमाण केले. आणि दोन अडीच हजार माणूस हशम केला. रहस्ता असावे. चालते वेळेस पालखी बरोबरि चौतर्फा चालत असावे. येजातीनें लोक ठेविले.

त्यावरि पनाळा किल्ला अदलशाईचा, तेथें भेद करून गड घेतला. राजे गडावरि राहिले. मग विजापुराहून शिद्दीजोर वजीर, वीस हजार स्वार [याणें] राजियासि वेढा घातला. गड नवाच घेतला होता, सामान करून मजबुती करावयासि अवकाश जाहला नाहीं. परंतु गड बरा भांडविला. नेताजी पालकर सरनोबत राजियाचा त्यांस पत्रे जासूद पाठविले कीं "तुह्मी लष्करें घेऊन उपराळ्यास येणें आणि शिद्दीजोर यास मारून चालवणें" ह्मणून पत्रें पाठविलीं. त्यास लष्कर दूर लांबलें. समयास यावयासि फावलें नाहीं आणि गडावर सामान नाहीं. मग राजियांनीं विचार केला आणि गड शिद्दीजोरास दिला. आपण उतरोन आले. गड शिद्दीजोरांनीं घेऊन आपले ठाणें बैसाविलें.

---

३७. अवनाळ, तैनाळ (तहनाळ) = म्यानाच्या वरील बाजूचें अडकावण, व खालच्या बाजूचें अडकावण.

३८. सिद्धी जाहेराचा पन्हाळ्यावर हल्ला, शिवाजीचें पलायन, रस्तुम जुमान व-गेरेचा पराभव हे सर्व मोंगलांशीं भांडण करण्याच्या पूर्वी ह्मणजे १६६२ (स० इ०) सालाच्या पूर्वी झालें. मागें पृ० २२ टी * पहा.

मग राजियांनीं नेताजी पालकर यांस बोलावून आणिला आणि "समयास कैसा पावला नाहींस?" ह्मणून शद्ब लावून, सरनौबती दूर करून, राजगडची सरनौबत कडतोजी गुजर ह्मणून होता त्याचें नांव दूर करून, प्रतापराव नांव ठेविलें आणि सरनौबती दिधली. प्रतापरावानीं सेनापती करित असतां शाहंण्णव कुळीचे मराठे चारी पादशाहींत जे होते व मुलखांत जे जे होते ते कुल मिळविलें. पागेस घोडीं खरेदी केली. पागा सजीत चालिले व शिलेदार मिळवित चालिले. असा जमाव पोक्त केला. चहूं पादशाहींत दांवा लाविला.[३१] राजे दिल्लीहून पळोन आपल्या देशास पितापुत्र सुखरूप आले. येऊन चहूं महिन्यांत सत्तावीस गड घेतले. मोठी ख्यात केली.

हें औरंगजेबास कळोन मनांत चिंतातूर झाला. तेव्हां शाहअलम, वडील पुत्र, यास पादशाहांनीं कित्येक विचार राजकारण सांगून त्यासि फौजेनिशीं रवाना केलें. शहाजादियास सांगितलें कीं, "जोरावरीनें शिवाजी हतास लागत नाहीं. तुह्मीं जाऊन औरंगाबादेस राहाणें आणि सल्ला मामला राजियांसि करून त्याचें सख्य करणें. आणि भेटी न ये तरि मुलाजा माफ करणें. आणिं दौलत त्याचे नांवें अगर मुलाचे नांवें देऊन त्याची फौज चाकरीस आपणा जवळ आणणें. त्यास मुलूक मोकासा, पैका टक्का, ठाणीं जे पाहिजेत तीं देऊन शिवाजी आपला चाकर झालासें करणें. येवढें यश तुह्मी घेणें. म्हणजे सर्व यश आलें. असें करणें." म्हणून बुद्धिवाद सांगून शहास फौजेनिशीं रवाना केलें. तो साठ सत्तर हजार स्वारांनिशीं निघाला. तो मजल दरमजल औरंगाबादेस येऊन राहिला आणि राजियाकडे पत्रें जासूद हलकारे हेजीब पाठविले. ते राजगडास दाखल जाहले. शहाजादियाचीं पत्रें दिलीं. तीं वाचून पाहिलीं. तेथें लिहिलें होतें जे, "सल्ला करून तुह्मीं आह्मीं एक व्हावें."-असें लिहून पाठविलें. त्यावरि राजे बहुत संतुष्ट होऊन रघुनाथपंत कोरडे यांस औरंगाबादेस पाठविलें. कित्येक जड जव्हाहीर वस्त्रें ही शहास पाठविलीं. रघुनाथपंतीं जाऊन भेट घेतली. शहानें बहुत सन्मान केला. एकांतीं कित्येक गोष्टी बोलिला कीं, "राजे व आपण भाऊ, तुह्मीं व आह्मीं एक विचारें राहून तुह्मीं भेटीसही येणें. तुमचे पुत्राचें नांवें दौलत देतों. एक सरदार फौज चाकरीस देणें. व एक ब्राह्मण मातबर देणें. मोकासा देऊन चालवूं. तुह्मीं पातशाहीं रुजवातीनें असणें." संभाजी राजाचे नांवें हप्तहजारी दौलत द्यावी, पंधरा लक्ष होनांचा मुलूख

---

३१. दावा लाविला = आपला हक्क सुरू केला, अंमल बसविला.

वऱ्हाड व खानदेश द्यावा, असें केलें. उत्तम भूषणें वस्त्रें देऊन रवाना केले.

ते परतून राजाच्या दर्शनास आले. भेट झाली. शहाजादियाचे अलंकार वस्त्रं पत्रें दिलीं. दौलतीच्या गोष्टी सांगितल्या. सर्व भावार्थ कळलियावरि राजियांनीं विचार केला कीं, "आपणास एक विजापूरचे पातशाहीशीं दावा, भागानगरकरांशीं दावा व मोंगलाशीं दावा; असे तीन दावे सोसवत नाहीं. आपलें राज्य नवें. त्याहीमध्यें दोन तीन चेपटें होऊन हलाखी झाली आहे. त्यास एक शत्रु तरी मित्र करावा आणि दोन वर्षें बळ धरून सांवरावें. मग पुढें जें कर्तव्य तें करावें." असा विचार करून, मोंगलाशीं सल्ला करावा हा विचार करून, फौज प्रतापराऊ सरनोबत या बरावरि पांच हजार स्वार देऊन, समागमें निराजीपंत सरकारकून दिधले. व मोरोपंत पेशवे व मजमदार व सुरनीस यांचे मुतालीक दिले. प्रल्हादपंत, निराजीपंताचे पुत्र, यांस लष्करची सबनिशी दिधली. मुलुख मोकासा देतील त्यास सुभेदार राउजी सोमनाथ कारकून करून दिधले. ऐसे रवाना केले. मोंगलाशीं सल्ला केला. संभाजी राजयास हप्तहजारी कबूल करून निराजीपंत व प्रतापराव औरंगाबादेस गेले.

मग शहानें बहुत सन्मानें भेट घेतली. त्यानंतर जागा दाखवून पुरा वसविला. हत्ती, घोडे, जवाहीर, वस्त्रें सर्वांस दिधलीं. वऱ्हाड देश जागा जहागीर पंधरा लक्षांचा होनाचा दिधला. त्या मुलखांत राउजी सोमनाथ सरसुभेदार ठेविले. हुजूर वांटणीही दिली. टका पैका लोकांस बहुत पावला. खुशाल राहिले.

मग शहाजादियानें दिल्लीस पातशहास खबर लिहून पाठविली. त्यावरि पादशहास कळतांच बहुत खुशाल झाला. आपला देश सुखरूप राहिला हा संतोष पादशहास जाहला. असे दोन वर्षें फौज [सुद्धां] औरंगाबादेस होते. आणि इकडे राजास फुरसत जाहली. टका पैका मुलखांत मेळविला. कित्येक अदलशाही गड कोट देश काबीज केला. शहाचा व राजियाचा घरोबा बहुत चालिला. परस्परें वस्ताभावा धाडूं लागले. या करितां दिल्लीस औरंगजेबास शंका उत्पन्न झाली कीं, "शाहाजादे व शिवाजी एक जाहले. येखादे वक्तीं फितवा होऊन आप-

१०. औरंगाबादेस या काळच्या बहुतेक राजांच्या नांवाचे पुरे आहेत. उदाहरणार्थ 'जयसिंग पुरा', 'जसवंतसिंग पुरा', इ० या पुऱ्यांमध्यें त्या त्या राजांचे कारभारी ही अद्यापि आहेत.

शास दगा करतील." अशी कल्पना केली कीं. "आतां या उभयतांत कज्या वाढवावा." म्हणून शहास लिहिलें कीं, "शिवाजी हरामी आहे. त्याचा सरदार प्रतापराव व निराजीपंत हे दोघे फौजेनिशीं आहेत. याकरितां त्यास पतिजों[४१] नये. एखादे वक्तीं दौलताबादेस भेद करतील, तरि तुम्हीं त्या दोघांस कैद करणें. त्यांचीं घोडीं अवघीं तबेल्यास लावणें. येविषयीं रयांत[४२] न करणें" ह्मणून लिहिलें. हें वर्तमान शहाचा वकील पातशहाजवळ होता, त्यांनीं टाकोटाक इशारतीनें पुढें शहास पाठविलें कीं, "येथें मजकूर असा जाहला असे." तुह्मी हुशार राहणें.

' असें वर्तमान पादशहाजादे यांनीं निराजीपंतास एकांतीं बोलावून हें वर्तमान सांगितलें. आणि वस्त्रें अलंकार देऊन गुप्तरूपें निरोप दिधला कीं, "तुम्ही उद्यां रात्रीचे कुल फौजेनिशीं उठून पळून राजियाकडे जाणें. तुमची बिशाद[४३] राहिली तर पावेल. पायदळ लोक घरोघरीं ठेवणें, मागून वस्तभाव सावकाश नेणें. दोचौं रोजांत पातशहाचे कागद येतील, मग तुह्मांस कैद करावें लागेल, याकरितां अगोदर निघून जाणें." असें सांगितलें. त्याजवरून निराजीपंत येऊन प्रतापराव यास व अवघे लोकांस सांगून दुसरे दिवशीं तयारी करून रातीस फौजेनिशीं निघोन गेले. तेच मजल दरमजल राजियाजवळ आले. भेटी जाहली. कित्येक खजीना व चित्र विचित्र वस्त्रें भूषणें घेऊन आले. राजे खुशाल जाहले. आणि बोलिले कीं, "दोन वर्षें लष्करचें पोट भरलें. आणि शहाजादा मित्र जोडला. ही बरी गोष्ट जाहली. आतां मोंगलाई मुलूख मारून खावयास वाव जाहाला." असें बोलिले. मग औरंगाबादेस राजियाची फौज निघोन गेली.

यावरि आठा दिवशीं पातशाहाचीं पत्रें हुजूरचे लेख आले. वर्तमान कळलें. मग शहा बोलिला कीं, "मराठे हरामजादे, आठ दिवस अगोदर पळाले. हजीर असते तरि कैद करितों." असें बोलिले. आणि दिल्लीस पातशहास जाब लिहिला कीं, "हुकुमाप्रमाणें वर्तणूक करावी. परंतु मराठे आठ दिवस अगोदर पळाले, कैद करावयास विलंबें[४४] नव्हता" ह्मणून लिहून पाठविलें. त्याजवरून पातशहास कळोन ठक्क जहाला. मराठे हरीफ[४५] बहुत आहेत, असें बोलिले. ये जातीचें वर्तमान झालें.

---

४१. पातेजणें = विश्वासणें.
४२. रयात = क्षमा, कसर.
४३. बिशाद = माउमना, चित्त.
४४. विलंब = अवकाश
४५. हरीफ = लबाड, धूर्त.

प्रतापरावाची व राजियाची भेट जाहली. पागा सजली. गनीमाची फौज आपले राज्यावर चालून आली त्यास मारून चालू [ ? ] मोंगल देश मारून धुंध उठविली. मग रांगणा किल्ला राजियाचा होता त्यास विजापूराहून रुस्तुमजमा वजीर सात आठ हजार लष्कर घेऊन गडास वेढा घातला. ते वक्तीं गडकरी यांनीं थोर भांडण केलें. व राजियांनीं लष्कर पाठवून उपराळी[39] करून रुस्तुमजमा मारून चालविला. आणि गड रक्षिला. रुस्तुमजमा नामोहरम जाहल्यावर अबदुल करीम व बेलोलखान वजीर विजापूराहून बारा हजार जमाव स्वार घेऊन रांगणियास वेढा घातला. गडकरी यांनीं बहुत मारामारी केली व राजियांनीं ही लष्कर पाठवून बाहेरून उपराळा करून मारामारी केली. बेलोलखानाचा थोर वाखा केला. आणि पाऊस पडला, झड लागली. पावसाळियांत कित्येक मेले. हत्ती, घोडे, उंटें मेलीं. लष्कर सडलें. अशी अवस्था जाहली. बेलोलखान जीव वांचवून पळोन गेला. गड सुखरूप राहिला. पुढें जितकीं शहरें मोंगलाईंत होतीं ते जागां चार पांच माणसें वेषधारी करून पाळतीस ठेविलीं. पाळती घेऊन दोघे खबर सांगावयास यावे. दोघांनीं तेथें हुशार रहावें. मग लष्कर पाठवून हवेलिया, शहरें मारावीं. ही तजवीज केली.

तों इतक्यांत सुरतेहून पाळती बहिरजी जासूद आला कीं, " सुरत मारिल्यानें अगणित द्रव्य सांपडेल. " असें सांगितलें. त्याजवरून राजियांनीं विचार केला, "लष्कर चाकरी नफरी, काम मनाजोगें होणार नाहीं. याजकारितां, जावें तरि आपण खासा लष्कर घेऊन जावें." असा विचार केला. आणि मकाजी आनंदराव ह्मणजे महाराज शहाजी यांचा फर[40]जंद पाळलेला व वेंकाजी दत्तो ब्राम्हण मोठे लष्करी नामोर्[38]शीचे सरदार हे महाराजाकडून सेवा सोडून राजियाकडे आले होते; त्यांस राजियांनीं नांवाजून पागेच्या पंचहजाऱ्या सांगितल्या. आणि प्रतापराव सरनौबत व वेंकाजी दत्तो व [मकाजी]आनंदराव व वरकड सरदार दहा हजार पागा व दहा हजार शिलेदार असे वीस हजार जमाव लष्कर, तसेंच सात पांच हजार मावळे लोक निवडक व सर कारकून मोरोपंत पेशवे व निळोपंत व अण्णाजीपंत व दत्ताजीपंत व बाळ परभु चिटनीस असे बरोबर घेतले. कोळवणांतून नीट सुरतेस पांच गांव सात गांव एक मजल करून एकाएकी सुरतेस पावले. सुरतेचे लोक गैर हुशार होते. चढे घोड्यानिशीं सुरतेच्या दरवाज्याजवळ पेठेंत लष्कर शिरलें. मोंगलाची

३९ उपराळा = मदत, कुमक.
४० फरजंद = मुलगा.
३८. नामोश, नामोशी = लौकिक कीर्ति.

तेव्हां पुढें बाजी भिवराव व रामचंद्र हरी पुण्याहून आले. तर हल्ला केला. परंतु त्यावेळेसही साधला नाहीं. लोकांनीं फार झटून काम केलें परंतु व्यर्थ. नंतर बाजी भिवराव व रामचंद्रपंत पुण्यास गेले. तों दिल्लीहून कागद आले कीं, किलिजखॉनें मोंगल बादशाही फौज घेऊन दक्षिणेवर येतो. हें ऐकून बाजीराव आपली फौज घेऊन नर्मदा उतरून माळव्यांत गेले. व चिमणाजी आपानें लष्कर व राऊत व पाईचे लोक यांस व रामाजी महादेव यांस घेऊन धारावीस वेढा घातला. तोफा जोडून दर्यांत मारा रोखला.

इकडे शंकराजीपंत, गंगाजी नाईक, कर्णाजी शिंदे, मोरोजी शिंदे, खंडोजी मानकर व माहादजी केशव यांनीं बसून विचार केला कीं, "आपण केळव्या माहिमास मोरचे लावावे." त्या विचाराप्रमाणें माहादजी केशव, कर्णाजी शिंदे, शिवाजी नाईक व खंडोबा प्रभु यांनीं माहिमास जाऊन मोरचे लाविले. आपासाहेबांस पुण्याहून रामचंद्र हरी, जिवाजी ढमढेरे, आपाजी शितोळे, चिमणाजी बापुजी व वाघोजीराव राणोजीराव खानविलकर यांनीं कुमक माहिमास पाठविली. वासुदेव जोशी व रघुनाथजी प्रभु हे फौज सुद्धां रवाना केले. त्यांनीं शिरगांवास मोरचे लाविले.

तिकडे किलिजखान दिल्लीची फौज घेऊन आला. बाजीरावानें त्याचा मुकाबला[४८] केला. लढाई मोठी झाली. किलिजखानाचा मोड झाला. भूपाळ गडाखालीं त्यास वेढा घातला. त्यावेळीं एक रूपयाचें एक शेर धान्य झालें. मोंगलांचे लष्करांत दुष्काळ पडला. हिकडे आपासाहेबांनीं ठाण्यास फौज पाठविली. वसईस व्यंकटराव घोरपडे व संभाजी शिंदे रवाना करून, आपण बऱ्हाणपुरास गेले. औरंगाबादेची कुमक[४९] किलिजखानास जाईल ह्मणून पुढें गेले. मग किलिजखान कौलास आला. बाजीरावाबरोबर सल्ला

---

२७. निजाम उलमुल्क. मराठ्यांचा सर्वत्र उत्कर्ष होत आहे असें पाहून दिल्लीच्या मुत्सुद्दी मंडळांतील भांडणें कांहीं कालपर्यंत मोडून निजामास दक्षणेंतून बलावून नऊन सर्वानुमतें त्याणें दिल्लीची फोज घेऊन मराठ्यांचें पारिपत्य करावें असें ठरलें. त्याप्रमाणे निजाम हा बादशाही फौजेनिशीं मराठी राज्यावर चाल करून आला. (१७३८ इ० स०)

४८. मुकाबला केला = गांठ घातली, सामना केला.

४९. ही कुमक किलिजखानाचा दुसरा मुलगा जो नासिरजंग याजकडून व्हावयाची होती. ह्या मदतीचें वर्तमान बाजीरावास कळल्याबरोबर त्याणें आपास निक्षून लिहिलें कीं हजार कामें एकीकडे ठेवून तुह्मी सर्वजण ह्मणजे भोंसले, दाभाडे, सरलष्कर, शितोळे वगैरे यावेळेस माझी कुमक करा, कीं मुसलमानांस दक्षिणेंत पुनः पाय मिळून ठेवायास नको. निदान तूं तरी वसईचें काम सोडून नासिरजंग पुढें येईल तर एकदम त्याला पायबंद टाकून अडकावून ठेव. त्यावरून आपा मोठ्या नाखुषीनें वसईचें काम सोडून वरघाटीं गेले.

केला. दरोबस्त माळवा मुलूख बाजीरावास देऊन मोंगल दिल्लीस गेलें.[५०] बाजीराव मुलूकगिरीस गेले.

हिकडे गोव्याहून पेद्रे दमेल नांवाचा जराळ[५१] होऊन कुमक घेऊन आला. आरमार[५२] वसईस आलें. गंगाजी नायकानें आंतून कोटांतील नाजुक खबर आणिली, तों फिरंगी हा ठाण्यावर हल्ला करण्याचे बेतांत * आहे. तें ऐकून गंगाजी नाईक ठाण्यास गेले. पाणबुरजास लादण्या‡ लाविल्या. मग धारावीस गेले. तेथें रामाजीपंतास ही हकीगत सांगितली कीं, फिरंगी ठाण्यावर जाण्याकरितां तयारींत आहे. असें कळवून गंगाजी नाईक ठाण्यास आले. ठाण्याचा बंदोबस्त नाहीं म्हणून खंडोजी मानकराशीं बोलण्याचा फेर पडला.[५३] तिकडे माहिमचे मोरचे कोटाखालीं भिडले. तोफांचे गोळे लागून कोट ढांसळावयास लागला. ही खबर वसईस पाठविली. मग फिरंग्यानें ठाण्याची मसलत ठेविली. आरमारावर बसून माहिमास कुमक गेली. माहिमास मोरचे तीन—माहादजी पंताचा, कर्णाजी शिंद्याचा व खंडोजीचा. याशिवाय माहादजी पंताचा व वाघोजीराव खानविलकर यांचे मोरचे पश्चिमेस दर्याजवळ भिडले होते त्यांजवर फिरंग्यानें मोरचा थोडे माणसांनीं रोखला. रामचंद्र पंत, शितोळे, ढमढेरे व राऊत यांनीं उचल केली ; परंतु कोटावरून शिपायांनीं फार मारा केला. राउतांचा इलाज चालेना. रामचंद्र हरीस गोळी लागून उजवी बाही मोडली व दुसरे लोक जखमी झाले. स्वार फिरले. मोरच्यांवर लगट केली. हातांतील गरनाळे, दारूचे नळे व दारूचीं मडकीं टाकून मोरचा अगदीं अग्नीनें भरून काढला. तेथें माहादजी केशव, वाघोजीराव खानविलकर व बापूजी क्षीरसागर वगैरे ३०० शें मनुष्यांनीं बाहादुरीनें काम केलें. मग तेही दोन्ही मोरचे

५०. भोंसले, दाभाडे वगैरे यांणीं दुजाभाव न पाहतां या प्रसंगीं बाजीरावाचा कुमक केली असती तर फार उपयोग झाला असता, परंतु त्यांणीं खुद्द शाहूच्याही आज्ञेस यावेळीं न जुमानतां कांहीं तरी सबब सांगून साहाय्य करण्याचें नाकारिलें. त्याच कारणानें यावेळीं मोंगलास परत दिल्लीस जातां आलें.

५१. जराळ=मुख्य अधिकारी. मागें पृ० ९ टी० २३ पहा.

५२. आरमार = ( Armada ) =आर्माडा=युद्ध-नौका-समूह.

* ही बातमी मुंबईचे इंग्रजांनीं मराठ्यांस दिली व त्यांना दारूगोळाही त्यावेळीं मराठ्यास विकला असें ग्रां० डं० म्हणतात. असो, पेशव्यांची बखर पृ० ४२ पहा.

‡ लादण्या=लदाव = भिंतींत अगर दुसऱ्या बांध कामांत कमान देणें असतां कमानीच्या पोकळीत जें मातीचें अगर लांकडाचें काम करितात तें ?

५३. बोलण्याचा फेर पडला तो कसा ? फेर पडला म्ह० भांडण झालें असें तर नव्हे ?

उठविले. फिरंगी शिरगांवास गेला आणि शिरगांवचा मोरचा उठविला. व तारापुरास गेला. नंतर फिरंगी अशेरीस चालला. मग माहिमची फौज व शिरगांवची फौज फिरंग्याचे मुकाबिल्यास गेली. लढाई करूं पाहतात, परंतु फिरंग्याचा आघीचा मारा फार. जवळ ठरूं देत नाहीं, जुमान खात नाहीं. आपली फौज संभाळून चालला. स्वारांचा कांहीं उपाय चालेना, ह्मणून मराठी फौज होती ती निघाली. अशेरीस पंताजी पंताचे मोरचे दरवाज्याखालीं लागले होते. अशेरी जेर झाली. एक महिन्याचें सामायन किल्यावर होतें. तों फिरंगी तेथें येऊन पोहोंचला. पंताजीपंत निघाले. विठ्ठलपंत मनोहर पाहून निघाले. फिरंगी अशेरीस खजिना चढवून मागें चालिला. फिरंगी बाहेर पडला ह्मणून आपासाहेबांस लिहून गेलें. आपासाहेब ब्ऱ्हाणपुराहून मजल दरमजल घावणी करून आले. तों फिरंगी तारापुरास आला. तेव्हां गंगाजी नाईक, शंकराजीपंत व मोरोजी शिंदे यांनीं असा मनसुबा केला कीं, आपासाहेबांस माहिमाकडे जाऊं न देतां ठाण्यास अणावें. हा विचार करून शंकराजीपंत आपासाहेबांस सामोरे गेले. तेव्हां फिरंगी वसईस आला. ठाण्यास जावयाची मसलत केली. आधीं धारावीस जावयाचा विचार केला. तेथें अमृतराव खानविलकर होता व नारायणजी नाईक देवळांत होता. व स्वारांचा तळ खालीं होता. फिरंगी यानें तळावर चालून घेतलें. दगडांचीं[५४] मार सोसवला नाहीं. मग फौज तेथून निघाली. व देवळाचे लोकांस धीर धरवला नाहीं. तेही निघालें. नारायणजी नाईक व बापुजी प्रभु चिटनीस व आणखी लोक यांनीं दिवसांत दोन चार हिराऱ्यो[५५] केल्या. मारापुढें माणसें पळूं लागलीं. फिरंगी धारावीचे डोंगरावर चढला व मेढ्यावर[५६] गेला. बापुजी चिटनीस व नारायणजी नाईक वगैरे सुमारें ७५ मनुष्यें धारावीचा डोंगर चढले. मराठे लोक मागच्या वाटेनें व राऊत खालच्या खालीं मेढ्यांत झुंजूं लागले. सकाळपासून तिसराप्रहर पर्यंत लढाई चालली. खंडोजी मानकर ठाण्याहून धावून आला. त्यास खालींच थांबवून फिरंगी यानें मेढ्यावर लगट केली. मेढा आघीनें अगदीं भरून काढला. तेथें गणपतराव खानविलकर वगैरे खासे खासे लोक कामास आले. धारावीचे मेढ्यास फिरंगी कोटें[५७] बांधूं लागला. आपासाहेब ठाण्यास

५४. मूळप्रतींत 'गदडांचा' असें आहे.

५५. हिराऱ्या=आवेशानें केलेले हल्ले.

५६. मेढा = वासे दाट पुरून केलेला तट किंवा भिंत.

५७. मूळप्रतींत 'काटे' असें आहे.

गेले. ठाण्यास व वसईस बळकटी झाली. लष्करें येऊन बसलीं. लाडदीन या नांवाचा फिरंगी गोव्याहून जराळ वसईस आला. त्यानें फौजबंदी करून धारावीचा मेढा घेतला. तेथें अणजोरकरांचा फकीर महमद वैजनाथ परवारी पडला. फिरंगी यानें मुरगांव येथें माडीस वेढा घालून, खाडीचें तोंड धरून, धारावीचें बेट घ्यावें हा विचार करून फौज मुरब्यास उतरली. दारूगोळा तोफांसुद्धां आला. तेव्हां खंडोजी मानकर, रामाजी माहादेव व मुल्हारजी नाईक वगैरे यांनीं फिरंगी यांचा मोड केला. तोफा आठ पाडाव केल्या. फिरंगी यांचें मनुष्य पांचशें मारलें. कांहीं बुडविलें. तेव्हां त्यांची ठाण्यावर जाण्याची मसलत राहिली. पेद्रे दमेल जराळनें गोंव्यास लिहून पाठविलें कीं, ठाण्याची मसलत लाड दीनानें मोडली. त्यावरून लाडदीनानें मोडली. त्या वरून लाडदीनास अन्यायांत आणून गोव्यांस पाठविलें.

मग पाऊतकाळ आला. आपासाहेबांनीं ठाण्याची व वसईची बळकटी करून पुण्यास गेले. मग पाऊत काळीं फिरंगी वसईस कोटांतून दिवसाचा बाहेर निघून बाहादूरपुऱ्यांचे मेढ्यावर चालून आला. त्याजवर मुल्हारजी शिंदे मेढ्यांतून बाहेर पडून आडवे झाले. शंकराजीपंत, गंगाजी नाईक व खंडोबा प्रभु व सारी फौज लढली. फिरंगी यास मारीत मारीत कोटाखालीं घातला. गोडे विहिरी जवळ हात घाईस आले. फिरंगी व मराठे यांचे २०० मनुष्य पाडाव झालें. हें वर्तमान पुण्यास कळलें.

मग बाजीराव व आपासाहेब यांनीं फिरंगी याची चांगली खात्री करावी, कारण सालदरसाल शिबंदीचा खर्च फार पडतो, याज करितां सारी फौज नेऊन, फिरंगी खणून काढावा हा सिद्धांत करून मल्हारजी होळकर पुढें ठाण्यास पाठविला. तेव्हां फिरंगी पेद्रे दमेल जराळनें साहित्य घेऊन मुंबईवरून ठाण्यास आला. पाणबुरजावर मार केला. गरनाळीचे गोळे बुरजावर टाकिले. बुरजास लादण्या केल्या होत्या त्यावर पडून फुटल्या. खालीं लोक निसूर भांडत. एक गोळा लादणी फोडून आंत फुटला. तेणेंकरून लोक जायां झाले. बरकड घाबरे झाले. बुरजाचा गोळा जाऊन जराळ खासा पेद्रे दमेलवर पडला. मग फिरंगियाचा मोड झाला मग वसईस गेला.

---

५८. Pedro de Mello पेद्रो दी मेलो.

५९ हा 'बहादुर पुरा' कोठें होता त्याचा पत्ता सांगणारा कोणी भेटत नाहीं.

६० 'डॉन अन्तोनिओ' हा या वेळीं हल्ल्यात पडला असें मा० ड० ह्मणतो.

त्याजवर बाजीराव थोडी फौज घेऊन माळव्याकडे गेले. आपासाहेब कोंकणांत आले. आपासाहेबांनीं माहिमावर मोरचे दिले. तेथें बुगाजी नाईक व मुऱ्हारजी नाईक गेले. शंकराजीपंतानें वसईस गंगाजी नाईक व कर्णाजी शिंदे यांस ठेऊन, मोरोजी शिंदे, शिवाजी नाईक, रायाबा व खंडोबा यांस घेऊन माहिमास गेले. माहिमास मोरचे भिडून सुरुंग लावले. तेव्हां माहिमचे लष्कर कौलास आलें; केळवें घेतलें. तारापुरावर हल्ला केला. राणोजी शिंदे यांनीं बंदर किनाऱ्याचें गाव ह्मणजे साळसुबें, खतळवीड, नारगोळ, डाकू व दुसरे गांव मोडीत तारापुरास गेले. तारापुरचे बुरजास सुरुंग लावले. बुरूज उडविला. मग किल्यावर हल्ला केला. तेथें बाजी भिवराव पडले. फत्ते झाली. अशेरी कौलास आली. मग सगळी फौज घेऊन वज्रयोगिणीस* गेले. तेथून गोविंद हरी व तुकाजीपंत यांस साष्टीस पाठवून आपण खुद्द फौज घेऊन वसईस आले. वसईस मोरचे लाविले. पिलाजी जाधवराव, मल्हारजी होळकर, राणोजी शिंदे, राणोजी शितोळे, गणपतराव ब्राह्मण, रामचंद्र हरी व बापुजी भिवराव वगैरे तयारी करण्यास लागले. मोरच्यांस, दमदम्यांस, सुरुंगांस व तोफांस सामान पाहिलें. ओंडे, तक्ते, झांप व सोंट, शिड्या व दारूगोळा वगैरे सर्व सामान शंकराजीपंतास पुरवावयास लागलें.

इकडे साष्टींत गोविंद हरी, तुकाजीपंत, खंडोजी मानकर व कृष्णाजी नाईक यांनीं मडावर हल्ला केला. वसईहून मडास मुऱ्हारजी नाईक यांस पाठविले. साष्टीचे लोक व अणजूरकर यांनीं आपला मोरचा बंदराकडे चालवून, मडचें बंदर घेतलें. वर खंडोजी मानकर, गोविंद हरी व तुकाजीपंत यांनीं मोरचे चालवून तोफा लावून कोटाची सफेली[61] फोडली. मग रातीचा फिरंगी चार वाटांनीं उतरून, गलबतावर चढून, पळून गेला. मडचा कोट सई झाला. मग धारावीस गेले. तेथें नारायण जोशी व मुऱ्हारजी नाईक यांनीं गायमुखाचा मोरचा चालवून बंदर घेतलें. वरून तोफा लावून सफेल[61] मोडली. तेव्हां फिरंगी यार मोड झाला. धारावी काबिज झाली. तेव्हां ही फौज मानकर, नारायण जोशी, व शिवाजी नाईक अणजोरकर हे घेऊन वसईस आले. सुरुंगी[62] कोटाजवळ जात तों फिरंगी वरून उरफाट्या तोफा डागून सुरुंगीवर

---

* म्ह० वज्राबाई,

६१. सफेल = तटाची गच्ची.

६२. 'शंगकोट' 'शृंगावर' 'शृगाचें' असें मूळप्रतींत अनुक्रमें आहे.

गोळे मारूं लागला. वरून लांकडें टाकूं लागला. चंद्रूस[६३] गंधक टाकूं लागला, तापलेलें पाणी ओतूं लागला. सुरुंग जवळ भिडूं देईना. प्रत्येक सुरुंग पांच पांच वेळा मोडिला. सुरुंगांचें काम राहिलें. काम चालूं देईना. मग खालून तोफा तीस लाविल्या. कवल्हेरी बुरूज व समोरच्या दुसाळी [ ? ] फोडून साफ केल्या. दमदमे[६४] दोन जवळ उभे केले. त्याजवरून बरकंदाजी[६५] बुरजावर चालली. तेणेंकरून फिरंग्याचा मार कमी झाला. आठ सुरुंगांत बुधले[६६] भरून तयार केले. सर्व फौज हल्ला करावयास तयार झाली. सुरुंग उडविलें. कोटावर हल्ला करावा तों सुरुंगांच्या उरफाऱ्या दगडी येऊन माणसें फार जायां झालीं. उत्तरेचे कोनाचा सुरुंग राणोजी शिंद्याचा उडाला व पश्चिमेचा सुरुंग बत्तीवर दगडी पडून विझाला. बाकीचे लहान लहान सुरुंग उडाले. पश्चिमेचे बुरजावर लगट झाला. तेव्हां विभूतगावाचा सुरुंग उडाला. तेणें करून आपले लोक जखमी झाले. त्यावेळेस फिरंगी चार कोपऱ्यांवर उतरला आणि आग लावली. मग शृं ग ऱ्हो ळ [ ? ] दुसरे दिवशीं पश्चिमेचा उडविला, बुरूज अर्धा उडाला. मग सारे शाहीचा[६७] हल्ला झाला. सर्व श्रीमंतांची फौज व सर्व मराठे लोक पायउतारानें जिवाची आशा सोडून कोटास लागले. लढाई मोठी झाली. त्या दिवशीं ४००० मनुष्य पडले. त्यांत कांहीं चांगले चांगले लोक पडले. शेवटीं फिरंगी कौलास आली[६८]. सात दिवसांची मुदत मागितली. व तारवें भरून गोव्यास गेला. शके १६६१ सिद्धार्थी नाम संवत्सरे वैशाख शुद्ध ९ या दिवशीं फिरंगाण मोडला. फिरंगी दवणेस राहिला व इंग्रज मुंबईचे बेटांत राहिला.

मग चिमाजी आपा मुलखाचा बंदोबस्त करून पुण्यास चालले ते वेळेस गंगाजी नायकास सांगितलें कीं, "तुह्मी पुण्यास यावें म्हणजे तुम्हांस

६३. चंद्रूस = एक प्रकारची लाख

६४. दमदमा = धमधमा = मातीचे मोठ मोठाले धक्के किंवा बुरूज.

६५. बरकंदाजी = बंदुकीचा मारा

६६. बुधले दारूचे.

६७. शाहीचा = सर्व फौजेचा ( पेशव्यांच्या. )

६८ किल्ल्याचे पश्चिमेचे आंगास म्हणजे खाडीचे मुखाजवळ बाहेर समुद्रांत जाण्याचें जें चोरदार आहे त्या दारानें फिरंग्याची स्त्री बाहेर पडून गुप्तपणें गोंव्यास जावयाकरितां निघाली असतां मराठ्यांच्या नावाड्यांनीं तो मचवा धरून बाईस आपासाहेबांकडे नेलें व त्यांनीं तिजला वहिणी प्रमाणें मानून तिची नीट संभावना करून तिजला परत किल्ल्यांत पाठविलें व तिच्या शिफारशीनें सल्ल्याचें काम लौकर शेवटास गेलें अशी वसईचे किरिस्तांव लोक आख्यायिका सांगतात, तिचा उल्लेख येथें नाहीं. पेशव्यांची पू० बखर ४३ पहा.

तुमच्या वतनाच्या सनदा व पत्रें देववितों." असें सांगून पुण्यास गेले. श्रीमंत बाजीराव हे पुण्याहून मुलूखगिरीस निघाले तेव्हां आपासाहेबांस सनदा, मानपत्रें वगैरे देण्यास सांगितलें इतक्यांत बाजीरावांस देवाज्ञा झाली, व त्यांच्यामागून चिमाजीआपाही वारले. मग बाजीरावाचा पुत्र बाळाजी बाजीराव यास शाहूराजांनीं प्रधानकीचीं वस्त्रे दिलीं तीं घेऊन पुण्यास आले. मग शंकराजीपंत ही वतनदारांस घेऊन पुण्यास आले. बाळाजीरावानें वतनें देण्याचें नाकारलें आणि म्हणाले कीं, "तुमचा मुलूख सोडविण्यास कोट्यावधि रुपये खर्च झाला." देसायांचें वतन बुडविलें. व देसनाडगौडि याच्या वतनास नांव देशमुख ठेविलें. आपले गुमस्ते पाठविले. या प्रमाणें देशपांड्यांचे वतनास गुमस्ते पाठविले. व सर पाटील हें वतन स्थापिलें व आपले गुमस्ते ठेविले. व परगणे मालाड, परगणें मरोळ, तर्फ आटगांव व परगणे साहिवान याच्या पाटिलकीच्या सनदा गंगाजीस दिल्या. माहिम येथील कुळकर्ण शंकराजी केशवास दिलें. या प्रमाणें वतनें व इनाम यांच्या सनदा अणजूर वगैरेच्या देऊन प्रांताचा बंदोबस्त केला. साष्टीचे किल्ल्याचे संरक्षणार्थ माहादजी शिंदे पांचशें लोकांनिशीं होते ते पुढें हिंदुस्थानात गेले. त्या वेळेस रामाजी महादेव हे साष्टीचे सुभेदार होते. त्यांच्या पाठीमागें त्याचे पुत्र आनंदराव राम सुभेदार होते. शके १६९६ त इंग्रजांनीं मुंबईहून पलटणें आणून ठाण्याचा किल्ला सर करून घेतला, त्या समयीं आनंदराव सुभेदार यांनीं मोठी लढाई दिली. किल्ल्यांतील फौज सारी पडली. त्या पैकीं आनंदराव सुभेदार व एक हवालदार असे राहिले होते. त्या पैकीं हवालदार यांस कपतान साहेब यानीं गोळी घालून मारलें. व विसाजीपंत कळव्यांस फौजेनिशीं होते त्यांनीं फितूर होऊन वायबार केले व किल्ल्याच्या मैदानांत घरबंदी होती यामुळें आंतील फौजेचा इलाज चालला नाहीं. या मुळें किल्ला हस्तगत झाला. व दुसरे किल्लेही इंग्रजांनीं सर करून घेतले. आनंदराव सुभेदार यास मुंबईस नेऊन, त्याच्या सन्मानार्थ तोफा वगैरे मारून व गव्हरनर साहेब त्यास सामोरे जाऊन, मोठामान देऊन, मुंबईत ठेविला. नंतर श्रीमंतांकडून पत्र आल्यावर त्यांस पुण्यास रवाना केलें.

इकडे साष्टींत इंग्रजी अम्मल झाला. त्यावेळेस किती एक आपलीं

---

६१. बाजीराव नर्मदातटीं कडुडें तालुक्के रावेर येथें ता० २८ अपरील १७४० रोजीं व आपा जानेवारी १७४१ महिन्यांत असें मृत्यु पावले.

घरें दारें टाकून अणजुरास व दुसरेकडे गेले. इंग्रज सरकारानें जा-हिराती लाविल्याकीं, जो वतनदार असेल त्यानें वतनावर हजर व्हावें. नंतर साष्टीचे सरपाटील हजर झाले. हे वर्तमान श्रीमंतांकडे गेले व सरपाटील हे इंग्रजांस मिलाफी झाले, तेव्हां पाटील यांज पासून ७००० रुपये दंड घेण्या विषयीं हुकूम आल्यावरून मामलेदार यांनीं सरपाटील यांजपासून ७००० रुपये दंड घेतला व वतन घेतलें. पुढें श्रीमंतांकडे जाऊन साष्टी विषयीं विनंती केली तेव्हां श्रीमंतांनीं सांगितलें कीं, "तुह्मी वतनावर हजर कां झाला ? तें राज्य आपण घेऊं." पुढें साष्टीचे बदल माहादजी शिंदे यांस मध्यें घालून तिप्पट ९ लक्षांचा मुलूख शिंद्यास देऊन मुंबईच्या लगत साष्टी तीन लक्षांची इंग्रज यांनीं ठेविली.[७०]

## समाप्त.

७०. हे सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत सालप्याच्या तहांत ठरलें (१७८२) असो. या बखरींत थोर पुरुषांचीं नांवें आलीं आहेत त्यापैकीं कांहींकांच्या वंशाची माहिती येथें देणें अप्रासंगिक होणार नाहीं.

गंगाजी नाईक–हे सरपाटील ; यांस अणजूर वगैरे गांव इनाम आहेत. त्यांचे वंशज अणजूर, तालुके भिवंडी येथें राहतात.

खंडोजी मानकर–यांस खरवली (ता० माणगांव) येथें स्थापिलें. हा गांव त्यांस इनाम आहे. हपशीयांचे तोंडावर यांची स्थापना केली ती यथायुक्त झाली. ह्यांचे वंशज खरवली येथें आपल्या पूर्वजांच्या करामतीच्या फलाचा अद्याप उपभोग घेत आहेत.

खानविलकर–दक्षिण कोंकणांत.

घोरपडे–हे पेशव्यांचे मेहुणे. ह्यांनीं गोंव्याकडे स्वारी करून तिकडून साष्टीकडील फिरंग्यांस मदत येऊं दिली नाहीं. ह्यांचे वंशज इचलकरंजीस आहेत.

शिंदे–ह्या नांवाचे पुरुष अपरिचित असे यांत पुष्कळ आढळतात. राणोजीचें नांव मात्र परिचित आहे. हीं व भाऊसाहेबांची बखर वाचिली म्हणजे शिंद्यांचें घराणें किती मोठें होतें व त्याचे किती पुरुष सरकारी कामास आले हें नीट ध्यानीं येईल. यांचें मूळ स्थळ शिदखेड. मोठें घराणें ग्वाल्हेरीस.

रामाजी महादेव बिवलकर–यांजकडे साष्टीचा सुभा होता. यांचे वंशज कल्याणास नांदतात. कल्याण येथील वाडा त्यांच्याच नांवानें अद्याप प्रसिद्ध आहे ह्मणजे त्या वाड्यास अद्याप "रामाजी महादेवाचा वाडा" असें म्हणतात. ठाणें यथील कौपिनेश्वर-मंदिराच्या सभामंडपाचा जीर्णोद्धार नुकता झाला त्यावेळेस रामाजीपंताचे वंशज यांणीच त्याच्या पायाचा दगड बसविला.

शंकराजी केशव फडके–हे वसईचे सुभेदार. ह्यांजकडे देशपांडेपणाचें वतन. हें वतन अद्याप त्यांचे वंशज उपभोगित आहेत. ते पुणें येथें राहतात व इनामनीस ह्या नांवानें मोडतात.

शितोळे, बाजी भिवराव, गोविंद व रामचंद्र हरी–ह्यांची माहिती मिळत नाहीं. शेवटील दोघे पटवर्धन असावेसें वाटतें.

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
|---|---|---|---|---|
| १३२ | १० | ३ | श्यामता | नीलता |
| १३२ | ११ | ४ | असौंदर्य जालें स्वदेहीं | सौंदर्य गेलें स्व देहीं |
| १३२ | १३ | २ | हो जगीं | आंगीं |
| १३२ | १४ | २ | नव्हे | नेणसी |
| १३२ | १४ | ४ | न पावे | नेणवे |
| १३२ | १५ | २ | सेवित | सेवीं |
| १३२ | १५ | ३ | वरुषीं | दिवशीं |
| १३२ | १९ | २ | तीं हो | समयीं |
| १३२ | २० | १ | ऋतुपर्ण | ऋतुपर्ण राया |
| १३३ | २५ | १ | आश्चर्य | आश्रय |
| १३३ | २६ | २ | वनांतरीं | कांतारीं |
| १३३ | २७ | २ | जातसे | जितसे |
| १३३ | २९ | २ | शद्ध | कुशद्ध |
| १३३ | ३१ | ३ | सांडुनीं | सुगुण |
| १३३ | ३४ | १ | कळला पाहिजे | कल्पिजे |

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
|---|---|---|---|---|
| १३३ | ३६ | ३ | वचनीं | वदनीं |
| १३३ | ३८ | २ | मांगल्य गृहांगणीं | सुमांगल्य कृत्य पुण्याहवाचनीं |
| १३४ | ३९ | ३ | प्रपंचा माजील प्राणी | प्रपंच निष्ठां माजी ज्ञानी |
| १३४ | ४४ | ३ | सर्व वृत्तांत सांग मातें | पुसती झाली एक चित्तें |
| १३४ | ४५ | ३ | नामे विश्व इया | नावो विश्वमाया |
| १३४ | ४७ | २ | बहु | उत्तम |
| १३४ | ५२ | ४ | नेणें | नेणें चि पैं |
| १३४ | ५३ | ३ | वहिली | हे वहिली |
| १३५ | ६३ | ४ | देहीं धडके सर्वदां | चिंताग्रस्त मानसीं |
| १३६ | ७२ | ३ | विकळ | विफळ |
| १३७ | ८६ | २ | सूचना | खुणा |
| १३७ | ९३ | ३ | सूर्य | दिवस |
| १३७ | ९४ | १ | ह्मणे | ह्मणती |

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
|---|---|---|---|---|
| १३७ | ९८ | ३ | जाण | प्रयत्न |
| १३८ | १०६ | २ | उडाले | उधळले |
| १३८ | १०९ | ३ | नृपति | हातीं |
| १३८ | ११० | २ | दश | एक |
| १३८ | ११० | ३ | येतां | येणें मार्गीं |
| १३९ | ११७ | ४ | तुज | रथ |
| १३९ | १२१ | १ | विद्या | ह्रदय |
| १३९ | १२५ | ४ | तामसाची | तामस असुराची |
| १३९ | १२६ | १ | कलियुगीं | युगानुयुगीं |
| १४० | १३२ | ३ | विलक्षणता | विरूपता |
| १४० | १३५ | ३ | ठायीं | विषयीं |
| १४० | १३७ | ४ | अनुमाना | आमुतें |
| १४१ | १४५ | ४ | करीं धार्मिका | केलें पाहिजे |
| १४१ | १५१ | १ | दुष्ट | भूत |
| १४२ | १६२ | ३ | वाटोन | दाटोन |
| १४२ | १७१ | २ | स्मरण | विचार |

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
|---|---|---|---|---|
| १४३ | १७८ | २ | कपाळ | भाळ |
| १४४ | १९४ | २ | परस्परें क्षेम कवळी | सर्व इंद्रियां क्षेम कवळी |
| १४४ | १९८ | ४ | तेणें आल्हाद पौरजां | परमानंद जगातें |
| १४४ | २०० | ३ | मांडिली | होत |
| १४४ | २०२ | २ | अपारवित्तें | अपरिमितें |
| १४५ | २१३ | ४ | वैभव | सर्व |
| १४५ | २१८ | २ | असंख्य | अपार |
| १४५ | २१९ | १ | कीर्ति | निर्दोष कीर्ति |
| १४६ | २२२ | ४ | पावसी | पावाल |
| १४६ | २२५ | ४ | संतोषें | संतांतें |
| | | | **अध्याय १४ वा.** | |
| १४६ | ४ | १ | भूमंडळीं | भूमंडळींचीं |
| १४६ | ६ | ४ | धर्मज्ञा | सर्वज्ञा |
| १४६ | ८ | १ | न वसतां | नसतां |
| १४६ | ८ | २ | सत्यवंत | सत्वनिष्ठ किंवा सत्यव्रत |

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
| --- | --- | --- | --- | --- |
| १४७ | ९ | ४ | देशीं त्या वसती | दंश त्या करिती |
| १४७ | १२ | १ | इंद्रिय | नित्य |
| १४७ | १२ | १ | व्यसनी | आसनीं |
| १४७ | १३ | १ | तीर्थांचा | सृष्टीचा |
| १४७ | १७ | ३ | कर्णीं का | नाटिका |
| १४७ | १८ | १ | सुबुद्धि | शुद्ध |
"The publication, of which the name heads this notice, is, in our judgement, one of the most important and useful of the productions to which the feeling referred to has given birth. Whether in consequence of defect of management, or of some other cause, that publication has not become so widely known as it deserves to be. It commenced to be published in January 1878, and from that till now the monthly parts have come out with pretty fair regularity. The contents are divided into three separate departments, so to say: the first is intended to contain old *documenta* of Maratha history; the second is to contain unpublished Marathi poems; and the third is to contain unpublished Sanskrit poems. The original matter which the Editors are to supply will embrace information regarding the various pieces to be published, and their authors, short notes in explanation of difficult words, &c., and in the case of the historical portion, references from time to time to Grant Duff's *History of the Marathas*, and other similar works. Such is the general scheme of the publication; and if it is executed with even ordinary care, it cannot fail to be of the greatest service to the interests of the literature and history of Western India. So far as the undertaking has already progressed, we have no hesitation in saying that, upon the whole, the work has been done very judiciously. In the first department, we have already had one very interesting *Bakhar* completed. It gives a connected narrative of the careers of all the Peshvas from Balaji Vishvanath down to the last Bajirow, and has been called the "*Peshva's Bakhar.*" The other, which is now in process of publication, and which has been named "*Bhau Saheb's Bakhar*, relates to that most important period of Maratha history, the period of the battle of Panipat. The principle adopted in printing the first was rather an uncritical one, as the Editors permitted themselves to make sundry alterations in the text of the *Bakhar* in order to render the narrative more perspicuous. In printing the second *Bakhar*, however, they have abandoned that principle, and we trust they will not act on it again with reference to any of the other documents they

( To be Continued. )

# विषयक्रमः

बखरी.

शिवछत्रपताचें चरित्र ५३–६०.

नागपूरकर भोंसल्यांचे संबंधाचे कागदपत्र. १–८.

मराठी कविता.

मुक्तेश्वर शुद्धिपत्र, पाठांतरें वगैरे. ४९–६ समाप्त.

मोरोपंत कृत भृगुचरित्र ४९–५२

वामन कृत नृहरि-दर्पण ९१–९४

संस्कृत कविता.

नीलकंठ चंपू.... ... .... .... ५–२०.

ही फौज पुढें आली. मोठी मारामारी जाहली. तांत्राकडील लोक बहुत मारिले. आणि सावकारांचे वाडे कावीज करून सोनें, रुपें, मोतीं, पोंवळें, माणीक, हिरे, पाच, गोमेदराज, वैडुर्य, असे नवरत्नें नाणें मोहरा, पुतळ्या, इभ्राम्या, सतराम्या, अर्सर्फ्या[४९], होन, नाणें नानाजातीचें इतक्या जिनसाच्या धोंकटिया भरल्या. कापड भांडें तांब्याचे वरकड हान [ अन्य ? ] जिन्नस यास हात लाविलाच नाहीं. असें शहर दोन दिवस अहोरात्र लुटिलें. उत्तम घोडे जितके युद्धांत व सावकाराच्या घरांत सांपडले तितके घेतले. आणि राजियांनीं विचार केला कीं, लौकर निघून जावें. असें करून कुल लष्करांतून निमे घोडी भांडावयास लष्करी ठेविलीं. निमे घोडियांवरीं धोंगटिया मालाच्या घातल्या. पाईच्या लोकांस हमेण्यां[५०] करून त्यांजवळ दिधल्या. अशी मुस्तेदी[५१] करून वोझीं घेऊन निघाले. सुरतेचा कोट घेतला नाहीं. अवकाश थोडा ह्मणून शहर मारून चौलिले[५२]. ही खबर मोंगलांचे सुभेदार वीस उंबराव व मोहबत खान, व दाऊदखान असे सात गांवची दवड करून बराबर हजार स्वार एक एक सुभ्याबराबर चालून आले, त्यानीं राजियास गांठलें. गनीम आला ऐशी खबर कळली. राजा खांसा घोड्यावर बैसून बख्तर धुगी[५३] घालून, हातीं पट्टे चढवून, मालमत्ता घोडीं, पाईंचे लोक पुढें रवा॥ करून आपण दहा हजार स्वारानिशीं सडेसडे राऊत उभे राहिले. वणी दिंडोरी ह्मणवून शहर आहे ते जागां उभे राहून सुभ्याचे लोक आले त्यांशीं घोरांदर युद्ध केलें. मोहबत खान व दाऊत खान यांनीं युद्ध केलें. राजियांनीं आपली फौज पुढें करून पाठीवर आपण खांसा राहून झगडा दिधला. प्रतापराव सरनोबत व व्यंकोजी दत्तो व आनंदराव वरकड सरदार पुढें होऊन मोठी कत्तल केली. आणि मोंगल मारून मुरदे पाडिले. दोन प्रहर युद्ध झालें. मराठे यांणीं शर्त केली. तीन हजार मोंगल मारिले. तीन चार हजार घोडे पाडाव केले. दोन वजीर मोंगलाई सांपडले. असे फत्ते करून आले. तो पुढें उदाराम वजीर मोंगलांचा याचा लेक जगजीवन उदाराम[याची]बाईल

---

४९. इभ्राम्या, सतराम्या, असफ्या हीं नानां प्रकारचीं सुवर्णाचीं नाणीं निरनिराळ्या बादशहांचीं होत.

५०. हमेणी = लांब पिशवी.

५१. मुस्तेदी = तयारी.

५२. इंग्रजांच्या वखारीबद्दल येथें उल्लेख नाहीं. त्यांनीं या वेळीं आपला बचाव केला व कांहीं सावकारांचेंही आपल्या कोटांत संरक्षण केलें. कदाचित् शिवाजीस तितकी फुरसुद सांपडली नसेल असें ही ह्मणता येईल.

५३. बखतर = चर्म, ढाल (?) धुगी = शिरस्त्राण.

रायबागीण[५४] असे व सरदार पांच हजार उदैरि [ ? ] आले. त्यास मारून चालविले. रायबागीण कोंडली. तिणें दांतीं तृण धरून लेंक राजियाची ह्मणून बोलून कौल घेतला. मग तीस कौल घेतला. मग तीस कौल देऊन अनांत[५६] करून सोडली आणि माघारे राजे राजगडास आले.

मालमत्ता सुरतेची आकार करितां सर्व बिशांत[५७] पांच कोर्डे[५८] होनाची आणली. चार हजार घोडीं आणलीं, तीं पागा केली. पागेत खूण चौकटीचा डाग घोड्याचे उंजवेकडे[५९] देऊन अशी ओळखण करून पुढें ज्या ज्या मुलखांत अदलशाही निजामशाही गड होते तितके घेतले. कित्येक डोंगर बांके जोगेत होते ते गड वसविले. जागोजागां गांवावरि मुलखांत नूतन गडवसविले. गडा करितां मुलूख जप्त होता. असे समजून गड बांधिले. व कोंकणांत कल्याण भिवंडी राजापूर पावेतों देश काबीज केला. काबीज करितां जागां जागांपुढें पाळेगार होते व देशमुख होते, त्यामध्यें जे युद्धास आले त्यांस मारून गर्दीस मेळविले. आणि ज्यांनीं कौल घेतला, त्यास यथायोग्य चालवून रक्षिले. रेवदंडा राजापुरी दर्यामध्यें किल्ला निजामशाही आहे तेथें हाबशी किल्लेदार जागियाचा खावंदच. याचीं पाणियांतील जहाजें गुराबा[६०] चाळीस पन्नास आरमार त्यानें करून मुलूख मारून पैदा करून जागा जतन आहे. त्याचे लोकांनीं राजियाचे देशास उपद्रव मांडिला. मग राजियानें बाजी पासलकर यास लष्कर मावळा हजार दोन हजार [दिला] तैसेच जहाजें पाणियांतील झालीं. समुद्रास पालाण राजियांनीं घातलें. हा एक हात सजला. राजापुरी एक पाणियांत उरली या करितां आद्यापि निजामशहाचें नांव चालतें तें स्थळ हस्तगत करावें ह्मणून राजियानीं जागां जागां डोंगर पाहून गड वसविले कीं येणें कडोन दर्या जेर आहे, आणि पाणियांतील राजे जेर होतील. असें जाणून कित्येक पाणियांतील डोंगर बांधून दर्या मध्यें गड वसविले. पाणियांतील ह्मणजे केवळ जंजिरे असें करून गड जहाजें मेळवून दर्यास पालाण राजियानें घातलें. जों वर पाणियांतील गड असतील तोंवर आपले नांव चालेल, असा विचार करून अगणित गड जंजिरे जमीनीवर व पाणियांत वसविले. असें कर्म केलें.

---

५४. रायबागिण ही माहूरची देशमुखीण. हिचा भ्रतार एका लढाईंत पडला असतां ही पुढें होऊन आपल्या लोकांस धीर देऊन जय पावली ह्मणून तीस रायबागीण असा किताब बादशहानें दिला होता.

५५. " मोंगल घेऊन उंदीरखिंडीस आले " पाठांतर.

५६. अनात=अनाथ (?)

५७. बिशात=संपत्ति, मालमिळकत.

५८. " साडेआठ कोट होनाची जागा आणिली " पाठांतर.

५९. " उजवे टिरीवर " पाठांतर.

६०. गुराबा=एक प्रकारचे तारूं.

त्याजवरि राजापुरीहून कायसांवत ह्मणोन पांच हजार फौजेनिशीं युद्धास आला. मोठें युद्ध होतां बहुत रणखंदल जालें. कायसांवत खासा व बाजी पालसकर महायोद्धा—याच्या मिशा दंडा एवढ्या यांस पीळ घालून वरि केंशाच्या आधारें निंबे दोहींकडे दोन ठेवीत होता, असा शूरमर्द ठेविला—यांशीं व त्याशीं खांसा खांशी गांठ पडली. एकास एकांनीं पंचवीस जखमा करून ठार पडले. मग उभयतांकडील दळ आपले जागियास गेलें.

इतकियांत राजियाचे बाप शहाजी महाराज बेंगरूळीं होते ते विजापुराकडे येत असतां एकाएकीं चित्रदुर्गांत विलाइतींमध्यें बेगेदरी[61] गांवीं घोडियावरून पडून मृत्यु पावले. हें वर्तमान राजियास कळलें. बहुत शोक केला सर्वही विधान करून दानधर्म अपार केले. आणि बोलिले कीं, "मजसारख्या पुत्राचा पराक्रम महाराज पहाते तरि उत्तम होतें. आपण आपला पुरुषार्थ कोणास दाखवावा ? मागें अफजुलखान मारिला व शास्ताखानास शास्ती केली. पराभवातें पाववीला. आणि मिरजा राजियाची भेट घेऊन दिल्लीस गेलों. पादशहाची भेट घेऊन मागती आपल्या राज्यास आलों. मागती कित्येक गड घेतले व शहरें मारिलीं आणि पागा शिलेदार लष्कर चाळीस हजार केलें. असें पराक्रमाचें वर्तमान ऐकून महाराज संतुष्ट झाले. सभाधान पत्रें आपणास वरचेवर येत होतीं. तैशींच अलंकार वस्त्रें पाठवीत होते. या उपरि त्या मार्गें आपणास कोणी आतां वडील नाहीं !" ह्मणून मोठा खेद केला. त्या उपरि मातुश्री अग्निप्रवेश करीत होती तिंचे मांडीवर बैसोन गळां मिठी घालून आण घालून राहविली. आपला पुरुषार्थ पाहवयास कोणीं नाहीं. तूं जाऊं नको. ह्मणून मोठा यत्न करून राजियांनीं व सर्व थोर थोर लोकांनीं राहविली. असें वर्तमान झालें.

पुढे राजियास राजपुरीचे शिद्दी घरांत जैसा उंदीर तैसा शत्रु, यास कैसे जेर करावें ह्मणून तजवीज[62] पडली. तेव्हां रघुनाथ बल्लाळ सबनीस यांनीं आंगें अर्ज केला कीं, आपण शिद्दीवर स्वारी करितों. असे ह्मणून सात पांच हजार मावळे खकम पाईचे घेऊन राजपुरीवरि चालिले. त्यांनीं जाऊन राजपुरी पावेतो तळें घोसाळें कुल देश मारून राजपुरी पावेतो सरद[63] दरिया किनारा मोकळा केला, शिद्दीच्या एक दोन फौजा आल्या त्या मारिल्या. तेव्हां राजपुरी कडून रघुनाथपंताशीं राब

---

६१. "बोदेगिरगांवीं" पा०
६२. तजवीज = विचार, काळजी.
६३. सरद = सीमा.

कारण करून सल्ला केला. देश थोडा बहुत मागून, पुढें सज्जन मनुष्य पाठवून आण शफत देऊन, रघुनाथपंतास भेटीस नेलें. भेट जाहली, सत्याची बळकटी करून सख्य झालें. रघुनाथपंतास वस्त्रें घोडा दिधला. आपले देशास आले. पुढें काळानुसार रघुनाथपंत मृत्युपावले. त्या नंतर शिद्दीचे शैल तुटलें. यावरि हाबशियांनीं बदल खावून देशास उपद्रव करूं लागले. मग राजियानीं व्यंकाजी दत्तो फौजेनिशीं नामजाद रवाना केले. त्यानीं जाऊन त्याचा मुलूख मारून तलफ[६४] केला. मग शिद्दीनें आपले जातीचे हापशी लष्कर घोडे स्वार व हशम नामजाद व्यंकाजी दत्तोवर रवाना केले. याशीं त्याशीं युद्ध जालें. तीनशें हावशी व्यंकाजी पंतीं मारिले. घोडे पाडाव केले. व्यंकाजी पंतीं करत[६५] फार केली. बारा जखमा व्यंकाजी पंतास लागल्या. असा चौका[६६] बसवून आले. शिद्दीनें सल्याचें नातें लाविलें होतें. परंतु राजियानीं सल्ला केलाच नाहीं. त्याचे देशांत जागां जागां गड कोट नवेच बळावून राहिले. राजपुरी नजीक डोंगर बळाविला होता तो घेऊन गड बांधून कुल देश काबीज केला. ठाणीं ठेविलीं. मग त्याचा इलाज चालेना. पांच सात हजार हशम व सुभे ठेविले. असें केलें. मग राजपुरीस मुलूख नाहीं. दाणे कोठून यावे? त्यास पाणियांतील जाहजें होतीं. तेणें करून वरकड मुलूख मारून सामान आणून खाऊं लागले. त्यास राजियानीं जाहाजें पाणियांतील सजिलीं. गुराबा व तांडीं[६७] व तारवें गलबतें, शिबाडें, गुराबा, पगार अशीं नाना जातीचीं जहाजें करून दर्यासागर ह्मणोन मुसलमान सुभेदार व मायनाईक ह्मणोन भंडारी असे दोघे सुभेदार करून, दोनशें जहाजें एक सुभा, असे आरमार सजलें. त्यास व शिद्दीचे जाहाजास युद्ध होऊन शिद्दीचीं जहाजें पाडाव केलीं. युद्ध बहुत जाहलें. दर्यांत तरांडें फिरेना असें जालें. त्यावर हमेशा युद्ध करीत चालले. मग चोरून मारून हाबशी सामान नेत होता. राजियाचीं जहाजें जागांजागां बंदरें शहरें मोंगलाई व फिरंगी व वलंदेज, इंग्रज, किलाताव ऐशा सत्तावीस पातशाहा पाणियांत आहेत त्यांचीं शहरें बदनूर, सोंदें श्रीरंगपट्टण ऐशीं दर्या किनारे नाना शहरें मारून पोट भरीत चालले. जागांजागां युद्ध करीत माल मत्ता मेळवून आपले पोट भरून राजियास रसद द्रव्यें जिन्नस आणून देऊं लागले. ये रीतीनें सातशें जहाजें पाण्यांती

६४ तलफ = जप्त.
६५. करत = मेहनत.
६६. चौका = जरब, धाक.
६७. नौका विशेष.

ल झालीं. समुद्रांमध्यें ही एक लष्कर झालें. हा एक बेत सजिला. पाण्यांतील एक राजपुरी निजामशाही उरली. याकरितां अद्याप निजामशहाचें नांव चालतें.

तें स्थळ जेर करावें म्हणोन व कोंकणांत कुडाळीं लखमसांवत देसाई म्हणोन पुंड होता. बारा हजार हशमानिशीं राहत असे. कुडाळ म्हणजे आदलशाही. त्याणें विजापुरास सांगून पाठविलें कीं फौज घोडा राऊत हशम मेळवून आपण राजियावरि चालोन जातों आणि कोंकण सोडवितों. म्हणोन सांगोन पाठविलें. त्याजवरून विजापुरींहून खवासखान सरलष्कर, मोठा योद्धा, दाहा हजार स्वारांनिशीं कुडाळास आला. लखमसांवत बारा हजार हशमांनिशीं सामील होऊन कोंकण सोडवीत चालले. इतकियांत राजास खबर कळून लष्कर व हशम निवड करून नीट चालून त्याजवर घेतलें. खवासखानास विजापुराहून मदतीस बाजी घोरपडे, दीड हजार स्वार, येत होते. घाट उतरोन कोंकणांत राहिले. त्याजवर राजियांनीं लष्कर पाठवून छापा घालून, बाजी घोरपडे कुल भाऊबंद सहवर्तमान बुडविले.* बाराशें घोडीं पाडाव केलीं. मोठें युद्ध झालें. पुढें कुडाळावरि खवासखानावरि जावें, त्यासही या सारखें बुडवावें, तों त्यांनीं हें वर्तमान ऐकिलें. बाजी घोरपडे दीड हजार घोडे समवेत बुडविले. ही खबर ऐकून धास्त खाऊन घाटावर पळून गेला. नीट विजापुरास पावला. पुढे लखमसांवतावरि राजियांनीं नामजादी केली. त्यांची ही फौज कित्येक मारिली. यावरि लखम सावंत कुडाळ प्रांत सोडून फिरंगणांत बाहेर देशांत पळाला. कुडाळ देश राजियांनीं काबीज केला. फिरंगी यास राजियाचा धाक तेथें त्यास ठेवून घेववेना असें झालें. जागा कोठें नाहीं तेव्हां राजियाशीं राजकारण लावून पीतांबर शेणवी मच्छाहारी ब्राह्मण म्हणून कुडाळी हेजीब पाठवून दिला. आणि राजियाचा कौल घेऊन भेटीस आला. भेट झाली. "आपण सांवत म्हणजे भोंसले यांचा गोत्रज. आपलें तुह्मीं चालविणें उचित आहे." असें कित्येक बोलिल्यावरि राजियांनीं देशमुखी कुडाळची करार करून तनका दाखल सहा हजार होन वेतन करार करून द्यावे असें केलें. वाडा हुडा बुरजाचा बांधूं नये. कुडाळीं रहावें. जमाव करूं नये. असें करून ठेविलें. त्याचे सरदार राम दळवी व तान सांवत यांस हशमांचीं हाजारिया देऊन आपले आला-

* शहाजीस विश्वासघातानें धरून विजापुरास कोंडून ठेवणारा बाजी घोरपडा हाच. याचा सूड घेशील तरच माझा पुत्र खरा असें शिवाजीस शहाजीनें मागें लिहिलें होतें त्याजवरून शिवाजीनें त्याचा या प्रसंगीं सत्यानास उडविला.

हिदा चाकर तिंघे तीन जागां नामजाद ठेविले. पुनः लखम सांवताचीं व यांची भेट होऊं न दिली. असा कुडाळ देश काबीज केला. फोंड कोट इदलशाई होता. तेथें मोबतखान राजबिंडा सरदार जबरदस्त होता. ते जागां वेढा घालून, सुरंग लावून हुडे बुरूज उडविले. फोंड घेतलें. मोबतखानास कौल देऊन विजापुरास जावयास निरोप दिला. तेव्हां राजियाकडील सरदार इब्रामखान मुसलमान मोठा धारकरी लष्करचा हजारी बरोबरि होता. त्यानें कष्ट मेहनत बहुत केली. फोंड घेऊन कडवाड, शिवेश्वर, मिरज, अंकोलें, कदरें, सुपे, उडवें हे कोट कोकणाचे कुल् घेऊन गोकर्ण महाबळेश्वर वरघाट सुपें येथवर सरद लाविली. व गोंवियाचे फिरंगी यास दबावून त्याजवळून तोफा, नखत, जड जवाहीर घेऊन आपलेसे करून, त्यास उदमास कौल देऊन आला. दरफ्ती करावयासि निरोप दिला. असें कुल् कोंकण काबीज केलें.

पुढें बिदनुरीं शिवापा नाईक जंगम होता. त्याचें शहर बसनूर म्हणून थोर नामांकित होतें. दर्या किनारा, तेथें पालती पाठवून पाळती आणून, वरघाटे जातां मार्ग नाहीं म्हणून पाणियांतील आपलीं जहाजें आणून सिद्ध करून, आपण राजा खांसा जहाजांत बसून जाऊन बसनुरास एकाएकीं दिवस उगवावयासि गेले. शहरचे लोक बेहुशार होते. एकाएकीं जहाजांतून उतरले. शहर मारिलें. एक दिवस शहर लुटून फन्ना केलें. जैसी सुरत मारून मालमत्ता आणिली त्याप्रमाणें बसनूरची मत्ता अगणित माल जड जवाहीर कापड जिन्नस घेऊन आपले देशास आले. मत्ता सर्व पाहतां दोन कोटी होनांची आणिली[६८].

त्या उपरि कारंजे मोंगलाईंत मोठें शहर होतें तेथून पालती आणून खांसा राजियानीं लष्कर बरोबर घेऊन चालिले. जातां जातां औरंगाबादेची पेंठ मारिली. सात गांवची दौड करून जाऊन कारंजियाबरि तीन दिवस मुक्काम करून कुल शहरचे वाडे काबीज करून मत्ता खणती लावून काढली. नक्त जड जवाहीर, सोनें रुपें, उंच कापड असें घेऊन स्वारी करून चालिले[६९].

६८. हुबळी १६७३ सालीं लुटली. तेथें मुबलक दौलत सांपडली. हुबळीचें वर्तमान ऐकून बेदनूरकरानें शरण येऊन दरसाल करभार देण्याचें कबूल केलें. असें ग्रां० ड० ह्मणतात. तेव्हां ही समुद्राच्या बाजनें केलेली स्वारी "बार्सीलोर" याजवरील होय. बिदनूर आणि बसनूर अशीं दोन नांवें बखरींत दिलीं आहेत तीं भिन्न नगरांचीं कीं काय? बार्सीलोर कोठें आहे?

६९. कारंजें, करजें हें १६७० च्या दिसेंबरांत प्रतापरावानें लुटिलें. ह्या स्वारींत विशेष गोष्ट ही झाली कीं प्रतापरावानें सर्व खानदेशामध्यें प्रत्येक गांवचे पाटील कुळकर्ण्यांपासून सरकारी वसुलापैकीं चवथाई शिवाजीस देत जाऊं असे करार लिहून घेतले व त्यास आलेल्या चवथाईबद्दल पो-

मोंगलाचे सुभे जागां जागां दिलेलखान व बाहादुरखान, एखलासखान व बेलोलखान व इंद्रमणी असे उमराव जागां जागां कोणी दहा हजार कोणी बारा हजार असे चौतर्फा चालून आले. त्यांशीं युद्ध करीत भांडत चालिले. मोठें मोठें झुंज करून मोंगल मारून गर्दीस मेळवून हत्ती घोडे उंट मालमत्ता पाडाव करून आणिली. आणि कुल गनीमाचे वजीर माघारे नामोहरम होऊन गेले. राजे आपले फौजेनिशीं सुखरूप देशास आले. पाठीवर दिलेलखान बारा हजार स्वारांनिशीं दहा बारा गांवें अंतरानें भीमातीर पावेतों आला. मग राजे राजगडास [ गेले. ] मालमत्ता संख्या पाहतां सात कोडीचा आकार झाला.

पुढें रायँरीगड अदलशाही होता तो घेतला. राजा खासा जाऊन पाहतां गड बहुत चखोट. चौतर्फा गडाचे कडे तासिल्याप्रमाणें, दीड गांव उंच, पर्ज्यन्यकाळीं कडियावरि गवत उगवत नाहीं. आणि धोंडा तासींव एकच आहे. दौलताबाद हा पृथ्वीवर चखोट गड खरा, परंतु तो उंचीनें थोडका. दौलताबादाचे दशगुणी गड उंच. असें देखोन बहुत संतुष्ट झाले. आणि बोलिले तक्तास जागा गड हाच करावा. असें करारीं करून तेच गडीं घर, वाडे, माडिया, सदरा चौसोपे आणि अठरा कारखाँने यांस वेगळाले महाल, व राणियांस महाल, तैशीच सरकारकुनास वेगळीं घरें, व बाजार, पंच हजारियास वेगळीं घरें, व मातबर लोकांस घरें, व गजशाळा व अश्वशाळा व उष्टरखाने पालखिमहाल व वहिलीमँहाल, कोठी, थटीमहालें चुनेगची चिरेबंदी बांधिले. राजियास प्रथम स्त्री संभाजी राजियाची माता होती ती निवर्तली. त्याजवरि राजियानीं साहा स्त्रिया केल्या. त्यामध्यें मोहित्यांची कन्या सोइराबाई गरोदर होती. तीस पुत्र जाहला. तो पालथा उपजला., राजियास वर्तमान सांगितलें. राजे ह्मणूं लागले कीं, "दिल्लीची पातशाई पालथी घालील" असें बोलिले. गम जोतिषी ह्मणों लागले कीं "थोर राजा होईल. शिवाजी राजियाहून विशेष किर्ति होईल"

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.) चरया देऊन, दरवर्षी असें केल्यास लुटीचें भय तुह्मांस नाहीं इतकेंच नव्हे तर तुमचें आह्मी संरक्षण करीत जाऊं असेंही त्यांस सांगितलें.

७०. रायरीचें नांव पुढें 'रायगड' पडलें.

७१. हे कारखाने निरनिराळ्या ठिकाणीं निरनिराळे प्रकारें दिलेले आढळतात. एके ठिकाणीं ते असे दिले आहेत:— खजीना—जामदारखाना—जिराईतखाना—पीलखाना—फरासखाना—तासेखाना—शिकारखाना—दारूखाना—उष्टरखाना—अबदारखाना—मुदपाक-नगारखाना-खलबतखाना—सराफखाना—शिलेखाना—तोफखाना—तालीमखाना—बंदीखाना.

७२. वहिलीमहाल = रथशाला.

७३. थटीमहाल = गोशाला.

असें भविष्य केलें. मग राजियानीं राजाराम ह्मणोन नांव ठेविलें. आणि बोलिलें कीं, "राजाराम प्रजा सुखी राखील. आपणापेक्षां याचा पराक्रम होईल. नांवाची कीर्त बहुत होइल. आपलें नांव रक्षील तर एवढाच रक्षील." असें बोलिले आणि दान धर्म बहुत केला. पुढें मोरोपंत पेशवे यानीं त्रिंबकगडापासून सालेरी किल्या पावेतों किल्ले कित्येक घेतले. कितीएक नवे वसविले. असे चाळीस गड नवे कदीमँ[५] त्यांणीं घेतले. कोळवण काबीज केलें. रामनगर, जवाहीर हा देश घेतला. त्या देशांतही गड वसविले. अशी ख्यात केली.

हें वर्तमान दिल्लीस पातशहास सर्वही कळलें कीं, सुरत मारिली बसनूर मारिलें, बराणपूर औरंगाबाद मारिली. सालेरी आदीकरून सर्व किल्ले घेतले. खानदेश, बागलाण, गुजराथ, वऱ्हाड देश बांधीत चालिले." असें ऐकून बहुत कष्टी होऊन बोलिले कीं, काय इलाज करावा ? लाख लाख घोड्याचे सुभे रवाना केले ते बुडविले. नामोहरम होऊन आले. आतां कोण पाठवावें ? शहाजादे पाठवावे तरि तिकडेच फितवियांत मिळून दिल्लीच घेतील. याकरितां कोणी पाठवावयास दिसत नाहीं. या उपरि आपण खांसा कंवरबस्ती करून शिवाजीवर जावें तर शास्ताखानाचा न्याय जालियास काय करावें ? याकरितां शिवाजी जोंवर जिवंत तोंवर दिल्ली आपण सोडीत नाहीं " असा विचार केला, आणि इखलासखान ह्मणजे केवळ शूर व बेलोलखान यांस बोलावून आणून वीस हजार स्वारांनिशीं सालेरीस रवाना केलें. सालेरी घेऊन फस्त करणें. तसें दिलेलखान यांस दहा हजार स्वारानिशीं अहिवंत रवाना केलें. दिलेलखान येऊन रवळा-जवळयास लागले. गडकरी बरे भांडले. मोठें युद्ध झालें. गड हातास आला नाहीं. मोरोपंत पेशवे यानीं उपराळियास मावळे लोक बारा हजार रवाना केले. त्यांनीं जाऊन छापे घातले. ऐसा घाबरा केला. रामाजी पांगेरा ह्मणून हशमांचा हजारी [ त्यानें ] हजार लोकांनिशीं कणेरागड आहे त्या खालें दिलेलखानाशीं युद्ध केलें. हजार लोक थोडे देखून दिलेलखान यानें फौजेनिशीं चालून घेतलें. रामाजी पांगेरे यानीं आपले लोकांत निवड करून निदान करावयाचे आपले सोबती असतील ते उभे राहणें, म्हणून निवड करितां सातशें माणूस उभे राहिले. तितकियानीं निदान करून भांडण दिधलें. दिलेलखान याची फौज [ इनें ] पाय उतार होऊन चालून घेतलें. चौफेर,

---

[१] या पुत्राचा जन्म चैत्र शुद्ध ९ स झाला ह्मणून 'राजाराम' असें नांव ठेविलें.

[५], कदीम = जुने.

श्री

# नागपूरकर भोंसल्यांच्या संबंधाचे कागदपत्र.

१. नागपुरकर भोंसल्यांच्या दोन बखरी आह्मांस मिळाल्या आहेत. त्यांतील कांहीं मजकूर वाचकांस कांहींसा अपरिचित असेल व नागपुराकडील सरदार, कारभारी, मानकरी, मुत्सदी यांची आमच्या इकडलि वाचकांस फारशी माहिती नसेल असें समजून त्या बखरी तूर्त छापणें प्रशस्त दिसत नाहीं. परंतु भोंसलेशाईंतील अनेक गोष्टींची आधीं थोडीबहुत माहिती झाल्यास बखर समजण्यास सुलभ पडेल व वाचण्यास ही गोडी लागून उत्साह वाटेल अशी अटकळ आहे. तर अशी माहिती बखरीच्या अगोदर किरकोळ लेखांच्या द्वारें वाचकांस सादर करण्याचें योजिलें आहे.

२. आज आरंभलेल्या नवीन सदरा खालीं नागपुरकर भोंसल्याविषयींचे कागदपत्र, तहनामे, यादी, सवालजबाब, हिशेब, पत्रव्यवहार, सनदा इत्यादि अनेक लहान मोठ्या लेखांचा समावेश होईल. हे लेख आह्मांस एकाच ठिकाणीं मिळाले आहेत असें नाहीं. कांहीं लेखांच्या दोन दोन तीन तीन प्रती ही मिळाल्या आहेत. त्यामुळें कित्येक दुर्बोध लेखांचा अर्थनिर्णय करण्यास चांगलें सुलभ साधन झालें आहे. शिवाय गिचमिड लिहिलेले मोडी लिपींतील लेख वाचतांना अक्षरें उमगण्याची जी अडचण असते ती ही कांहीं अंशीं दूर होणार आहे. यांतील कित्येक लेख भोंसल्यांच्या पदरच्या कामदारांकडून व मानकऱ्यांकडून नागपुर येथील एका वजनदार गृहस्थानें मिळवून देण्याच्या कामीं आमच्या तेथील साहाय्यकर्त्यांस पुष्कळ मदत केली या कामगिरीबद्दल आम्ही आपल्या ह्या साहाय्यकर्त्या सन्मान्य गृहस्थाचे आभारी आहों.

३. हे लेख छापतांना कालानुक्रमाकडे लक्ष देणें प्रस्तुतच्या स्थितींत दुरापास्त आहे. याचें मुख्य कारण सर्व कागदपत्र यादी वगैरे आज आह्मांपाशीं नाहींत. तरी साधारण वाचकांस आणि विशेषतः इतिहास रचनाकारांस ह्या लेखसंग्रहाचा उपयोग व्हावा व ठिकठिकाणीं पूर्वापार ऐतिह्यांवर अनुसंधान ठेवून हवाला दाखल करण्याची सोय व्हावी म्हणून या प्रकरणास पृष्टांक आणि प्रत्येक लेखास अनुक्रमांक घालण्याची तजवीज केली आहे.

४. मूळ लेखांत कोठें ही फेरफार केला नाहीं. जेथें अर्थबोध मूळींच झाला नाहीं तेथें मुळांत जशीं अक्षरें होतीं तशींच प्रतींत अक्षरें लिहिण्याचा यत्न केला आहे. वाचकांच्या सोईकरितां क्वचित् स्थलीं विराम चिन्हें दिलीं आहेत. तसेंच पूर्वापार संदर्भ जुळण्याकरितां कोठें कोठें एकादा शब्द कौंसांत घातला आहे. याशिवाय कांहींएक कमज्यास्त केलें नसल्यामुळें हा लेखसमुदाय मूळ लेखाची 'असल बरहुकुम नकल' आहे असें ह्मणतां येईल.

## [१] "सेना साहेब सुभा" पद कोणा पुरुषापासून चाललें याचा तपशील.

१. शाहू महाराजांस सातान्यास दिल्लीहून बादशहानीं[१] रवाना केलें ते बऱ्हाणपुरचे मुक्कामीं दाखल झाले. ताराबाई[२] शाहू महाराजांची चुलती सातान्यास मालकी[३] करून होती. तेवेळेस परसोजी भोंसले याजला वर्तमान समजलें कीं शाहू महाराज सातान्यास येतात. तें समजून बऱ्हाणपुरचे मुक्कामीं भेट घेऊन त्यांजसमागमें सातान्यास आले. तेथें ताराबाईनीं बंड केलें होतें त्याचे पारिपत्याकरितां महाराजास साथ देऊन बंड परागंदाकरून स्वराज्यावर शाहू महाराज स्थापित झाले. ते वेळेस महाराज सरफराज[४] होऊन परसोजी भोंसले उपयोगीं[५] पडले सबब यांजला वऱ्हाड प्रांताचे "सेना साहेब सुभ्या"चें पद देऊन जरीपटका व साहेबनौबद[६] व शिक्केकटार वस्त्रें देऊन सन १११७ फसली शके १६३० चे सालीं रवाना केलें. त्यांनीं वऱ्हाड प्रांतीं येऊन त्या प्रांताचा बंदोबस्त ठेऊन स्वस्थान कायम करून दोन वर्षें राज्य केलें. त्यांचा काळ सन १११९ सालीं झाला.

२. बाद त्यांचे चिरंजीव कान्होजी भोंसले यांजला सन ११२० सालीं "सेनासाहेब सुभ्या"चें पद देऊन रवाना केलें. त्यांनीं १८ वर्षें राज्य केलें. त्यांस संतति नव्हति सबब त्यांचे धाकटे बंधू बिंबाजी भोंसले यांचे

---

१. अझीमशहा—औरंगजेबाचा मुलगा—यानें झुल्फिकारखान्याच्या सांगण्यावरून शाहूस इ० स० १७०८ त मुक्त केलें.

२. राजारामाची बायको.

३. ताराबाई. आपला मुलगा 'वेडा शिवाजी' याच्या नावानें राज्यकारभार चालवूं लागली.

४. मोठ्या कामगिरीबद्दल पदवृद्धि करण्याविषयीं उत्सुक, न्यहाल.

५. शाहूस तोतया ठरविण्याकरितां ताराबाईनें परसोजीचा भाऊ बापूजी भोसले यास धाडून दिलें. त्याची व शाहूची भेट गोदावरी-तीरीं झाली. तेव्हां शाहू खरा असल आहे, तोतया नव्हे अशी त्याची पूर्ण खात्री झाली. नंतर उभयतां भावांनीं शाहूच्या ताटांत सर्वां समक्ष भोजन केलें. या योगानें सर्वांचे संशय दूर झाले. अशा प्रकारें परसोजी शाहूच्या उपयोगीं पडला.

६. राजादिक सत्ताधारी पुरुषाच्या स्वारींत हत्तीवर ठेवलेला मोठा नगारा.

चिरंजीव रघोजीबाबा उर्फ बाबासाहेब यांजला आपले जवळ भाम[७] येथें ठेऊन पुत्रवत् मानिलें. नंतर कान्होजी भोंसले यांस पुत्र रायाजी भोंसले झाले. सबब रघोजी भोंसले ऊर्फ बाबासाहेब हे साताऱ्यास जाऊन शाहू महाराजापाशीं राहिले. महाराजाकडून फत्तेशिंग* भोंसले †कर्नाटकचे मोहिमेवर रवाना झाले त्यांसमागमें रघोजी भोंसले यजला दिलें. त्यांनीं कर्नाटकचे प्रांतीं जाऊन स्वपराक्रम व जवामर्दी करून प्रांत सर केला. नंतर साताऱ्यास आले. नंतर एक दिवस शाहू महाराज शिकारीस गेले. समागमें रघोजी बाबासाहेबही होते. महाराज जंगलांत पालखींतून उतरून उभे राहून शिकारीचा तमाशा पहात राहिले. तितकियांत एक वाघ मातब्बर बिडांतून निघून महाराजांचे सामूने आंगावर चालून आला. नजीक येऊन झेंप टाकावी तिताकियांत रघोजी भोंसले नजीक उभे होते त्यानीं जलदी करून तलवारीनें वाघ मारिला, व महाराजांस वांचविलें- याजवरून महाराजांनीं बहुतशी खातरतसरीफ ‡ करून आपले जवळ ठेविलें. इकडे कान्होजी भोंसले यांनीं वऱ्हाड प्रांतीं बदफैलीवर[९] जुलूम करून महाराजाशीं बेगी झाले. सबब त्यांचे पारिपत्यास रघोजी भोंसले ऊर्फ बाबासाहेब याहास मुकरर करून समागमें फौज देऊन वऱ्हाड प्रांतीं रवाना केलें. त्यांनीं कान्होजी भोंसले याजला कैदीज[१०] करून साताऱ्यास घेऊन आले.

३. त्याजवरून महाराज सरफराज होऊन रघोजी भोंसले यांजला सेना-

---

७. हा गांव वऱ्हाडांत यवतमाळ शहराच्या दक्षिणेस सुमारें ८।९ कोसांवर आहे. राजपदप्राप्ति होईल असा रघोजीस ह्या ठिकाणीं दृष्टांत झाला अशी आख्यायिका आहे. ह्या स्थलीं अनेक जंगी इमारती गडप झाल्याच्या खाणाखुणा क्वचित् दृष्टीस पडतात व फक्त बैरागी लोकांचा ५,००० उंबरटा होता असें सांगतात. याजवरून रघोजीच्या सैन्याची जमात येथें केवढी होती याची अटकळ करितां येईल.

८. साताऱ्यास जाण्यापूर्वी रघोजी 'देवगड' चा राजा चांद सुलतान याजकडे गेला. तेथें रघुनाथभट झिपरे पटवर्धन यांस रेशमी व लोंकरी मालाबद्दल सरकारी जकात न दिल्यावरून कैदेंत ठेविलें होतें. त्यास रघोजीनें बन्दमुक्त केलें. पटवर्धनानीं रघोजीची कोणती कामगिरी केली हें पुढें ओंलच आहे. देवगडाहून रघोजी एलिचपुरच्या सुभेदाराकडे गेला. तेथें कांहीं दिवस राहून साताऱ्यास चालता झाला.

* अक्कलकोटकर भोंसल्याचें आद्यपूर्वज

† ही कर्नाटकची स्वारी इ० स० १७४० च्या पूर्वीची असावी. पण तिजविषयीं ग्रां० ड० च्या इंग्रजी इतिहासांत उल्लेख नाहीं.

‡ पराक्रमानें संतुष्ट होऊन सन्मानार्थ पोषाक अलंकार इत्यादि देणें.

९. वांकडेपणा करणारा, दंगेखोर, बंडखोर.

१०. इ० स० १७३० त कान्होजीस रघोजीनें वऱ्हाडांतील वणी तालुक्यांतील मंदार नांवाच्या गांवीं पकडिलें. कान्होजी साताऱ्यास बंदीखान्यांत असतांच मरण पावला.

साहेब सुभ्याचीं वस्त्रें व जरीपटका व साहेबनौबद व शिक्केकटार व कोन्हेर* राम दिवाण व रखमाजी §गणेश चिटणवीस व पटवर्धन शिक्केनवीस[11] व बक्षी व फडणवीस वगैरे मुत्सद्दी आणि इतर सरदार मानकरी बरोबर देऊन सन ११३९ सालीं वऱ्हाड प्रांतीं रवाना केले. त्यानीं वऱ्हाड प्रांताचा बंदोबस्त करून गोंडवण व बंगाला व उडीसापर्यंत मुलूख काबीज करून अमल बसवून २१ वर्षें राज्य करून ११६१ सालीं फाल्गुन शुद्ध ३स त्यांचा अंतकाळ झाला.

४. नंतर त्यांचे वडील पुत्र जानोजी भोंसले- सन ११६२चे सालीं गादीनशीन[12] झालें. त्यांचा काळ सन ११८० चे सालीं वैशाख मासीं १९स झाला. त्यांजला संतति नव्हती. सबब त्यांचे धाकटे बंधु मुधोजी बावा भोंसले यांचे वडील पुत्र रघोजी भोंसले ऊर्फ बापू साहेब यांजला जानोजी बोवांनीं मृत्यु होण्याचे पूर्वींच दोन वर्षें वटींत घेतलें होतें. नंतर जानोजी बावाचा काळ ११८०चे सालीं झाला.

५. यावर सन ११८२चे सालीं रघोजी भोंसले यांला पुण्याहून वस्त्रें येऊन गादीनशीन[12] झाले. त्यानीं सन १२२५ साल पावेतों राज्य करून तेच सालीं फाल्गुन मासीं वद्य ९ रोजीं † शुक्रवारीं मृत्यु पावले. त्यानीं ४३ वर्षें राज्य केलें.

६. उपरांत रघोजी भोंसले ऊर्फ बाळा साहेब सन १२२५ सालीं वैशाख मासीं पुण्याहून वस्त्रें येऊन गादीनशीन झाले, त्यानीं ९ महिने राज्य करून त्यांचा ‡ काळ सन १२२६चे सालीं माघमासीं १५स तारीख १ फेब्रुवारी शनवार रोजीं पहाटेस ६ घटका रात्रीस झाला.

७. उपरांत मुधोजी भोंसले[13] ऊर्फ आपा साहेब यांनीं केवळ १ वर्ष राज्य करून कंपनी सरकाराशीं बिघाड करून परागंदा[14] झाले.

---

* ह्याची साग्रत हकिकित पुढील लेखांत पहावी.

§ हे कायस्थ परभू विद्यमान माधवराव गंगाधर चिटणीस यांच्या घराण्याचे मूळ पुरुष.

११. रघुनाथभट पटवर्धन यानीं आपल्या बायकांच्या हातांतील पाटल्या मोडून रघोजीसाठीं शिक्का करण्याकरितां पाटल्याचें सोनें दिलें ह्मणून पटवर्धन हेच शिक्केनवीस झाले. रघोजीचा शिक्का वर्तुलाकार असून त्यांत पुढील अक्षरें होतीं:—

"शाहुराज-पदांभोज-भ्रमरायित-चेतसः"
"बिम्बात्मजस्य मुद्रेय राघवस्य विराजते"

१२. सिंहासनारूढ.

† इ० स० १८१६ मार्च २२.

‡ परसोजीस मारण्याच्या कामीं रामचन्द्र वाघ व मनभट यांचें अंग होतें असा प्रिन्सेप् याचा लेख आहे.

१३. हा रघोजी भोंसले ऊर्फ बापूसाहेब याचा सहोदर बंधु व्यंकाजी ऊर्फ मन्याबापू याचा मुलगा, म्हणजे रघोजीच्या पुतण्या.

१४. सितावर्डीच्या टेंकडीवर आपासाहेबाची इंग्लिश लोकांशीं लढाई झाली.

( पुढें चालू. )

८. नंतर सन १२२८चे सालीं श्रावणमासीं रघोजी भोंसले ऊर्फ बापू साहेब यांची वडील कन्या बनूबाई व्यंकटराव गुजरास दिली होती त्यांचा पुत्र बाजीबा गुजर याजला श्रीमंत बांकाबाई[१६] साहेबांनीं दौलतीचे वारस समजून परसोजी भोंसल्याची ३ री स्त्री दुर्गाबाई यांचे ओटींत घेऊन रघोजी ‡‡ भोंसले नांव देऊन दत्तविधान केलें. कंपनी सरकारानीं दोस्तीची पासखातर येऊन गादीनशीन केलें. याचा बंदोबस्त पूर्वींप्रमाणें चालला. यानीं ३५ वर्षे राज्य करून सन १२६३ सालीं मार्गशीर्ष महिन्यांत शुद्ध ११स काळ झाला.

---

[ २ ] [ अनुकूल काल होतो तेव्हां बळ बुद्धि तेज यश देतो ।
प्रतिकूल तोचि होउनि माघारें दत्त सर्वही घेतो ॥ १ ॥
मोरोपंत—मौसलपर्व* ]

कैफीयत बापुजी जिवाजी कोल्हटकर, मुजूमदार, मुलोईम श्रीमंत महाराज राजश्री सेना साहेब सुभा बहादूर, सुरू सन १२६४ साल फसली.

१. आमचे मूळपुरुष तीर्थस्वरूप राजश्री रामाजी नारायण कोल्हटकर यांचे वतनदारीचा गांव पांडवगड प्रांत वाई येथील वतनदारी व राहणें घरदार वगैरे यांगांवीं, तेव्हां कोंकणांत नेवरें येथील देशमुखी याजकरितां,

---

( मागील पृष्ठावरून )
ही लढाई इ० स० १८१७ चे नोव्हेंबर महिन्याचे २६ वे तारिखेस तिसरे प्रहरानंतर सरू झाली व दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं समाप्त झाली.

१५. आपासाहेबास अलाहाबादेच्या किल्ल्यांत ठेवण्याकरितां नागपुराहून ता० २ मे रोजीं रवाना केलें. वाटेंत ता० १३ रोजीं जबलपुराजवळ रायचूर म्हणून एक खेडें आहे तेथून तो पळाला.

१६. ही दुसऱ्या रघोजीची तिसरी बायको. ही मोठी राजकारस्थानी होती. हिचा इंग्रज सरकारावर विश्वास आणि प्रेमभाव दृढ होता. ही १८५८ त मरण पावली.

१७. काशीबाई व अहिल्याबाई हीं दुसऱ्या दोघीजणींचीं नांवें.

‡‡ सन १८१८ चे जुनच्या २६ वे तारिखेस ' रघोजी ' नांव ठेवून राज्याभिषेक केला.

१८. इ० स० १८५३ चे डिसेंबरचे ११ तारिखेस.

* ही आर्या प्रस्तुत लेखास किती अनुरूप आहे हें मार्मिकजनांस सांगणें नको. ही मूळ लेखाच्या माथ्यावर नाहीं. परंतु तदन्तर्गत विषयाचे उत्तम बोधक म्हणून येथें दिली आहे.

१. हे गृहस्थ सुमारें १० वर्षांपूर्वी वारले. यांस तीन पुत्र, पैकीं एक हयात आहे. दोन ही उपाध्यांचे घरीं यांचे नातू दत्त दिले आहेत. यांचे घर वगैरे सर्व जळून आज या गृहस्थाचे वंशजांची हलाखी इतकी आहे कीं तिचें वर्णन करणें दुःखद आहे. एकंदरीनें या घराची उतरती कळा कशी शनैः शनैः येत गेली याचें वर्णन पुढील लेखावरून कळेलच.

२. सौम्यप्रकृति, सुगुणसंपन्न.

३. हा गांव रत्नागिरीपासून चार कोशांवर आहे.

साहेब सुभ्याचीं वस्त्रें व जरीपटका व साहेबनौबद व शिक्केकटार व कोन्हेर[*] राम दिवाण व रखमाजी [§]गणेश चिटणवीस व पटवर्धन शिक्केनवीस[११] व बक्षी व फडणवीस वगैरे मुत्सद्दी आणि इतर सरदार मानकरी बरोबर देऊन सन ११३९ सालीं वऱ्हाड प्रांतीं रवाना केले. त्यानीं वऱ्हाड प्रांताचा बंदोबस्त करून गोंडवण व बंगाला व उडीसापर्यंत मुलूख काबीज करून अमल बसवून २१ वर्षे राज्य करून ११६१ सालीं फाल्गुन शुद्ध ३स त्यांचा अंतकाळ झाला.

४. नंतर त्यांचे वडील पुत्र जानोजी भोंसले- सन ११६२चे सालीं गादीनशीन झाले. त्यांचा काळ सन ११८० चे सालीं वैशाख मासीं १९स झाला. त्यांजला संतति नव्हती. सबब त्यांचे धाकटे बंधु मुधोजी बावा भोंसले यांचे वडील पुत्र रघोजी भोंसले ऊर्फ बापू साहेब यांजला जानोजी बोवांनीं मृत्यु होण्याचे पूर्वींच दोन वर्षे वटींत घेतले होते. नंतर जानोजी बावाचा काळ ११८०चे सालीं झाला.

५. यावर सन ११८२चे सालीं रघोजी भोंसले याला पुण्याहून वस्त्रें येऊन गादीनशीन[१२] झाले. त्यानीं सन १२२५ साल पावेतों राज्य करून तेच सालीं फाल्गुन मासीं वद्य ९ रोजीं † शुक्रवारीं मृत्यु पावले. त्यानीं ४३ वर्षे राज्य केलें.

६. उपरांत रघोजी भोंसले ऊर्फ बाळा साहेब सन १२२५ सालीं वैशाख मासीं पुण्याहून वस्त्रें येऊन गादीनशीन झाले, त्यानीं ९ महिने राज्य करून त्यांचा ‡ काळ सन १२२६चे सालीं माघमासीं १५स तारीख १ फेब्रुवारी शनवार रोजीं पहाटेस ६ घटका रात्रीस झाला.

७. उपरांत मुधोजी भोंसले[१३] ऊर्फ आपा साहेब यांनीं केवळ १ वर्ष राज्य करून कंपनी सरकाराशीं[१४] बिघाड करून परागंदा झाले.

---

* ह्याची साग्रत हकिकत पुढील लेखांत पहावी.

§ हे कायस्थ प्रभू विद्यमान माधवराव गंगाधर चिटणीस यांच्या घराण्याचे मूळ पुरुष.

११. रघुनाथभट पटवर्धन यानीं आपल्या बायकोच्या हातांतील पाटल्या मोडून रघोजीसाठीं शिक्का करण्याकरितां पाटल्यांचें सोनें दिलें म्हणून पटवर्धन हेच शिक्केनवीस झाले. रघोजीचा शिक्का वर्तुलाकार असून त्यांत पुढील अक्षरें होतीं:—

"शाहुराज-पदांभोज-भ्रमरायित-चेतसः"
"बिम्बात्मजस्य मुद्रेयं राघवस्य विराजते"

१२. सिंहासनारूढ.

† इ० स० १८१६ मार्च २२.

‡ परसोजीस मारण्याच्या कामीं रामचन्द्र वाघ व मनभट यांचें अंग होतें असा प्रिन्सेप् याचा लेख आहे.

१३. हा रघोजी भोंसले ऊर्फ बापूसाहेब याचा सहोदर बंधु व्यंकाजी ऊर्फ मन्याबापू याचा मुलगा, म्हणजे रघोजीच्या पुतण्या.

१४. सिताबर्डीच्या टेंकडीवर आपासाहेबाची इंग्लिश लोकांशीं लढाई झाली.

( पुढें चालू. )

८. नंतर सन १२२८चे सालीं श्रावणमासीं रघोजी भोंसले ऊर्फ बापूसाहेब यांची वडील कन्या बनूबाई व्यंकटराव गुजरास दिली होती त्यांचा पुत्र बाजीबा गुजर याजला श्रीमंत बांकाबाई[16] साहेबांनीं दौलतीचे वारस समजून परसोजी भोंसल्याची ३ री स्त्री दुर्गाबाई यांचे ओटींत घेऊन रघोजी ‡ ‡ भोंसले नांव देऊन दत्तविधान केलें. कंपनी सरकारानीं दोस्तीची पासखातर येऊन गादीनशीन केलें. याचा बंदोबस्त पूर्वीप्रमाणें चालला. यानीं ३५ वर्षें राज्य करून सन १२६३ सालीं मार्गशीर्ष महिन्यांत शुद्ध ११स काळ झाला.

——०००——

[ २ ] [ अनुकूल काल होतो तेव्हां बळ बुद्धि तेज यश देतो ।
प्रतिकूल तोचि होउनि माघारें दत्त सर्वही घेतो ॥ १ ॥
मोरोपंत—मौसलपर्व* ]

कैफीयत बापुंजी जिवाजी कोल्हटकर, मुजूमदार, मुलांईम श्रीमंत महाराज राजश्री सेना साहेब सुभा बहादूर, सुरु सन १२६४ साल फसली.

१. आमचे मूळपुरुष तीर्थस्वरूप राजश्री रामाजी नारायण कोल्हटकर यांचे वतनदारीचा गांव पांडवगड प्रांत वाई येथील वतनदारी व राहणें घरदार वगैरे यांगांवीं, तेव्हां कोंकणांत नेवरें[3] येथील देशमुखी याजकरितां,

(मागील पृष्ठावरून)
ही लढाई इ० स० १८१७ चे नोव्हेंबर महिन्याचे २६ वे तारिखेस तिसरे प्रहरानंतर सुरू झाली व दुसऱ्या दिवशीं दोन प्रहरीं समाप्त झाली.

१५. आपासाहेबास अलाहाबादेच्या किल्ल्यांत ठेवण्याकरितां नागपुराहून ता० २ मे रोजीं रवाना केलें. वाटेंत ता० १३ रोजीं जबलपुराजवळ रायचूर म्हणून एक खेडें आहे तेथून तो पळाला.

१६. ही दुसऱ्या रघोजीची तिसरी बायको. ही मोठी राजकारस्थानी होती. हिचा इंग्रज सरकारावर विश्वास आणि प्रेमभाव दृढ होता. ही १८५८ त मरण पावली.

१७. काशीबाई व अहिल्याबाई हीं दुसऱ्या दोघीजणींचीं नांवें.

‡ ‡ सन १८१८ चे जुनच्या २६ वे तारिखेस 'रघोजी' नांव ठेवून राज्याभिषेक केला.

१८. इ० स० १८५३ चे डिसेंबरचे ११ तारिखेस.

* ही आर्या प्रस्तुत लेखास किती अनुरूप आहे हें मार्मिकजनांस सांगणें नको. ही मूळ लेखाच्या माथ्यावर नाहीं. परंतु तदन्तर्गत विषयाचे उत्तम बोधक म्हणून येथें दिली आहे.

१. हे गृहस्थ सुमारें १० वर्षांपूर्वी वारले. यांस तीन पुत्र, पैकीं एक हयात आहे. दोन ही उपाध्यांचे घरीं यांचे नातू दत्त दिले आहेत. यांचे घर वगैरे सर्व जळून आज या गृहस्थाचे वंशजांची हलाखी इतकी आहे कीं तिचें वर्णन करणें दुःखद आहे. एकंदरीनें या घराची उतरती कळा कशी शनैः शनैः येत गेली याचें वर्णन पुढील लेखावरून कळेलच.

२ सौम्यप्रकृति, सुगुणसंपन्न.

३. हा गांव रत्नागिरीपासून चार कोशांवर आहे.

वडिलांचे जाणें हरहमेष मौजे नेवरे येथें. मार्गीं कोंकण प्रांतीं कोयना नदीचे तीरीं भैरवगडाचे खालीं भोंसले राजश्रीचे बापूजी वडिल बंधु व मधले परसोजी व कनिष्ट साबाजी भोंसले त्रिवर्ग बंधु व मुल माणसें खटल्यासमवेत वस्तीस राहत होतेत. त्या गांवीं मुक्काम होण्यामुळें भोंसल्यांनीं आपले घरीं ठेऊन घेऊन शिधासरंजाम वगैरेची सरभेराई करावी. या अन्वयें दिवसोंदिवस स्नेह विशेष झाला. असें असतां, हाफसीयानें भोंसल्यावर दगा करून खटला सर्व लुटून कुटुंबासमवेत आपले कैदींत ठेवलें. हें वर्तमान रामाजीपंतास समजल्यावरून हाफसीयाजकडेस जाऊन सवाल जातीनिशीं केला. जबाव दिल्हा जे भोंसले याजबाबत तीन हजार रुपये जो कोणी देईल त्याचे सुपुर्द*करण्यांत येईल. हें ऐकोन आपले गांवीं येऊन जिंदगी आपली विकून तीन हजार रुपयांची भरती करून हाफसी यांजला देऊन भोंसले यांजला सोडून पांडववाडीस आणून पाहाडा खालीं घर तयार करून देऊन जिंदगी कालानुरूप जमऊन देऊन ठेविलें. आपले वतनाचे विभागांतून खर्चाची मदत करावी. याजमुळें स्नेह अधिकोत्तर जाला. तेव्हां भोंसल्यांनीं आपली उपाधिक वगैरे आमचे वडिलांस दिल्ही. नंतर बापूजी भोंसले यांचे चिरंजीव राजश्री बिंबाजभोंसले यांचे स्त्रियेचे पोटांत दोन वर्षांचे सल होतें. याजमुळें फार चिंतेंत होते. पंत मजकूर याजला उपासना श्री रघुवीर स्वामीची व साक्षात्कार; हें बिंबाजी बाबास समजल्यावरून निष्टा पंताजवळ जडून अनुग्रह आपण स्त्रियेसमवेत घेतला. रामाजीपंतानीं आपले येथील श्रीरामचंद्रस्वामीची धातुमूर्ति बिंबाजी बाबास पूजे करितां दिली. तीच मूर्ति हा काळपर्यंत सरकारांत देवघरांत आहे. बिंबाजी बाबाचे स्त्रियेस नित्य तीर्थ देत असावें व पंतानीं श्रीरघुवीर स्वामीस करुणायुक्त प्रार्थना केली, जे बिंबाजी बाबास पुत्र जाल्यास नामाभिधान स्वामीचेंच ठेऊं; ऐसा नवस केला. तो श्रीरामाचे कृपेकडून सन १६०७ चे सालीं बिंबाजी बाबास पुत्रच झाला. नवसाप्रमाणें नांव रघूजी भोंसले ठेविलें. कलम अव्वल.

१. श्री छत्रपति संभाजी महाराज यांजला बादशहांनीं फौज पाठवून

---

४. तरतूद, सामग्री पोचवणें

५. जंजिरेकर मुसलमान सरदार याकुदखान, याचा मूळ प्रांत आबिसिनिया; याच्या प्रांतास 'हपसाण' ह्मणतात.

* स्वाधीन करणें, कबज्यांत देणें.

६ रामाजीपंत कोल्हटकर.

७. गुरुमतादिक उपदेश.

८. पुरुषांपेक्षां स्त्रिया उपदेश घेणाऱ्या ज्यास्त आढळतात.

९. इ० स० १६८८ मध्यें संगमेश्वराजवळ संभाजीस, औरंगजेबाचा सरदार तकरीबखान यानें पकडिलें.

कबजी करून धरून नेऊन समक्ष हजर झाले. ते पातशहानीं यांचे खुबसुरतीस[१०] पाहून द्रवित होऊन आमचा " खाना खा " असें बोलण्यांत आणिलें. उत्तर केलें कीं आपली कन्या मजला प्राप्त जाली असतां आज्ञेनुरूप हजरच आहों. या सख्त जबाबावरून मर्जी फार खप्पा होऊन प्रांणांत[११] केला. हें वर्तमान पातशहाजादीस[१२] समजल्यावरून लग्न आपलें केलें नाहीं. शोध करून महाराजाचे चिरंजीव शाहू याजला बहुत दिवस आपले अटकेंत ठेविलें. ते प्रसंगीं समागमें राजश्री विठ्ठल कान्हो ठोसर बाकुनवीस[१३] कुटुंबासुद्धां होते. याजला कन्या जाली तिजवर प्रीति शाहू महाराजाची पुत्रवत्प्रमाणें. ऐसें असतां कांहीं एक दिवसांनंतर पादशहाची मर्जी खुष होऊन सरदेशमुखी चवथाई बाबती व खिलात वगैरे देणगी देऊन शाहू महाराज यांजला आपले नातू असें ह्मणोन साताऱ्यास रवाना केले. तों साताऱ्या नजीक स्वारी येण्याची आवाई श्रवण होतांच रामाजीपंत यांणीं भोंसले यांजला समागमें घेऊन व चिरंजीव कोन्हेर राम यांजला समागमें घेऊन चलकुंचांतच[१४] महाराजाच्या भेटी झाल्या. कोन्हेर राम यांचे वय लहान फार खुबसुरत व चालाखी पाहून त्याच मुक्कामीं विठ्ठल कान्हो ठोसर यांची कन्या देऊन विवाह केला. महाराजांनीं आपले जांवई असे ह्मणून नंतर कोन्हेर राम हरहमेष साताऱ्यास जात ते वेळेस [ त्यांनीं ] समागमें रघोजी भोंसले यांजला नेत असावें. बाबासाहेब अवतारी पुण्य पुरुष, याजमुळें कोन्हेर राम यांचे मनांत ध्यास हाच कीं, बाबासाहेबांस पद मोठें मिळावें ; याजकरितां महाराजाचे कारपरदार[१५] मोठमोठीं माणसें चिटणवीस[१६] वगैरे यांचा स्नेह, बाबासाहेबांशीं करून सर्वांचे मनांत वागले कीं, बाबासाहेबांस छत्रपति महाराजाकडून मोठे पदाचें काम देववावें. दुसरें, महाराजास कोन्हेर राम यांनीं विनंति केली जे रघुजी भोंसले हे आपले मेहुणीचे[१७] चिरंजीव होत. हें समजविण्यावरून महारा-

---

१०. लावण्य, सौंदर्य.

११. संभाजीस तुळापूर येथें फाल्गुन वद्य अमावास्या शके १६११ रोजीं ठार मारिलें.

१२. बादशहाची कन्या. ही बापास ह्मणाली " तुमचे देखत या मुलाचे बापानें माझें नांव घेतलें, तेव्हां हा पुत्र माझा आहे. याजवर आपण कृपा करित असावी व मुलास जननीयांत येण्याची परवानगी द्यावी " ना० भों० बखर.

१३. श्रीमंत लोकांकडे आचारी, पाणके, कामाठी वगैरे यांजवर जो मुख्य कामगार असतो तो. सर्व जेवण खाणाची तजवीज याचे मार्फत व्हावयाची. अशाच कामगारास इंग्रजींत ' Steward ' म्हणतात.

१४. कूच करीत असतां मार्गांत.

१५. कारभारी मंडळ.

१६. खंडेराव बल्लाळ चिटणवीस.

१७. ही चूक दिसते. शाहुची मेहुणी रघोजीस दिली होती.

जही कृपावलोकनें करून बाबासाहेबाकडे पाहत होते. परसोजी भोंसले यांचे चिरंजीव कान्होजी भोंसले यांजला 'सेनासाहेब सुभ्या'चीं वस्त्रें देऊन वऱ्हाड प्रांतीं रवाना पेशजी कांहीं एक दिवस केले होते. तेव्हां ते वऱ्हाडप्रांतीं राहून होते. तों त्याचे कारभाराची महाराजाचे मनांत विकृति होऊन बोलले, जे कान्होजी भोंसले यांजकडून सेनासाहेबी काढावी. त्यास धरून आणावें; या कामीं कोणाचीं योजना करावी. तों चिटनवीस याजला अगत्य वाद फार. यांनीं विनंति केली कीं, या कामीं सेनासाहेबीचीं वस्त्र रघोजी भोंसले यांजला देऊन रवाना केल्यास बंदोबस्त नीट राहील. उत्तर झालें जे कान्होजी भोंसल्याचे [पुतणे.] चुलते पुतणे एक झाल्यास कैसें होईल ? तर राजेश्री कोन्हेर राम हे जामनी देतील तर रवाना करावें; याजवरून कोन्हेर राम हे यांनीं आपली जामनी देऊन विनंति केलीजे याजला राहण्याकरितां याचे खटल्याजोगी जागा एखादी स्वामीनें देवबावी. या विनंतीवरून देऊर[१८] हा गांव मोकासा वंशपरंपरा बाबासाहेबांस करून देऊन सेनासाहेबीचीं वस्त्रें देऊन कोन्हेर राम आमचे पणजे समागमें रवाना केले. तेसमयीं महाराजानीं कोन्हेर राम याला लग्न प्रसंगीचें आंदण देणें राहिलें तें आंदण मुजुमूचें[१९] सेनासाहेब सुभे यास आज्ञा केली कीं, तुह्मी आपले सेनासाहेबीचे मुलुकांतील मुजमूचा दरख देत जाणें. मुजमूचे कोन्हेर राम जांवई सबब आम्ही आंदण दिली. बाबासाहेबांनीं विनंति केली कीं, आज्ञेप्रमाणें घडून येईल. कधींही अंतर नाहीं. ऐसें होऊन बाबासाहेब व कोन्हेर राम वऱ्हाडांत येऊन कान्होजी भोंसले याजला बगी जवळ धरून कैद करून पुन्हा साताऱ्यास जाऊन महाराजाजवळ कान्होजी भोंसले दाखल केले. कलम दुय्यम.

१. कान्होजी भोंसले साताऱ्यांत दाखल झाल्याबाद श्रीमंत राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा याजला बंगाला व झाडी वगैरे सर करण्याकरितां अज्ञा झाली व हमराइत सदरची भलीं माणसें विश्वासुक दिले. बितपशील:—

कोन्हेर राम आमचे पणजे यांजला दिवाणगिरीचें काम देऊन दरोबस्त

---

१८. हा गांव साताऱ्यापासून ६ कोसांवर आहे. सन १८६२ चे जून महिन्यांत गव्हरनर जनरल साहेबानें आपल्या सहीचें विद्यमान श्रीमंत जानोजी महाराज भोंसले यास एक इनामपत्र दिलें, त्यांत "राजाबहादूर आफ् देऊर" हा किताब दिला.

१९ मजमूदारी. मजमूदाराचें काम; दप्तरचे हुकूम वगैरे लिहिणें व जमाखर्चाच्या हिशोबांवर "मर्तूबमूद" हीं निशाणी लिहिणें हें होतें. यास 'पंत अमात्य' म्हणत.

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
|---|---|---|---|---|
| २४३ | ४४ | १ | हे खेचरी | हे अनिवार खेचरी |
| २४४ | ५९ | २ | विचित्र | विविध |
| | | | **अध्याय २३.** | |
| २४५ | ३ | ४ | दुश्चित | दुःखातें |
| २४५ | ५ | २ | घेऊनी मृग पळाला वेगीं | म्हणोनी पातलों लगबगी |
| २४५ | ९ | २ | हरिलीं | देखत हरिलीं |
| २४६ | १३ | १ | येरू दक्षिणेकडे वृक्षीं । | तंव दक्षिणाविप दिसे वृक्षीं |
| २४६ | १४ | १ | कर्दळी वृक्षाचा | कदंब द्रुमाचा |
| २४६ | १६ | ४ | सुवासा | सुस्वरें |
| २४६ | १७ | १ | हर्षो | पांडवें |
| २४६ | १९ | २ | जल अगाध | तें कबंध |
| २४६ | २० | ३ | तळीं विशाळ | तळीं महा विशाळ |
| २४६ | २१ | १ | नकुलातें | सहदेवातें |
| २४६ | २१ | २ | सहदेवातें | नकुलातें |

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
|---|---|---|---|---|
| २४६ | २२ | १ | जल-प्राशन | तृषाहरण |
| २४६ | टीप * | २ | आतां | तत्वतां |
| २४६ | टीप * | ३ | नकुल | सहदेव |
| २४७ | २६ | १ | दानवांतें | मानवांतें |
| २४७ | ३० | १ | पार्थे सोडूनी | पार्थे वारितां सोडूनी |
| २४७ | ३२ | ४ | कपाळ हातें | करें लल्लाट |
| २४७ | ३४ | ४ | ग्राशिलें | मारिलें |
| २४७ | ४० | ३ | देव | धर्म |
| २४८ | ४२ | ३ | लाहिजे | पाविजे |
| २४८ | ५१ | ३ | म्हणसी | म्हणिजे |
| २४८ | ५२ | ४ | हीन | मनुष्य |
| २४९ | ५९ | ३ | मान्य पंडित | जीं बहुत |
| २४९ | ६१ | ३ | भूतां | भृत्यां |
| २४९ | ६२ | ४ | तुझेनी वचनें | तूं सेवीं जीवन |
| २४९ | ६३ | १ | कृपण | कृत्रिम |
| २४९ | ६३ | ३ | लोभाचे नि लाभें | भोगाचे नि लोभें |

| पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. | पृष्ठ | ओवी | चरण | मूळपाठ | पाठांतर. |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २४९ | ६४ | ३ | बलिष्ठ | हळुवट | २५२ | ११५ | २ | आतां | तत्वतां |
| २४९ | ६५ | (पूर्वार्ध)………… | | कवण पूजनीं पावे थोरी | २५३ | ११५ | ४ | सुबुद्धी | सुशब्दी |
| | | | | कवण देव श्रेष्ठाधिकारी | २५३ | ११९ | ३ | होत वावो | पाहा हो |
| २४९ | ६९ | ४ | वाहे | वाढे | २५३ | ११९ | ४ | संग्रह पापाचे | संग्रह नासे पापाचा |

**समाप्त.**

# छापून प्रसिद्ध झालेल्या ओव्यांहून अधिक ओव्या मिळाल्या त्या.

## अध्याय १ ला.

| पृष्ठ | ज्या दोन ओव्यांचे मध्यें ओवी असावयाची त्यांचे अंक. | अधिक ओव्या. |
|---|---|---|
| ११ | ६६— ६७ | भोजनीं तोषवी ब्राम्हण ।<br>नित्य नित्य पुराण—श्रवण ॥<br>सकळां सहित कुरु—नंदन ।<br>काम्यक—वना पातला ॥ १ ॥ |
| १६ | ११३— ११४ | दुरी यादव पांचाल ।<br>आला नाहीं जंव गोपाळ ॥<br>पांडव आहेत जंव निर्बळ ।<br>तंव मारूनी सांडावे ॥ १ ॥ |
| २० | १६१ च्या पुढें | इति आरण्य पर्व भारत ।<br>लीला—विश्वं भरानुगृहीत ॥<br>मुक्तेश्वराचा वचनार्थ ।<br>पवित्र—प्राय परिसोत ॥ १ ॥ |

## अध्याय २ रा.

| पृष्ठ | ओवी संख्या. | अधिक ओव्या. |
|---|---|---|
| २५ | ५८— ५९ | धर्म निरूपणाचे शब्द ।<br>अनाचारिया हृदय-भेद ।<br>तेंवी भीम—प्रहारें खेद ।<br>असुर पावे आगळा ॥ १ ॥ |
| २७ | ८९चे पुढें | इति आरण्य पर्व भारत ।<br>मुक्तेश्वर—कवि—विरचित ॥<br>श्रोतीं देऊनी चित्त ।<br>परिशिलें पाहिजे ॥ १ ॥ |

## अध्याय ३ रा.

| पृष्ठ | ओवी संख्या. | अधिक ओव्या. |
|---|---|---|
| २९ | १७— १८ | हें देखूनी वेगवान । |

| पृष्ठ | ओवी संख्या | अधिक ओव्या. |
|---|---|---|
| | | सौभ–सेना अति दारुण ॥<br>वावुनिया धनुष्य बाण ।<br>सांबा उजू लोटले ॥ १ ॥ |
| २९ | २२— २३ | वांकुडी घालिजे महा घनीं ।<br>तैंवी वर्षाव बाणीं ।<br>मांडिला देखोनी द्वारका–जनीं ।<br>महा कल्पांत मानिला ॥ १ ॥ |
| ३४ | ७२— ७३ | सांगे उग्रसेनाचीं वचनें ।<br>शाल्वें घालूनीं घालणें ॥<br>वसुदेव घेतला प्राणें ।<br>सर्व यादवां देखतां ॥ १ ॥ |

**अध्याय ४ था.**

| पृष्ठ | ओवी संख्या | अधिक ओव्या. |
|---|---|---|
| ३७ | १३–– १४ | सत्य चि एक महाबळ ।<br>ऐसा ज्याचा निश्चयो अचळ ॥<br>ते पावती कैवल्य–फळ ।<br>पृथ्वी–तळ तें किती ॥ १ ॥ |
| ३८ | २०–– २१ | ब्राम्हणांचें आशीर्वचन ।<br>तें क्षत्रियां शस्त्र जाण ॥<br>ब्राम्हण–कृपेचें अंग–त्राण ।<br>वज्र कवच अक्षयी ॥ १ ॥ |
| ४० | ४५— ४६ | क्रूराशी सेविती सेवक ।<br>क्रूराशी भीति प्रजा लोक ॥<br>क्रूरास्तव महा धाक ।<br>शत्रु वाहाती सर्वदा ॥ १ ॥ |
| ४२ | ७०–– ७१ | हा चि जपतां सर्व काळ ।<br>इच्छिलें तें पावशी फळ ॥<br>ऐसें बोलोनी दीन दयाळ ।<br>अदृश्य झाला ते ठायीं ॥ १ ॥ |
| ४५ | १०८–– १०९ | धनुष्य–बाण सज्जुनी मुष्टी ।<br>किरात लागला दिसे पाठी<br>वराह येउनी पार्थी निकटी ।<br>रक्षीं रक्षीं म्हणतसे ॥ १ ॥ |

| पृष्ठ | ओवी संख्या | अधिक ओव्या. |
|---|---|---|
| ४७ | १३०—१३१ | लीले कारिशी विश्व—जनन ।<br>कृपा—दृष्टी प्रति—पालन ॥<br>प्रलयीं करूनी सर्व दहन ।<br>शेष उरसी तूं एक ॥ १ ॥ |
| ४८ | १३९—१४० | अस्त्र तुझें अत्यद्भुत ।<br>ज्यातें म्हणती पाशुपत ॥<br>तें मज देऊनी सनाथ ।<br>स्वामीनें केलें पाहिजे ॥ १ ॥ |
| | | **अध्याय ५ वा.** |
| ४९ | २५—२६ | जे धर्म वंचिती धनी ।<br>जे कृपण युद्धीं प्राण—दानीं<br>अतिथी दवडिले भोजनीं ।<br>ते तये स्थानीं वाळिले ॥ १ ॥ |
| | | **अध्याय १७ वा.** |
| १८९ | ९१—९२ | कर्ण शकुनी दुःशासन ।<br>सकळ जळसंद विकर्ण ॥<br>रथारूढ अवघे जण ।<br>युद्ध—कंदना मिसळले |
| | | **अध्याय १९ वा.** |
| २१० | ८६चे पुढें | इति भारत वनपर्वणि ।<br>सकळ तीर्थांचिया श्रेणी ।<br>जोडती इये ग्रंथ—श्रवणीं ।<br>मुक्तेश्वर कवि वदे ॥८७॥ |
| | | **अध्याय २०.** |
| २१३ | ३१—३२ | यावरी बोले बिभीषण ।<br>स्वामी जालेती प्रसन्न ।<br>तरी जो वर मागेन ।<br>तो दीधला पाहिजे ॥१॥ |
| २१४ | ४७—४८ | तिहीं लोकांच्या सुंदरी ।<br>हिरोनी आणिल्या बळात्कारीं ।<br>दासी सूदल्या सहस्र घरीं । |

| पृष्ठ | ओवी संख्या | अधिक ओव्या. |
|---|---|---|
| | | जाति पद्मिनी भोगावया ॥१॥ |
| | | **अध्याय २२.** |
| २४० | ४–५ | वक्ता वदे स्नेह–मेळी । |
| | | ब्राम्हण–वेष धरूनी हेली ॥ |
| | | उतरला असे भूमंडळीं । |
| | | हितोपदेशा कारणें ॥१॥ |

**समाप्त.**

# उपसंहार.

ईश–कृपेनें आज दोन वर्षांत मुक्तेश्वरकृत वनपर्व आमचे हातून समग्र मुद्रित झालें. आरंभीं आमचे जवळ एकच पोथी होती. परंतु चार पांच अध्याय छापण्याकरितां तयार झाल्यावर आणखी तीन मिळाल्या. पैकीं दोहोंत मात्र हरिश्चंद्राख्यान आहे. बाकीच्यांत अठराच अध्याय आढळतात. मुक्तश्वरानें हरिश्चंद्राख्यान प्रथम निराळें रचून नंतर तें आपणच वनपर्वांत सामील केलें असावें असें वाटतें. पहिल्या अध्याया खेरीज इतर कोणत्याही अध्यायाचे आरंभीं गणपति–स्तवन नसून फक्त तें साहवे अध्यायाचे मात्र आरंभीं आढळतें ही गोष्ट, वरील मतास पुष्टि आणिते. मूळ भारतांत ही हरिश्चंद्राख्यान नाहीं. सदर्हू प्रकरण (हरिश्चंद्राख्यान) मार्कंडेय पुराणांत आलीकडे आमचे आढळण्यांत आलें आहे. मुक्तेश्वरी हरिश्चंद्राख्यान व मार्कंडेय पुराणांतर्गत हरिश्चंद्राख्यान ह्यांत बरीच तफावत दृष्टीस पडते. मोरोपंतांनीं मात्र मार्कंडेय पुराणाप्रमाणें सर्व कथा दिली आहे. पंतांनीं सदर्हू पुराणांतील सप्तशति व मदालसाख्यान हीं दोन प्रकरणेंही आर्या-बद्ध रचिलीं आहेत. आतां मुक्तेश्वराविषयीं एक आख्यायिका सांगून लेखणी ठेवतों.

ग्रंथारंभीं एकनाथाची कन्या लीलाबाई हा विश्वंभरबावा यांस दिली होती असें सांगण्यांत आलेंच आहे. हे विश्वंभरबावा वारांगनानुरक्त असल्यामुळें ह्यांचा पाय घरीं ठरत नसे. त्यामुळें लीला बाईस संसारसुख मिळेनासें झालें. तेव्हां तिनें आपली स्थिति दीन मुद्रेनें पित्यास विदित केली. त्यावरून त्यांहीं जामाताकरवीं आपणास भोजनास बोलावण्याची योजना करण्यास सांगितलें. तदनुरूप विश्वंभरबावांनीं पत्नीचे सांगण्यावरून एकनाथ स्वामीस भोजनास बलाविलें. भोजन समयीं स्त्रीस तरणोपाय कोणता असें नाथांनीं विच्यारल्या वरून विश्वंभर बुवांनीं ‘ पती ’ असें उत्तर दिलें. तदनतर “ तुम्हीं प्रत्यहीं रात्रौ भोजनोत्तर भगवद्गीतेचा एक अध्याय अपले पत्नीस सार्थ वाचून ऐकवावा व मग आपले इच्छेनुरूप नेहमी प्रमाणें वर्तावें ” असें नाथांनीं जामातांस सांगून ती गोष्ट त्यांजकडून कबूल करून घेतली. त्या प्रमाणें प्रथम दिवशीं प्रथमाध्याय सार्थ वाचून बुवा बाहेर गेले. दुसरे दिवशीं

" अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे " या स्थळीं येऊन ठेपल्यावर विषयाचा विचार करितां करितां रात्र निघून गेली. या प्रमाणें गीता पत्नीस ऐकविण्याचा नियम केल्यामुळें विश्वंभरबुवांचा बाहेर जाण्याचा नाद सुटला. नंतर यथाकाळीं मुक्तेश्वराचा जन्म झाला. पुढें सात आठ वर्षांचा पुत्र झाला तरी तोंडांतून शद्ब काढीना, म्हणून लीलाबाई पित्याजवळ जाऊन करुणा भाकीत बसली. तेव्हां नाथांनीं दौहित्रास विचारिलें " मुला, तूं बोलत कां नाहींस? " तेव्हां मुलानें उत्तर दिलें कीं आपण 'मला बोण्यास कांहीं शिल्लक ठेविलें नाहीं.' त्यावर नाथ म्हणाले " बाबा ! मी अजून भारतास हात लाविला नाहीं. तें तूं कर." अशी आज्ञा झाल्यावर सर्व भारत रचिलें. त्याचीं चवदा पर्वें नष्ट झाल्याची कथा मागें ग्रंथारंभीं दिली आहे. तथापि कांहीं पर्वें तरी अजून उपलब्ध व्हावीं असें आम्हांस वाटतें. ह्यास्तव सर्व शोधक पुरुषांनीं हें काम हातीं घ्यावें अशी त्यांस आमची सविनय प्रार्थना आहे.

---

देती ऐश्वर्य भारी भुवनमहित मी या पदें केटभारी ।
हे माझी कीर्ति सारी द्विजपदयुगळीं सर्व संताप सारी ॥ ३६ ॥
भवत्पादाब्जांचे दृढ वसति चित्तीं भरंवसे ।
वळें या घेऊनी अहिपति शिरीं भूभर वसे ॥
भवत्पादार्चेनें सकळ सुरवृंदा महित मीं ।
असे तापार्तांचा विधु तरणि उद्दाम हि तमी ॥ ३७ ॥
भवद्द्वंदापाशीं मम मन वसे वेंचित रती ।
भवाब्धीतें सारे द्विजचरणसेवें चि तरती ॥
तुह्मीं स्वस्वाधीन क्षितिसुर तपस्वी जग वितां ।
लया नेतां कांहीं समय कुतुकानें जगवितां ॥ ३८ ॥
तुम्हीं त्रैलोक्याचे अभयसुखदेते वसवितें ।
अविद्याध्वांताचे समुदित धरादेव सवितें ॥
भवन्माहात्म्याला अवधिच नसे शोधक-मतें ।
असें जाणायाला पदनमन हें बोधक मतें ॥ ३९ ॥
ब्रह्मण्य देव हरि यापरि गोड बोले । प्रेमें करूनि धृतसात्विकभाव डोले ॥
हातें हळू चि रगडी पद देव दोनी । विप्रासि दुर्लभ असें सुख दे वदोनी ४०
करि करें मग साधु सभाजनें । स्तविति ज्या प्रति साधुसभाजन ॥
करुनियां चरितें हरि तो मलों । बहु मला गमतो हरि तो भला ॥ ४१ ॥
केलें ब्रह्मण्य देवें अतुळ कुतुक हें तारक श्रेष्ठ आजी ।
आजा भूतो पदातें वर मुदितमनें घालिते नीर आजी ॥
नाहीं संकोच पूजा गुरु करि बहुधा टाकिली लाज नातें ।
हें गातां शीघ्र तारी परि वरि हरिची सत्वलीला जनातें ॥ ४२ ॥
सारे सात्विकभाव या वसुमतीदेवास झाले तसे ।
जे तद्भक्त तदीय देह चि तशा त्या भूषणा लेतसे ॥
तो श्रीकांतदयापयोद मुनि तो भासे मयूराभ रे ।
नेमानें भरतें अनुक्षण तदा तद्बाष्पपूरा भरे ॥ ४३ ॥
वंदी तो भृगु सकळक्षमानदातें । दासांच्या सुरवरलक्षमानदातें ॥
गेला तो मुदित सरस्वतीस सत्रा । घेऊनी हरिगुणसद्रतीस सत्रा ॥ ४४ ॥
कथि भृगु हरिभक्तिमज्जनातें । करिति मुनी सुखसिंधु-मज्जनातें ॥
विधिजनिस हि देति खेंव सारे । म्हणति मुकुंद भजा सुखें वसा रे ॥४५॥

---

१ शेष. २ भूदेव (ब्राम्हण.) ३ उत्पन्न करिता. ४ पूजा. ५ पाप. ६ मयूराप्रमाणें शोभणार. ७ स्नानातें.

मुनि म्हणति सदा जो मोक्षदाना विकासी ।
धरूं भवजलधींत त्वत्पदानाविकासी ॥
करूं जप तप अर्चा साधना याजनासी ।
तुजविण हरि कैंची सद्गती या जनासी ॥ ४६ ॥
**मयूरेश्वरें** वर्णिलें हें चरित्र । कराया मनोवाग्वपूतें पवित्र ॥
रसज्ञा जनाला नमस्कार आहे । कवित्वें न मद्बुद्धि गर्वासि वाहे ॥ ४७ ॥

---

## दशावतारार्या.

करूणा-शब्द-श्रवणें, सदया उदकांत **मीन** हो जागा ॥
परि मज विषयींच विभो दैवें बहु हीन मी न हो जागा ॥ १ ॥
मंथन-समयीं घेतां, पृष्ठीं श्रमलासि **मंदरा** हीन ।
वचनें दुखविशि माझ्या.' वदतां मी तुजसि मंद राहीं न ॥ २ ॥
दन्तीं धरा धराया, देवा तुज कांहिं बल न सायास ।
मजसीं मृद हि न वदवे, झालें तुज काय बल नसायास ॥३॥
होतासि जेविं काष्ठीं, श्रवणीं पडतां चि हाक दासाची,
**प्रल्हादा** परि माझी, वाणी करिशील हा कदा साची ॥ ४ ॥
निपट कपट-मति बहु हा, व्हावा तुज उद्धरावयासि बळी ।
निर्बल पडलों म्हणुनी करिशी अमुची सख्या अशी अवळी ॥ ५ ॥
शंका न ज्यास चित्तीं अपुली जननी जिवें चि माराया ।
त्या तुज करूणा कैंची बापा दीना जनासिं तारा या ॥ ६ ॥
पाषाणातें लावुनि केली चरणाचिया नखा रामा[1] ।
मज वरि कोप कराया **दशानना**चा न मी सखा रामा ॥ ७ ॥
**गोकुळ**-वासी दासी, त्यां पाशीं राहसी जसा दास ॥
नीच कसा मी झालों, देवा त्याहुनि तव प्रसादास ॥ ८ ॥
करूणाकर ह्मणवीशी, तुझिया उपमेस काय बोलावा ॥
परि मज विषयीं च **विभो** कठिणीं हृदयांत कां न बोलावा ॥ ९ ॥
ज्या तुजला या कालीं मान सवारी बसूं न दे वाजी ।
या तुज लागिं नवेक्षे कैसा दुर्घट घडेल देवाजी ॥ १० ॥

दशावतार समाप्त.

---

1 स्त्री ( अहल्या ).

# श्रीनाथ-चरित्र.

आणावें कावडिनें, **श्रीगंगेचें** भरूनियां पाणी ।
७८. सूर्यराव हा शिवाजीचे जुन्या बाळपणच्या संवगड्यांपैकीं एक होय. जावळी व रोहिडा हे किल्ले शिवाजी लावून घेतले त्या वेळीं यानें फार मोठी कामगिरी बजाविली होती.

७९ शिवाजीच्या फौजेनें हा मोठा जय रूपादिला. यांत मोगलांचे २२ सरदार मारले गेले. व पुष्कळ मोठमोठे पाडाव ही सांपडले. पाठविलेल्या सैन्याचा पराजय झाला हें पाहून मोहबतखानानें सालेरीचा वेढा उठविला.

८०. हा बेलोलखान कोण होता तें समजत नाहीं. ग्रां० ड० ह्याचें नांव देत नाहीं.

* हमखास=प्रसिद्धपणें—दरबारास.

हादूर कोका, पातशहाचा खुद्द भाऊ, याणें येऊन पातशाहाचें समाधान केलें कीं, "तुह्मीं दिल्लीची पातशाई खुशाल करणें. आपण शिवाजी वरि जातों त्यास ‡‡हालखुद्द ठेवितों. त्याचें लष्कर पातशाही मुलखांत नये असें करितों. नाना हुन्नेर करून त्यास जेर करितों. पातशहांनीं फिकीर न करावी." असें समाधान करून पातशहास आणून तख्तावर बसवून, बर्हादूरखानास [८१] नांवाजून वस्त्रें अलंकार आपले गळ्यांतील पदक व शिरची कलगी जवडावाची, दोन हत्ती व घोडे असें देऊन दौलत जाफा दिधली आणि समागमें सत्तर हजार स्वार दिले. [८२]हरोलीस दिलेलखानास हुकूम करून दिल्हा. येणेंप्रमाणें फौज दक्षणेस राजियावर पाठविली. ती मजल दरमजल दिल्लीहून चालिली.

राजियास ही खबर बातमी दिल्लीहून आली. राजे बोलिले कीं, "बहादूरखान पेंडीचें गुरूं आहे. त्याचा गुमान काय आहे? त्यास आपले मुलकांत यावयास दोन वर्षें लागतील," असें बोलिले. मग आण्णाजी दत्तो सुरनीस याणीं मालसांवत, मावळे यांचा हजारी, यास सांगून हल्ला करून पन्हाळा किल्ला अदलशाही होता तो घेतला[८३]. व सातारा, चंदन, वंदन, नांदगिरी, परळी असे किल्ले घेतले. राजा खांसा किल्ले देश

---

‡‡ हालखद्द=जसा पाहिजे तसा. 'यथावश्यतु हालखद्द' रा० व्य० को०

८१. 'दाहाशीरखान', 'दावशीरखान', व 'बहादूरखान' असे तीन पाठ आहेत. हा खानजहान बहादूर होय.

८२. 'सेनामुखं हरोलः स्यात्' रा० व्य० को०

८३. सन १६७३. पन्हाळा किल्ला ह्या उपर शिवाजीपासून विजापूरकरांचे हातीं लागला नाहीं. त्यांनीं तो परत घेण्याकरितां पुढें केलेले सर्व प्रयत्न व्यर्थ गेले. एका जुन्या दफ्तरांत ह्या पन्हाळे प्रकरणास उद्देशून शिवाजीवर केलेली कविता सांपडली आहे ती येणेंप्रमाणें:—

पराक्रम किल्ले पन्हाळा

होतों पन्हाळ्यावरि मी शिवाजी। चक्रावतांची डरडार भाजी ॥ आतां पुढें कोण धजेल पाहों। मी भोंसला कां उगलाचि राहों ॥ १ ॥ फौजेंत माल मृ कं द गजेंद्र चाले। शोभे निशाण भगवें गज फार डोले। दैत्येंद्र कां राजगडास येना। मी आपुला पर्वत त्यासि देना ॥ २ ॥ भावें भजावें मज मोंगलांनीं। भविष्य सांगे तुळजा भवानी। समुद्र याचें जळ मोजवेना। माध्यान्हिंच भास्कर पाहवेना। मुठींत वैश्वानर बांधवेना। ऐसा शिवाजी नृप जिंकवेना ॥ ३ ॥

ह्याच श्लोकाचे खालीं पेशव्याच्या वर्णनाचा एक श्लोक आहे तो पेशवा मोरोपंत असावा व साल्हेरीच्या जवळील युद्धांत त्याणें केलेल्या पराक्रमास उद्देशून हें कवन असावें असें दिसतें ह्मणून तेंही येथें देतों.

पुण्याच्या कप्या [?] गर्जता हे शिवाजी तिथें नांदतो पेशव्या मर्द गाजी। जशीं कौरवें मारिलीं अर्जुनानें। तशीं मोंगलें मारिलीं पेशव्यानें ॥ १ ॥

ह्या कवितेंत अशुद्धें कांहीं आहेत तीं ज्यांस तिची दुसरी प्रत मिळेल त्यानीं शुद्ध करावीं. ही कविता रामदासाच्या धाटणीवर केलेली दिसते.

पाहावयास रायरीहून निघोन आले. वांईचा कोट येतांच घेतला. तसाच कोट कऱ्हाडचा घेतला. सिरोळें, कोल्हापूर हे कोट घेतले. हुकेरी, रायबागपर्यंत देश घेतला. मुलुख चौतर्फा सुटला. मुलकांत आटोप कैसा होय? तेव्हां मोरोपंत पेशव्याचा हवाला कल्याण भिंवडीपासून देखील कोळवण सालेरीपर्यंत वरघाट व कोंकण त्यांचे स्वाधीन देश केला. लोहगड व जुन्नर देखील बारा मावळें हारोल्यांचे घांटापासून पेशव्याचा हवाला केला. आण्णाजी दत्तोचे स्वाधीन चऊलपासूनें दाभोळ राजापूर कुडाळ बादे फोंड कोपल पर्यंत कोंकण आण्णाजीपंत सुरनीस याचे स्वाधीन केलें. वरघाट वांईपासून कोपल तुंगभद्रा पावेतों देश नेमून दत्ताजीपंत वाकनीस याचे स्वाधीन केला. दत्ताजीपंतास पन्हाळां ठेविलें. असा देश तीन सरकारकुनांच्या हवालां केला. या खेरीज मोंगलाई देश येथें सुभेदार ब्राह्मण सात पांच ठेविले. तेही पेशव्याचे आज्ञेनें ठेविले. गडकोट किल्ले येथें सरकारकुनांनीं परामर्ष करावा. परंतु किल्लेदार कारकून लोक जे ठेवणें ते राजियांनीं आपले नजर गुजर करून ठेवावे. कामाचा माणूस पाहून तैनात जाजती हशमास करणें ती सरकारकुनांनीं करावी. ये जातीनें तह केला. सरकारकुनाचे मुतालीक राजियाजवळ असावे. वर्षास हिशेब मुलकाचा व रसद घेऊन सरकारकुनांनीं राजदर्शनास यावें. येणेंप्रमाणें कारभार करीत चालिले.

पुढें विजापुराहून अब्दुल करीम बेलोलखान बारा हजार स्वारांनिशीं इकडे चाल करून आला. तो फौजेनिशीं हिकडे चालला ही खबर राजियास कळोन कुल लष्कर प्रतापराव यास हुकूम करून आणविलें आणि हुकूम केला कीं, "विजापूरचा बेलोलखान येवढा चळवळ बहुत करीत आहे. त्यास मारून फत्ते करणें." म्हणोन आज्ञा करून लष्कर नबाबावरि रवाना केलें. त्यांणीं जाऊन उबराणीस नबाबास गाठिलें. चौतर्फा राजियाचे फौजेनें कोंडून उभा केला. पाणी नाहीं. असा जेर केला युद्धही थोर जाहलें. इतक्यांत अस्तमानही झाला. मग निदान करून नबाब पाणियावरि जाऊन पाणी प्याला. त्याजवरि प्रतापराव सरनौबत यास अंतस्त कळविलें कीं "आपण तु-

८४. 'येता येता' म० प्र०

८५. 'शिराळें' 'शिराळ्याचा' पाठांतरें.

८६. 'हरेळुच्या' म० प्र० 'देषाळ्याचा' सा० प्र०

८७ "चौक—दाभोळसुभा राजपुरी कुडाळ देगवादें खारें व अकोलें" म० प्र०

८८. विजापूरच्या सुलतानास अर्धांग वायु होऊन तो मरण पावला. त्याचा मुलगा शिकंदर हा लहान होता. आणि मुत्सद्यामध्यें भांडणें सुरू झाली. या मुत्सद्यापैकीं हा अबदुल करीम एक होय.

८९. 'वळवळ' म० प्र०

ह्यांवरि येत नाहीं. पादशहाचे हुकुमानें आलों. या उपरि आपण तुमचा आहें. हरएक वक्तीं आपण राजियाचा दावा न करीं" असे कितीएक ममतेचें उत्तर सांगोन सल्ला केला. मग राजियाचें लष्कर निघोन गेलें. राजियास खबर कळून लष्करास ताकीद करून फजीत केलें कीं "सल्ला काय निमित्य केला?" असे रागास आले पुढें प्रतापराव फौजेनिशीं मोगलाईंत भागानगरचा देश, देवगड, रामागिरी, वाजेदेश मारून लुटून माघारे आले. तों राजिया जवळ निळो सोनदेव मजमदार होते त्यांस एकाएकीं मृत्यु जहाला. त्यांची मजमदारी त्याचे पुत्रास सांगावी असें केलें. त्यांस वडील पुत्र नारोपंत होते ते काहीं शहाणे नाहीं. रामचंद्रपंत धाकटे पुत्र, तो शाहणा. राजियाचा लोभ फार कीं हा मोठा शाहाणा, दैवाचा, भाग्यवंत, बापापेक्षां लक्षगुणीं थोर होईल. असें म्हणून नारोपंतास मजुमदारी मात्र सांगून हुद्दा चालविला.

त्याजवरि मागती विजापुराहून बेलोलखान पन्हाळे प्रांतास पादशाहांनीं रवाना केला. तो सदर प्रांतांत आला त्याजवरि राजियास कळलें कीं बेलोलखान मागती आला आहे. मग राजे म्हणूं लागले कीं हा घडोघडी येतो, या करितां मागती प्रतापराव यास पाठविलें कीं "तुम्हीं लष्कर घेऊन जाऊन बेलोलखान येतो याशीं गांठ घालून बुडवून फत्ते करणें. नाहीं तर तोंड न दाखविणें," ऐसे प्रतापराव यास लिहून सांगून पाठविलें. त्यावरि प्रतापराव जाऊन बेलोल खानाशीं गाठिलें. जेसरीवरि नबाब आला. त्यानें गांठिलें. मोठें युद्ध झालें. अवकाल होऊन प्रतापराव सरनोबत तरवारीचे वारानें ठार झाले. रण बहुत पडिलें. रक्ताच्या नद्या चालिल्या. त्याजवर बेलोलखान विजापुरास गेला. आणि राजियाचें लष्कर पन्हाळ्याखाले आलें.

प्रतापराव पडले, ही खबर राजियांनीं ऐकून बहुत कष्टी झाले; आणि बोलिलें कीं, "आज एक बाजू पडली. प्रतापराव यास आपण लेहून पाठविलें कीं फत्ते न करितां तोंड दाखवूंनये, त्या सारिखें करून बरें म्हणविलें. आतां लष्कराचा बंद कैसा होतो? सरनौबत कोण करावा?" अशी तजवीज करून आपण खासा लष्करांत येऊन लष्कर घेऊन कोंकणांत चिपळून जागा परशुरामाचे क्षेत्र आहे तेथें येऊन राहिले[११]. मग लष्कराची पाहणी करून लहान

१०. प्रतापरावाबरोबर हंसाजी मोहिते पंचहजारी हा होता, त्यानें प्रतापरावाचा मोड झालेला पाहून, विजापुरकरांवर निकरानें हल्ला केला त्यांत मुसलमानांचा पराभव होऊन मराठ्यांचा जय झाला व त्यांस लूट पुष्कळ सांपडली. या कामगिरी बद्दल हंसाजीस पुढें सरनौबत केलें.

११. कोंकणांत छावणीस राहण्याचें कारण हें कीं, त्या सालीं देशावर दुष्काळ पडला होता.

थोर लष्करास व पायदळ लोकांस खजीना फोडून वांटणी केली, आणि सरनोवतीस माणूस पाहातां हंसाजी मोहिते म्हणून पागेमध्यें जुमला होता. बरा शाहाणा, मर्दाना, सबुरीचा[१२], चौकस शिपाई मोठा धारकरी पाहून त्यास 'हंबीरराव' नांव किताबती देऊन सरनोबती सांगितली. कुल लष्करचा गाहा [ ? ] करून हंबीरराव याचे तांबीज[१३] दिधले. आणि फौज [ सुद्धां ] वरघाटीं रवाना केला.

त्यानंतर शाहाजी राजे पडले[१४]. विजापूरचे पातशहांनीं त्याची दौलत त्यांचे धाकटे पुत्र व्यंकाजी राजे होते त्यांस दिधली. नारो दीक्षित कुल-कारभारी महाराजांचे होते, ते मृत्यु पावले. त्यांचे पोटीं रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे दोघे बंधु सर्व विद्येनें निपुण व राजकारणीं बुद्धिवंत चतुर शहाणे, होते. त्यांचा व व्यंकाजी राजियाचा बनाव बसेना. मग ते उभयेतां बंधु त्याजवळून निघोन राजियाकडे आले. येतांच रघुनाथपंत व व जनार्दनपंत व बाळकृष्ण चुलतभाऊ व बाळकृष्णपंताचे पुत्र कमळाजीपंत व जनार्दनपंताचे पोटीं गंगाधरपंत ह्मणोन सु-बुद्ध झाले, असे पांचजण व घरचीं माणसें, घोडीं व हत्ती असें सामान बायका सहवर्तमान राजियाकडे आले. हें वर्तमान राजियास कळतांच राजे सामोरे जाऊन भेट घेतली. वरकडही सरकारकून जाऊन भेट घेऊन सन्मानें आणिले. त्यांस सर्वांस मिळून देखील घोडीं चाळीस, हजार होन तैनात सालीना करून, तनखे वराता देऊन सरकारकुनांमध्यें श्रेष्ठत्व गौरवें देऊन त्यांचें चालवून ठेवून घेतले.

हंबीरराव लष्कर घेऊन संपगांवास गेले. इतकियांत विज्यापुरचा सरदार हुसेनखान मायाणा पठाण मोठा तालेदार पांच हजार पठाण तिरं-दाज बरचीवाले आडहत्यारी असे पं च रू स [ ? ] तसे बहिले, बंदुकी, तोफखाना असा होता. हुसेनखान ह्मणजे जैसा नबाब बेलोलखान याच्या जोडीचा सरदार, तो हंबीरराव याजवर चालून आला. मराठे[१५] यांनीं शर्त करून भांडण दिधले. नीट ग च ड ते [ ? ] घोडीं घालून मारामारी केली. हुसेनखानाचे कित्येक लोक मारिले. व घोडीं मारिलीं. व हत्ती रणास आणिले. मोठें युद्ध बळकट दोन प्रहर दिवसापासून चार प्रहर रात्र पर्यंत

१२. सबुरीचा = शांत, सहनशील.
१३ 'स्वाधीन केलें' म० प्र०
१४. शहाजी १६६४ सालीं तुंगभद्रा नदीचे कांठीं बसवपट्टन बेदनुराजवळ आहे तेथें शिकारी करीत असतां घोड्या-वरून पडून मृत्यु पावला.
१५. जनार्दनपंत शिवाजीजवळ होताच व त्याजकडे एक मोठा अधिकारही होता.
१६. 'मराठे ह्मणजे मोठे हरीफ त्यांनीं' सा० प्र०

जालें. सहा प्रहरांत कुल् फौज बुडविली. हुसेनखान खासा धरिला. चार साडेचार हजार घोडीं पाडाव केलीं. बारा हत्ती पाडाव केले. तसे उंट व बाजेजिन्नस, बिछाईत, खजीना व कापड बेमुहिनें[९७] सांपडलें. मोठें झुंज करून फत्ते केली. रण दुतर्फा अपार पडले. यानंतर फत्तेची खबर [ लिहून ] राजियाकडे जासुदाबरोबर पत्रें पाठविलीं. त्यांनीं जाऊन वर्तमान सांगितलें. त्याजवरून राजे बहुत संतोष पावून खुशाल झाले. हुसेनखानाचा भाऊ किल्ले कोपल येथें होता त्याशीं राजकारण मोरोपंत पेशवे यांणीं केलें आणि कोपल घेतलें. कोपल ह्मणजे दक्षणचा दरवाजा. तक्ताची जागा. असा किल्ला घेतला. मोठें स्थळ प्राप्त जाहालें. कोपल म्हणजे तुंगभद्रेचे कांठीं. तुंगभद्रा पावेतों देश हस्तगत जाहला. कोपला[९८] करितां कनकगिरी हरपनहाली रायदुर्ग व चित्रदुर्ग व विद्यानगर, बुंदीकोटें[९९] बाजे पाळेगार जेर झाले. असें कार्य झालें.

यानंतर पुढें दिल्लीहून बाहादूरखान[१००] देखील* हरोल दिलेलखान हे फोजेनिशीं अमदानगरास येऊन राहिले. हे वर्तमान राजियास कळलियावरि राजियांनीं गडकोट किल्ले यांस खबर केली आणि मजबुतीनें राहिले. मग जासूद पत्रें नवाब बहादूरखान यांजकडे गुप्तरूपें पाठविलीं. "हरेंद्र सोधावें, पुढें तजवीज करणें ती करावी" असें केलें. आणि राजियांनीं आपले लष्करास हुकूम करून हंबीरराव सरनोबत फौज घेऊन मोगलाईंत शिरले. खानदेश, बागलाण, गुजरात, अमदाबाद, बऱ्हाणपूर, वऱ्हाड, माहूर वरकड देश नर्मदा पावेतों देखील जालनापूर या देशांत स्वारी करून, मुलूख मारून, खंडणी करून, जप्त केला. मालमत्ता अगणित जमा करून चालिले. तों बाहादूरखान यांणीं कुल् जमाव घेऊन हंबीर रायाचे पाठीवर चालून आले. राजियाची फौज तालेदार गांठली. मोगल बहुत धास्तीनें घाबिरा होऊन सात आठ गांवचे अंतरानें चालिला. दिलेलखान उतावळा होऊन फौजेशीं गांठ घातली. हंबीरराव यांणीं दिलेलखान नजरेंत धरिला नाहीं. तालेदारीनें मत्ता घेऊन आपले देशास आले. मालमत्ता राजियास दिली.

पुढें वेदमूर्ती राजेश्री गागाभट ह्मणून वाराणशीहून राजियाची कीर्ति ऐकून दर्शनास आले. भट गोंसावी, थोर पंडित, चार वेद सहा शास्त्रें

९७. "बेमुबलक" सा० प्र०

९८. 'कोपल हस्तगत करितां' सा० प्र०

९९. 'बुंडीकोट' सा० प्र०

१०० बहादरखान इ० मागें पृ० ६३ पहा.

* देखील=सुद्धां.

१. 'हरिद्र ध्यावें' सा० प्र०.

योगाभ्यास संपन्न, ज्योतिषी, मांत्रिक, सर्व विद्येनें निपुण, कलयुगींचा ब्रह्मदेव, असे पंडित त्यांस राजे व सरकारकून सामोरे जाऊन, भेट घेऊन सन्मानें आणिले. त्यांची पूजा नाना प्रकारें रत्नखचित अलंकार पालखी, घोडे, हत्ती देऊन द्रव्यही उदंड देऊन पुजिलें. गागाभट बहुत संतुष्ट झाले. भट गोसावी यांचे मतें, मुसलमान पातशहा तक्तीं बसवून, छत्र धरून, पातशाही करितात आणि शिवाजी राजे यांणींही चार पातशाही दबाविल्या आणि पाऊण लाख घोडा लष्कर गडकोट असे असतां त्यांस तक्त नाहीं, याकरितां मऱ्हाठा राजा छत्रपति व्हावा असें चित्तांत आणिले. आणि [ हें ] राजियासही मानिलें. अवघे मातबर लोक बोलावून आणून विचार करितां सर्वांचे मनास आलें. तेव्हां भट गोसावी ह्मणूं लागले कीं, तक्तीं बसावें. तेव्हां राजियाचे वंशाचा शोध करितां राजे शुद्ध क्षत्री शिसोदे उत्तरेहून दक्षिणेस एक घराणें आलें, तेंच राजियाचें घराणें असें शोधिलें. उत्तरेचे क्षत्रियांचे व्रतबंध होतात त्या प्रमाणें व्रतबंध करावा. हा विचार आधीं करून भट गोसावी यांणीं राजियाचा क्षेत्री वृतबंध केला. शुद्ध क्षत्रिय आधीं केला. अपार द्रव्यधर्म केला. कुल आपले देशांतून पर देशांतून वैदिक ब्राह्मण थोर थोर क्षेत्रींहून मिळाले. तो सर्व ही समुदाय राहून घेतला. प्रत्यहीं मिष्टान्न भोजनास घालूं लागले. पुढें तक्तारूढ व्हावें. तक्त सुवर्णाचें बत्तीस मणाचें सिद्ध करविलें. नवरत्नें अमोलिक जितकीं कोशांत होतीं त्या मध्यें शोध करून मोठीं मोलाचीं रत्नें तक्तास जडाव केलीं जडित सिंहासन सिद्ध केलें. रायरीचें नांव 'रायगड' ह्मणोन ठेविलें. तक्तास स्थळ तोच गड नेमिला. गडावरि तक्तीं बसवावें असें केलें. सप्त महानदियांचीं उदकें व थोर थोर नदियांचीं उदकें व समुद्रांचीं उदकें, तीर्थ क्षेत्र नामांकित तेथील तीर्थोदकें आणिलीं. सुवर्णाचे कलश केले व सुवर्णाचे तांब्रे केले. आठ कलश व आठ तांब्रे यांनीं अष्ट प्रधानांनीं राजियास अभिषेक करावा असा निश्चय करून सुदिन पाहून मुहूर्त पाहिला. शालिवाहन शके १५९६ ज्येष्ठ मासीं शुद्ध १३ स मुहूर्त पाहिला.* ते दिवशीं राजियांनीं मंगलस्नानें करून श्रीमहादेव व श्रीभवानी कुलस्वामी व उपाध्ये प्रभाकर[३] भटाचे पुत्र बाळंभट कुलगुरू व भट गोसावी वरकड श्रेष्ठ भट व सत्पुरुष अनुष्ठित यांची सर्वांची पुजा यथाविधी अलंकार वस्त्रें देऊन सर्वांस नमन करून अभिषेकास सुवर्ण चौकीवर बसले. अष्टप्रधान व थोरथोर ब्राह्मणांनीं स्थळोस्थळचीं उदकें करून सुवर्ण कलश

२. 'पन्नास सहस्र' हे शब्द प्र. ग. प्रतींत मात्र आहेत.

३. 'भास्कर' म. प्र.

* पुढील मिती प्र. प्र. देत नाहीं. म० प्र० मात्र देते.

कारभार व मुजमुची निशाणी मैदरख व खर्च वगैरेचा बंदोबस्त नीट ठेवून मुलुख सर करणे अशी आज्ञा होऊन समागमें दिले.

१ भास्कर राम कोनेर रामाचे बंधु याजला बक्षीगिरी[२०]चें काम कुल् फौजेचे मुखत्यारी देऊन रवाना केलें.

१ मुख्य चिटणवीस[२१] याजकडून चिटणवीसी देऊन रवाना केले.

१ साहुकार रघुनाथभट[२२] पटवर्धन झिपरे याजकडून अनंतभट[२३] चितळे व रघुनाथपुरी व दत्तपुरी गोसावी साहुकार या त्रिवर्गांची खातरी कोनेर राम यानें करून महाराजांची आज्ञा घेऊन समागमें घेतले.

१ आणि कित्येक सरदार व मुत्सद्दी वगैरे समागमें छत्रपतीनें दिले.

१ फडनवीस यांजकडून फडणाविसीचे कामीं एक मनुष्यांची[२४] योजनाकरून कोन्हेर राम याचे अनुसंगानें वागावे म्हणून ही आज्ञा देऊन समागमें दिलें.

सदर्हू मंडळी बाबा साहेबाचे समागमें देऊन व वस्त्रें देऊन सन ११३२ सालचे अखेर सालीं रवानगी हुजुराहून जाली. मंडळीसह देऊर मुक्कामीं येऊन कोन्हेरपंत याणीं आपली उपाधिक शिकंभेटे[२५] जोशी हे फार लोभांतील इसम पंताचे, सबब कृपा युक्त होऊन उपाधिकीची वृत्ती देऊन बाबासाहेबांचे हे स्वाधीन केले. व विश्वनाथ[२६] भट राहाळकर याजला श्री रामजीची पूजा दिली; असें दोघे भट बाबा साहेबांनीं देऊरांत आपले खटल्यांत घरीं ठेविले. नंतर कूच करून मोहिम मकसुदाबादेस जाऊन लढाई फार करून मुलुक कबज्यांत आणून राजश्री भास्कर राम याजला चाळीस हजार फौजेनशीं विरभूवन नावें जागा तेथें छावणी करून ठेविली. कारण मुलक जमीदार माणसें मोठे लढाक[२७] याकरितां पंत मजकूर राहिले. तेव्हां छत्तीसगड[२८] वगैरे येथपर्यंत पंत मजकुरांनीं लढाई करून अंमल करून छावणीवर होते. बाबा साहेब मै को-

---

२०. सेनापतीचा अधिकार.

२१. गोविंद खंडेराव चिटणीस यानीं आपले मामेभाऊ रखमाजी गणेश परभु यांस चिटणीविशी दिली.

२२. मागें टीप ११ पृष्ठ ४ पहा.

२३. यांचे वंशज अद्याप नागपुरीं आहेत.

२४ महादाजीपंत फडनवीस.

२५. यांचे वंशज नागपुर मुक्कामीं असून त्याजकडे राजोपाध्यायत्व आहे.

२६. यांचे वंशज नागपुर मुक्कामीं आहेत. हे राजाचे उपाध्याय आहेत.

२७. संग्रामकुशल, लढाऊ.

२८. छत्तीसगड परगण्यांत हैहयवंशी राजघराण्यांतील दोन राजे दोन ठिकाणीं राज्य करीत असत,—एक रत्नपुर व दुसरें रायपुर. इ० स० १७४२ त भास्करपंत कोल्हटकरानें, बंगाल प्रांतावर स्वारी करण्याकरितां जात असतां, मार्गांत रत्नपुरचा राजा रघुनाथसिंग यास आपल्या ताब्यांत आणून खण्डणी घेतली.

नेर राम समागमें फौज घेऊन गयेंत अंमल केला. व प्रयाग येथेंही अंमल केला. पुढें सवारीचा बेत जाण्याचा होता इतक्यांत नागपूर प्रांतीं झाडींत अंमल बसवून पवणी वगैरे येथें मोठे मोठे सरदार[29] यांजला ठेविले होते तो यांचें पत्र आलें जे, गोंडाचा मोठा उपद्रव होऊन आह्मा लोकांस जेर केलें. हा मजकूर श्रवणीं येतांच सवारीचा कूच होऊन पुन्हा नागपूर जिल्ह्यांत येऊन गोंडाचे पारपत्य असें केलें कीं गोंडें[30] मारून पेंवें भरलीं. इतक्यांत भास्कर राम छावणी करून होते तेथें अल्ली बिरदीखान व मिरजाफरखान या उभयतांनीं फंद करून पंतास मेजवानीचे बाहाण्यानीं बागांत डेरा देऊन तेथें नेऊन डेऱ्याचे तनावे[31] कापून गरदी करून शीर कापिलें[32], सन ११५७ फसली उर्फ शके १६६९ व पंताची स्त्री गर्भिणी होती. इजला धरावें तो ईश्वरकृपेनें एका पठाणाचे बायकोनें बाईला डोली देऊन कोणास न समजतां काशीस रवाना केलें. बाई काशीस पोंचल्यानंतर तेथें पुत्र जाला. त्याचें नांव काशीराव भास्कर ठेविलें. भास्करराव मारले पडले हें वर्तमान तेथील फौजीचे सरदार[33] मोठे मोठ होते

---

२९. पवनी येथील ठाणेदारापाशीं रघोजीची लढाई झाली. तेव्हां त्यानें तुळजोरामपंत नामक सरदाराची नेमणूक केली. पवनी हें शहर भंडाऱ्यापासून १६ कोसांवर वैनगंगेच्या तीरीं आहे.

३०. नागपुरचा गोंडराजा चांद सुलतान हा इ० स० १७३९ त मरण पावला याचे दोन मुलगे अकबरशहा व बुराणशहा हे गादीचे मालक असतां, वलीशहा यानें गादी बळकाविली. हा पूर्वीच्या बख्तबुलंद नामक गोंडराजाचा दासीपुत्र होता रघोजीनें चांद सुलतानाच्या मुलांचा पक्ष घेतला होता. पाटण सावंगी नांवाचा एक गांव नागपुरापासून सात आठ कोसांवर आहे. तेथें वलीशहाच्या दोघां सरदारांबरोबर रघोजीची लढाई इ० स० १७४२ च्या सुमारास झाली. तींत १२,००० लोकांस पेंवांत घालून ठार मारिलें. या भयंकर प्रसंगाचें स्मरण गोंड लोकांत अद्याप जागृत आहे. मराठ्याविषयीं बोलावयाचें असल्यास "पाटणसावंगीची आठवण नाहीं काय?" असें ते म्हणतात.

३१. तनाई, तनाव=तंबूच्या दोऱ्या.

३२. तहाचे बोलणें लावून भेटीस बोलावण्याकरितां अल्ली बिरदीखानानें, मुस्तापखान, राजा जानकीराम व बालामई या तिघां सरदारांस भास्कर पंताचे गोटांत पाठविलें त्यानें तहाचीं कलमें मान्य करून येण्याचें कबूल केलें. भास्करपंत नवाबाच्या डेऱ्यापाशीं येतांच पूर्वोक्त तिघे सरदार सामोरे आले. त्यांनीं त्यास आंत नेलें. यापूर्वी पडद्यांत निवडक लष्करी लोकांच्या टोळी नवाबानें आपल्या पुतण्यास सांगून तयार करून ठेविली होती. तंबूंत मराठ्यांचा सरदार प्रवेश करतांच, नवाबानें "भास्करपंत कोणता" म्हणून विचारिलें. तें समजतांच "या विधर्मी मनुष्यास कापून टाका" अशी नवाबानें निशाणी दिली. नंतर हत्यारबंद लोक त्याजवर व त्याच्या सरदारांवर तुटून पडले.

३३ नवाबानें मोठे मोठे २१ मराठे सरदार मारले. रघोजी गायकवाड नांवाचा एक सरदार मात्र या प्रसंगीं निभावला. मां० द०

त्यांनीं बाबा साहेबांस पत्र लिहून कळविलें. हें वर्तमान श्रवण होतांच बाबा साहेब कोन्हेरपंत रोज दर्शनास जाऊन मजकूर निवेदन केला. तो पुन्हा आज्ञा जाली जे तुह्मी जाऊन पारपत्य करावें व तुमचे समागमें मदतीस बाजीराव बल्लाळ पेशवे फौजेनशीं येतील त्यास पेशवे व बाबासाहेब हे मकसुदाबादेस सवार करून निघाले ते आपण झाडींत नागपुराहून श्रीमंत जानोजी भोंसले व मुधोजी भोंसले याजला पेशवे यांचे बरोबर देऊन मकसुदाबादेस जाऊन बंगाला सर करून बंदोबस्त करून पेशवे गेले व जाणोजी भोंसले यानीं तेथें राहून उढीया जगन्नाथ पर्यंत अंमल केला. व भास्करराव याचें मुंडकटाईबद्दल चवदा लक्ष रुपयांचा मुलुख शिवाय करून फौज घेऊन बंदोबस्त करून माघारे आले. कोन्हेर पंत बंधूचें दुःखांत शोकार्णवीं मग्न हें मुधोजी बावांनीं जाणून आपले नांवें दरसाल पंचवीस हजार रुपयांची सनद वंशपरंपरेची याखेरीज सवारी शिकारीस जो खर्च लागेल तो व लग्न कार्य प्रयोजन तुमचे येथील होईल, याचे खर्चाची सरकारांतून मदत राहील असी शपथ पूर्वक वंशपरंपरेची सनद करून दिली. सन ११६१ व शके १६७२ सालीं झाली.

कलम ३ सीयम.

१ भास्करराम मारले पडले. त्याची स्त्री ताईबाई नांवाची काशीस गेली होती इचें नांवें वराडांतील बंदोबस्त साठ चाळिशीचा झाला तेव्हां वऱ्हाड प्रांतीं सुभा ठेविला तो सुभा बाईचे नांवें बाबा साहेबांनीं करून देऊन वहिवाटीस कोन्हेर राम यांचें विद्यमानें कृष्णाजी गोविंद मुकरर करून बंदोबस्त ठेविला तो सन ११६१ साल फसली पावेतों चालला. भास्कर राम मारले गेले या दुःखानें राजश्री कोन्हेर राम शोकाक्रांत फार होऊन देशीं जाण्याची आज्ञा मागितली. बाबा साहेबही बहुतां प्रकारें समाधान करून पाहिलें. परंतु उदासीनता दूर होईना हें पाहून त्यांचे विनंतीवरून देशीं जाण्याची आज्ञा देऊन रवाना केलें. नंतर बाबा साहेबांनीं कोन्हेरपंत यांचे सहा पुत्र त्यांत चवघांचें नांवें पत्र पाठवून बोलावून घेऊन, बहुतशी खात्री करून चवघांचे नांवें सनद करून दिली. नांवें वितपशीलः--

| | |
|---|---|
| १ बाबुराव कोन्हेर. | १ लक्ष्मणराव कोन्हेर. |
| १ गोविंदराव कोन्हेर. | १ बळवंतराव कोन्हेर. |

सदरहु चवघांचे नांवें वंशपरंपरेची चाळीस हजार रुपये नेमणूक दरसालीं घेत जाणें, व शिवाय खर्च स्वारी शिकारी व लग्न कार्य वगैरे तुमचे

येथें होईल याची मदत सरकारांतून राहील ऐशी वंशपरंपरेची सनद सन ११६२ सालची करून देऊन बाबुराव कोन्हेर याजला कारभार, दवलतीचा कुल् सोपून संन्निध ठेविलें, व तिघे बंधु यांची रवानगी देशीं पंतांनीं करून देऊन बाबासाहेबांचे आज्ञाप्रमाणें दिवाणगिरी व मुजमूचा दरख वगैरे शिलेशिल्याप्रमाणें[34] घेऊन कारभार केला. व लढाई वगैरे जो प्रसंग प्राप्त झाला, त्यास आपण जातीनें जाऊन फौज घेऊन लढाचें काम करून दिवाणगिरिचें काम करावें, बाबासाहेबांची मर्जी बहुत संतोषभरित पंतावर ऐसें असतां बाबसाहेबांची प्रकृति बिघडली तेव्हां राज्य कारभाराचें कितीएक प्रकार बाबुराव याजला एकांत घेऊन करावे व आज्ञा झाली तुह्मी आम्हांस पुत्रवत् आहां. तेव्हां आह्मांजवळ रात्रंदिवस राहत जाणें. आज्ञेप्रमाणें रात्रंदिवस संनिधच रहावें. श्रीमंत जानोजी भोसले यांणीं ही जवळ रहावें. या उभयतांस दवलतीचे सर्व कारभार जे बारकीचे ते समजवून देऊन सन ११६३ सालीं देवाज्ञा झाली. तेरा स्त्रियांनीं सहगमन केलें. दिवस क्रमल्यानंतर चवऱ्या सोन्याच्या दांडीच्या दोन त्यांजपैकीं बाबासाहेबांच्या आज्ञेप्रमाणें एक चवरी बाबुराव कोन्हेर याजला दिली व एक श्रीमंत जानोजीबावांनीं आपणाकरितां ठेविली. नंतर कांहीं दिवस सेनासाहेबाचा अधिकार जानोजीबावांनीं घेतला. व कारभार बाबुरावांनीं करावा. तो पंतमजकूरची प्रकृत फारच बिघडली याकरितां आज्ञा घेऊन देशीं गेले. नंतर पंताचे पाठीमागे श्रीमंत जानोजीबावा श्रीमंत मुधोजी बाबासाहेब या उभयतांत फिसाद[35] वाढून खिस्सा होत गेला. हें वर्तमान पुण्यास समजल्यावरून पेशवे यांनीं जानोजी बाबासाहेबाचे नांवें सेनासाहेबीचीं वस्त्रें पाठविलीं व आपासाहेबांचे नांवें "सेनाधुरंधरी"चीं वस्त्रें येऊन राजकारण कांहीं दिवस सुरळीत चाललें. बाबुराव याजला पत्रें फार येण्याविषयीं गेलीं. परंतु प्रकृतीमुळें पंताच्या येण्याचा योग न झाला. कलम चाहरम् ४

१. राजश्री बाबुराव कोन्हेर यांच्या न येण्यामुळें कारभार अस्ताव्यस्थ होणें याकरितां श्रीमंत जानोजीबावांनीं बळवंतराव कोन्हेर आमचे आजे याजला पत्र पाठवून बोलावून घेऊन भेट झाली व फार प्रस्तावा केला. जे सेनासाहेबीचें पद रायांनीं[36] आह्मांकडे दिलें हें तुमच्या वडिलांच्या प्रसादा-

---

३४ जुनी वहिवाट.

३५. बेबनाव, वाकडेपणा. रघोजीच्या मरणानंतर दोघा भावांमध्यें गादीविषयां कलह उत्पन्न झाला. पुढें सन १७५६ मध्यें पेशव्यांनीं हा तंटा मिटवून, दोघाच समजूत घातली.

३६ रघोजीनें.

चें होय. याची आठवण आह्मी विसरल्यास तिर्थरूपजी कैलासवासी हांसतील, हें समजोन तुम्हांस बोलाविलें. त्यास तीर्थरूपजींनीं सनद तुमचे वडील बंधु बाबुराव कोन्हेर व तुमचे नांवासमेत चवघां बंधूंचे नांवें करून दिली ती तुम्हांजवळ आहेच. त्यास सांप्रत तुम्हांस दुसरी सनद तुमचे जातीचे नांवाची दहा हजार रुपयां शिवाय करून सरकारांतून सनद करून देण्यांत येईल. या आज्ञेवरून विनंति केली. जे आम्ही साक्षात बंधु सहा, त्यांत दोघे नाहींत; बाकी आम्ही चवघे जणे आहोंत त्यांस चवघांचे नावें सनद मिळावी. या विनंति वरून संतोष होऊन आमचे चवघांचे नांवें बितपशील १ रामचंद्र कोन्हेर १ यशवंतराव कोन्हेर १ लक्ष्मणराव कोन्हेर १ बळवंतराव कोन्हेर. सदर्हू चवघांचे नावें सनद सन ११६७ साल व शके १६७९ या सालीं पन्नास हजार रुपये सालीना नेमणूक वंशपरंपरागत घेत जाऊन सेवा करणें व या खेरीज सवारी शिकारी व तुमचे येथें कार्य प्रयोजन याजला जो खर्च लागेल, तो सरकारांतून तुमचे शिरस्तेप्रमाणें मिळत जाईल, अशी वंशपरंपराची सनद कृपा करून दिली, आणि आज्ञा जाली जे दिवाण-गिरी व तुमचे वृत्ती मुजमीची, याचा दरख शिरस्तेप्रमाणें घेऊन सरकार चाकरी आपले वडिलांप्रमाणें बेअंदेष करावी. या आज्ञेप्रमाणें बळवंतराव कोन्हेर, आमचे आजे, यांणीं दिवाणगिरीचा कारभार व मुजुमीचा दरख वगैरे घेऊन कांहीं दिवस सरकार ताबेदारी मर्जीनुरूप केली. ऐसें असतां राजेश्री दिवाकर पुरुषोत्तम यांचा प्रारब्धोदय दिवसेंदिवस श्रीमंतांची कृपा होऊन बळवंतराव यांस सोडून राज्य कारणें होऊं लागलीं. तेव्हां आमचे आजे याणीं विचार केला जे दोघे कारभारी एकदिल नसल्यास व एक चित्तें न वागल्यास कोणे दिवशीं रैयांतीस[37] धक्का बसून वडिलांचे लौकिकास दूषण लागेल हें समजोन, हें न दाखवितां श्रीमंत साहेबांस यात्रेचा बहाणा करून देशीं जावयाविषयीं विनंति करून आज्ञा घेऊन कार-भार मंत्राचें सूत्र सोडून देशीं रवाना जाले. तों पुन्हा नागपुरास आलेच नाहींत. नेमणुकीपैकीं ऐवज श्रीमंत साहेबानीं देशीं पाठवीत असावा व आपासाहेब[38] यांजकडे दवलतीचा अधिकार जाल्यानंतर याणीं हा ऐवजच दररोज देशीं पाठवीत असावा. कलम ५.

१. आमचे आजे देशीं गेले ते पुन्हा नागपुरास आलेच नाहींत. व

---

३७. प्रजेस.

३८. मुधोजी भोसले. ऊर्फ आपासाहेब | सेना धुरंधर.

आम्हांकडील काशीराव भास्कर याचे पुत्र रामचंद्र काशी याचा बंदोबस्त चारसें सवारीचा रिसाला याजकडे देऊन जातीचा दरमहा पांचसें रुपये व हत्ती पालखी डंका निशाण वगैरे ऐसें मरातबानें श्रीमंत बापूसाहेब[३९] नि-भवेत होते. त्यांचे जातीपावेतों सरकारांतून निर्वाह जाला. नंतर ह्यांचे स्त्रीचे नांवें चाललें. हल्लीं त्यांचे वंश आहेत. कलम ६.

आमचे आजे बळवंतराव देशीं गेले तेथें त्यांचा काळ जाल्यानंतर श्रीमंत बापूसाहेबांनीं आमचे तीर्थरूप जिवाजी बळवंत यांजला पत्रें एक दोन पाठविलीं. तेव्हां पत्रान्वयें तीर्थरूपजी सन ११९६ सालीं नागपुरास दाखल होऊन श्रीमंत साहेबाची भेट होऊन सरकारांनीं बहुतसा प्रस्तावा केला. व आज्ञा जाली जे हें राज्य तुमचें वडिलांचें कृपेचें होय. हा विसर आह्मांस कधींही पडणार नाहीं अशी आपली खात्री ठेवा. व तुमचे वडील व आमचे वडील हे पुण्यवान त्यांचें तसेंच निभलें, या अमृत वचनांनीं आमचे तीर्थरूपजीचा परम संतोष होऊन, विनंति केली जे, आम्ही सर्व परी सरकारचे आहों. पुन्हा आज्ञा जाली जे सांप्रत या दवलतींतून तुमचे जातीस नेमणूक, मै पालखीचे सरंजामासुद्धां अठराशें रुपये सालीना मिळतील. व घांस लकडीकारितां तिनशें रुपयांचा गांव मौजे मांडव मोकासा तुम्हांकडे चालेल. ऐसें एकवीसशें रुपये सालीना घेउन प्रपंच कालानुरूप करावा. याशिवाय तुमचें येथील लग्न कार्य वगैरे जें निमित्त होईल याशीं जो खर्च लागेल तो सरकारांतून मदत होऊन खर्च होत जाईल. ऐशी कृपाळूपणें आज्ञा जाली. त्या आज्ञेप्रमाणें एकविसशें रुपये कबूल करून नागपूर मुक्कामीं राहून प्रपंच करीत होते. शिवाय नैमित्तिक खर्चास आज्ञेप्रमाणें हजारोंच रुपयाची मदत सरकारांतून होऊन सन १२२९ साल पावेतों निर्वाह एकरूप झाला. नंतर साल मजकुरीं फाल्गुन वद्य ९ मीस श्रीमंत कैलासवासी झाले. नंतर आपासाहेब[४०] यांजकडे दवलतीचा अधिकार जाला. त्यांनीं कांहींएक कमबेश [ ? ] व शिलशिल्याप्रमाणें सन १२२७ साल पावेतों निर्वाह केला. सनमजकुरीं राज्य बुडालें. नंतर अंग्रेजी जाली सन १२२८ सालीं सिदक अलीखान[४१]

३९. दुसरा रघोजी.

४०. आपासाहेबापूर्वीं परसोजी ऊर्फ बाळासाहेब याजकडे 'सेना साहेब सुभा' हें पद कांहीं महिने होतें. त्याच्या मरणानंतर तें आपासाहेबास प्राप्त झालें. सन १८१६ त अप्रिल महिन्याचे १४ च्या तारखेस आदितवारीं बाळासाहेबास गादीवर बसवून त्याचा कारभारी आपासाहेब झाला. यास 'नायब मुखत्यार' असें ह्मणत.

४१. ज्या पाच गृहस्थांच्या विचारानें आपासाहेब कारभार करीत असे त्यापैकीं एक, याजकडे सेनाधिपत्य होतें. इतर चवघांचीं नांवें:—नागोपंत, रामचन्द्र वाघ, नारायण पंडित व मनभट उपाध्ये.

बाब व राजश्री नारायण गोपाळ पंडितजी[42] या उभयतांचे हातांनीं दवलतीचा बंदोबस्त जाला. तेव्हां तीर्थरूपजींचे नांवें नेमणूक मुत्सद्यांत नगदी रुपये पन्नासप्रमाणें महावार एकून रुपये सालीना सहाशें प्रमाणें व तीनश्या रुपयांचा गांव एकून दरसाल नवशें रुपये सनमजकुरी पासोन १२३० अखेर साल पावेतों शिवाय कार्य प्रयोजनास जिनगी शिलशिल्याप्रमाणें दिवसानुरूप मिळत होती सनमजकुरीं तीर्थरूपजींचा काळ जाला. नंतर आमचे नांवें नेमणूक गुजाबादादानीं[43] करून दिली. आह्मी देशीं गेलों पुन: देशांतून आलों ते वेळेस कारभार गुजाबा दादासाहेब यांजकडेसच होता आमचे पाठीमागे आम्हांकडे तीनशे रुपयांच्या मोकाश्याचा गांव चालत होता तो महकुफ करून नगदी नेमणूक सालीना साहाशें रुपयेप्रमाणें चालली ती सन १२५४ बाराशें चौपन्न सालापावेतों सरकारचे अमलांत आह्मांस मिळत गेली. व कार्य प्रयोजनास आमची मदत सरकारांनीं शिरस्तेप्रमाणेंच ठेविली. सन मजकुरीं अखेर सालीं मुत्सद्यांतून राजश्री भगवंतराव[44] दादा फडनवीस यानें सरकारास समजवून मुत्सदी नेमणूकदार जे होते त्यांची खाजगींतून वजाई करून दरमहाप्रमाणें कामें दिलीं त्यांत आमची खाजगी वजाई होऊन सरकारानीं कामाविशीचें काम पन्नास रुपये दरमाहाचे देऊन आह्मांकडून कमाविशीचें काम सन १२६३ सालपावेतों घेतलें नंतर सनमजकुरीं सरकार कैलासवासी जाले. उपरांत सहा सात महिने अंग्रेज बहादुर यांचे हाताखालीं कमाविशी निभली. अखेर वैशाखमासीं इलीयेट[45] साहेब बहादूर यांणीं आह्मांकडील कामाविशीचें काम कांहीं एक कामांत अंतर नसतां आह्मी वृद्ध असें आह्मांस समजावून बोलण्यांत आणलें कीं जे तुह्मी बुजरूग, व वयांनीं वृद्ध सबब तुह्मांकडून

---

४२. यांचे वंशज व पुत्र विद्यमान श्री॰ माधवराव नारायण पंडितजी, नारायण गोपाळ पंडितजी हे व्यापार धंदा करून असतां आपासाहेबांच्या वेळीं राज्यकारभारांत शिरले. यानीं आपासाहेबांस शुद्धीवर आणण्याचा यत्न केला परंतु सफळ झाला नाहीं.

४३. परसोजीचा आते भाऊ. हा बाकाबाईच्या राज्यकारभारांत तिच्या पक्षाचा होता. आपासाहेबांच्या कारकीर्दींत याचा छळ सुरू झाला तेव्हां हा इंग्लिशांच्या आश्रयाखालीं होता. नंतर प्रयागास निघून गेला. इंग्लिशांनीं त्यास आश्रय न देतां दोस्तीच्या तहाप्रमाणें आपल्या ताब्यांत द्यावें असें आपा साहेबाचें म्हणणें होतें परंतु तें इंग्लिशांचा वकील मिस्तर जंकिन्स् यास पसंत पडलें नाहीं. पुढें तिसरा रघोजी पदारूढ झाल्यावर गुजाबादादा नागपुरास परत आला

४४. हे रघोजीचे वेळीं फडनविशीचें काम करीत असत. यांजकडे सर्व नागपूर प्रांताची सरसुभेदारी असे. यांचे वंशज नागपूर मुकामीं आहेत.

४५. हा तिसरा रघोजी मेल्यानंतर नागपूर येथें कमिशनर होता.

कमाविशी महकुफ केली तुमचा निर्वाहाचा बंदोबस्त सदरांतून करण्यांत येईल. कलम ७

१ सदर्हूप्रमाणें आमची कैदामत सरकार*कैलावासी होत पावेतों निभली. सरकारास देवाज्ञा जाली तेदिवसापासून नाउमेद तो श्रीमंत मातुश्री बाईसाहेबांची आज्ञा कदामतीचे कैफीयतीविषयीं सादर जाली त्यावरून मनांत परमसंतोष जाला, जे श्रीकृपेनें या दवलतीचा रागरोष न होईल, व कैफीयती विषयीं हुकूम जे पक्षीं जाला, तेव्हां जसी ज्याची कदामत त्याप्रमाणें सरकारानें निर्वाह केला तसाच बंदोबस्त हाल कायम होऊन निर्वाह होईल या उमेदीनें मनांत फार आल्हाद होऊन कैफीयत कदामतीची पेष केली आहे.

[ ३ ] श्री

राजेश्री मुधोजी भोंसले सेनाधुरंधर गोसावी यांसः—

सकळगुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित माधवराव नारायण आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असले पाहिजे. विशेष. राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा यांचे लग्न मार्गशीर्ष माशीं करणार त्यास घरांतील बायकांचा ‡ बेत, सोन्याच्या सांखळया पायीं घालाव्या याजकरितां श्रीमंत महाराज छत्रपती स्वामीस विनंती करून राणीचे पांया साखळया प्रसादिक आणून लग्न समारंभास पाठवाव्या, ह्मणून राजश्री दिवाकर[२] पुरुषोत्तम यानीं राजश्री सखाराम भगवंत व बाळाजी जनार्दन यांस लिहिलें त्याजवरून कळलें, ऐशियाशि आपल्याकडील बायकांचे मनोरथ सिद्धीस न्यावे हें आह्मांस ही आवश्यकच यास्तव महाराजांस[३] विनंती करून डागिणे मागविले आहेत. आले ह्मणजे राजश्री बापुराव[४] विश्वनाथ याजबराबर पाठऊन देऊं; नवरीस लहान डागि-

---

४६. जुनी वहिवाट.

*तिसरा रघोजी.

४७. बाकाबाई साहेब.

१ रघोजीचीं चार लग्नें झालीं. त्यांत पहिलें मानसिंगराव मोहिते याचे कन्येशीं ११८५ फसली मार्गशीर्ष मासीं झालें. ह्या मुलीचें नांव गजराबाई ठेविलें. बाकीच्या बायकांचीं नावें:—पार्वतीबाई, बाकाबाई व अंबिकाबाई.

‡ चिमाबाई आदिकरून.

२. हा साडेतीन शहाण्यापैकीं एक. याचे आड नांव चोरघोडे. हा देशस्थ यर्जुवेदी ब्राह्मण, नागपुराजवळ चिमुर नांवाचा गांव आहे तेथील राहणारा होय. याचे वंशज कोणी नाहींत. नागपुर येथें चोरघोड्यांचा मोठा वाडा होता. परंतु तो मोडकळीस येऊन आतां 'रीठ' ह्मणजे उजाड पडलेली जागा मात्र आहे.

३. रामराजे महाराज (इ. स. १७४९-१७७७).

४. बापुराव विश्वनाथ वैद्य हे पंत प्रधानाचे वकील सेनासाहेब सुभ्याच्या दरबारीं असत.

# दुर्गास्तव [आर्या]

दुर्गे नाशूत तव श्रीचरण प्रणतकल्प[1]नग मोहा ॥
महिषासुराहुनि अधिक आह्मां भक्तांसि अल्प न गमो हा ॥ १ ॥
ते शुंभनिशुंभ तसे कामक्रोधाख्य ही मथीं खळ गे ॥
दुर्गे हे तव भजनीं घातक न भले जसे पथीं खळगे ॥ २
होतो काळ हि दास चि कर जोडुनि सर्वकाळ जीवांचा ॥
दुर्गे स्मर त्यांसि ह्मणसि तूं सोडुनि सर्व काळजी यांचा ॥ ३ ॥
दुर्गे देवि प्राकृत जन नित्य स्वैरें[2] वैर जे करिते ॥
अरि ते मग जगदीश्वरि न लवतिल कसे दयासुधा सरिते ॥ ४ ॥
अत्यद्भुत रूप तुझें अत्यद्भुत भक्तवत्सले देणें ॥
अत्यद्भुत यश दुर्गे जालें लोकत्रयास जें लेणें ॥ ५ ॥
महिमा अहि-मानव-सुर गाती दुर्गे तुझा नवल यांचें ॥
काय निगम तव बंदी स्तव न घडे यांस ही न वलयांचे[3] ॥ ६ ॥
दुर्गे त्वद्वात्सल्यें इतर पितर लाजले तुला कोटी ॥
होवूत तव श्रीमच्चरणयुगीं प्राण हे तुलाकोटी ॥ ७ ॥
दुर्गे भगवति वधिले त्वां महिषप्रमुख खळ न रागानें ॥
कीं सुगति दिली हें यश देतें कलिदलनबळ नरा गानें ॥ ८ ॥
दुर्गे त्वां सर्वार्थप्रद केलें भव्य चरित गायातें ॥
त्वद्दृष्टि पुढें किति खळबळ पळ हि प्रबळ तरि तगाया तें ॥ ९ ॥
त्वां निर्मुनि नांदविलें नांदे त्वदधीन विश्व दुर्गे हें ॥
ज्यांत नसे तव पूजनगुणकीर्तनयजन तीं च दुर्गेहें[6] ॥ १० ॥
श्रमति प्रसू प्रसवतां बहुत चि विटती हि सेवितां बोळ ॥
तूं न तसि तुझा प्रेमें भक्षिति शक्रादि देवि तांबोळ ॥ ११ ॥
करिसी विनता रंका शक्र चि तूं रंक अविनता शक्रा ॥
विश्वस्थितिलय सरला कीं होतां भ्रूलता तुझी वक्रा ॥ १२ ॥
हरिहरविधि सेविति तव गुण सति यश हें न मज जडा कथवे ॥
पथ वेद कथिति सोडिति गति कामांचे कधीं हि या न थवे ॥ १३ ॥
दुर्गति गांजी जीवा जी कोणाचें हि नायिके दुर्गे ॥

---

१ कल्पवृक्ष. २ यथेच्छ. ३ कंकण. ४ नूपुर-तोरड्या. . ६ दुष्घरें.

तीतें द्रवोनि दीनीं तूं चि ह्मणसि विश्वनायिके दुर्गे ॥ १४ ॥
दुर्गे बळि-पर-निग्रहदक्षे शक्रादिदेव-राजी जी ॥
ती तुज करीं शचीच्या जोडुनि कर जेंवि देवरा जीजी ॥ १५ ॥
अणिमादिसिद्धि दासी संवाहिति चरण वारिती चवरें ॥
दुर्गे जी दास्य करी पावे यश तोषकारि ती च वरें ॥ १६ ॥
दुर्गे व्यसनसमुद्रीं ताराया तूं चि सादरा जीवां ॥
अगणित तरले स्मरले जे तुझिया भव्य पाद-राजीवा ॥ १७ ॥
दुर्गे अंजितें समरप्रारंभीं स्तवन तव नरें कथिलें ॥
दर्शन वरदान दिलें त्वां तरि च प्रबळबळ ततें मथिलें ॥ १८ ॥
दुर्गे तव प्रसादें नारि किति सर्व संपदा भुलती ॥
झुलती सिंधुर अंजिरीं शत्रूंची देखतां उरें उलती ॥ १९ ॥
दुर्गे देवि दयावति वरदे परदेवते सदाधारे ॥
तव यश ह्मणतें सादर मज सेवुनि जीव हो सदा धौरे ॥ २० ॥
श्रीदुर्गे कीर्ति तुझी विपुला अमृतप्रर्पा जगीं आहे ॥
लावितसे भवपांथश्रांतां सर्वां करावया आहे ॥ २१ ॥
प्याली श्रुति महिषासुर-शोणितबीजादि-घात-लीला जे ॥
दुर्गे ह्मणतां पररण गुरु ती श्रवणांत घातली लाजे ॥ २२ ॥
दुर्गे परमेश्वरि हें ब्रह्मांड स्वल्प तव महामाया ॥
मायासृष्टिसुते वरि करिसि सदां फार तूं महा माया ॥ २३ ॥
निज दुर्गति चुकवाया होति क्षम देवि कवि न यत्नांनीं ॥
जेंवि तव गुणस्तोत्रें ह्मणुन चि तुज गाति सविनय ज्ञानीं ॥ २४ ॥
दुर्गे देवि महासति बहुविनयें पसरिला पदर ज्यांहीं ॥
ते जन कृतार्थ केले संसारीं या तुझ्या पदरजांहीं ॥ २५ ॥
दुर्गे दुर्लिपि पुससी दाखविसी स्वप्रभाव पुनिवेसी ॥
न शरत्काळींच्या ये त्वत्पादनखप्रभावें पुनिवेसी ॥ २६ ॥
दुर्गे नारायणि तूं सर्वाद्या विष्णुची महाशक्ती ॥
देती प्रणतांसि तुझी सर्वेश्वरि भुक्ति मुक्ति ही भक्ती ॥ २७ ॥
प्रभुवर सुरतरु वेष्टुनि वसतीस तसी च तूं महा व्रततंती ॥
मिरवी तव प्रसादें जी ख्यात पतिव्रता महाव्रत ती ॥ २८ ॥
भजका वांछित देतें तव लोचन सानुकंप देवि वर ॥

---

१ दुर–गे अगे दुरजा असें. २ अष्टमहासिद्धी. ३ अर्जुनाळा. ३ विष्णुनें. ५ हत्ती. ६ अगणात. ७ तृप्त व्हा. ८ पाणपोई. ९ शरीराळा. निरविणारी. १० देळी.

देवि वररथ हि पाहे रवि हि न ज्या ज्ञानसंपदे विवर ॥ २९ ॥
दुर्गे देवि सुरासुरवीरजयाजय महा समर केले ॥
त्वां व्यास-प्रमुखाखिल-सुकवि निजपदांबुजभ्रमर केले ॥ ३० ॥
शक्रादि विषय न गणिति पात्र तुझ्या जे यशास हे माते ॥
स्पर्शमणि प्राप्त जयां भजतिल दुर्गे कशास हेमातें ॥ ३१ ॥
दुर्गे जड मूक हि जन नमुनि तुझें होय पादपीठ कवी ॥
लीलेनें चि गुरू यशा त्यांसी सांगोनि वाद पी ठकवी ॥ ३२ ॥
स्वचरितरंजितभर्गे गुणगणनाक्षमगणेशवाग्गर्गे ॥
श्रितदत्तचतुर्वर्गे रक्ष मज यशोविभूषितस्वर्गे ॥ ३३ ॥
दुर्गे तूं चरणनतां नव निधि किति ओपिसील नव लक्ष ॥
नवल क्षम तव यश करि विश्व करिल चंद्रकोटि न वलक्ष[1] ॥ ३४ ॥
दुर्गे जसि पावसि तूं तैसी अन्या न देवता पावे ॥
असती जरि सुसमर्था तरि न महेंद्रादि देव तापावे ॥ ३५ ॥
भवपतित ह्मणति कर दे वरदे परदेवतेसि तुजला जे ॥
दुर्गे उद्धरिसि तयां वत्सळ ह्मणवूनि सर्व तुज लाजे ॥ ३६ ॥
दुर्गे त्वद्दासाच्या पुरुषार्थ पडति बळें गळां ठावें ॥
त्वदभक्तें करितां जप तप विघ्नकृतच्छळें गळांठावें ॥ ३७ ॥
दुर्गे कां न तव यशोमृतपान ह्मणुनि नको रसिक लाजो ॥
तो अधिक चांद्रिकेचें सेवन पक्षी चकोर सिकला जो ॥ ३८ ॥
दुर्गे भस्म करावें मेरुसमा ही अघा तव ध्यानें ॥
भगवति घातीं स्मरतां तुज पावावा न घात वध्यानें ॥ ३९ ॥
दुर्गे गातां तारिति तव विपदब्धींत वासवा नावें ॥
कविमधुपानीं त्वत्पदपद्म चि सेवूनि वास वानावें ॥ ४० ॥
ग्रंथ श्री दुर्गास्तव आर्या लिहिल्या जपोनि चाळीस ॥
हा मोहास जसा श्रीराम नतमयूरमेघ वाळीस ॥ ४१ ॥

**समाप्त.**

---

१ शुभ्र, धवल.

[ साक्या ]

भक्तिस साधु चरित्रें बळ दे तारिसें अरित्रें [1] ॥ ध्रु० ॥
उत्तानचरण राजा परम ख्यात त्रिजगीं हरिसा ॥
परिसा मंदारासें [3] हि ज्याचे आश्रित म्हणति न परिसा ॥ १ ॥
ज्येष्ठ वधू सुनीति सुनीति च मूर्तिमती ती गुर्वी [4] ॥
परम प्रिया कनिष्ठा जाया त्याची नामें सुरुची ॥ २ ॥
ज्येष्ठा स्त्री प्रसवली जया तो ध्रुव बाळक निष्ठेचा ॥
उत्तम नामा दुसरा तातप्रिय बाळकनिष्ठेचा ॥ ३ ॥
एका समयीं सुरुचि सुतातें अंकीं घेउनि राजा ॥
लालन करीत बसला होता म्हणत रसा इतरा जा ॥ ४ ॥
सिंहासनीं बसावें आपण असि वांछा ध्रुव वाहे ॥
पाहे भूप उगाचि न घे कीं ती सुरुचि निकट आहे ॥ ५ ॥
परम कठिण ईर्ष्या [5] गर्ववती ती सुरुचि असें वदली ॥
जेणें साधुसभा बहु कांपे वातें जैशी कदली [6] ॥ ६ ॥
वत्सा दुर्लभ सिंहासन हें इच्छिशी बैसायातें [7] ॥
उचित नसोनि हि आक्रमिसी तूं सहसा कैसा यातें ॥ ७ ॥
राजसुत हि न पदोचित तूं कीं म्यां धरिलासि न पोटीं ॥
होतासि मदात्मज जरि असती पदरीं सुकृतें [8] मोठीं ॥ ८ ॥
अन्य स्त्रीसुत आपण ऐसें बहुधा नेणसि बाळा ॥
इच्छिसी दुर्लभ अर्थ म्हणोनचि नुमजुनि हीना भाळा ॥ ९ ॥
आराधिला अवंध्य मनोरथ व्हाया जो साधूंनीं ॥
सुतपें आराधुनि तो ईश्वर तदनुग्रह साधूनी [9] ॥ १० ॥
ये माझ्या पोटीं सिंहासनकाम मनीं जरि आहे ॥
ऐसें सुरुचि वदे निष्ठुर तें बाळ हि न ध्रुव साहे ॥ ११ ॥
आहिसा खवळुनि माते पाशीं तेथुनि रडतचि गेला ॥
पुसतां सुनीतिला श्रुत रोदनहेतु पुरजनें केला ॥ १२ ॥
दवदहनांत [10] लता तैसी ती बाळा शोकीं पडली ॥
आलिंगुनि बाळातें सोडुनि धैर्यातें बहु रडली ॥ १३ ॥
ती बाळासि ह्मणे बापा हा न परापराध मानीं ॥
कीं द्यावा दोष परा आपण जोडुनि नराधमांनीं ॥ १४ ॥

---

१ नाव. २ चाटूनें (वल्ह्यानें.) ३ कल्पवृक्षास. ४ नवऱ्याची. ५ असूया. ६ केळ. ७ बसतोस. ८ नशीब. ९ संपादन. १० दावाग्नीत.

राजा म्हणे मग तयांच पुरोहितांतें ।
कीं " यास न्या स्वसदनीं शिकवा हितातें ॥
ऐसें करा त्वरित कीं धरि लोक-रीती " ।
नेऊनि त्या द्विजगृहास तसें करीती ॥ ७१ ॥

तेथें मुलें जीं गुरु-गेहँ-वासी । तीं योजिलीं सर्व **जगन्निवासीं** ॥
त्या दैत्य-बाळां गुरु हा चि झाला । जो दाखवीतो स्वसुखा **अजाला** ॥७२॥
मुलांस हीं विस्मय फार वाटे । कीं लागला हाचि कसा सुवाटे ॥
ते पूसती हें तंव या द्विजाला । ठावें न तूंतें गुरु कोण जाला ॥ ७३ ॥
**प्रऱ्हाद** सांगे " स्वपिता तपातें । जाऊनि सोशी हिमें-आतँपातें ॥
इंद्रासि मागे विजयी शिराणी । धरूनि ने तो **दितिजेंद्र-राणी** ॥ ७४ ॥
गर्भांत मी हें भय तीस वाटे । तों भेटला तो मुनिवर्य वाटे ॥
म्हणे ' सतीची हरिसी त्रपा हे । **सहस्र-नेत्रा** ! निज नेत्र पाहें '॥७५॥
म्हणे **इंद्र** ' पोटीं इच्या पुत्र वाटे । तया जन्मतां लावणें मृत्यु-वाटे ॥
प्रतापें दिसे अग्नि-कुंडीं विधूमीं । वधूनी तया सोडवीतों वधू मी ॥७६॥
ऋषी बोले ' भक्त **त्रिभुवन-पतीं**चा परम हा ।
महा योगी पें हा धरिसि म्हणि ऐसा नियम हा ॥
महात्मा हा ज्याची अचळ **हरि**-सेवा-विभव-धी ।
वधी यातें कोण ? प्रभु कवच यातें निरवधी ' ॥ ७७ ॥

**इंद्रें** भिऊनि नमिली दितिजेंद्र-राणी ।
हो सुप्रसन्न **हरि** भक्ति अशा शिराणी ॥
जातां **सुरेंद्र** तिस सांडुनियां सुवाटे ।
केली प्रदक्षिण गुरू हरिभक्त वाटे ॥ ७८ ॥

जननिला च तयीं मुनि-शेखरें । श्रुति रहस्य निरूपियलें खरें ॥
परि मदर्थ अनुग्रह तो करी । उमजला मजला **हरि** लौकरी ॥ ७९ ॥
उमजला मजला **हरि** ज्या मुखें । गुरु च तो रुचतो हृदयीं सुखें ॥
शिकवणें कवणें मज त्याविना । निजपणीं जपणी जड दाविना ॥८० ॥
मानूनि मिथ्या न गणी भवासी । होतों बहू वत्सर गर्भ-वासी ॥
भिऊनियां या असुर-प्रसंगा । त्याच्या च या दुर्जन विप्र-संगा ॥ ८१ ॥
प्रपंच मिथ्या परि दुष्ट संगें । वाटे खरासा विषय-प्रसंगें ॥
भ्यावें कुसंगा प्रति साधकानें । न शब्द त्याचा धरिजे स्वकानें" ॥८२॥

---

१ घर. २ थंडी. ३ उष्ण. ४ दैत्यश्रेष्ठ. ५ हे इंद्रा. ६ धूमरहित. ७ ईश्वर. ८ अविनाशी.

दैत्यार्भकां हा हित शद्ब वाटे । समस्त ते लागति त्या च वाटे ॥
हें सर्व ही आयकतां च तातें । पाचारिलें क्रोध-वशें सुतातें ॥ ८३ ॥
गाळी-प्रदानीं न करूनि वाणी । वाणी वदे हो अपवित्र वाणी ॥
म्हणे " मरूं इच्छिसि रे ! निघातें । मारीन जो तूं न भिसी च मातें ॥८४॥
मी क्रुद्ध होतां मज लोक सारे । भीती भिती एक न तूं कसा रे ॥
या शासना लंघुनि दुर्गमातें । कोणा बळें सत्वर सांग मातें" ॥ ८५ ॥
प्रऱ्हाद बोले " जग गांजितोसी । ज्याच्या बळें आत्मपणें जितोसी ॥
रक्षी अनाथा मज ही हरी तो । ज्याला असा बाप चि संहरीतो ॥८६॥

माझें तुझें बळ चि तो इतुकें चि नाहीं ।
त्याचें च कीं बळ असे सकळा जना ही ॥
तूं शत्रु मानिसि तया असुर-स्वभावें ।
तो टाकिं देखसिल त्यास निजात्म भावें ॥ ८७ ॥

जिंकिले ह्मणसि लोक हि सारे । त्यांस नागविसि तस्करसा रे ॥
तें न ज्यास वश होति मनीं च । स्वर्ग मृत्यु जित मानिति नीच ॥८८॥
शत्रु सा स्वहृदयीं च रहाती । नित्य नागविति हें न पहाती ॥
शासनें दश दिशांत करीती । देखतों अशि हि कौतुक रीती ॥ ८९ ॥
चोर सा स्वहृदयांत रहाती । आणि मानिती चराचर हातीं ॥
श्लाघ्यता स्फुट हि ते च करीती । देखतों अशि हि कौतुक-रीती ॥९०॥
सा शत्रु कामादिक तूं निकामी । न जिंकिसी चित्त धरूनि कामीं ॥
कां श्लाघ्यता व्यर्थ तुवां वदावी ।" प्रऱ्हाद इत्यादिक भाव दावी ॥९१॥
या गोष्टिनें फार चि तप्त जाला । घे खड्ग बोले मग आत्मजाला ॥
कीं " तूं मरूं इच्छिसि रे ! निपातें । स्वयें असें बोलसि सन्निपातें ॥९२॥
शब्दासि या उत्तर हें चि वाटे । कीं तूज लावूं यम-लोक-वाटे ॥
जितोसि तूं हा क्षिण कोण सोसी । मी सोसितों आइक ते असोशी ॥९३॥
त्रिभुवनेश्वर तो मज वेगळा । तुज गमे सकळांहुनि आगळा ॥
जरि दिसेल अरे मज ये क्षणीं । वधिन त्या च पुढें तुज ये क्षणीं ॥९४॥
जरि समर्थ असेल तुझा धणी । तरि तुझी पुरवील चि तो धणी ॥
परि वद स्थळ कोण तया असे ,, । ह्मणुनि गर्जत शब्द करीतसे ॥९५
" असे कोठें तो रे ! तुज बहुत ज्याचे भरंवसे "
" वसे सर्वां ठायीं स्थिर-चर-पटीं तंतु गवसे " ॥
" दिसेना कां स्तंभीं " " मज दिसतसे तो नरहरी ॥

१ बाळक. २ कमताई. ३ सदृश. ४ पुल.

हरीतो दुष्टांचे त्वरित मद जो एक चि हरी " ९६ ॥
"असे स्तंभीं " ऐसें श्रवणिं पडतां शब्द असुरा ।
सुरा-पानी मत्त स्वहित विषयीं जो निजसुरा ॥
सुराधीश-द्वेषें करुनि दृढ खड्ग क्षय-करें ।
करें हाणी मुष्टी करुनि खळ खांबासि निकरें ॥ ९७ ॥
स्तंभ तो अवचितां चि कडाडी । अब्दं झाड अवघें चि तडाडी ॥
अब्जजादि-हृदयांत धडाडी । काळ मेघ-शत-नाद घडाडी ॥ ९८ ॥
खरी कराया निज भृत्य-वाणी । आणी सखी व्यापित ही न वाणी ॥
स्तंभीं सभे अद्भुत मूर्ति दावी । मनुष्य ना सिंह न ते वदावी ॥ ९९ ॥
मनुज-रूप नव्हे च न केसरी । सकळ सृष्टि करूं न सके सरी ॥
कनक-वर्ण कटीं पट केशरी । प्रकट होय असा **नर-केसरी** ॥१००॥
पसरित मुख मोठें आंत दंष्ट्रा कराळा ।
परम चपळ जिव्हा खड्ग जैशा निराळा ॥
युगल नयन जाणों तापलें हेमं पाणी ।
चहुं भुजिं नख-शस्त्रें देखिला चक्र-पाणी ॥ १०१ ॥
माना मनीं देखुनि दुष्ट भारी । कीं मूर्तिनें या मज **कैटभारी** ॥
मारील कीं जो वर घातयाचा । केला चुकावा बहुधा तयाचा ॥ १०२ ॥
सिंहावरी त्या मद-दैत्य-हस्ती । धांवे गदा घेउनि थोर हस्तीं ॥
पतंग अग्नीवरि जेंवि जातो । हाणी गदा थोर **अधोक्षजा** तो ॥ १०३॥
**विधि**-वर-प्रतिपालक जो **हरी** । न दिवसा न निशींत हि संहरी ॥
म्हणूनि युद्ध निशा-मुखीं तो करी । मग वधी बुडतां रवि लौकरी ॥१०४
अमरतो मरतो अति लौकरि । चपळ तो पळतो धरितां करीं ॥
उखळला खळ लाघव-लक्षणी । विलपती लपती सुर ते क्षणीं ॥१०५॥

आश्चर्य हें **नृहरि** मानुनियां महासें ।
सक्रोध हास्य करि उत्कट अट्टहास्यें ॥
तों झांकिले नयन भ्रांति मनीं निघाली ।
मांडीवरि **हरि** असास धरूनि घाली ॥ १०६ ॥

" न धरणीवरि मृत्यु न वा नभीं " । वर असा म्हणऊनि च जो न भी ॥
निज तनूवरि त्या खळ-शेखरा । चिरि धरूनि करी वर ही खरा ॥ १०७॥
न गेहीं न बाहेर यालागिं दारीं । बसे उंबरा पोट त्याचें विदारी ॥
सजीवें अजीवें मरेना तसा ची । चिरोनी नखें ते करी गोष्टि साची ॥१०८॥

---

१ मद्य. २ दैत्य. ३ मेघ. ४ ब्रह्मादि. ५ सेवक. ६ वाचा. ७ कमताई. ८ सिंह ९ तरवार. १० सोनें. ११ सायंकाळ. १२ श्रेष्ठ.

चळवळे निसटे करि तांतडी । असुर तो हरि काढुनि आंतडीं ॥
उदर फाडुनि घालितसे गळां । करि सुमंगळ देव अमंगळा ॥ १०९
चिरुनि वारुनि गंड जसा हॅरी । असुर मारुनि शोभतसे हरी ॥
दितिजें तो गज केशव केसॅरी । इतर साम्य करूं न शके सरी ॥११०॥
दितिज यूथप तो मृति पावला । असुर वारॅण-यूथॅपिं धांवला ॥
मृतकॅ तें ढकलोनि धरा तळीं । वधि तया हरि लाथबुक्यां तळीं ॥१११
पदतळें किति एक नखें करें । तुडविले तनुजेंद्रॅ भयंकरें ॥
असुर-नाथ-नृपासन त्यावरी । हरि बसे परि कोप न सांवरी ॥ ११२ ॥
निववि कोप असें सुर धातया । विनविती स्तविती बहुधा तया ॥
विधि ह्मणे दुरूनीं च नमो हरि । कवण या समयीं मन मोहरी ॥ ११३
स्तविति देव अजी कनकांबरा । असुर मारियला म्हणती बरा ॥
परि अनावर कोप रमा-पती । सभय लोक चतुर्दश कांपती ॥ ११४ ॥

विधि प्रार्थितो तेधवां श्रीरमेला ।
ह्मणे " थोर जो दुष्ट तो स्वैर मेला ॥
करीं जाइं माते ! प्रभु-क्रोध शांत ।
त्रिलोकी भिती हे दहा ही दिशांत " ॥ ११५ ॥

प्रार्थितां अमृत-सागरजा ते । सांवरोनि कनकांबर जाते ॥
जाय पाड किति एक रमा ते । तो गमे भय चराचरमाते ॥ ११६ ॥
परततां कर्बॅ्यंबर नावरे । पदर ही ह्रदयीं वरि त्रावरे ॥
स्मरण भाव न शीघ्र तिचा वळे । नयन चंचळ जीभ हि च वळे ॥११७

मग प्रऱ्हादातें ह्मणति अवघे भक्त परमा ।
" रमा ब्रह्मा कीं न स्वकृत विभु-कोपा उॅपरमा ॥
रमा-कांता येना तुजविण दया दैत्य-दमना ।
मनाच्या विश्रामा त्वरित करिं गा ! क्रोध-शमना " ११८ ॥
ज्याला भिती देव विरिंचि-पॅद्मा । प्रऱ्हाद त्याच्या धरि पाद-पद्मा ॥
जो वंदिला वंदित सर्व भूतें । करी तया दंडवत प्रभूतें ॥ ११९ ॥
बाळकें स्वचरणांबुॅरुहातें । वंदितां प्रभु जगद्गुरु हातें ॥
ऊचलोनि अवलोकुनि ठेवी । मस्तकीं अभय हस्तक ठेवी ॥१२०॥

कर-स्पर्शें झाले परम सुख तें दैत्य-तनया ।
न या संसाराचें स्मरण उरलें त्या सुविनया ॥

१ सिंह. २ दैत्य. ३ सिंह. ४ हत्ती. ५ कळपाचा स्वामी. ६ प्रेत. ७ दैत्य. ८ लक्ष्मी ९ केश १ वस्त्र १० नाश. ११ लक्ष्मी १२ कमळ.

न ये नेत्रीं दोनीं श्रवणिं न निघे शब्द सगळा ।
गळा दाटे प्रेमें त्वरित हरि जो मोह सगळा ॥ १२१ ॥

प्रऱ्हाद याउपरि होउनि सावधान ।
प्रेमें स्तवी **त्रि-भुवनेश** दया-निधान ॥
" **ब्रह्मादि** सात्विक तयां कळशी न देवा ! ।
मी तों " ह्मणे " असुर राजस **वासुदेवा** ! ॥ १२२ ॥
भक्ती करूनि तुज गाय **अधोक्षजाला** ।
झालासि तूं स्वपद-दायक त्या गजाला ॥
मारूनि नक्र गति दे द्विरदा[1] तयाला ।
यालागिं मी स्तवितसें वर-दातयाला ॥ १२३ ॥

मुखांतूनि नक्राचिया कुंजरासी । जसें सोडवीलें कृपा-पुंज-रासी ॥
तसें सोडवीलें मला देव-देवा । पित्याच्या करापासुनीं **वासुदेवा**"॥१२४॥
**प्रऱ्हाद** इत्यादि करी स्तुतीतें । अर्पी **नृसिंहासि सरस्वतीतें** ॥
कृपा तया ऊपरि देव दावी । यानंतरें ते चि गमे वदावी ॥ १२५ ॥
ऐशा स्तुतीनें **हरि** तुष्ट झाला । बोले कृपेनें असुरात्मजाला ॥
कीं " वर्णितां या निगमागमातें । संतोषलों मी वर माग मातें "॥१२६

ह्मणे **श्रीप्रऱ्हाद** " त्रिभुवन चि हें लोभकर जी ।
रजीं[2] मातें घाली क्षणि म्हणुनि हा शब्द वरजी ॥
रजीं[3] या पायाच्या सुख कवण नाहीं मज **हरी** ! ।
हरी दुःखें सारीं तव गुण कथा **श्रीनरहरी** ॥ १२७ ॥

अंतरीं धरूनि पूर्ण रिरिक्षा[4] । पाहतोसि निज *भक्त परीक्षा ॥
अन्यथा स्वभजन भाव न नासी । कां वदे करुण त्या वचनासी ॥ १२८
स्वामीस जो वेंचिल काम्य वाणी । वाणीज ते भक्ति हि दीनवाणी ॥
वाणी च कां सेवक वेतनाचा । निष्काम तो पंथ पुरातनाचा ॥ १२९ ॥
जशी लौकिकी भक्ति भृत्याजनाची । तशी क्षुद्र देवांस ही पूजनाची ॥
न तूं स्वामि तैसा नव्हे भृत्य कामी । वरा अल्प यालागिं मागें न कामी॥१३०॥
म्हणसि माग चि जी **कमळावरा** ! । त्वरित दे तरि या अमळा वरा ॥
किमपि ही उपजे च न कामना । करिं असें **विधिच्या** जनका! मना॥१३१॥
मनीं उद्भवे जेधवां काम कांहीं । तयातें करीं तेज लज्जादिकांहीं ॥
तनू प्राण सर्वेंद्रियां कष्ट भारी। जळाला करीं काम हा कैटभारी!॥१३२॥

---

१ हत्ती. २ रजोगुण. ३ धूळ. ४ रक्षण करण्याची इच्छा ( रक्षितुमिच्छा ) ५ इच्छा
छ ' भत्य ' पा० भे०.

सकळ काम मनामधुनी च जी । सुख अपार तयास चि सत्य जी ॥
वर चि देशिल जी, जरि लौकरी । न उपजे मनिं काम असें करीं ॥ १३३ ॥
प्रऱ्हाद-शब्दें हरि तुष्टला हो । ध्यावा ह्मणे हा चि यथेष्ट लाहो ॥
लक्ष्मी-पतीचें मन जो हरीतो । बोले असा त्यास वदे हरी तो ॥ १३४ ॥
"कीं बोल हे सत्य न अन्यथा रे ! । मद्भक्ति चित्तांत न अन्य थोरे ॥
ज्याला असें कांहिं न पाहिजे तें । त्याचें असें मी मनिं पाहिजे तें ॥ १३५ ॥

ऐसें तथापि जिस सिंधु[3]चिया च पाळीं ।
पाळी[4] स्वभूमि फळ हें तुझिया कपाळीं ॥
पाळीं तुझी ह्मणुनि सर्व वसुंधरा या ।
राया ! तुतें इतर योग्य न तें धराया ॥ १३६ ॥

एकाहात्तर चौकड्या कलि-कृत-त्रेता-युगीं द्वापरीं ।
हें मन्वंतर काळ एक इतुका जो होय या ऊपरी ॥
प्रऱ्हादा ! इतुकीं युग अधिक ही कांहीं तुझ्या शासनीं ।
पृथ्वी सर्व असो म्हणे नरहरी कीं, बैस सिंहासनीं ॥ १३७ ॥

त्या माजि माझी स्मर हे कृपा कीं । या पूर्विंच्या पातक पुण्य पाकीं ॥
उद्विग्न दुःखी न सुखी स्पृहा ही ॥ ऐसें असावें तरि निस्पृहां हीं ॥ १३८ ॥

स्पृहा-द्वेष-त्यागें अनुभाव अहो योग भलता ।
लता प्रारब्धाची असि च जरि तोडी कुशलता ॥
वदे प्रऱ्हादातें हरि कुशल भागा समज गा ! ।
जगामध्यें ऐसे तुम्हि सकळ मद्भक्त मज गा ॥ १३९ ॥

जडीं ही चिद्रूपा कपट-पट तंतूस मज गा ।
जगामध्यें पाहें हरि-सुमन-हारा न भुजगा ॥
जगाया या लोकीं भजन गुण गातो सतत रे ! ।
तरे त्याचे पायीं जन भव नदी-पार उतरे ॥ १४० ॥

प्रपंचाच्या त्रासें वनिं वसति कीं मौन धरिती ।
तरी त्यांची भेटी क्षय भव-भयाचा न करिती ॥
व्रती या गोष्टीचे बुध असति कीं विष्णु भजनीं ।
जनीं जाणावे ते रवि हरिति अज्ञान रजनी[11] ॥ १४१ ॥

घे भक्ति ही मुक्ति हि भक्त-राया । दे मुक्ति ही अन्य जना तराया " ॥
प्रऱ्हाद माथां धरि शासनातें । अंगीकरी तात-नृपासनातें[12] ॥ १४२ ॥

---

१ इच्छा. २ टिके. ३ समुद्र. ४ तीर ५ रक्षण. ६ पृथ्वी. ७ आज्ञेंत. ८ परिणाम ९ वेल. १० फूल. ११ रात्र १२ सिंहासन.

स्वपितयास न हो अधमा गती । ह्मणुनियां विनवी शिशु मागुती ॥
हरि म्हणे " सुत ज्यांस असा असे। सुगति पावति पातकि ही असे ॥ १४३
एकवीस निज पूर्वज सारे । उद्धरी सुत होतां तुजसा रे ! ॥
सत्क्रिया करि तथापि तयाची । म्यां तन चिरियली पितयाची ॥ १४४ ॥
या परी निज कृपा-अवलोका । दाखवूनि अपुनर्भव लोकां ॥
तें चि हें चरित लोक तराया । ठेविलें भव-नदी उतराया ॥ १४५ ॥
भुक्ति मुक्ति अशि दाखवि भक्ता । **वामनें** मन तया अविभक्ता ॥
अर्पिलें करुनि अर्पण बोला । ग्रंथ हा **नृहरि–दर्पण** बोला ॥ १४६ ॥
**नृहरि** थोर लहान हि दर्पण । प्रभु तयांत करी स्वसमर्पण ॥
इतुकियांत चरित्र समस्त कीं । जनिं धरू सुपुरुष हि मस्तकीं ॥ १४७
बोलतो करुनि अर्पण बोला । ग्रंथ हा **नृहरि-दर्पण** बोला ॥
**वामनें** त्रिभुवनीं प्रगटावें । यांत ये रिति च पुण्य वदावें ॥ १४८ ॥

**समाप्त.**

---

१. नीच. २. बाळक. ३. पुनः ४. दृष्टि. ५. आरसा.

# स्थालिपाक.

पांडूचे सुत द्रौपदी सहित ते होते जया काननीं ।
तेथें शिष्य दहा सहस्त्र सम तो दुर्वास आला मुनी ॥
क्रोधें तो स्फुट बोलिला निज मुखें दे अन्न ऐसें तिला ।
नेलें सत्व असें चि जाणुनि मनीं तीनें हरी चिंतिला ॥१॥
ये ये येइं रमा-पती यदु-पती गोपी-पती गो-पती ।
हे दामोदर दैत्य-भंजन दया प्रार्थोनि घे मत्पती ॥
ये भक्तांबुज-पद्मिनी-निशिपती[1] विद्वत्पती वाक्पती ।
दुग्धाब्धींत हि विव्हळा सुरपती काढीं मला श्रीपती॥ २ ॥
ये ये ये करूणाकरा सुखकरा ये ये कृपासागरा ।
ये ये मन्मथसुंदरा धरधरा विश्वंभरा भूधरा ॥
ये गोपीजन सागरा गुणवरा ये सर्व अभ्यंतरा[2] ।
ये माझ्या निज मंदिरा सुखकरा पाळीं मला श्रीधरा ॥३॥

हे द्वारकावासि सरोज-नेत्रा ! । कोठें अहेसी वद नंद-पुत्रा ।
ऐशी अवस्था मज प्राप्त झाली । तूं आसतां नाथ अनाथ झालीं ॥४

तेव्हां सुभाव धनुओढूनियां करानें ।
तो विंधिला श्रवणिं हो करूणा-शरानें ॥
भेदूनि तें स्थळ उरावरि जो निजेला ।
झाली बहू गमनिं तांतडि त्या अजाला ॥ ५ ॥

गलद्वसन सांवरी पडत हो हरी आंवरी ।
पडे चि धरणीवरी त्यजुनि खेचरी केसरी ॥
कृपांबु नयनांतरीं तिलक तो हि निद्रा हरी ।
दयांबुधि तया परी त्वरित पावला श्री हरी ॥ ६ ॥

कृष्णे ! आजि मला क्षुधा धडधडी दे अन्न कांहीं तरी ।
बोले द्रौपदि नाहीं कृष्ण बदला पाहे स्वपात्रांतरीं ॥
तेणें निर्मित एक पत्र हरिच्या हस्तांबुजीं आर्पिलें ।
तेणें तृप्त समस्त विश्व अवघे होऊनियां राहिले ॥ ७ ॥

**समाप्त.**

---

१ कमल. २ चंद्र.

# राधा-भुजंग.

हरीचा वियोगाग्नि-संताप राधा । न सोसूनियां आठवी स्वापराधा ॥
सखी एक दूती प्रिया फार तीची । बहू शाहणी मूर्ति जे भारती[1]ची ॥ १
करी तीस काकूळती सारसाक्षी[2] । ह्मणे भेटवीं सर्व संसार-साक्षी ॥
हरीवीण जाल्यें बहू दीन माये । त्रिलोकीं सये दुःख माझें न माये ॥ २
सदानंद जो सर्वदा मोदराशी[3] । तया भेटवीं आजि दामोदरासी ॥
त्वरें आणिं वो तो सये दानवारी[4] । जयावीण कोणीच खेदा न वारी ॥ ३
वियोगाग्नि जाळी मला केशवाचा । न बोलों शके ते सये क्लेश वाचा ॥
न तें सांगवे दुःख जें काम दे हा । त्वरें आणिं वो त्या घन-श्याम-देहा ॥ ४
तनू जाळितां त्रास येना शशीला । प्रभा[5] तावि तो ये सये नाश शीला ॥
उरें वीझतां जाळ भी विंगळां[6]ची । फुलांची तशी माळ भावी गळांची ॥ ५
दिशा तावितो चंद्रमा आजि दाहा । असा निर्मितो या तनूमाजि दाहा ॥
नव्हे चंद्रमा कोण कोणी वदेना । सुधा[7]-रश्मि[8] तो या परी ताप देना ॥ ६
न ये नीरद[9]-श्याम तों मी न जेवीं । नदी शुष्क तीमाजि तो मीन[10] जेवीं ॥
तृषा लागली नाथ-ओष्ठामृताची । शरीरासि ज्यावीण निष्ठा मृताची ॥ ७
सये कृष्ण-उत्कंठित प्राण कंठीं । धरूनी बळें काळ निर्वाण कंठीं ॥
ह्मणे भर्वशानें तुझ्या प्राण वाहें । खरें हें म्हणोनी तिची आण वाहे ॥ ८
दुजी कोण तत्पाद-राजीव[11] दावी । वृथा अन्यथा गोष्टि कां हो वदावी ॥
वदे लोचनीं नीरें[12] सक्लेश वाहे । अवस्था ह्मणे सांग वो केशवा हे ॥ ९
अशी राधिका बोलतां दीन वाणी[13] । भरे कंठ झाली पराधीन वाणी[14] ॥
धरूनी तिला पोटिशीं दूतिका ही । रडे आणि सांगे तिला नीति कांहीं ॥ १०
ह्मणे खोडि खोटी तुम्हां मानिनींची । पुढें तूं तरी बुद्धि ही मानिं नीची ॥
हरी दुःख त्या नाग[15]-नक्रोद्धरासी[16] । नको दाखवूं साजणी क्रोध-राशी ॥ ११
धरी मत्स्य-कूर्मादि रूपें दहा हा । तया ही वरी कोप केला अहा हा ! ॥
धरी पाठिशीं सागरीं मंदरासी । हरी तो चि कीं हा चिदानंद-राशी ॥ १२
जगन्नाथ जो कृष्ण नानावतारी । स्वयें होउनीयां जना नाव तारी ॥
हरि काम-कोपादिकां साजणांसी† । नको कोप त्या तारका साजणासी* ॥ १३

१ सरस्वती, २ कमलाक्षी. ३ आनंदपुंज. ४ दैत्यशत्रु. ५ शोभा. ६ निखारा. ७ अमृत. ८ किरण. ९ मेघ. १० मासा. ११ कमळ. १२ पाणी. १३ शब्द. १४ रदश. १५ हत्ती. १६ सुसर. † सहा जणांस ( षड्रिपूंस ). * हृदयवक्रभास.

खगेंद्रीं[17] अहींद्रा[18] नुरे जेथ दावा । तया दाविशी कोपरूपाग्नि-दावा ॥
वनामाजि निर्वैर त्या व्याघ्र-गाई । कसा क्रोध त्याशींच तूझा अगाई! १४
तरी क्रोध तूं टाकिं वो स्वापराधें । करीना हरी तूजशी कोप राधे ! ॥
स्वयें जातसें मीच आधीं वनातें । त्वरें आणितें त्या जगज्जीवनातें ॥१५॥
ह्मणे दूतिका टाकिं या काळजीला । त्वरे आणिनें शीघ्र गोपाळजीला ॥
वदोनी असें चालिली काननातें[19] । वनीं देखिलें त्या मृगांकाननातें[20] ॥ १६ ॥
शिरीं पाय त्या गोप-कांता-पतीचे । नमूनी वदे क्लेश संताप तीचे ॥
ह्मणे चूक तीची क्षमा देवराया ! । करूनी पुन्हा पाय हे दे वराया॥१७
जरी चूक झाली तरी राधिकेला । नव्हे योग्य हा जो तुम्ही[21] आधि केला ॥
तुतें मी ह्मणों काय हो लोक-पाळा । असे बोल आह्मां स्त्रियांचे कपाळा १८
वियोगें तुझ्या वर्जिलें अन्न-पाणी । मुखातें सदा वाहते खिन्न पौंणी[22] ॥
करें पूर्ण तारा[23]-पती अर्द्ध जाला । घना दाट त्या ही वरी मूर्द्धजाला[24] ॥ १९ ॥
मुखीं सर्वदा गुंतला एक पौंणी । दुजा तर्जनीनें[25] हरी शोक-पाणी ॥
तरी काय सांगों तिच्या मी कराची । प्रभा जो धरी तप्त चामीकराची[26]२०
सुधे[27] तुल्य पाजोनि दंत[28]-च्छदासी । कशी आजि केली जशा तुच्छ[29] दासी॥
नसे पाड जेथें जगत्स्वामिनीचा । तया काय लेखा[30] अशा कामिनीचा॥२१
तथापि स्त्रिया भाग्य-युक्ता सदैवा । भजों तूज ज्या नित्य मुक्तास देवा ! ॥
मनीं काम या बायकांचे च पेटे । तुम्हांला न तत्सायकांचे[31] चपेटे[32] ॥ २२
जरी प्रीति हे होय देवा नराशी । तरी नाचवूं जे रिती वानरासी ॥
कुयुक्ती वृथा ये स्थळीं भामिनीची । प्रभा चंचळा जेंवि सौदामिनीची[33]॥२३
म्हणोनी च टाकोनि सर्वां उपायां । सकामा तरी सेवितों या च पायां ॥
असे बोल बोलोनियां पाद-पद्मा[34] । धरी मस्तकीं ज्या पदीं नित्य पद्मा[35] ॥ २४
असा प्रार्थुनीयां हृषीकेश[36] वाचे । धरी पाय सप्रेम त्या केशवाचे ॥
घरा भक्ति-भावें सखा चालवीला । न अन्या नरा सारिखा चाळवीला ॥२५॥
करूनी क्षमा सर्व राधाऽघराशी* । हराया तिची काम-बाधा घरासी ॥
तिच्या चालिला दूतिका-हस्त हस्तीं । धरूनी जसा चालतो मत्त हस्ती ॥ २६
प्रतीक्षा करी मंदिरीं कंबु-कंठी[37] । त्रुटी[38] जे युगाहूनियां थोर कंठी ॥
शुभें सूचती तों अकस्मात तीला । ह्मणे दूतिका आणिते श्री-पतीला ॥ २७

---

१७ गरुड. १८ सर्पश्रेष्ठ. १९ वन. २० चंद्रमुख. २१ मनोव्यथा. २२ हात. २३ चंद्र. २४ केश. २५ आंगठ्या जवळचें बोट. २६ सोनें. २७ अमृत. २८ ओंठ २९ नीच. ३० हिशेब. ३१ बाण. ३२ तडाखा. ३३ वीज. ३४ कमल. ३५ लक्ष्मी. ३६ हृषीक = इंद्रिय + ईश = स्वामी. = जितेंद्रिय. * पापराशि. ३७ शंख. ३८ अत्यल्प काळ.

म्हणे लोचनाचें लवे सव्य[39] पातें । पाहायासि लोक त्रयांच्या नृपातें ॥
त्वरें आजि भेटेल मांडीस मांडी । म्हणूनी स्फुरे भानि उल्हास मांडीं ॥ २८
म्हणे **कृष्णजी** आजि दृष्टी पडावा । भुजांमाजि मझ्या **हरी** सांपडावा ॥
**हरीचा** रती-संग तो ही घडावा । शुभीं सूचकीं अर्थ हा ऊघडावा ॥२९
असा हर्ष मानूनियां गोपदारा । उठे जाय बाहेर तत्काल दारा ।
पहाते बहू दूर न्ह्याळूनि दृष्टी । ह्मणे लाभ आहे मला हा अदृष्टीं[40] ॥ ३०
अकस्मात तों मूर्ति **गोविंदजीची** । दिसे पुत्रता मानि जो **नंदजीची** ॥
पहाते प्रिया ती प्रियाचे मुखासी । त्रि-लोक मधे दाटि जाली सुखासी ॥३१
भुजीं कंचुकी फाटताहे तडाडां । करीं कंकणें फूटती ही कडाडां ॥
पुढें होउनी तत्करांभोरुहातें[41] । उरोजीं धरी गाढ रंभोरु हातें ॥ ३२ ॥
घरामाजि नेऊयियां ये रितीनें । **मुकुंदा**सि आलिंगिलें गाढ तीनें ॥
वियोगें तुझ्या दीन मी **चक्र-पाणी**[42] । म्हणे तों भरे लोचना माजि पाणी[43] ॥ ३३
पुशी **चक्र पाणी** करें अश्रु तीचे । जया वर्णिती वेद वृंद श्रुतिचे ॥
करी जो स्वदासाचिया ध्वस्त काळा । जळें कज्जळें तो तिच्या हस्त काळा ३४
शिरीं वंदिती वेद पादांबु[43] ज्याचें । पुशी तो तिचे नीर[43] नेत्रांबुजांचें[44] ॥
कुचाग्रा[45] वरी बिंदु जे कां जळाचे । पुशी थेंब काळे निळे का जळाचे ॥ ३५
हराया तिचे सर्व ते कष्ट भारी । करी मुक्त-नीवी तिला **कैटभारी**[46] ॥
धरी सर्व जानूवरी भार तीचा । समारंभ ऐशा रिती त्या रतीचा ॥ ३६
स्वयें फेडुनी शीघ्र चोळीस तीच्या । कुचाग्रां करें शीघ्र चोळी सतीच्या ॥
उरोजीं रतीं सर्वदा हस्त नाचे । तिचे नीववी सर्व दाह स्तनाचे ॥ ३७ ॥
कुचाग्रां वरी हार मुक्ताफळांचा ॥ रतीं शोभतो **श्रीहरीच्या** गळांचा ॥
शिळा गंडकी मूर्ति पुष्पायुधाची । वरी माळ ते शंख-धारा दुधाची ॥ ३८
रति-स्वेद शुद्धाभिषेकासि पाणी । करी तेथ निर्माण शंखाब्ज[47] पाणी ॥
यजी कृष्ण मूर्ती तशी चूचुकांची । रती माजि ही भक्ति दावीत साची ३९
जया अंबरीं स्पर्श भूतां बराचा । न मूर्तीस या स्पर्श दंतांबराचा ॥
कटी सूक्ष्म **राधा** वयें धाकुटी ते । शिळा-भार वाहे उगीं संकटीं ते ४०
जगद्व्यापका मन्मथा काय जीं तो । स्तन-द्वंद्व-रूपें हरी तो यजीतो ॥
जगीं जे स्थळीं द्वंद्व संपुष्ठ होतो । पहा देव तो ते स्थळीं स्पष्ट हो तो॥४१
करी गोपिका-संग-लीला **हरी** तो । जिणें विश्व-पापावलीला हरीतो ॥
पदें पावती वर्णितां उंच देही । रते तो व्रज-स्त्री-सरोमांच-देहीं ॥ ४२ ॥

---

३९ डावा. ४० नशीब. ४१ कमळ. ४२ हात. ४३ जळ. ४४ नेत्रकमळ. ४५ स्तन. ४६ कैटभ=शत्रु. ४७ कमळ.

रती काम देहीं समारंभ भारी । रती-नाथ रोमा गुढ्या हो उभारी ॥
स्मरें क्रीडतां ये रिती संग जाला । गमे तो चि अष्टादिकां अंगजाला ४३
नगांचे पदीं घोष एके चि काळीं । सुवाद्यें च कीं त्या सुखाचे सुकाळीं ॥
ध्वनी ते सुरांच्या चि वाजंतरांचे । न त्या उत्सवीं नाद वाद्यांतरांचे ॥४४
नर श्रांत देखोनि पुंभाव-रीती । रतज्ञ स्त्रिया भोग-काळीं करीती ॥
ह्मणोनी प्रिया आपणा सांवरूनी । करी त्या रतीच्या विलासा वरूनी॥४५
जसें वर्णिती काम-शास्त्रीं निबंधीं । यथापूर्व बांधा न सोडूनि बंधीं ॥
अकस्मात घाली तळीं **श्री-पतीतें** । वरूनी करी ऊफराटे रतीतें ॥ ४६॥
स्थिर ब्रह्म तेथें चल स्वैर माया । तिहीं घेतलीं दोन रूपें रमाया ॥
न हाले **हरी** त्यावरी गोप-दारा । करी रम्य चांचल्य-लीला उदारा ॥४७
उठे ऊफराट्या विलासा चि माजी । असे घोष तो मेखळांचा समाजीं ॥
तिच्या उत्तमांगाहुनी उत्तमांगीं । फुलें वर्षती आणि सर्वोत्तमांगीं ॥ ४८ ॥
उभारी हरी छत्र मीन-ध्वजाचें । **हराचे** भयें राज्य विध्वंस्त ज्याचें ॥
बहू वर्षले **देव** देखोनि दृष्टी । पडे **ब्रह्म**-लोकाहुनी पुष्प-वृष्टी ॥ ४९ ॥
**स्मराचा रथ स्वामि गोपाळ** साजे । ध्वजीं **राधिका** मीन-नेत्री विराजे ॥
पताकांसि दृष्टांत तीच्या कुचांचे । वरी बांधिले गुच्छ भारी कचांचे ॥५०
**हरी** ऊर्ध्व-रेता द्रवे गोप-जाया । रमे जो तिचा शोकसंताप जाया ॥
जयाला न ये भोगआल्हाद-वार्ता । निवे ते च कामाग्निनें जे दवार्ता ॥५१
रतांतीं तिच्या त्या सुखाच्या समुद्रा । पडे वर्णितां मौन्य वाचेस मुद्रा ॥
सुखीं मग्न होतां चि आत्मा सतीचा । नुरे स्फूर्ति राती मध्यें ती सतीच्या५२
निजानंद-सिंधूमधें जेंवि योगी । सुखें मज्जती कल्पनेच्या वियोगीं ॥
गळां हस्त वक्ष-स्थळीं **कृष्णजीचा** । रतांतीं दडे काम तो पूर्ण जीचा५३
जरी टाळिल्या कामना **वामनानें** । कथा वर्णिल्या विश्व-नावा मनानें ॥
तरी निर्गुणात्मत्व दे देव तारी । मना आवडे **कृष्ण** लीलाऽवतारी ॥ ५४
न या तो कथा मन्मथानायकांच्या । जगोद्धारका **द्वारका**-नायकाच्या ॥
सकामां जरी श्रोतयां काम वाटे । तरी चित्त लागे घन-श्याम-वाटे ॥५५
ह्मणोनी च वर्णीतसे **वामनाची** । अशी वैखरी हे चि सेवा मनाची ॥
अहो चाळितो जो **हृषीकेश** वाचा । असे निर्मिला ग्रंथ त्या केशवाचा॥५६
कथा वर्णिली हे भुजंगप्रयातें । असे वर्णिलें जेथ **राधाप्रियातें** ॥
असें नांव **राधा-भुजंग** प्रबंधीं । हरी कीर्तनें वर्णनें क्षिप्र बंधा ॥ ५७ ॥

समाप्त.

---

४८ आठ सात्विक भाव (शरीरज) ४९ दागिना. ५० मस्तक. ५१ कृष्ण-शरीर. ५२ नष्ट. ५३ ब्रह्मचारी. ५४ प्रकरण. ५५ सत्वर.

अपि च अद्राक्षुरतिदूरत एव ते निरस्तरजस्तपोऽयतिकरतया निर्मलसत्व-प्रकाशराशिमिव निष्कलंकशशांकेष्टकासंघसंघाट्टितामिव निरिंधनज्वलदबिंधनज्वालापरिवर्तपिंडितदुग्धसागरोर्मिभिर्निर्मितमिव चिरनिपातघनीभूतशारदाशिरश्चंद्रचंद्रिकाविकीर्णनीहारसारसाधितमिव त्रैविक्रमचरणाक्रमाविद्धविध्यंडकपालनिर्गलदलकनंदानिपातधौतामिव विमलभास्वरप्रभावभासितनभोविभागमपास्तलंकानुषंगतयेव धूमादिमार्गचंक्रमणपंकिलचरणपशुजनानाक्रमणीयमशेषभुवनसर्गानशेषसारैरिव विलक्षणैः शब्दादिभिर्विषयैरुपस्कृतमनुश्रवमयैर्प्राकारैरभ्युदयिकोपासनामयैर्गोपुरैरात्मोपासनामयीभिः कक्षाभिः प्रणवमयेन चास्थानमंडपेन परिशोभितं निजनिजकार्यनिवेदनावसरप्रतीक्षितत्तल्लोकाधिकारिकारितसंमर्दबहिर्द्वारवितर्दिकाभागमागंतुकगंधर्वकिन्नराप्सरःसमारब्धतौर्यपूरितप्रथमकक्ष्यमनभिसंधिसत्कर्मयोगानिर्मलकर्मादिवृंदपरिक्रमितद्वितीयकक्ष्यमतिगहनन्यायसांख्ययोगादिदर्शनतत्वामर्शनव्यसनकर्शितकणादकपिलपतंजलिप्रमुखविद्वदुद्दामजल्पकथाघोषघोषिततृतीयकक्ष्यमतिविचित्रतरत्रयीशिखरोपपादितोपासनाभेदवासनासनाथमुनियूथदर्शिताश्चर्यतुर्यकक्ष्यमतिरहस्यवैश्वानरदहरादिविद्यापरिचयानवद्यमहर्षिदर्शितापासनाप्रपंचंपंचमकक्ष्यमतिदूरविसृष्टदृष्टानुश्रविकविषयामिषरिरंसागंधपरमहंसावंतासितषष्टकक्ष्यमतिचातुर्यपर्यवस्थापितानुश्रवतात्पर्यपर्यालोचनापनीतविपरीतान्वयशंकाकलंकानिरंकुशकुशलजनालंकृतसप्तमकक्ष्यंप्रसंख्यानपरासंख्यभृग्वंगिरोवासिष्टाधिकारिकमुनिमंडलमंडितास्थानमंडपमपदांविपदामगोचरं वाचामनाशसंनीयमर्वाचांप्रमाणानामगम्यमाचारमात्रशरणैरसाध्यमध्वरैरलभ्यमधिकैरामितयागविपाकैर्दुरवगाहमाहवसाहसैरसंभावनीयं भवनं ।

स्वाध्यायाध्ययनादृतेन विधिना दृष्टयापि नालोकिताः
सभ्यैः प्रत्युत सर्वभोगविमुखैरुत्सारिता दूरतः ॥
नृत्यंतः सुरसुभ्रुवः परमधुस्तत्र व्यथां मानसी
मानंदैकपदेपि धामनि कलाकौशल्यवैफल्यतः ॥ ९ ॥

प्राकारगोपुरविहारवितर्दिकानां
मूलेषु यत्र हरिनीलशिलाविभंगाः ॥
सक्ताश्चिरादिव जयातियगांतधूम-
संतानसंघटितसांद्रमषीविलेपाः ॥ १० ॥

प्रविशंतश्च तमालयं ननु प्रातरागतस्य पुरुहूतनाम्नो दिवस्पतेः कतितमः पुरंदरो नामायमिति पृच्छयमाना दौवारिकैः निर्जरा बलवल्लज्जिरे अपि च ग

---

१ तत्वावेतस - भारण चक्रुः । ३ रचना

च्छतामंतरेषामालक्ष्यगतिमतिमलीमसामधिगंतव्याधिगमनेन निर्वृताः सर्वतोपि महर्षयः कतिचिदतिचिरंकालमहो खलु वयमप्यमीषां सामीप्यसारूप्यसालोक्यसिद्धिमाशंसमानाः नानाविधानि तपांसि वृथा चक्रमेति गर्हमाणाः स्वमात्मानं लज्जितानमरान्भूयोपि लज्जयांचक्रिरे ।

अथ भगवानांगिरसो देवर्षिभिः परिष्वज्यमानः पदे पदे नारदादिभिः प्रत्युद्गम्यमानः विद्वद्भिः पतंजलिप्रमुखैराभिवाद्यमानः सिद्धविद्याधरैरानीयमानः सबहुमानमाप्तभृत्यैः परमेष्ठिना परिवृतो देवैः परमाश्चर्यनिर्भरैः प्रकृतिगुणैरिव परस्परयोगावियोगपरिणमद्भिर्दैहच्छावचैर्मणिभिरुपरंजितमुपर्यास्तीर्णहंसतूलिकातल्पकल्पितमहार्होपबर्हमहिंसानृशंस्यकोमलमावर्जितशमाभोगमंत.करणमिव महायोगिनां तांबूलकरंकचामरतालवृंतकलाचिकाद्युपचारचतुरवरवर्णिनीजनन्यस्तवामहस्तवेष्टिततया व्याकोचाष्टदलात्मिकां व्यंजयादिव कलासनतां त्रिभंगिसमुन्नतमित्रवर्गीतातमिव सर्वतोभद्रभद्रासनमाधीतिष्ठतं समसमयसमुद्यदादित्यसहस्रभास्वरैरर्केंदुविद्युदनलरूपचतुस्तेजःसमुत्तंभनायेव चतुर्दिक्षु निर्जिहानैस्तेजोभिरवलुंपंतमिवदिव्यमपिचक्षुर्दिवौकसां संततव्यवहारसंसक्तचतुरागमाक्षरप्रेक्षणायेदंतचांद्रिकाविकासपरिहृतसंसारशार्वरैरायतापांगरिंगदभंगुरकरुणातरंगमालाभिराचार्याभिषेकमादधानैरिव योगिनामध्यात्मविद्यासु चतुर्भिरिवांतःपुरैर्दयितानां चतसृणामपि श्रुतीनामाननपंकजैरनुगृण्हंतमभितो महाशयान् मुकुटावलोकनालंबितहंसदशार्जितेन मृणालवलयेनेव मृदुना शुचिना च सूत्रमयेनोपवीतेन सूचयंतामिव सूत्रात्मतामात्मनःशस्त्रास्त्रविद्याकूपारपारीणक्षत्रियवर्गसर्गनिर्वृततयेव शस्त्रग्रहपराङ्मुखेन प्रकृत्यादिपृथिव्यंतपंचविंशतितत्वपरिवर्तनमात्मेव व्यापार इति प्रदर्शयतेव पाणिना दक्षिणेन परिवर्तयंतमक्षमालिकामहर्मुखेषु प्रथममपामेव स्रष्टव्यतामवधार्य धार्यमाणेनेव स्फटिकमयेन कमंडलुना परिष्कृततरकरपल्लवमसकृदधीताध्यापितनिखिलनिगमांतसिद्धांतपांथसनकसनंदनादिमहादेशिकोद्भासितदुर्भेदसंशयच्छेदसंवादजिज्ञासयामुहुर्मुहुरवलोकयंतमंतिकगतां वाग्देवतामाचार्यमाचार्याणामधिगंतव्यमधिगंतव्यानां परमानंदतुंदिलमपि प्रपन्नानुग्रहव्यसनिनं समष्टि भूतग्रामस्य साधारणं पितरमखिललोकस्य विश्रांतिभूमिं विद्याफलानां विरामपदं वाग्विभूतीनां दूरं दूराशयानामदूरमात्मवेदिनामधिगम्य भगवंतं पितामहमत्यद्भुतसभासभानाथसंदर्शनजडीकृतो वाचस्पतिरपि भगवान् वाग्देवतावलोकनसंपन्नभयकंपसंभ्रमस्तंभितवाङ्मुखः क्षणमवाङ्मुखश्च तदीयदिव्यतेजःप्रतिहतदृष्टितया यावदास्ते स्तब्धमिव तावदनुग्रहमय्या दृशा जगान्निधेरागच्छ वत्सेत्यमृतासारगिरा च गिरां देव्या निर्व्याजमाप्यायितः समाधाय कथंचिदंतरं करणमनुस्मरन्प्रणवमावर्तयन् ब्रह्मसूक्तानि तत्तदागमोदितानि प्रागेव न

सोपि भक्तिभारेण प्रणम्य शतशः सहामरैः प्रसादाद्देवदेवस्य प्रारभत किंचि-
देवमभिधातुं ।

अगंतव्यं तर्कैरनधिगमनीयं क्रतुशतै
रनासाद्यं दानैरनुपसरणीयं च तपसा ।
भवंतं पश्यंतः शुचमभिभवंतं प्रणमतां
कृतार्था जाताः स्मः पुनरपि कृतार्था पुनरपि ॥ ११ ॥

किंच ।

भूतग्राममिमं चतुर्विधमहो निर्मासि यल्लीलया
यच्च व्याकुरुषे निरंतरममी सांगाश्चतस्रः श्रुतीः ॥
चातुर्यं कथमीदृगित्यपगता शंका समस्तापि न-
श्चातुर्यं भवतो भुजेष्वपि मुखेष्वद्य स्वयं पश्यतां ॥ १२ ॥

इति सच ततः साधु वत्स साधु

स्थाने खलु छंदोगा बृहती वाक् तस्याः पतिर्बृहस्पतिरिति नाम ते निराहुरिति
प्रशस्य प्रम्लानइव लक्ष्यते कुतः पाकशासन इति पृच्छति सानुकंपमंभोजसंभवे
पुनरिदमभाषत ।

परिम्लाना दीनाश्चिरपरिहृतस्वस्वभवना-
श्चरंतः पादाभ्यामवनिवलये भिक्षव इव ॥
यदा ख्यातुं दुःखं तव सविधमेते परिगता-
स्तदद्य व्यस्मार्षुः पदमिदमुपेता वितिमिरं ॥ १३ ॥

अपि च ।

यत्प्रत्यस्तमितप्रपंचमखिलव्याहारपारंगतं
प्रत्यग्ज्योतिरनुत्तरं शमधनैरालोच्यमेतादृशैः ॥
तत्संप्रश्नकथासुधाभरितयोः सेक्तुं भवत्कर्णयो-
र्मिथ्याज्ञानविचेष्टितानि बलवज्जिज्ञेति जिह्वैव नः ॥ १४ ॥

अथाप्यनुयोगाज्ञानिर्वर्तनाय किंचिदावेद्यते योसावग्रतो भवतः परिणामइव
करुणायाः परिपाकइव शमदमोपरमाणामधितिष्ठति शमवतामग्रासनं दुर्वासाः
सोयमेव सर्वासां निदानमस्मदापदां ।

अव्याजकोपनिधिना मुनिनाऽमुनैव
निर्वासिता सुरपतेः सुरलोकलक्ष्मीः ॥
आसाद्य दानवकुलानि दिवौकसो न-
श्चक्रे पदं कृपणमानवदुर्दशानां ॥ १५ ॥

अपि च । अथ यद्भवतैव कल्पितमध्वरहविर्जीवनममर्त्यानामपहृते तस्मिन्न-

सुरैरसंभविते च यथा कथंचिद्दाने द्विजन्मनां अशिक्षिते च भौमवदन्नसाधनस्य व्यसने भवत्प्रसादादवधूय सौवर्गराज्यसिसाधयिषामपहाय दिव्यभोगेषु कुतूहलमन्नायैव स्पृहयमाणाः निरंतरमनिमिषतया श्रमावर्जितमूर्छास्वापमप्यलभ्यमानाः सुलभमाना दिवौकसः सूक्ष्मतरं व्युदपद्यंत दुर्लभानामन्नार्थिनामर्थनाभंगमंदाक्षसंधुक्षितांतरज्वालाकलपसंभृतेषु मानवानां यदि यज्जीवितमेतैस्तदायुषा कल्पितेन भवतैव यास्यियती मांसलता साप्यन्नापायशोकेन आस्तामिदं ।

प्रेक्षावंतो दिशि दिशि नराः प्रेक्ष्यमाणा धरण्या-
मित्थंभूतान्सुरपरिवृढानिंद्रवैश्वानरादीन् ॥
तत्तत्साम्योदयफलपरामप्रमाणां पुराणीं
मत्वा वाचं विदधति शनैः कर्ममार्गेष्ववज्ञाम् ॥ १६ ॥

अथवा किमिदनावेदनीयमस्माभिः ।

अभिदधति ते मूर्धानं त्वामनुश्रवसूक्तयः
सुचिरमसुराश्चैनामित्थं तुदंति दुराशयाः ॥
निगमशिखराभ्यासव्यासंगतो यदि विस्मृतं
तदपि भवता तन्नो दौष्कर्ममित्युपरम्यते ॥ १७ ॥
इमे वयमिदं तत्त्वमित्थं स्थानमियं दशा ॥
परं यदत्र कर्तव्यं प्रमाणं तत्र नो भवान् ॥ १८ ॥

इत्यावेद्य विरमत्यांगिरसे विनमत्सु च युगपदमर्त्येषु प्रसादयन्सर्वानिदमाह पद्मसंभवः विदितवेदितव्यैर्भवद्भिरित्थं न प्रतिपत्तव्यं दुर्वाससि यतः परिणाम एव करुणायास्तत एव महेंद्रमनुजगृहे तनीयसा शापेन अपरथा कथमतिवाहनीयमिंद्रेण परःसहस्रैरपि वत्सरैर्निखिलजगन्मातुरंबिकायानिर्माल्यसमुल्लंघनप्रसूतमिदं दुरितं तदस्मिन्महत्यपराधे यावत्क्षपितमेतदेनस्तावदनुस्मरणमपि भवतामपराधो महानिति चकितैरस्माभिरेतावदुदासितं महदपीदं दुरितं मंदरपरिसरावासेन परिहृतमेव सवासनं तदपि जगज्जननीचरणापराधसंसर्गादधुनापि शंकमानैरस्माभिरन्य एवोपायः समुल्लिखितो भवदनुग्रहे नारायणीप्रसादतिरस्कारजोयमपराधो नारायणीयप्रसादपुरस्कारेण समाधेयइति ॥

तथा हि ।

यदेतद्वामांगं घनजघनकेशस्तनभरं
कदाचित्तच्छंभोर्भवति कमलाकौस्तुभधरं ॥
जगन्मातर्येवं यदपचरितं तन्मघवता
जगन्माता देवः प्रभवति सएव क्षपयितुं ॥ १९ ॥

तदा गच्छत क्षीरसागरं तत्र दर्शयिष्यामो भगवंतमिति वदन्नासनादुत्थायांतर्दधे भगवान असंभवः।

अथ कथमप्यमर्त्यपतयः परित्यज्य भयं
गुरुकरुणाविशेषपरिणामकृताभ्युदयाः ॥
अखिलजनुष्मदाशयगुहाशयमप्युदधौ
शयितमिमे समेतु मुदेपुंजत शार्ङ्गधरं ॥ २० ॥

किंच।

पथि ध्वजं यं गरुडध्वजस्य प्रस्थाय यांतो ददृशुर्दिगीशाः ॥
तमेव सद्यस्तदनुग्रहस्य भविष्यतोपि ध्वजमग्रहीषुः ॥ २१ ॥

अवतरंतश्च ते सत्यलोकादनेकसहस्रयोजनमपि पंथानमतिलंघितं गणयंतो गव्यूतिमात्रमिव गणयंतो गुणयंतो भाषितानि चतुर्मुखस्य गुरुणाकृष्यमाणतयेव झटित्युपनिपत्य विशश्रमुः। अविश्रांतपरिभ्रमदभ्रमारुतसंपातविनीतपथिकव्यथे जलदपथे अद्राक्षुरपि ते तत्र निद्राणपुराणपुरुषनिद्राभंगमपराधमाशंक्य संत्रासयंतमिव विद्रुमकांडवत्दंडैरनिवार्यमौखर्यसमुल्लासदुर्ललितानि कल्लोलमंडितानि निरिंधनज्वलदाबिंधनज्वालासंबंधान्निष्यंदमानामिव वीचिभिश्चिरपरिचितक्षीरमेघरसास्वादसुहितचातकपोतसावज्ञनिष्ठयूतचंचुपुटनिपतदितरमधीरैर्बिंदुशैबलिमंणरीभिरुपशोभितं चिरपरिचितक्षीरमेघमभितोपि सद्यःसमास्वादित शुध्धदुग्धपूरपूरितगर्भनिर्भरविशदनीरदनिकरसंछन्नात्मतया संपन्नमिव मंडनेन चिरसंभृततया संभावितपयोविकारजिहीर्षुणा ततस्ततः क्षिप्ताभिरंबुजसंभवेन समूलाभिरौषधीभिरभिशोभितं गोविंदचरणसंदर्शनायातविबुधसंसाद्विमानहंसाबेविच्यमानं सर्वतः पतदापगासहस्रनीरकृताहारलब्धसमिंधनबलवदाबिंधनानलं सायंप्रातिकोल्लासपल्लवितकल्लोलजालवेल्लितवेलागिरिशिखरसंचारलब्धदुग्धाभिषेकमुहूर्तविमलीकृतवन्यद्विपतया परिचिन्वंतामिव चिरादैरावतसर्गचातुरीक्षीरिकविधानतयापर्वकालावगाहनप्रसक्तपरमार्षिजनप्रस्तुताघमर्षणसूक्तगोचरक्षीरपदोहानूहविचारकोलाहलाभिभूतवीचिघोषतृतीयावतारश्वेततानुचिकीर्षया स्वयमपि श्वेतीभवद्भिरिव भगवतः प्राथमिकावतारजातीयैः क्षीराहारपरिणामानिर्मलैर्मत्स्यकूर्मैः परिकर्मितं शार्ङ्गधरं द्रष्टुमागच्छेदपि जातु चंद्रशेखरइति संभावनया सज्जीकृतैः कैलासैरिव पयस्तरंगैः परिस्फुरितैरंतर्गतैर्गिरिभिरुपशोभितं कालचक्रमिव कर्कटमीनमकरकरंबितं गंगातीर्थमिव गर्भस्थाने कमठराजितं पाणिनिसूत्रमिव परस्मैपदप्रातिपदिकं आत्मतत्त्वमिवानिर्वचनीयगुणप्रपंचं कैलासशिखरमिव शैवलक्षणलक्षितद्विजखंडमंडितं निदाघभास्करमिव नितांतमुत्तरंगत्वातिभीषणं स-

---

१ जगन्नायकः। २ पुंजीभूताः ॥

मष्टिमिव क्षीरसागरस्य समवायमिव नैर्मल्यस्य चंद्रकांतादिनिर्मलवस्तुवर्गनिर्माण कौतुकिना विधिना विलाप्य निषिक्तमिव भुवि रजताचलं क्षौमावगुंठनमिव क्षमाया: पद्मनाभशयनागारपर्यंतकुट्टिममिव स्फटिकशिलाचितमनास्पदं कविगिरामाश्चर्यमाश्चर्याणामार्तिहरं चक्षुषारानंदनमंत:करणस्यदुरासदमनाराधितनारायणचरणारविंदानां दुग्धोदं नाम रत्नाकरं ।

घोणे क्वापि पुरा पय: कियदपि स्तैन्येन दैन्येन वा
लब्धुं यो वहदीश्वरोपि जगतां जन्माधमं मानुषं ॥
तं विस्मापयितुं तरंगवलयैर्घोषानसंख्यान् सृजन्
नाभूद्भूतलसंभृतेन पयसैवावृत्य यो वर्तते ॥ २२ ॥

स्वाद्या यत्र सुधैव यस्य जठरे साक्षात्स धन्वंतरि:
शेते यत्र समस्तरोगशमनो नाम्नैव देवोऽच्युत: ॥
नास्मिन्दुग्धनिधावपि स्थिरयते नैव स्थिरामास्ति का-
मंतर्लीनहलाहलोष्मचकितो नाथ: स्वयं पाथसां ॥ २३ ॥

अपश्यन्नापि मध्यतस्तस्य किंचिदंतर्लीनमग्नपुराणभूदारदंष्ट्रादंडक्षोभितपय:पूरसमुद्भूतपुंजीकृतमिव फेनमंडलं एकत: प्रतिपर्वनिर्मुच्यमानपंकजनाभशयनोरगनिर्मोकराशिमिव कालपरिपाकलब्धमृद्भावनिर्मलं नीविबंधमिव वसुंधरादुकूलस्य कल्पांतरीयमंदरावेष्टनक्लेशजनितया मूर्छया पतितस्य वासुकेर्जयतो वलयितमिव भोगमंडलमप्रतिरूपमंतरीयं ।

स्थानं विश्वसृजोपि तन्निरय इत्याचक्षते यद्विदो
यद्गत्वा गमनीयमुत्तरमित: कुत्रापि न श्रूयते ॥
आयास्यापि हि साधयंति मुनयो यत्रारुरुक्षां परं
तं दृष्ट्वापि पदं हरे: सुरगणास्तस्तंभिरे गाहितुं ॥ २४ ॥

अपि च ।

दध्युर्यावदुपायं ते गंतुं यत्र दिवौकस: ॥
तावभिदध्युरायांतं तत्र देवं पितामहं ॥ २५ ॥

पश्यन्नथ तत्र पाकशासनममरान्प्रासादशिखरारोहकुतूहलिन: पंगूनिव भग्नमनोरथान्प्रसादविमलया दृष्ट्याऽनुगृह्य सहागच्छत मयेति संदिशन्नग्रतश्चचाल कमलासन: ।

गच्छन्नेव तत: सतन्न गलितब्रम्हाधिकारैश्चिरा-
दैकांत्यं परमं गतैर्भगवति श्रीवल्लभे दुर्लभं ॥

प्राचीनैः कमलासनैरुपगतैर्भक्त्या महत्या नमन्
सस्नेहं सदयं सखेदमपि च प्रत्येकमादिश्यता ॥ २६ ॥

कथमद्यापि न वत्स परिणतोसि ।

वल्लभोसि सरस्वत्या वहसे च श्रुतीर्मुखे ॥
जगत्पितृमहश्चासि कस्तवाप्यनुशासिता ॥ २७ ॥

तच्चिंतय तावत्स्वयमेव ।

आयुर्येषाममीषां परममभिमतं किंचिदूनो मुहूर्तः
का संपद्वा विपद्वा प्रभवति भवितुं तत्र तेषां क्षणार्द्धे ॥
तत्त्यक्त्वा क्षुद्रजंतून् दिवि चरत इमाश्चिंतयन्नात्मनीयं
वत्स त्वं प्रार्थयेथा न किमपि परमं ब्रम्ह लक्ष्मीसहाय्यं ॥२८

इति बोधितो विधिरिदमाचचक्षे । जानामि भगवंतो जानामि ।

कतींद्राः कति लोकेशाः कति विश्वसृजोथवा ॥
श्वासे श्वासे प्रजायंते प्रलीयंते च शार्ङ्गिणः ॥ २९ ॥

तथापि नियुक्तेन क्वचिन्मया तदनुगुणं चेष्टितव्यमिति व्यवस्यन्नागतोस्मि । दर्शितं भगवंतमाधिगम्य भवद्भिरेवाक्षरैर्व्याहरेयमिति प्रश्रितवादिनि पद्मसंभवे । प्रसन्नाः पारिषदा हस्तग्राहमाकर्षंतस्तमंतिक एव दर्शयामासुरांतरं रहस्यमुपनिषदां ।

यस्त्वं चिंतयसे नान्यं सर्वारंभेषु सर्वदा ॥
सत्वं चिंतयसे नान्यं विष्वक्सेनमिमं हरेः ॥ ३० ॥

इमं च पश्य वैनीतकं भगवतो वैनतेयं । व्यस्य किल पुरा कल्पे सुधाकुंभहरणसंरंभसंभ्रमोद्भूतपक्षमारुतविक्षेपसमुन्मीलिततया परितो विकीर्यमाणेषु नंदनोद्यानपादपेषु प्रयत्नेन महता पारिजातमेकमाहृतवतो भगवतोपि मंदाक्षमिव लक्ष्यते इति संशृणुमहे ।

आपि च ।

छंदे यथा यथा शौरेः संग्रामेषु जिगीषतः ।
तथा तथा प्रवृत्तोयं छंदोमय इतीर्यते ॥ ३१ ॥

अपि च ।

पादांगुष्ठनखाग्रलंबितमहाकूर्मद्विपांघ्रिद्वय-
न्यासाटोपविभग्नचंचुविधृतन्यग्रोधशाखागताः ॥
येनोर्ध्वं पतता पुराणमुनयो नीताः पुरा मेनिरे
संसिद्धं सशरीरमूर्ध्वगमनं सद्यस्तपोभिर्ददैः ॥ ३२ ॥

अस्य किलोपवीतमिव्यायामतः साम्यमवधारयंतः पुरा निर्जरा मौर्वीपदे मेरुधन्वनो वासुकिमादिशन्निति वदंत्यैतिहासिकाः ।

पश्य ज्ञानक्रियेच्छामयमणिमुकुटाबद्धमध्यात्मविद्या-
भास्वद्रत्नप्रदीपप्रकरपरिहृतध्वांतमंतः समंतात् ॥
गाढं विद्याकपाटं प्रबलशमदमद्वारपालाभिगुप्तं ॥
भक्तिद्वारं मुरारेरिदमिह शरणागारमोंकाररूपं ॥ ३३ ॥

इति प्रबोधितो विधिरिदशतादशतानवच्छिन्नवैभवमचक्षुर्ग्राह्यमनुश्रवैकश्रवणीयमधिगंतुमिव भगवतो रूपमासाद्य चक्षुश्रवस्तनुमाक्षीभिः सहस्राभ्यामनुभवंतमिव परमात्मशयमागमानामातिवेलश्वासनिश्वासपरंपरासंपादितभोगोपचयायचयतया संततमुपपादयंतमिव विलक्षणामूर्ध्वाधोदोलाविहारनिवृत्तिमाचार्यं योगविदामादिदेशिकं पदतंत्रस्य संप्रदायप्रवर्तकं शरीरमर्मणां भोगविमुखेषु हृदयेषु शमधनानां निरंतरावासानिर्वेदादिव योगिनं कमपि भुवनतलाकल्पमास्तीर्य तल्पमधिशयानमतिशयानम्रमौलिभिर्महायोगिभिः प्रणामावसरप्रकीर्यमाणेषु कुसुमोपहारेषु सौकुमार्यातिशयसंसक्तैः कतिपयैरिव कल्पतरुप्रसूनैश्चिरनिर्गतसिद्धसिंधुसीकरशेषैरिव ततस्ततो लग्नैर्नखरैर्निरर्गलपवर्गदानसंसूचयनियंत्रितेन ध्वजेन संसारकांतारसंचारणखिन्नशरीरिणां छायाप्रदानाय समावर्जितेनैव छत्रेण परिष्कृताभ्यां पादतलाभ्यामलंकुर्वाणमंकतलमादिजनन्योर्लक्ष्मीधरण्योः कटितटाबद्धकनकांशुकशतभातरंगपरिष्वंगपिंगीकृतवसुमतीकमलाविवेचनाचतुरतत्तत्परिचारिकोपचारविपर्यासपरिहासविनोदिनमाविर्भविष्यदसंख्यहिरण्यगर्भांकुरमयमणिशतांचितकार्णिकेन प्रतिसर्गावर्तमानप्रकृत्याधिवरण्यंततत्वाकिंजल्कपुंजेन प्रपितामहेन भुवनानां पांडुरेण सरोरुहेण मंडितनाभिमंडलं निर्मलचिन्मये वपुषि नित्यानुबिंबितेन मृगमदातिलकेनेव वक्षस्थितायाः श्रियः श्रीवत्सेन हृदयादुद्भूते चंद्रमसि स्पर्धया स्वयमपि हृदयाविर्भवता बालसूर्येणेव कौस्तुभेन च भूषयंतमप्राकृतानि भूषणान्यपराणि दिग्दंतिशुंडादंडैरिव विचित्रकनकांगदकंकणाद्यलंकृतैश्चतुर्भिःभुजैः सूचयंतमिव चतुर्व्यूहतामहर्मुखविकसदाम्रपल्लवोल्लासिनि दंतच्छदे विप्रकीर्णतया संध्यारागसंमूर्छितचंद्रिकोद्गारानुकारिणा मंदस्मितेन कलिकलुषजलाशयप्रसादनकतकरेणुभिः कैवल्यलक्ष्मीस्वयंवरदामभिरिव कलितनानावर्णविन्यासपेशलैः परिवहत्करुणासारसंपातशीतलशीतलैः कटाक्षैरप्यनुगृण्हंतमनन्यशरणान्महामुनीन्कार्णविष्टनिकमुखारविंदकामनीयकावलोकाविस्मयमानकमलावितीर्णचुंबनासक्तांबूलरागसंपद्विडंबिना पद्मरागतिलकेन परिष्कृतकपोलवलपमतिनिर्मलफणामंडलोदरप्रतिबिंबितैरहिराजफणामाणिगणैरिव किरीटरत्नैरजितमहोपवर्हमतिनयभारभंगुरैरनन्यार्पितदृष्टिसभिराकृतिमद्भिरायुधैः पं-

चभिरभितोपि यथोचितमासेव्यमानमनुपमेयं प्राकृतैर्भावैरप्रमेयमनुत्तरपदारोहण-पंगुभिरर्वाचीनैः प्रमाणैरक्षोभ्यविज्ञानसागरमक्षयं महानंदशेवधिमतिदुर्लभमश्रुतानु-श्रवैरमीमांसितोपनिषदाशयैरनध्यासितनिदिध्यासनपथैरक्षालितकर्माशयैरनुल्लंघि-ताविद्यकपर्वपंचकैरनायासलभ्यमतिदृढावलंबितगुरुचरणैरपायोपायवृत्तिपराङ्मु-खैरप्रकंप्यविश्वाससंपदवष्टंभराशिभिरात्मार्पणतत्ववेदिभिर्महाभागैरसाधारणषाड्-गुण्यमखिललोकशरण्यमालक्ष्य सर्वप्रमाणपरायणं भगवंतं नारायणमसकृत्प्रणि-पतन्नसकृदुत्थाय बध्नन् शिरस्यंजलिमसकृदावर्तयन्प्रणवमसकृदनुस्मरन्परतत्व-मश्रुपूर्णैर्लोचनैरविरलपुलकांकितैरंगकैरानंदगद्गदैश्च वचोभिरित्थमस्तावीत् ।

क्षंतारं सकलागसां जडधियां यंतारमंतस्तमो-
हंतारं जगतामनुत्तरपराहंतांकितोरस्थलं ॥
उद्यत्कौस्तुभशोभमुत्पलवनीसच्छायमच्छायत-
स्निग्धापांगतरंगमैक्षिषि परं ब्रह्माच्युतं शाश्वतं ॥ ३४ ॥
किं तर्कैरतिवक्रैः किं फलमतिबृंहणैर्विविधैः ॥
अवैक्षिषि श्रुतीनामाशयमहिराजभोगशय्यायां ॥ ३५ ॥

अहो धन्योस्मि धन्योस्मि ।

एकं जगद्विभूति विधामनिहितं चतुर्व्यूहं ॥
पंचायुधं प्रपद्ये षड्गुणसंपन्नमशरणः शरणं ॥ ३६ ॥

इति । अत्रांतरे वाचस्पतिं पुरस्कृत्य वासवमुखा बर्हिर्मुखाः प्रविकीर्य पुष्पांजलीन्प्रणिपत्य दूरतः शतक्रतुं समुत्थाप्य शिरसि संघट्टितांजलयो विस्मय-स्तिमिताः स्तंभवदासांचक्रिरे ।

तुष्टूषतोस्य बहुधा सुरदेशिकस्य
दिव्याद्भुतानि चरितानि परस्य धाम्नः ॥
स्तब्धा सती श्वशुरदर्शनसाध्वसेन
वाणी न वक्त्रकुहराद्बहिराविरासीत् ॥ ३७ ॥

ततः प्रसादविमलपद्मनाभकटाक्षपरिक्षेपविदितेंगितया पादमूलनिविष्टया तस्य भगवत्या पद्महस्तया निसर्गमधुरैरपि निर्भरवात्सल्यसुधासारमधुरतरैरक्षरै-र्वत्स चिरादागतोसि कुशलेन वर्तसे का इमाः प्रजाः कांदिशीका इव लक्ष्यंत इत्यनुज्ञ्यमानो विधिरंतरानंदतुंदिलः प्रणम्य शतशः परां देवतामिदमाबभाषे ।

जय जय जगदंब जांबूनदांभोजकोशप्रभे
जय जय कमलाक्षवक्षस्थलीनर्महर्म्यप्रिये ॥
जय जय करुणाकटाक्षप्रतीक्षस्त्रिलोकेश्वरे
जय जय जनिमार्गलग्नाणुवर्गापवर्गप्रदे ॥ ३८ ॥

वत्सेति प्रवहत्सुधारसपरिष्वक्तं यदा मंत्रितं
दृष्टं यच्च दयातरंगशिशिरोत्संगैरपांगैस्त्वया ॥
तस्मादस्म्यधुना विशिष्य कुशली धन्याश्च देवा इमे
विज्ञाप्यंतु कथं हरौ किमथवा तस्यादिरादिश्यतां ॥ ३९ ॥

इति यावत्प्रार्थयते कमलां कमलासनस्तावद्गोविंद एव स्वयमित्थमनुजगृहे ।

स्रष्टासि तात जगतोस्य चराचरोसि
संधारयस्यथ मुखैश्चतुरोपि वेदान् ॥
तेनासि लोकदयितो दयितो ममापि
तद् ब्रूहि कं सफलयामि मनोरथं ते ॥ ४० ॥

कसृजं विश्वसृजः कतिचित्स्रक्ष्यामि कति सृजाम्यधुना ॥
भवति परभक्तिशालिनि भवतीव न मे क्वचित्करुणा ॥ ४१ ॥

इति मधुरां गिरमिंदिरापतेः पिबन्नष्टभिः कर्णैः पितामहस्तादात्विकमहाहर्षसंभ्रमादुपरतवक्तव्यः कथंचिदिदमाचचक्षे ।

स्वप्नोन्मादावपि हि सृजतो नाथ वस्तूनि मिथ्या
संधार्यंते ननु च मनुजैरप्यमी वेदवादाः ॥
पापः श्रेयः किमहमियताप्रापमेवानयातु
स्वामिन् दृष्ट्या तव शिशिरया मंगलं मंगलानां ॥ ४२ ॥

अपि च ।

मनोरथानामपि यो मनोरथः
सुदुर्लभानामपि यत्सुदुर्लभं ॥
तदेव लब्धं तव पादपंकजं
कदर्थनान्येव कदर्थनान्यतः ॥ ४३ ॥

अपि च ।

के देवाः के दनुजाः किं जगदेवेदमंततः कोऽहं ॥
परिहृत्य विमोहमिमं पालय दासोस्मि दासोस्मि ॥ ४४ ॥

इति कटाक्षपातेन कमलायाः परिग्रहेण च भगवतः प्रतिबुध्य तत्वमुदासीने पद्मसंभवे प्रपंचपांचालिकानटनसूत्रधारः परमपुरुषः सर्वपथीनया महामायया तमाच्छादयन् कर्तव्यमस्योपादिदेश सत्यमेवं भवानाह कदर्थनान्येव कदर्थनानीति अलमवेक्षयतः स्थितिरस्माकमवहितो गृहाणेदमादिश्य च सर्वानमरान् ।

संधानं कुरुतासुरैः प्रथमतो मंथानमुर्वीधरं
कृत्वा मंदरमर्णवे क्षिपत तैर्यूयं समेतास्ततः ॥

बध्वा वासुकिनाथ मंथत ततः संपत्स्यते या सुधा
तामास्वाद्य गमिष्यथाप्यमरतां यूयं न वः शत्रवः ॥ ४५ ॥

परंतु भविता तत्र दुष्परिहरः प्रत्यूहः परिहरिष्यते च स प्रसादाद्देवदेवस्य तदद्यप्रभृति विशिष्यावलंबध्वमंबिकारमणं शरणमिति ।

जानाम्यहमुमाकांतं जानासि त्वं च मद्रिरा ॥
जानंति किमिमे मूढास्तत्सम्यगनुशिष्यतां ॥ ४६ ॥
इति परमुपदेशं देशिको देशिकानां
निरुपधि करुणाब्धिर्निर्जरेभ्यो वितीर्य ॥
स्वयमपि हृदि गाढं चिंतयन्निंदुचूडं
मिषति कमलपीठे पद्मनाभस्तिरोभूत् ॥ ४७ ॥

अथ यथोपदेशमिंदिरापतेरादिश्यादेष्टव्यमंतर्हिते पितामहे पूर्णमनोरथा दिवौकसः पुरहराराधनकौतूहलेन पुनरासेदुरुपत्यकां परमानंदमंथरां मंदराद्रेः ।

इति श्रीमद्भ० श्रीमन्नीलकंठदीक्षितेन विरचिते चंपूकाव्ये द्वितीयोच्छ्वासः ।

---

उपासीना नानाविधिभिरुपहारैश्च विधिभिः
शरण्यं लोकानां शशधरकलोत्तंसममराः ॥
मृषा संधित्संतः प्रकृतिकुटिलैर्दानवगणै-
र्विरिंचस्यादेशादवृणुत गुरुं दूत्यविधया ॥ १ ॥
परायणं नः परमं भवान्यतो
गुरुः पुरोधाः सचिवश्च दैवतं ॥
अतो वयं तावदनन्यसाधना
वृणीमहे त्वामवमेपि कर्मणि ॥ २ ॥
इति प्रार्थितो देवैरिदमुवाच वाचस्पतिः ।

नैतावदाभिधातव्यं न हि किंचिदवमं नाम कर्मास्ति राजोपजीविनां ।

तत्तस्य कीर्तिदं कर्म तद्दलभ्यं तदीप्सितं ॥
राजानः पुरुषो यत्र राजकीयं नियुंजते ॥ ३ ॥

परंतु किंचिदत्र विवेक्तव्यं । तथाहि

अनालोच्य निजां शक्तिमदृष्ट्वा कार्यसाधनं ॥
औत्सुक्यादेव गाहंते मंदा मज्जंति चातलं ॥ ४ ॥

संधिर्नाम ऋजूपायः साधुष्वेवायमापद्यते न पृथग्जनेषु दूरे पुनर्दुरहंकारे दूषितेषु दानवेषु किंच दूतवाङ्मुखकौशलसाधनीयोयमर्थः कथं नाम दूतदर्शन-

मप्यसहमानेषु घटते श्रूयतएव हि वैश्रवणेन प्रहितो दूतः सद्य एव समापितः सद-सि लंकापतेरपि च प्रवृत्ताः समरकर्माणि भग्नोद्यमाः सर्वतोपि संधित्संतो दूर-दर्शिनो लब्धुं कथंचिदपि लिप्सितं ननु लब्धमपि नाशयितुं पश्यत ।

स्थानाच्चावयितुं क्षणात्पुनरपि स्थानेभिषेक्तुंच वा
शक्ताः केलिकथांतरेष्वपि भवंत्यर्धोद्गता यद्गिरः ॥
तेऽमी सर्वसुनिर्वृतादनुभवः संधाय किं धावता
भिक्षार्थं परितोधुना मघवता संपादयंत्वीप्सितं ॥ ५ ॥
गौरश्वः करिणः स्त्रियो मणिगणाः शस्त्राणि वस्त्राणि वा
यानि प्राभृतयेम तान्यपहृतान्याक्रम्य तैरेव नः ॥
तद्रिक्तेन करेण रिक्ततरया वाचापि चाहं कथं
शक्तः स्यादनुजेश्वरान्वशयितुं संद्रष्टुमप्यंततः ॥ ६ ॥

इति युक्तियुक्तमुपपाद्य विरमति देवगुरौ । विहस्तेषु च समस्तेषु दैवतेषु कृत-मुखः स्वयं शतमखः किंचिदिदमाचचक्षे । भगवन्नेवमेवैतद्यदभिहितं भवता किंतु ।

निःसंख्यस्फुरदुत्तरोत्तरचमत्कारासु धारासु ते
वाचामक्षरमक्षरं त्रिजगतीवाग्गर्वसर्वंकषं ॥
श्रोतुं लालयितुं पुनः प्रतिसमाधातुं च वा किंचिद-
प्यर्वाचः कइमे वयं यदि परं देवः स वाचांनिधिः ॥ ७ ॥

परं त्वेकमिदमेवमनुस्मरामि । आदिष्टं यदध्यक्षमेव नः समस्तानां संधानं कुरुतासुरैरिति शार्ङ्गधन्विना परमेष्ठिने यदपि च तेन तुभ्यं ।

शिष्टं यदत्र दुष्टं वा न विवेक्तुं क्षमामहे ॥
स जानीते स जानीते त्वं जानीषे तदंततः ॥ ८ ॥

इति ।

अनितरशरणत्वमात्मनस्तद्
दृढमुपपादयताथ देवभर्त्रा ॥
प्रतिहतवचनो गुरुः सुराणां
प्रकटयितुं धियमात्मनः प्रतस्थे ॥ ९ ॥

स गच्छन्नेव पथि सर्वं करणीयमवधारयामास ।

अयं कालो बुद्धेरयमवसरश्चाटुवचसा-
मियं वेला युक्ता दिशि दिशि यशः संघटयितुं ॥
असावस्त्यर्घो नः सुकृतमुपचेतुं महदिति
व्यवस्यन् प्राप प्रागसुरगुरुमाखंडलगुरुः ॥ १० ॥

ततश्च तमतर्कितोपनतविनयमाभिगम्य सहशिष्यैरभ्यर्च्य विधिवदर्घ्यादिभिः

सपर्याभिरासयन् महति मणिविष्टरे भार्गवः स्वयमासीनः तदनुज्ञया सविनयमिदमाचचक्षे। अद्य मे सफलं जीवितं अद्य हुतं विधिवदाग्निषु अद्य दत्तमतिथिष्वभ्यागतेषु अद्याधीतमागमेषु सरहस्येषु अद्याराधिता गुरवः अद्य फलितो गृहस्थाश्रमः किं बहुना अद्यायमन्वयः प्रतिष्ठितो भृगोः यदनुल्लिखितं मनोरथैरनवाप्यं तपोभिरपि आशासनीयं गृहमेधितामासादितमनायासेन मया। स्वयमागमनं भवतोऽधुना इत्युदाहरति भार्गवे पुनरिदमुवाच बृहस्पतिः।

पुत्रावुभौ प्रथमजौ भृगुरांगिराश्च
ख्यातौ कुले शमवतो ननु पद्मयोनेः ॥
तद्भार्गवस्य कुलमांगिरसः प्रपन्न-
श्चित्रीयते किमिह सोदरसंप्रयोगे ॥ ११ ॥

अपि च।

निष्ठामाश्रमधर्मपालनविधौ नित्याभियोगं शिवे
शक्तिं कर्तुमकर्तुमन्यथयितुं तंत्रेषु राज्ञामपि ॥
श्रावं श्रावमनुक्षणोचिततया प्रीत्याहमस्म्यागतो
यत्सत्यं भवदीक्षणाय हृदये तत्रावयोः साक्षिणी ॥ १२ ॥

इत्यभिदधानो गुरुरलमतिवात्सल्यादतिलालनेनेत्यभिधाय विसृज्य सामाजिकान् विविक्ते पृष्टः कविना समागमनकारणमुदाजहारेदमुपपत्तिगर्भया गिरा। अवेदनीयं किमखिलवेदिषु भवादृशेषु। तथाहि।

जानीषे जगदेव तावदखिलं स्वप्नेंद्रजालोपमं
जानीषे ह्यधिकारदुर्विलसितं संसारमप्यावयोः ॥
जानीषे भगवत्परिग्रहपरीणामं सुपर्वस्वपि
व्यापर्तव्यमितोस्ति यत्तदपि ते नापेक्षते मद्गिरं ॥ १३ ॥

अपि च।

येनादिश्यत वेधसा जनिमता मद्रोहतो जीवनं
तेनैव त्वयि दुर्धियां दनुभवामादिष्टमाचार्यकं ॥
अस्मिन्किं करणीयमर्थगहने मीमांसकैर्मादृशैः
शक्तस्त्वं त्वनुवर्तितुं तदपि खल्वाकाशवद्वर्तितुं ॥ १४ ॥

तत्कथंचिदेकीकृत्य देवासुरान् एकांतशीलाभ्यामावाभ्यामासितव्यमिति वक्तुकामोहमागतोस्मीत्यभिहितो गुरुणा यथार्थमेव तदालोचयन् कविरिदमाबभाषे। भगवन्नेवमेवैतत्।

जानाम्येव यदाह पद्मनिलयो यच्चाह विश्वंभरो
यच्चास्ते हृदि ते यथा किल तदप्यग्रे विवर्तिष्यते ॥

कस्त्वं संघटनेति को विघटनेस्म्याकृष्य विश्वात्मना
योद्ध्यंते न चिरेण चेह तृणवद्वातेन देवासुराः ॥ १५ ॥

तदस्तु यथा तथा वा संमुखीकरिष्यामि दानवान् संभाषयिष्यामि च भवंतं ततो यथामनोरथमभिधीयतामित्युपच्छंद्य समानीय बलेः सभां सभाजयन् विविधैरुपचारैः संलापयामास वासवगुरुं भगवन् दिष्ट्यासि दृष्टश्चिराय किमागमनकारणं किं कुशली मे भ्राता पुरंदरः सकिं करोति किमावसति नामापि तस्य न संशृणुमस्तदाप्रभृति इत्यनुयुंजाने बलौ सोत्प्रासमाददे गिरमांगिरसः।

देयं यस्य सदेवमर्त्यभुजगं विष्वंडमेवाखिलं
पात्रं यस्य जगन्निधिः स भगवान् देवः सरोजेक्षणः ॥
शिष्यो भूतपतेरसौ कुलगुरुर्यस्योशना भार्गवः
कीर्तिर्दानवराज सा भगवतः कासां न पारे गिरां ॥ १६ ॥

तदभिगम्यापि सुदूरमालोकितव्यः पुण्यश्लोको भूतामित्यागतोस्मि भ्रातुरपि ते वृत्तांतमावेदयामि ।

यस्यैवं भूर्भुवस्वर्भुवनपरिवृढो वर्तसे पूर्वजस्त्वं
दुर्दांतध्वांतभानुः स भवति भगवानेव यस्यानुजन्मा ॥
संप्राप्तो यः शरण्यं त्रिभिरपि करणैर्देवदेवं त्रिनेत्रं
प्रष्टव्यं तस्य कस्मिन्कुशलमकुशलं तस्य जिष्णोः कुतः स्यात् ॥ १७ ॥

स यदैव संगररंगमारूढो योद्धुकामोवतस्थे तदैव तमशरीरिण्या गिरा निवर्तयन्नाहवात् निर्माष्टुं मुनिशापमालिन्यमभ्युदयेन च नियोक्तुमधिकेन परमे तपसि परमेश्वरो नियुयुजे ।

यः शक्यो न दृशापि गोचरयितुं सत्वैस्तमोगंधिभि-
र्यत्र ब्रह्म सनातनं गिरिजया स्वैरं परिक्रीडते ॥
अध्यारुह्य तमेव मंदरमनुध्यायन्य आस्ते शिवं
कस्तं ईक्ष्यति कः प्रवेक्ष्यति कथं देवोपि वा दानवः ॥ १८ ॥
प्रल्हादः प्रथमो गुरुर्भगवतस्तंतेषु लक्ष्मीपते-
र्व्यातेने च विरोचनं कमलभूरध्यात्मविद्यानिधिं ॥
बाणः पारिषदाग्रणीः पशुपतेस्त्वं तु प्रवेकः सतां
सिद्धानामपि योगिनामशृणुवं नैवं कुलं निर्मलं ॥ १९ ॥

तदत्र महाकुलप्रसूतस्य भवतो महदनुशिष्टस्य किमावेदनीयमन्यैः स्वयमेव महाभागः स्वरूपं पर्यालोचयतु कार्यस्य ।

ददाति च वरं दत्वा सद्यस्तदन्यथयंति च
द्रुहिणहरगोविंदा देवेष्विति स्फुटमेव नः ॥

न च नियमितो देवानेवानुकंपितुमीश ते
यदसुरवरान्मध्ये मध्ये समुद्रमयंति च ॥ २० ॥
अथ ब्रह्मेशविष्णूनामपि शुद्धचिदात्मनां ॥
आचूडादानखाग्रेभो मन्ये मायामयं वपुः ॥ २१ ॥
तदप्रदाय परेभ्योवकाशमन्योन्यसमवेतेषु युष्मासु ।
यन्नैश्चित्यं यदौद्धत्यं यद्बलं या सुखासिका ॥
यद्यशो यः प्रतापश्च सर्वं तदनुचिंत्यतां ॥ २२ ॥

आस्तामिदमवश्यं हि विगृण्हत्सु युष्मासु । भवितव्यप्रकाशेन मया वा भार्गवेण वा । तथाच ।

निर्वर्त्यमाना यत्नेन निर्जरैरसुरैश्च वा ॥
काः क्रियाः फलवत्यः स्युरावयोरप्रकाशयोः ॥ २३ ॥

आखंडलस्य तु मतिरन्यादृशी ।

स्थीयतामग्रजैः स्वर्गे जीयतामनुजेन वा ॥
सर्वथा भ्रातृभाग्येन संवृत्तं नः प्रयोजनं ॥ २४ ॥

इति । अहं तु भवतः सर्वज्ञादविशंकमवादिषं न खल्वात्मसचिवोक्तमित्येवादरणीयं । परसचिवोक्तमिति परिहरणीयं । धीमतां हि धीरेव सचिवः शासिता- इत्यभिधाय विरमति गुरौ । आलोकितो बलिना भार्गवः सामाजिकाननुमोदयन्निदमाचचक्षे ।

सकलाशयमर्मज्ञाः समयज्ञाः संधिविग्रहयोः ॥
पारीणा नीतिपथे भवंत एव प्रमाणमर्थेषु ॥ २५
यद्यप्यदा गतश्रियः सुमनसो यद्यप्यसौ तद्गुरु-
र्यद्यप्यास्ति फलं न किंचिदपि नः संधाय साध्यं सुरैः ॥
पर्यालोच्य तथापि किंचिदुदधिं निर्मथ्य लब्ध्वा सुधां
पास्यामो वयमित्यसौ रहसि मां यत्प्राह दिव्यो मुनिः ॥ २६

इति तच्छृण्वंत एव दानवाः संमोहिता मायया वैष्णव्या सद्य एव संमेनिरे । आहुश्च ।

संधास्यामः शमधनगिरा निर्व्यलीकं सुरैः प्राक्
क्षोभिष्यामो जलधिममृतं तत्र लभ्यामहे च ॥
पास्यामश्चाप्यथ तदुभये यद्यमी साधवः स्यु-
र्नैवं चेत्किं विहितमियता नाहवः कागमन्नः ॥ २७ ॥

इति ततः साधु साध्वित्यनुमोद्यमानाः सचिवेन प्रस्थाप्य वाचस्पतिं प्रथमतः संधास्यंतः प्रतस्थिरे दानवाः सद्यएव मंदरं पूर्णमनोरथश्च गुरुः पुनरुपाव-

र्तमानः संददर्श मंदरमेत्य संततशिवध्याननिर्धूतकल्मषान् शिवार्चनव्रतिनः शिवार्पितप्राणान् शिवनामकीर्तितपवित्रितमुखान् शिवकथापरायणान् शिवाहंभावभावितान् शिवाद्वैतवादकोविदान् भस्मदिग्धतनूरुहान् भासितात्रि-पुंड्रमंडितपंचाष्टादिस्थानमनोहरान् प्रालंबिजटावलयावलंबितशकुनकुलनादश-कुनावेदितसन्निहितशांभवप्रसादान् शुद्धाध्ववर्तिनो विज्ञानिकपालानिव सुनासी-रमुखान् ।

आख्याय निखिलवृत्तमाशयं च विरोधिनां ॥
आदितेयान्स दैतेयैः संधातुं समनीनिहत् ॥ २८ ॥

ततो महता बलेन महता सन्नाहेन महता चावधानेन संधातुमागताः सर्वेपि दानवाः प्रकृतिकुटिला अपि परिणततपोविशेषपरिक्षीणकल्मषतया दुर्द-र्शान् मध्यान्हभास्करानिव दुरासदान् युगांतपावकानिव विस्रंभणीयान् विश्व-सृजमिव पुनः पुनर्दर्शनीयान् पूर्णसुधाकरानिव संलक्ष्य गीर्वाणान् संत्यज्य दुर्विशंकितानि प्रतिषिध्यानुयात्रिकान् परित्यज्य शस्त्राणि निर्मलेन मनसा निरंतरं परिरेभिरे संक्रंदनोपि यथान्यायं समागम्य दानवैरभिवाद्य पुरोधसं भार्गवमनुमतो वाचस्पतिना किरन्निव सुधारसं किंचिदिदमाचचक्षे ।

साफल्यं तपसामिदं सुमहता साफल्यमक्ष्णामिदं
साफल्यं पितुराशिषामिदमिदं साफल्यमस्यायुषः ॥
श्रीमत्काश्यपपादतातचरणस्थानोदितैर्भ्रातृभि-
र्ज्यायोभिर्यदहं विरोचनमुखैर्वात्सल्यपात्रीकृतः ॥ २९ ॥

अपि च ।

आराध्या ननु यूयमेव गुरवस्त्रैलोक्यराज्यार्पणा-
दाराध्या गुरुभार्गवप्रभृतयो ब्रम्हर्षयः शक्तितः ॥
किं कर्तव्यमितोपि केवलमहं शांतोस्मि शांतोस्मि च
प्राप्तुं तत्परमामृतं यदि भवत्याज्ञा यतिष्ये सुखं ॥ ३० ॥

इति वदंतं भ्रातरमिंद्रमाहुरसुरेश्वराः । मैवमाखंडल मैवं ।

त्वमसि शतक्रतुस्त्वमसि नीतिपथे कुशल-
स्त्वमसि कृपास्पदं भगवतः प्रमथाधिपतेः ॥
अपि खलु बालकेन भवता भवता मघवन्
निखिलमनाकुलं कुलमिदं प्रतितिष्ठति नः ॥ ३१ ॥

व्यापृते च त्वयि तपसि राज्यमिदं व्याकुलीभवेदिति संलक्ष्यतेस्माभिरनियु-क्तैरपि साम्यमेवानुचिंत्य भवतः ।

एकेन विधृतं राज्यमियंतो भवता वयं ॥

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छायां येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक. ३. सप्टेंबर, सन १८८०. अंक ९.

हें मासिक पुस्तक

पुणें पेठ शनवार, येथें

'श्री शिवाजी' छापखान्यांत छापिलें.

किंमत ८ आणे.

☞ सूचना—शिल्लक राहिलेले अंक दुसरे छापखान्यांत काढण्याची तजवीज आम्हीं केली आहे. सालअखेरीच्या आंत सर्व अंक सालाबादप्रमाणें येऊन पोंचतील. वर्गणीदारांनीं वर्गणी लवकर पाठविण्याची तजविज करावी अशी विनंती आहे.

**का० सं० व्यवस्थापक.**

---

## पोंच.

### सन १८७८—७९.

| | रु० | आ० |
|---|---|---|
| रा० सा० सि० वि० पटवर्धन | १ | ० |
| वे० शा० सं० बा० शास्त्री देव | ८ | ६ |
| रा. रा. दे० वि० वकील | ४ | ६ |
| ,, ,, खं० बा० फडके | ४ | ६ |
| ,, ,, गो० वि० भावे | ४ | ६ |
| ,, ,, से० ने० ला० आर्ष्ठे | ४ | ६ |
| ,, ,, ज० प्र० सरंजामे | २ | ० |
| ,, ,, सि० वि० देव | ७ | १० |
| ,, ,, से० ने० ज० ला० पंढरपूर | १ | ६ |
| ,, ,, पु० वि० गोडबोले | ४ | ० |

### सन १८८०—८१

| | रु० | आ० |
|---|---|---|
| श्री० राजेसाहेब सं० मुधोळ | ५ | ८ |
| श्री० राजेसाहेब सं० जव्हार | १ | ६ |
| श्री० बाबासाहेब दातार | १ | ० |
| वे० शा० सं० बा० शास्त्री देव | १ | ४ |
| रा० सा० भि० कृ० पटवर्धन | १ | २ |
| रा० सा० सि० वि० पटवर्धन | १ | ० |
| रा० रा० दे० वि० वकील | ४ | ६ |
| ,, ,, खं० बा० फडके | १ | ६ |
| ,, ,, र० बा० तळवळकर | १ | ६ |
| ,, ,, गो० ना० केळकर | ४ | |
| ,, ,, ज० मो० पिंगळे | ४ | ६ |
| ,, ,, गो० र० नंदर्गीकर | ४ | ० |
| ,, ,, रा० बापूजी, मुंबई | १ | ६ |
| ,, ,, सि० वि० देव | २ | ६ |
| ,, ,, आ० प० भट | ४ | ६ |
| ,, ,, से० ने. ज. ला. पंढरपूर | ४ | ६ |
| ,, ,, बा० ना० शिंदे | ४ | ६ |
| ,, ,, का० पां० परब | ४ | ६ |
| ,, ,, गो० ह० चिखली | ४ | ६ |
| ,, ,, ज० कृ० गोगटे | ४ | ६ |
| ,, ,, पु० वि० गोडबोले | ४ | |
| रा० सा० रं० रा० महाडीक | ४ | ६ |
| रा० रा० बा० दा० ओक | ४ | ६ |
| ,, ,, जो० बा० डे० आ० | ४ | ६ |
| ,, ,, ना० रा० सोहोनी | ८ | १२ |
| ,, ,, ब० वि० गोखले | ४ | ६ |
| ,, ,, ह० म० पंडीत | ४ | ६ |

---

## जाहिरात.

## राजव्यवहारकोश.

हा कोश छापून तयार होण्यास विलंब लागण्याचें कारण छापखान्याची गैर व्यवस्था हें होय. आतां थोडेच दिवसांनीं पुस्तक तयार होऊन वर्गणीदारांकडे पाठविण्यांत येईल.

**का० सं० व्यवस्थापक.**

## विषयक्रम.

बखरी.

शिवछत्रपतींचें चरित्र ................ ६९–७६.

नागपूरकर भोंसल्यांचे कागदपत्र......... १७–२४.

मराठी कविता.

मोरोपंत-कृत-ध्रुव-चरित्र प्रश्नोत्तरमाला .... ५७–६४

वामन-कृत सत्यभामा-विनोद-

द्वितीय-सुदाम-चरित्र ..................... १०८–११४

संस्कृत काव्यें

नीळकंठचंपू. ........................ ३७–४४

कृष्ण-स्तवराजः... ... .................... १–८

पाणीं अभिषेक केला. दिव्यवस्त्रें दिव्य अलंकार घेऊन सर्व पूज्य मंडळीस नमस्कार करून सिंहासनावर बसले. कित्येक नवरत्नादिक सुवर्ण कमळें व नाना सुवर्ण फुलें वस्त्रें उदंड दिधलीं. दानपद्धतीप्रमाणें षोडश महादानें इत्यादिक दानें केलीं. सिंहासनास अष्ट खांब जडित केले. त्या स्थानीं अष्टप्रधानांनीं उभें रहावें. पूर्वीं कृतायुगीं त्रेतायुगीं द्वापारीं कलयुगाचें ठायीं पुण्य श्लोक राजे सिंहासनीं बैसले. त्या पद्धतीप्रमाणें शास्त्रोक्त सर्व ही साहित्य सिद्ध केलें. अष्टखांबीं अष्टप्रधान उभे राहिले. त्यांचीं नांवें. तपशील.:—

१ मोरोपंत त्रिंबक पंताचे पुत्र, पेशवे, मुख्यप्रधान.

१ नारो निळकंठ व रामचंद्र निळकंठ मुजुमदार यांचे नांव अमात्य.

१ रावजी पण्डितराव होते त्याचे पुत्रास रायजीराज.

१ हंबीरराव मोहिते सेनापति.

१ दत्ताजीपंत व निराजीपंत वाकनीस यांचें नांव मंत्री.

१ त्रिंबकजी सोनदेव डबीर यांचे पुत्र रामचंद्रपंत सुमंत.

१ अणाजीपंत सुरनीस यांचें नांव सचिव.

१ निराजी रावजी यांस न्यायाधिशी.

येणेंप्रमाणें संस्कृत नांवें ठेविलीं. अष्ठ प्रधानांचीं नांवें ठेविलीं ते स्थळें नेमून उभे केले. आपले स्थळीं उभे राहिले. बाळ प्रभु चिटनीस व नीळ प्रभु पारसनीस वरकड अष्ट प्रधानांचे मुतालिक व हुजरे प्रतिष्ठित सर्वही यथाक्रमें पद्धतीप्रमाणें सर्वही उभे राहिले. छत्र जडावाचें मोतीलग झालरीचें करून मस्तकावर धरिलें. छत्रपति असें नांव चालविलें. कागदीं पत्रीं स्वस्ति श्री शक, सिंहासनावर बसले त्या दिवसापासून नियत चालविला. पन्नास सहस्र ब्राह्मण वैदिक मिळाले. या वेगळे तपोनिधी व सत्पुरुष, संन्यासी, अतिथी, मानभाव, जटाधारी, जोगी, जंगम नानाजाती मिळाले. तितक्यांस चार मास मिष्टान्न उनफे चालविलें. निरोप देतां पात्र पाहून द्रव्य, अलंकार, भूषणें, वस्त्रें अमर्याद दिधलीं. गागाभट मुख्य अध्वर्यु त्यास अपरमित द्रव्य दिलें. संपूर्ण खर्चाची संख्या एक क्रोड बेताळीस लक्ष होन झाले. अष्ट प्रधानांस

---

४. 'केलीं' म० प्र०

५. 'स्तंभीं' म० प०

६. 'मोरो त्रिंबक पेशवे मुख्य प्रधान' म० प्र०

७ 'दत्ताजी त्रिंबक वाकनीस' म० प्र०

८. 'मोरो' म० प्र०

९. 'त्रिंबक सोनदेव होते त्याचे पुत्र रामचंद्रपंत डबीर' म० प्र०

१० 'अनाजी दत्तो' म० प्र०

११ 'रघुनाथ पंडितराव त्याचे पुत्र दानाध्यक्ष, म० प्र०

१२ 'निराजी रावजी हे न्यायाधीश' म० प्र०

१३. 'उलफा' ?

लक्ष लक्ष होन बक्षीस दर असामीस, त्या खेरीज एक एक हत्ती, घोडा, वस्त्रें, अलंकार असें देणें दिलें. येणेंप्रमाणें राजे सिंहासनारूढ झाले. या युगीं सर्व पृथ्वीवर म्लेंच्छ बादशाह. मऱ्हाटा पातशाह येवढा छत्रपति झाला. ही गोष्ट कांहीं सामान्य झाली नाहीं.

हीं वर्तमानें बाहादूरखान कोकी[१४] याशीं कळलें. त्यानें पुढें पेडगांव[१५] भीमातीर येथें येऊन छावण्या केल्या. आणि दिल्लीस पातशाहास हें वर्तमान सिंहासनाचें लिहिलें. पातशाहास कळून पातशाह तक्तावरून उतरून अंतःपुरांत गेले. आणि दोन्ही हातभुईस घांसून आपले देवाचें नांव घेऊन परम खेद केला. दोन दिवस अन्न उदक घेतलें नाहीं. आणि बोलिले कीं, " खुदानें मुसलमानाची पादशाई दूर करून तक्त बुडवून मराठियास तक्त दिलें. आतां हद्द झाली. " असो, बहुत खेद दुःखाचे पर्वत मानिले. मग मोठे मोठे वजिरांनीं नाना प्रकारें समाधान करून आणा खुणा घालून तक्तावर बसविलें. ऐसेंच विजापूरचे पातशहास व भागानगरचे पातशहास वरकड सर्वांस वर्तमानें कळून खेद जाहला. रुमशाम, इरान, तुरान व दर्यांतिल पातशहांस[१६] खबर कळोन मनांत खेद करूं लागले. खेद करून आशंका मानिली. येजातीचें वर्तमान जाहलें.

पुढें राजे तक्तीं बसून राज्यभार करूं लागले. निजामशाही देश काबीज केला. व मोंगलाई ही जप्त केली. भागानगरच्या पादशहांनीं राजेयांशीं सल्ला करून निराजीपंताचे पुत्र प्रल्हादपंत मोठे बुद्धिवंत यांस हेजिबीस ठेवून घेऊन, करभार राजियास देऊन स्नेहांत मिळाले. वरकड किरकोळीं राज्यें होतीं तीं घेतलीं. कितीएकांनीं करभार देऊन अंकित होऊन राहिले. तुंगभद्र देशापासून कावेरीपर्यंत कर्नाटक साधावें, हा हेत मनांत धरिला. त्यास लष्कर पाठवून साधावें तरि दिवसगतीवर पडतें. ह्मणून खुद्द राजियानीं आपण जावें असें केलें. त्यास पेडगांवीं[१७] बाहादूरखान गनीम पाठीवर येईल ह्मणून निराजीपंत न्यायाधीश पाठविले. कित्येक द्रव्य अलंकार रत्नखचित पाठविलीं. त्यास अंतरंगें सख्य एक वर्षपर्यंत आपणास कर्नाटक साधावयास लागेल. तुम्हीं राज्यास उपद्रव न करणें असें त्यास सांगून ठायीं ठेविलें, आणि कर्नाटकास जावयास समागमें निव-

१४. मागें पृ० ६३ व पृ० ६७ पहा.

१५. 'मुदुगलें' म० प्र०

१६. दर्यांतील बादशाह म्हणजे 'युरोपियन लोक.' या दर्यांतील बादशाह्या २७ किंवा २२ होत्या असें मानीत असत. मागें पृ० ५६ पहा.

१७. येथें 'गोदडगांव' असा म० प्र० पाठ आहे.

डून पागे पतके पंचवीस हजार स्वार व सरकारकून रघुनाथ नारायण व जनार्दन नारायण हे कर्नाटकचे माहीतगार यांस बरोबर घेतले. वरकड पेशवे व मुरनीस व वांकनीस वरकड लष्कर राज्यास रक्षणास ठेविलें. आणि विचार केला कीं, " कर्नाटक साधावयास द्रव्य लागेल त्यास खजिन्यांतील द्रव्य वेंचूं नये. नूतन मिळवावें आणि वेंच करून देश साधावा. " असा विचार करितां भागानगरची पातशाहींत द्रव्य उदंड आहे. तेथें निष्ठुरता करून द्रव्य मेळवावें तरि वर्षास करभार भागानगरकर देतात. तेथें निष्ठुरता करूं नये. सख्य करून त्यांची भेट घ्यावी. भेटी नंतर सर्वही अनुकूळ करून देतील. असा विचार करून भागानगरीं प्रल्हादपंत हेजीब राजियाचे होते. त्यांसि हें वर्तमान लिहून भेट घ्यावी हा विचार केला. तानशाई[१८] पातशहा भागानगरकर यांनीं मनांत बहुत शंकाधरिली कीं, जैसा अबझुलखान बुडविला, कीं शास्ताखान बुडविला, दिल्लीस जाऊन अलमगिर पातशहास पराक्रम दाखविला, ऐसा येखादा अनर्थ जाहाला तर काय करावें ? भेट मात्र राजियाची न घ्यावी. जें मागतील तें देऊं " असें बोलिला. मग पातशहाशीं व अक्रंणापंत व मादंणापंत कारभारी यांशीं प्रल्हादपंतें आण, शपत, क्रिया बहुत दिधल्या. अपाय नाहीं. स्नेहाची भेट घेऊन जातील, अशी बळकटी केली.

येणेंप्रमाणें राजियाशीं घटाई केली. उभयतांच्या भेटी व्हाव्या ऐसा नेम करून मग राजे मजल दरमजल लष्कर घेऊन भागानगरास[१९] चालिले. भागानगरची विलांयत[२०] लागल्यावर ताकीद केली. एक काडी रयतेची तसनस न व्हावी ऐसें केलें. कित्येक गर्दांना मारून जाबेता[२१] बसविला, आणि मजलीस जाऊन तेथें खुष खरेदी सर्व पदार्थ घेऊन चालिले. लूट नाहीं. असे जातां पुढें पातशहास खबर कळून बहुत संतुष्ट जाहला. पातशहा पुढें दोन चार गांव सामोरे यावें असें केलें. राजा मोठा साधक, आण घालून पादशहास सांगून पाठविलें कीं, " तुम्हीं न येणें. आपण वडील भाऊ मी धाकटा भाऊ. आपण पुढें न यावें. " असें सांगून पाठविल्यावरि पातशाह बहुत संतुष्ट जाहले. आणि मादंणापंत व अक्रंणापंत ह्मणजे वजया [ ? ] पातशाह. सर्व पातशाही धणी. मादंणापंत हे उभयतां पुढें येऊन राजियास घेऊन शहरास गेले. राजियांनीं आपले लष्करास कुल् जरी सामान

१८. 'तानाशहा' पाठांतर
१९. म्हणजे 'हैदराबाद'.
२०. विलायत=मूळ देश--भागानगरचा मुलुख
२१. जाबता = धाक.

केलाच होता. सुमुहूर्त पाहून पातशाहाचे भेटीस नगरामध्यें चालिले. पातशहांनीं कुल नगर शृंगारिलें. चौफेरी बिदीस कुंकुम केशराचे सडे रंगमाळा घातल्या. गुढिया, तोरणें पताका निशाणे नगरांत लाविलीं. नगर नागरिकलोक कोट्यानकोटी राजा पहावयास उभे राहिले. नारींनीं मंगळ अर्त्या अगणित उजळून राजियास वंदिलें. सोनें रुपियाचीं फुलें राजियांवरि[२२] उधळलीं. राजियांनीं लोकांस खैरात द्रव्यवस्त्रें अगणित दिलीं आणि सर्व सैन्यासहित हद महालास पावले. पातशहास " खालते उतरूं नका, आपण खासा येतों " ह्मणून शफत घालून सांगून पाठविलें. पातशाहा महालावरि राहिले. राजियांनीं आपलें लष्करचे लोक कंबरबंदी करून महालाखालीं[२३] बसविले आणि शिडीवरून चालिले. खासा राजा व जनार्दन नारायण व प्रल्हादपंत व सोनाजी नाईक दौलतबंकी[२४] व बाळाजी ढंढेरे[२५] पांचजण चढले. महालांत गेले. पातशहा पुढें येऊन क्षेम आलिंगन केलें. उभयतां एकासनीं बसले. मादंणापंत व अकंणापंत व जनार्दनपंत, प्रल्हादपंत. सोनाजी नाईक बंकी व बाबाजी ढंढेरे असे होते. पातशहा व राजे व मादंणापंत त्रिवर्ग बसले. वरकड उभे राहिले. उभयतांचा स्नेह अतिशय बोलणें झालें. पातशहाच्या स्त्रिया झरोकियांतून जाळपोलांतून[२६] राजा पाहतां बहुत थक्क जाहल्या. पातशहाही बहुत खुशाल जाहले. एक प्रहर बसून राजियाच्या पराक्रमाच्या गोष्टी ऐकिल्या. कित्येक अलंकार रत्नजडित व वस्त्रें हत्ती, घोडे राजियास व राजियाकडील लोकांस सर्वांस देऊन निरोप दिला. राजे व पादशहा महालाखालीं येऊन राजे आपल्या स्थळास चालिले.

महालाखालीं रघुनाथपंत[२७] व हंबीरराव वरकड सरदार लष्कर ठेविले होते त्यांस ही समागमें घेऊन आपले जागियास आले. मार्गी येतां नगर लोकांस खैरात केली. राजे उठोन गेलियावरि पातशहाचें समाधान झालें कीं, राजा प्रामाणिक, आपल्यास रक्षिलें क्रिया जतन केली. ऐसें आश्चर्य मानून प्रल्हाद पंतास कित्येक बक्षिसें पातशहानीं दिलीं कीं, तुम्ही प्रमाणीक ह्मणून नांवाजून राजियाकडे पाठविलें. दुसरे दिवशीं मादंणापंतीं राजियास आपले घरास मेहे[२८]मानीस नेलें. आणि आपले मातोश्रीचे हातीं पाक सिद्ध

२२ 'पुर्वी बलायत दूर केली' म० प्र०

२३. 'जिन्या खालीं' म० प्र०

२४. 'दौलद्बंकी महाद्वारपाल इत्यभिधीयते' रा० व्य० को० महाड प्रतीचा पाठ 'सोमाजी नाईक हकीम' असा आहे.

२५. 'बाजी ढासरे' म० प्र०

२६. 'जाळ्या लावून' म० प्र०

२७. 'रघुनाथ नारायण हबीर' म० प्र०

२८ मेहमानी = पाहुणचार. 'मेहमानी तु आतिथ्यं' रा० व्य० को०

करून मादंणापंत व अकंणापंत जवळ बसून राजियास भोजन घातलें. वरकड राजियाकडील समुदाय होता त्यास ही भोजनास घातलें. आणि अलंकार वस्त्रें हत्ती घोडीं देऊन स्थळास पोहोंचाविलें. पातशाहानीं मादंणापंतास बोलावून नेऊन विचारलें कीं, "राजियास काय पाहिजे तें देऊन राजियास संतुष्ट करून निरोप द्यावा." असा विचार करून सुमुहूर्त पाहून मागती राजे भेटीस आणिले. आणि जड जवाहीर रत्नाचे अलंकार हत्ती घोडे अपरमित दिधलें. कुल सरकारकुन व हंबीरराव वरकड सरदार यांचे मुजरे महालावरि उभयतां छत्रपति बैसून मुजरे घेऊन सरदारांचे पराक्रम नांव पाहून सर्वांस अलंकार वस्त्रें हत्ती, घोडे, मनुष्य पाहून दिधलें. आणि पातशहा बोलिले कीं, "सर्वां प्रसंगीं आपणांस तुह्मीं सहाय असावें." ऐशीं बळकटी करून राजियाची आण शपत घेऊन निरोप दिला. प्रतिवर्षीं कारभार जो देणें तें येणेंप्रमाणें देऊन प्रल्हादपंत नेहमीं आपणा जवळ ठेऊन आमचे निजबतीनें आपणाजवळ असों देणे, ऐसें बोलिले. राजे आपले स्थळास आले.

त्या उपरी राजियास भागानगरचे मोठमोठ्या सरदारांनीं मेहमान्या केल्या. ऐसे एक महिनाभर भागानगरीं होते. तेथील द्रव्य वस्तभाव घेऊन चंदीकडे सेनासमुदाय घेऊन चालिले. मग श्रीशैल्यास आले. नीळगंगेचें स्नान करून श्रीचें दर्शन झालें. तीर्थविधी झाला. राजियानीं स्थळ देखोन परम आनंद झाला कीं, केवळ कैलास दुसरें, असें स्थळ वाटलें. तेथें हें देह श्रीस अर्पण करावें. शिरकमल वाहावें. ऐसें योजिलें तें समयीं श्रीभवानी अंगांत आविर्भवली आणि बोलली जे, "तुज ये गोष्टी मोक्ष नाहीं. हें कर्म करूं नको. पुढें कर्तव्यही उदंड तुझे हातें करणें आहे" असें सांगून श्री गेली. हें वर्तमान सावध झाल्यावरि राजियास कारकुनांनीं सांगितलें. मग श्रीस शिरकमल वाहावें हा विचार राहिला.

पुढें कर्नाटकचा देश साधावा म्हणोन चंदीस वेढा घातला. चंदीमध्यें खानखान विजापुरकराचा वजीर याचे पुत्र रुपलखान व नासरीखान[२९] हे उभयतां होते. त्यास काज कारण करून, त्यास कौल देऊन, बाहेर काढिले. आणि स्थळ साध्य केलें. त्रिवांदि[३०] महाल म्हणून आहे तेथें शेरखान विजापूरचा वजीर पांचहजार स्वारांनिशीं होता. पठाण तालेदार, हत्ती सामान द्रव्य अगणित होतें. तो राजावर चालून आला त्याशीं युद्ध करून त्यास

---

२९. 'रुदलखान व नासीर महमदखान' म० प्र०

३०. 'त्रिमलवा' म० प०

बुडविला. जिवंत खासा शेरखान धरिला. पांचहजार घोडे, व बारा हत्ती, पाडाव केले. द्रव्य, जवाहीरही अपार हस्तगत झालें. मोठें युद्ध केलें असें कर्म झालें.[31]

त्या उपरीं राजेश्री व्यंकाजी राजे धाकटे भाऊ राजियाचे यांनीं चंदावरचें राज्य साध्य करून राज्य करीत असत. त्यांनीं आपले कारकून होते ते समागमें घेऊन राजियाचे भेटीस आले. भेट बंधू बंधूंची झाली. एकाजी राजाचे कारकून काकाजी पंत पेशवे भेटले व कोन्हेर महादेव मुजुमदार भेटले. जगंनाथ पंत, व्यंकाजी दत्तोचे पुत्र सर्व सैन्य भेटलें. व भिवजी राजे व प्रतापजी राजे नाटिकशालेचे[32] पुत्र महाराजाचे होते. तेही भेटले. बहुत संतोष झाला. उभयतां बंधूंची मेहमानी परस्परें झाली. देणेंही उभयतांनीं उदंड दिलें. आठ दिवस एकत्र होते. मग राजियानीं व्यंकाजी राजे यासि प्रश्न केला कीं, "महाराज तुमचे आमचे पिते आपण त्याजकडून निरोप घेऊन पुण्याकडे जाऊन येवढें राज्य साधिलें. कीर्त केली. ऐशियाशीं वडिलांचीं बारा बिरदें तुह्मांजवळ आहेत तीं तुम्ही चालवीतच आहां. ऐशियास आपण वडील पुत्र आणि पराक्रमी तुम्हांहून पराक्रम विशेष केला. बारा बिरदें मात्र तुम्हांजवळ आहेत तीं आपणास देणें. आपण चालवूं. नवीं बिरदें करावयाची काय आशंका आहे? परंतु वडिलांचीं हातचीं आहेत तेवढीं आपणाजवळ असावीं म्हणून मागितलीं." त्याजवरून त्यानें विकल्प चित्तांत आणून दिलीं नाहींत. त्याजवर एकाजी राजे यांच्या कारकुनानीं व कारभारी यांनीं त्याचे पोटांत भय घातलें कीं, राजे तुह्मांशीं खटखट करून बिरदें जोरावारीनें घेतील असें सांगून त्यास धास्त उत्पन्न करून राजियाचे वेळेस व्यंकाजी राजे पळून चंदावरीस बिरदें घेऊन गेले.

त्यास दुसरे दिवशीं राजियास वर्तमान कळलें कीं, व्यंकाजी राजे पळून गेले. त्याजवरून आश्चर्य केलें कीं, "काय निमित्य पळाले? आह्मी त्यास धरीत होतों कीं काय? आम्हांस बिरदें काय करावयाचीं? आमचीं बिरदें अष्ट दिशेस लागलीं आहेत. समुद्रवलयांकित भूमंडळीं कीर्त आपली झाली आहे. तेथें बिरदें काय करावयाचीं? वडलांची वस्त असावी म्हणून मागितलीं होतीं. पळावयाचें नव्हतें. द्यावयाचीं नव्हतीं तरि न देणें. उगेच उठून पळून गेले. अति धाकटे ते धाकटे, बुद्धिही धाकटेपणा योग्य केली." असें बो-

---

31. 'असें कर्म करून भिमल महाल फत्ते केला.' ग० प्र०

32. वेश्या, उपस्त्रिया. (शाहजीच्या)

लिले. मग त्यांचे कारकून व सरदार पळत होते ते राजियाच्या लोकांस सांपडले, त्यांस धरून आणिलें. मग त्या अवघियांस वस्त्रें, भूषणें, अश्व देऊन चंदावरास बंधूसंन्निद्ध पाठाविलें. संताजी राजे ह्मणून महाराजाचे नाटकशाळेचे पुत्र होते. ते शूर पराक्रमी होते. ते राजियाच्या भेटीस आले. भेट झाली. त्यास करनाटकांत हजार घोड्यांची दौलत दिधली. महाल मोकाशे दिले. हत्ती, घोडे, वस्त्रें देऊन रवाना केले. आणि येळूर[३३]कोठ याममध्यें इदलशाई ठाणें होतें. तो कोट म्हणजे पृथ्वीवर दुसरा गड असा नाहीं. कोटांत जीत पाणियाचा खंदक. पाणियास अंत नाहीं असे. उदकांत दहा हजार सुसरी. कोटाचे फांजियावरून[३४] दोन गाडिया जोडून जावें ऐशी मजबुदी. पेंडकोट[३५] तरि चार चार फेरियावरि फेरे. ये जातीचा कोट. त्या कोटास वेढा घालून कोट घेतला. वरकड ही जागां जागां गढी कोट घेतले. कित्येक नवे वसविले. असे शंभर कोट त्या प्रांतीं केले. वीस[३६]लक्ष होनाचें राज्य साध्य केलें. चंदी ह्मणजे जैसें विजापूर, भागानगर, तैसाच तक्ताचा जागा. येथें राजियानीं रहावें. परंतु इकडेही राज्य उदंड. त्याचें संरक्षण झालें पाहिजे. याजकरितां चंदीस रघुनाथ नारायण ब्राह्मण त्यास मजमू संपूर्ण राज्याची सांगितली, आणि त्यांस तो प्रांत स्वाधीन करून चंदीस ठेविलें. त्यापाशीं तूर्त फौज असावी ह्मणून हंबीरराव सेनापति सेनेसहीत ठेविले. आणि राजियानीं आनंदराव व मानाजी मोरे हे दोघे सरदार फौजेनिशीं बराबर घेऊन चंदीहून निघाले. घाट चढून वरतें आले. कोल्हार, बाळापूर हे कोट घेतले. देश काबीज केले. कित्येक गड वसविले. पुढें पाळेगार मारून गर्दीस मिळविले. त्या प्रांतीं रंगो नारायण म्हणून कारकून सरसुभेदार ठेविले. तो ही प्रांत रघुनाथ पंताचे स्वाधीन केला. कोल्हार प्रांते मानाजी मोरे सरदार फौजेनिशीं ठेविले. आनंदराव राजियानीं बराबर घेऊन कोपलास आले. तेथून लक्ष्मेश्वरास आले[३७]. तेथून मजल दरमजल संपगांव प्रांतीं आले. बलवाडा म्हणून कोट होता. तेथें देसाईण बायको होती. तिनें राजियाचें लष्करचे कहीकाबाडी[३८] बैल नेले. हें वर्तमान राजियास कळलें. बलवाडास वेढा घातला, कोट घेऊन देसाईण धरिली. तीस शिक्षा केली. मग पुढें पन्हाळियास आ-

---

३३. 'बेंगरूळच्या' म० प्र०

३४. 'फ़फेली म० प्र० 'प्राकारवेदिका फांजि' रा० व्य० को०

३५ 'पडकोठस्तथासाद्रि: प्राकारवलयं स्मृतं' रा० व्य० को०

३६. 'बारा लक्ष' म० प्र०

३७. याच्या पुढें 'लक्ष्मेश्वरचा किल्ला वेढा घालून घेतला. खान गौडा देसाई यास धरून शिक्षा केली.' असें म० प्र०

३८. 'कहीकाबाडी = लाकूडफाटें, दाणा वैरण नेणारे.

ले, आणि राजियाचाही पैरामृष केला. मग राजे आले हें वृत्त सर्वांस कळलें. त्याजवरून निराजीपंत बाहादुरखानाजवळ ठेविले होते, तेही दर्शनास आले. व खानानींही जड जवाहीर, वस्त्रें राजियाशिं पाठविलीं.

त्या उपरी, कर्णाटकांत हंबीरराव फौजेनिशीं व रघुनाथ नारायण ठेविले होते हें वर्तमान व्यंकाजी राजे यास कळोन राजियांनीं आपली फौज व पाळेगाराची फौज मिळविली. आणि हंबीरराव यावरि चालून आले. ते समयीं हंबीरराव याचे चौगुणी घोडा राऊत हशम अगणित व्यंकाजी राजे यांचे होते. मग यांस त्यांस युद्ध झालें. मग राजियाचा पुण्यप्रभाव अधिक आणि भाग्योदय, हंबीरराव यानीं व्यंकाजी राजियाची फौज मोडिली. मोठें युद्ध जाहलें. अगणित रण पडलें. आणि व्यंकाजी राजियाचे चार हजार घोडे पाडाव केले. व हत्ती जड जव्हाहीर बाजे सरदार भिवजीराजे व प्रतापजी राजे वरकड हीं नामांकित लोक पाडाव केले. अशी फत्ते केली. यश आलें आणि पाडाव केले सरदारांस वस्त्रें देऊन सोडिले. यावरि रघुनाथपंत व हंबीरराव चालोन चंदावराकडे गेले. मग व्यंकाजी राजे यांनीं सभ्य मनुष्य मध्यस्त घालून सख्य करावें असें झालें. त्याजवर रघुनाथपंतीं व हंबीररायांनीं राजियाकडे जासूदपत्रें देऊन पाठविले मग राजियास वर्तमान कळोन या उभयतांस उत्तर पाठविलें कीं, व्यंकाजी राजे आपले धाकटे बंधु आहेत. मूलबुद्धि केली. त्यास तोही आपला भाऊ त्यास रक्षणें. त्याचें राज्य बुडवूं नका. अशीं उत्तरें आलियावरि उभयतांनीं व्यंकाजी राजे यांशीं सल्ला केला. आणि द्रव्य ही उदंड घेतलें. मग रघुनाथपंतीं हंबीरराव यास लष्कर सहवर्तमान निरोप देऊन राजियाकडे पाठविलें. आणि रघुनाथपंत आपण तिकडे कर्नाटकांत फौज दहाहजार स्वार व पागा व शिलेदार जमाकरून तें राज्य रक्षून राहिले. हंबीरराव याची व राजियाची भेट जाहाली. कित्येक नांवाजिले. बक्षिसें दिलीं. आणि पुढें त्यासा राजियांनीं अवघें लष्कर घेऊन जालनापूर मोंगलाईंत त्यास वेढा घातला. पेठा मारिल्या. शहर लुटून फन्ना केलें. अगणित द्रव्य, सोनें रूपें, जड जव्हाहीर, कापड, घोडे, हत्ती, उंटें फस्त केलीं. मोंगलाच्या फौजा, रणमस्तखान व केशरशिंग, वडा, व लष्करखांन व बाजेउमराव अशा फौजा पंचवीस तीस हजार चालून आले. त्यांशीं व राजियाचे

---

३९. 'परामर्ष' हा शब्द असा पूर्वी लिहीत असत.

४० मागें पृ० ६३ व ६७ पहा.

४१. 'सरदारखान' सा० प्र०

जे असतील, ते तेथें आपण करावेत. रा छ ९ माहे रमजान बहुत काय लिहिणे लोभ आसों दीजे हे विनंती. लेखनसीमा.

[ ४ ] श्री

राघोबादादांनीं साबाजी भोंसले यास फोडून आपल्याकडे सामील होण्याकरितां कलमबंदी[1] लिहून या प्रकारें दिली. नकल:—

१ आमचे घरचे चाकरांनीं मोंगल मेळवून खूळ आरंभिलें आहे त्यांतून तुम्हीं निघोन लवकर हरवक्त आह्मापाशीं यावें..................कलम.

२ घरचे चाकर यांचा व मोंगलांचा बंदोबस्त जसा आमचे सेवकास सोयीस बनेल तसा करावा. या कामास सर्वात्मना अकृत्रिमपणें आमचे मनोदयानुरूप अनुकूळ असावें. तिळप्राय कसूर कोणेविशींही करूं नये. .............. कलम.

सदर्हू दोन कलमांप्रमाणें अमलांत यावें. आह्मांकडून आपला गौरव या प्रमाणें होईल. तपशील:—

१ सेनासाहेबसुभा बमोजीब[2] दौलत सांप्रत जशी ज्याचे नांवें आहे तशी असावी असें तुह्मास प्रशस्त असल्यास, आहे तसेंच असेल. हें जर तुमचे चित्तास न ये, तुमचेच नांवें पद व दौलत असावी असें असल्यास, तुमचेच नांवें पद दौलतसह करून देऊं. यांत तुह्मांस जसें आवडेल तसें करूं...... कलम.

२ तुमचा उपयोग हल्लींही हरवक्त पडावा व पुढेंही हमेषा असावा सबब तुह्मांस महाल जहागीर एकूण बेरीज तनख्याची ३२ लक्ष रुपयांची द्यावयाचा करार केला असे. सदर्हू बेरिजेचे महाल क्षेपैनिक्षेप[3] देऊं. येणें प्रमाणें पेशजीं प्रमाणें ३२ चा करार....... कलम.

३ पेशजींचे कराराप्रमाणें किल्ले आशेरी ही जागा तुह्मांस देऊं. येणेंप्रमाणें करार... कलम.

छ ९ माहे मोहरम सुम आरबा सबैन चैत्रमास मुक्काम कुडची करनाटक प्रान्त नजीक कृष्णा दक्षिणतीर. फसली ११८३.

[ ५ ] श्री

राजेश्री त्र्यंकोजी[4] भोंसले सेना धुरंधर गोसावी यांस सकळ गुणाळंकरण

---

१ ही इ० सन १७७३ त झाली.

२ प्रमाणें, अनुसरून.

३ खचीत, अवश्य, निश्चयें करून.

४ हा मुधोजीचा कनिष्ठ पुत्र. याचा जन्म चन्द्रपूर येथें शके १६९८ श्रावण वद्य द्वादशी सोमवारीं झाला. यास "मन्याबापु नाना साहेब" असें म्हणत. आरगांव येथें इ. स. १८०३ मध्यें जो युद्ध संग्राम झाला त्यांत मराठ्यांच्या सैन्याचें-आधिपत्य या

( पुढें चालू. )

अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित माधवराव नारायण पंत प्रधान आशीर्वाद उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय कुशळ लिहीत जावें. विशेष राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेबसुभा पुण्यास आले. भेटी झाल्या. मुधोजी भोंसले कैलासवासी झाले याजकारितां सेनाधुरंधरीचें पद त्यांचे नांवें होतें तें तुमचे नांवें सरकारांतून करार करून दिलें पाहिजे ह्मणून बोलले. त्याजवरून सेनाधुरंधरीचें पद तुमचें नांवें करार करून पदाचीं वस्त्रें व जवाहीर व हत्ती व शिक्के कटार पाठविली असे. आलाहिंदा याद आहे त्याप्रमाणें घ्यावी, आणि मुधोजी भोंसले यांजकडेस सरंजाम चालत आला आहे त्याप्रमाणें बंदोबस्त करून सरकार लक्षांत राहून सेवा एकनिष्ठपणें करून सेनासाहेब सुभ्यांचे लक्षा प्रमाणें वर्तणूक करावी. रा छ १४ माहे साबान सुमतिसा समानीन मयातैनअलफ; बहुत काय लिहिणें हे विनंती. लेखनसीमा.

[ ६ ] श्री

राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेबसुभा गोसावी यांस सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित माधवराव बल्लाळ पंत प्रधान आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशळ ल्याहावें. विशेष आपण कितीएक प्रकारें तीर्थरूप कैलासवासी यांचे वेळेस निखालस वर्तलेत त्या अलीकडे कालगतीनें दरम्यान न व्हावयाच्या गोष्टी झाल्या. त्यास सांप्रत सर्व प्रकारें निखालस वर्तावें व या दवलतीचें कल्याण इछावें; या अर्था वरून संतोष झाला. त्यास तुह्मी तरी सर्व प्रकारें या दवलतीचें उत्तम तेंच इच्छावें, काडीमात्र दुसरा भाव नसावा, व येथून तिळतुल्य आपणा विषयीं दुसरा विचार नाहीं. सर्व प्रकारें निखालसतीनें असावें. याशीं अंतर होणार नाहीं. याज विषयीं आपणही शपतपूर्वक पत्र पाठविलें त्याप्रमाणें

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू.)
जकडे होतें. हा काशी क्षेत्रीं फसली ११२१ सालीं श्रावण मासीं मरण पावला. पुढें प्रसिद्धीस आलेला मुधोजी ऊर्फ आपा साहेब हा याचाच पुत्र.

१ मुधोजी नागपूर मुक्कामी इ. स. १७७८ फसली ११९७ वैशाख शुद्ध १५ स मरण पावला. नंतर फसली ११९८ मार्गशीर्ष मासीं रघोजी मंत्रिमंडळासह नागपुराहून निघोन माघ मासीं पुण्यास आला. तेथे वैशाख मासीं पेशव्यांशीं तहनामा होऊन श्रावण मासीं नागपुरास येऊन दाखल झाला.

२ "सेनाधुरंधर" हा किताब प्रथम मुधोजीस स. १७७५ त मिळाला.

३ बाळाजी बाजीराव उर्फ नाना साहेब.

४ जानोजीनें निजाम अली बरोबर सख्य करून पेशवा होण्याचा घाट घातला, पुणें शहरास स. १७६३ त आग लाविली, राघोबा दादाशीं स्नेह ठेवून पेशव्याच्या विरुद्ध वर्तन ठेविलें व पुढें स. १७६८

(पुढें चालू)

चालावें. येथूनही ऐसेंच वर्तण्यांत येईल. यास तीर्थरूप कैलासवासी नानासाहेबांची शपथ असे व श्री गजाननांची शपथ असे. जैसे निष्टेनें वर्तील तैसेच तुमचे दवलतीची अभिवृद्धि करण्यांत येईल. वरकड मजकूर हे[2] सांगतील त्याज वरून कळेल. छ २७ माहे सवाल बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती. लेखनसीमा.

[ ७ ] श्री

राजश्री रघोजी भोंसले सेनासाहेब सुभा गोसावी यांस.

सकल गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य.... ...स्नेहांकित माधवराव नारायण पंतप्रधान आशीर्वाद विनंती उपरि, येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहित असलें पाहिजे. विशेष श्रीमंत महाराज[3] छत्रपति स्वामी यांचे आज्ञे वरून तुह्मांस सेनासाहेबसुभा पद बहाल केलें असे, तरि तुह्मी फौजेचा व मुलुखाचा बंदोबस्त करून चाकरी सरकारची एकनिष्टपणें करीत जावी. रा। छ. २९ माहे रानेर सुमसिन सबैनमया अलफ. बहुत काय लिहिणें लोभ असो दीजे हे विनंती. लेखनसीमा " राजाराम नरपति हर्षनिधान माधवराव नारायण मुख्य प्रधान ".

[ ८ ] जरीपटका मिळाला.

रघोजी भोंसले उर्फ बाबासाहेब यांजला शाहूमहाराजांनीं सेनासाहेब सुभ्याचें पद व शिक्के कटार वस्त्रें वगैरे मरतैबा दिला ते वेळेस रघोजी भोंसले यांणीं महाजांस विनंती केली कीं आम्ही कर्नाटकचे मोहिमेवर गेलों होतों तिकडेस एका महापुरूषानें आह्मांस श्री रामचंद्र स्वामीची मूर्ति प्रसाद दिली. त्या वेळेस त्या सत्पुरूषाची वाणी झाली कीं या मूर्तीची आराधना करून सेवा करणें ह्मणजे तुमचे कल्याण होईल व देवाची पताका ही आह्मांजवळ आहे. या योगानें महाराज कृपावंत होऊन हें पद ते दिवसा पासून दिलें त्यास आमचे मनांत वासना आहे कीं श्री रामचंद्राचे नांवानें झेंडा उभारून चालवावा; या विषयीं महाराजांची आज्ञा असावी. यावरून महाराजांनीं आज्ञा केली कीं आम्हीहि रामभक्तच आहों व आमचा

---

( मागील पृष्ठावरून पुढें चालू )
त पुण्यावर स्वारी केली; इत्यादिक नाना साहेबांच्या मरणा नंतर झालेल्या गोष्टी होत.

१ माधवराव पेशवा गणपतिभक्त होता अशी प्रसिद्धि आहे.

२ हें पत्र कोणाबरोबर पाठविलें याचा पत्ता लागत नाहीं.

३ राजाराम.

४ सन्मानाचीं व हुद्याचीं भूषणें.

५ ही स्वारी इ. स. १७२७ सालची असावी.

झेंडा भगवा रामदास स्वामीचाच आहे. त्यास तुह्मीही भगवा झेंडा करून जरीचा पटका येथील प्रमाणें लावावा, व हा सरदाराचा शिरस्ताही आहे कीं जयाचा झेंडा करावा हें समजून महाराजांनीं कृपावंत होऊन सदरीं लिहिल्या प्रमाणें आज्ञा करून विडे दिले. त्या हुकमाप्रमाणें तेथेंच जरी-पटका तयार करून समागमें घेऊन वराड प्रांतीं आले.

[ ९ ] श्री

सकळ गुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य राजश्री राघोजी भोंसलें सेना साहेब सुभा

सेवेशीं फत्तेसिंगे भोंसले रामराम विनंति उपरि, तुह्मीं आपल्या समागमें फौजेनें शिकस्त मेहनत केली. तुमचे पदरीं फौजेस सरंजाम बेगमीचा नाहीं, याज करितां तुह्मांस सरंजाम देऊं केला त्पशील:—राजश्री कान्होजी भोंसले राज्यांतून गेले. यांचे लेक राजश्री रायाजी भोंसले असलईत पुरातन सरं-जाम राजश्री परसोजी भोंसले याचे वेळेस जो होता तो दरोबस्त स्वस्थान देखील करून देऊं; खेरीज माळवा सुपें बारामती व दहीगांव महाल तनि मोकासे करून देऊं, येणेंप्रमाणें कलमें दोन तुम्हास देऊं केलीं आहेत. रा-जश्री स्वामींचें दर्शन झाल्यावर करून देऊं. अंतर होणार नाहीं. राजेश्री स्वामींस अर्ज करून देववूं, यास अंतर करूं तरि, स्वामींचे पायांची शपत असे. देशमुखी कडेवळितची राजपत्र करून देववूं. हे विनंति.

[ १० ] श्री

राजश्री मुधोजी भोंसले सेनाधुरंधर गोसावी यांस

सकळ गुणालंकरण अखंडित लक्ष्मी अलंकृत राजमान्य—

स्ने॥ बाळाजी जनार्दन आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लिहीत असले पाहिजे. विशेष विस्तारें मजकूर लिहिला त्यांत मुख्यार्थ कीं महमँदइसफ याजवर ताजँखान रोहिले फौजेसुद्धां रवाना

१ मराठ्यांचे झेंडे भगवे असत याचें कारण 'रादास स्वामीच्या बखरींत' १०१ पृष्ठांत सांगितलें आहे. 'धोम महाबळेश्वर वर्णन, ११९ पृ० पहा.

२ हा अक्कलकोटकर भोंसल्यांचा मूळ पुरुष. शाहू महाराजांची अक्कलकोट येथें फत्ते झाली तेव्हां कोणी आपला मुलगा शाहूच्या पायांवर घातला. त्यास शाहूनें पुत्रतुल्य मानून रंकाचा राव केला.

3 सरकार अहमदनगरचे पोटीं १० परगणे अथवा महाल होते. त्यापैकीं एकाचें नाव

४ नारायणरावास मारणारा बास मुधोजीनें कपटानें धरून पेशव्यांच्या कारभाऱ्यांच्या स्वाधीन स. १७७६ चे सुमारास केलें. यास कोणती शिक्षा मिळाली हे 'पेशव्यांची बखर' पृ० १३२ पहातां समजेल.

५ शिवनी-छपारे येथील भोंसल्यांचा सरदार

केले. त्यांनीं मेहनत फार करून धरून आणून त्याचे पायांत बिडी घातली. त्यास शिरूरास आणविला आहे. तेथें पांचशे राऊत पाठऊन न्यावा, म्हणून राजश्री हरि बल्लाळ यांस लिहिले आहे त्यांचे राऊत येऊन घेऊन जावें हे प्रतीक्षा आहे म्हणून लिहिलें तें कळलें. ऐशास ताजखान रोहिले यानीं मेर्दुमीची शर्थ करून हरामखोर धरिला, फार सरस केलें. त्यास आणावयास पांचशें राऊत पाठविले म्हणून हरि बल्लाळ यानीं लिहिलें. येथें होते त्यास राऊत शिरूरास पोंचवून त्यांचे स्वाधीन इसम मजकुरास केलाच असेल. आपलें लक्ष दुसरें नाहीं म्हणून लिहिलें तरि पूर्वीपासून श्रीमंतांचा व आपला स्नेह घरोबा एकात्मता चालत आला. तेंच लक्ष आपलें आहे. त्याच रीतीनें येथून दुसरा विचार सहसा नाहीं. आपण मार्गाची गोष्ट, तेच करितात, हेंच फार उत्तम आहे. अलंकाराचा विषय किती परंतु लिहून पाठविलें हें उचित. रा छ० ६ रमजान. बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हें विनंती.

याच पत्राच्या अन्वयें सखाराम भगवंत यांनीं ही पत्न लिहिलें. तारीख ही छ मजकूरच आहे.

[ ११ ] श्री

### सवाई माधवराव पेशवे व रघोजी सेना साहेब सुभा यांचे सवाल + जबाब.

१. सवाल. ब्रम्हेश्वरचा तह झाला तो कैलासवासी रावसाहेब यांची मर्जी रखून निरोप घेतला; दोन वर्षे प्रचीत पुरवून विनांति करावी हा निश्चय होता त्या वेळेस बोलणें तसेंच राहिलें. त्यास सांप्रत तें ऐकून काय तें सांगितलें पाहिजे. कलम १. जबाब. उचित आहे तेंच बोलावें. याप्रमाणें करार करावे.

---

१ प्रख्यात सेनापती-हरीपंत तात्या फडके

२ पराक्रम, शौर्य.

**[ सवाल जबाब—टीप ]**

+ हे सवाल जबाव इ. स. १७७१ चे सपटंबर महिन्यांत झाले. भोंसल्याकडून ह्या सालीं जून महिन्यांत दिवाकर पंडित पुण्यास गेला होता, त्याच्या मार्फत हे सवाल जबाब झाले असें दिसतें.

३ ब्रम्हेश्वराजवळ भीमानदीच्या तटाकीं, कज्जकापर येथें थोरले माधवराव पेशवे व जानोजी भोंसले यांचा गोपाळराव पटर्धन मिरजकर याच्या मध्यस्थीनें १३ कलमांचा तह स. १७६९ मार्च २९ रोजीं झाला. या तहास "कनकापुरचा तह" म्हणतात. या तहानें जानोजीस पेशव्यानें चांगला वठणीस आणिला. पेशव्याच्या अनुमतिशिवाय जानोजीनें कोणतेंही राजकारण करूं नये असें ठरलें. (ग्रां० डफचा इंग्रजी इतिहास पृ. ३३२ आवृति ३)

४ माधवराव बल्लाळ पेशवे पंतप्रधान यांस 'रावसाहेब' म्हणत.

२. *सवाल. तीर्थस्वरूप सेनाधुरंधर यांचा व नबाबाचा अलजैपुरावर तह झाला त्यासीं पांच वर्षें झालीं. तहांत करार कीं, रा॥ रघुनाथ राव दादा याशीं सोडावें आणि रा॥ पंतप्रधान यांचा पक्ष धरावा त्याप्रमाणें अमलांत घडून आलें किंवा नाहीं हें उत्तर व्हावें. कलम- जबाब. तीर्थस्वरूप रा॥ राजश्री दादा साहेबांचा पक्ष सोडून सरकार लक्ष्यांत राहून वर्तणूक केली येविशीं निशा आहे. लौकिकांतही प्रसिद्ध आहे. सरकारची खातर जमा जाहली. येणेंप्रमाणें करार करावे.

३ सवाल. इंग्रज येऊन दोन महिने हुसंगाबादेवर बसले. इंग्रजांची व आपली तूट आणि कटकचे बदल खातर, आम्ही त्यांशीं स्नेहाचें रीतीनें दोन अडीच महिने दिवस घेतले. येणेंकरून चोहींकडे एक प्रकार दिसला, परंतु येथें लक्षांत रतिमात्र अंतर झालें कीं काय येविषयींचें उत्तर झालें पाहिजे. कलम १. जबाब. येविशीं पक्की खातरजमा झाली. संदेह राहिला नाहीं. इंग्रजाकडील पत्रें दाखविलीं त्यावरून पूर्ते समजलें. येणेंप्रमाणें करार करावे.

४. सवाल.† इंग्रजांचा व सरकारचा बिघाड ; इंग्रज रा॥ रघुनाथराव दादा याशीं पुढें करून दौलतीस उपद्रव करूं लागले ; तेव्हां आम्ही सरकारचे लक्षांत याजमुळें कटक प्रांतास व प्रति वर्षीं १४ लक्ष रुपये द्यावे या शिवाय वीस वर्षें मकसुदाबादेस मागील बाकी आहे. यास इंग्रज पेंच वसवितील, त्यास बिघाडाचे पोटांत पेंच वसविला तरी चिंता नाहीं. सरकारची मदत असावी; समजून घेऊं. इंग्रजाचा आपला सलूख होऊन तह झाला तरी आमची वाट काय त्याची आज्ञा करावी. कलम १ जबाब कटकास इंग्रजाचा पेंच पडल्यास सरकारांतून मदत केली जाईल. येणेंप्रमाणें करार करावे.

---

* दुसऱ्याप्रतींत हा सवाल ११ वा आहे.

१ मुधोजी भोंसले.

२ निजाम अली.

३ एलिचपूर.

४ कर्नल गाडर्ड हा इ. स. १७७८ च्या डिसेंबरच्या २ तारिखेस हुसंगाबादेस नर्मदा नदी उतरून चालता झाला. परंतु पुढें जाण्यापूर्वीं त्यास मुधोजीच्या पत्राची वाट पहात थांबावें लागलें. मुधोजीनें इंग्लिश सरकारचें म्हणणें प्रथम मान्य केलें नाहीं. पेशव्यांचें वजन कमी करण्या करितां मुधोजीस सर्व मराठे लोकांचा राजा बनवावा आणि त्याच्या बळावर ढवळाढवळ करावी असा मि. हेस्टिंग याचा इरादा होता. परंत तो समूळ फसला. विठ्ठल सुन्दर यांनी हा पूर्वीं असा घाट घातला होता.

† हा सवाल १२ वा दुसऱ्या प्रतींत आहे.

५ बंगाल.

५. सवाल. सर्वांचा आमचा वालीपणा ईश्वर दयेनें येथें राखिला आहे. यासी उपद्रव इंग्रज, हैदर नाईक अगर कोणी करूं लागले तरि आह्मांस ईतल्ला[१] अगोदर दोन महिने व्हावा. जमियतीनिशीं शक्तीप्रमाणें हजर आहों. या खेरीज कोठेंही फौज पाठवा अगर आमचे सरकारची फौज जाती याजबरोबर आपली फौज द्या ही गोष्ट नसावी, सबब घरांत भावाबंदाचे पेंच व वऱ्हाडांत नाना प्रकारचे उपद्रव व संबलपूर[२] आदिकरून रजवाडे, व मंडले[३] आदिकरून कामें, भोपाळ[४] आदिकरून कामें बिघडून राहिलीं आहेत; याजकरितां फौज पाठवावी हें माफच असावें. केवळ दौलतीवर पेंच बसल्यास एक इशारा आला म्हणजे बेहुजूर‡ आहों. कलम १. जबाब. मातबर मसलतीस बोलाविलें जाईल, ते समयीं फौज सुद्धां तुम्ही यावें. शिवाय मसलतींत दरसाल बोलावणें होणार नाहीं. येणें प्रमाणें करार करावे.

६. सवाल.* तीर्थरूप सेनाधुरंधर याजकडून राजश्री रघुनाथरावदादा यानीं तेरा लक्ष रुपयांचा रोखा लिहून घेतला आहे, त्यास त्यापैकीं साडेसहा लक्ष रुपये त्यानींच माफ केले. बाकी साडेसहा लक्ष रुपये त्यानीं आम्हांजवळून घ्यावे अथवा त्यानीं माफ करावे हा जिमा ईश्वरेंच त्यांजकडे ठेविला नाहीं. तेव्हां ईश्वरसत्ता आपणाकडेस आहे. त्यास आम्हांकडून जी वर्तणूक घडली आहे ती ध्यानांतच आहे. येविशीं काय आज्ञा ते करावी; हें न लिहितों परंतु तेरा लक्ष रुपयांचे खत राजश्री बाबुराव विश्वनाथ यानीं दाखविलें तेव्हां हें लिहिणें प्राप्त आहे. यास्तव येविशीं आज्ञा केली पाहिजे. कलम १. जबाब. तुम्ही बंगाल्याची मसलत अंतःकरण पूर्वक कबूल केली सबब १३ लक्ष रुपये माफ केले आहेत. रोखा माघारा द्यावा. येणेंप्रमाणें करार करावे.

---

१ बातमी, वर्तमान.

२ या समयीं संबलपूरचा राजा जेटासिंग होता. त्याचें नागपूरकर भोंसल्याशीं वैमनस्य होतें. इ. स १७१७ मध्येंतर एक मोठा कलह उपस्थित झाला.

३ गऱ्हामंडळ्याचा राजा शिवराजशहा यास पेशव्यानें स० १७६० मध्यें राज्यपदाधिरूढ केलें. तेव्हां तो पेशव्यास चौथाई बद्दल वर्षास ४ लाख रुपये खंडणी देत असे. हा इ. स. १७६७ त मरण पावला तेव्हां राज्यांत अव्यवस्था माजली.

४ भोपाळच्या नबाबांचा मूळ पुरुष दोस्त महमद याचा नातु नवाब फैजमहमद यसीद महमद व हियत महमद हे नागपुरकर भोंसल्यांच्या मुलखास उपद्रव देत.

‡ सन्निध, जवळ

* हा सवाल १३ या दुसऱ्या प्रतींत आहे.

५ पेशव्याकडील नागपुरास असणारे वकिल. याचें अडनांव वैद्य.

७. सवाल. आम्ही आपलेही पूर्ती खातरजमा झाली असली तरी दायादसंबंधी प्रकरण घरकुलें घडतच असतात; त्याची नालिश[1] सरकारांत येत असती त्यास येथून मनोधारण त्याचे रक्षायास पत्रें जातील त्याशीं हे गोष्ट न घडावी; आमचे दायाद संबंधीं आहेत त्यांजला जागा सरकारांत न व्हावी अगर नबाब निजाम अल्लीखान बहादुर, व शिंदे होळकर सरदार यांजकडेस कोणी पत्रें लिहील अथवा जाईल याशीं ही येविषयीं पत्रें लिहून त्याचा थारा न व्हावा; अखंड लोभ करून आम्हावर अंतरबाह्य मदतच असावी. आमचे दायादसंबंधाचीं पत्रें व राज्यकारण येईल तरि त्याचा इतला आम्हांस होत असावा, आम्हाकडेस कोठीलही पत्रें अथवा राज्यकारण आलें तर त्याचा इतला वरचेवर करण्यांत येईल. कलम १ जबाब. सरकारचा तुमचा स्नेह व तुम्ही सरकार लक्ष्यांत या पक्षीं अशा गोष्टी घडणार नाहींत. येविशीं खातरजमा असावी. येणेंप्रमाणें करार करावे.

८. सवाल—आम्हाकडील† संपूर्ण प्रांत किती, यांत वसूल काय याजपैकीं धर्म परंपरा कैलासवासी तीर्थस्वरूप बावासाहेब[2] व बावासाहेब[3] यांजपासून चालत आला आहे. किती बाकी राहिली काय, त्याजपैकीं चिरंजीव चिमणा बापू[4] व चिरंजीव मन्या बापू[5] आदिकरून यांजकडेस काय, व संसार खर्च व खासगीचा खर्च किती आहे, हें जाऊन बाकी राहिली त्यांत फौज किती असावी ही आज्ञा करावी; या खेरीज अधिक फौज ठेवणें, सरकारचे आज्ञेप्रमाणें महत् कृत्यावर उपयोगी येणें, याजविषयीं मार्ग दाखवावा. कलम १. जबाब. तुम्ही सर्वजाण आहां; दौलती प्रमाणें समजून सावधपणें खर्चवेंच करीत जावा. येणेंप्रमाणें करार करावे.

९. सवाल—नबाब निजाम अल्लीखान बहादूर याचा व आमचा अलजपुरावर तह झाला ते वेळेस नबाबांनीं तहांत लिहून दिलें कीं, गंगथडी व वऱ्हाड आपले मामूल घेत जाणें, आणि स्नेहामध्यें अंतर

---

१ गाऱ्हाणें, फिर्याद.

† हा सवाल दुसऱ्या प्रतिन १४ वा आहे.

२ पहिले रघोजी भोंसले सेना साहेब सुभा.

३ मुधोजी.

४ मुधोजीचा मधला मुलगा. याचें नांव खंडोजी ऊर्फ चिमणाजी बापू दाजीसाहेब. यास 'सेनाबहादर' हा किताब होता.

५ मुधोजीचा कनिष्ट मुलगा. याचें नांव व्यंकाजी ऊर्फ मन्याबापू नानासाहेब. यास 'सेनाधुरधर' हा किताब होता.

आपा दुःख परा जो देतो जें भोगितसे तो तें ॥
पेरावें बीज जसें त्याचें प्राप्त फळ तसें होतें ॥ १५ ॥
सत्य **सुरुचि** वदली वत्सा कीं माझीं कर्में खोटीं ॥
त्यां हतभाग्येनें धरिलासी प्रथम अभद्रीं पोटीं ॥ १६ ॥
वाढविलासी मग बारा [ ? ] तूं तंव आहितकरें स्तन्यें ॥
धन्य असे कसें फळ होतें काय ह्मणावें अन्यें ॥ १७ ॥
मी दुर्भगा नव्हें कैसी कीं पुत्रा मातें भार्या ॥
दासी ही ह्मणतां बहु लज्जा वाटे राजा आर्या ॥ १८ ॥
जैसी मी माता तैसी च प्राज्ञ जन मतें **सुरुची** ॥
मजहुनि ही तुजला बहु मान्या कीं ती दयिता गुरुची ॥ १९ ॥
सत्य प्रिय हित वदली मत्सर सोडुनि तूं तें चि करीं ॥
आराधीं **श्रीहरि**तें तो चि श्रेष्ठ वरद सुरनिकरीं[1] ॥ २० ॥
उत्तम जसा तसा भद्रासन इच्छिसि तूं जरि तरि तें ॥
प्रभुपदसारस आराधीं हित बहु भजकाचें करितें ॥ २१ ॥
ब्रह्मेंद्रादि हि झाले प्रभुतें आराधुनि सुपदेश ॥
ऐसा **सुनिति** हि करी त्या **ध्रुव**बाळाला उपदेश ॥ २२ ॥
त्यागी करावया रोमांचित धीरजना भवनातें[2] ॥
ध्रुव बाळ निघे आराधाया नीरजनाभ[3] वनातें ॥ २३ ॥
माय हि न ह्मणे ध्रुवबाळाला बहु ताप न हो राहो ॥
कीं जी शरणागति प्रभुप्रति होय शुभद होरा[4] हो ॥ २४ ॥
संसृतिपारद परम विशारद भेटे श्री**नारद** या ॥
शारदयामवतीश[5] चकोरीं तेंवि करी फार दया ॥ २५ ॥
पुसुनि मुनि ह्मणे बा बाळ असें वचन कठिण सोशील ॥
तेव्हां चि तुझें ऐसें केवळ उग्र हटि नसो शील[6] ॥ २६ ॥
भूतसुहृत मानि याति शरण बुध शांतिस चि सुरभि मानी ॥
बहु दुर्लभ परमेश्वर त्यातें पावे न दुरभिमानी ॥ २७ ॥
ध्रुव बोले सांगसि जें तूं तें सत्य चि सर्व स्वामी ॥
ऐकावें त्वां वदतों कांहीं सज्जन सर्वस्वा मी ॥ २८ ॥
साधुनि वृत्त्युपदेशामृत हें प्यावें कविकटकांहीं ॥
न धरी सुरुचिदुरुक्तिशरशतच्छिद्र-हृदय धैर्य कांहीं ॥ २९ ॥

---

१ देवांच्या समुदायांत. २ घर. ३ विष्णु. ४ सुमुहूर्त. ५ शरच्चंद्र. ६ स्वभाव. ७ सागर.

धर्माचें तत्व तसें चि न हा जाणे बाल नयाचें ॥
त्वां गुरुवरें करावें संप्रति समुचित लालन याचें ॥ ३० ॥
भगवद्दर्शन दुर्लभ हि सुलभ व्हाया जी काय किल्ली[1] ॥
ती तव हस्तीं आहे ऐसी कीर्ति तुझी आयकिली ॥ ३१ ॥
बहु मानावें तोकें केलें आंगउपायन तातें ॥
वहु काय वदों सदय गुरुवरा सांग उपाय नतातें ॥ ३२ ॥
परम प्रसन्न होऊनि भगवान् ज्ञानदया राशि कवी ॥
भगवध्द्यानार्चनमंत्र सुविधि राजकुमारा शिकवी ॥ ३३ ॥
ध्रुव नमुनि ह्मणे जातों आतां मी बापा यमुनेतें ॥
भगवद्दर्शन झालें चि तुझे दिसतां पाय मुने तें ॥ ३४ ॥
जाऊनि यमुने प्राति तत्तीरीं रम्य मधुवनीं राहे ॥
आरंभी परपुरुषाराधन शिशु हि बहु श्रम साहे ॥ ३५ ॥
मुनि भूपाला भेटे राजा पूजी मुनिला विधिनें ॥
त्यातें कां खिन्न असे पुसिलें त्या ज्ञानदयानिधिनें ॥ ३६ ॥
कथितां वृत्त सविस्तर त्याच्या होय भर विलापाला ॥
पुत्र विरहविषतरुचा विधिनें विपुल भरविला[2] पाला ॥ ३७
स्त्रीजित निर्दय निस्त्रप[3] ऐसें स्वमुखें बहु निंदुनि घे ॥
सुतशोकांत न तो नृप जाणों राहुमुखीं इंदु निघे ॥ ३८ ॥
नारद ह्मणे सुतातें शीघ्र चि सिद्धार्थ पहाशील ॥
आहे क्षेमीं देवसुरक्षित तन्मान्य महाशील ॥ ३९ ॥
मुनिवचनें चिंता सोडावी परि घडल्या अनयातें ॥
स्मरुनि अनादरुनि श्रीतें तो नृप चिंती तनयातें ॥ ४०
पांचा वर्षांचा ध्रुव उग्रीं नियमीं चळला न दरें ॥
पहिल्या मासीं तो त्रिदिनांतीं खाय कपित्थें[4] बदरें ॥ ४१
दुसरे मासीं द्विगुण दिनांतीं तो शीर्णें तृणपर्णें[5] ॥
भक्षुनि चिंती प्रभुसि परिसिला होता जैसा कर्णें ॥ ४२
तिसरे मासीं त्रिगुण दिनांतीं पी केवळ तोयातें[6] ॥
आशीर्वाद मुनीचा जो दे योगिबळ तो यातें ॥ ४३ ॥
मग तो चवथे मासीं द्वादश दिवसांतीं वातातें ॥
प्राशुनि चित्तीं चिंतीं प्रेमें चतुरानन-तातातें[7] ॥ ४४ ॥

---

१ किल्ली (युक्ति) २ सावविला. ३ निर्लज्य. ४ कवठ. ५ — ६ पाणी.
७ विष्णु.

पंचम मासीं एक पदें तो स्थाणुसम[1] उभा राहे ॥
हृदयीं भगवन्मूर्ती तें चि न तादितर कांहीं पाहे ॥ ४५ ॥
विश्वस्वरूप हरिहुनि आपण भिन्न नसे या भावें ॥
धरिला ध्रुवें समाधि असें चि ध्यान धराया यावें ॥ ४६ ॥
त्याच्या प्राणनिरोधें झाला विश्वप्राणनिरोध ॥
भ्याले लोक सलोकप त्यांशि न लागे कारणशोध ॥ ४७ ॥
व्यसनीं सर्व हि लोकेश शरण गेले लक्ष्मीपतितें ॥
यन्नामें शुचि व्हावें चलन न होतां पॆक्ष्मीं[2] पतितें ॥ ४८ ॥
ते प्रभुसि ह्मणति आह्मांसि तुझा मात्र असे विश्वास ॥
रक्षीं सदया प्राणनिरोधा पासुनि या विश्वास ॥ ४९ ॥
दे अभय प्रभु सांगे कारण जें कांहीं न कळे तें ॥
जा स्वथ ह्मणे पावविलें सुख हें कां हीनकळेतें ॥ ५० ॥
लोकेश स्वस्थानीं धाडुनि जगदीश्वर मग पॆतें[3] ॥
न लवे तोंचि मधुवनीं आला समधिष्ठुनि खगपातें ॥ ५१ ॥
राहे पुढें उभा परमेश्वर परि तो ध्रुव पाहेना ॥
कीं अंतःस्फुरितप्रभुमूर्तिवियोग क्षण साहेना ॥ ५२ ॥
त्या ध्रुवहृद्गतनिजमूर्तीतें तो प्रभुवर आकर्षी ॥
व्हाया प्रमुदित साधु श्रोते सुकवि ध्रुवें नाकर्षी ॥ ५३ ॥
हृदयीं भगवन्मूर्ति न दिसतां पावे व्यॆत्थानातें[4] ॥
ध्रुव गडबडला चुकला शोधी बाळ जसा थानातें ॥ ५४ ॥
नेत्रें उघडीं घाबरला तो ध्रुव सहसा जों पाहे ॥
तों आंत जशी तसि बाहेर प्रभूमूर्ति उभी राहे ॥ ५५ ॥
भी परि सुनीतिसुत दंडा परि पडला करि अंजलि ही ॥
कीं बहु भाग्य ललाटीं श्रीगुरुनारद करॆंज[5] लिही ॥ ५६ ॥
स्वगुरुगुरूचि शिकवुं ह्मणे जाणों शिकवि न या स्तवन मुनी ॥
स्तुति वांछा धरुनि उगा चि पुढें राहे यास्तव नमुनी ॥ ५७ ॥
ध्रुवमति जाड्य ब्रह्ममयदरें स्पर्शुनि गाल हरी तें ॥
वात्सल्य असें परिसुनि जन हो हर्षुनि गाल हरीतें ॥ ५८ ॥
जागविली निजली होती त्या बाळाची जी वाचा ॥
बोध दिला ऐसा लाजावा ज्या महिमा जीवाचीं[6] ॥ ५९ ॥

---

१ खुंट. २ डोळ्याच्या पापण्या. ३ निश्चयेंकरून. ४ प्रतिरोध. ५ करकमळ. ६ बृहस्पतीचा.

प्रभुनें शिशुसि शिकविलें जैसें निजवर्णन वेदास ॥
वाट तो उच्चारी स्तवनीं शुचि वर्ण नवे दास ॥ ६० ॥
बाळ मुखींचीं जरि अव्यक्तें अक्षररूपें साधीं ॥
केवळ अमृत चि होती वत्सल गुरुजनकर्णी आधीं ॥ ६१ ॥
परमानुग्रह करुनि शिकविलें प्रभुनें भाषण मग तें ॥
किति वर्णावें अमृत कसें हो त्या सूक्ति पुढें तगतें ॥ ६२ ॥
वाजविला वेणु तसा किंवा बहु शिक्षित हा शुकसा ॥
प्रभुला प्रमुदित मग न करील ध्रुव बाळक आशु कसा ॥ ६३
भगवान् प्रसन्न होउनि बोले दिधलें तुजला पद तें ॥
सर्वपदश्रेष्ठ असें वत्सा विश्व जयातें वदतें ॥ ६४ ॥
ज्यातें प्रदक्षिणा सप्तर्षि ग्रहमंडळ करि वेढो ॥
जे ज्योतिश्चक्रो वृषचक्री जेंवि विराजे मेढो[1] ॥ ६५ ॥
आधीं वत्सा तूं येथुनि जा निजजनकाच्या भवनीं ॥
जातां तपोवनाप्रति देइल तुजला राजा अवनी ॥ ६६ ॥
छत्तिस सहस्र वर्षें करिसिल अवनीच्या अवनातें ॥
नित्य मम भुजा परि करितिल प्रकृति तव स्तवनातें ॥ ६७ ॥
उत्तम[2] मरेल मृगयेंत सुरुचि दवदहनांत जळेल ॥
वत्सा हें न टळेल कदापि त्वत्कीर्ति हि न मळेल ॥ ६८ ॥
बहुलक्षिण यज्ञांहीं मातें यजुनि सुखें वससील ॥
मग तूं माझ्या सर्वामर मुनिवंद्य पदीं बससील ॥ ६९ ॥
ऐसा अत्यद्भुत वर देवुनि गुप्त प्रभुवर झाला ॥
मग नातिप्रीत मनें तो ध्रुव तात-पुरी प्रति आला ॥ ७० ॥
कर जोडुनि वार्ताहर[3] सांगे ध्रुव आला हे वार्ता ॥
ती राजाला झाली जैसी वृष्टि सुधेची आर्ता ॥ ७१ ॥
वार्ताहरासि बहु मोलाचा मणिहार दिला भूपें ॥
रत्नाकरें प्रसन्नें रत्नें वार्षी उदकें कूपें ॥ ७२ ॥
नारद मुनिच्या विश्वासें ती वार्ता साची वाटे ॥
शोक सुतागमनें जेंवि घटजतेजें सागर आटे ॥ ७३ ॥
राजा भार्यापौरामात्यां सह सामोरा गेला ॥
तैं स्वनिर्याति[4] वरि तेंवि सुरुचिवरि न ध्रुव तो रागेला ॥ ७४ ॥

---

१ मेढ. २ सावत्रभाऊ. ३ हेर. ४ स्वप्रारब्धावर.

गुरुस सुरुचिस सुनितिस वंदुनि भेटुनि निववी अंगें ॥
कीं आलें तापहरत्व श्रीमुनिभगवत्पदसंगें ॥ ७५ ॥
सादर सुरुचि निरखि दिसलें न तदानन सा महिने तें ॥
ध्रुव मनिं ह्मणे अशा पदवीस न दान न साम हि नेतें ॥ ७६ ॥
विरहद होउनि योगद झाला त्या यादा अर्णव तो ॥
भगवज्जनसंगज परमोत्सव सांग कसा वर्णवतो ॥ ७७ ॥
पुरजन न वर्णवे वर्णवतो त्याचा तात कसा हो ॥
ध्रुव ह्मणतां चंद्र चकोर असे कीं घन चातक साहो ॥ ७८ ॥
नेला नगरीं तो ध्रुव गाजत वाजत मिरवित तातें ॥
माथां तत्कीर्ति वितानीं तें त्रिभुवन मिरवि ततें तें ॥ ७९ ॥
वर्णिति अत्यद्भुत भाग्य सदा सुरपन्नग राजाचें ॥
अमृताचे वर्षतसे निववी यश तन्नगरा ज्याचें ॥ ८० ॥
योग्य दशा पुत्राची राज्या त्यागा आपुलि पाहे ॥
मग भगवद्भक्तीं सत्पात्रीं राजा स्वश्री वाहे ॥ ८१ ॥
कृतकृत्य चि नृप झाला रत भगवंतीं सुत पाहूनीं ॥
गेला तपोवना कीं अधिक न अंतीं सुतपाहूनि ॥ ८२ ॥
वाटेल कसें परम पद प्रद तप काविला सामान्य ॥
हें टाकुनि होय जडचि नेणुनि सपेक विलासा मान्य ॥ ८३ ॥
पाववि ताताच्या प्रकृतीचें मानस जेंवि सराळा ॥
तें विसरवि हंसकुळाकरवी मानस जेंवि सराला ॥ ८४ ॥
तो उत्तम मृगयेतें गेला तेथें वधिला यक्षें ॥
व्हायाचें तें होय चि कोणें भावि चुकाविलें दक्षें ॥ ८५ ॥
गेहीं सुतशोक परम दुःसह ह्मणूनि सुरुचि ती गहनीं ॥
शिरली सद्यः स्वतनुवियोगें व्हाया सुख दवदहनीं ॥ ८६ ॥
क्षोभे ध्रुव बहु ज्याच्या चक्रध्वनिनें अरि तापावे ॥
त्या चढुनि रथीं यक्षपुरा षढहितमदहारिता पावे ॥ ८७ ॥
आले त्रयोदशायुत धावुनि गुह्यक राक्षस यक्ष ॥
तींतीं बाणांनीं एकैका विंधी ध्रुव रणदक्ष ॥ ८८ ॥
एकें एकें सा सा ऐसे त्यांहीं शर बहु लक्ष ॥
पाठविले तेव्हां ध्रुव झाला दवदहन चि ते कक्ष ॥ ८९ ॥
प्रकट करिति बहु दुःसह जाणुनि यातें ते परसाया ॥

---

१ जलचर. २ समुद्र. ३ छत. ४ विस्तृत. ५ गोडी रहित. ६ चतुर. ७ भवत.

नारायणास्त्र योजी जें ध्रुव भ्याल्या त्या परसा या ॥ ९० ॥
गुह्यकपुर मर्दुनि ध्रुवानें मर्दांया अलँकेला ॥
त्या राक्षसगुह्यकयक्षांच्या पति वरि ही चल केला ॥ ९१ ॥
तेव्हां त्याचा त्यसि पितामह मनु भेटुनिया वारी ॥
सत्क्षोभा शमवि सदुक्त दवा घनमुक्त जसें वारी ॥ ९२ ॥
एकाच्या अपराधें केला बहुतांचा घात कसा ॥
तूं प्रभुपदनखचंद्रामृतरस पितां कीं चातकसा ॥ ९३ ॥
न क्षोभाया करि तो अंजलि ईश्वरबंधु प्रति मी ॥
त्या मेघें वर्षावें या ममवंशीं अधुर्प्रतिमी ॥ ९४ ॥
हरिभिन्न असे ज्याला कोणी जाता न वदे हर तो ॥
न क्षोभो तद्भक्तजनाच्या भजनीं तव देह रतो ॥ ९५ ॥
निजपौत्रातें स्वायंभुव मनु सांगुनि ऐसें गेला ॥
ध्रुवभूपें चापन्यास करुनि अंजळि हरासि केला ॥ ९६ ॥
शिवसख हि तया दर्शन नेउनि पाहुनि हर्षे डोळे ॥
लोलेक्षण तद्रूपीं होउन बहु मधुर असें बोले ॥ ९७ ॥
साधो प्रसन्न झालों वदला जें स्वायंभूमनु तें ॥
जनुतें सफळ कराया केलें मान्य तुवां सुजनंनुतें ॥ ९८ ॥
यक्षनिमित्त चि उत्तमनिधनीं यक्षवधीं तूं हि तसा ॥
काळाचें तें करणें राजा तो चि अहिंसाहि तसा ॥ ९९ ॥
बा ध्रुवराजा मजपासीं त्या अभिमत वर मागावा ॥
हरिभक्ता तव महिमा व्हाया शुचिता परमा गावा ॥ १०० ॥
ध्रुव हें मागे मज शंभुभजकमुकुटमणे वर दे हा ॥
मन्मतिस ह्मणो स्वपदीं जेंवि श्रीस ह्मणे देव रहा ॥ १०१ ॥
तो धनप तथास्तु असें वदला मग अंतर्हित झाला ॥
या परिस पाहुनि नय सुयश ध्रुव निजनगरा आला ॥ १०२ ॥
षटत्रिंशद्वर्षसहस्त्र स्व प्रकृतींस सुख प्राज्य ॥
देउनि मग उत्कल नामक निज तनुजातें दे राज्य ॥ १०३ ॥
श्रीबदरिकाश्रमीं ध्रुव जाऊनि हरितें चिंतित राहे ॥
नंदसुनंदप्रभुचे पार्षद आले त्यांतें पाहे ॥ १०४ ॥

---

१ कुबेरपुरी. २ आड विहिर. ३ सुजनांनीं स्तविलेला. ४ दुःख सहन करणारा. ५ प्रजेला. ६ दूत.

त्यांहीं दिव्यविमानीं वाहुनि विष्णुपदा प्रति नेला ॥
ऐसा राजा ध्रुव जगदीशें उत्तमपदभाक् केला ॥ १०५ ॥
देवर्षि ह्मणे झाला बाळ हि धन्य सुनीतिसुत पहा ॥
प्रभु न ह्मणो दे दीना शिकउनि शीघ्र सुनीति सुतप हा ॥ १०६ ॥
राम दयाघन भक्तमयूरप्रियाहित सर्व हि करितो ॥
दर्शन देउनि जें बहु दुःसह तें तापत्रय हरितो ॥ १०७ ॥

समाप्त.

---

# प्रश्नोत्तर-रत्न-माला.

श्रीशंकरभगवत्पदरचित प्रश्नोत्तराख्य मणिमाला ।
प्राकृत शब्दगुणीं[2] मी रचितों बुध हो परंतु प्रतिपाला[1] ॥ १ ॥
कंठींच असों द्या हो हे मणिमाला अलभ्य परि साची ।
प्रेमें सुलभचि रसिकां कीर्ति इणें जिंकिली च परिसाची ॥ २ ॥
प्रश्नोत्तरमणिमाला हे केवळ होय हो सुधाधारा ।
खळ राहुलाचि न जिरे त्यांस जिरे भजति जे बुधाधारा[3] ॥ ३ ॥
**श्रीशंकरें** दिली हे भजकां रसिकांसि कामदा कपिला[4] ।
**श्रीरामें** जसि गाया ध्याया निज कीर्ति त्या महाकपिला[5] ॥ ४ ॥
कोण न शोभे विमल प्रश्नोत्तररत्नमालिकाधारी ।
दृष्टीं दृष्टार्थांचा स्वसाधनीं जो सुजाण संसारीं ॥ ५ ॥
सच्छिष्य बोधरीती करुनि **श्रीशंकरें** दयानिधेनें ।
ग्राह्याग्राह्य पदार्थ स्पष्ट चि केले असे अशा विधिनें[7] । ६ ॥
स्वामी काय ग्राह्य स्वमुखें सांगा करा दया पूर्ण ।
शिष्या स्वीकारावें गुरुवचन प्रणतिपूर्व[8] अति तूर्ण[9] ॥ ७ ॥
काय त्यागावें तें स्वामी सांगा अजाणत्यास मज ॥
शिष्या अकार्य सारें टाकावें हें मनीं बरें समज ॥ ८ ॥
स्वामी कोण गुरू हें सांगा होईन संशयोन्मुक्त ॥
शिष्या जो तत्त्वज्ञ प्राणिहिता कारणें सदोद्युक्त ॥ ९ ॥

---

१ हाय. २ शब्दरूपी दोऱ्यांत. ३ ज्ञान्यांचा आश्रय. ४ कामधेनु. ५ मारुतिला. ६ दृष्टादृष्टार्थांच्या साधनीं जो तो चि कुशल संसारीं असाही पाठ आहे. ७ रीतीनें. ८ नमस्कारपूर्वक. ९ सत्वर.

सत्वर काय करावें स्वामी तुमचा चि बोल मज वेद ॥
वत्सा शीघ्र कराधा ज्ञानें संसार-संतति-च्छेद ॥ १० ॥
स्वामी मोक्ष तरूचें बीज कथावें तुम्हीं मुखोदक जें ॥
शिष्या साधो आयिक अति शुद्ध ज्ञान आणि सत्क्रिय जें ॥ ११ ॥
[10]पांथेय काय मार्गीं सांगा तुमचेंचि वाक्य बहु पथ्य[11] ॥
शिष्या धर्म सिदोरी फार बरी हें चि जाण तूं तथ्य ॥ १२ ॥
शिष्याज्ञानतमोर्का[12] गुरुराया कोण शुद्ध या लोकीं ॥
शिष्या ज्याचें मानस निर्मळ लोकत्रयांत शुचि[13] तो कीं ॥ १३ ॥
पंडित कोण स्वामी छात्रें[14] जनाच्या अनंतसुखहेतो[15] ॥
शिष्या सद्बुद्धिसुधाकलशा जेथें विवेक राहे तो ॥ १४ ॥
हाळाहळा परिस हो दारुण विष कोणतें आजि स्वामी ॥
अपमानिलें गुरूतें वत्सा तें गरळ जाणतों आम्हीं ॥ १५ ॥
स्वामी कारुण्यनिधे संसारीं सार काय सांगावें ॥
गुरुराया चिंतामणिचरणा ऐसें तुला न कां गावें ॥ १६ ॥
वारंवार हुडकितां हें चि मनुष्यांत सार आढळलें ॥
शिष्या जें जन्म क्षण न त्यजुनी स्वपरहितपदा* ढळलें ॥ १७ ॥
मद्या परि मोहप्रद काय स्वामी दया करूनि सदा ॥
शिष्या पुत्रकलत्रीं[16] सुरेहुनि स्नेह दे अपार मदा ॥ १८ ॥
तस्कर कोण स्वामी वत्सा जे विषय दस्यु[17] ते जाण ॥
कोण भयाची वल्ली शिष्या तृष्णा चि रे तुझी आण ॥ १९ ॥
स्वामी वैरी कोण च्छात्रा[18] तो शत्रु जो अनुद्योग[19] ॥
ज्या उद्योगाभावें[20] पावति विलयासि सर्व सुखभोग ॥ २० ॥
स्वामी कोणापासुनि भय लोकीं फार पावती प्राणी ॥
शिष्या मरणापासुनि भय पावति सर्व ही खरी वाणी ॥ २१ ॥
जात्यंधाहूनि अधिक कोण कथा जी गुरो तुह्मी ज्ञानी ॥
शिष्या अंधापरिस हि कामी बहु अंध हें मनीं मानीं ॥ २२ ॥
स्वामी शूर ह्मणावें कोणाला हें मला तुम्हीं बोधा ॥
शिष्या स्त्रीनेत्रशरें पावेना जो व्यथेसि तो योधा ॥ २३ ॥
स्वामी कर्णांजलिनीं सेवाया काय हो सुधे[21] सारें ॥

---

१० शिदोरी. ११ हितकारक. १२ शिष्याचें अज्ञान हाच अंधःकार त्याचा नाश करण्याविषयीं सूर्य. १३ शुद्ध. १४ शिष्य. १५ कारण. * पथा असाही पाठ आहे. १६ स्त्री. १७ चोर. १८ शिष्य. १९ आळस. २० उद्योगाचा अभाव. २१ अमृतासारखें.

# सत्यभामा-विनोद.

अंगुल्या कः कपाटं प्रहरति ? कुटिले ! माधवः किं वसंतो ? ।
नो चक्री किं कुं[1]लालो ? न हि धरणिधरः किं द्विजिव्हः फणींद्रः ॥
नाहं घोराहिमर्दी किमपि खगो[2]पति ? नो हरिः किं कपींद्रो ?
इत्येवं सत्यभामाप्रतिवचनजितः पातु वः पद्मनाभः ॥ १ ॥

येतां देखोनी स[3]द्मा यदु-कुल-तिलका सत्यभामा विनोदें ।
दे[4]वोनी द्वार तेव्हां समरसलिलया लागिं ठाके प्रमोदें ॥
कृष्णें बोटें क[5]पाट-प्रहरण करितां बोलिली सानुरागें ।
द्वारातें अंगुलीनें प्रहरण करिशी कोण तूं सत्य सांगे ॥ २ ॥

हरि म्हण कपटी हो ऐक तूं सत्यभामे ।
भ्रम तुज बहु आहे भूलशी देह धर्में ॥
अभिनव अभिमानें नेणशी कोण मातें ।
भव-नट नटला जो माधवो नाम ज्यातें ॥ ३ ॥

बाला स[6]त्राजिताची पुनरपि पुसते माधवो कोणता तूं ।
कं[7]दर्पाचा सखा जो कुसुमनिधि कृती क्षांतिला कीं वसंतू ॥
हा काळो शा[8]रदेचा सुख करि सकळां नाहिं गेला हिमं[9]तू ।
येथें येणें अकाळीं अवचित घडलें सांग पां कोण हेतू ॥ ४ ॥

ऐसें प्राण-प्रियेचें वचन परिसतां बोलिला कृष्णनाथ ।
जो कां लीलाविलासी निज-जन सुख दे इंदि[10]रा-प्राणकांत ॥
मुग्धे वै[11]दग्ध्य सोडीं म्हणसि मज ह्मणी पुष्प-छंदें वसंत ।
नोकां प्रख्यात चक्री खल-दळ समरीं जाणिजे तो चि कांत ॥ ५ ॥

श्रवण करूनि सत्या वाक्य विश्वंभराचें ।
म्हणसि कवण चक्री होसि गा कोण मातें ॥
घडिशी बहु घटातें काय होशी कुं[12]लाल ।
मज तंव तुजशीं गा कार्य नाहीं च चाल ॥ ६ ॥

अमृत मधुर तीचें वाक्य कृष्णासि वाटे ।
पुनरपि वदताहे बोलसी कंवि खोटें ॥

---

१. कुंभार. २. गरुड. ३. गृह. ४. लावून. ५. दार. ६. सत्यभामेच्या बापाचें नांव ७. मदन. ८. शरदृतु. ९. हेमंतऋतु. १०. लक्ष्मी. ११. शहाणपण. १२. कुंभार.

झणि ह्मणसि कुलाला रूसणें कोण कैसें ।
धरणिधर असा जो जाण मी तो चि ऐसें ॥ ७ ॥
यदुपति वचनांतीं बोलिली सत्यभामा ।
धरणिधर असा जो सांग तूं कोण आम्हां ॥
अगुण सगुण बोली पावला द्वैत जिव्हा ।
फणिधरवर शेषो येथ आलासि केव्हां ॥ ८ ॥
लक्ष्मी-कांत वदे तियेसि पुढती नोहे प्रिये मी फणी ।
चातुर्यो बहु वाटतें ह्मणउनी हे आमची साजणी ॥
आह्मी घोर-फणींद्र-मर्दन जगीं प्रख्यात हें बोलणें ।
जिव्हा एक चि आमुतें शरण जो आला तया पाळणें ॥ ९ ॥
यदुपति-मुख-चंद्रीं चंद्रिका वाक्य पाहे ।
श्रवणपुट-चकोरां सेवितां तृप्ति नोहे ॥
म्हणउनि पुसताहे कोण तूं सर्प-हंता ।
खगपति विनतेचा[१] पुत्र पीयूषहर्ता[२] ॥ १० ॥
गोपी-वल्लभ मागुती रमणितें बोले प्रिये! धन्य तूं ।
जो कां सौभाग्य-वैभवो (?) मज सवें नाना परी हास्य तूं ॥
नोहें मी खगराज[३] गे भव हरी जाणें प्रिये! सत्य तूं ।
ऐसें देवकि-नंदनू सुवचनीं सत्येप्रती बोल तूं ॥ ११
पद्माक्षी पुसती हरी कवण तूं त्वद्दास वृक्षावरी ।
होसी वानर तूं तरी झडकरी जाईं वनाभीतरीं ॥
जो देवां श्रुति-स्मृतींस न कळे जो योगियां नातळे ।
फीटे जेथ परात्परा वृति तया लक्षासि जो नातळे ॥ १२ ॥
पद्माक्षी हरिपाद-सेवन करी श्रीशंभु-तीर्थावरी ।
त्या मागें हरिशीं विलास करितां तो हासत श्रीहरी ॥
श्रीकृष्णा-मुकुंद-पाद-रज हे देखावया उत्सुक ।
उद्घाटोनि कपाट कृष्ण-चरणीं ठेवीतसे मस्तक* ॥ १३ ॥

समाप्त.

---

१ गरुडमाता. २ अमृत. ३. गरुड. * हें प्रकरण वामनपंडिताच्या नांवावर आमचेकडे आलें आहे, परंतु हें वामनकृत नव्हे असें आम्हांस वाटतें.

# द्वितीय सुदाम चरित्र.

मंगल-प्रद समस्त मंगला । कीर्ति-हार **हरि**चा धरूं गळां ॥
जो कृपा-घन **सुदाम**-चातका । वर्षला **हरिं** दरिद्र चातका ॥ १ ॥
वृथा गोष्टि ही बोलतां काय वाचा । पुराण-श्रुतीची अभिप्राय-वाचा ॥
वदा वाग्मनें **कृष्ण** सर्वार्थ थारे । तरी भक्ति-संपन्न सर्वार्थ तारे ॥ २
परीस चिंतामणि सिंधु काचा । कोट्यावधी कोठडिया फुकाच्या ॥
हा त्या तरी तो **हरि**-नाम बा गा । कल्प-द्रुमाचा[1] जरि होय बागा[2] ३
अद्यासिनें वर्जित जो **सुदामा** । दृष्टी न पाहे परि एक दामा ॥
चित्तीं हरीचीं दृढ पाद-पद्में । धरी बरीं मानुनि सौख्य-सद्में ॥ ४ ॥
जाया सुशीला पति मानसाची । पतिव्रता केवळ शुद्ध साची ॥
उपाय नाहीं जरि जीवनासी । तरी न वांचे पति-सेवनासी ॥ ५
ह्मणे जाया जाया उशिर ह्मणि जाया तुह्मिं करा ।
ह्मणी लाजा लाजा तुज न **हरिला** गात चि भजा ॥
ह्मणा दाता त्राता तुज विण अनाथास न दुजा ।
चला मागा भागा मग हि **हरिला** जाउनि भजा ॥ ६
हरि-जना उदरार्थिक कामना । परि न वाटतसे बरवी मना ॥
गृहिणि आग्रह फार करीतसे । द्विज ह्मणोनि **हरि** प्रति जातसे ॥ ७
स्वभार्ये पुढें विप्र बोलि सुवाणी । ह्मणे त्यास भेटूं कसा रिक्त-पाणी[3] ॥
फिरे चार-पांचा गृहीं होय कष्टी । मिळाले प्रयत्नें फवे चार मुष्टी ॥ ८
बांधावया स्वपदरीं जंव विप्र पाहे । तों ठाव देखत स्वर्वास सच्छिद्र पाहे ॥
तों चौघडी करुनि बांधियले स्त्रियेनें । जातो **हरी**जवळि पाहि न तो दयेनें ॥९॥
धन्य आजि **हरि**-दर्शन-जोडी । **रुक्मिणी**सहित पाहिन जोडी ॥
पारणें मजकडे नयनांचें । हें चि चिंतनिं निरामय नाचे ॥ १०
तो मोक्षदायक पुरी द्विजवर्य पाहे ।
शोभे सुरेंद्र-नगरी प्रति- इंद्र पाहे ॥
**वैकुंठ**-नाथ **हरि** आपण नांदताहे ।
ध्यानीं द्विजेंद्र सुख मानुनि नांदताहे ॥ ११ ॥

---

१. वृक्ष २. गृह. ३. रिकाम्या हातीं. ४. वस्त्र.

दोखिलें हरिचिया सदनासी । पाहतां परम सौख्य मनासी ॥
स्वस्थ चालत निवारण नाहीं । भाग्य हें न करवे गणना ही ॥ १२ ॥

दुरूनि देखत असे हरि तो सुदामा ।
आत्मा च कीं ह्मणतसे प्रिय हा चि आह्मां ॥
धांवोनियां झडकरी हृदयीं धरूनी ।
प्रेमाश्रु-बिंदु गळती उभयां वरूनी ॥ १३

वंद्य जो सनकादिक नंदना । तो निघे द्विज-पदाब्ज-वंदना ॥
हस्तकें धरुनि आदरें वरी । बैसवी द्विज निजासनावरी ॥ १४ ॥
दिव्य हंस-तुलिका मृदु भारी । बैसवूनि निज भक्त उभारी ॥
आणवूनि बहु शीतल वारी । क्षालुनी पद पथ-श्रम वारी ॥ १५ ॥
दिव्य चंदन तनूसि चार्चिलें । आदरें द्विजवरासि अर्चिलें ॥
हार कल्प तरूच्या सुमनांचे । अर्पि जेंवि निज सौख्य मनाचे ॥ १६ ॥
अन्न षड्रस सुधेहुनि गोडी । ब्राम्हणा प्रथम हे बहु गोडी ॥
रुक्मिणी परम सावध वाडी । दाखवी पतिस आदर-वाडी ॥ १७ ॥
बैसका द्विजवरासि पलंगीं । वीटिका सहित कात-लवंगी ॥
श्रीहरी परम सादर देतो । सज्जनासि पदवी निज दे तो ॥ १ ॥
भेटि हे परम दुर्लभ तूझी। सांग कीं कुशल होइ न माझी ॥
अंतरीं च नमिलें मज जीणें । भेटि काय दिधलें मज तीणें ॥ १९ ॥
लज्जा-डोहीं विप्र चित्तांत पोहे । कैसें देऊं भाग्यवंतास पोहे ॥
तों देखीलें ग्रंथिसी कृष्णनाथें । भावार्थें घे दीधलें जें अनाथें ॥ २० ॥
धाडिलें ह्मणुनि वाट पाहतों । अर्पिशी ह्मणउनी च राहतों ॥
विप्र तो निज कुचेल ओढतो । श्रीपती त्वरित गांठ सोडतो ॥ २१ ॥
पत्र पुष्प फल तोय भक्तिनें । अर्पितां परम तृप्ति भक्ति ने ॥
ते फवे त्रिभुवनेश्वरें मुखीं । घालितां निज कुचेल तो सुखी ॥ २२ ॥
एकदा स्वमुखिं मुष्टि हि ओतिली । मागुती मुष्टि हि भरोनि घेतली ॥
रुक्मिणीन मग हात हि घातला । आपुला मग विभाग हि घेतला ॥ २३

कृष्णाची वनिता पयोनिधि-सुता सादृश्य सालंकृता ।
विद्युत्सन्निभ अंबरीं परिवृता चंद्रानना सस्मिता ॥
आश्चर्यांबुनिधींत पोहति मुनी कीं पाहती ब्राह्मण ।
यांचें भाग्य अगम्य ज्यास भजतो सर्वेश नारायण ॥ २४ ॥

---

१. हंसाचे परांची गादी. २ उदक. ३. विडी ( पट्टी ). ४. विड्याचे पानांची. ५. फाऊर्के ( वाईट ) वस्त्र. ६. सदृश. ७. वस्त्र.

सत्य हंस-तुलिका सुकुमारा । ठाव तेथ न दिसे सकुमारा ॥
ब्राह्मणा निजसुखासन देतो । बाळ-मित्र कथनें हि वदे तो ॥ २५ ॥
म्हणे आम्ही तुह्मी गुरु-सदनिं अभ्यास करितां ।
कथा झाली कैशी वनिं उपवनामाजि फिरतां ॥
तुम्हां आम्हां धाडी गुरु[1]-गृहिणि काष्टांस्तव वनीं ॥
निशा झाली तेथें तम निबिड अदृश्य अवनी[2] ॥ २६ ॥
पर्जन्य वृष्टि अति घोर तया च काळीं ।
दिङ् मोह नेत्र-युगलीं अतिरात्रिकाळीं ॥
[3]शीतिं प्रकंप सुटला परिहार नाहीं ।
कें निस्तरेल भय वाटतसे मना हो ॥ २७ ॥
उभय-वर्ग-मनीं गुरु हीमनी । परम संकट पावतसे तिन्ही ॥
करिल संकट मित्र निवारण । ह्मणुनि पाहतसों तम दारुण ॥ २८ ॥
झाला ह्मणे गुरु अकल्पित घात मोठा ।
झाल्या जडा अपयशें अपकीर्ति-मोटा[4] ॥
प्राणाहुनी मदिय आवडता मनासी ।
कां धाडिलें तयांस मूर्खपणें वनासी ॥ २९ ॥
सांदीपनी[5] गुरु विचारुनियां मनासी ।
घेवोनि शिष्य-समुदाय निघे वनासी ॥
तों भेटलों उभय अंतरिं हर्ष मोठा ।
झाला; हलू उतरल्या अपकीर्ति-मोटा ॥ ३० ॥
जावोनि धर्म[6]-सदनीं गुरु-पुत्र मागे ।
होता बुडोनि मृत जो बहु काळ मागें ॥
आणूनि देउनि मनोरथ पूर्ण केला ।
जो मानसीं बहुत काळ असे भुकेला ॥ ३१ ॥
हे च त्यां उचित काळ दक्षिणा । कल्पुनी मग करूनि प्रदक्षिणा ॥
वंदुनी मग गृहासि पातलों । त्यावरी स्वसदनीं च राहिलों ॥ ३२ ॥
रातलों पर बहू दिवसांचा । होतसे स्वमनिं आठव साचा ॥
हें अपूर्व न गमे मुनिवर्या । कृष्ण-पाद-रज-तत्पर आर्या ॥ ३३ ॥
कर्मै अनंत दृढ बद्ध अनंत जाती ।
कर्मानुरूप नियमी जन रे थ जाती ॥

---

१. गुरुपत्नी. २ भूमि. ३ थंडी. ४ पाण्याची मोट. ५ कृष्णाच्या गुरूचें नांव. ६ यम-गृह.

ते काळिच्या हरि वदे न अपूर्व गोष्टी ।
हो त्या मुखीं प्रकट त्या सहजें चि ओष्टीं ॥ ३४ ॥

ह्मणे हरी जें कथिलें तुला म्यां । ठाऊक आहे तुजला सुदाम्या ॥
कुटुंब माझें तुजलागिं ठावें । यांतून कैसें मन हें उठावें ॥ ३५

यांच्या पोषण तोषणाविण दुजा धंदा नसे बा मला ।
नें उत्पन्न सवे च तें न असतें हें ही कळावें तुला ॥
जें जें कृत्य तयासि आपण विणें नाहीं दुजा सोयरा ।
मी जाणें दुसरा हि जो अनुभवी तो शद्ब मानीं खरा ॥ ३६ ॥

मागेल तें हि कळलें धन धान्य कांहीं ।
देईन दुर्लभ सुरेंद्र अजादिकां ही ॥
या कारणें द्विजवरा पुसिलें च नाहीं ।
देणार वैभव अगोचर[1] जें मना ही ॥ ३७

सुदामयाच्या हरि आशयाला । जाणोनि कांहीं न वदे तयाला ॥
हरी च या तो वचनामृतानें । झाला जसा स्तन्य पिऊन तानें ॥ ३८ ॥
गोमतीस करि मज्जन संध्या । आपुल्या चि मग घेउनि विंध्या ॥
श्रीपती प्रति निरोप चि घेतो । श्रीपती मग निरोप हि दे तो ॥ ३९ ॥
सुदामा स्वचित्तीं विचारूनि पाहे । ह्मणे रिक्तें[2] हस्तें चि जातों त्रपा[3] हे ॥
परी श्रीहरीची दया पूर्ण मातें । न शीवों दिलें द्रव्यलोभा तमातें ॥ ४०

बोलाविला जवळि तो मग विश्वकर्मा ।
आज्ञा करी हरि ह्मणे निज शिल्पकर्मा ॥
वेगीं उभारूनि बरी नगरी करावी ।
संपत्तिनें परम दुर्लभ ती भरावी । ४१

होतां आज्ञा हरीची अभिनव नगरी निर्मिली भासमान[4] ।
नाहीं जोडी त्रिलोकीं अणु भरि न पवे स्वर्ग-शोभा समान ॥
ऐशीं चित्रें विचित्रें मणिमय विविधें हाट[5] भांडारें[6] नाना ।
लोकां आनंद मोठा हरि-गुण नटती गायकांच्या तनाना ॥ ४२ ॥

सामाजि एक गृह थोर सुदामयाचें ।
जें राज-मंदिर निरूपम भाग्य याचें ॥
रत्नें अमूल्य बहु हाटकसांडे तेजें ॥
दूरूनि त्या लकलकी रवि-रश्मि[7]-तेजें ४३ ॥

---

१ अतर्क्य. २ रिकामा. ३ लज्जा. ४ शोभायमान. ५ बाजार. ६ द्रव्यकोश. ७ किरण.

अनंत देणें कमला-पतीचें । तेथें किती वर्णन संपदेचें ॥
सुदामया जात असे अगारा । झाला पुढें एकसरें नगारा ॥ ४४ ॥
तों देखिली एकसरें पुरी ते । आश्चर्य वाटे मन जें करीतें ॥
तों देखिले लोक हि पूर-वासी । आले पुढें ते नृप-आज्ञेवासी ॥ ४५ ॥
जी ही कोण पुरी सुदाम-नगरी राजा सुदामा भला ।
होता भिक्षुक हे खरें पर तया श्रीकृष्णजी तुष्टला ॥
त्याला काय दिलें मुठी न पृथुका ब्रम्हण्य-भावें तया ।
अर्पा अल्प हि आदरें तरि करी संपूर्ण भावें तया ॥ ४६ ॥
आमात्य मंगल-तुरें सह सर्व येती । राजा अलंकृत सुखासनिं बैसविती ॥
आरूढतां नृपति आसनिं त्या करीती । केलें तसें च अभिवंदन राजनीती ४७
कोशादि वास हय-वारण-रत्नशाला । पाकालयादि विविधा अठरा विशाला ॥
सौभाग्य-पूर्ण परिचारक दास दाशी । न्यूनत्व एकाचि उणें अमित-प्रदासी ४८
येऊनि त्या स्वभवनीं द्विजराज पाहे । आश्चर्य मानुनि म्हणे हरिची कृपा हे ।
नीराजना करि मुख स्मित-युक्त राणी । स्वामीस वंदन म्हणे मधुर स्ववाणी ४९
हा कृपाघन हरी अवधारा । वर्षला निज कृपा-रस-धारा ॥
तो म्हणे द्विज खरें च बरा हा । भाव तच्चरणिं ठेवुनि राहा ॥ ५० ॥
भक्ती न मुक्ति अशि भक्ति सुदामयाची ।
पाहा विचित्र करणी करुणालयाची ॥
वर्णून आदर बरा बरवा मनाचा ।
हा विश्वनाथ निज किंकर वामनाचा ॥ ५१ ॥

**समाप्त.**

# जल-क्रीडा.

नमन करुनि आधीं सद्गुरू श्रीहरीतें ॥
कथिन चरित गोपी-गर्व-वारी हरी तें ॥
कळवि भजन ऐसें तें भवाब्धींत तारी ।
पशुप-वधु-जनातें त्या कलिंदींत तारी ॥ १ ॥

१ कृष्ण. २ गृह. ३ वाद्यें. ४ सेवक. ५ आरती. ६ हास्यमुख. ७ करुणागृह. ८ सेवक. ९ उदक. १० यमुना नदी.

स्वजन ही जरि गर्व मनीं धरी। तरिच मित्रपणें हरि तो हरी ॥
उचलितां गिरि गोप बळें बळें। कळवि त्यांस हरी च बळें बळें ॥ २ ॥

वधू नीरो जातां हरि तिस हरी जाणुनि मनीं।
पहातां गर्वातें सकळ त्यजिला खेळ तमनी ॥
नदीमध्यें नौकेवरि निज कुळीं स्वामि सरिता।
निगर्वा ह्या सख्या करुनि मग तो तारि वनिता ॥ ३ ॥

नीरानिमित्त यमुनेप्रति गोप-नारी। जातां सवें कडिस घेउनि पूतनारी ॥
नेला तिहीं न कळतां जननीस जेव्हां। केलें विचित्र हरिनें यमुनेंत तेव्हां ॥ ४

पावल्या जंव वधू यमुना-तिरीं। नाव देखिलि तिहीं बरवी निरीं ॥
इच्छिती वरि बसोनि फिरावया। यत्न कांहिं न चले चि धरावया ॥ ५ ॥
सांपडेल कसि नाव बसावया। यत्न त्या पुसति विश्व-विसावया ॥
कृष्ण बोलत असे किं मूढ हो। अर्भकासि प्रउढा पुसतां हो ॥ ६ ॥

आज्ञानत्व वधूंस दावि पर तो सर्वज्ञ त्याच्या मनीं।
आहे तें करणें परंतु वर तो बालत्व भावी जनीं ॥
चित्तीं तैसें चि तो ही धरुनि मग तो कृष्ण नावेस लक्षी।
ऐसें देखोनि तेव्हां स्वमनिं सकळा हर्षल्या त्या मृगाक्षी ॥ ७ ॥

कळुनि व्रज वधूंसी स्वामिचा स्नेह भारी।
त्वरित मरुत-नेटें चालवी नाव तीरीं ॥
चढति उडति नौके माजि घेऊनि कृष्णा।
न कळत जल मध्यें न्यावया फार तृष्णा ॥ ८ ॥

नेती नाव पुढां पुढां जरी हरी वारी जळा भीउनी।
जाणों कीं फिरावावयास म्हणती आणूं तिरीं नेउनी ॥
आज्ञा-भंग वधूंसि संग करितां तेणें हरी कोपला।
क्रोडे माजि अनर्थ थोर यमुने माझारि आरंभिला ॥ ९ ॥

सच्छिद्र नौका जळ आंत चाले। प्रचंड वातें बुडवूं सकेलें ॥
तों त्या जळा हाणिति पाद-घातें। आणूं पहाती तिरिं नाव हातें ॥ १० ॥

निघत सलिलं नौके माजि अर्द्धास आलें।
वधुंसि कटिसि कृष्णा कंठपर्यंत झालें ॥
म्हणति वधु बरें कीं आधिं गे आह्मि मेल्या।
सगुण मरण भेणें स्कंधिं वाहूं निमाल्या ॥ ११ ॥

---

१ स्त्रिया. २ उदक. ३ कृष्ण. ४ बालक. ५ मृगनयना. ६ वायु. ७ इच्छा. ८ नि-वारी. ९ आंत. १० पाणी.

निर्वहंतोद्य जानीमो नैपुण्यं वत्स तावकं ॥ ३२ ॥
अमृतं यदि भोक्तव्यं अनुमन्यामहेतरां ॥
संविजित्यैव तद्भोज्यं न निर्भज्येति नो मतिः ॥ ३३ ॥

तदाख्यातु भवानेवमथनोपायमादिष्टं नारायणेनेत्यनुयुंजानेषु दानवेषु यथाश्रुतमाख्याय पुरंदरः तमेव मंदरमुत्पाट्य सागरे निपातयितुमुत्साहयामास बलिं ततः कियदेतदुत्पाटनं नाम गिरेः विधमामो मुखमारुतेन विक्षिपामोंगुलिस्फोटेन समुध्दरामो वामहस्तेन संक्रामयामः सायकेनैकेन इति बलोत्सेकादुच्चावचं गर्जत्सु दानवेषु बलिरिदमवादीत् हंत कथमर्भकाइव यूयमकृतज्ञाइव निरंकुशं प्रतिजानीध्वे ।

विंशत्यापि भुजैः पुरा गिरिवरं विक्षोभयन्छूलिनः
पादांगुष्ठनखाग्रयंत्रणदलद्दोः संधिभेदश्चिरं ॥
क्रोशक्रोशमवाप वार्षिकानिशामंडूकवद्यः श्रमं
युष्माभिः श्रुतिगोचरं न गमितः शंके स लंकेश्वरः ॥ ३४ ॥

अपि द्रष्टुमशक्यो यः सिद्धैरपि महार्षिभिः ॥
विना शंभोः प्रसादेन कथमुत्पाटयेम तं ॥ ३५ ॥

तदद्य वयं सर्वे प्रपद्य भगवंतमुमाकांतं प्रसाद्य वाङ्मनःकायैः प्रार्थयेमहि प्रार्थनीयमिति । ततः साधु साध्वित्यभिनंद्यमाना भार्गवांगिरसाभ्यामन्योन्यकृतसंविदो देवासुराः प्रतिपद्य मंदरं शैलं प्रणिधाय मनांसि वर्तमानाः कठोरे तपसि वाग्भिरस्तुवन्नित्थमंबिकारमणं ।

युगविगमोन्मिषद्विषमलोचनकोणपत-
द्धुतवहविस्फुलिंगहुतसर्वजगद्द्रविषे ॥
अचलधनुर्धराय हरिणांकशिखामणये
विजयजयैकहेतुविशिखाय नमो भवते ॥ ३६ ॥

शिवं ध्यायस्यंतः सकलजगतां यच्छसि शिवं
शिवोसि त्वं नाम्ना ननु शिवतरश्चासि विदितः ॥
शिवार्थी जंतुस्तच्छिवमखिलभावेन भगवन्
भवंतं हित्वान्यं शरणयतु कं न्यायशरणः ॥ ३७ ॥

तदिदानीम् ।

मंदिरं क्षालयंतस्ते मंदरं दुग्धसागरे ॥
अमृतं लब्धुमिच्छामस्तद्भवाननुमन्यतां ॥ ३८ ॥

इति ततस्तथा कुरुतेति घनस्तनितगंभीरया गिरा गगनसंभवया संतोषिताः

संतोऽसुराः सुराश्च समनह्यन् ।

विनिघ्नंतः पादैरथ विचलयंतः करतलै-
रुदस्यंतो दंडैरुपरि च किरंतस्तामिषुभिः ॥
निषेदुः श्रांतास्ते यदपि च विषेदुर्दनुभुवो
निमित्तं दुष्टं तन्निखिलमुशना तेषु जगृहे ॥ ३९ ॥

अथ प्रतीक्ष्यमाणश्चरलग्नमाचार्यो दिवौकसां संवर्तोचितं रूपमालंब्य सर्वतो वाहीति संदिदेश गंधवहं ।

अथ दिवसावसानइव पद्मभुवः पवनः
स्वयमकृतक्षणादिव विदिक्षु च दिक्षु चरन् ॥
अलघुविघूर्णितार्णवसमुक्षितकुक्षितल-
क्षितिवलयार्द्रताशिथिलमूलमहार्यकुलं ॥ ४० ॥
स्तोकस्तोकप्रचलदनिलग्रासदुर्भिक्षखेदैः
कालं कालं कथमपि चिरं यापयां चक्रिरे ये ॥
आकंठं ते पपुरिममविच्छिन्नधारं समीरं
प्राप्ताः शंभोरुपकरणतां पन्नगास्तं नगाग्रे ॥ ४१ ॥

अथ तमदृष्टचरं वेगमनलसारथेरभिनंदतइव मंदरस्यालक्ष्यत मनागिव शिरःकंपः[1] ।

चकंप हंतायं गिरिरनुचकंपे पुरहरो
जहीतेदं क्लैब्यं जहित च वृथावस्थितमिदं ॥
इति स्वेन स्वेन व्यवसितधियः काश्यपसुताः
समेता गर्जंतः सपदि चलयामासुरचलं ॥ ४२ ॥

तदिदानीं च ।

निष्पतद्रुममुत्पतत्खगमद्भुतस्खलदश्मभू-
झर्झरस्रुतनिर्झरांबुझलझ्झलारंबुभैरवं ॥
गर्भगह्वरनिर्भरभ्रमदुद्भटानिलपूरित-
कंदरंतरकंदरं किल मंदरं ददृशुर्जनाः ॥ ४३ ॥

गर्जंतश्च ते तदनु पर्जन्याइव गणयंतश्च करगतमिव कार्यमशेषं पूर्वतो दिक्पतीन् दक्षिणतो देवानपरान् पश्चिमतो बाणं सहस्रबाहुमुत्तरतो महासुरानितरानपि विभज्य विनियुंजानाः खाते परितः परिखावलयमिव मूलगर्ते कराचलान् निदधानाः परित्यजंतः प्रहरणानि परिहरंतोंगुलीयकानि बध्नंतः कटितटेषूत्तरीयाणि समारोपयंतः कंकणान्यंगदस्थानमुपवीतयंतो नीवीतलंबीनि हारमं-

1 सज्जा बभूवुः

ढलानि उद्बोधयंतः परस्परमसकृदपि समं निदधत करांचलात् समुत्तंभयत समं विलंभयंत समुच्छ्वसत समं निश्वसत समं कुरुत बलानि अपरथा विशीर्येयुः शिखराणि विनमेदयमेव मंदरः क्वापि चलेदपि ततो भद्रपीठं चंद्रापीडस्य समुद्विजेत दुहिता शैलराजस्य क्षुभ्येयुः प्रमथाः कुप्येदपि शैलादिश्चतुरंतया न गतइव भगवानंबिकारमणः चतुरतरमस्माभिर्वाहनीयः इति वादयत्सु वादित्राणि गंधर्वेषु गायंतीषु गणशः किन्नरीषु नृत्यंतीषु निर्जरवारकांतासु श्लाघमानेषु चारणेषु प्रयुंजानेष्वाशिषः परमर्षिषु वर्षत्सु दिव्यबलाहकेषु पुष्पवर्षाणि हरहरहरहरेतितारध्वनिभिरापूरयंतो विध्यंडमंडलमुन्नमयामासुरुर्वीधरं मंदरं ।

आपातालनिमग्नमूर्तीनि बलान्मूले समुन्मूलिते
शैलस्यास्य भुजंगराजनगरप्रासादशृंगायते ॥
खेलंत्यः शतशः फणींद्रसुदृशः स्वच्छंदमात्रास्पदे
शय्याद्भिः प्रतिलेभिरे दिविचरैरक्लेशमप्रार्थितं ॥ ४४ ॥

अपि च ।

अभ्यर्णस्थलभाजि तत्र शिखराण्यामूलमुन्मीलिते
तत्क्षोभक्षुभिते च कांचनगिरौ किंचित्समाकुंचिते ॥
विभ्रश्यद्दृहभित्तिविश्लथपुरद्वारं विशीर्णत्रुट
त्सौधोत्सेधविटंकसंघमजनि स्थानं सुराणां तदा ॥ ४५ ॥

समुद्धृत्य तमारसातलप्रविष्टमपि सद्यः समारोपितं कलममिव लीलया प्रस्थिता दुग्धार्णवं प्रति देवासुराः अशिथिलशिखरमप्रकंपितनितंबमखंडितगंडोपलमनुज्झितनिर्झरप्रवाहमस्फुटितपर्यंतरमभंजिततरुपुंजमनुत्खातलतावितानमस्पंदमृगवृंदमनुद्भ्रांतशकुंतमव्यापन्नपन्नगमवसन्नकिन्नरीगानमस्तब्धसिद्धचारणकोलाहलमविश्रांतगंधर्ववादित्रमनुपरुद्धतपोधनध्यानमानंदयंतो भगवंतमुमाकांतमवहंत मंदरं स च नीयमानः सर्वैरपि सुरासुरैरखिलभुवनाधारस्य पशुपतेरप्याधारतावलेपादिव पादैराचक्राम शिरांसि पर्वतानां परितः पतदच्छनिर्भरापदेशेन प्रत्यक्षमिव विचकार दिङ्मुखेषु यशांसि निर्मलानि आकाशएव नीयमाने तस्मिन्नधस्तनीषु दिव्यभूमिषु तासुतासु तपस्यंतस्तपोधनाः कतिचिदतिचकितः प्रायुंजत परमाशिषः परिपेठुः स्वस्त्ययनानि अजपन्नभयंकरमावर्तयंत मृत्युंजयमनुदध्युरापदुद्धरणमंबिकारमणमाशंसिरेच बलातिबलाभ्यामश्रमं दिविचराणां महाप्रकाशमणिगणाकीर्णस्य चलतः पथि संचरणादागत्य पार्श्वतलमध्वप्रतिरोधादवैव निलीयमानः पतिरपि त्विषां प्रदीपइव दिवाप्रवर्तितो भग्नतेजा ददृशे । अपिच पुनरक्लेशलेशमानापत्यासहकात्यायनीरुचिरान्प्रदेशान्पश्यंती विविधानि वस्तूनि परिपृच्छंती प्रणयिनमभीक्ष्णं प्रसन्नेन चेतसा स्थापयिष्यतोपि गिरिमनुजगृहे

देवासुराननुजगृहे उपेंद्रगृहे क्षीरसमुद्रे ।

उड्डीय स्वयमुत्पतन् गिरिरसौ वाचैव नेतुं क्षमो
भग्नस्कंधशिरोधरैर्दिविचरैरित्थं यदद्योह्यते ॥
एतत्पर्वतपक्षतिक्षतिकृतो मुख्यस्य दौष्कर्म्यमि-
त्यायस्ताः पथि पर्यभाषित [ ? ] ते सर्वे सुपर्वेश्वरं ॥ ४६ ॥

अपि च ।

भग्नो यस्य दशाननः प्रचलने किंचित्सवृत्तः पुरा
शक्यं तस्य गिरेः कथं नयनमित्यस्ताविषुः साधवः ॥
अन्ये चक्षमिरे न तद्भवति का श्लाघात्र शाखामृगै-
रानीताश्च निपातिताश्च जलधौ शैलाः समूलाइति ॥ ४७ ॥

इत्थमतिभारभंगुराः सुरासुराः यावदासेदुरंतिकं दुग्धनिधेस्तावदुद्वेगः श्वे-तद्वीपसदामुज्जृंभत पश्यत पश्यत पर्यंते नीयमानं महागिरिं पातयिष्यते च नून-मत्रायमर्णवे परिप्लावयिष्यते च सनिःशेषमंतरीयं यदद्यैव सज्जीभवत समुत्ति-ष्ठत सर्वतोपि वेलामुच्छ्रयध्वं इति हंत केनेदमुत्प्रेक्षितं बकबंधकौशलं किंचिदपि चोच्छ्वसिति सा किंकरणीयमुच्छ्रितयापि वेलया तदारोक्ष्यामो वयमद्य वैकुंठमर्क-मंडलं वा धाम त्रिधाम्नइति अनुचितमेतदालोचितमयुक्तं हि सेवकानपहाय भगवंतमन्यत्र गंतुमिति किमुच्यते भगवंतमपहायेति किं न विचारितं भगवानेव मंदरपातदर्शनकौतूहलव्याजेन प्रस्थातुकामो वर्तत इति कतिवारानेष पपात मंदरः कतिवाराभोदजृंभत सागरः कस्यापि ब्रह्मणः कल्पेन जानीमो विप्रवास-महो खल्वमीभिराधुनिकैर्बाध्यामहे भागवतैरिति भवतु भवतु कथयंतो दृढमि-तोपि कवलिताः सरिद्भिः सागरैश्च महत्स्वायतनेषु महीगतेषु शार्ङ्गपाणेः कति न भवद्विधाः परमभागवताः तदास्यतामिहैव भवद्भिराधुनिकास्तु वयमज्ञातपारा-वाराः गोपायंतः क्वचिदात्मन गोविंदमेव निरंतरमसंदधीमहि इतिच विप्रविदिता-न्महावादान् पश्यतामसकृदुन्नम्योन्नम्य परिपृच्छतामागच्छतो वैमानिकान् परि-भ्रमतामभितोपि कोलाहलेन महतापारिषदानामग्रणीः कुपितो विष्वक्सेनो बहिर्निर्गत्य परितोपि चक्षुः प्रसारयन् आनीयमानमभ्यर्णतएव मंदरमवधारयन् अनुपदमेव तस्य सिंधौ निपातनमपि विज्ञापयामास विनयेन विदितवेदितव्यमपि स्वधर्मइति विश्वंभरं ।

व्यत्यस्तकौस्तुभमवप्लुतवैजयंति विस्रंसमानकनकांबरलोभनीयं ॥
सद्यः फणींद्रशयनादुदतिष्ठदीशः कैलासशैलशिकरादिव कालमेघः ॥४८॥

अपि च ।

दिव्यैः पंचभिरायुधैः सविमयैराबद्धसेवाक्रम-

स्तत्कालोपनतैस्तपोधनगणैर्धन्यैर्वृतः कैरपि ॥
अभ्यर्णे वसतस्तदा खगपतेरालंब्य हस्तं शनै
र्विष्वक्सेननिवेद्यमान सरणिर्विश्वंभरो निर्ययौ ॥ ४९ ॥

अथ तमतर्कितोपनिष्क्रांतमरविंदनाभमवसरज्ञो विधिरर्धपथे समेत्य सह महर्षिभिः विविक्तसेवावसरलाभविस्मयानंदमंथरं पश्यंतमचलनिपातकौतुकं परिवार्य केवलमवतस्थे ।

नवकुवलयदामश्यामलस्निग्धमुग्धं
नलिननयनमाद्यं तत्वमावेदयंतः ॥
परिजहुरमरौघाश्चेतसा कार्यभारं
परिजहुरुभये ते पाणिभिः शैलभारं ॥ ५० ॥

ततश्च ।

सुरासुरकरोदरस्खलितशैलमूलस्थल-
स्थितोपलतलाहतिक्षुभितसिंधुरंधूत्थितः ॥
भ्रमत्तिमितिमिंगिलभ्रमितवालकोलाहलैः
समं निखिलमंबरं परिववार तारस्वनः ॥ ५१ ॥
सबलदचलसमुद्रवल्लोलकल्लोलकोलाहल
व्यतिकरबधिरभ्रमत्कूर्मनक्रद्विपक्रंदितैः ॥
स्फुटितकमलजांडभांडप्रचंडस्वनोत्प्रेक्षण-
क्षुभितविबुधमुक्तहाहारवैश्चाहसदिच्युतः ॥ ५२ ॥

अपि च ।

निर्मग्नमंदरमणिद्युतिसंप्रदिग्धानिष्पेतुरंबरतले पयसः कणा ये ॥
व्माश्चिरायकुलिचामलकाभ्रमात्रास्तारा स्तएव परिणेमुरिति प्रतीमः ॥५३॥

पथि गिरिवरादस्माद्धारावसन्नसुरासुर-
प्रतिपदकृतस्कंधव्यत्याससंभ्रमकंपितात् ॥
मणिभिरभितो यस्यां यस्यां भुविस्खलितं क्वचि-
त्समजनि खनिः सा सा नाम स्थलेषु जलेषु च ॥ ५४ ॥

अपि च

विदूरादंबरतलादापततोस्य महता वेगेन प्रकीर्यमाणे पर्यंगते परिपीयमाने च दरीमुखैरेव परिसरगते च पयसि शून्यमिव निरवशेषमर्णवंमन्यमाना नभश्चराः निर्ममज्जुरुभये भये उन्मथितेषु च तन्मूलघटनादर्णवजंतुषु ततः परिभ्रष्टाः करिणएव जलकरिणः किराताएव जलमानुषाः निर्झरचराः शफराएव तिमयश्च तिमिंगिलाश्च संपेदिरे ।

अपि च ।

पुनरवगाहमाने रसातलं गिरौ अभ्यर्णगतं दुग्धमादायादाय सुखमभिषिंचंतः पारमेश्वरं लिंगमभ्यनंदन्नंदिमुखा गणाः । ऊर्ध्वमाभुजलोकादुत्पतता च दुग्धपूरेण परिप्लाविता सिद्धनदी बभूव दुग्धनदी । संसिक्ताश्च पयसा मधुरेण सर्वतो नंदनोद्यानपादपाः । सदाहि सुधामधुराणि स्रवंते फलानि ।

मज्जन्मंदरशैलकंदरपुटव्याघूर्णदर्णोभर-
स्वैरोज्जागरघोषभीषणपयः कल्लोलिनीवल्लभाः ॥
खेदस्तंभितकिंपचानविबुधप्रारब्धभूरिस्तवा-
गोविंदस्य कुतूहलं विदधिरे ते केचिदेके क्षणाः ॥ ९५ ॥

मज्जति मज्जति शैले पतति च पततीह कुलमिदंबुसदां ॥
प्रणतेति । वध्वाः प्रणते नम्रे । शिरसि अक्षतान् वर्षतः प्रभवतः प्रभोः ते रुचिरकरसरोजे चामराकारशोभायोस्ते स्तथाविधे । उदभातां शुशुभाते । अत्र वाद्यसंघाः विनेदः । समग्रः लोकः आनंदपूर्णश्च अभवत् ॥६६॥ अथोऽइति चेष्टितानि व्यापाराः । विलासैः मध्ये मध्ये गीतविनोदादिभिः सह । रीत्या परिपाट्या । अभूवन् तत्रतत्र चेष्टिते अतीवरक्ता प्रीतियुक्ताः । वासरे वासरे दिवसे दिवसे । रसालोक्षणादीनि विवाहप्रसिध्दान्याम्रसेचनादीनि । आदिपदेन अनुक्ताः सर्वेऽप्यन्योन्यो परिकेसररंगप्रक्षेपादयो विवाहप्रक्रियाप्रसिध्दा व्यापारा संगृह्यन्ते ॥ ६७ ॥ जहत् त्यजन् ॥ ६८ ॥ संस्कारीति । समंत्री संस्कारिभोजन निषेधवतां गेहे विविधं । उत्तमं । आमं अपक्वं । अन्नं प्रेषयन् सन् । तान् इति अशात् आज्ञापयामास । इति किं । यूयं स्नानं । देवयजनं देवपूजनंच । मदीये समये कृत्वा । मया-सह मण्डपं एत आगच्छत ॥ ६९ ॥ तैलमिति । इदानीं भोजनार्थमागच्छतां प्रकारं कथयति । अधिकृता नियुक्ताः । तान् ततपीठपंक्तौ विस्तृतपीठपरंपरायां आसयन्नुपवेशयामास: ॥ ७० ॥ सध्दूपेति । कांताः स्त्रियः सुदराः पुरुषा वा ॥ ७१ ॥ सत्केसेरति । सत्केसरेण उत्तम केसरेण आहिताः कृताः याः ललाटसंबंधिन्यः सुष्ठुराजयो रेखास्तासां मध्ये कस्तूरिका तिलकं दधतः । अभुंजत भुक्तवन्तः ॥ ७२ ॥ मंडंदधि मस्तु ॥ ७३ ॥

स्वादुः स्वच्छं पाटलपुष्पैः कृतगंधम्॥ कर्पूरेणोद्वासितमेलासुरपुष्पैः॥
कस्तूर्याचोशीरसुगंधैःकृतवासम् ॥ भिन्नं भिन्नं नीरमदभ्रं पपुरेते ॥७४॥

बध्वा कटिं प्रांजलयो विनीताः ॥ पंक्तौ पृथक्त्वेन मुहुर्मुहुस्तान्॥
समाहिता यूयमथाभिभुंग्ध्वम् ॥ संप्रार्थयामासुरिति प्रयुक्ता ॥ ७५ ॥

अन्योन्यस्य मुखे करेण ददतौ ग्रासानुपांतोल्लस– ॥
च्चंचत्कांचनभाजनप्रतिफलन्मूर्ती इवानेककौ ॥
द्वावेतौ तु वधूवरौ विबभतुः सौवर्णके जक्षतौ ॥
तत्रालज्जत चैक्षत प्रददती ग्रासान्कटाक्षैर्वधूः ॥ ७६ ॥

अन्नैः पुष्कलचारुभिः सुविहितै राशीभवद्भिस्तदा ॥
विप्रास्तृप्ततरा बभूवुरथ ते नित्यं यदृच्छाशिनः ॥
आशीर्वादविधायिनो जनपदांस्तत्कीर्तयन्तोऽभ्ययु– ॥
र्दुर्वासा यदि चापतेदसमये स प्रीयमाणस्त्वियात् ॥ ७७ ॥

स्वाद्विति । पाटलपुष्पैः भाषायां गुलाबपुष्पै रिति प्रसिद्धैः । सुरपुष्पै र्लवंगपुष्पैः ) पाटलादिपुष्पजातिभिः । भिन्नंभिन्नं वासितं । नीरं उदकं । एते भोक्तारः । अदभ्रं बहुलं । भिन्नं भिन्नं च यथा तथा पपुः । भिन्नंभिन्न मिति सर्वत्रान्वेति । तथा तत्र दर्शनादिति भावः ॥७४॥ बध्वेति । प्रयुक्ता प्रार्थनाकर्मण्यधिकृताः । हे भोक्तारः यूयं समाहिताः एकाग्रमनसः सन्तः । अभिभुंग्ध्वं इति प्रार्थयामासुः ॥७५॥ अन्योन्यस्येति । अन्योन्यस्य परस्परस्य । मुखे करेण । स्वस्वहस्तेन ग्रासान्ददतौ द्वौतु द्वावपि एतौ वधूवरौ । उपांते प्रांतभागे । उल्लसन्ति शोभमानानि । यानि चंचत्कांचनभाजनानि स्फुरत्सुवर्णपात्राणि । तेषु प्रतिफलन्मूर्ती प्रतिबिंबितांगौ सन्तौ । अनेककाविव प्रतिबिंबभूयस्त्वादनेकाविव विबभतुः शुशुभाते । कथं भूतौ । सौवर्णके सुवर्णपात्रे । जक्षतौ भुंजानौ । तत्रवधूः ग्रासान् प्रददतीसती । कटाक्षैः ऐक्षत अवलोकयामास । अलज्जत लज्जतेस्मच । ददतौ जक्षतौ प्रददातीत्यत्रच " नाभ्यस्तादितिनुप्रतिषेधः" ॥७६॥ अन्नैरिति । तदा विप्राः पुष्कलैः बहुभिः । चारुभिः सुंदरैः । दर्शनीयैरितिभावः । पुनः सुष्ठविहितैः कृतैः । पुनः राशीभवद्भिः अराशयोराशयः संपद्यन्ते तथा भवन्ति राशीभवन्ति तैः । राशीरूपैरित्यर्थः । अन्नैः ओदनादिभिः । तृप्ततराः अतिशयेन तृप्ताः । बभूवुः अथानित्यं यदृच्छाशिनः तेविप्राः आशीर्वादविधायिनः । तत् अन्नं कीर्तयंतःसंतश्च जनपदान्नानादेशान् । अभ्ययुः जग्मुः । किंबहुना । दुर्वासानामऋषिः । यदि असमये । अनवसरे आपतेदागच्छेत्तर्हि । सः प्रीयमाणः सन् इयात् गच्छेत् ॥७७॥

पद्माक्ष्यश्चंद्रवक्त्रास्तडिदमलरुचो योषितो रासखेले ॥
कुंदाभश्वेतवस्त्राः प्रसरदणुकणैः पाटला रागजन्यैः ॥
अन्योन्यस्मिंस्तु रागं ह्यभिमुखवदना दोर्भिरुध्दूलयन्त्यः ॥
फूत्कुर्वत्यः कराग्रैर्ह्रद इव विबभुः खेलशीलाः करिण्यः ॥ ७८ ॥

खेलंत्यो रागधूलिप्रसरविहरणैरुच्चयसन्मण्डपेऽस्मि–
न्नादर्शभ्राजमानश्च्छदिषिमुकुरकेष्वात्मबिंबान्यवेक्ष्य ॥
स्वाभिःसाकं विहर्तुं किमु सुरललना आगता व्योम्नि रागै– ॥
रित्थं ता मन्यमाना ववृषुरुपरि वै रागधूलीः समेत्य ॥ ७९ ॥

अस्तग्रावशिरोविलंबितरणित्विड्रागरक्तद्युतौ ॥
संध्यायामरुणे विहायसि यथा राकाशशांकोऽरुणः ॥
आशांतावधि रागधूलिपटले सांद्रं समुत्सर्पति ॥
भ्राजन्ते स्म तथा मुखानि शतशो रासोत्सवे योषिताम् ॥ ८० ॥

पद्माक्ष्य इति । कुंदाभश्वेतानि रागखेलात्प्राक् कुंदपुष्पवच्छुभ्राणि वस्त्राणि यासां ताः । रागा ह्वाषायां गुलाल इति प्रसिद्धरंजनद्रव्याज्जन्यैः उत्पन्नैः प्रसरद्भिः अणुभिः कणैः रजोभिः करणैः पाटलाः श्वेतरक्ताः । अभिमुखवदनाः । परास्पराभिमुखवक्त्राः सत्यः । अन्योन्यस्मिन् दोर्भिर्हस्तैः । रागं गुलालसंज्ञं रंजनद्रव्यं । उद्धूलयंत्यः उत्क्षिपन्त्यः । योषितः स्त्रियः । ह्रदे जलाशये । कराग्रैः शुंडाग्रैः । फूत्कर्वत्यः परस्परोपरिजलं सिंचत्यः । करिण्य इव । विबभुः शोभंते स्म ॥ ७८ ॥ खेलन्त्य इति । आदर्शैं निबद्धैरितिभावः । भ्राजमानं छदिः पटलं । यस्यतस्मिन् तथा विधे । अस्मिन् उच्चमण्डपे । रागधूलिप्रसराविहरणैः खेलंत्यस्तायोषितः । मुकरकेष पटलनिबद्धादर्शेषु । आत्मबिंबानि अवेक्ष्य स्वाभिः आत्मभिः साकं । रागैः रंजनधूलिभिः करणैः । विहर्तुं खेलितुं । सुरललनाः देवांगनाः । व्योम्नि आकाशे । आगताः किमु इत्थं मन्यमानाः सत्यः । समेत्य सर्वामीलित्वा ।उपरि रागधलीः ववृषु : वर्षन्तिस्म । वै निश्चयेन । छादरादर्शेषु प्रतिफलितात्ममूर्तिष्वेव ।देवांगना एव खेलितमागता इति कृतबुद्धयः स्त्रियः । सर्वाभिः भौमांगनाभि र्दिव्यांगनाभिः सहैव विहरणीयामिति बुध्या उपर्येव रागमुष्टीन् क्षिपन्ति स्मेति भावः ॥७९॥ अस्तेति । अस्तग्रावा अस्ताचलः । तस्य शिरसि शिखरे । विलंबी स्रंसमानोयस्तरणिः सूर्यः। तस्य त्विषारागेण रक्ता द्युतिर्यस्यतस्मिन्।अत एव अरुणे ताम्रे । विहायसि आकाशे । संध्यायां अरुणस्ताम्रः । राकाशशांकः पौर्णमासीचंद्रः । यथा भ्राजते तथा। आशांतावधि दिगंतपर्यंतं । सांद्रं यथा तथा समुत्सर्पति प्रसरति । रागधूलिपटले रंजनक्षोदनिवहे । रासोत्सवे रासोत्सवसमये । योषितां खेलंतीनां स्त्रीणां । शतशः असंख्यातानि । मुखानि भ्राजन्ते स्म शोभन्ते स्म । यथा संध्यायामारक्तेऽभ्रे ताम्रं पूर्णचंद्रमण्डलं शोभते । तथा रागधूलिपटले रागताम्राणि शतशो वधूमुखानि शोभन्ते स्मेतिभावः ॥८०॥

अभ्यंगदेशे कृतचारुरंभास्तंभोल्लसद्वारि कदुष्णवार्भिः ॥
स्नाताः सरस्याबभुरुत्थिताभिर्वातेनपद्मिन्य इवाद्भिरार्द्राः ॥ ८१ ॥

हंसारावविराविनूपुररवव्याजत्रिलोकीजयो– ॥
त्सूच्यारावविधायितूर्यनिकरः सिष्णासयोत्कंठितः ॥
चंचद्भ्रूकुटिहस्तपादकुचदृङ्मोहाधिकारीषुको ॥
रासस्नानमनंग एव ललनारूपेण नूनं व्यधात् ॥ ८२ ॥

याते काममहीपतौ प्रियतमारूपेण रासोत्सवम् ॥
तत्साचिव्यविधित्सया ननु मधुस्तैलं विवेशोत्तमम् ॥
आसारायितकोष्णवारिविलसद्वृष्टौ लसंति स्म ताः ॥
खेलंत्यस्तु सुवर्णवर्णतनवो विद्युत्समा योषितः ॥ ८३ ॥

कृत्वा वरानयनसंभ्रममाशु मंत्री ॥ प्रस्थानवद्बुधजनादिनिमंत्रणाद्यैः ॥
आनेतुमात्मभवनं सह तं स वध्वा ॥ वध्वा गृहानभिययौ सकलैः समेतः॥८४॥

न्यधुरथकृतपूजामैरिणीं ज्ञातिशीर्षे ॥ कनकवसनयुक्तामग्रजांके वधूं ताम् ॥
स्वभवनगमनार्थं सोऽध्यरोहत्स्ववध्वा॥सह महानिवहैस्तां हस्तिनीं सद्विमानाम्॥८५॥

अभ्यंगेति । कृता चारवो ये रंभास्तंभाः कदलीदंडौस्तरुल्लसती द्वा : द्वारं यस्य तथाविधे अभ्यंगदेशे । कदुष्णवार्भिः मंदोष्णोदकैः । स्नाता योषितः । सरसिवातेन उत्थिताभिः आद्भिः आर्द्राः क्लिन्नाः पद्मिन्य इव आबभुः शोभन्ते स्म ॥ ८१ ॥ हंसेति । हंसारावस्येव हंसकूजितस्येव । विराविणां शब्दवतां । नूपुराणां पादभूषणानां । यो रवः शब्दः स एव व्याजो यस्य तथाविधो यस्त्रिलोकीजयोत्सूची त्रैलोक्यविजयसूचकः । आरावो नादस्तं विदधाति तच्छीलः तूर्यनिकरो वाद्यसमूहो यस्य । पुनः सिष्णासया रासस्नातुमिच्छया उत्कंठितः । ननुतस्य पंचेषवः क्वगता इति चेदत आह । चंचत्स्फुरद्भ्रूरूपं भ्रूकुटिहस्तपादकुच दृगेवमोहाधिकारिणः मोहकर्तारः । इषवोबाणा । यस्य तथाविधः । अनंग एव ललनारूपेण स्वस्याशरीरत्वात्स्त्रीरूपेण रासस्नानं व्यधात् कृतवान् नूनमित्युत्प्रेक्षायाम् ॥८२॥ यातइति । मधुर्वसंतः कामसाचिव्यविधित्सया कामसारथ्यचिकीर्षया । कुसुमाकरः तैलोपा × × कुसुमादिष्वपि सौगंध्याधायक इति भावः । उत्तमं तैलं विवेश ननु । अन्यथा पुष्पादिनिष्कासिततैले तादृक् सौगंध्यं नस्यादिति भावः । आसारायितकोष्णवारिविलसद्वृष्टौ आसारइव धारासंपात इव । आचरितायां मंदोष्णोदकदिव्यवृष्टौ ॥८३॥ कृत्वेति । प्रस्थानवत् वरप्रस्थानवत् । स मंत्री सकलबंधुजनादिभिः समेतः युक्तः सन् । तं वरं । वध्वा सह आत्मभवनं आनेतुं । वध्वागृहान् वधूजनकगेहमित्यर्थः । अभिययौ जगाम ॥८४॥ न्युधुरिति । अथश्वश्रूश्वशुराः कृतपूजां ऐरिणीं ज्ञातिशीर्षे वरपूर्वजमस्तकेन्यधुः स्थापयामासुः । कनकवसनयुक्तां तां वधूंच अग्रजांके वरपूर्वजोत्संगेषु न्यधुः । न्यध्युरीति बहुवचनं पूज्यताभिप्रायं श्वश्रूश्वशुरा इति शेषः । स वरः । स्ववध्वासह । महानिवहैः नानोत्सवसंभारैः । स्वभवनगमनार्थं सद्विमानां तां हस्तिनीं अध्यरोहत् वध्वासह आरुरोह ॥ ८५ ॥

विष्वक्चंद्रज्योतिराद्यं विभास्वद् ॥ व्यद्योतिष्टाग्नेयमायन्जनौघाः ॥
दीपा रेजुर्वाद्यसंघाश्चनेदू राममादायायतोऽस्य स्वगेहम् ॥ ८६ ॥

रम्यानात्मगृहान्महोत्सवभरैरागच्छतः प्रेयसी– ॥
मादायात्मवधूमतींद्रविभवस्यारोहतो हस्तिनीम् ॥
रत्नाभस्य विभोरभूदतितरामाशोभितस्यांबरै– ॥
र्लक्ष्मैश्वर्यविलाससंपदपरा भार्येव वर्याऽध्वनि ॥ ८७ ॥

वेलायां किल दैवविद्वरतरैरुच्चारितायां गृहान् ॥
यातौ तौ तु वधूवरौ फलकरौ देवान्मुदा नेमतुः ॥
लक्ष्मीपूजनमुत्सवेन महता विद्वद्भिराधायि तै– ॥
र्वध्वा नाम रमेत्यकारि जगतामानंदसंदोहदम् ॥ ८८ ॥

इत्थं स भूपतिरपारमतिर्महात्मा ॥ लोकाभिरामगुणधाम महाकुलीनाम् ॥
रूपाधरीकृतसुराधिपचारुरामाम् ॥ भीमात्मजां नल इवोदवहद्रमां ताम् ॥८९॥

विद्याभ्यासमनोज्ञराजघटनाः शत्रोश्चसंभेदनम् ॥
सद्विद्वत्परिपालनं नययुतं राजाधिकारक्षमम् ॥
दृप्ताराातिमदाधिधामहरणं सर्वं सदभ्यासितम् ॥
श्रीमन्माधवभुभूजा ध्रुवमिदं नानाख्यसन्मंत्रिणा ॥ ९० ॥

विष्वगिति । रामां वधूं । आदाय गृहीत्वा । स्वगेहं आयतः आगच्छतः । अस्य वरस्य । विष्वक् अभितः । विभास्वद्देदीप्यमानं । चंद्रज्योतिराद्यं आग्नेयं भाषाप्रसिद्धं दारुद्रव्यं । व्यद्योतिष्ट प्रकाशतेस्म । जनौघाः आयन् गच्छन्तिस्म । दीपा दीपिकाः । रेजुः प्रकाशन्तेस्म । वाद्यसंघाश्चनेदुः दध्वनुः ॥८६॥ रम्यानिति । प्रेयसीं प्रियतरां आत्मवधूं । आदाय गृहीत्वा । रम्यान् रमणीयान् । आत्मगृहान् स्वगेहं । महोत्सवभरैः करणैः आगच्छतः । अतींद्रविभवस्य इन्द्रविभवं अतिक्रांतस्य । हस्तिनीं आरोहतः वध्वा सह आधिरोहतः । रत्नैः शिरोरत्नाद्यलंकारगतैः आभाति सरत्नाभस्तस्य अंबरैः कनकवसनैः । अतितरां अत्यंतं । आशोभितस्य प्रसाधितस्य । विभोः श्रीमतो वरस्य । लक्ष्मैश्वर्यविलाससंपत लक्ष्मसंबंधि यत् ऐश्वर्यं वैभवं । तस्य विलाससंपत् शोभोद्रेकः सैव । अध्वनि मार्गे अपरा अन्या वर्या वरणीया भार्येव द्वितीया स्त्रीव अभूत् । स्ववधूमादायातिमहोत्सवेन स्वगेहमागच्छतः श्रीमतो वरस्य मार्गे या काचिदलौकिकीशोभा उत्पन्ना साद्वितीया वधूरिव सर्वैरत्यादरेण प्रेक्षणीया जातेतिभावः ॥८७॥ वेलायामिति । दैवविद्वरतरैः ज्योतिर्विच्छ्रेष्ठतमैः । उच्चारितायां अस्मिन्समये गृहप्रवेशः कर्तव्य इत्यादिष्टायां वेलायां समये । फलकरौ नारिकेलहस्तौ । देवान् गृहदेवताः । आधायि कृतं । आनंदस्य संदोहः समूहस्तं ददाति तत् ॥८८॥ इत्थमिति । लोकेषु अभिरामा आल्हादका । ये गुणा शालीनतादयस्तेषां धाम स्थानं । रूपेण सौंदर्येण । अधरीकृतास्तिरस्कृताः । सुराधिपस्य इन्द्रस्य । चारुरामा उत्तमाः स्त्रियो रंभोर्वश्यादयो यया तां । भीमात्मजामिव दमयन्तीमिव उदवहत् परिणीतवान् ॥८९॥ विद्येति । दृप्तानां गर्वितानामरातीनां शत्रूणां । मदस्य गर्वस्य । अधिधाम्नः अधिकतेजसश्चहरणं नानाख्यसन्मंत्रिणा कर्ता । श्रीमन्माधवभूभुजा प्रयोज्यकर्त्रा । इदं सर्वं सदभ्यासितं । ध्रुवं निश्चयेन ॥९०॥

वर्षे वर्षेऽथराज्ञः सपदि सवयसो वीक्ष्य बुद्धेश्ववृद्धिम् ॥
मंत्री कृत्वा प्रणामं नृपवरमिति तं प्रार्थयामास धीमान् ॥
स्वामि त्वस्याधिलेखः प्रभवतु भवतो हस्ततो राजकार्ये ॥
श्रुत्वाऽधत्त द्वितीयाविधुमिव सकलैर्वंदनीयं स लेखम् ॥ ९१ ॥

विद्यायां स निशम्य बुद्धिमधिकां तत्तद्गुणज्ञाननात् ॥
राज्यव्यापृतियोग्यमस्य च वयो मंत्री निरीक्ष्योत्तमः ॥
जिज्ञासुर्जनरंजने च विनये शक्तित्रये नैपुणम् ॥
राज्यांगीकरणे व्यजिज्ञपदमुं काशींगमव्याजतः ॥९२॥

अगृण्हात्कचो जीवनीं शुक्रदत्ताम् । यथा वार्जुनःसंपदं कृष्णदत्ताम् ॥
हतस्त्रीं मरुत्सूनुदत्तां च रामो । गृहाणेशदत्तं तथा त्वं स्वराज्यम् ॥९३॥

करयुगमेकीकृत्य प्रणतोऽहं तेऽस्मि भो विभो चरणम् ॥
वितराज्ञां काशिपुरं यातुं मे त्वं कुमारक्ष ॥९४॥

धन्योसिराजन्मम जन्म धन्यमाज्ञा विधेयेति तमर्थयित्वा ॥
नानाख्यमंत्री प्रभुपादपद्मे नियुज्य देहालिमभूत्कृतार्थः ॥९५॥

जितांतरःशत्रुजिदाहवेषु कालत्रयज्ञोऽतिवशीकृतेशः ॥
निवेद्य सर्वं विभवे स हृष्टो मुद्रां हनूमानिव रामपत्न्यै ॥९६॥

गंतासि चेत्त्वमिह भूसुरभूरिरूपम् । क्षात्रं विचित्रमतिनीतियुतं च वेत्ता ॥
वृद्धाखिलादिमविशिष्टसुसंप्रदायो । मंत्री भवेद्वद सदा मम संनिधौ कः ॥९७॥

वर्षेवर्षइति । स्वामित्वस्य अधिलेखः स्वामित्वसूचकः देयमित्यादिरूपो मुख्यलेखः आधत्त कृतवान् ॥९१॥ विद्यायामिति । तत्तद्गुणज्ञाननात् तत्तद्गुणशिक्षकमुख्यात् ।जिज्ञासुर्ज्ञातुमिच्छुः अमुंप्रभुं । व्याजिज्ञपत् । विज्ञापयामास ॥९२॥ अगृण्हादिति । ईशदत्तं । ईश्वरप्रसादलब्धं स्वपितृपैतामहं राज्यं त्वं तथा गृहाण स्वीकुरु ॥९३॥ करयुगमिति । भोविभो त्वं मे काशिपुरं यातुं गतुं । आज्ञां वितर देहि । कुं पृथ्वीं । त्वमेव आरक्ष पालय ॥ ९४ ॥ अथ मंत्री नत्वा स्तौति । धन्य इति । राजन् त्वं धन्योऽसि । त्वत्साचिव्यात् ममापि जन्म धन्यं । अथ प्रार्थयते आज्ञां काशीं गंतुमितिशेषः । विधेया कर्तव्या । इति तं अर्थयित्वा प्रभोर्माधवस्य पादपद्मे चरणकमले देहमेव आलिं भ्रमरं नियुज्य कृतार्थः कृतकृत्यः अभूत् ॥ ९५ ॥ जितांतर इति । जितांतरः जितांतःकरणः । आहवेषु संग्रामेषु । मुद्रां अंगुलीयकं । रामपत्न्यै । सीतायै ॥ ९६ ॥ अथ विभुः प्रतिवक्ति । गंतासीति । हे मंत्रिन् त्वं गंतासि गमिष्यसि चेत् इह राज्ये भूसुराणां ब्राह्मणानां रूपं स्वरूपं ज्ञानमितियावत् । तत्तद्योग्यतानुरूपसत्कारवर्धनं वा तथा विचित्रं अनेकरूपं अतिनीतियुत च क्षात्रं राज्यरक्षणार्थं तत्तत्कालोपयुक्तं संधिविग्रहादिकं च वेत्ता ज्ञाता पुनः वृद्धाखिलादिमविशिष्टसुसंप्रदायः वृद्धाः ज्ञाताः अखिलाः आदिमाः प्राचीनाः विशिष्टाश्च ये सुसंप्रदायाः अस्मत्कुलपरंपरागतशोभनाचाराः येन । तथाविधः मंत्री सदा मम सन्निधो को भवेत् त्व वद ब्रूहि नामिति शेषः ॥ ९७ ॥

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छायां येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक. ३. नवंबर, सन १८८०. अंक ११.

हें मासिक पुस्तक
पुणें पेठ बुधवार, येथें
'आर्यभूषण' छापखान्यांत छापिलें.

किंमत ८ आणे.

# केसरी.

स्थितिं नो रे दध्याः क्षणमपि मदांधेक्षण सखे
गजश्रेणीनाथ त्वमिह जटिलायां वनभुवि ।
असौ कुंभिभ्रांत्या खरनखरविद्रावितमहा—
गुरुग्रावग्रामः स्वपिति गिरिगर्भे हरिपतिः ॥

जगन्नाथराय.

वरील नांवाचें वर्तमानपत्र निवळ महाराष्ट्र भाषेंत येत्या सालच्या आरंभापासून दर मंगळवारीं काढण्याचा विचार खालील मंडळींनें केला आहे. या पत्रांत एरवींच्या वर्तमानपत्रांप्रमाणें बातम्या, राजकीय प्रकरणें, व्यापार संबंधी माहिती, वगैरे नेहेमींचे विषय तर येतीलच; पण यांखेरीज लोकस्थितिवर निबंध, नवीन ग्रंथांवर टीका, वगैरे विषयांचाही त्यांत समावेश केला जाईल. तसेंच विलायतेंत ज्या राज्यप्रकरणांची वाटाघाट होते ती इकडील लोकांस समजणें अवश्य असल्यामुळें त्यांचा ही सारांशरूपानें यांत संग्रह करण्याचा बेत केला आहे. आजपर्यंत वरील तीन विषयांवर, ह्मणजे देशस्थिति, देशभाषेंतील ग्रंथ, व विलायतेंतील राजकारण, या विषयांच्या संबंधानें जसें यथास्थित उद्घाटन व्हावयास पाहिजे होतें तसें कोणत्या ही वर्तमानपत्रांतून झालें नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तर ही मोठी उणीव नाहींशी करून टाकण्याचें आह्मीं मनांत आणिलें आहे.

वरील वर्तमानपत्रांत प्रत्येक विषयाचें विवेचन जें करावयाचें तें केवळ निःपक्षपातबुद्धीनें व आह्मांस जें खरें वाटेल त्यास अनुसरून करावयाचें असा आमचा कृतसंकल्प आहे. आलीकडे बादशाही अमलाच्या सुरवातीपासून तोंडपुजेपणाचा प्रकार बराच वाढत चालला आहे यांत संशय नाहीं. हा प्रकार अत्यंत अश्लाघ्य असून देशाच्या हितास अपायकारक होय. हें कोणीही प्रांजल मनुष्य कबूल करील. तर सदरील पत्रांतील लेख त्यास ठेविलेल्या नांवा प्रमाणेंच येतील असें समजावें.

# विषयक्रम.

बखरी.—


शिवछत्रपतींचें चरित्र.* ............................ ८५—९२
नागपूरकर भोंसल्यांच्या संबंधाचे कागदपत्र...... ३२—४०


मराठी कविता.—


वामनपंडितकृत—जल क्रीडा,
उपदेश माला, गोपी गीत,
भक्ति महिमा,लघुचेंडुफळी
व मनाचे श्लोक. ................................ ११५—१२०


संस्कृत काव्यें.—


नीलकंठचंपू ..................................... ४५—६०


---

* मुखपत्र मागाहून येईल.

कर्नाटक प्रांतीचे गड केले नवे एकूण सु ॥ ७९.

तपशील——

## कोल्हार बाळापूर वरघाट.

कित्ता——

१ कोल्हारबाळापूर भोर.
१ नंदीगड.
१ चंदन गड.
१ ब्रम्हगड.
१ गणेशगड.
१ श्रीवर्धनगड.
१ वज्रगड.
१ मर्दनगड.
१ कोट बिदनूर.
१ भास्कर गड.
१ पिपला उर्फ प्रकाशगड
१ कोट ढमकूर.
१ कोटकोलार कदीम.
१ दुर्गमगड.
१ भीम गड.
१ मरसगड.
१ अहिनिज्या दुर्ग.
१ कट्टरगड.
१ मकरंदगड.
१ बुरवैंडगड.
१ सोमशंकर गड.
१ हातमलगड.
१ भुमंडणगड.
१ मेजकोल्हार गड.
१ महीपाल गड.
१ भीमगडनजीककपशेरी
१ बुंदीकोट.
१ कोट एलूर.
१ कैलासगड.
१ महीमंडणगड.
१ अर्जुनगड.
१ अर्काटगड.
१ पडवीरगड.
१ भंजनगड.
१ राजगड चंदी.
१ मदोन्मत्तगड चंदी.
१ मुखणे गड कोटवेल.
१ भातुर.
१ पाले कोट.

३८

## घाटाखालीं गड कोट.

कित्ता——

१ पतनगदनेगड.
१ जगदेवगड.
१ केवळगड.
१ गगनगड.
१ सुदर्शनगड.
१ महाराजगड.
१ कृष्णागिरीगड.
१ रत्नगड.
१ शिदर्गड.
१ मल्लकार्जुनगड.
१ मदगड.
१ कस्तुरीगड.
१ रत्नगड.
१ प्रबळगड.
१ मार्तंडगड.
१ बिर्गबोळूगड.
१ बहिरवगड.
१ कोटसुभा.
१ मनगड.
१ कोट त्रिकळूर.
१ वेटवल उर्फ केमल-गड.
१ कृष्णागिरी चंदी.
१ शारंगगड चंदी.
१ लागगड चंदी.
१ कोट त्रिचंदी.
१ कोट देवणा पाटी.
१ रामगड.
१ चिंताहर कोट.
१ वृध्दाचल कोट.
१ चवीकोट.
१ निलसाजित गड.

---

७९. 'बरुड कोट' पाठांतर.
८०. 'शीरगड' पाठांतर.
८१. 'बीर्गपल्ली दुर्ग' पाठांतर.

| | | |
|---|---|---|
| १ प्राणगड. | १ विशाळगड. | १ यशवंत गड. |
| १ कुंजरगड. | १ कोट त्रिमल. | १ देवगड. |
| १ आरकोट गड. | १ चेलगड चंदी. | — |
| १ कर्नाटकगड. | १ गर्वगड चंदी. | ४१ |

एकंदर गड वेरीज. ७९ [८२]

**एकंदर गडबेरीज.**

५० प्रथम पन्नास.
१११ नवे, राजियांनीं वसाविले.
७९ कर्नाटक प्रांतींचे.

एकूण [८३] २४०

एणें प्रमाणे आपलें राज्य सालेरी किल्यापासून गोदावरी नदी आलीकडे कुल देश वरघाट तळघाट तुंगभद्रा पावेतों हा एक प्रांत, व तुंगभद्रे पलीकडे देखील[८४] कोल्हार, बालापूर, चंदी, एलूर सरद कावेरी पावेतों हा एक प्रांत. असे दोन प्रांत मिळून एक राज्य आहे. ऐशी तजवीज करून संभाजी राजियास पन्हाळ्यास ठेविलें. त्याजवळ जनार्दन नारायण सरकारकून व सोनोजी नाईक बंकी व बाबाजी ढंढेरे असे ठेविले. आणि पुत्राचें समाधान केलें कीं "आपण रायगडास जातों. धाकटा पुत्र राजाराम याचें लग्न करून येतों. मग राज्य भाराचा विचार कर्तव्य तो करूं. तूं वडील पुत्र आहेस. सर्व प्रकारें भरंवसा तुमचा." असें बोलून रायगडास गेले.

धाकटा पुत्र राजाराम यास वधू पाहतां प्रतापराव पूर्वील सेनापति होते त्यांची कन्या नवरी नेमस्त केली. आणि लग्न सिद्धीतें पावविलें. वधूचें

---

८२. ह्या खेरीज आणखीं नांवें दुसऱ्या प्रतींत आढळतात. तीं हीं—

| | |
|---|---|
| १ कोंडापूर कोट. | १ धर्मपुरीकोट. |
| १ कराडकोट. | १ धरापूरकोट |
| १ काणणूर | १ जवादीगड. |
| १ कामकोट. | १ प्रमोदगड. |
| १ गोकाक कोट. | १ त्रिचनापूर कोट. |
| १ गोजरागड. | १ तळगिरी कोट. |
| १ भवानीदुर्ग. | १ रवळागड. |
| १ त्रिवेली कोट. | |

| | |
|---|---|
| १ माणीकगड. | १ रायदुर्ग. |
| १ मृगांकगड. | १ विराटकोट. |
| १ मनोहर कोट. | १ सोजिरागड. |
| १ मिरजकोट. | १ शिरोळगड. |
| १ मंगळगड. | १ शामलकोट. |
| १ बागलकोट. | |

८३ महाड प्रतींत ३२३ व दुसऱ्या एका जून्या यादींत ३६४ असें आहे. प्रतापगड प्रतींत २३० आहेत.

८४ देखील=सुद्धां, सह.

[ नांव] सौभाग्यवती जानकीबाई असें ठेविलें. मोठा महोच्छाह केला. दानधर्म अपार केले.

मग कांहीं दिवसांनीं राजास व्यथा ज्वराची जाहली. राजा पुण्यश्लोक, कालज्ञान जाणे. विचार पाहतां अयुष्याची मर्यादा झाली असें कळून जवळील कारकुन व हुजरे लोक होते त्यांमध्यें सभ्य भले लोक बोलावून आणिले. बितपशील.

| कारकून. | हुजरे लोक. |
|---|---|
| १ निळोपंत प्रधान पुत्र. | १ हिरोजी फरजंद. |
| १ प्रल्हादपंत. | १ बाबाजी घाडगे. |
| १ गंगाधरपंत जनार्दन पंताचे पुत्र. | १ बाजी कदम. |
| १ रामचंद्र निळकंठ. | १ मुधोजी सरखवास. |
| १ रावजी सोमनाथ. | १ सुर्याजी मालुसरा. |
| १ आबाजी महादेव. | १ महादजीनाईक पानसबळ. |
| १ जोतीराव. | |
| १ बाळप्रभु चिटनीस. | |

असे मातबर लोक जवळि बोलावून आणिले. मग त्यांस सांगितलें कीं, आपली अयुष्याची अवधी झाली. आपण कैलासास श्रीचे दर्शनास जाणार. शरीर क्षीण देखून पन्हाळियावरि संभाजी राजे वडील पुत्र यांस सांगितलें कीं तुम्ही दोघे पुत्र आपणास त्यांस राज्य वांटून देतों. आणि उभयतां सुखरूप राहणें. म्हणोन सांगितलें. परंतु वडील पुत्र संभाजी राजे यांनीं ऐकिलें नाहीं. शेवट आपला तो निदान समय दिसताहे. राज्य म्यां शिवाजीनें चाळीस हजार होनाचा पुणें महाल होता, त्यावरि एक क्रोड होनाचें राज्य पैदा केलें. हे गड कोट व लष्कर पागा ऐसें मेळविलें. परंतु मज माघारें हें राज्य संरक्षण करणार ऐसा पुत्र दिसत नाहीं. कदाचित् धाकटा कुंवार राजाराम वांचला तर तो एक हें राज्य वृद्धीतें पाववील. संभाजी राजे वडील पुत्र जाणता आहे. परंतु बुद्धि फर्टकैळ[८५] आहे. अल्पबुद्धि आहे. त्यास काय करावें ? आपण तो प्रयाण करतों. तुम्हीं कारकून व हुजरे मराठे [८६]कदीम या राज्यांतील आहां. तुम्हांस या गोष्टी कळल्या असाव्या. आपणा माघारें संभाजी राजे पराक्रमानें राज्य सर्व आटोपतील. लष्करही थोरला राजा संभाजी म्हणून त्याजकडे डौल

८५ 'अनीतीची' पाठांतर. | ८६ कदीम=जुने, फार दिवसांचे.

आणि योगाभ्यास करून आत्मा ब्रम्हांडास नेऊन दशद्वारें फोडून प्राण प्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५[10] रविवारीं दोन प्रहरीं काळ रायगडीं झाला. त्या नंतर शिवदूत विमान घेऊन आले. आणि विमानीं बैसून कैलासास गेले. हें जड शरीर मृत्युलोकीं त्याग केला.

राजियाचें देहावसान झालें. ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून झाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्री शंभुमहादेवीं तळयाचें उदक रक्तांवर झालें. पाण्यांतील मच्छ बाहेर पडून अमासवणी [ ? ] उदक जाहलें. ऐशीं अरिष्टें जाहलीं. मग राजियाचे कलेवर चंदनकाष्ठें व बेलकाष्ठें आणून दग्ध केलें. स्त्रिया राजपत्न्या कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं धाकटा पुत्र **राजाराम** यांनीं क्रिया करावी. सर्वांनीं खेद केला. **राजाराम** यांनीं अत्यंत शोक केला. त्या नंतर उत्तरकार्य कनिष्ठांनीं करावें असें सिद्ध केलें. वडील पुत्र संभाजी राजे वेळेस नाहींत. याजकरितां धाकट्यांनीं क्रिया केली. ऐसें राजियांचें चरित्र आख्यान उत्पन्न काळा पासून देहावसाना पर्यंत जाहलें.

राजा साक्षात् केवळ आवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदापासून रामेश्वरपर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाई, कुतुबशाई, निजामशाई, मोंगलाई ह्या चारी पातशाहा व समुद्रांतील बेवीस पातशाहा असे जेर जप्तकरून नवेंच राज्य साधून मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपती जाहला. प्रतिइच्छा[11] मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहला नाहीं; पुढेंही होणार नाहीं. असें वर्तमान महाराजांचें जाहलें, कळलें पाहिजे.

चरित्र पुण्यश्लोक राजियाचे जे घरीं लिहून ठेवतील त्याच्या भाग्यास पारावार नाहीं. व जे वाचतील त्यास मोठें पुण्य जोडेल. निपुत्रियास पुत्र होतील व दरिद्रि यास लक्ष्मीवंत होतील व अपेशी यास यशवंत होतील. व पुण्यश्लोक पराक्रमी होतील. जे पुत्रवंत असतील त्यास ही पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणें प्रमाणें सर्वमनोरथ पूर्ण होतील. बरें समजणें. ही बखर संपूर्ण जाहली. चैत्रशुद्ध प्रतिपदा ते

१० ही मिती महाड प्रतींत मात्र आहे.

११ इच्छेस येईल त्यावेळीं देहावसान करण्याचा वर मागें भीष्मास होता.

दिवशीं वर्णन समाप्त झालें.[१२] ईश्वर संवत्सर-मुक्काम चंदी शालिवाहन शके[१३] १६१६ [ त ] जाहली कळले पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

---

## उपसंहार.

oxo

कोल्हापुरास असलेली बखर मिळविण्याविषयींचा आमचा प्रयत्न सफळ झाला नाहीं. तथापि तिजविषयीं थोडी माहिती मिळाली ती अशी.

" श्रीमन्महाराजआदिअनादिप्रगल्भपरंतपश्रीजगत्कारपाय शेवेशीं विनंति शेवक कृष्णाजी अनंत सभासद समस्त राजमंडळ द्वयकर जोडून कृतानेक विज्ञापना " असा कोल्हापूर येथील बखरीचा प्रारंभ आहे.

हींत मध्यंतरीं बालबोध लिहिलेलीं अफजूलखानास वाघनखानें मारलें वगैरे त्यासमयाचीं पदें वगैरे आहेत.

**बखरीची अखेर** :—शिवाजीचामृत्यु, त्यावेळेचें यथासांगवर्णन. व त्या वेळेचीं दुश्चिन्हें यांचें वर्णन उदाहरणार्थ:—तळें आटलें. आंबाबाईचे नाकांतील मोत्यें गळून पडलें. सूर्य काळा झाला. चंद्रास खळें पडलें इ०.

### अखेर फलश्रुति.

" निपुत्रिकास पुत्र होतील. निर्धनासि धन. रोगी प्राण्यांचे रोग परिहार होतील शत्रु किंकर होतील. पुत्रपौत्र वंशपरंपरेनें सुखरूप असतील—हें शिवाख्यान अनंत पुत्र कृष्ण यानें केलें. पुढें चंदीमध्यें ईश्वरनामसंवत्सर चैत्र शुद्ध १ तदिनीं बखर महाराजांची समाप्त झाली. गतशालिवाहन शके १६१६ सोळाशें सोळा अनंत कृष्णाजीनीं निर्मिली. "

यापुढें हकीगत आहे ती बखर उतरून घेणाराची दिसते. " तदनंतर या बखरीचा भावगर्भचित्तांतसंपूर्णमनन रघुनाथ यादव चित्रगुप्त दिमत राजमंदीर परंपरागत महाराजांचे कारकीर्दीचे सेवक. वडील वडिलांनीं सेवा करून महत्पदें संपादिलीं व हल्लीं श्रीमन्महाराज राजश्री राजाराम छत्रपती व थोरले महाराजांचे पुत्र श्रीमन्महाराज राजश्री संभाजीराजेछत्रपती यां-

---

१२. 'ते दिवशीं राजा कैलासवासी झाला' असें प्रतापगड प्रतींत आहे. तें चुकीचें आहे.

१३. सर्व प्रतींत ईश्वर संवत्सर व १६१६ शक असेंच आहे.

संनिध साहेब कामावरि आमचे चुलतआजे काकाजीबावा प्रभु विनाप-राधें धेरले संभाजी महाराजांनीं स्वहस्तें मारिले व आमचे बाप साहेब कामावरि पडले शेवक बारा तेरा वर्षांपासून श्रीमन्महाराज राजारामपुत्र धाकटे श्रीमन्महाराज राजश्री जिजाकांतशंभुछत्रपतींची त्रिकर्णचित्तें चिटणिशी सेवा केली. ती चाळीस वर्षे. महाराज निजधामास गेले. तन्मुळें शेवकास आश्रय नाहीं. अन्नाकरितां दारोदार भणंगगतीनें लागलों. देशांत-रास गेलों. भ्रमत भ्रमत तारगलास अप्रसिरवा घडली ह्मणोन चिकोडीस आलियावरी राजश्री यशवंतराव शिंदे सुभेदार श्रीमन्महाराज मातुश्री जिजाबाईसाहेब यत्स्वीपारिपरमसुज्ञ शौर्यकर्मै बुद्धीसागर यशश्वी प्रतापनिधी विद्यावंताचे जाण करुणासमुद्र सहिष्णशांतश्वांतनितांत धुरीणमहत्कार्य कर्ते महाराज मातुश्री आई साहेबांचे नावांजीस एकवचनीं अनृत्य स्वप्नींहि जाणत नाहीं. तेव्हां जागृतींत होणार कोठील ? एक महाराजांचे राज्यांत माहराकत कामें संपादिलीं महाराजांमागें राज्यसंरक्षणा केली त्यानें आमचे बहुताप्रकारें समाधान करून अन्नोदकाकरितां"—इतकें अर्धेंच वाक्य आहे.

२. शिवाजीस रायगडीं ज्या प्रासादांत राज्याभिषेक झाला त्या प्रासादाच्या एका सुमारें १॥ हात लांबीच्या व १। हात रुंदीच्या चिऱ्यावर खालीं दिलेले दोन श्लोक लिहिलेले आहेत. हे आह्मांकडे आमच्या दोन महाडकर मि-त्रांनीं पाठविले. त्यांची एक प्रत आम्हांस एक्या जुन्या दफ्तरांत हि सांपडलीं होती. ह्या तिहींची तुलना करून हे श्लोक येथें दिले आहेत.

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया
श्रीमच्छत्रपते : शिवस्य नृपतेः सिंहासने तिष्ठतः ।
शाके षण्णव[1]-बाण-भुमिगणनादानन्दसंवत्सरे
ज्योती राजमुहूर्त कीर्तिमहिते शुक्लेश सार्पे तिथौ ॥ १ ॥
वापी-कूप-तडाग-राजि-रुचिरं रम्यं वनं वीतिकौ
स्तंभैः कुंभिगृहे नरेंद्र सदनैरभ्रंलिहै मीहिते[2] ( ? )
श्रीमद्रायगिरौ गिरामाविषये हीराजिना[3] निर्मिते
यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंभते[4] ॥ २ ॥

३. शिवाजीच्या शिक्क्यावर श्लोक होता तो येणें प्रमाणें:—

---

१ षण्णवबाण भूमि गणना= १५९६.

२ 'सदने रम्यं लिहै रीहिते' असें मूळांत आहे.

३ 'हिराजी' हा ह्या कामावरील मेस्त्री असें होतें.

४ समुज्जृंभताम् ?

देऊन मिळतील. राजाराम धाकटा म्हणोन याजकडे लष्कर येणार नाहीं सरकारकून राजारामाचा पक्षपात करून उभयतां बंधूस राज्य वांटून दोन राज्यें करूं म्हणतील. शेवट लष्करचे मराठे कारकुनाचे विचारांत येणार नाहींत. शेवट अवघे सर कारकुनांसि विश्वास देऊन धरतील. संभाजी राजे हे आपले वेळचे थोरथोर ब्राम्हण यांस मारील. ब्राम्हणहत्या करील. पुढें मराठे यांस लष्करचे सरदारांसही मारील, धरील, इजत घेईल. लहान माणसें, गुलाम, यांचा घगडा पडेल. आणि थोर लोकांची चाल मोडील. संभाजी कैफ खाईल. गांज्या ओढील. इषकबाजी करील. गडकोट-देशामध्यें अनहिक होईल. राजा परामृष करणार नाहीं. द्रव्य खजीना सर्व उडवील. सर्व राज्य गमाविल. संभाजीचे गुण ऐकून औरंगजेब दिल्लीहून चालून येईल. भागानगर विजापूर मोंगल घेईल. हें राज्यही घेतील. आणि संभाजी शेवट दगा खाईल. जे गति मलिक अंबर निजामशाहा त्याचा पुत्र फत्तेखान मलिका माघारा जाहला, आणि पातशाही बुडविली, तैशीच संभाजी राजा करील. मग राजाराम राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील. हीं पुत्रांचीं लक्षणें. आतां कारकुनांमध्यें माझे वेळचे थोरले कारकून यांस तो संभाजी वांचूं-देणार नाहीं. त्या पैकीं एक प्रल्हादपंत निराजीपंताचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंताचे पुत्र हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. निळोपंत प्रधानाचा पुत्र हाही नांव धरील. या वेगळे कोणी होणार होतील. मराठ्यांमध्यें बहुतेक संभाजी मोडील. उरल्या पैकीं संताजीघोरपडे व बहिरजीघोरपडे व धनाजी जाधव हे जरि वाचले तरि हे तिघे मोठे पराक्रम करतील मोडिलें राज्य हे तिघे ब्राम्हण व तिघे मराठे सांवरतील." असें बोलले. येणें प्रमाणें राजे बोलिले. सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक श्रवूं लागलें. परम दुःख झालें. त्या उपरी राजे बोलिले कीं, "तुम्ही चुकूर होऊं नका. हा तो मृत्यु लोकच आहे. या मागें किती उत्पन्न झाले तितके गेले. आतां तुम्ही निर्मळ सुखरूप बुद्धीनें असणें. आतां अवघे बाहेर बैसा. आपण श्रीचें स्मरण करतों" म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्री भागीरथीचे उदक आणून स्नान केलें. भस्म धारण करून रुद्राक्ष धारण केलें.

---

८७ 'अनाहक' 'अन्याय होतील' पाठांतरें.

८८ मलिकंबर याणें मोंगलांपासून पुष्कळ वर्षे अहंमदनगरचें राज्य बचाविलें. (१५९९-१६२६) पुढें त्याचा मुलगा फत्तेखान यानें आपल्या राजास मारून तें राज्य मोंगलांचे स्वाधीन केलें. (१६३७).

८९ हे तिघे ब्राह्मण व तिघे मराठे राजारामाचे वेळीं प्रमुख होते, हें सुप्रसिद्ध आहे.

आणि योगाभ्यास करून आत्मा ब्रम्हांडास नेऊन दशद्वारें फोडून प्राण प्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १९ रविवारीं दोन प्रहरीं काळ रायगडीं झाला. त्या नंतर शिवदूत विमान घेऊन आले. आणि विमानीं बैसून कैलासास गेले. हें जड शरीर मृत्युलोकीं त्याग केला.

राजियाचें देहावसान झालें. ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून झाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्री शंभुमहादेवीं तळ्याचें उदक रक्तांवर झालें. पाण्यांतील मच्छ बाहेर पडून अमासवणी [ ? ] उदक जाहलें. ऐशीं अरिष्टें जाहलीं. मग राजियाचे कलेवर चंदनकाष्ठें व बेलकाष्ठें आणून दग्ध केलें. स्त्रिया राजपत्न्या कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं धाकटा पुत्र **राजाराम** यांनीं क्रिया करावी. सर्वांनीं खेद केला. **राजाराम** यांनीं अत्यंत शोक केला. त्या नंतर उत्तरकार्य कनिष्ठांनीं करावें असें सिद्ध केलें. वडील पुत्र **संभाजी** राजे वेळेस नाहींत. याजकरितां धाकट्यांनीं क्रिया केली. ऐसें राजियांचें चरित्र आख्यान उत्पन्न काळा पासून देहावसाना पर्यंत जाहलें.

राजा साक्षात् केवळ आवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदापासून **रामेश्वर**पर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. अदलशाई, कुतुबशाई, **निजामशाई, मोंगलाई** ह्या चारी पातशाहा व समुद्रांतील बेवीस पातशाहा असे जेर जप्तकरून नवेंच राज्य साधून मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपती जाहला. प्रतिइच्छा[११] मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहला नाहीं; पुढेंही होणार नाहीं. असें वर्तमान महाराजांचें जाहलें, कळलें पाहिजे.

चरित्र पुण्यश्लोक राजियाचे जे घरीं लिहून ठेवतील त्याच्या भाग्यास पारावार नाहीं. व जे वाचतील त्यास मोठें पुण्य जोडेल. निपुत्रियास पुत्र होतील व दरिद्रि यास लक्ष्मीवंत होतील व अपेशी यास यशवंत होतील. व पुण्यश्लोक पराक्रमी होतील. जे पुत्रवंत असतील त्यास ही पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणें प्रमाणें सर्वमनोरथ पूर्ण होतील. बरें समजणें. ही बखर संपूर्ण जाहली. चैत्रशुद्ध प्रतिपदा ते

---

१० ही मिती महाड प्रतींत मात्र आहे.

११ इच्छेस येईल त्यावेळीं देहावसान करण्याचा वर मागें भोग्मास होता.

देऊन मिळतील. राजाराम धाकटा म्हणोन याजकडे लष्कर येणार नाहीं सरकारकून राजारामाचा पक्षपात करून उभयतां बंधूंस राज्य वांटून दोन राज्यें करूं म्हणतील. शेवट लष्करचे मराठे कारकुनाचे विचारांत येणार नाहींत. शेवट अवघे सर कारकुनांसि विश्वास देऊन धरतील. संभाजी राजे हे आपले वेळचे थोरथोर ब्राम्हण यांस मारील. ब्राम्हणहत्या करील. पुढें मराठे यांस लष्करचे सरदारांसही मारील, धरील, इजत घेईल. लहान माणसें, गुलाम, यांचा पगडा पडेल. आणि थोर लोकांची चाल मोडील. संभाजी कैफ खाईल. गांज्या ओढील. इषकबाजी करील. गडकोट-देशामध्यें अनाहँक होईल. राजा परामृष करणार नाहीं. द्रव्य खजीना सर्व उडवील. सर्व राज्य गमाविल. संभाजीचे गुण ऐकून औरंगजेब दिल्लीहून चालून येईल. भागानगर विजापूर मोंगल घेईल. हें राज्यही घेतील. आणि संभाजी शेवट दगा खाईल. जे गति मलिक अंबर निजामशाहा त्याचा पुत्र फत्तेखान मलिका माघारा जाहला, आणि पातशाही बुडविली, तैशीच संभाजी राजा करील. मग राजाराम राज्य करूं लागेल. तेव्हां गमाविलें राज्य साधील. मजपेक्षां पराक्रम विशेष करील. हीं पुत्रांचीं लक्षणें. आतां कारकुनांमध्यें माझे वेळचे थोरले कारकून यांस तो संभाजी वाचूं-देणार नाहीं. त्या पैकीं एक प्रल्हादपंत निराजीपंताचे पुत्र व रामचंद्रपंत निळोपंताचे पुत्र हे दोघे ब्राह्मण पराक्रमी होतील. निळोपंत प्रधानाचा पुत्र हाही नांव धरील. या वेगळे कोणी होणार होतील. मराठ्यांमध्यें बहुतेक संभाजी मोडील. उरल्या पैकीं संताजीघोरपडे व बहिरजीघोरपडे व धनाजी जाधव हे जरि वाचले तरि हे तिघे मोठे पराक्रम करतील मोडिलें राज्य हे तिघे ब्राम्हण व तिघे मराठे सांवरतील." असें बोलले. येणें प्रमाणें राजे बोलिले. सर्वांचे कंठ दाटून नेत्रांपासून उदक श्रवूं लागलें. परम दुःख झालें. त्या उपरी राजे बोलिले कीं, "तुम्ही चुकूर होऊं नका. हा तो मृत्यु लोकच आहे. या मागें किती उत्पन्न झाले तितके गेले. आतां तुम्ही निर्मळ सुखरूप बुद्धीनें असणें. आतां अवघे बाहेर बैसा. आपण श्रीचें स्मरण करतों" म्हणोन अवघियांस बाहेर बसविलें. आणि राजियांनीं श्री भागीरथीचे उदक आणून स्नान केलें. भस्म धारण करून रुद्राक्ष धारण केलें.

---

८७ 'अनाहक' 'अन्याय होतील' पाठांतरें.

८८ मलिकंबर याणें मोंगलांपासून पुष्कळ वर्षें अहंमदनगरचें राज्य बचाविलें. (१५९९-१६२६) पुढें त्याचा मुलगा फत्तेखान यानें आपल्या राजास मारून तें राज्य मोंगलांचे स्वाधीन केलें. (१६३७).

८९ हे तिघे ब्राह्मण व तिघे मराठे राजारामाचे वेळीं प्रमुख होते, हें सुप्रसिद्ध आहे.

आणि योगाभ्यास करून आत्मा ब्रम्हांडास नेऊन दशद्वारें फोडून प्राणप्रयाण केलें. शालिवाहन शके १६०२ रौद्रनाम संवत्सरे चैत्र शुद्ध १५ रविवारीं दोन प्रहरीं काळ रायगडीं झाला.[10] त्या नंतर शिवदूत विमान घेऊन आले. आणि विमानीं बैसून कैलासास गेले. हें जड शरीर मृत्युलोकीं त्याग केला.

राजियाचें देहावसान झालें. ते दिवशीं पृथ्वीकंप जाहाला. गगनीं धूमकेत उदेला. उल्कापात आकाशाहून झाला. रात्रीं जोड इंद्रधनुष्यें निघालीं. अष्टदिशा दिग्दाह होऊन गेल्या. श्री शंभुमहादेवीं तळ्याचें उदक रक्तांवर झालें. पाण्यांतील मच्छ बाहेर पडून अमासवणी [ ? ] उदक जाहलें. ऐशीं अरिष्टें जाहलीं. मग राजियाचे कलेवर चंदनकाष्ठें व बेलकाष्ठें आणून दग्ध केलें. स्त्रिया राजपत्न्या कारकून व हुजरे सर्व लोकांनीं सांगितलें कीं धाकटा पुत्र **राजाराम** यांनीं क्रिया करावी. सर्वांनीं खेद केला. **राजाराम** यांनीं अत्यंत शोक केला. त्या नंतर उत्तरकार्य कनिष्ठांनीं करावें असें सिद्ध केलें. वडील पुत्र **संभाजी** राजे वेळेस नाहींत. याजकरितां धाकट्यांनीं क्रिया केली. ऐसें राजियांचें चरित्र आख्यान उत्पन्न काळा पासून देहावसाना पर्यंत जाहलें.

राजा साक्षात् केवळ आवतारीच जन्मास येऊन पराक्रम केला. नर्मदापासून **रामेश्वर**पर्यंत द्वाही फिरली. देश काबीज केला. **अदलशाई, कुतुबशाई, निजामशाई, मोंगलाई** ह्या चारी पातशाहा व समुद्रांतील बेवीस पातशाहा असे जेर जप्तकरून नवेंच राज्य साधून मराठा पातशाहा सिंहासनाधीश छत्रपती जाहला. प्रतिइच्छा[11] मरण पावून कैलासास गेला. ये जातीचा कोणी मागें जाहला नाहीं; पुढेंही होणार नाहीं. असें वर्तमान महाराजांचें जाहलें, कळलें पाहिजे.

चरित्र पुण्यश्लोक राजियाचें जे घरीं लिहून ठेवतील त्याच्या भाग्यास पारावार नाहीं. व जे वाचतील त्यास मोठें पुण्य जोडेल. निपुत्रियास पुत्र होतील व दारिद्रियास लक्ष्मीवंत होतील व अपेशी यास यशवंत होतील. व पुण्यश्लोक पराक्रमी होतील. जे पुत्रवंत असतील त्यास ही पुत्र होतील. जे लक्ष्मीवंत असतील ते विशेष भाग्यवंत होतील. यशस्वी असतील ते दिग्विजयी होतील. येणें प्रमाणें सर्वमनोरथ पूर्ण होतील. बरें समजणें. ही बखर संपूर्ण जाहली. चैत्रशुद्ध प्रतिपदा ते

---

१० ही मिती महाड प्रतींत मात्र आहे.

११ इच्छेस येईल त्यावेळीं देहावसान करण्याचा वर मागें भीष्मास होता.

दिवशीं वर्णन समाप्त झालें[१२]. ईश्वर संवत्सर-मुक्काम चंदी शालिवाहन शके[१३] १६१६ [ त ] जाहली कळले पाहिजे. बहुत काय लिहिणें हे विनंती.

## उपसंहार.

कोल्हापुरास असलेली बखर मिळविण्याविषयींचा आमचा प्रयत्न सफळ झाला नाहीं. तथापि तिजविषयीं थोडी माहिती मिळाली ती अशी.

" श्रीमन्महाराजआदिअनादिप्रगल्भपरंतपश्रीजगत्कारपाय शेवेशीं विनंति शेवक कृष्णाजी अनंत सभासद समस्त राजमंडळ द्वयकर जोडून कृतानेक विज्ञापना " असा कोल्हापूर येथील बखरीचा प्रारंभ आहे.

हींत मध्यंतरीं बालबोध लिहिलेलीं अफजूलखानास वाघनखानें मारलें वगैरे त्यासमयाचीं पदें वगैरे आहेत.

**बखरीची अखेर** :—शिवाजीचामृत्यु, त्यावेळेचें यथासांगवर्णन. व त्या वेळेचीं दुश्चिन्हें यांचें वर्णन उदाहरणार्थ:—तळें आटलें. आंबाबाईचे नाकांतील मोतें गळून पडलें. सूर्य काळा झाला. चंद्रास खळें पडलें इ०.

### अखेर फलश्रुति.

" निपुत्रिकास पुत्र होतील. निर्धनासि धन. रोगी प्राण्यांचे रोग परिहार होतील. शत्रु किंकर होतील. पुत्रपौत्र वंशपरंपरेनें सुखरूप असतील—हें शिवाख्यान अनंत पुत्र कृष्ण यानें केलें. पुढें चंदीमध्यें ईश्वर-नामसंवत्सर चैत्र शुद्ध १ तद्दिनीं बखर महाराजांची समाप्त झाली. गत-शालिवाहन शके १६१६ सोळाशें सोळा अनंत कृष्णाजीनीं निर्मिली. "

यापुढें हकीगत आहे ती बखर उतरून घेणाराची दिसते. " तदनंतर या बखरीचा भावगर्भचित्तांतसंपूर्णमनन रघुनाथ यादव चित्रगुप्त दिमत राजमंदीर परंपरागत महाराजांचे कारकीर्दीचे सेवक. वडील वडिलांनीं सेवा करून महत्पदें संपादिलीं व हल्लीं श्रीमन्महाराज राजश्री राजाराम छत्रपती व थोरले महाराजांचे पुत्र श्रीमन्महाराज राजश्री संभाजीराजेछत्रपती यां-

---

१२. 'ते दिवशीं राजा कैलासवासी झाला' असें प्रतापगड प्रतींत आहे. तें चुकीचें आहे.

१३. सर्व प्रतींत ईश्वर संवत्सर व १६१६ शक असेंच आहे.

संनिध साहेब कामावरि आमचे चुलतआजे काकाजीबावा प्रभु विनापराधें धेरले संभाजी महाराजांनीं स्वहस्तें मारिले व आमचे बाप साहेब कामावरि पडले शेवक बारा तेरा वर्षांपासून श्रीमन्महाराज राजारामपुत्र धाकटे श्रीमन्महाराज राजश्री जिजाकांतशंभुछत्रपतींची त्रिकर्णचित्तें चिटणिशी सेवा केली. ती चाळीस वर्षें. महाराज निजधामास गेले. तन्मुळें शेवकास आश्रय नाहीं. अन्नाकरितां दारोदार भणंगगतीनें लागलों. देशांतरास गेलों. भ्रमत भ्रमत तारगलास अप्रसिखा घडली ह्मणोन चिकोडीस आलियावरी राजश्री यशवंतराव शिंदे सुभेदार श्रीमन्महाराज मातुश्री जिजाबाईसाहेब यत्वीपारिपरमतुज्ञ शौर्यकर्मैं बुद्धीसागर यशश्वी प्रतापनिधी विद्यावंताचे त्राण करुणासमुद्र सहिष्णशांतश्वांतनितांत धुरीणमहत्कार्य कर्ते महाराज मातुश्री आई साहेबांचे नावांजीस एकवचनीं अनृत्य स्वप्नींही जाणत नाहीं. तेव्हां जागृतींत होणार कोठील ? एक महाराजांचे राज्यांत माहराकृत कामें संपादिलीं महाराजांमागें राज्यसंरक्षणा केली त्यानें आमचे बहुताप्रकारें समाधान करून अन्नोदकाकरितां''—इतकें अर्धेच वाक्य आहे.

२. शिवाजीस रायगडीं ज्या प्रासादांत राज्याभिषेक झाला त्या प्रासादाच्या एका सुमारें १॥ हात लांबीच्या व १। हात रुंदीच्या चिऱ्यावर खालीं दिलेले दोन श्लोक लिहिलेले आहेत. हे आह्मांकडे आमच्या दोन महाडकर मित्रांनीं पाठविले. त्यांची एक प्रत आम्हांस एकया जुन्या दफ्तरांत ही सांपडली होती. ह्या तिहींची तुलना करून हे श्लोक येथें दिले आहेत.

प्रासादो जगदीश्वरस्य जगतामानन्ददोऽनुज्ञया
श्रीमच्छत्रपते : शिवस्य नृपतेः सिंहासने तिष्ठतः ।
शाके षण्णव[1]-बाण-भुमिगणनादानन्दसंवत्सरे
ज्योती राजमुहूर्त कीर्तिमहिते शुक्लेश सार्पे तिथौ ॥ १ ॥
वापी-कूप-तडाग-राजि-रुचिरं रम्यं वनं वीतिकौ
स्तंभैः कुंभिगृहे नरेंद्र सदनै[2]रभ्रंलिहै मीहिते ( ? )
श्रीमद्रायगिरौ गिरामविषये हीरा[3]जिना निर्मिते
यावच्चन्द्रदिवाकरौ विलसतस्तावत्समुज्जृंभते[4] ॥ २ ॥

३. शिवाजीच्या शिक्कयावर श्लोक होता तो येणें प्रमाणें:—

---

१ षण्णवबाण भूमि गणना= १५९६.

२ 'सदने रम्यं लिहै रोहिते' असें मूळांत आहे.

३ 'हिराजी' हा ह्या कामावरील मेस्त्री असें होतें.

४ समुज्जृंभताम् ?

॥ राजमुद्रा ॥

॥ प्रतिपच्चन्द्ररेखेव वर्धिष्णोर्विश्ववंदिता
शाहासुतस्य मुद्रेयं शिवराजस्य राजते ॥

१. कृष्णाजी अनंत हा या ग्रंथाचा कर्ता. याजविषयीं हकीगत कोल्हापुरास मिळते तीः–

नारो कृष्ण सभासद हल्लीं येथील (कोल्हापुरीं) सरकारवाड्यांत खाजगी कडील कारकून आहेत. यांच्या वडिलांचे पणजे त्रिंबक सदाशिव सभासद हे करवीर सरकारच्या राज्यांत, हें राज्य स्थापिलें त्यावेळींच आले, त्यास आजमासें २०० वर्षें होत आलीं. यांचे पूर्वज सताऱ्या नजीक वसंतगड आहे तेथें राहत असत. हल्लीं कांहीं वंशज हिंदुस्थांत ही आहेत. सभासद हे इकडे आल्यापासून त्यांनीं ह्या राज्यांत मोठमोठीं कामें केलीं. चिटणिशीकडील व कोठीकडील कामें पूर्वीं यांजकडेच होतीं. बखरीचे कर्ते कृष्णाजी अनंत याविषयीं नारोपंत यांस विशेष माहिती नाहीं. अर्थात् कोल्हापुरास गादी स्थापन होण्याच्या पूर्वीं कृष्णाजीपंत होऊन गेले. तेव्हां जो पुरुष कोल्हापुरास ताराबाई बरोबर गेला त्याच्या वंशजांस कृष्णाजीपंताबद्दल विशेष माहिती असण्याचा फारसा संभव नाहींच. नारोपंतांकडील बखरही साताऱ्याहून पारसनीस यांजकडून आणविली असें पंत ह्मणतात. ह्याज पलीकडे ह्या चरित्रकाराची माहिती मिळत नाहीं. तथापि शोधाअंतीं ही माहिती कदाचित् मिळेल अशी आशा आहे.

समाप्त.

---

५ "शहासुत शिवस्येयम्" पाठांतर.

१९. कोठें मेजवानी व हळदकुंकास वगैरे जाणें असल्यास आजीबाई-साहेबांस व सरकारांस पुसून जावें ; किंवा आजीबाईसाहेबांकडील आज्ञा आल्यास सरकारचे कानावर टाकून जावें. फक्त.

२०. लेंकूरपणाचा स्वभाव टाकून बुरदबारी[२४] आंगीं ठेवावी. बेजोंहा[२५] हांसूं नये व धांवूं नये. फक्त.

२१. आजीबाईसाहेबांची खबर फुरसतींत असल्याची रमाबाई व येशवंतराव[२६] व सदाशिव[२६] या त्रिवर्गांत जो हजर राहील त्यांनीं बोलावून बाई-साहेबांस दररोज एकवेळ शिवाय मामुलाचे समागमें जाऊन आजीबाई-साहेबांजवळ बसून जें भाषण करतील तें श्रवण करून त्या गोष्टी लक्षांत ठेवणें जरूर आहे. फक्त.

२२. सरकार असल्यास रमाबाईनें आपले खोलींत अगर कोठेंही रहावें. बाद सरकार गेल्यावर रमाबाईनें आपला बिछाना बंदोबस्त पलंगाजवळ करून निद्रा करावी व सरकार ज्या दिवशीं नसल्यास, दरोबस्त राहणें जरूर असे. फक्त.

२३. बाईसाहेबांनीं सरकार मुदबखखान्यांत जाऊन पांडे व मुदबाखी बापू भोंसला वगैरे यांसि पुसावें कीं आज पाकनिष्पत्ति तयार काय झाली याची तकरार[२७] हमेषा करावी. फक्त.

२४. सरकारांशीं बाईसाहेबांनीं दररोज दिवसा उदया पासून अस्तमान पावेतों सरकारचे व आपले दोन घटका फुरसत पाहून खिलवत[२८] जरूर करावी. फक्त.

२५. सरकारांनीं सौभाग्यवती बाईसाहेबांस जहर[२९] खाणें अथवा अमृत प्राशन करणें किंवा विहिरींत उडी टाकणें असा हुकूम केल्यास निःसंशय अनमान न करितां आज्ञावंदन करणें जरूर, परंतु सरकार हुकूम करतील ते समजूनच करतील. फक्त.

२६. प्रातःकाळीं उठून शौचमुखमार्जन नंतर स्नान, देवपूजा पोषाखी-लुगडें व पोषाखीदागिने कुंकू वगैरे इत्यादि यांची त्वरा करावी, या कामास सुस्ती व ढील न करावी. फक्त.

२७. देवपूजेकडे ब्राह्मण व पुराणिक व देवपुजारी आदीकरून मुक्रर होऊन हालबंदोबस्त करण्यांत आला. दस्तुरामाफक सहा घटका अगर

२४. प्रौढता.
२५. वेळ स्थळ न पाहतां.
२६. हे बहुधा हुजरे असावेत.
२७. चौकशी, पूसपास.
२८. भेट, बोलणें चालणें.
२९. विष.

सात घटका दिवसांचे पोटांत पूजा व पुराण नित्यनेमित्य दान व धर्म वगैरे इत्यादिक होऊन फरागत होणें जरूर आहे. पैकीं इसम बितपशील.

२. पुराणिक असामी

१. आबा पुराणिक. १. रामाचार्य पुराणिक.

२

४. पुजारी असामी चार.

१. लक्ष्मण भट. १. जयरामभट.

१. बापुभट. १. कृष्णाबापु.

४

२. गुजराती असामी दोन.

१. तुळाराम. १. जागु पोर.

२. तुळशीफुलांचे कामावर व ब्राह्मणांचें शिधे सरंजाम वगैरेची तजवीज ठेवणें.

१. चिमणा व मदतीस. गणू पोर.

१०

२८. जामदारखान्याकडे[30] दरोबस्त आमला[31] वगैरे मुकरर होऊन हाल बंदोबस्त करण्यांत आला. इसम बितपशील. १. पैकाजीपंत यानीं जितकें काम आहे याची देखरेख व ज्याहवेज्याहचा बंदोबस्त ठेवावा व कामाचा रपोट यांनीं हमेषा दररोज प्रातःकाळीं घेत जावा; जें काम ज्याकडे नेमलें आहे त्याकामाची हरकत झाल्यास त्याचा इतला सरकारास करून मुनासब सजा करणें जरूर आहे. जामदारखान्याकडे दरोबस्त आमला वगैरे ३ मुत्सदी मंडळी तीन यांनीं आपले कामीं जें काम नेमून दिलें आहे तें करावें. दुसरे कामाशीं व सल्लामसलतीशीं जरूर नाहीं. दुसरें काम करणें जरूर असल्यास सरकार हुकूम करतील तें करावें इसम बितपशील.

१ गजानन अवधूतराव १ वामनाजी शंकर हळदे १ जागेश्वर भवानी

३

कुळंच भोंसला यांणीं जामदारखान्याची चांगली हुषारी ठेवावी. कोणाचीही वस्तूचें नुकसान झाल्यास, अथवा चोरी गेल्यास, जबाबदेहीं घेऊन मुनासब सजा करणें ती करण्यांत येईल. बाकी पोषाखीकापड व डागीना वगैरे दस्तुरामाफक हमेषा देणें जरूर आहे.

५ फरास इसम पांच पैकीं इसम बितपशील.

१ श्रावण फरास यांनीं चवघाही फरासांचा बंदोबस्त ठेवावा. जी, चीज

---

३०. हा दर्याबाईचा खास जामदारखाना. | ३१ कामगार.

पडदे वगैरे इराजिन्सा मशारनिल्हेचे[32] झुपुर्द आहे त्याचे नुकसान अथवा चोरी गेली असें समजल्यास मुनासब जाणून सजा करण्यांत येईल.

४. इसमचार या लोकांनीं **श्रावण** फरासाची मदतगारी ठेवावी व सरकार कामाविषयीं जो हुकूम करील त्याची बेआदली न करितां कामाची निकाशी करीत जावी. जामदारखान्याकडील फरास इसम पांच. फरासें इसम चार पैकीं तपसील.

**१ त्रिंबकजी, १ भिकू, १ आलिबेग, १ फाजल.**

४

५

१०

२९. वें, मुदबाखखान्याकडे माणसें बायका वगैरे मुकरर करून फिल्हाल बंदोबस्त करण्यांत आला. इसम बितपसील.

१. **रमाबाईनें** ज्यावेळेस सौभाग्यवती बाईसाहेब; न्याहारी व भोजन वगैरे करतील त्यावेळेस जवळ बसून माशा वाराव्यात व ताट वाढवावें व मुदबाखखान्याची देखरेख स्वयंपाक तयार झाला किंवा नाहीं ही तजवीज ठेऊन हमेषा दस्तुरा माफक करीत जावें.

३. पाकनिष्पात्ति व दस्तूर हमेषा जेवेळचे तेवेळेस होणें जरूर; इसमबीतपसील. १ देविदीन पांडे १ सटवा १ रखमागरत

२. कामाठी असामी दोन या लोकांनीं सरंजाम लांकूड भांडीं वगैरे दस्तुराप्रमाणें करण्याचें तें करणें.

३०. पाण्यावर गुजराथी वगैरे माणसें नेमून दिलीं तीं हरवख्त हाजर राहून आपले बारिप्रमाणें आपली गैर हाजिरी न होतां काम करीत जाणें.

२ सुरईवर आसामी दोन जगन्नाथ व हरीराम. १ विहीरीचे पाण्याकरितां **मनसाराम.**

३

३१. छोळण्यावर जे बारिदार नेमले आहेत त्यांनीं हरवख्त आपले बारीवर हाजर राहून काम करीत जावें, पैकीं तपशील इसम.

२ खास छोळण्यावर.

१ मल्हारी जुना यानें विड्याचीं पानें वगैरे जो दस्तुर चालत

---

३२. स्वाधीन, ताब्यांत.

आला, त्या बमूजिब बंदोबस्त ठेवावा व जे बारिदार लिहिले आहेत त्यांचे हातीं काम घेत जाणें.

१ मल्हारी चव्हाण.

---

२

२ पानाकडे असामी देववा व रामा.

२ फालतु असामी दोन झोळणा वगैरे चवरी हरएक काम पडल्यास यांनीं करीत जावें. १ बाजल्या कृष्णा.

---

६

३२. दवाखान्यावर अंतु बारिदार वगैरे असामी दोन मुकरर केले आहेत. त्यांचा बंदोबस्त दुरुस्त ठेवणें जरूर.

१. अंतु बारिदार यानें औषधें वगैरेची तजवीज ठेवावी. रात्रौ घरास जाणें असल्यास इतला करून जावें व बहिणाजी बारिदार रात्रौ ऐवजीं ठेवणें या तजविजींत हरकत झाल्यास अंतु जवळून जबाब घेण्यांत येईल.

१. बहिणाजी बारिदार यानीं दरोबस्त अंतूची मदतगारी ठेवावी. दोघे मिळून काम आज्याम द्यावें.

३३. बाळाजी बारिदार याजकडे शिलेखानाचे दागिने पोषाखावर देणें व चांदीचे भांडें, कुंकू, दातवण, टिकल्या वगैरे इत्यादि यांची तजवीज ठेवून हाजर बाशींत रहावें. रात्रौ घरास जाणें असल्यास, कुलंच भोंसला याला पुसून जावें. म्हणजे पोषाखांचा बंदोबस्त कुलंच ठेविल व सौभाग्यवती बाईसाहेबांकडील नजणारा येईल तो बाळाजीचे जिम्मेस राहील. त्याचा हिशोब व्यंकटेश रघुनाथ सावंत हा ठेविल. व त्याचा दाखला जामदारखान्याचे इलाख्यांत ठेवणें जरूर मुनासब आहे.

३४. चवरी बारदार याजवर दोघे बारिदार मुकरर केले आहेत. स्वारी कोठें सौभाग्यवती बाईसाहेबांची बाहेर गेल्यास चवरीचें काम करतील. बाकी चाकरी हमेषा झोळणा वगैरे फालतु जो हुकूम अन्वयें येईल तें करावें. फक्त.

१. बापु कवल्या बारिदार.
१. आश्रु बारिदार. } २

३५. हमेषा हजर बाशीवर यशवंतराव व सदाशिव व रमाबाई. सदर्हू सदाशिव व यशवंतराव यानीं सुरई आणून न्याहरी व भोजनाचे वेळेस पाणी पाजावें व एका इसमानें आपले बारीप्रमाणें दरोबस्त रात्रंदिवस हजर बाशीं-

त असावें, दिवसभर उभयतांही रहातील. रात्रीं एकानीं घरास जानें व एकांनीं चाकरीवर रहावें. रमाबाईनें दरोबस्त रहाणें जरूरच आहे. या हुकुमांत हरकत झाल्यास मुनासब समजून हुकूम देण्यांत येईल. फक्त.

३६. भोंसले लोक यांच्या तीन वरच्या [ बाऱ्या ? ] मुकरर होऊन फीलहाल बंदोबस्त आपआपले बारीप्रमाणें करून काम बराबर आजाम द्यावें. इसम बितपशील.

५ अवलबारी रघु भोंसला बितपशील.

१ मशारनिल्हे १ यशवंता १ रामा नागींचा १ कोल्हा १ सखाजी.

५

४ दुय्यमबारी हिरूभोसला.

१ मशारनिल्हे १ रामा क्षिरके १ मारूती १ भोगाजी.

४

५ बारी तिसरी मालवाभोंसले येकटींग मनाजी भोंसले.

१ मनाजी १ गणु १ लक्षुमण भुरा १ कृष्णाजी भोंसले १ लक्ष्मण पारीचा.

५

१४

सदहू प्रमाणें इसमांनीं दिवसां हाजर रहावें. रात्रौ आपआपले दस्तुरानीं जशी बारी येईल त्या बारी प्रमाणें पाहारा चवकी वगैरे करीत जाणें. व कोणास घरीं काम असल्यास आपले बारीवाल्यास इतला करून घरास जावें; बेइतल्यानें घरास गेल्यास दरमाहा अगरचे शेर एक महिन्याचा जप्त होईल.

३७. बारी करणी फिलहालबारी मुकररकरून बंदोबस्त करण्यांत आला त्याप्रमाणें आपापले बारीवर हजर राहून काम आजांम द्यावें. कांहीं हरकत दिसून आल्यास सजा मुनासब पाहून करण्यांत येईल.

इसमनविशी बितपशील.

१० अवलबारी हवशी

१ मशारनिल्हे १ पारु १ साविञि १ चिमी १ गंगा १ रेणुकी १ जनी किल्लेवाली १ कृष्णी १ विठी १ केतकी.

१०

१० दुयमबारी मंजी.

१ मशारनिल्हे १ मोहनी १ गुनाई १ अीबाई १ गवरी

आला, त्या बमूजिब बंदोबस्त ठेवावा व जे बारीदार लिहिले आहेत त्यांचे हातीं काम घेत जाणें.

१ मल्हारी चव्हाण.

२

२ पानाकडे असामी देवबा व रामा.

२ फालतु असामी दोन झोळणा वगैरे चवरी हरएक काम पडल्यास यांनीं करीत जावें. १ जानबा कृष्ण.

६

३२. दवाखान्यावर अंतु बारीदार वगैरे असामी दोन मुकरर केले आहेत. त्यांचा बंदोबस्त दुरुस्त ठेवणें जरूर.

१. अंतु बारीदार यानें औषधें वगैरेची तजवीज ठेवावी. रात्रौ घरास जाणें असल्यास इतला करून जावें व बहिणाजी बारीदार रात्रौ ऐवजीं ठेवणें या तजविजींत हरकत झाल्यास अंतु जवळून जबाब घेण्यांत येईल.

१. बहिणाजी बारीदार यानीं दरोबस्त अंतूची मदतगारी ठेवावी. दोघे मिळून काम आज्याम द्यावें.

३३. बाळाजी बारीदार याजकडे शिलेखानाचे दागिने पोषाखावर देणें व चांदीचें भांडें, कुंकू, दातवण, टिकल्या वगैरे इत्यादि यांची तजवीज ठेवून हाजर बाशींत रहावें. रात्रौ घरास जाणें असल्यास, कुलंच भोंसला याला पुसून जावें. म्हणजे पोषाखांचा बंदोबस्त कुलंच ठेविल व सौभाग्यवती बाईसाहेबांकडील नजणारा येईल तो बाळाजीचे जिम्मेस राहील. त्याचा हिशोब व्यंकटेश रघुनाथ सावंत हा ठेविल. व त्याचा दाखला जामदारखान्याचे इलाख्यांत ठेवणें जरूर मुनासब आहे.

३४. चवरी बारदार याजवर दोघे बारीदार मुकरर केले आहेत. स्वारी कोठें सौभाग्यवती बाईसाहेबांची बाहेर गेल्यास चवरीचें काम करतील. बाकी चाकरी हमेषा झोळणा वगैरे फालतु जो हुकूम अन्वयें येईल तें करावें. फक्त.

१. बापु कवल्या बारीदार. } २
१. आश्रु बारीदार. }

३५. हमेषा हजर बाशीवर यशवंतराव व सदाशिव व रमाबाई. सदर्हू सदाशिव व यशवंतराव यानीं सुरई आणून न्याहरी व भोजनाचे वेळेस पाणी पाजावें व एका इसमानें आपले बारीप्रमाणें दरोबस्त रात्रंदिवस हाजर बाशीं-

त असावें, दिवसभर उभयतांही रहातील. रात्रौ एकानीं घरास जावें व एकांनीं चाकरीवर रहावें. रमाबाईनें दरोबस्त रहाणें जरूरच आहे. या हुकुमांत हरकत झाल्यास मुनासब समजून हुकूम देण्यांत येईल. फक्त.

३६. भोंसले लोक यांच्या तीन बरच्या [ बाऱ्या ? ] मुकरर होऊन फीलहाल बंदोबस्त आपआपले बारीप्रमाणें करून काम बराबर आजाम द्यावें. इसम बितपशील.

५ अवलबारी रघु भोंसला बितपशील.

१ मशारनिल्हे १ यशवंता १ रामा नागींचा १ कोल्ह्या १ सखाजी.

५

४ दुय्यमबारी हिरूभोंसला.

१ मशारनिल्हे १ रामा शिरके १ मारूती १ भगाजी.

४

५ बारी तिसरी मालबाभोंसले येकटींग मनाजी भोंसले.

१ मनाजी १ गणु १ लक्षुमण भुरा १ कृष्णाजी भोंसले १ लक्ष्मण पारीचा.

५

१४

सदर्हू प्रमाणें इसमांनीं दिवसां हाजर रहावें. रात्रौ आपआपले दस्तुरानीं जशी बारी येईल त्या बारी प्रमाणें पाहारा चवकी वगैरे करीत जाणें. व कोणास घरीं काम असल्यास आपले बारीवाल्यास इतला करून घरास जावें; बेइतल्यानें घरास गेल्यास दरमाहा अगरचे शेर एक महिन्याचा जप्त होईल.

३७. बारी करणी फिलहालबारी मुकररकरून बंदोबस्त करण्यांत आला त्याप्रमाणें आपापले बारीवर हजर राहून काम आजांम द्यावें· कांहीं हरकत दिसून आल्यास सजा मुनासब पाहून करण्यांत येईल.

इसमनविशी बितपशील.

१० अवलबारी हवशी

१ मशारनिल्हे १ पारू १ सावित्रि १ चिमी १ गंगा १ रेणुकी १ जनी किल्लेवाली १ कृष्णी १ विठी १ केतकी.

१०

१० दुयमबारी मंजी.

१ मशारनिल्हे १ मोहनी १ गुनाई १ जीवाई १ गवरी

१ राधु १ सगुणी १ नागी १ गजी १ बजी १ पोरगी

१०

९ बारि तियम येशीची

१ मशारनिल्हे १ जैनी १ जैनी नवीन १ वेणू बुद्धी १ मनी

१ गंगी नवीन १ रेवाई १ यमुना १ गजी

९

---

२९

पैकीं तपशील.

१८ बारि पैकीं आसाम्या आठरा.

४ फुटकळ आसामी च्यार.

७ खालच्या आसामी.

---

२९

३८. बकुसुईण इनें नेहमीं हजर रहावें आपलें काम अथवा आणीक कोणाचेंही काम जें येईल तें करावें. फक्त.

३९. काकोजी भोंसला याकडे कोठीचें काम मुकरर होऊन फीलहाल बंदोबस्त करण्यांत आला. शिधा वगैरे सरंजाम ब्राह्मणाची नित्यनेमित्य दानाची दक्षिणा आदीकरून हें काम बरवख्त आज्यांम देऊन ज्यास्ती कमतीचा इतला कामदारास होत असावा. यामध्यें कोणत्याही गोष्टीची तफावत पडल्यास मुनासब हुकूम देण्यांत येईल.

४०. आबदागिरे इसम दोन. दस्तुरा प्रमाणें त्यांनीं आपलें काम आज्यांम द्यावें इसमनवीशी १ रामा बोराम्या १ राम अवतस्य.

४१. भोई असामी आठ व नाईक दयाराम सदरहु प्रमाणें असामी नऊ. यांनीं आपले बारी प्रमाणें भोईखान्यांत हजर राहून सरकारचाकरी वक्तशीर करीत असावी. चाकरीची हरकत झाल्यास दयाराम नाईक याजपासून जबाब घेण्यांत येईल.

४२. फरासखान याकडे घुल्या फरास असामी दोन. यांनीं हरवख्त बिछाना सतरंजी वगैरे पडदे साफ करून बिछाना करावा व रावजीस इतला द्यावा.

४३. हरदो इलाख्याचे महालीं येकंदरच आहेत. जेवेळेस ज्या इलाख्यांत जसें काम पडेल तसें तें आज्याम देतील.

४४. कमीच्या इंदोऱ्याची, देखरेख परभारें इलाखे गज्याबा नाईक कारकून १ व पैकीं बारिदार येक.

४५. चिमणबाग नवीन तयारी फीलहाल बंदोबस्त करण्यांत आला. याची देखरेख बलासूखखान यांनीं करावी. खानमजकूरचे हाताखालीं दोघे माळी परशराम व झिंगरा माळी या उभयतांचे हातें काम घेऊन दुरस्ती झाड तयार करण्याची चांगली करावी. हरकत झाल्याबद्दल बलासुखापासून जबाब घेण्यांत येईल.

४६. चुकवल्या हर दोचवकांतील असामी आठरा यांनीं आपले आपले कामीं राहून याची देखरेख रमाबाईनें करावी हरकत झाल्यास रमाबाई जवळून जबाब घेण्यांत येईल.

४७. चपराशी लोक यांनीं दरोबस्त चाकरी येईल ती आमलांत आणून कामदारास इतल्ला करीत आसावें. आसामी दोन हुजूर१ मुकुंदाचपराशी इलाके कोतवाली.

४८. भिस्ती महमद यांनीं दरोबस्त हजर राहून काम मामुला प्रमाणें करीतजावें फक्त.

४८

सदरहु कलम बंदीपैकीं कलम आठेताळीस दस्तुगप्रमाणें अमलांत आणूनवहिवाट करावी फक्त.

तारीख चंद्र२१ माहे जिलकाद सन १२५६[३३] साल फसली.

[ १३ ] ॥ श्री ॥

राजश्री जानोजी भोंसले सेनासाहेब सुभा गोसावी यांस .

सकल गुणालंकरण अखंडीत लक्ष्मी अलंकृत राजमान्य

स्नेहांकित रघुनाथ बाजीराव आशीर्वाद विनंती उपरी येथील कुशळ जाणून स्वकीय कुशल लिहीत जावें. विशेष. तुह्मीं पत्र पाठविलें तें प्रविष्ट होऊन लेखनार्थ अवगत झाला. त्यांतील खुलासा मजकूर कैलासवासी नाना साहेबां मागें यवनांच्या मसलतीस आपण येऊन सामील झालां, यवनांचा पराभव झाला. आपली ममता अधिक असावी. तेज पुण्य दृष्टीस पडलीं त्या नंतर बाबूराव फडणवीस व गोपाळराव[१], व पिराजी नाईक, व सदाशीव रामचंद्र व नरशिंगराव आदीकरून प्रतिनिधि यवनांकडेस[२] गेले. सदाशिव यमाजी येऊन आपणांस घेऊन गेले. आठ महिने पर्यंत

३३. सन १८४६.

१ गोपाळराव पटवर्धन रागावून १७६३ सालीं हैदराबादेस गेले.

२ नबाब निजामअल्ली.

ततः प्रकृतिस्थे जगति प्रतिबुद्धेषु सुरासुरेषु परिष्टुवति पद्मविष्टरे पद्मनाभे च । निषेद्धुमनुवर्तितुमप्यपारीणतया निश्चलार्पितदृष्टिषु नंदिमुखेषु पारिषदेष्वंतरेव मंगलमाशासानया सर्वमंगलया समालिंगितो दृढं हालाहलो नाम विषराजोयमाचम्यतेऽस्माभिर्मा बिभीत विज्वरा भवत इति प्रबोध्य पश्यतो जनान्माधवइव नवनीतमुमाधवो गरलमुपयुयुजे । यस्य शिष्यवर्गे वाडवानलो भुजिष्यवर्गे भुजगाविषाणि वनोपवर्गे वज्रानिःपेषो गणनीयएव न गगनमणिः तादृशि कालकूटे तावतीमपि दारुणतामुपसंगृह्य जंबूफलइव जीर्णामलकइव खर्जूरापिंडइव खदिरसारखंडइव विशति निःशंकमाननं विषमलोचनस्य । जठरस्थजगत्प्लोषमाशंकमाना दयामयी भगवती दाक्षायणी पल्लवकोमलेन पाणिना परामर्श कंठपदं ।

निर्मर्यादभवज्वरज्वलनसीदज्जविज्ञावितुन ।
संस्पृष्टं करपल्लवेन जगतां मातुः सुधास्पंदिना ॥

सद्यः शीतलितं भवत्परिणतज्योत्स्नामृतस्यंदवत्
तस्तंभे गरलं गले भगवतश्चंद्रार्धचूडामणेः ॥ ३३ ॥
यच्छैलेषु यदंबुराशिषु यदुद्भिज्जेषु यज्जंतुषु
क्वापि क्वापि हृतस्य तस्य सहसा लेपात्मना शेषितं ॥
तत्सौराष्ट्रिकदारदादिभिधया विख्यातमद्याप्यहो
कीटायापि न मन्यते खगपतिं धन्वंतरिं चाश्विनौ ॥ ३४ ॥
अंतर्निगीर्णमपि तेन तदाविरासीत्
कालोन्मिषत्कुवलयच्छविकंठमूले ॥
आयस्य गुप्तमपि खल्वनृतं कदापि
सद्यः स्फुटीभवति साधुषु निर्मलेषु ॥ ३५ ॥

अथ भगवंतमनायासकवलीकृतकालकूटमाविष्कृतमंदस्मितसुंदरमाश्वस्तया भवान्या मुहुर्मुहुराश्लिष्य परिचुंबंत्या परामृश्यमानकंधरापदमानंदतुंदिलतया किमप्यज्ञातकरणीयैरालिंगद्भिरितरेतरमास्फोटयद्भिरपहसतद्भिरन्यानमरान् गणैरसकृदुपसंगृह्यमाणचरणारविंदमालक्ष्य चंद्रशेखरमानंदनिर्भराः गोविंदाविविपुरंदरादयो देवा बलिविरोचनादयो दानवाश्च ब्रह्मर्षयश्च सनकादयो यथामति स्तोतुमारेभिरे ।

दिष्ट्या विषेण भग्नाः स्मो दिष्ट्या पीतमिदं त्वया ॥
दिष्ट्या च नीलकंठं त्वां गृण्हंती साधिता श्रुतिः ॥ ३६ ॥
पाषाणान्सितपीतरक्तहरितान्वैडूर्यरत्नादिका-
न्कंठे वक्षसि मूर्ध्नि वा निदधतां का नाम तेन स्तुतिः ॥
एतद्भूषण मेतदेव जगतां दुःसाधमुज्जीवितं
कंठे यद्भगवन्नियच्छसि सुखं काकोलमुच्छृंखलं ॥ ३७ ॥
अद्याहं परिपालकोस्मि जगतामद्यैव धातात्मभू-
रद्येमे हरिदीश्वरा भुजबलै रद्योद्भटा दानवाः ॥
अद्येते चिरजीविनो मुनिवरास्तंत्रैश्च मंत्रैरपि
स्वामिन्नाकलयामहे तव यदा कंठं घनश्यामलं ॥ ३८ ॥

कैलासशिखरभूषण तंत्राद्यगोचर चंद्रार्धशेखर शापायुधकुलाध्यक्ष कोपारुणकटाक्ष सस्मितापांग भस्मितानंग ऊरीकृतविभूतिदिव्यांगराग गौरीपरिगृहीतसव्यांगभाग अंगानुषंगपावितनवास्थिलेश गंगातरंगभासितजटाप्रदेश शैलादिकृतनिषेवण वंदनाभिरताखंडल स्यंदनायितभूमंडल अक्रीतदासतापसकदंब चक्रीकृतार्कशीतकरबिंब आदृतपुराणवेतंड स्वीकृतसुमेरुकोदंड खर्वीकृतासुरमदानुपूर्वीविकास दर्वीकरेश्वरगृहीतमौर्वीविलास वीणामुनींद्रख्या-

पितगरिमपौरुष बाणाधिकारस्थापितपरमपुरुष अनिलाशनाविहितनेपथ्य कमलासनकलितसारथ्य विश्वाधिकत्वपदालंब आश्वायिताद्यवचोगुंफ कुंदस्मयहरकांतिकांतिप्रकर मंदस्मितलवशांतत्रिपुर नादबिंदुकलाभिज्ञापितभूरिभद्र स्वेदबिंदुलवाविर्भावितवीरभद्र त्रस्तरक्षापरतंत्र ध्वस्तदक्षाध्वरतंत्र कोटीरनिहितविविधवेधःकपाल चपेटाघातशिथिलभास्वत्कपोल जृंभितविक्रमोद्दंड स्तंभितचक्रिदोर्दंड ब्रह्मस्तवोपचितमहाहर्ष जिह्मस्वभावजनदुर्धर्ष वसुंधराधरसुतोपलालन जलंधरासुरशिरोनिपातन कोपाहतपतितांतक व्यापादितसमदांधक वरसंहननजटासंभृतपरभार गौरनरसिंहनियमनालंबितशरभावतार प्रपन्नभयमोचन विभिन्नभगलोचन प्रपंचदहनकारक विरिंचवदनहारक संचारपूतमंदर पंचायुधातिसुंदर अपनीतदक्षानन अभिनीतभिक्षाटन धारितमेरुकाननकुसुममालिकालंकार दारितदारुकावनकुलपालिकाहंकार समावर्जितभक्तमानसानुसार परावर्जितदृप्ततापसाभिचारवैय्यासिकोक्तिगोचर वैयाघ्रकृत्तिभासुर गतपारिकर्मगणस्पृह कृतकरिचर्मपरिग्रह ध्यानशामितपातकप्रसंग विध्यादिविबुधपूजितस्वालिंग शांतमानसानुरोध क्षांततापसापराध फालानलज्वलनभीषण हालाहलगरलभूषण अरुणांशुकंदलमणिसुंदरफणिकुंडल चरणाग्रयंत्रितदशकंधरभुजमंडल आनंदतांडवनटनानुबंध गोविंदपूजितचरणारविंद विनयानतामृताशनसहस्राहितप्रमोद तनयाभिलाषिमाधवतपस्याकृतप्रसाद दिव्यास्त्रदानतोषितभृगुसूनुनम्य सव्यार्धभागभावितहरिरूपरम्य वंदितागतश्रुतिसार नंदिपालितप्रतीहार बुद्धनानार्यरहस्यशतमन्युमुख्यामरभाक्तिगोचर दुग्धपानार्थतपस्यदुपमन्युविश्राणितदुग्धसागर अधिकसंचारितदुष्टपीडाचरण हरिविरिंचापरिजुष्टचूडाचरण अचद्धर्मवृषाधर पंचब्रह्ममयाकार वेदाश्ववरोपाहितसाम्य श्वेताश्वेततरोपनिषद्गम्य चापल्यरहितरम्यस्वभाव कैवल्यवचनगम्यप्रभाव अखर्वमखाशिराज्यप्रताप अथर्वशिखानुवाद्यस्वरूप अगर्वनरस्तुतिमुदित अथर्वशिरःश्रुतिविदित नादांतविभावनीय वेदांतविबोधनीय प्रणतार्तिहर प्रणवार्थसार मुग्धलावण्याधार शुद्धचैतन्याकार आशीविषधारक काशीपुरनायक हृदंबुजकृतविलास चिदंबरकृतनिवास आकर्णचलितापांग गोकर्णरचितासंग घोरासुरपुरधूमकेतुस्मित वाराकरगतरामसेतुस्थित रक्षणलीलाविलास दक्षिणकैलासनिवास आताम्रलोलनयन एकाम्रमूलभवन आभीरवधूसेवन श्रीशैलशिखरपावन अद्राक्षमधुरवाग्गुंफ रुद्राक्षरुचिरदोस्तंभ कालकंठरुचिघटितलावण्य नीलकंठकविनिहितकारुण्य सेवापरतंत्रपालक शैवागमतंत्रकारक सर्गस्थितिसंहृतिकार्यत्रयस्थेय भर्गश्रुतियंत्रितगायत्र्यानुध्याय अध्यासितवरनिकुंजगृहहिमार्य अध्यापितविरिंचिमुखशिवाचार्य अचिंतानंदविहार सच्चिदानंदशरीर विजयीभव विजयीभव ।

भुंजीथा न हलाहलं यदि महादेव त्वमेवं विधं ।
भुंजीरन् किमिमे सुराश्चरुपुरोडाशादिहव्यं मखे ॥
आसीथा न यदि स्वयं पितृवने भूतानि संमोहयन्
नासीदन्किमिमे जनाः सुकृतिनो हर्म्येषु सौधेषु च ॥ ३९ ॥
त्वत्प्रसूतास्त्वया गुप्तास्त्वया व्यापारिता वयं ॥
त्वां विदंतो विदंतो वा त्वामेव प्रीणयामहे ॥ ४० ॥

इति स्तुवतो देवान्पुरशासनः पुनरित्थमनुशशास ।

पुत्रा यूयं भुवनविदिता ब्रह्मनारायणेशाः
दासा देवाः शतमखमुखा दानवेशास्ततोपि ॥
कस्यानस्य व्यसनमहरं कालकूटं निगृण्हं
लज्जे भूयः स्तुतिषु भवतां व्यापृतः स्वे कुटुंबे ॥ ४१ ॥

तदलमतिक्रामति कालो मथनस्य वत्सा देवासुराः वत्स भोश्चतुरानन शृणुतावहिताः परमिममुपदेशं ।

अमुं यं वीक्षध्वे पुरुषमरविंदेक्षणमसौ
सवित्री सर्वेषामपि च भवतां यत्प्रियतमा ॥
ममाज्ञामस्याज्ञां मम भजनमेतस्य भजनं
विजानंतो यूयं विनमत तयास्मिन्मयि यथा ॥ ४२ ॥

भगवन्नरविंदलोचन जानामि भवतो मयि प्रीतिमन्यादृशीं काममग्रे सहै वास्वहे कालस्त्वयमेषामत्येति सुधाप्रदानस्य । तदद्य वियोगेन मे नार्हसि वै क्लव्यमधिगंतुं ।

भवानीति भवानीति पश्य भेदः कियानयं ॥
विग्रहं प्राप्तयोरेकं विश्लेषः कइवावयोः ॥ ४३ ॥

इति प्रसादयन्निंदुशेखरः प्रदक्षिणीकृत्य सहस्रशः पादावाधाय मूर्ध्नि परिरभ्य निर्भरं बाहुभ्यां विसृष्टः कथंचिदपि विश्वंभरेण पश्यत्सु देवासुरेषु पार्वतीसहितस्तिरोदधे । तदनु च ।

स्तुवंतो दिव्याभिः स्तुतिभिरभिसंगम्य शतशः
स्पृशंतः कोटीरैश्चरणकमलैः कैटभभिदः ॥
स्मरंतः श्रीकंठं सममसुरवीरैर्दिविचराः
प्रहृष्यंतः सिंधुं प्रमथितुमुपाक्रंसत पुनः ॥ ४४ ॥

॥ इतिश्रीनीलकंठचंपूकाव्ये चतुर्थोयनाश्वासः ॥

आलोड्यमानः पुनरेकतानै-रामज्जमाब्धिः सुरदैत्यसंघैः ॥
प्रादुष्करिष्यन्परमामृतं त- प्रासीद्दशानइवक्रागे ॥ १ ॥

ततश्च । ततः क्षोभ्यमानात्सजातीयमंदरसंघर्षमसहमानतया समुत्थितइव मैनाकभूधरः परिगलत्कलुषमदजलासारपरिजिहीर्षया निर्वासितइव भुवि नैर्मल्यैकमत्यस्थितैरांतरैर्जंतुभिः सलिलएव संततवप्रक्रियाशीलनेन संसक्तैः दुग्धसागरसरोजनालैरिव वज्रवलयैरावेष्टतचतुर्दंतः सततभूभारविश्रांतदिगंतदंतावलराजिदृष्टिपथं निलीय विष्टिग्रहणशंकया विनिर्गतः स्वयमेव बहिरिव केनापि पथा विस्मयनीयशरीरो महानैरावतो नाम मतंगजः प्रादुरभूत् ।

अपि च ।

परिचलितदुग्धवेलापरिचयविमलस्य मंदरस्य गिरेः ॥
अभ्यर्णमुपसरन्नयमर्भकइव तस्य संददृशे ॥ २ ॥
आजिघ्रन्निव पुष्करेण जलधेरर्धं पिबन् शीकरै-
रासिंचन्नभितस्तनूमिव सुरान्स्रोतोभिराप्लावयन् ॥
वप्राघातमिवाचरन् शिथिलयन्मंथानमेवाचलं ।
हर्षायाजनि पश्यतां दिविषदामैरावणो वारणः ॥ ३ ॥

स च बहिर्निःसरन् शिक्षिताधोरणनियंत्रणतया मनागप्यगणयन्देवासुरानमृतोपयोगसुहिततया किमप्यनालोकयन्नुपनीयमानानिक्षुलतोपहारानुपह्रियमाणानि कदलीकांडानि संह्रियमाणानि पिप्पलपल्लवानि च सर्वतः परामर्शयादासि । तमित्यमतर्कितोपनिष्क्रांतमालक्षयंतः पुनरपि यावदाविलयांबभूवुरर्णवं देवासुराः । तावदुद्वेलहेषाहलहलोन्मेषयोषितकोलाहलः चटुलखुरपुटाविद्धदुग्धसागरशीकरासारदुर्दिनदुर्दर्शदिङ्मंडलः संततसलिलनिमज्जनोन्मज्जनक्लेशासहनाक्षमतया सैंधवइव कुमुदबांधवस्यंदनसंदानितः कोपि समुन्मुच्य बंधनमुच्चलितो बहिरुच्चैःश्रवा नाम यथार्थनामा समुन्ममज्ज सज्जीकृतो वाजी ।

आप्योपि रंहसा गच्छन्ननाप्यो मारुतेन यः ॥
सैंधवः सैंधवाद्गर्भादुत्ततार स पांडुरः ॥ ४ ॥

स च किंचिदुदंचिताग्रपादतया मुहुर्मुहुराधित्सन्निव शिरसि पदमनलसारथेरपहसन्निव हेषारवैरवनितलमात्रसंचारशिक्षिता इत्यारदजवनायुजान्सलिलमात्रसंचारशीलिनो मत्स्यमंडूककर्कटाइवेति वाजिनो वरुणस्य तैलयंत्रनियंत्रिता बलीवर्दाइव संततभ्रमणमात्रगर्विताइति सैंधवानंभोजबांधवस्य मारुतजयादेवमनांसि विजितानि । अपि च वाडवानामाजन्मसिद्धो मनोजयः कस्तत्र यत्नइति कथयितुकामइव चलत्प्रोथतया वालधिक्षेपनिर्धूतमेघमंडलतया वाहनं प्राचीनमभिभवंतमिवाखंडलस्य पश्यन्नुच्चैःश्रवसमनिमिषेण चक्षुषा पद्मनाभः स्वयमंगीकृतहयग्रीवतनुरध्यापनमात्रनिर्वृतः सर्वतोपि विस्मयनीये तदीये गतिचातुर्ये सासूयइव बभूव ।

यावद्यावत्सागरं ते ममंथु स्तावत्तावत्सोर्पयन्नेकमेकं ॥
भूयो भूयः क्षोभमेवाप दैवै र्दृष्टास्वादास्तत्र किं ते दयंते ॥ ५ ॥

ततश्च ।

साध्वी गौस्सुरभिर्नाम सागरादुदभूत्स्वयं ॥
गोप्रसूता हि गावो स्यामसाधुश्चेति जानती ॥ ६ ॥
स्नातुं वान्छति शंकरोपि पयसा स्तन्येन यस्याः स्वयं ॥
तोयं पावनमुत्तमं त्रिजगतां यद्गात्रनिष्यंदजं ॥
यद्रूपां समुपासते शमधना वाचं पुराणीं परां
सा दिव्या सुरभी करोति सुरभिर्वाचं कवीनामपि ॥ ७ ॥
प्रथमसमुद्गतामखिलकामदुहामनघां
सुरभिमभिप्रपद्य सुरसिध्दमहर्षिगणे ॥
स्तुवति धृतक्षमाइव वदान्यशिखामणयः
स्वयमुदयांबभूवुरथ पंचमहानखः ॥ ८ ॥

अमीषां च पुनरखिलभुवनाद्भुतानां किसलयान्येव कनकांशुकानि जीर्णपर्णान्येव चीनांबराणि मुकुलाएव मुक्ताफलानि निर्यासा वैडूर्याणि फलपाकाएव पद्मरागाः परागाएव पटवासाः मधुकराएव महेंद्रोपलाः प्ररोहाएव हारलताः प्रसवासवाएव परिणामाः सुधारसस्य इत्याचक्षते ।

किं कर्म दुष्कृतमिदं तरुजन्महेतुः
किंवा महत्सुकृतमीदृशकीर्तिमूलं ॥
किंवा तृतीयमिदमीदृशमन्यदेवे
त्याद्यापि शाम्यति न वादकथा मुनीनां ॥९॥

अवस्थाप्य च तानानुपूर्व्येण परित्यक्तजरारोगपरिश्रामासु पंचेंद्रियसमुज्जीविनिषु छायासु तेषां आयासमवधूय पुनरपि ते ममंथुरमृतार्णवं ।

अभ्युद्यतामथ ततः किल निष्कलंका-
मानंदकंदलमयीममृतांशुरेखां ॥
उत्तंसपुष्पकलिकेयमुमापतेरि-
त्यालोचयन्नुपपदे मनसा मुकुंदः॥१०॥

ततश्चिंतितएव सन्निहितो नंदी । शिवइव सभाजितो देवासुरैस्समर्पितां मधुसूदनेन शशांकरेखामाददानः सादरमिदमवादीत् ।

किमिव दयितं शंभोः केन प्रसीदति देवइ-
त्यविरतसमासक्तं चित्तं तवैव हरे हरे ॥
तदिह भगवन्माहाभाग्यं तव प्रणुमः कथं

त्वमसि शरणं शैवानां नस्त्वमेव महागुरुः ॥११॥
जानीषे ननु नाम केशव जगन्नाथस्य नाथस्य नः
प्रीतिं पारमिकीमनन्यसुलभां पुष्पेषु नीलोत्पले ॥
अस्मिन्नुत्पलबंधुरित्यतितनुभूतेपि भूतेशितुः
प्रीतिं चिंतयतावतमिुपचितामिदौ ततोवाधिकां ॥१२॥

तदहमेव साधन्ननेन भगवतः कपर्दपदमाराधयामि हस्तेन ते परमात्मानमग्रे भुजे च विश्वेषामग्रपूजनमेतदुचितमारचितं । ततइतो यथाभिमतमिमानि वस्तुन्युपयुज्यतामित्यभिज्ञाय तिरोभवति शिलादनंदने संचुक्षोभ पुनरपि सारस्वतो गर्भः । ततश्च ।

नैर्मल्यादुपसंभृताः फणधरस्त्रैणानुबिंबाः शतं
स्वस्थानक्षुभितोद्गतामृतरसस्यंदोपसंदानतः ॥
प्राप्तप्राणसमागमाइव ततः प्रादुर्बभूव स्त्रियो
नासीराग्रपताकिका रतिपतेर्नाना जयांकाइव ॥ १३ ॥

ततश्च विद्रुमलताइव वीचिभिराहृताः तडितइव तत्तत्समयोपनम्रपयोधरोत्संगपरिभ्रष्टाः कौस्तुभरत्नपांचालिकाइव कौतूहलाय निर्मिताः केनापि पंचशरराज्यलक्ष्मीविभूतिरिव परिगृहीतविग्रहाः तुल्यवयोरूपविभ्रमाः तुल्यांबरभूषणाः हंसीरिव मानसादंभोदविगमे समुत्तरंतीर्बहिरालक्ष्य सर्वेपि सुरासुराः विरम्य सागरमथनवृथाक्लेशादुत्तरमप्यमृतमुपेक्ष्य सन्निहिताधरामृतएव दृष्टिमादधिरे। तापसा अपि तद्दर्शनक्षुभिता मंत्रजपादुपारम्य भणितभेदानधिजिगासांचक्रिरे। पंचास्त्रविद्यामेव परमर्षयोपि बहुमेनिरे । किं बहुना । श्रुतिन्यायविदोपि हि सूक्ष्मदर्शिनः तासामालोकनमग्निष्ठोमस्य द्वारोपसर्पणं द्वादशावहस्य गाननिषेवणं गवामयनस्य नाभ्यावलोकनं नक्षत्रसत्रस्य वाङ्मिश्रणं वाजपेयस्य परिष्वंगं पौंडरीकस्य वदनास्वादनं वाजिमेधस्य दंतक्षतं दाक्षयणयज्ञस्य नखलेखनं नानाविधानां संस्थानां कुचमर्दनं कुंडपायिनामयनस्य शयनावमर्शनं राजसूयस्य विपरीतरतं विश्वसृजामयनस्य चरणताडनं चांद्रायणस्य परिभाषणं च पराकसांतपनयोः फलमाचक्षते ।

सौहार्दं परमेयुषामपि तदा सन्नह्यतां विग्रहे
तासामेव कृते शनैः सुमनसां दैत्येश्वराणामपि ॥
सद्यः क्षालयितुं विवादमनतिप्रौढं सरोजेक्षणः
संगृण्हन्तु भयानिमानभिदधे तथ्यं च पथ्यं वचः ॥ १४ ॥

हंत भो देवासुराः किमिदमजानतामिव भवतामपि वैमत्यं तुल्ये परिश्रमे तुल्ये चाभिजने तुल्येनैव वो भावितव्यं फलेनापि । तदिमाः समुद्रसंभवाः

अप्सरसो नाम तरुण्यः साधारणा भवंतु भवतां ।

गजमेकमश्वमेकं गामेकां पंच च द्रुमान्दत्वा ॥
संभावयत विनाशितसर्वस्वं वासवं यदि प्रीतिः ॥ १५ ॥

इत्यभिहितमात्रएव सादरमादाय शासनं शिरसि किं प्रतिब्रूमो भवच्छासने किंतु स्वामिने किमप्यनुपयुज्य न युक्तमस्माभिरियदासेवितुं तदग्रे यदुत्पत्स्यते तद्भवाननुमन्यतामिति प्रार्थ्यमानो सुरासुरैरंतरेव कृतस्मितः किंचिदन्वमन्यत रमारमणः ।

अथ पुनरपि यावदाविलं ते
व्यदधुरुदधिं विबुधाश्च दानवाश्च ॥
सममखिलजनुष्मतां मनोभिः
समजनिता वदनाविला त्रिलोकी ॥ १६ ॥
अभ्यग्रावतरिष्यदर्णवसुताहस्ताग्रसंभावना-
संहृष्यत्कनकारविंदकलिकासौरभ्यसारस्पृशः ॥
मंदं मंदममंदचंदनकिरः पस्पंदिरे मारुताः
कालेभिद्रकदंबडंबरप्रभूद्यैनांगमंगं हरेः ॥ १७ ॥

ततश्च समसमयसमुन्मिषत्कनकारविंदकाननश्रीरिव नयनानंदसंदायिनी समभागयोजितशरदिंदुकंदलबालारुणप्रविलापनचाकचक्यलक्ष्मीरिवचमत्कारि-णी सागरावर्तविवरसमुत्थितफणासहस्रमणिभेव फणिराजस्य कांचनकां-तिधारिणी समुद्गिता दुग्धकल्लोलेषु संध्येव चंद्रातपे सफलीचकार कमलाक्षतां कमलाक्षस्य तत्र च तालवृंतचामरतांबूलकरंककनकालुका-दिप्रकरपाणयो भावानुभावदेवताइव परिणताः शरीरबंधेन शृंगारस्य-रंभादिरमणीयकमात्रनिर्वर्णननिर्वृता निधयंस्यो नयनानि नाकसदां प्रादुर्ब-भुवुरग्रतः परिवारशक्तयः कमलालयायाः । तदनु च परमानंदघनीभावपरिणाम-मयी मातृकावर्णसंपन्नमुकुटादिचरणांतसर्वांगसुंदरीपतिदेवताधर्मनियंत्रणेन पति-मुखलक्ष्यैकपातिनीभिरपि कटाक्षवृत्तिभिःपरिसरनिष्पंदमातपरितोषिजगत्त्रयी-जातजायमानजनिष्यमाणरूपापि जातरूपैकमयी लक्ष्यमाणा धर्ममयी धार्मि-केषु विज्ञानमयी विप्रेषु पराक्रममयी बाहुजेषु संपन्मयी राजसु साहसमयी श-रारुषु कारुण्यमयी भक्तेषु कामकलामयीपरिणे तरि विजयपताकिका मकरध्व-जस्य जीविका जनार्दनस्य माता चराचराणां महिषी नारायणस्य समालक्ष्यत सौभाग्यदेवता ।

विरहासहेव सततं विहितस्थितिराननेंदुना सविधे ॥
कुवलयवती विरेजे कुटिला कचसंहतिस्तस्याः ॥ १८ ॥

॥ श्री ॥

# काव्येतिहास-संग्रह.

भुजतरुवनच्छायां येषां निषेव्य महौजसां
जलधिरसना मेदिन्यासीदसावकुतोभया ।
स्मृतिमपि न ते यान्ति क्ष्मापा विना यदनुग्रहम्
प्रकृतिमहते कुर्मस्तस्मै नमः कविकर्मणे ॥

राजतरंगिणी.

पुस्तक ३.  डिसेंबर, सन १८८०.  अंक १२.

हें मासिक पुस्तक

पुणें पेठ बुधवार येथें

भाऊ गोविंद सापकर यांचे ज्ञानचक्षु छापखान्यांत
छापून प्रसिद्ध केलें.

किंमत ८ आणे.

# विज्ञापना.

संग्रहाचें तिसरें साल खलास झालें. तेव्हां सालाबाद प्रमाणें गत-सालचा गोषवारा थोडक्यांत देऊन साल पेस्तरचे व्यवस्थे बद्दल दोन शद्ब लिहूं.

१. ग्रंथांचा पुरवठा मंडळी कडून होत आहे. आमच्याकडे येऊन पडलेल्या ग्रंथांची यादी थोडकेच दिवसांनीं देऊं. ह्या कामीं मंडळी मदत करीत आहे त्या प्रमाणें करीत गेल्यास संग्रहास ग्रंथांचा तोटा न पडतां जीर्ण ग्रंथांचा उद्धार लौकरच होऊन जाईल. गतसालीं रावबहादूर निळकंठ जनार्दन कीर्तनें व रा० रा० एकनाथ महादेव पुराणीक यांजकडून विशेष मदत मिळाली तिज बद्दल त्यांचे आभार मानणें योग्य आहे.

२. आश्रयाच्या संबंधानें गतवर्षी जें आह्मीं लिहिलें त्यापेक्षां विशेष कांहीं लिहावयाचें नाहीं. ग्रंथांचा शोध व पुरवठा करण्याच्या कामीं संग्रहास जशी मदत होते, तशी त्या ग्रंथांचा संग्रह करण्यांत अद्याप होत नाहीं. या कामीं आमच्या मित्र मंडळीनें मनावर घेतल्यास ही उणीव दूर होण्यास मोठेसे प्रयास लागणार आहेत असें नाहीं. तेव्हां सर्व लोकांस अशी विनंती आहे कीं, एकदां या संग्रहास नीट हात बोट लाविलें तर हें एक काम एकदां उरकून टाकिलेंसें होईल.

३. ह्या कामास हात घातल्या पासुन ह्या कामीं जितकी लोक सेवा आह्मांकडून होईल तितकी एक निष्ठेनें आह्मीं करीत असतों. तथापि कांहीं मंडळीचें पूर्ण समाधान आमच्यानें करवत नाहीं, असें दिसतें. ह्या गोष्टीस आमचा नाइलाज आहे. अशा मंडळीनें आह्मांस संभाळून घेतलें पाहिजे, या शिवाय दुसरी विनंती त्यांस नाहीं. धट्टा खट्टा, सदृढ अशा पुरुषासही मधून मधून किरकोळ दुखणीं येतात; परंतु त्यावरून तो लगेच मृत्युमुखीं पडणार हें ह्मणणें बरोबर नाहीं. तद्वत् ह्या मासिक पुस्तकास कधीं कधीं किरकोळ

मराठी ग्रंथ संग्रहालय
क्रमांक ......
ता. ......
ठाणे.

# विषयक्रम.

बखरी.

विठ्ठलराव शिवदेव विंचूरकर यांची कारकीर्द ........................ ... १–८.

नागपुरकर भोंसल्यांचे कागदपत्र .. ४१–४८.

मराठीकविता.

मोरोपंत–कृत श्रीमद्भगवद्गीता, साधुस्तव, महीपतिस्तुति, सत्संगस्तवः, मुरलीपंचक, श्रीनामसुधा–चषक .... ८१–९६.

संस्कृतकाव्यें.

प्रभुवंशकाव्यम् .................... १७–२०.

मोरोपंतकृतं शिवार्या–शतकम् ...... १–८.

वामनकृतोऽनुभूतिलेशः ............ १–४.

॥ श्री ॥

यादी कारकीर्द विठ्ठलराव शिवदेव—प्रथम श्रीमंत महाराज राजे शाहू छत्रपती यांजपाशीं एक घोडियानें चाकरीस राहिले. तेव्हां वय वर्षें २७ शके १६४२ सन इहिदे अशरीनचे सालीं. त्या दिवसापासून महाराजांचे संनिध स्वारी शिकारींत शिपायगिरीचेच दायानें कृपा संपादिली. पुढें कांहीं एक दिवशीं कोकणप्रांतीं श्रीमंत चिमाजी आप्पासाहेब यांस सिद्दीसात यानें बंड केलें होतें, त्याचे पारिपत्यास पाठविलें. समागमें विठ्ठलराव शिवदेव मर्द माणूस महाराजांनीं दिले. सिद्दीसात याची लढाई मातबर झाली. ते समयीं आप्पासाहेब यांचे समक्ष विठ्ठलराव तात्यासाहेब यांणीं आघाडीस वाढून हत्यार केलें, शिपाईगिरीची पराकाष्टा केली, व कांहीं घोडीं पाडाव करून आणिलीं. लढाई फत्ते होऊन सिद्दी मारला गेला. हें वर्तमान महाराजांस विदित जाल्यावरून कृपाळु होऊन पागेचीं वस्त्रें पाठविलीं. व घोडीं पाडाव आणिलीं तीं पागेस दिलीं. त्या दिवसापासून पागे जाले. मर्दनके साहेब आप्पासाहेब बहुत लोभ करूं लागले. सातार्‍यास आले. नंतर कांहीं एक दिवशीं श्रीमंत बाजीराव साहेब व चिमाजी आप्पासाहेब मोहीम सीर सैद याचे पारपत्यास सन अर्बा अशरीनचे सालीं रवाना महाराजांनीं केले. तेव्हां यांस तैनातीस बरोबर दिलें. लढाईंत काम केलें. त्या दिवसापासून पेशवे सरकार यांचा लोभ होऊन समक्ष काम चाकरी शिपाईगिरीची करूं लागले. नंतर सन खम्मस अश-

---

१. हें प्रकरण आह्मांस रावबहादूर महादेव गोविंद रानडे यांजकडून मिळालें. हें श्रीक्षेत्र वाराणशीहून ग्वाल्हेरीस गेलें व तेथून त्याची प्रत दक्षणेंत शके १७५५ सालीं आली, असा लेख ह्या प्रकरणाचे अखेरीस आहे. हें जुन्नरी कागदाच्या चिकट बंदावर एकसारखें सुमारें १३।१४ चिकटबंदां पर्यंत लिहिलें असून नंतर पाठीमागून लिहिलें आहे तें सुमारें ३ ऱ्या किंवा ४ थ्या बंदा पर्यंत आहे

२. शाहू—सन इ० १७०८–१७४९.

३. दायानें=धंद्यानें.

४ सिद्दी जंजिऱ्याचा. याजपाशीं शिवाजी राजापासून मराठ्यांचा नेहमीं कलह सरू होता स० इ० १७३४।३५ सालीं त्याजपासून तळा घोसाळा वगैरे मुलूख घेतला

५. वाढणें, वाढून जाणें=चालून जाणें, चाल करणें.

६ मर्दनके साहेब=शूर पुरुषांचे प्रतिपालक.

७ सुरुसन अर्बा अशरीन् मय्या व अल्लफ ११२४; स० इ० समारें १७२३. बाजीराव बल्लाळ यांणी सन १७२४ पावेतों नर्मदेपर्यंत ३ स्वाऱ्या केल्या त्यां पैकीं ही एक असावी. पेशव्यांची बखर पृ २५ टी० ११ ( ३ ) पहा.

८. इतके दिवस राजे यांजकडून पेशव्यांकडे नेमणूक होत असे. पुढें खुद्द पेशव्यांनीं आपले पदरीं ठेविलें.

९ खंमस अशरीन म० अ० (११२५) इ० स० १७२४.

रीन शके १६४६ चे सालीं बाजीराव साहेब यांची स्वारी मोंगलावर दाऊदखां[10] वगैरे यांचीं पारिपत्यें केलीं. किलीचखां[11] याच्या भेटी जाल्या. दुसरे वर्षीं सन सीत[12] अशरिनांत दिल्लीस गेले तेव्हां बराबर हे होते. हरवख्त शिपाईगिरी आघाडीस करूं लागले. सबब आणखी इतलाख[13] स्वार ठेवावयास सांगितलें. सन सब्बा[14] अशरिनांत स्वारीबराबर साताऱ्यास आले. सन तिस्सा[15] अशरीन सालीं शके १६५० कीलकनाम संवत्सरांत दया बाहादर[16] यांणीं लबाडी केली त्याचे पारपत्यास फौज देऊन पाठविले. त्याचेंही पारपत्य केलें. दिवसें दिवस पराक्रमें करून सरकार चाकरी करून लोभ संपादन करीत गेले. गढेमंडळास सरकारांतुन सयाजी गुजर पाठविले. त्याचे तैनातेस पागा व इतलाख शिलेदार सह विठ्ठलराव शिवदेव यांस बराबर दिले. *तेथेंही कामकाज जालें. हें वर्तमान सरकारास समजलियावर पागा व शिलेदार होतेच,* परंतु शिलेदार *आणखी ज्यास्ती ठेवावयास सांगून* पथक[17] करून दिलें. जमेत[18] वाढत चालली. मर्द माणूस पाहून स्वारी समागमें जमेत सुद्धां बाळगून कोकणपट्टींत वसई साष्टी वगैरे बाजीराव साहेब व चिमाजी आप्पासाहेब यांणीं मसलत केली. लढाया मातबर झाल्या. त्यासमयीं उभयतांचे समक्ष मेहनती करून चाकरी केली. हें उभयतांचे मनांत पक्कें येऊन जमेत वाढतच गेली. नबाबावर स्वारी हरवख्त होत गेली. तेथें कामकाज होत गेलें. हिंदूस्थानांत उदेपूर व जयपूर व कोटें व दिल्ली वडधाघाई

---

१०. दाउदखां माळव्याचे सुभेदाराच्या तर्फे बाजीरावावर चालून आला होता. पे० व० पृ. ४५ टी० ५५ पहा.

११. किलीचखां असफजाहा उर्फ निजाम उल्मुल्क—दाक्षिणचे सुभेदार. यांच्याशीं १७२८ व १७३२ या सालीं भेटी झाल्याचें ग्रां० ड० लिहितात. पे० ब० पृ० २५ पासून ३० यांत या भेटीचा थाट वगैरेचें वर्णन मोठें मनोहर केलें आहे. चोघां खिसमतदारांपैकीं विठ्ठलराव शिवदेव एक असावेत असें वाटतें.

१२. सीत अशरीन म० अ० ११२६ सन इ० १७२५. दिल्ली पर्यंत ही स्वारी झाल्याचें ग्रां. ड. लिहित नाही. माळव्यांतूनच परत आले असावे.

१३. इतलाख=ज्या स्वारांच्या पगाराचा खर्च सरकार तिजोरींतून रोख मिळतो असे स्वार, सरंजामी स्वारांच्या उलट. सरंजामी स्वारां बद्दल गांव नेमून मिळत असत.

१४. स० अ०=११२७ स० इ० १७२६.

१५. तिस्सा अशरीन=११२९. स० इ० १७२८. मळांत 'तिस्सा' च्या ठिकाणीं 'सीत' आहे तें चुकीचें आहे.

१६. हा मोंगला कडील माळव्याचा सुभेदार. हा ब्राह्मण होता. त्यानें रयतेवर इतका जुलुम चालविला होता कीं, लोकांनीं बाजीरावास बलाऊन आणून आपली सुटका करून घेतली. ग्रां० ड० ह्मणतात हें स० इ० १७३४ सालीं घडलें.

१७. पथक=टोळी. पथकांत सुमारें १०० स्वार असत.

१८. जमेत=जमियत=जमाव, सैन्य.

वगैरे मकसुदाबाद[१९] बंगाला बाजीराव साहेब यांच्या स्वाऱ्यागे त्या. समागमें पागा पथक जमेतसुद्धां विठ्ठलराव शिवदेव चाकरी करीत गेले. सातारियाहून सत्ताविसावे दिवशीं बाजीराव साहेब धरणें पारणेस आले. बराबर नेहमीं विठ्ठलराव यांणीं असावें. लोभ बहुत. ते वेळेस डगई पैकीं कालपी सुद्धां तेहतीस लक्षांचा मुलुख पेशवे सरकारांत आला. नवाबाचा व श्रीमंतांचा भाऊपणा जाला. त्या काळीं विंचूर वगैरे गांव सुटले, ते पागेकडे दिले. हरवख्त लढाईचा प्रसंग त्यांत शिपाईगिरी करीत गेले. नेहमीं मुलुखगिरी मोहिमेवर रहात गेले. बरोबर दहा हजार फौज नेहमीं शास्ता[२०] ठेवावयाचे, घोडे माणूस चांगले, तैनाती मोठ्या, व बारागिरास दरमहा मोठे, चौरी आफ्तगीर बमेय[२१] लेश सरंजाम; जातीनें बंदुका खांद्यावर, नेहमीं स्वारी घोड्यावर हरवख्त श्रीमंत बाजीराव साहेब स्वारीस निघाले ह्मणजे बरोबर; *प्रथम हिंदुस्थानांत मुलुखगिरी करून पराक्रमें करून कीर्त आणि लौकीक* संपादन केला. एकवीस वर्षें बाजीराव साहेब यांची कारकीर्द, त्यांत हरवख्त लढाईचा प्रसंग व मुलुखही बहुत सर जाला. त्या प्रसंगांत हरवख्त लढाईत सरशी करीत गेले. व वेगळी कामगारी सांगणें ती यांस सांगावी. त्यांत यश संपादित करित गेले. तपशिलवार लिहिण्यास विस्तार फार होतो. सबब थोडक्यांत लिहिलें आहे. श्रीमंतांचा लोभ दिवसें दिवस अधिक वाढला. दुसरे संस्थानिकांवर विठ्ठलराव यांणीं समयविशेष उपकार केले. सन इहिदे[२२] अर्बैन शके १६६२ रौद्रनाम संवत्सरीं रेवातीरीं बाजीराव साहेब यांचा काळ जाला[२३].

नंतर श्रीमंत नानासाहेब भाऊसाहेब यांची कारकीर्द जाली. त्यांचे कारकीर्दीस दहा हजार जमेत पागे सुद्धां यांस खर्चास इतलाख पैका पावत गेला. सरंजाम[२४] नाहीं. नानासाहेब भाऊसाहेब यांणीं नबाबांवर[२५] स्वाऱ्या

---

१९. कलकत्या पासून ६० कोसांवर मकसुदाबाद आहे. येथें रेलवे असून तें हल्लीं व्यापाराचें मोठें ठिकाण आहे. बंगाल्यावर बाजीराव गेल्याचें ग्रां० ड० लिहीत नाहींत. बाळाजी रावानें मात्र १७४४ चे सुमारास बंगाल्यावर स्वारी करून रघूजी भोंसले यांस हुसकावून दिल्याचें लिहितात.

२०. शास्ता = नेहमी, हमेश.

२१. बमय = बमे = सुद्धां, सह. लेश = तयार.

२२. इहिदे अर्बैन = ११४१ स० इ० १७४०.

२३. बाजीरावाचा मृत्यु शके १६६२ वैशाख शु० १३ या दिवशीं मौजे कलमढे प्रगणें रावेर रेवातीर येथें.

२४. सरंजाम = जाहागीर मुलुख.

२५. औरंगाबादवाले—निजाम उल्मुल्क व त्यांचे चिरंजीव नाझर, सलाबत वगैरे.

केल्या व हिंदुस्थान प्रांतीं जाऊन गडेमंडलची खंडणी घेऊन मकसुदाबादेस[२६] जाऊन भागिरथी स्नान करून आले. नंतर सन खम्मैस[२७] अर्बैनात पायगडावरून जाऊन उज्जनीची खंडणी घेऊन आले. सन सैबां[२८] अर्बैनांत कर्नाटक प्रांतीं जाऊन बहादूर बिंडा घेऊन आले. व हिंदुस्थानांत माळवा वगैरे खालसा केला. त्या समयीं सेवा चाकरी करणें तशी करून लोभ संपादन केला. पुढें सन खैमसेनांत[२९] शके १६७१ शुक्लनामसंवत्सरे महाराज शाहू छत्रपति कैलासवासी झाले. तेव्हां नानासाहेब यांणीं राज्याचा बंदोबस्त करून कर्नाटकची स्वारी केली. नंतर मोंगलाई सरहद्द खिसां[३०] पुरवत गेला. हरवख्त गाजुदिन[३१]खा पुढें आले होते. नबाब रामदासपंत[३२] सह आले होते. लढाई मातबर झाली. कोणतेही लढाईचे प्रसंगीं विठ्ठलराव शिवदेव यांणीं स्वारी बराबर नेहमीं राहून, शिपाईगिरी आघाडीस करून, कृपा संपादन करून घेतली. मुख्य चाकरी करून दाखवावी हीच उमेद. दुसरें आर्जव काडीमात्र नाहीं. कैलासवासी दादासाहेब, यांचे चाकरीची उमेद पाहून नानासाहेबांचा हेतु दादासाहेब यांस चाकरी सांगोन रूढीस घालावें. याजमुळें आमदाबादे[३३]ची मसलत उभी करून दादासाहेब यांस कारभारी सखाराम भगवंत देऊन, लढाईची आघाडी विठ्ठलराव शिवदेव यांणीं घेऊन, दादासाहेब यांचा लौकिक व्हावा हें मनांत आणून, समागमें फौज हुजरात वगैरे देऊन, फौजेची मालकी विठ्ठलराव शिवदेव यांची असा नेम करून सन

---

२६. वर टी० १९ पहा. पादशहाच्या तर्फे रघुजीस बंगाल्यांतून हाकून लावण्या करितां ही स्वारी केली येणेकरून माळवा प्रांताची सनद पेशव्यांस दिल्लीवाले यांजकडून प्राप्त झाली.

२७ खंमस अर्बैन = ११४५ = स० इ० १७४४.

२८ सबां अर्बैन = ११४७ = स० इ० १७४६

२९. खमसेन = ११५० = इ० स० १७४९

३० खिसा = तंटा भांडण

३१. गाजुदीन हा निजामउलमुलक याचा ज्येष्ठ पुत्र. हा दिल्लीस असे. सलाबत जंगास काढून त्यास गादीवर बसविण्याच्या खटपटींत पेशवे बाळाजीराव होते व तो त्यांचा बेत साधलाही असता परंतु गाजुदीन यास त्याच्या सावत्र आईनें विष घालून मारिल्यानें ( १७५२ ) ती मसलत फुकट गेली. पुढें सलाबत जंगाशीं तह होऊन तो तंटा मिटला

३२. रामदासपंत हा फ्रेंच लोकांचा गव्हर्नर जो डूप्ले याच्या मार्फतीनें सलाबत जंगाचा दिवाण झाला होता. ह्यास राजा रघुनाथ असा किताब होता. वरील लढाई चालली असतां एके दिवशीं सलाबत जंगाच्या लष्करांत अपसांत तंटा उप्तन्न होऊन रामदासपंत मारला गेला. (एप्रिल १७५२). पत्रें यादी वगैरे पृ० ४ पहा.

३३. ग्रां० ड० यांणीं अमदाबाद १७५५ सालीं घेतली असें लिहिलें आहे तें बरोबर नाहीं. तें साल १७५३ हें होय भाऊ साहेबांची बखर पृ० ११ टी० २८ पहा.

सल्लास[३४] खमसेनांत शके १६७४ त आमदाबादेस रवानगी केली. गुजराथींत जाऊन सुरत अट्ठाविशी[३५] वगैरे ठाणीं बसवीत चालिले तेव्हां उरपाडची कमाविशी विठ्ठलराव शिवदेव यांणीं करून घेतली. पुढें आमदाबादेस जाऊन मसलतीस चार दिवस अधिक लागले. जाणून नानासाहेब यांणीं कुमकेस शिंदे रवाना केले. हें वर्तमान दादासाहेब यांस समजतांच सखारापंत बापूसह विठ्ठलराव शिवदेव यांचे गळयांत हात घालून शिंदे येण्याचे पूर्वी आमदाबाद सर व्हावी. त्याजवरून कड निकड करून माणसें मोठीं मोठीं जाया झालीं.[३६] आमदाबाद घेऊन नबाबाचें पारिपत्य केलें. अंमल सुरू केला. शिंदे येत होते त्यांस कोंडाई[३७] बारींत हें वर्तमान समजतांच बारी उतरून माघारीं फिरले. दादासाहेबांनीं गुजराथेचा गायकवाडसुद्धां बंदोबस्त केला[३८]. त्यावेळेस दादासाहेब यांणीं सातशें रुपयांच्या आमदाबादेस दरखी[३९] आसाम्या करून दिल्या. दादासाहेब यांची जमेत कायम राखून कोणतीही मसलत आली म्हणजे यांस सांगावें. कारभारी सखाराम बापू व फौजेंत विठ्ठलराव शिवदेव नेहमीं तैनातीस राहून नबाबावर स्वारी करीत गेले. व हिंदुस्थानची स्वारी नेहमीं दादासाहेब यांचे गळीं पडली. त्यांचे समागमें विठ्ठलराव शिवदेव दहा हजार जमेतीनिशीं चाकरी करीत गेले. स्वारी दिल्ली व कुंभेरीची[४०] तीन सालें स्वारी करून नंतर कर्नाटकची[४१] स्वारी, त्याजवर लाहूरची[४२] स्वारी, सन सब्बां खमसेना[४३] पासून तीन सालां व यां खेरीज बहुत स्वाऱ्या के-

---

३४ सल्लास खमसेन = ११५३ = इ० स० १७५२.

३५. सुरते खालीं २८ महाल होते त्यांस सर्व मिळून 'सुरत अट्ठाविशी' अशी संज्ञा होता. पे० ब० पृ. २८ पहा.

३६. अमदाबादेचा वेढा—जवान मर्दखान बाबे हा अमदाबादेचा सुभेदार याणें मोठ्या शौर्यानें किल्ला भांडविला. शेवटीं नाइलाज जाणून किल्ला स्वाधीन करण्याचें त्याणें कबूल केलें. त्या बद्दल त्यास पट्टण. राधनपूर. वगैरे परगण्याची जहागिरी दिली.

३७. कोंडाईबारी—दोन पहाडांचे कच्यांतून बोगद्या सारखा एक मार्ग आहे. कोठें ?

३८. गुजराथेचा बंदोबस्त—अमदाबाद सुभ्याच्या वसुलाचा अर्धा हिस्सा गायकवाडांनीं व अर्धा पेशव्यानीं घ्यावा. शहरांत नाकेबंदी पेशव्यांची व्हावी. फक्त एक वेस गायकवाडाच्या लोकांच्या ताब्यांत असावी, व बाकीच्या बदोबस्ता बद्दल त्यांनीं ६००० रुपये पेशव्यांस द्यावे, असें ठरलें. ग्रां० ड०

३९ दरखी = वतनी, वंशपरंपरेनें चालणाऱ्या.

४०. कुंभेरीची स्वारी—सि० इ० १७५४ भाऊ साहेबांची बखर पृ० ४ पासून ११ पहा.

४१ दादांनीं ह्या वेळीं कर्नाटकांत स्वारी केल्याचा दाखला नाहीं.

४२. लाहोरची स्वारी ( १७५६–५९ ) जींत दादांनीं गिलच्यांचा पराभव करून भिमथडाच्या व गंगथडीच्या घोड्यांस सिंधु नदाचें पाणी पाजिलें.

४३. सब्बां खमसेन = ११५७ = स० इ० १७५६,

त्या. कुंभेरचे स्वारींत विठ्ठलराव शिवदेव यांची स्त्री निवर्तली. कुंभेरीस जाटाचें पारिपत्य करून दिल्लीस गेले. तेथें कालपीस नवरी आहे याचा शोध आणून, फौज दिल्लीस ठेऊन सडे कालपीस येऊन लग्न करून ग्वाल्हेरीस मुक्कामास आले. किल्ला जाटाकडे होता. त्यानीं यांची कैंही[४४] वळली याजमुळें कलागत वाढून विठ्ठलराव शिवदेव यांणीं नवी जमेत करून किल्ल्यास मोर्चे लाविले आणि दिल्लीहून आपली फौज बोलावून घेतली. दादासाहेब व सखारामपंत यांचा मानस ग्वाल्हेरीची मसलत करूं नये. परंतु शहास लागले. सबब न ऐकतां मसलत केली. लढाया बहुत जाल्या. एके दिवशीं जाट लढाईचा सरंजाम घेऊन खालीं उतरून चालून आले. त्यांची व यांची मातबर लढाई होऊन जाट याचा मोड झाला. त्यावेळेस यांणीं कड निकड करून जाटाशीं गांठ घातली. फौजेंतून महादजी शितोळे मांजरीकर व अप्पाजी मुंढे व यमाजी नाईक रूळेकर व मोतीभँटे पाणी[४५] वाळगावयाचा ब्राह्मण, यांणीं उड्या घालून जाट यास घोड्याखालीं पाडून डोकें कापलें. किल्याचा दरवाजा घेतला व बागलकोटही[४६] घेतला. नंतर किल्लाही घेतला. जाट याचा मूल व राजधर कारभारी भेटीस आले त्यांत गोहद संस्थान कायम ठेऊन तेथें पोंहोचऊन दिलें. किल्या खालचे मुलकाचा बंदोबस्त करून गोविंद शामराज शिरवळकर जवळ होते, त्यांजकडे सुभा मागून दादासाहेब यांचे स्वारींत जाऊन पोंचले. मसलतीमुळें देण्याचा पेंच जाला. दादासाहेबांचे मनांत वाटलें न विचारितां मसलत केली. यामुळें खप्पा नानासाहेब व भाऊसाहेब यांची मर्जी करविली. परंतु नानासाहेब यांचा आंतून लोभ कीं, काम जालें हें चांगलें. लोभाचा डोळा भाऊसाहेब यांचे चित्तांत न[४७] वागे. सबब मसलतीस खर्च जाला त्याचा फडशा न होय. या मुळें विठ्ठलराव शिवदेव उदास जाले. फौज अरळतरळ[४८] होऊं लागली. तेव्हां नानासाहेब यांणीं एकांतीं बोलावून खातर जमा केली. घाबरे न व्हावें. मर्जीनरूप बंदोबस्त करून देऊं.

---

४४. कही=दाणा वैरण, लांकूड फाटें, पैदा करणारी टोळी.

४५. हा गुजराथी ब्राह्मण असावा. पाणी भरण्यास पूर्वी गुजराथी ब्राह्मण ठेविण्याची वहिवाट फार असे.

४६. बागलकोट=बालेकोट. बालेकिल्ला. (?).

४७. पैका पुरविण्याचें काम भाऊसाहेबांकडे असल्यामुळें त्यांस वारंवार अडचण पडे व याजकरितां त्यांस हिशोबाच्या कामांत जरा कडक व्हावें लागे. या गोष्टीवरून मल्हारराव होळकर, विंचूरकर, बुंदेले व खुद्द रघुनाथरावदादा वगैरे मंडळीचा भाऊंवर रोष असे अशा विषयीं दाखले सांपडतात.

४८. अरळतरळ=ढील. टंगळमंगळ.

त्याजवर कर्नाटकचे स्वारीस नानासाहेब भाऊसाहेब निघोन सावनुरास गेले. बरावर विठ्ठलराव शिवदेव सरंजामसुद्धां होते. लढाईचा सरंजाम भारी. तोफा लागू न होत. मसलतीस फार दिवस लागले. सावनूर घ्यावें याज करितां नबाबें[४९] कुमकेस आणविले. ते पंचविस तीस कोसांवर येऊन पोहोंचले. नानासाहेब यांचे चित्तांत नबाब येण्याचे पूर्वी सावनूर हस्तगत जालें तरि नबाबास हिस्सा देणे नको. त्याजवरून मल्हारराव होळकर यांस बोलावून विचार केला. तेंव्हां होळकर याणीं सांगितलें कीं, उपयोगी मर्द विठ्ठलराव शिवदेव यास रुसविलें त्यांची समजूत व्हावी. ह्मणजे ते व आह्मीं उभयतां मिळून बातेऱ्यां[५०] बाहेरच्या घेऊन शहरांत मोर्चे शिरवितों, आणि हस्तगत करितों. तेंव्हां ही गोष्ट मनांत आली. आणि विठ्ठलराव यांस बोलावून खातरदास्त करून सांगितलें कीं, तुह्मीं व होळकर मिळून सावनूर लवकर हस्तगत नबाब येण्याचे पूर्वी होय असें करावें. उभयतांनीं रुकार दिला. सरकारांतून पानाच्या पट्या दिल्या. नंतर उभयतांनीं तयारी केली. सावनुराबाहेर बातेऱ्या बांधिल्या होत्या, वर लढाई चालू होती, त्याजवर चालून घेऊन बातेऱ्या घेतल्या. आणि पाय उतारा होऊन, चालून घेऊन हल्ला करून शहरांत मोर्चे बसविले. लागलेंच पठाणाचें बोलणें येऊन, त्यास बाहेदारी[५१] देऊन, शहर हस्तगत मोंगल येण्याचे पूर्वी केलें.[५२] मोठें यश आलें. बातेऱ्या घेऊन, हल्ला करून, मोर्चे बसविले, तेथें नानासाहेब व भाऊसाहेब मागाहून जाऊन पोहोंचले. आणि विठ्ठलराव यांजवर बहुत संतोष होऊन खातर जमा केली. तुह्मी पराक्रमी आणि कैलासवासी तिर्थस्वरूप राजश्री बाजीराव यांचे अव्वली पासून चाकरी, श्रम, सेवा केली ती खरी. या दौलतीचे सरीक[५३] आहां. ह्मणोन ग्वाल्हेरीचे मसलतीचे बारा लक्ष देणें आहे तो ऐवज बाळाजी गोविंद बुंदेले यांज कडून देवविला. व चौघडा व जरीपटका देऊन सरफरासी[५४] केली. महादजी शितोळे व आप्पाजी मुढे यांणीं उड्या टाकून ग्वाल्हेरीस जाटाचे डोकें कापलें होतें, त्यांस बक्षीस महादजी शितोळे शिलेदार होते त्यांजला मांजरीगांव कृष्णातिरीं येडुराजवळ आहे,

४९. नबाब हैद्राबादेचे.

५०. बातेऱ्या = पडकोट ?

५१. बाहेदारी = बाहेदारी = आश्वासन, उत्तेजन.

५२ सलाबतजंग यांशीं तह होऊन त्यांणीं आपली फोज वेढा घालण्यास पाठविली. त्यांत फ्रेंच सरदार बुसी याणें किल्यांत तोफांचा भडिमार करून सावनूरवाल्यास दे माय धरणी ठाय असें केलें. नंतर लौकरच नबाबाचें व पेशव्यांचें बोलणें त्याणें कबूल केलें. ग्रां० ड०

५३. सरीक = शरीक = वांटेकरी.

५४. सरफराशी = सर्फराजी = तारीफ, बढती.

तो इनाम करून देवविला. तो हल्लीं त्यांचे वंशाकडे चालत आहे. आप्पाजी मुढे बारगीर होते, त्यांस सरकारची पागा देऊन गांव दिला. पागा बहुत दिवस चालत होती. माळवा प्रांत व झांसी व §अहीरवाडा व खेचीवाडा नानासाहेब यांचे कारकीर्दींतच सुटला. पैकीं अहीरवाड्यांतील महाल क द बा ई आ थ खे डा इ दा र व *सबलगड पैकीं ब ज र हा टा ब मे सा ली व जवाहीरगड व कुं भे ली से बा ई येथील मोकासा इनाम करोळी[५५] वाले राजे यांचा पगडीबद्दल[५६] भाऊपणा झाला त्या काळीं इनाम दिलाच होता. व हल्लीं जाहागीरीचे अंमल श्रीमंत यांजकडून करून घेतला. व माळवे प्रांतांतील सिहूर अष्टा इछादर देवीपुरा[५७] कमाविशीनें करून घेतले. हिंदुस्थानचे महाल ग्वाल्हेर वगैरे ग्वाल्हेरीचा किल्ला घेतला याजमुळें सुटले. ते कमाविशीनेंच विठ्ठलराव शिवदेव यांजकडे होते. सरकारचा अंमल होऊन, सरकारच्या वहिवाटी जाल्या नंतर कमाविशी केले असें नाहीं, ज्या काळीं मुलुक सोडविला, त्या दिवसा पासून अंमल यांजकडेस. हिंदुस्थान प्रांतीं प्रथम स्वाऱ्या विठ्ठलराव शिवदेव यांणीं केल्या बराबर दहा हजार फौज नेहमीं व कारण परत्वें दहा हजारांपैकीं जाजती ठेवावी. व सरकारांतून अंताजी माणकेश्वर कामेरगांवकर[५८] सरदार पांच हजार फौजेनिशी होते. कांहीं मुलुक सोडवीत गेले. हरवख्त लढाई, परंतु कोणें समयीं कधीं नासकती[५९] ज्या पुरुषाची झाली नाहीं. मेहरबां बादशहा यांस दिल्लींत दुसमानाचा प्रसंग पडला. काबू[६०] दुसरा कांहीं नाहीं. तेव्हां विठ्ठलराव शिवदेव यांस लिहिल्या वरून दिल्लीस जाऊन बादशहाचे मनोगतानुरूप सेवा केली. बादशहाची कमाल संतोष होऊन आपले हातची तलवार व आणखी हत्यारें व जवाहीर देऊन 'राजे उमदे कुल मुलुक बाहादूर' हा किताब देऊन विंचूर

---

§ लष्करा जवळ भिंड ह्मणून शिंद्यांचा महाल आहे त्या जवळच अहीरवाडा हें गांव आहे.

* सबलगड—हा महाल हल्लीं शिंद्यांकडे आहे हा लष्करा पासून २५ कोसांवर आहे.

५५ करोळी=केरौली.

५६ एकमेकांची पगडी घातली ह्मणजे भाऊपणा झाला असें रजपुतांमध्यें समजतात ह्या चालीचा प्रचार हिंदुस्थानांत फार, दक्षिणेंत नाहीं. "पगडीभाई झाल्यावर पोटचें द्यावें पण पाठचें देऊं नये" भाऊ साहेबांची बखर पृ० ८ पहा.

५७. शिहूर वगैरे ४ महाल हे भोपाळच्या राज्यांत आहेत. यांत शिहूर येथें छावणी आहे.

५८. कामरगांव दक्षिणेंत राहुरी भांबुरी जवळ आहे.

५९. नासकती=पराजय, अपमान.

६० काबु=हुशार, पक्का.

तुह्मांस सर्व उमजोन तुह्मी आलां. परस्परें एकयता होऊन बोल तुळसी इमान प्रमाण जाहलें. तेव्हां संशयाची गोष्ट तिळमात्र राहिली नाहीं. तुमचे मनांत संशय राहिला तो दूर न होय. बोल तुळसी ईश्वराची शपथ जाहली. यावर संदेह नसावा; तथापि तुमचा आग्रह कीं, आपण जे शपथ लिहिली ती हिकडून असावी. परंतु थोर लोक जे आहेत ते या शपथेस शब्द ठेवतील, तथापि तुमच्या मनांतील संशय तोडून तुह्मांस आपल्या जवळ आणावें यास्तव तुमचे लिहिल्या प्रमाणें शपथ मान्य असे. चिरंजिवाचे नांवें पत्र पाठवावें असें लिहिलें. ऐशियासि चिरंजीव हल्लीं मोहिमसीर लांब आहेत. आणि येविशींचे विस्तारें अर्थ रामाजी बल्लाळ यांस आज्ञा केली आहे. मशार निल्हे सांगतां कळेल. सारांश तुह्मास कोण्या काळीं ही इकडून दगा होणार नाहीं. आपण निर्भयपणें यावें रा॥ चन्द्र ११ माहे जमादिलाखर फसली ११७२ बहुत काय लिहिणें हे विनंति [लिखनसीमा] शिक्का आहे.

[ १४ ] ॥ श्री ॥

राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर गोसावी यांस. सकलगुणालंकरण अखंडितलक्ष्मी अलंकृत राजमान्य स्नेहांकित चिंतो विठ्ठल[1] आशीर्वाद विनंती येथील कुशल तागाईत छ १७ जमादिलाखर मुक्काम पुणे जाणोन स्वकीय कुशल लेखन करीत असलें पाहिजे. विशेष इकडील वर्तमान सविस्तर राजश्री व्यंकटराव[2] कासी यानीं लिहिलें आहे त्याजवरून कळलेंच असेल. श्रीमंत राजश्री दादा साहेब यांनीं सर्व प्रकार कृपाकरून करार[3] मदाराच्या यादी करून व पत्रें देऊन लक्ष्मणराव[2] कासी आपणास आणावया करितां पाठविले आहेत. त्यास आपण अविलंबें यावयाचें करावें रवाना छ १६ जमादिलाखर बहुत काय लिहिणें. लोभ केला पाहिजे हे विनंती.

---

१. हा राघोबादादाच्या कारभाऱ्यांचा मुख्य. यास नाना फडनवीसानें हालहाल करून मरेपर्यंत छाळलें. सदाशिव रामचन्द्र, आबाजी महादेव आणि सखाराम हरि हे दादांचे दुसरे विश्वासु कारभारी.

२ व्यंकटरावकाशी आणि लक्ष्मणराव काशी हे दोघे बन्धु, नागपूरकर मुधोजीचे वकील पुण्यास असत. हे पुण्या जवळाल कोथळ्याचे रहिवासी यांत व्यंकटराव वडील व लक्ष्मणराव धाकटा भाऊ जानोजीची बायको दर्याबाई साहेब यांच्या मनांत मुधोजीचा मुलगा रघोजी (दुसरा) यास दत्तक घ्यावयाचे नव्हतें. तेव्हां मुधोजीनें दादांकडे या दोघांस पाठवून साबाजीस 'सेनासाहेब सुभा' हें पद न मिळावें ' ह्मणून यत्न केला. हे दोघे भाऊ आपल्या यजमानासह दादांचा पक्ष धरून असत.

३ रघोजीच्या पदाधिकारा विषयीं तराव लेख [१६] पहा

[ १५ ] ॥ श्री ॥

राजश्री मुधोजी भोसलें सेनाधुरंधर गोसावी यांस. सकलगुणालंकरण अलंकृत राजमान्य स्नेहांकित रघुनाथ बाजीराव आशीर्वाद उपरी येथील कुशल जाणून स्वकीय कुशळार्थ लिहित जावें. आपला आमचा स्नेह पहिल्या पासून; आपलें चित्त अंत:कर्णपूर्वक आमच्या ठाईं अति स्वच्छ; हा अर्थ राजश्री व्यंकटराव कासी व लक्ष्मणराव कासी विनंती करीत गेले तो अर्थ चित्तांत आणून, आपणावर दृष्टी देऊन आपले सरदारीचा बंदोबस्त, ज्यांत आपलें कल्याण व सरकार उपयोगीं तोच प्रकार निश्चयांत आणून, राजश्री हरि विश्वनाथ[1] व व्यंकटराव कासी यांसि आज्ञा करणें ते केली आहे; हे लिहितील व राजश्री लक्ष्मणराव कासी यासि पाठविलें आहे हे सांगतील, तो प्रकार चित्तांत आणून येथील लक्ष राखून सारी फौज गंगाजलनिर्मल दर्याबाई[2] इसमाईलखान यांजपाशीं येऊन, दोन हजार सडी फौज व राजश्री रघुजी भोंसले यांसि घेऊन अतिशीघ्र यावें रवाना छ १६ माहे जमादिलाखर बहुत काय लिहिणें हे विनंती.

[ १६ ] कलमेबंदी याद राजश्री मुधोजी भोसले सेनाधुरंधर सुाआर्बासबैन मया व आलफ.

सवाल १.—राजश्री रघोजी भोसले सेनासाहेबसुभा या पदाचीं वस्त्रें. कलम

जबाब—सदरहू प्रमाणें करार.

सवाल २.—सरकारांत ऐवज द्यावा याचा करार रुपये७०००० १ यासि हप्तेबंदी; वस्त्रें जालियावर ४०००००; ज्येष्ट अखेर पर्यंत ३०००० १ द्यावे एकूण सातलक्ष एक रुपये. कलम.

जबाब—येणें प्रमाणें करार.

सवाल ३.—रुकनेंतद्दवलौ[3] यास पत्र कीं राजश्री मुधोजी भोसले सेना-

---

१. हा कोण ? बाबूराव विश्वनाथ वैद्य याचा बन्धु असावा.

२. जानोजीची बायको.

---

१. हे सवाल जबाब दुसरा रघोजीस सेनासाहेब सुभा व्हावयाचा होता तेव्हां झाले १४ व्या लेखांत लक्ष्मणराव काशी बरोबर करारांची याद पाठविल्याविषयीं उल्लेख आहे ती हीच होय.

२ सेना साहेब सुभ्याचीं वस्त्रें मुधोजीचा मुलगा रघोजी ( दुसरा ) यास मिळाल्यावर.

३. या दिवाणाचें मूळ नांव सय्यद लष्कर खान सन १७५२ मध्यें राजा रघुनाथदास ( सलाबतजंगाचा दिवाण—) मरण पावल्यावर त्याच्या जागीं सय्यद लष्कर खान याची योजना फ्रेंच सरदार बुशी याच्या वशील्यानें झाली, पुढें १७५५ मध्यें याची–दिवाणगिरी निघाली. पुढें सन

धुरंधर यांस, सरकारांतून भेटीस यावें या विशीं पत्रें पाठविलीं आहेत, सडे फौजनशीं येतील, तरि तुह्मी आपली फौज सुधां निघोन नबाबा-कडे जाणें, आणि कलह तोडणें, आणि प्रांताचा बंदोबस्त होऊन लावणी होईल तो अर्थ करणें ह्मणून पत्र. कलम.

जबाब—सदर्हू अन्वयें मजकूर समजोन पत्र लिहिलें आहे.

सवाल ४.—साबाजी भोसले याची समंजावीस आह्मी काढूं. ते न ऐकत आणि सरकारांत फिर्याद आले, तरि पदांविशीं घालमेल न व्हावी. ते नजर देतील, सर्व द्यावयास करतील परंतु येविशीं ऐकूं नये. कलम

जबाब—साबांजी भोसले यांची समजूत हरप्रकारें घरांत पडली तरि उत्त-मच आहे ते न ऐकतां हुजूर आले तरी पदाविशीं तरि घालमेल होणार नाहीं. वरकड समजुतीची सरकारांतून आज्ञा होईल त्या प्रमाणें करावें लागेल. करार.

सवाल ५.—सालाबाद घास दाणा मोंगलाचे प्रांतांत घेत असतों त्या प्रमाणें घेत जाऊं. साल मजकुरीं रुकनतदवला याचा आमचा पेंचं वाढला आहे.त्यास येविशींचा पक्का बंदोबस्त सरकारांतून व्हावा.कलम

जबाब—पूर्वी कैलासवासी जानोजी भोसले यांचा व मोंगलांचा तह जाहला आहे त्या प्रमाणें वर्तणूक करावी; नवीन [तह] करूं नये. करार.

सवाल ६.—सरकारची फौज साबाजी भोसले याजपाशीं आहे ती हुजूर आणावयाविशीं बोलोजी पलांडे व सरलष्कर वगैरे येतील त्यास कीं, राजश्री सेनाधुरंधर यां समागमें हुजूर येणें ह्मणून पत्र.

जबाब—सदर्हू प्रमाणें सरदारास बोलावण्याविशीं पत्रें गेलीं असेत.येतील.का।

सवाल ७.—सालमजकुरीं घर कलहामुळें फौजेचा पेंच भारी बसला. सरदारी ओढगस्त जाहाली. त्यास बंगाला गढमंडला या प्रांतीं जाऊन

---

(मागील पृष्ठावरून पुढें चालू) १७६३ मध्यें विठ्ठल सुन्दर दिवाण हा राक्षसभुवन येथील संग्रामांत गतप्राण झाल्यावर सय्यद लष्कर खान याची पुनः दिवाणाच्या जागीं स्थापना झाली व यावेळीं त्यास 'रुकनुद्दवला' ह्मणजे राज्याचा स्तंभ हा किताब मिळाला. हा सखाराम बापू सारखा आपल्या यजमानास पुरून उरण्या जोगा शाहणा व धोरणी होता. तेव्हां त्याला त्याच्या धन्याच्याच हुकूमावरून मारेकरी लोकांनीं यजमानासमक्ष ठार केलें! हा गोष्ट सन १७७५ मध्यें झाली.

४. निजाम अल्लीकडे.

५. समजूत.

६ सेना साहेब सुभा हें पद.

७. साबाजी हा मुधोजीचा बन्धु. दर्याबाईचे मनांत यास सेना साहेब सुभ्याचें पद मिळावें असें होतें.

८. लढा, विरोध. अडचण.

९. पेशव्यांच्या पदरचा मनुष्य.

फौज बारावी लागेल. किती एकांच्या समजाविसी कराव्या लागतील; लोक दंगा करतील; त्यास आह्मी आपला अजमास पाहून जें देणें तें देऊं; येविशीं सरकारांतून साहित्य असावें.

जबाब—तुमचें तुह्मीं समजून करावें, येथें बोभाट येऊं देऊं नये, तें करणें. येथील इतल्यां खरीज लांब जाऊं नये, येणें प्रमाणें करार.

[ १७ ] कलमबंदी राजश्री **रघोजी भोसले सेनासाहेबसुभा** सुा आर्बासबैन मया व आलफ.

सवाल १.—कडेवळाचीदेशमुखी ठाण्यासुद्धां आमची आह्मांकडे द्यावी ऐसें पूर्वीं पासून करारांत असतां, अमलांत येत नाहीं; अशास हल्ली सरकारचे हुजरे कारकून देऊन ठाणें स्वाधीन करून द्यावें कलम १.

जबाब—[या सवालाचा जबाब मूळप्रतींत नाहीं].

सवाल २.—मोगलां पासून मुलुख सोडविल्यास आह्मांस जाहागीर देण्याचा करार करून द्यावा. कलम.

जबाब—मेहनत मन लावून केली व लढाईंच उपयोगीं पडल्यास फौजेचे अजमासें नेमून दिला जाईल; करार; परंतु वाजवीचा ऐवज घेतला जाईल.

सवाल ३.—मोंगलाचे बिघाडांत काम काज घडून आल्यास सालमजकुरीं रदकजांत वगैरे नजरेत महाल लिहून घेण्यांत आले आहेत येणें करून सरदारीचा बदनकशा लौकिकांत जाला आहे तो कृपा करून दूर होऊन माहाल मोकळे होत, तो अर्थ व्हाला पाहिजे. कलम.

जबाब—आमचे मर्जी प्रमाणें मोंगलाविशीं मसलत मेहनत करून शेवटास नेल्यावर सदरहू कलमाचा मजकूर फार नाहीं. आपले मनोदया प्रमाणें घडेल. येणें प्रमाणें. दोन [प्रकार] होणार नाहींत.

सवाल ४.—चार मराठे सरदार व कारकून पदरीं आहेत याजविशीं वतनाचे वगैरे कामकाजाविशीं बोलावें लागेल तें मनास आणून वाजवी करून देत जावें कलम.

जबाब—वाजवी आवसाल वतनाचे मनास आणून इनसाफ मनास आणिले जातील. येणें प्रमाणें करार.

---

१० सूचना.

सवाल ५.—साताऱ्यांतील रामाबाचा गोट पूर्वीं पासून चालत आला तो अलीकडे चालत नाहीं. ऐशास सुदामत[1] प्रमाणें पेठ करून देवावी. कलम.

जबाब—नानासाहेबांचे कारकिर्दीस चालत आल्यास चालेल येणें प्रमाणें करार.

सवाल ६.—पेशजी मोंगलावर स्वारी झाली ते समयीं फौज पाहून दरमहाचा खर्च देण्यांत आला आहे. हल्लींहि दरमहाचा करार करून दिला पाहिजे. कलम.

जबाब—मोंगलाचे मसलतीवर आहेत तों पर्यंत दरमहा खर्चास, दाहा हजार फौज बाळगावी, मेहनत रात्रंदिवस करावी, त्यांत आणिक [प्रकार] नसल्यास दरमहा खर्चास ७५००० रुपये पाऊण लाख रुपये मुदती प्रमाणें पोंचत जातील. करार.

सवाल ७.—मोंगलाई मुलुखांत घासदाणा सदामत पासून आहे, तो मुलुक सरकारांत आल्यास, आह्मांकडील घासदाणा आहे तो सूदामत प्रमाणें चालवावा. कलम.

जबाब—मोंगलाकडील महाल सरकारांत येतील त्या महालाचे घासदाण्याचे ऐवजाचा आकार पाहून त्या ऐवजीं नेहमीं महाल तोडून दरोबस्त दिला जाईल. येणें प्रमाणें करार.

सवाल ८.—आंबाऊं सिंदखेड वगैरे महाल सरकार निसबतीचे आहेत. त्यास तेथें सालाबाद मेजमानी घासदाणा घेण्यांत येत आहे त्या प्रमाणे चालवावें. कलम.

जबाब—माधवराव यांचे कारकिर्दीस करार झाला असेल त्या प्रमाणें चालविलें जाईल. येणें प्रमाणें घासदाणा घेऊं नये, ऐसा करारच असेल. तथापि यादी पाहून यादी प्रमाणें चालूं.

सवाल ९.—स्वदेशचीं वगैरे खेडीं पूर्वीं पासून होतीं त्यांपैकीं कांहीं चालतात; कांहीं अलीकडेस चालत नाहींत, त्यास पहिल्या प्रमाणें करार करून दिले पाहिजेत. त्याची याद आलाहिदा असे. कलम.

जबाब—चालत आहेत त्याचा गुंता नाहीं, चालत नाहींत त्याचे कागदपत्र भोगवटा मनास आणून केलें जाईल येणें प्रमाणें.

---

१ चांगल्या प्रकारे सुरक्षितपणे | २ बाळाजी बाजीराव.

[ १८ ] **श्रीलक्ष्मीकांत.**

आज्ञापत्र, सेनाधुरंधर विश्वासनिधि राजमान्य राजश्री **रघोजी भोंसले सेनासाहेब** सुभा ता। **गिरमाजी**[1] **नाईक गायकवाड** सुा।समानसलासीन मयातैन व आलफ. तुह्मी दोन विनंतिपत्रें सरकारांत पाठविलीं तीं पोंचलीं. लिहिला मजकूर सविस्तर समजला; व **विठू**[2] **पांढऱ्याची** रवानगी केलीत, तो मागील प्रहररात्र राहतांना सरकारांत येऊन दाखल जाहला; त्याचे ही जबानी वरून समजलें. त्यास तीर्थस्वरूप मातोश्री **आजीबाई**[3] **साहेब** यांचे येण्याचा बेत वार्जिक[4] वारामुळें रविवाराचा केला; परंतु मध्यें **गुमगांवास**[5] मुक्काम करून सोमवारीं **टाकळघाटास**[6] यावें असा नेम ठहरला असें **विठूपांढऱ्या** याचे जबानीवरून कळलें. मुक्काम मजकूरीं सरबरा[7] येका दिवसाची; त्यांत तीन मुक्काम खासा स्वारीचे तळ पडले; व पाणी खराब, पुढें सरंजामाची अडचण पडेल, येविशीं तीर्थस्वरूप मातोश्री **आजीबाईसाहेब** यांजला पत्र लिहून मुजरद[8] पांढऱ्याची रवानगी माघारें केली आहे तो तुह्मा जवळ येऊन पोंचल्यावर त्याजेला तुह्मी त्रिवर्ग मिळून घेऊन जाऊन पत्र गुजरून देऊन, मातोश्री साहेबांस विनंती करून, रविवारीं कूच वडिलांचे स्वारीचें करून, टांकळ घाटासच येऊन पोहोंचावें ह्मणजे दर मजलीनें पुढें जाणें घडेल. **विठू** याचे जबानींत समजलें कीं, मातोश्री साहेबां समागमें तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातोश्री **जीजीबाई**[9] व चिरंजीव सौभाग्यवती **गंजाबाई**[10] व सौभाग्यवती **मैनाबाई**[11] ह्या तिघी परभारें निघोन येणार; तीर्थस्वरूप सौभाग्यवती मातोश्री **लक्ष्मीबाई**[12]

---

१. हा शिलेखान्यावरील मुख्य अधिकारी; शिलेखाना = शस्त्रागार.

२. हा सर्व हुजऱ्यांचा नायक. राजा जवळ राहून त्याचे हकूम दुसऱ्या हुजऱ्या कडून करवावे हें त्याचें काम असे.

३. रघोजी(तिसरा)याची आजी-बाकाबाई.

४. वार्जिकवार = वर्जवार. वर्ज दिवस; ज्या दिवशीं प्रयाण अथवा उद्योगारंभ करूं नये असा दिवस.

५. हा गांव नागपुराच्या दक्षिणेस सहा कोसांवर आहे. येथें मुधोजीची बायको चिमाबाई हिनें गणपतीचें सुंदर मंदीर बांधलें आहे. हा गांव अद्याप जानोजी महाराजां कडेच आहे.

६ हा गांव नागपुराच्या दक्षिणेस १० कोसांवर आहे व बोरी स्टेशना पासून दीड कोसावर आहे याची वसाहत सन १७०० च्या सुमारास झाली.

७. सरभरा, सामग्री, मदत.

८. लागलीच, तावडतोब.

९ जिजीबाई कोण? हें रघोजीच्या पहिल्या घरच्या आईचें नांव असावें.

१०. ही तिसऱ्या रघोजीची पहिल्या घरची सख्खी बहीण ही राघोबा शिरके यास दिली असून अद्याप जीवंत आहे.

११. गजाबाईची बहीण, ही विद्यमान त्रिंबकजी आहिरराव उर्फ नानासाहेब अहिरराव यांस दिली होती, हिचाच पहिला मुलगा विद्यमान राजे जानोजी साहेब आहे.

१२. ही मुधोजी उर्फ आपा साहेब सेना-

व सौभाग्यवती सौवित्रीबाई[१३] व चिरंजीव सौभाग्यवती ठमाबाई या तिघींचा कांहीं बेत समजला नाहीं, याकारितां तुह्मी तेथून कोणकोण येणार याचा नांवनिशीचा तपशील मातोश्री साहेबांस आधीं पुसून, जे येतील ते वडिलांचे स्वारी समागमें घेऊन येणें; व अगोदर इकडेस त्याचा तपशील लिहिणें. काल दाहा घटका रात्रौ राजश्री कृष्णराव[१४] जयराम याज बरोबर एक बिजादरी[१५] व लालमहंमद जमादार व एक कंपनी सुभेदार व मातबरदारीचा लवाजमा देऊन तुह्मांकडेस रवाना केले आहेत × × × × याद पाठविली आहे ती पोहोंचेल; मशारनिले याची रवानगी केली तेवेळेस त्याजला सांगण्यात आले आहे जे तुह्मी राजाबागसवार येथें सवार वगैरे लवाजमा उतरून देऊन सडे जातीनें जाऊन तुमची भेट घेऊन मातोश्री साहेबांची भेट घेणें व लवाजमा घेऊन हाजर आहों अशी विनंती करणें; तेथें शंभर गाडे राजश्री गोपाळराव आनंद याज कडून तयार ठेविले आहेत; ते, गाडे राजश्री अमृतराव आनंद याजला सांगोन बोलावून घेणें; त्यांतील कांहीं गाडे याजवर कनातीवर राहोड्या व कनाता ऐशा लावून त्याचा जोड गिरमाजीनाईक याजला माहीत आहे त्याप्रमाणें राहोड्या व कनाता आधीं भरून इकडेस रवाना करून देणें. हत्ती येथून पाठविले आहेत तरि शिलेखान्यांत अंबाऱ्या तयार कांहीं जाहाल्या आहेत व कांहीं राहिल्या त्या तयार करून त्यांचे बुरखे जामदारखान्यांत व पीलखान्यांत[१६] तयार असतील ते बोलावून घेणें व त्याच रीतीनें गाड्याही तयार जाल्या असल्यास व बाकी राहिल्या तयार करून घेऊन मातोश्री साहेबांस सदरीं लिहिल्या अन्वयें घेऊनच येणें. आंबाऱ्याचे घंटा टोपणें जे तयार नसतील ते रातोरात तयार करून घेऊनच येणें. जाणिजे छ. २१ माहे जिलकाद. मोर्तबसूद[१७].

पौ. छ. २१ माहे जिल्काद, उर्फ माघ वद्य ८ शनवार प्रातःकाळचे पहिल्या प्रहरचे सहा घटिका दिवसास पावले सन १२४७.

---

(मागिल पृष्ठावरून पुढें चालू.) धुरधरं यांची बायको हिला १५००० रुपये वार्षिक पेनशन सरकारांतून मिळत असे.

१३. ही आप्पा साहेबांची दुसरी बायको

१४. हा बक्षी घराण्यांतील देशस्थ ब्राह्मण सैन्याधिकारी होता. यास 'मेजर' ची पदवी होती. नागपूरकर भोसल्यांच्या पदरीं अनेक लष्करी अमलदार ब्राह्मणच होते. व त्यांस कर्नल, क्यापटन् इत्यादिक इंग्रजी लष्करी किताब असत. विद्यमान श्री. विनायकराव उर्फ दादा साहेब कपनान हेही देशस्थ ब्राह्मणच आहेत.

१५. बिजादरी ?

× या स्थलीं मूळ प्रतींत जागा वगळली आहे. त्याजवरून तेथील कांहीं अक्षरें गळालीं आहेत.

१६. गजशाला.

१७ आरंभीचीं पत्राच्या माथाळ्यावरील अक्षरें "लक्ष्मीकान्त" व शेवटचीं "मोर्तबसूद" हीं सरकारच्या हातचीं असतात. या पत्राच्या आरंभीं भोसल्यांचा शिक्का असून अखेरीस मोर्तब आहे.

[१९] राजश्री पंतप्रधान[1] याजपासून जाबसाल व्हावयाचे, सुमार ती साठीं[?] तैनमया व आलफ मुक्काम मौजे **कनकापूर** संनिध **श्री ब्राह्मेश्वर गंगा** उत्तरतीर छ १४ माहे जीलकाद फाल्गुन मास; राजश्री **जानोजी भोसले सेनासाहेबसुभा** यांजकडील.

सवाल १.—कड्याचें वतन व निंबगांवचें ठाणें आमचें. त्यास ठाणें वारंवार पाडलें आहेत ते न पडावे, वतन पूर्ववत प्रमाणें चालावें. कलम १

जबाब.—तीर्थरूप कैलासवासी याचे वेळेपासून ठाणें निंबगांव वतन चालतें त्या प्रमाणें चालवें व मनसुबीचा ठहराव तीर्थरूपाचे वेळेस झाला आहे त्या प्रमाणें करावें; येणें प्रमाणें करार.

सवाल २.—हिंदुस्थानांत फौजा जातात त्या महालांत उपद्रव करितात यास्तव पहिल्या पासून हिंदुस्थानांत फौजा जातात त्या वाटेनें सरकारचे फौजेनें जावें. कलम १.

जबाब—पहिल्या पासून ज्या वाटेनें फौजा जातात त्या वाटेनें जातील उपद्रव लागणार नाहीं; येणें प्रमाणें करार.

सवाल ३.—भावाबंदाचीं राजकारण सरकारांत आलीं तरी परिछिन्न[2] ऐकूं नये; आमचे आह्मांकडे लावून द्यावेत. आपण आश्रय देऊं नये. कलम १.

जबाब.—तुह्मीं त्यांचें चालवावें येथून कोणास आश्रय देणार नाहीं; येणें प्रमाणें करार.

सवाल ४.—इंग्रेजाचा कज्या कटक प्रांतीं आहे त्याचा फडशा होत नाहीं. त्यास फौज पाठविली पाहिजे. अथवा खाशानीं गेलें पाहिजे येविषयीं आज्ञा असावी. कलम १.

जबाब.—सरकारांत मसलत नाहीं व तुमची फौज न आल्यास पेंच नाहीं असें असल्यास फौज पाठवावयाची आज्ञा केली जाईल अथवा तुह्मांस निरोप दिला जाईल; येणें प्रमाणें करार.

सवाल ५—आमचे कर्जदार आहेत ते दरवर्षास सरकारांत येऊन बोभाट सांगून आह्मांस त्रैष्ट[3] लावतील. त्यास प्रस्तुत दवलतेंत पैका नाहीं. यास्तव कोणाचा अर्ज ऐकून तुर्त आह्मांस तगादा न व्हावा; पुढें दवलतींत पैक्याची आमदाणी झाल्यास वाजवी कर्ज असेल तें आज्ञेप्रमाणें वारूं. कलम १.

---

१. माधवराव बल्लाळ. हा तह ग्रान्डडफ यानें दिला आहे (इंग्रजी इतिहास तृ० आ० पृ० ३४२)

२ बिलकुल.

३. त्रास. उपद्रव

सुरकार्यार्थ घटज[17]मुनि वाराणसि पावला तुझ्या विरहा ॥
ज्ञानी हि स्मरुनि तुतें अनुदिन ह्मणतो ह्मणेल ही चिर हा[18] ॥२०॥
श्रीकाशि तुझ्या ठायीं यात्रोत्सव सर्वदा नवे शत गे ॥
भव[19] न तुज पुढें जैसा नृहरि पुढें सर्व दानवेश[20] तगे ॥ २१ ॥
भुक्ति मिळे मुक्ति मिळे दोनी हि सुखें चि काशि साधुनि घे ॥
मधुमधुनि पिपीलिके[21]सा तुज मधुनि कधीं स्वयें न साधु निघे ॥२२॥
"का" ह्मणतां काळ पळे जो सर्वांचा हि सर्व मद नाशी ॥
अति दुर्लभ शील मिळे येतां त्वन्नाम वर्ण[22] वदना "शी" ॥ २३ ॥
सेवन करुनि यत्नें वांछितसे जेंवि साधु जन काशी ॥
परमेश्वरा स्वधर्मे भजुनि तुला तेंवि साधु जनकाशी ॥ २४ ॥
श्रीकाशि श्रीगंगा भेटुनि तुज निकट सविनया वाहे ॥
ह्मणति अशांतपणें मज रागा कोणी हि कवि न यावा हे ॥ २५ ॥
हा रामसुत मयूर हि पावावा मरण काशि तव अंकीं[23] ॥
त्वां प्रभुतें विनवुनि बहु उद्धरिले जे निमग्न भवपंकीं[24] ॥ २६ ॥

इति श्रीरामनंदनमयूरविरचिता श्रीकाशीप्रार्थना समाप्ता.

---

**समाप्त.**

## ॥ अथ श्रीमद्भगवद्गीतास्तुत्यार्याः ॥

श्रीमद्भगवद्गीते वर्णावें आदरें तुला नमुनी ॥
सर्वोपनिषत्सारे माते तुज पाहती तुला[1] न मुनी ॥ १ ॥
तुज सोडुनि तरि तरते अन्याचे जीव जरि उपासक ते ॥
त्यजुनि अमृत लंघाया मृतितें सेवूनि जरि तुपा सकते ॥ २॥
भगवद्गीते ज्ञात्या अधिका तुजहुनि सुधा[2]नदी नाहीं ॥
त्वद्भक्ता तापांहीं भय जेंवि दिजे बुधा न दीनांहीं[3] ॥ ३ ॥
तुज भजत्या संसारीं वसतां गतिलाभ होय जो गीते ॥
त्यासि न पात्र भ्रमति श्रमति व्यर्थ चि तपोनि जोगी ते ॥ ४ ॥

---

१७ घटज = अगस्त्य. १८ हा = हायहाय. १९ भव = संसार. २० दानवेश = दैत्येंद्र = हिरण्यकशिपु. २१ पिपीलिक = मुंगळा. २२ वर्ण = अक्षर. २३ अंक = मांडी. २४ पंक = चिखल.

१ तुला = उपमा. २ सुधा = अमृत ३ दीन = गरीब.

सेवुनि सुधा हि तापति कामक्रोधार्त सतत रोगी ते ॥
संसारीं प्राशुनि तुज हा रामतनूज नत तरो गीते ॥ ५ ॥
जय मोह[4]महिषमर्दिनि जय भगवति गेय[5]गुरुगुणे गीते ॥
जरि झाली नसतीस प्रकटा तूं यति हि बहु भवा भीते॥ ६ ॥
तव [†]सचिव द्वैपायन[6] शंकर मधु[7]सूदनादि योगी ते ॥
ज्ञानेश[8] प्रतिनिधि हें वर्णन तुझिया मनास यो गीते ॥ ७ ॥
युवराज तुझा वा[9]मन वाम न मानू तुवांचि मानावें ॥
गुरु लघु कविनीं प्रभुतें नित्य यथामति विशंक वानावें ॥ ८ ॥
भगवति शुचिकीर्ति तुझी सुमति ज्ञा[10]नेश्वरी प्रिया आ[11]ली ॥
झाली विश्वख्याता हे कार्या बहु जनांचिया आली ॥ ९ ॥
नेती तिकडे जासी भगवति बहु मत इचें[12] तुला उक्त ॥
ज्ञानेश्वरीस जन जे अनुसरले त्यांसि करिसि तूं मुक्त ॥१० ॥
श्रीमद्भगवद्गीते नियमें जो करितसे तुझा पाठ[13] ॥
तारिसि तया तयाच्या घेउनि कामादिशत्रुंची पाठ ॥ ११ ॥
त्यातें मुक्ति वरि तुझे गीते अध्याय पाठ अठरा ज्या ॥
लोक[14]पाति त्यजुनि जसी ती दमयंती करूनि हठ राजा[15]॥१२॥
एकचि अध्याय पुरे किंबहुना श्लोक एक हा नियम॥
गीते त्वदाश्रितजनीं तिळ हि करिल न बहु मानहानि यम ॥१३॥
पटु अघ[16] हरूनि जलधिचे असुर मधुनि शंभुचे उदार पण ॥
हतभव[17]भीते गीते अत्यंताद्भुत तुझें उदारपण ॥ १४ ॥
साधनसंपत्तिपरा झाल्या तुज नम्र कंधरा[18] आर्या[19] ॥
भावेंसमर्पिल्या या तव चरणीं नमुनि पंधरा आर्या ॥ १५॥
इति श्रीरामनंदनमयुरेश्वरविरचिता श्रीमद्भगवद्गीतास्तुतिःसंपूर्णा.

---

**समाप्त.**

---

